# १९६० नंतरच्या स्त्री निबंधकारांच्या ललित निबंधांचा चिकित्सात्मक अभ्यास (शान्ता ज. शेळके, सुनीता देशपांडे, इंदिरा संत, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे)

(A CRITICAL STUDY OF LITERARY ESSAYS POST 1960 WOMEN WRITERS WITH SPECIAL REFERENCE TO SHANTA SHELKE, SUNITA DESHPANDE, INDIRA SANT, PRATIMA INGOLE AND ARUNA DHERE)

**पीएच्. डी. (मराठी) पदवीसाठी सादर केलेला संशोधन प्रबंध**


**मराठी अध्ययन शाखा**

शेणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

गोवा विद्यापीठ

**अभ्यासक**

**नयन काशिनाथ राणे**

**गोवा विद्यापीठ**

**गोवा**


**मार्च २०२४**

# DECLARATION

I, **NAYAN KASHINATH RANE** hereby declare that this thesis represents work which has been carried out by me and that it has not been submitted, either in part or full, to any other University or Institution for the award of any research degree.

Place: **Taleigao Plateau.**
Date:

**NAYAN KASHINATH RANE**

# CERTIFICATE

Date:

I hereby certify that the above Declaration of the candidate, **Nayan Kashinath Rane** is true and the work was carried out under my supervision.

**Dr. Sunita Umraskar**
(Guide)
Marathi Faculty
Shenoi Goembab School of Languages and Literature
Goa University

# १९६० नंतरच्या

# स्त्री निबंधकारांच्या निबंधांचा चिकित्सात्मकअभ्यास

(शान्ता ज. शेळके, सुनीता देशपांडे, इंदिरा संत, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे)

# मनोगत

एम. ए. करत असताना स्त्री लिखित साहित्य वाचून मन प्रभावीत झाले होते. एक स्त्री म्हणून स्त्रीने लिहिलेले साहित्य मला अधिक भावले व एम. ए संपल्यानंतर गोवा विद्यापीठाच्या पीएच्. डी. पदवी परीक्षेसाठी '१९६० नंतरच्या स्त्री निबंधकारांच्या ललित निबंध लेखनाचा चिकित्सात्मक अभ्यास (शान्ता ज. शेळके, सुनीता देशपांडे, इंदिरा संत, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे) हा विषय घेण्याचे निश्चित केले आणि डॉ. सुनीता उम्रस्कर यांच्या मार्गदर्शनानुसार अभ्यास पूर्ण केला.

डॉ. सुनीता उम्रस्कर या माझ्या एम.एच्या शिक्षिका असल्याने त्यांच्याशी याविषयासंबंधी चर्चा करणे मला अधिक सोपे झाले. मराठी विभाग प्रमुख म्हणून त्यांच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या सांभाळून मॅडमने मला खूप सांभाळून घेतले. माझ्या वैयक्तिक अडचणी समजून घेऊन हा अभ्यास मी कसा पूर्ण करू शकेल याविषयी समजून सांगितले. आपला मौलिक वेळ काढून माझ्याशी अतिशय आत्मीयतेने चर्चा केल्या. माझ्या संशोधनाला दिशा दिली, माझे प्रबंध लेखन तत्परतेने तपासून मौलिक सूचना केल्या. निवडलेल्या विषयाचा आवाका व पाच लेखिकांच्या साहित्याची व्याप्ती याचे मनावर प्रचंड दडपण होते. अशा परिस्थितित मॅडमने अत्यंत काळजीपूर्वक मार्गदर्शन करून माझ्याकडून प्रबंध लेखन करून घेतले. हा संशोधनपर अभ्यास योग्यरित्या करवून घेण्यात मॅडम उम्रस्करांचे मोलाचे योगदान आहे. त्यामुळे या माझ्या मनोगतात त्यांच्या मोठया सहकार्याचे छोटेसे ऋण व्यक्त करू इच्छिते. माझ्या मार्ग दर्शिका डॉ. सुनीता उम्रस्कर यांची मी शेवटपर्यंत ऋणी राहिल.

हा अभ्यास पूर्ण करताना माझ्या मैत्रीणी श्रीमती श्रध्दा गणोरकर व कुमारी उन्नती नारूलकर यांनी मोलाची मदत केली. श्रध्दा गणोरकरने मला देवनागरी फॉन्ट उपलब्ध करून देऊन टंक लेखन करायला शिकविले तर उन्नती नारूलकरने काहीवेळा टंक लेखन करायला मदत केली. याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. त्याचबरोबर या अभ्यासात डॉ. आशा गेहलोत, प्रा. प्रमोद पवार आणि डॉ. युवराज धबडगे यांचीही मदत लाभली त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

या संशोधनासाठी मला अत्यंत मोलाची मदत केली ते माझे पती प्रा. विशाल अडवईकर यांच्याकडून मला नेहमीच प्रेरणा मिळाली. हे संशोधन पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांनी अतोनात परिश्रम घेतले. संशोधनास आवश्यक असणारी पुस्तके उपलब्ध करून दिली त्यामुळे अभ्यास करण्यास मला सोपे झाले. त्यांच्या सहकार्यामुळेच हा प्रबंध मी पूर्ण करू शकले. त्यांच्या ऋणातून मला मुक्त होता येणार नाही. त्याचबरोबर माझी कन्या कु. विहा अडवईकर यांच्याकडे पाहून माझ्या मनात नेहमीच उत्साह निर्माण व्हायचा. त्यामुळे तिचा उल्लेख केल्याशिवाय हे मनोगत पूर्ण होणार नाही.

माझ्या शिक्षणाचा पाया ज्यांच्या कष्टांवर उभा आहे ते माझे वडील श्री. काशिनाथ राणे व आई श्रीमती सुशीला राणे यांचे ऋण मी औपचारिकरित्या व्यक्त करू शकत नाही. यांनी केवळ शिक्षण दिले नाही तर मला सहकार्य केले, अभ्यासाकडे प्रोत्साहित केले. अभ्यासात व्यस्थ असताना माझ्या मुलीचा सांभाळ केला. त्यामुळे त्यांचे मोल अमुल्य आहे. त्याचबरोबर माझी बहिण नविता, भाऊ कु. मेघनाथ राणे व माझे भावोजी श्री देवेंद्र हळर्णकर, श्री परेश सावंत यांनी मला वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा आवर्जून उल्लेख येथे करावा लागतो. त्याचबरोबर माझे मामा श्री. रत्नाकांत नाईक, श्री. सत्यावान नाईक, मावश्या श्रीमती विश्रांती नाईक व कालिंदी नाईक यांनी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मला सहकार्य केल्याने मी त्यांची ऋणी आहे.

या प्रबंधाचे लेखन करीत असताना मला गोवा विद्यापीठाचे संयुक्त कुलसचिव सर डोनाल्ड रॉड्रिगज, सहाय्यक ग्रंथपाल सर नंदकिशोर बांदेकर, कार्यालयीन कर्मच्यारी श्रीमती स्नेहा हळदणकर यांनी वेळोवेळी सहकार्य केले त्यामुळे मी त्यांची मनापासून आभारी आहे. त्याचबरोबर गोवा विद्यापीठाचे ग्रंथालय, कृष्णदास शामा केंद्रिय ग्रंथालय पणजी, तालूका ग्रंथालय वाळपई, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय या ग्रंथालयांमध्ये संशोधनासाठी लागणारी पुस्तके अगदी विनासायास मिळाली. ती पुस्तके उपलब्ध करून देणाऱ्या तेथिल कर्मचाऱ्यांची मी ऋणी आहे. अशा अनेक माणसांच्या सहकार्याने हे संशोधनाचे काम मी पूर्ण करू शकले याची जाणीव मला कायम राहिल.

**नयन काशिनाथ राणे**

## अनुक्रमणिका


| शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| **भूमिका** | **१ - ३** |
| **प्रकरण पहिले** | **४ - ५३** |
| **१. निबंध लेखनाचे स्वरूप व वाटचाल** | |
| १.१ प्रास्ताविक | |
| १.२ निबंध लेखनाचे स्वरूप | |
| १.२.१ 'निबंध' या साहित्यप्रकाराची व्याख्या | |
| १.२.२ निबंधाचे प्रकार | |
| १.२.२.१ वैचारिक निबंध लेखनाचे स्वरूप | |
| १.२.२.२ ललित निबंध लेखनाचे स्वरूप | |
| १.२.३ निबंधाचे उपप्रकार | |
| १.३ निबंध लेखनाची वाटचाल | |
| १.३.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील निबंध लेखन | |
| १.३.२ स्वातंत्र्योत्तर काळातील निबंध लेखन | |
| १.४ निष्कर्ष | |
| १.५ संदर्भ सूची | |
| **प्रकरण दुसरे** | **५४ - ११७** |
| **२. शान्ता ज. शेळके यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप** | |
| २.१ प्रास्ताविक | |
| २.२ शान्ता शेळके यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका | |
| २.३ शान्ता शेळके यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय | |

२.३.१ आत्मपर लेख

२.३.२ स्त्रीविषयक लेख

२.३.३ साहित्यविषयक लेख

२.३.४ प्रवासवर्णनपर लेख

२.३.५ व्यक्तिचित्रणपर लेख

२.३.६ चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख

२.४ शान्ता शेळके यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

२.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

२.४.२ आत्माविष्कार

२.४.३ काव्यात्मकता

२.४.४ चित्रमयता

२.४.५ चितंनशीलता

२.४.६ घटनांचा संदर्भ

२.४.७ व्यासंग

२.४.८ भाषाशैली

२.५ शांता शेळके यांच्या लेखनाचे वेगळेपण

२.६ निष्कर्ष

२.७ संदर्भ सूची

**प्रकरण तिसरे** **११८ – १६३**

**३. सुनीता देशपांडे यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप**

३.१ प्रास्ताविक

३.२ सुनीता देशपांडे यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

३.३ सुनीता देशपांडे यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

३.३.१ आत्मपर लेख

३.३.२ साहित्यविषयक लेख

३.३.३ निसर्गवर्णनपर लेख

३.३.४ प्रवासवर्णनपर लेख

३.३.५ व्यक्तिचित्रणपर लेख

३.३.६ चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख

३.४ सुनीता देशपांडे यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

३.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

३.४.२ आत्माविष्कार

३.४.३ काव्यात्मकता

३.४.४ चिंतनशीलता

३.४.५ घटनांचा संदर्भ

३.४.६ व्यासंग

३.४.७ भाषाशैली

३.५ सुनीता देशपांडे यांच्या लेखनाचे वेगळेपण

३.६ निष्कर्ष

३.७ संदर्भ सूची

**प्रकरण चौथे** **१६४ - १९५**

**४. इंदिरा संत यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप**

४.१ प्रास्ताविक

४.२ इंदिरा संत यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

४.३ इंदिरा संत यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

४.३.१ आत्मपर लेख

४.३.२ स्त्रीविषयक लेख

४.३.३ साहित्यविषयक लेख

४.३.४ व्यक्तिचित्रणपर लेख

४.३.५ चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख

४.४ इंदिरा संत यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

४.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

४.४.२ आत्माविष्कार

४.४.३ काव्यात्मकता

४.४.४ चित्रमयता

४.४.५ चिंतनशीलता

४.४.६ घटनांचा संदर्भ

४.४.७ व्यासंग

४.४.८ भाषाशैली

४.५ इंदिरा संत यांच्या लेखनाचे वेगळेपण

४.६ निष्कर्ष

४.७ संदर्भ सूची

**प्रकरण पाचवे** **१९६ - २४२**

**५. प्रतिमा इंगोले यांच्या ललित व वैचारिक निबंध लेखनाचे स्वरूप**

५.१ प्रास्ताविक

५.२ प्रतिमा इंगोले यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

५.३ प्रतिमा इंगोले यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

५.३.१ आत्मपर लेख

५.३.२ स्त्रीविषयक लेख

५.३.३ साहित्यविषयक लेख

५.३.४ प्रवासवर्णनपर लेख

५.३.५ व्यक्तिचित्रणपर लेख

५.४ प्रतिमा इंगोले यांच्या ललित लेखनाचे वाङ्मयीन विशेष

५.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

५.४.२ आत्माविष्कार

५.४.३ काव्यात्मकता

५.४.४ चिंतनशीलता

५.४.५ घटनांचा संदर्भ

५.४.६ व्यासंग

५.४.७ ललित निबंध लेखनाची भाषाशैली

५.५ प्रतिमा इंगोले यांच्या वैचारिक निबंध लेखनाचा आशय

५.५.१ स्त्री दुःख व स्त्री समस्यांचे चित्रण करणारे लेख

५.५.२ स्त्रीच्या मागास वृत्तीवर भाष्य करणारे लेख

५.५.३ समाजाने स्त्रीला दिलेल्या दुय्यम स्थानावर भाष्य करणारे लेख

५.५.४ सुधारकांवर आधारित लेख

५.५.५ स्त्री सामर्थ्याचे चित्रण करणारे लेख

५.६ प्रतिमा इंगोले यांच्या वैचारिक लेखनाचे वाङ्मयीन विशेष

५.६.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

५.६.२ वैचारिक लेखनाची भाषाशैली

५.७ प्रतिमा इंगोले यांच्या लेखनाचे वेगळेपण

५.८ निष्कर्ष

५.९ संदर्भ सूची

**प्रकरण सहावे** **२४३ - २९५**

**६. अरुणा ढेरे यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप**

६.१ प्रास्ताविक

६.२ अरुणा ढेरे यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

६.३ अरुणा ढेरे यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

६.३.१ आत्मपर लेख

६.३.२ स्त्रीविषयक लेख

६.३.३ साहित्यविषयक लेख

६.३.४ निसर्गवर्णनपर लेख

६.३.५ प्रवासवर्णनपर लेख

६.३.६ व्यक्तिचित्रणपर लेख

६.४ अरुणा ढेरे यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

६.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

६.४.२ आत्माविष्कार

६.४.३ काव्यात्मकता

६.४.४ चित्रमयता

६.४.५ चिंतनशीलता

६.४.६ घटनांचा संदर्भ

६.४.७ व्यासंग

६.४.८ भाषाशैली

६.५ अरुणा ढेरे यांच्या लेखनाचे वेगळेपण

६.६ निष्कर्ष

६.७ संदर्भ सूची

**प्रकरण सातवे** **२९६ - ३२०**

**७.समारोप**

७.१ प्रस्तावना

७.२ निवडक लेखिकांच्या लेखनाचा आढावा

७.३ निष्कर्ष

**परिशिष्ट** **३२१ – ३५१**

निवडक लेखिकांचा जीवन परिचय व वाङ्मयीन कार्य

**संदर्भ ग्रंथांची सूची** **३५२ - ३५६**

# भूमिका

## प्रास्ताविक

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्यात अंतर्बाह्य बदल झालेले दिसून येतात. त्यामधील निबंध हा एक साहित्यप्रकार मराठी साहित्यक्षेत्राच्या दालनात महत्त्वाचा मानला जातो. १९५० नंतर 'निबंध' या साहित्यप्रकाराच्या रूप–गुणात बदल झाला. 'निबंध' या नावाने ओळखला जाणारा साहित्यप्रकार स्वातंत्र्योत्तर कालखंडात 'ललित निबंध' म्हणून प्रचलित झाला. यामागचे कारण म्हणजे वैचारिकतेकडून निबंध लालित्याकडे वळला. त्यात आत्माविष्काराला महत्त्व आले. त्यामुळे या काळात अनेक लेखकांनी ललित निबंध लिहून मराठी साहित्यक्षेत्र अधिक समृद्ध केले.

एखादी विचार पद्धती, मानसिक जडण–घडण, भोवतालच्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी याच्या प्रभावातून साहित्य निर्मिती होते. निर्मात्याचा भोवतालचा प्रदेश, त्याचे अनुभव, त्याच्या जीवनातील घटना–प्रसंग त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंधित असल्याकारणाने साहित्यकृतीमध्ये त्याचे प्रतिबिंब पाहता येते. पाचही लेखिकांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे जीवन, त्यांच्या विचारांना निबंध लेखनाद्वारे जाणून घेत असताना त्यांच्या निबंध लेखनाचा आशय, अभिव्यक्ती, त्यांच्या लेखनाचे विशेष, भाषाशैली यांचा सखोल अभ्यास करून त्यांच्या लेखनाला लाभलेल्या वाङ्मयीन स्वरूपाचा अभ्यास केला आहे.

## विषयाची निवडः

मराठी साहित्यक्षेत्रात स्त्री लेखिकांनी जी मोलाची भर घातली आहे त्याचे महत्त्व अनेकार्थाने अमुल्य आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात स्त्रियांनी संख्यात्मक तशीच गुणात्मक भर घातलेली दिसून येते. त्यामुळे स्त्रियांच्या निबंध लेखनाचा अभ्यास करायचा असे ठरवले. या संशोधनासाठी निवडलेल्या पाच स्त्री लेखिकांच्या लेखनाला विशेष दर्जा प्राप्त झालेला दिसून येतो. निवडलेल्या या पाचही स्त्री लेखिकांच्या निबंध लेखनाचा चिकित्सक अभ्यास व्हायला हवा असे वाटले आणि "१९६० नंतरच्या स्त्री निबंधकारांच्या ललित निबंधांचा

चिकित्सात्मक अभ्यास (शान्ता ज. शेळके, सुनीता देशपांडे, इंदिरा संत, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे)" हा विषय निश्चित केला.

## संशोधनाची व्याप्तीः

आज जरी निबंध लेखनाला ललित निबंध असे संबोधत असले तरी आजचे ललित निबंध लालित्याबरोबरच वैचारिकतेलाही सामावून घेणारे आहे. त्यामुळे लेखिकांच्या वैचारिक व ललित या दोन्ही प्रकारच्या निबंधांचा अभ्यास केला आहे.

या पाचही लेखिकांच्या निबंध लेखनातील आशय व अभिव्यक्ती याचे विश्लेषण करून त्यांच्या निबंध या साहित्यप्रकाराचे स्वरूप व वैशिष्टये तपासून प्रत्येक लेखिकेच्या निबंधातून जाणवणारे आत्मविष्काराचे स्वरूप तपासले आहे.

## संशोधन किंवा प्रबंधाची मर्यादाः

या प्रबंधाचे शिर्षक '१९६० नंतरच्या स्त्री निबंधकारांच्या निबंधांचा चिकित्सात्मक अभ्यास (शान्ता ज. शेळके, सुनीता देशपांडे, इंदिरा संत, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे)' असे असले तरी यात केवळ पाच लेखिकांनी १९६० ते २०१३ पर्यंत लिहिलेल्या निबंध लेखनाचा अभ्यास केला आहे.

## संशोधन विषयाची गृहीतके (अभ्युपगम):

१. निवडक लेखिकांचे निबंध लेखन हे आत्मपर लेखन स्वरूपाचे आहे.

२. स्त्रीविषयक लेखन, साहित्यविषयक लेखन, निसर्गवर्णनपर लेखन, प्रवासवर्णनपर लेखन, व्यक्तिचित्रणपर लेखन व चिंतनपर किंवा विचारप्रधान लेखन अशा विविध विषयांनी नटलेले या लेखिकांचे निबंध लेखन आहे.

३. स्त्री लेखिकांच्या ललित निबंध लेखनात स्त्रियांच्या विविध समस्यांचे चित्रण केले आहे.

४. लेखिकांच्या निबंध लेखनात संवेदनशीलता हा महत्त्वाचा पैलू म्हणून निदर्शनास येतो.

५. निसर्गवर्णनपर लेखात निसर्ग सौंदर्याचा आविष्कार घडवित असताना मानवाचा निसर्गा शी असलेला संबंध व्यक्त झालेला आहे.

६. ललित निबंधातील व्यक्तिचित्रे लेखकाच्या स्वानुभवातून साकार झालेली आहेत.

७. पुर्वपरंपरेपेक्षा आधुनिक वैचारिकतेचा प्रभाव या निवडक लेखिकांच्या निबंध लेखनावर आहे.

## संशोधनाचे ध्येय आणि उद्दिष्टये:

१. 'ललित निबंध' हा साहित्यप्रकार आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख व चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशा उपप्रकारांना सामावून घेणारा साहित्यप्रकार आहे. त्यामुळे या उपप्रकारांचा निवडलेल्या पाचही लेखिकांच्या निबंधाद्वारे शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

२. पाचही लेखिकांच्या लेखनाचे स्वरूप तपासून, लेखनातील आशयाचा व अभिव्यक्तीचा शोध

घेणे हे या संशोधनाचे उद्दिष्ट ठरते.

३. प्रस्तुत लेखिकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्टयांचा शोध घेऊन त्यांच्या निर्मितीप्रक्रियेतील महत्त्वाचे पैलू उलगडून दाखवणे महत्त्वाचे आहे.

४. निवडलेल्या स्त्रीनिबंधकारांच्या निबंधात दिसणारा जीवनविषयक विचार, त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभ्यासणे.

५. लेखिकांच्या निबंध लेखनाच्या वाङ्मयीन विशेषांचा शोध घेणे.

६. निबंधकारांच्या लेखनाची भाषाशैली तपासणे. अशी काही उद्दिष्टये या संशोधनामागे आहेत.

# प्रकरण पहिले

# निबंध लेखनाचे स्वरूप व वाटचाल

# प्रकरण पहिले

## १. निबंध लेखनाचे स्वरूप व वाटचाल

### १.१ प्रास्ताविक

कविता, कथा, कादंबरी, नाटक, निबंध लेखन इत्यादी ललित साहित्याचे उपप्रकार आहेत. तथापि निबंध हा साहित्यप्रकार वैचारिक व ललित अशा दोन्हीं प्रकारात समाविष्ट होणारा साहित्यप्रकार आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळी लिहिला जाणारा निबंध स्वातंत्र्योत्तर काळात नव्या जाणिवांनी प्रेरित होऊन आला. त्यामुळे पूर्वी 'गुजगोष्टी', 'लघुनिबंध', 'लघुलेख' अशा नावाने संबोधला जाणारा हा साहित्यप्रकार आज 'ललित निबंध' या नावाने ओळखला जातो.

'ललित निबंध' या प्रकारात केवळ लालित्यालाच महत्त्व नसून कल्पना, भावना आणि विचार यांनाही तितकेच महत्त्व आहे. लेखक समाजाचा घटक असल्याकारणाने त्याने न्याहाळलेले समाजजीवन साहित्यात व्यक्त होत असते. केवळ समाज जीवनच नव्हे तर त्याचे स्वतःचे विचार, स्वतःचे अनुभव लेखकआपल्या लेखनात मांडत असतो. हे स्वतःचे अनुभव म्हणजेच 'मी'चा आत्माविष्कार आहे. आत्माविष्कार हे प्रयोजन आजच्या साहित्यात महत्त्वाचे झाले आहे. माणूस आपले स्वतःचे मन मोकळे करण्यात किंवा स्वतःला व्यक्त करण्यात आनंद मानत असतो आणि या आत्माविष्काराला ललित निबंध या साहित्यप्रकाराने वाट करून दिलेली आहे. त्यामुळे अनेक लेखक व लेखिकांनी ललित निबंध हा साहित्यप्रकार अनेकअंगांनी समृद्ध केला. या साहित्यप्रकाराने साहित्यक्षेत्रात व समाजमनात एक महत्त्वाची जागा निर्माण केली आहे. तर पहिल्या प्रकरणात निबंध या साहित्यप्रकाराचे स्वरुप व वाटचालीचा परामर्श घेतला आहे.

### १.२ निबंध लेखनाचे स्वरूप

साहित्य ही एक व्यापक संकल्पना आहे. इंग्रजीतील 'literature' या शब्दाचा प्रतिशब्द म्हणून मराठीत 'साहित्य' हा शब्द वापरला जातो. आणि साहित्य या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून 'वाङ्मय' हा शब्द मराठीत रूढ झाला आहे. 'साहित्य' हा शब्द 'सहित' या संस्कृत शब्दापासून निर्माण झाला आहे. 'सहित' या शब्दाचा अर्थ एकत्रित ठेवणे असा आहे. 'साहित्य'

या शब्दाची व्युत्पत्ती मराठी व्युत्पत्ती कोशात पुढीलप्रमाणे दिली आहे. "सामानसुमान सामग्री, मदत, उत्तम वाङ्मय, Instruments kept ready for product, apparatus literature"[१]

"Literature is a production of languages."[२] अशी साहित्याची व्याख्या केली जाते. भाषा आणि साहित्य यांचा असलेला संबंध या व्याख्येवरून स्पष्ट होतो. भाषेच्या माध्यमातून माणूस आपले विचार व्यक्त करत असतो. आपले अनुभव, आपल्या भावना भाषेद्वारे दुसऱ्यापर्यंत संक्रमीत करत असतो. या प्रक्रियेतूनच 'साहित्य' या कलेचा जन्म झाला. 'Literature' या शब्दाचा अर्थ साहित्य, वाङ्मय, ललित लेखन म्हणजे "एखाद्या विषयावरील सर्व ग्रंथसंपत्ती, छापील माहिती पुरवणारी पत्रके"[३] असे सांगितले आहे.

आज आपण ज्याला साहित्य, वाङ्मय म्हणत आहे; ते लेखन शब्दसौंदर्याने नटलेले, विशिष्ट ध्येयापायी लिहिलेले, बुद्धिपुर्वक रचलेले, निश्चित स्वरुपाचे व कोणत्यातरी प्रकाराच्या साच्यात बसणारे लेखन असते. साहित्याचे गद्य व पद्य असे दोन विभाग केले जातात. पद्यामध्ये कविता लेखन तर गद्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, लघुनिबंध, प्रवासवर्णने, आत्मकथन, चरित्र लेखन इत्यादी साहित्यप्रकारांचा अंतर्भाव केला जातो. मात्र गद्य लेखनाचे मुख्य दोन प्रकार आहेत; ते म्हणजे वैचारिक गद्य आणि दुसरे ललित गद्य. वैचारिक साहित्यामध्ये लालित्याला, कल्पनेला वाव नसतो. वैचारिक साहित्यामध्ये विषय प्राधान्य, तर्कशुद्धता व कठोर विचार या गोष्टींना अधिक महत्त्व असते. त्यामुळे वैचारिक साहित्याला म्हणजेच ललितेत्तर साहित्याला 'non fiction' असे शब्द वापरले जातात. याचा अर्थ वास्तव, कल्पनाशुन्य असा घेता येईल. २२ मे १९३९ या दिवशी केलेल्या भाषणात लेखक ना. सी. फडके वास्तववादी साहित्याबद्दल आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, "ज्या ललितकृतीत माणसांनी कसं वागावं याबद्दलचं विवेचन न करता फक्त माणसं प्रत्यक्ष कशी वागतात व त्यांच्या सुखदुःखाचं प्रत्यक्ष स्वरूप कसं असतं याचच वर्णन लेखक करतो. त्याची वास्तववादी साहित्यात गणना केली पाहिजे"[४] किंवा "वास्तव घटनांवर एक विचारवंताने तळमळीने केलेले

भाष्य"[५] वरील दोन्हीं स्पष्टीकरणावरून विषय प्राधान्य आणि वास्तव घटनांवर निव्वळ विचारांची मांडणी करणारे लेखन म्हणजेच वैचारिक साहित्य.

दुसरा गद्य प्रकार म्हणजे 'ललित साहित्य'. ललित साहित्यामध्ये कल्पना आणि भावना यांना महत्त्व असते. याचा अर्थ ललित साहित्यामध्ये वास्तव नसते असे नव्हे. आपल्या भाषणामध्ये लेखक ना. सी. फडके ललित साहित्याची व्याख्या करतात, "ललित साहित्य' म्हणजे स्वतः अनुभवलेली सुखदुःख किंवा कल्पनेनं जाणलेली इतरांची सुखदुःख सांगण्यासाठी काव्यवृत्तीच्या माणसांनी शोधून काढलेली एक प्रकारची भाषा होय."[६] याचा अर्थ ललित साहित्यातही वास्तवाला कमी अधिक महत्त्व असते. कल्पना आणि वास्तव या दोहोंचे मिश्रण ललित साहित्यामध्ये असलेले आपल्याला जाणवते. माणसाकडे जे आहे त्याचा अनुभव घेत असताना जे त्याच्यापाशी नाही याचाही कल्पनेच्या जोरावर तो अनुभव घेत असतो. उदा. दुःखातही आपण सर्वसुखी आहोत अशी कल्पना माणसाला करता येते. म्हणजेच कल्पनेच्या जोरावर लेखक वास्तवाला कमी तापदायक करू शकतो. जे घडलंच नाही ते घडलं अशी कल्पना करून ललित लेखक स्वतः त्यात रंगून जात असताना वाचकांनाही शब्दकलेच्या माध्यमातून रमवताना जाणवतो आणि हे त्याला त्याच्यापाशी असलेल्या प्रतिभेमुळे शक्य होत असते. जी गोष्ट सामान्य माणसाला समजून सांगता येत नाही तीच गोष्ट लेखक लोकांना सहज लक्षात येईल अशाप्रकारे रमणीय पद्धतीने सांगत असतो. असे करणे लेखकाला ललित लेखनात शक्य आहे असे आपण म्हणू शकतो. "जे तुम्हाआम्हाला नीट कळत नाही ते ज्यांना कळलं तेवढंसुध्दा नीट बोलून दाखविता येत नाही ते ज्यांना स्पष्ट कळतं व सांगता येतं त्याला ललित लेखन म्हणावं अशी व्याख्या करायला काही हरकत नाही."[७] ही ना. सी. फडके यांनी केलेली व्याख्या लक्षणीय वाटते.

वरील स्प्ष्टीकरणावरून ललित साहित्यात वास्तव आणि कल्पना यांचे मिश्रण असते आणि हे प्रतिभावंत लेखकामुळे शक्य होते असे म्हणता येते. याचा अर्थ ललित व ललित्तेतर साहित्यात पूर्णतः विरोध आहे असे आपण म्हणू शकत नाही. कारण ललित्तेतर साहित्यातही वास्तव असते आणि ललित लेखनातही काही प्रमाणात वास्तव असते. ललित्तेतर साहित्यात विचारांची मांडणी असते आणि ललित लेखनातही विचार व्यक्त होताना जाणवतात. फक्त ललित साहित्यात त्या विचारांना भावनांची जोड असते. तो विचार सुंदर शब्दांत वाचकाला

लगेच भावेल अशा आकर्षक भाषेत मांडला जातो. महत्त्वाची गोष्ट म्हणजे साहित्यामध्ये मानवी जीवनाचे दर्शन होत असताना दिसते. याच साहित्याच्या माध्यमातून लेखक स्वतःच्या अनुभवातून किंवा अवलोकनात आलेल्या अनुभवातून वाचक वर्गाला विचार करायला लावतो.

उपदेश करणे, बोध देणे, नीतीमत्तेला चालना देऊन मानवी मनाला सन्मार्गाकडे प्रवृत्त करणे अशा काही प्रयोजनातून साहित्य निर्माण होत असते. माणसाला तर्कशुद्ध विचार देऊन प्रबोधित करणे अशी महत्त्वाची भूमिका बजावण्याचे कार्य इंग्रजी राजवटीत होत होते; आणि हे कार्य पूर्वी वैचारिक साहित्याच्या माध्यमातून होत होते. या काळात मराठी भाषेमध्ये 'निबंध' लेखनाला सुरुवात झाली. ब्रिटिशांच्या कालखंडामध्ये अशा निबंधाच्या माध्यमातून उपदेश करण्याचे काम सुरू झाले. या कालखंडात ज्ञान देणारी महाविद्यालयाची स्थापना ब्रिटिशांनी केली होती. मराठी भाषेतील पुस्तकांचे मुद्रण करण्याची सुरुवात याच कालखंडात झाली व खऱ्या अर्थाने भारतीयांना ज्ञान, आपली संस्कृती यांचा परिचय होऊ लागला. टिळक, आगरकर, किर्लोस्कर, हरिभाऊ आपटे इत्यादी लोकांनी त्या काळात ज्ञान देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी केली. या स्वातंत्र्यपूर्व काळात वैचारिक निबंध लेखनाचा पाया घातला गेला आणि पुढे 'निबंध' हा साहित्यप्रकार समृद्ध होत गेला.

## १.२.१ 'निबंध' या साहित्यप्रकाराची व्याख्या

'निबंध' या शब्दाचे वेगवेगळे अर्थ सापडतात. कारण निबंधाच्या स्वरूपाच्या संदर्भात विचार करत असताना वेगवेगळया दृष्टिकोणातून विचार करण्यात आला आहे. त्यामुळे अमुक एकच अर्थ आपण मानायलाच हवा असा ठाम निर्णय घेणे बरोबर होणार नाही.

'निबंध' या शब्दाचे दोन भाग नि+बंध केले तर; ज्याला बंध नाही; असा अर्थ त्यातून प्रतित होतो. मुळात निबंधाला फारसे बंध नसतात. ज्या लेखनाला बंधन नाही; असा निबंध हा साहित्यप्रकार; अशा अर्थाने घेतला तर चुकीचे होणार नाही. अनिर्बन्ध लेखन हे निबंध लेखनाचे वैशिष्ट्य मानण्यास हरकत नाही. 'निबंध' म्हणजे एखाद्या विषयावर अनेक विचारांची केलेली गुंफण. एखाद्या विषयावर अनेक विचार एकत्रित आणून त्यांची नीट बांधणी करणे.

एखाद्या विषयासंबंधीचे सुसंबद्ध, सुसंगत व निःसंदिग्ध असे विचार म्हणजे निबंध. प्राप्त केलेल्या ज्ञानाचे, मनन चिंतनातून नवीन विचार उमलून त्या विचारांना सुसंघटित करणे म्हणजे निबंध होय.

विशिष्ट विषयावर निबंधकाराला जसे विचार सूचतात त्या विचारांची सुयोग्य अशी मांडणी निबंधकार आपल्या निबंधात करत असतो. निबंधकाराला निबंध विषय निवडायला स्वतंत्रता असते. आपल्याला हव्या त्या विषयाला निबंधकार प्राधान्य देऊ शकतो. निबंधासाठी विषय निवडायला जशी मर्यादा नसते; तशी निबंधातील विषयाच्या विवेचनालाही मर्यादा नसते. निबंधकाराला याबाबतीत कोणतेही बंधन नसते. हे वैचारिक व ललित निबंध या दोहोंच्या बाबतीत तितकेच सत्य आहे.

धर्म, समाज, संस्कृती, राजकारण, शिक्षण, उद्योग, कला, साहित्य अशासारख्या गंभीर विषयांवर निबंधकार जसे आपले विचार व्यक्त करू शकतो तसेच आजकालचे राहणीमान, बदलणाऱ्या फेशनेबल जीवनावरही लिहू शकतो किंवा स्वतःचे अनुभव आठवणींनाही त्यात अधिक महत्त्व देऊ शकतो. निबंधात विषयाच्या आशयाला आणि अभिव्यक्तीला महत्त्व असते. विषयाची सुस्पष्टता येथे जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर निबंध लेखनासाठी भाषेवर प्रभुत्व असावे लागते. निबंध लेखनासाठी विपुल शब्दभांडार पाहिजे; म्हणजे विचार योग्य शब्द वापरून मांडता येतात. भाषेच्या माध्यमातून सुस्पष्टपणे लेखन लेखकाला करता यायला हवे यासाठी भाषिक कौशल्य लेखकाकडे असावे लागते. आपल्याला सूचलेले विचार सुस्पष्टपणे, आकर्षक रीतीने व मुद्देसूदपणे आपल्या लेखनाद्वारे लेखकाला मांडता यायला हवे.

## १.२.२ निबंधाचे प्रकार

### १.२.२.१ वैचारिक निबंध लेखनाचे स्वरूप

वैचारिक हा शब्द 'विचार' या शब्दापासून तयार झाला आहे. "मनोव्या; चर्चा; मनन; तर्क; कल्पना; युक्तायुक्तता पाहणे; मर्यादा."[८] असे विचाराचे अर्थ ह. अ. भावे यांच्या विस्तारित शब्दकोशात सांगितले आहे.

विचार करणे ही एक मानसिक प्रक्रिया आहे आणि ही विचारशक्ती माणसाकडे असते. त्यामुळे माणूस पृथ्वीवरील इतर जीवांपेक्षा वेगळा ठरतो. माणूस विचारशील आहे म्हणून सतत तो यशाच्या विकासाच्या वाटेवर असतो. आपले भविष्य बदलण्यास 'विचार' ही मानसिक प्रक्रिया त्याला मदत करत असते. जरी ही मानसिक प्रक्रिया असली तरी विचार हा माणसाच्या अंतःकरणात तयार होत असतो. त्याच्या मनन चिंतनाच्या प्रक्रियेमुळे हे त्याला शक्य होत असते म्हणून चिंतनातून तो आपले जीवन, आपला समाज बदलत असतो.

'विचार' सांस्कृतिक क्षेत्रातदेखील महत्त्वाची भूमिका करत असतो. सांस्कृतिक क्षेत्रातील विचारांचे महत्त्व डॉ. यशवंत मनोहर सांगतात, "विचार हा कोणत्याही संस्कृतीच्या खोलीचा आणि उंचीचा मापदंड असतो. या संस्कृतीमधील भावनात्मक व्यवहारही अधिक अर्थपूर्ण व सर्वस्पर्शी, अधिक उपकारक व प्रकाशतत्त्व स्पर्शी होण्यासाठी विचारांच्या कक्षा अधिकाअधिक विस्तृत होणे आवश्यक  असते. विचार हा मुळात असतो या अनुभवातून निष्कर्ष निर्माण होतात. विचार हेच होत की, जे माणसाच्या विवेकशक्तीचा विकास करतात"[१] माणूस आपल्या चिंतन मननातून विचारांची मांडणी करत असतो आणि या विचारांच्या माध्यमातून तो साहित्यात व्यक्त होत असतो. त्याचे व्यक्तिमत्त्व नकळत तिथे उमटत असते. आता साहित्य म्हटले तर ते दोन प्रकारचे असते वैचारिक किंवा शास्त्रीय साहित्य आणि ललित साहित्य. याबद्दल मागे स्पष्टीकरण दिलेले आहे. शास्त्रीय किंवा वैचारिक साहित्यात वैचारिक निबंध लेखन येत असते. 'निबंध' लेखनाचे वैचारिक व ललित निबंध असे उपप्रकार घेतले तर विषय प्राधान्यता, तात्त्विकता, सुस्पष्टता, वस्तुनिष्ठता आणि भाषा या घटकांमुळे वैचारिक निबंधात विचाराला जास्त प्राधान्य असते. समाजाला तर्कशुद्ध विचार देणे आणि बोध करणे अशी त्याची भूमिका असते. या विचारांच्या मुळाशी चिंतन हा घटक  तितकाच महत्त्वाचा ठरतो. एखाद्या विषयावरील विचार वैचारिक निबंध लेखनात मांडत असताना वापरणाऱ्या भाषेला विवेकनिष्ठ आणि सुस्पष्टता, सूत्रबद्धता या वैशिष्ट्यांचीही तितकिच गरज आहे.

वैचारिक निबंध लेखनात अभिव्यक्त होणाऱ्या भाषेला अधिक प्राधान्य असते. भालचंद्र नेमाडेच्या मते "शास्त्र भाषेत लेखकापेक्षा विषयाला अधिक प्राधान्य, महत्त्व असते. साहित्य भाषा जशी लेखकागणिक बदलते तशी शास्त्र भाषा बदलत नाही. शास्त्र भाषेची एक स्वतंत्र शैली ठरलेली असते आणि शास्त्रीय भाषेच्या लेखकाला आपले व्यक्तिमत्त्व मांडावे लागत

नसून बौद्धिकआकलनाची मांडणी फक्त वैयक्तिक करणे शक्य असते."[१०] हे शास्त्रीय साहित्या इतकेच वैचारिक सहित्याच्या बाबतीत खरे आहे. कारण वैचारिक साहित्यात किंवा वैचारिक निबंधात विषयाला अधिक प्राधान्य दिले जाते. चितंनशीलता, जीवनदृष्टी, समाजजीवनात नवनवीन निर्माण होणारे प्रश्न आणि या प्रश्नांची आव्हाने पेलण्याची उत्सुकता असे गुण वैचारिक निबंध लेखकाकडे असणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच स्वातंत्र्योत्तर काळातही वैचारिक निबंध लेखन होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील निबंधकारांच्या लेखनात आक्रमकता, आवेश, अन्यायाची चीड आणि स्वातंत्र्याविषयी आस दिसून येते. तर स्वातंत्र्योत्तर काळातील वैचारिक निबंधातील आक्रमकतेबरोबर नवीन समाज निर्मितीची इच्छा जाणवते. बहुतेक वेळा हा निबंध आकाराने दीर्घ असे. कारण वाचक वर्गाला एखादा विषय सविस्तरपणे समजावून सांगणे ही स्वातंत्र्यपूर्व काळातील गरज होती आणि त्या दृष्टीने पाहिले तर त्या काळातील निबंधकार गंभीर प्रकृतीचे व अभ्यासू वृत्तीचे होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक निबंधावर समता, व्यक्तिस्वातंत्र्य अशा मूल्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. स्वातंत्र्यानंतर वैचारिक निबंध लेखनाच्या स्वरूपात बदल झाला आहे. पूर्वीचा वैचारिक निबंध सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रश्नांविषयी होता. त्याकाळी लोकांना अशा विषयांविषयी आणि लेखकाने तो कशाप्रकारे मांडला आहे याविषयी उत्सुकता होती. आणि लेखकही आपल्या पांडित्याच्या बळावर निबंध रचत असे. परंतु आता तसे दिसत नाही. या जुन्या नव्या निबंधातील फरक सांगत असताना लेखक ना. सी. फडके म्हणतात, "पूर्वी निबंध वाचला जात असे तो मतासाठी आणि पांडित्यासाठी. निबंधाचा "विषय" वाचकाला महत्त्वाचा वाटे व म्हणून तो त्याकडे वळे. अमुक अमुक सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रश्नांविषयी चिपळूणकर, आगरकर, टिळक, परांजपे, खाडिलकर, केळकर काय म्हणतात ते माहित करून घेण्याची वाचकांची इच्छा असे व म्हणून त्यांचे निबंध वाचले जात. निबंधांची योग्यता त्याच्या विषयावरून ठरत असे. जितका विषय मोठा आणि महत्त्वाचा तितकी निबंधाची योग्यता मोठी ठरत असे. परंतु नव्या थाटाच्या निबंधात विषयाचं महत्त्व पार लयाला गेलं. मतप्रचार आणि पांडित्य प्रदर्शन हे हेतुच सुटल्यामुळे निबंधात विषयाची मातबरी आता राहिलेली नाही."[११] मतप्रचार व पांडित्य हे गुण आज निबंधात दिसत नाही. त्याच्या अंतरंगात

तसेच बाह्यगांत बदल झालेला दिसून येतो. आजच्या वैचारिक निबंधात विचार लेखकाच्या अनुभवविश्वातून साकार झालेले असतात. "आधुनिक निबंधप्रकारात कोणत्याही विषयाच्या निमित्ताने लेखकाच्या अंतरंगात उठणाऱ्या विचार–विकार तरंगाचं दर्शन घडावं"[१२] अशा पद्धतीने आधुनिक काळात वैचारिक निबंध लेखनासाठी एखादा विषय मांडत असताना त्यात मधेच वाचकाच्या मनातील विचार येत असतात. आणि दुसरे म्हणजे लेखकाचा पांडित्य प्रदर्श न हा हेतू नसून मनातील भावना, विचारांचा आविष्कार हा हेतू असतो. असे असले तरी वैचारिक निबंध लेखनात कल्पनेला जागा नाही.

## १.२.२.२ ललित निबंध लेखनाचे स्वरूप

'निबंध', 'लघुनिबंध', अशा नावाने ओळखला जाणारा साहित्यप्रकार आज 'ललित गद्य', 'ललित लेख' किंवा 'ललित निबंध' या संबोधनाने ज्ञात झाला आहे. यापूर्वी ना. सी. फडके, वि. स. खांडेकरांनी लघुनिबंध लिहायला सुरुवात केली. 'मी' चे अनुभव, 'मी' चे आत्मनिवेदन, 'मी' चे विचार, लालित्यपूर्ण मांडणी, मित्रांशी गप्पा मारल्यासारख्या भाषेत विषयांतर करणे इ. लघुनिबंधाची वैशिष्ट्ये होती. परंतु त्या काळात लेखन करणाऱ्या लेखकांनी फडके यांच्या लघुनिबंध लेखनाचे वरवर अवलोकन करून या प्रकाराची एक विशिष्ट चौकट निर्माण केली. त्यांनी केवळ तंत्राला महत्त्व दिल्यामुळे त्यातून योग्य रीतीने 'मी' चे दर्शन घडत नव्हते. त्यामुळे त्याकाळातील इतर लेखकांचे लेखन लघुनिबंधाची उंची गाठू शकले नाही. हा काळ लघुनिबंधाला विकल बनविणारा काळ होता. परंतु फडके–खांडेकर–काणेकर यांच्या लघुनिबंधांना विशेष लोकप्रियता लाभली. फडके–खांडेकर–काणेकर यांबरोबर लेखक ना. मा. संत, गं. भा. निरंतर, कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे या काही लेखकांनी लघुनिबंधाच्या पडत्या काळातही ललित गद्याचा नवा कलात्मक आविष्कार सुरू केला. आणि १९४५ नंतर लघुनिबंधानी घेतलेली मित्राची भूमिका जाऊन लेखकाला, त्याच्या आत्माविष्काराला, विचाराला महत्त्व आले. या लेखकांनी ललित निबंधप्रकाराला पुढे नेले. "लालित्यपूर्ण भाषेत लिहिलेला पण मुळात विचारांचे अधिष्ठान असलेले निबंध"[१३] अशा अर्थाने सर्वप्रथम १९४५ पूर्वीच वि. स. खांडेकर यांनी 'ललित निबंध' ही संज्ञा वापरली होती. वाचकांना एक वेगळी अनुभूती देऊन वाचकांची वैचारिक भूक लालित्यपूर्णतेने भागविणारा हा साहित्यप्रकार आहे.

आज ललित निबंधाला बंधन असलेले जाणवत नाही. या प्रकारातील लेखन विस्तारशील मोकळेढोकळे चिंतन, स्वैर आविष्कार मुक्त असे आहे. त्यामुळेच त्याला (formless form) लेखन असा शब्दप्रयोग काही वेळा केलेला दिसून येतो. प्रत्येक सहित्यप्रकाराच्या रचनेत त्याच्या प्रक्टीकरणात आपल्याला वेगळेपण जाणवत असते. साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक अशा साहित्यप्रकाराहून 'ललित निबंध' हा प्रकार वेगळा आहे. तथा ललित निबंधप्रकाराच्या प्रक्टीकरणात आपल्याला वेगळेपण दिसून येते. कथा, कादंबरी, नाटक अशासारख्या साहित्यप्रकारांसाठी साहित्यिक जास्तसा काल्पनिक घटनांच्या आधारे लेखन करत असतो. किंवा येथे तो 'मी' म्हणून व्यक्त होत नाही. तो काल्पनिक पात्रे निर्माण करून त्यांच्याद्वारा अनुभव कथन करत असतो. तर ललित निबंध हा आत्मनिष्ठ साहित्यप्रकार आहे. ललित निबंधात लेखक 'मी' म्हणून व्यक्त होत असतो. 'मी' ला प्रभावीपणे प्रक्ट करणारा, मानवी मनातील भावभावनांना वाट करून देणारा हा साहित्यप्रकार आहे. बालपणातील आठवणी, गतआयुष्यात घडलेल्या घटना, मन हेलावणारे प्रसंग किंवा नाट्यमय विनोदी प्रसंग, सहवासात आलेला निसर्ग, वाचनात आलेले साहित्य, भेटलेली माणसे, घडून आलेले योगायोग अशांचे चित्रण ललित निबंधात लालित्याच्या शैलीत येताना दिसते. लालित्य हा त्याचा गाभा आहे.

निसर्गातील कोणताही सजीव–निर्जीव, दृश्य–अदृश्य ललित निबंध लेखनाचा विषयवस्तू होऊ शकतो. वनस्पती, पाणी, वारा, पुस्तक, जन्म, मरण, प्रेम, दगड, दिवस, रात्र असे विविध विषयांना ललित लेखनात स्थान असते. असे विषय निवडून त्या संदर्भात आपले अनुभव, आपले विचार लेखक व्यक्त करत असतो. ते जसे आहे आणि ते जसे असायला हवे असे 'मी' ला वाटते; त्याप्रमाणे तो मुक्तपणे रेखाटन करत असतो.

ललित निबंध लेखनात लेखक 'मी' म्हणून व्यक्त होत असल्याने जीवनात अनुभवलेल्या घटना प्रसंगांकडे, त्यांना भेटलेल्या माणसांकडे, त्यांनी अनुभवलेल्या निसर्गाकडे तो कशा दृष्टीने पाहतो याला या लेखनात महत्त्व आहे. स्वतःमधल्या 'मी' ला तो कसा प्रक्ट करतो, आपले अनुभव–आठवणी तो कशा पद्धतीने मांडतो, कशाप्रकारच्या शैलीत तो व्यक्त होतो यावरच त्यांच्या लेखनाची कलात्मकता अवलंबून असते. या लेखनात लेखकाचे व्यक्तिमत्त्व

अधिक संवेदनशील, चिंतनशील व जागरूक असते. त्यामुळे या लेखनात लेखकाने घेतलेला अनुभव उत्कटतेने, सूक्ष्मतेने व्यक्त होताना दिसून येतो.

ललित निबंध लेखनात लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि आशयविषय यांचे एकरूपत्त्व असते. येथे लेखकाने स्वतः अनुभवलेल्या किंवा पाहिलेल्या विषयांना स्पर्श करत स्वतःला व्यक्त केलेले असते. लेखनातील विषयासह लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रकट झालेले दिसून येते. इतर साहित्यप्रकारांपेक्षा ललित निबंधातील लेखनाला घटनांचा संदर्भ असतो. लेखकाच्या आयुष्यातील घटनाप्रसंगांचा अनुभवांचा, व्यक्तींचा संदर्भ व यांकडे लेखकाचा पाहण्याचा जीवनविषयक दृष्टीकोन याला जास्त महत्त्व असते.

आजच्या ललितनिबंधाने 'लघुनिबंध', 'आत्मचरित्र', 'व्यक्तिचित्रण', 'प्रवासवर्णन' अशा प्रकारांना आपल्यात सामावून घेतलेले दिसून येते. ललित निबंधात व्यक्त होणाऱ्या अनुभव–आठवणी लेखकाच्या भूतकाळातल्या असल्यामुळे हे लेखन आत्मचरित्र या प्रकाराशी जवळीक साधणारे आहे. परंतु हे लेखन आत्मचरित्र आहे असे आपण म्हणू शकत नाही. कारण निबंधलेखन आत्मचरित्र लेखनाहून वेगळे ठरते. ते पुढील प्रमाणेः "आत्मचरित्रकाराच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार; घटना आणि प्रसंग या अनुरोधाने होत असल्याने तो अनिर्बंध नसतो; तर एखाद्या प्रेरणेने लघुनिबंधकाराचे अनुभव आणि स्मृती जशा चाळवतील तशी त्याची कल्पनाशक्ती चाळवेल. अशा प्रकारे रेखाटलेली चित्रणे हाही त्यांच्या आत्माविष्काराचा रमणीय विलास होय. लघुनिबंधात गुंफलेल्या व्यक्ती, प्रसंग आणि घटना या जरी प्रत्यक्ष जीवनातून उचललेल्या असल्या तरी त्यावर संयोजक कल्पकतेचा हात फिरवतो. त्यामुळे त्यांना वाङ्मयीन सत्याचे स्वरूप प्राप्त होते."[१४] आत्मचरित्रातील घटनाप्रसंगाच्या आविष्काराला बंधन असते. त्यात कल्पनेला वाव नसतो. तर त्याच्या वास्तव घटनाप्रसंग त्यात कोणताही बदल न करता आहे तसेच सलगतेने मांडावे अशी अपेक्षा असते. शिवाय निबंधलेखनात जरी 'मी' चे प्रत्यक्ष अनुभव असले तरी त्याच्या आविष्काराला कसलेही बंधन नसते. त्यात थोडा कल्पनेचा भाग असू शकतो. ते आठवतील तसे लेखक लेखात मांडत असतो. आत्मचरित्रासारखी त्यात सलगता येत नसते.

निबंध लेखन जसे आत्मचरित्राहून वेगळे ठरते तसेच एखाद्या लेखात आलेल्या प्रवासातील आठवणींचे रेखाटन जरी वर वर प्रवासवर्णनाशी जवळीक साधणारे असल्याचे जाणवले तरी ते प्रवासवर्णनाहून थोडे निराळे आहे. बारीक विचार केला तर निबंधात केवळ पाहिलेल्या स्थळांना, प्रदेश वैशिष्ट्यांना न्याय न देता लेखकाच्या अनुभवांनाही न्याय दिलेला असतो. याउलट प्रवासवर्णनात आपल्याला प्रवासी 'मी' ने स्थळ प्रदेश यांची ऐतिहासिक, सामाजिक , सांस्कृतिक अशी सर्वांगानी माहिती दिलेली असते. प्रवासवर्णन व निबंध लेखन यामधील फरक पुढील प्रमाणे– "प्रवासवर्णनात प्रवासी लेखक व प्रदेश यांचे समतोल पण कलात्मक चित्रण व्हावे लागते. तो लघुनिबंधात असेलच असे नाही. असेलच तर ते प्रवासवर्णन होईल तो लघुनिबंध असणार नाही. लघुनिबंध असण्यासाठी प्रवासी लेखक, (त्याचा) प्रवास व (त्याने पाहिलेला) प्रदेश या तिनही घटकांवर आधारित अशाच अनुभवविश्वाचे चित्रण व्हावे अशी सक्ती असणार नाही. कारण लघुनिबंध कोणत्याही विषयावर आधारित असू शकतो. त्यात सर्वस्वी लेखकाची लहर, त्याची प्रतिभा, त्याचे अनुभवविश्व, त्याची अंतस्फूर्ती या घटकांना प्राधान्य असेल."[१५] प्रवासवर्णनामध्ये प्रवास किंवा पाहिलेला प्रदेश किंवा स्थळ यावर आधारित लेखन व्हावे असे बंधन असते. मात्र ललित निबंधामध्ये असे बंधन असत नाही. आपल्या अनुभवविश्वाच्या साहाय्याने प्रतिभाशक्तीच्या जोरावर लेखक कोणत्याही विषयाला अनुसरून प्रवासातील स्थळवर्णने किंवा अनुभव म्हणून व्यक्त होऊ शकतो. लेखकाला जे आवडेल जे त्याला सांगावेसे वाटेल तेच लेखक आपल्या ललित निबंधात रेखाटत असतो. लेखक 'मी' च्या मानसिक भावभावनांना, त्यानी केलेल्या सर्जनशील कल्पनांना ललित लेखनात जास्त महत्त्व असते. त्यामुळे लेखात सापडणारी स्थळप्रदेशांची नोंद वाचकांना माहिती देण्यासाठी केली जात नाही. तर या लेखनात स्थळ प्रदेश विषयवस्तू म्हणून व्यक्त होत असतात. अशा कारणांमुळे ललित निबंधातील प्रवासाविषयी लेखन प्रवासवर्णन या प्रकारात मोडत नाही.

ललित लेख संग्रहात काही वेळा व्यक्तिचित्रणात्मक लेख आलेले असतात. अशी व्यक्तिचित्रे लेखक दोन प्रकारे रेखाटत असतो. पहिल्या प्रकारात लेखकाला ती माणसे कधी तरी भेटलेली असल्यामुळे लेखक त्यांच्या मुळ व्यक्तित्वावर न जाता लेखकाच्या अनुभवाला ती जशी आली तशी आपल्या कल्पनेचा साज चढवून रेखाटत असतो. तर दुसऱ्या प्रकारातल्या व्यक्तिचित्रांमध्ये लेखक त्याने अनुभवलेल्या, त्यांच्या वास्तविक व्यक्तित्वाचे दर्शन घडवत

असतो. मात्र दोन्ही प्रकारातील रेखाटन लालित्याच्या शैलीत म्हणजेच वाचकाला आवडेल अशा भाषेत केलेले असते. व्यक्तित्व अमुक गटातील असेलच असे नाही; ते ग्रामीण–शहरी, सुसंस्कृत–विकृत, पुरुष–स्त्री, बालक–म्हातारे अशा कोणत्याही गटातील असू शकतात. तसेच ते अमुक एका क्षेत्रातील असणार नाही; ते साहित्य क्षेत्रातील, संगीत क्षेत्रातील वगैरे कोणत्याही क्षेत्रातील असू शकते. त्यामुळे त्याचे स्वभाववर्तन, रंगरूप, वागणे बोलणे, कार्यकर्तृत्व रेखाटताना आपल्या प्रतिभेचा वापर करण्यासाठी भरपूर वाव असतो. येथे लेखकआपल्या अनुभवाच्या पातळीवर व्यक्तिचित्रण साकार करत असतो.

या लेखनात विषयवस्तूबरोबर लेखक'मी' चा आविष्कार; असे दोन्ही घटक प्रमुख ठरतात. येथे सत्य असतेच त्याचबरोबर कल्पकतेचा रंगही त्याला दिलेला असतो. पण पूर्ण कल्पनेतच ते लेखन रमलेले नसते आणि सत्य मांडायचे म्हणून निरर्थक वाटणारे वास्तवाचे रडगाणेही त्यात आलेले नसते. असे कोणतेही विषय घेऊन 'मी' च्या आविष्कारातून हे ललित निबंध लेखन आकाराला आलेले असते.

## १.२.३ निबंधाचे उपप्रकार

वैचारिक आणि ललित असे निबंध लेखनाचे दोन मुख्य प्रकार आहेत तसेच निबंधाचे उपप्रकारही आहेत. या उपप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

### आत्मपर लेख

या प्रकारात लेखक'मी' चे अनुभव–आठवणी स्मृतीरूपाने केंद्रस्थानी असलेले दिसून येतात. म्हणजे लेखकाच्या बालपणातील, तरुणपणातील तसेच म्हातारपणातील अनुभव, आठवणी, जीवनातील घडलेल्या घटना–प्रसंगाच्या आठवणी व्यक्त झालेल्या असतात. अशाप्रकारच्या लेखनातून लेखकाच्या आयुष्याची जडण घडण, सुख दुःखे, आवडी निवडी, घटना प्रसंग इत्यादी गोष्टींवर प्रकाश पडतो. यात लेखक 'मी' विशेष स्वरूपात दिसत असतो.

## स्त्रीविषयक लेख

या प्रकारात लेखक स्त्रियांचे वेगळे अनुभवविश्व चित्रित करत असतो. हे अनुभवविश्व वैयक्तिक किंवा कल्पनेने अनुभवलेल्या इतर स्त्रियांच्या अनुभवांतून चित्रित झालेले असते. स्त्रीचे निराळे अनुभव, स्त्रीची सुख दुःखे, व्यथा–वेदना, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीला सोसावे लागणारे हाल अपेष्टेचे जीवन, समाजात स्त्रीला दिले जाणारे दुय्यम स्थान अशा गोष्टींचा आलेख याप्रकारच्या लेखनात आलेला असतो. स्त्रीजीवनावर चिंतन करून त्यासंबंधी स्वतःची मते लेखात व्यक्त झालेली असतात. स्त्री जीवनात सुधारणा व्हावी या दृष्टीने हे लेखन झालेले दिसते. या लेखनाला जास्तसे चळवळीचे स्वरूप प्राप्त झालेले असते.

## साहित्यविषयक लेख

यामध्ये लेखकाने अभ्यासलेल्या साहित्यकृतींवर, साहित्यिकाच्या निर्मिती प्रक्रियेवर तसेच एखाद्या साहित्य प्रकारावर लेखकाने व्यक्त केलेल्या मतांना महत्त्व असते. लेखकाने जे साहित्य अभ्यासले त्यावर स्वतःची प्रतिक्रिया लेखक देत असतो. विशिष्ट साहित्यिक लेखकाला कसा वाटला त्या साहित्यिकाकडे असलेल्या गुणांचा वेधही अशाप्रकारच्या लेखांमध्ये घेतला जातो. त्याचबरोबर एखाद्या साहित्यप्रकारावर, साहित्यकृतीवर लिहित असताना, साहित्यप्रकाराचे, साहित्यकृतीचे मूल्यमापन करून त्यांचे वेगळेपण, नावीन्य, वैशिष्टये लेखामध्ये स्पष्टपणे उलगडून दाखवली जातात.

## निसर्गवर्णनपर लेख

लेखकाने अनुभवलेला निसर्ग, निसर्गाची बहुरंगी रूपे, निसर्गसौंदर्य लेखक निसर्गविषयक लेखात टिपत असतो. याप्रकारच्या लेखात केवळ निसर्गसौंदर्यच चित्रित झालेले नसून निसर्गाचे भीषण रूप तसेच लेखकाने बारकाईने न्याहाळलेले माणूस व निसर्ग यांचे संबंधही चित्रित झालेले दिसतात. निसर्गाला त्यांनी जसा अनुभवला तसाच त्याला वाचकांसमोर उभा करण्याची क्षमता त्याच्या लेखणीत असते त्यामुळे हे लेखन वाचताना वाचक त्या निसर्गाशी एकरूप होतो.

## प्रवासवर्णनपर लेख

प्रवासवर्णनपर लेखांमध्ये केवळ स्थळ प्रदेशाचे वर्णन आलेले नसून प्रवास करणाऱ्या लेखकाने तो प्रवास कसा अनुभवला, त्याला ते स्थळ, तो प्रदेश कसा वाटला या गोष्टींनाही तितकेच महत्त्व असते. प्रवासातील कोणत्याही अनुभवाला अनुसरून या प्रकारच्या लेखाची सुरुवात होत असते. स्थळप्रदेशाबरोबरीने लेखक त्यात तितक्याच प्रमाणात दिसत असतो. येथे लेखकाच्या अनुभवांना जास्त महत्त्व असते. भूतकाळात अनुभवलेल्या गोष्टी लेखात मांडत असताना तो प्रवास पुन्हा एकदा कल्पनेने अनुभवत असताना पाहिलेल्या स्थळांचा इतिहास, संस्कृती, सौंदर्य चित्रित करत असतो. या लेखनात लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचे प्रवासानुभव व स्थळप्रदेशांनाही एकसारखे महत्त्व असते.

## व्यक्तिचित्रणपर लेख

या प्रकारच्या लेखनातील व्यक्तिचित्रणे लेखकाच्या अनुभवातून साकार झालेली असतात. या लेखनात ज्या व्यक्तीचे चित्रण केले आहे त्या व्यक्तिबरोबरीने लेखकाचे व्यक्तिमत्त्वही दिसत असते. येथे व्यक्तीच्या अंतरंगाचे व बाह्यांगाचे चित्रण लेखक करत असतो. व्यक्तीचा स्वभाव, आवडीनिवडी, लकबी, सुख दुःखे, यश—अपयश, नातेसंबंध, विचार, कार्यकर्तृत्त्व तसेच शरीरवर्णने व्यक्तिचित्रणपर लेखनातून प्रतित होतात.

## चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख

या प्रकारच्या लेखांमध्ये एखाद्या विषयावर सखोल अभ्यास करून त्या संदर्भात चिंतन करून साधक बाधक चर्चेतून त्या विषयाच्या अनुषंगाने विचार व्यक्त केले जातात. एखाद्या विषयाचा संगोपांग अभ्यास अशा प्रकारच्या निबंध लेखनात होत असतो. येथे लेखकाचे विचार व प्रगल्भ व्यक्तिमत्त्व दिसून येते. वाचकाला विचार करायला भाग पाडणारे लेखन येथे झालेले असते. अशा प्रकारच्या लेखनात वाचकाला योग्य दृष्टी देण्याची क्षमता असते.

## १.३ निबंध लेखनाची वाटचाल

निबंध प्रकाराचे मूळ इंग्रजीत आहे. इंग्रजीतील 'एसे'चे जनकत्व बेकनकडे जाते. पण बेकननेही 'एसे' हा प्रकार माँतेन या फ्रेंच साहित्यिकाच्या 'एसे' (essai) वरून इंग्रजीत आणला अशी नोंद आहे. माँतेनची पहिली दोन पुस्तके१५८० मध्ये फ्रेंच भाषेतून प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर बेकनने अशाप्रकारे 'एसे' असलेले पहिले पुस्तक माँतेनच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी म्हणजेच १५९७ मध्ये प्रसिद्ध केले. तद्नंतर माँतेनचे अनेक 'एसे' इंग्रजीत भाषांतरित झालेले आढळतात. माँतेनचे लेखन स्फुट स्वरूपाचे होते. त्याला त्याच्या वैयक्तिक जीवनात आलेले अनुभव आणि त्याचे विचार त्यानी आपल्या 'एसे' मधून मांडलेले दिसतात. स्वतःला लेखनाच्या माध्यमातून रेखाटणे असा हा प्रकार आहे. "आपणास स्फुट स्वरूपाचे अनेकअनुभव आलेले असतात त्यातही काही महत्त्वाचे विचार बीज स्वरूपात असतात. आपण आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार त्या अनुभवांचा विचार केलेला असतो. असे स्फुट स्वरूपाचे अनुभव आपण मुक्त स्वरूपात मांडले पाहिजे, या भूमिकेने प्रेरित होऊन त्याने हे 'एसे' लिहिले आहेत."[१६] अशा वाक्यातून आनंद यादवांनी माँतेनने लिहिलेल्या 'एसे'चे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

माँतेनने रूढ केलेला हा प्रकार बेकनने इंग्रजीत आणला खरा पण त्याच्या स्वरूपात थोडा बदल केला. आनंद यादव यांच्या मताप्रमाणे माँतेनच्या 'एसे' या लेखनात त्याच्या स्फुट अनुभवांचे मुक्तचिंतन केलेले आढळते. त्याच्या लेखनातून जगाकडे पाहण्याची सहानुभूती, विनोद वृत्ती, उत्सुकता, भावनाशीलता प्रत्ययाला येते. पण बेकनच्या लेखनाबद्दल आनंद यादव लिहितात, "बेकनचा इंग्रजी 'एसे' प्रकृतीने गंभीर, विचारनिष्ठ, तर्कसंगत आणि गोळीबंद झाला. एखादा विचार एसेमधून सांगताना बेकनने न्यायाधीशाची भूमिका घेतली. वैयक्तिक अनुभव व्यक्त करण्यापेक्षा अनुभवांचा वैचारिक परिपाकतो मांडत असे."[१७] माँतेनने 'एसे' या लेखनात मनाला महत्त्व दिले होते मात्र बेकनने त्या मनाला महत्त्व न देता स्वतःच्या विचारांना आणि मतांना महत्त्व दिले आहे. त्यामुळे फ्रेंचमधून येताना हा 'एसे' वेगळे असे रूप धारण करुन इंग्रजीत आला असे म्हणता येईल.

बेकनच्या लेखनात थोडाफार बदल असला तरी ‘एसे’ हा प्रकार बेकनने इंग्रजीत आणला होता व पुढे काही वर्षांनी अब्राहम काउले (Abraham Cowley) याने इंग्रजीत ‘एसे’ लिहिला. ‘on myself’ हा त्याचा गाजलेला ‘एसे’ आहे. १६६८ मध्ये प्रसिद्ध झालेला ‘एसे’ बेकनच्या ‘एसे’ लेखनाहून वेगळा ठरून माँतेनप्रमाणे व्यक्तिमत्त्वाचा मुक्त आविष्कार असलेली एसेची प्रकृती काउलच्या एसेने आत्मसात केलेली दिसते. त्यामुळे इंग्रजीत एसेच्या दोन धारा निर्मा ण झाल्या. अशा पद्धतीने ‘एसे’ हा प्रकार पुढे विकसित होत गेला. पुढे १८व्या शतकात ‘परिऑडिकल एसेज’ या नावानेही हा प्रकार खूपच लोकप्रिय झाला. १९व्या शतकात चार्ल्स लॅमने ‘पर्सनल एसे’ लिहिला. आणि या प्रकाराला मान्यता मिळत गेली. स्टीव्हन्सन, वेलॉक, जे. बी. प्रीस्टले, गार्डिनर अशा लेखकांनी आपल्या कुवतीनुसार ‘पर्सनल एसे’ हा प्रकार विविधांगी विकसित केला. आप आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार लेखकांनी विविध तऱ्हांनी हा प्रकार हाताळला. मराठीतही अनेक लेखकांनी अशा प्रकारची रचना केली. यात तीन महत्त्वाच्या धारा दिसतात. एक म्हणजे वैचारिकतेला महत्त्व देणारा ‘एसे’ म्हणजे मराठीत आपण निबंध असे म्हणतो व दुसरा ‘पर्सनल एसे’ ज्याला ‘लघुनिबंध’ म्हणतो. ‘निबंध’ हा विचार व वस्तुनिष्ठ या अंगाने विकसित होत गेला तर ‘लघुनिबंध’ व्यक्तीच्या अनुभवविश्वाला महत्त्व देत पुढे सरकला व पुढे तो ललित निबंध या नावाने प्रचलित झाला.

वि. का. राजवाडे, लोकमान्य टिळक, वि. दा. सावरकर या लेखकांनी पहिला ‘निबंध’ हा प्रकार हाताळला आहे. ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांनी लिहिलेले निबंध ‘लघुनिबंध’ या प्रकाराची उदाहरणे म्हणून देता येतील. तर विंदा करंदीकर, दुर्गा भागवत, श्रीनिवास कुलकर्णी यांचे निबंध लेखन तिसऱ्या म्हणजेच ‘ललित निबंध’ या प्रकाराची उदाहरणे म्हणून सांगता येतील. वर उल्लेखिलेल्या लेखकांनी आपल्या लेखनाने विविध नावांनी ओळखला जाणारा निबंध हा प्रकार सशक्त केला आहे.

‘ललित निबंध’ अशा नावाने ओळखला जाणाऱ्या साहित्यप्रकाराने आज समाजमनात एक महत्त्वाची जागा निर्माण केली आहे. याच पार्श्वभूमिवर वैचारिक व ललित निबंध या साहित्यप्रकाराची चर्चा या ठिकाणी करायची आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही वैचारिक निबंध लेखन झाले होते व होत आहे. तर वैचारिक व ललित निबंध हे

दोन्हीं प्रकार स्वातंत्र्योत्तर काळात हाताळले जात आहे. या भागात या दोन्हीं प्रकाराच्या निबंधांचे स्वरूप नोंदवत असताना स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ या दोन्हीं काळात ज्या लेखकांनी हा साहित्यप्रकार हाताळून या साहित्यप्रकाराला समृद्ध केला आहे अशा लेखकांचा व त्यांच्या निबंध लेखनाचा थोडक्यात परामर्श घ्यायचा ठरविले आहे.

## १.३.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील निबंध लेखन

'निबंध' या साहित्यप्रकाराला साहित्यामध्ये महत्त्वाचा दर्जा मिळाला आहे. मानवी मनामध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता या निबंध लेखनात आहे. निबंध लेखनाच्या संदर्भात लेखक वि. स. खांडेकर म्हणतात, "निबंध ही एक महाशक्ती आहे. जी राष्ट्रात चैतन्य निर्माण करू शकणारी, त्याला उत्कर्षाच्या शिखरावर जाण्यास सहाय्यीभूत ठरणारी जगातल्या ज्या राष्ट्रांनी या महाशक्तीची उपासना निष्ठेने केली; त्या राष्ट्रांना ऐश्वर्याची प्राप्ती झालेली दिसते."[१८] वि. स. खांडेकरांनी वर्णन केलेल्या या निबंधाच्या शक्तिबद्दल भारतीय विचारवंताना जाणीव झाली असावी आणि त्यांनी निबंधाच्या माध्यमातून आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याचा ध्यास घेतला. या निबंधाकडे लेखकांनी प्रबोधनाचे साधन म्हणून पाहिले. आपल्याला स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर 'निबंध' लेखनाद्वारे आपण समाज जागृती करू शकतो हे त्यांना कळाले; या जाणिवेतून वैचारिक निबंध लेखन होऊ लागले. अव्वल इंग्रजी काळात वैचारिक जागृतीमुळे धार्मिक, सामाजिक प्रबोधनाला प्रारंभ झाला.

इ. स. १८४८ पर्यंत सरकारचे धोरण उदारमतवादी होते. शिक्षणात ऐतद्देशीय भाषांना प्राधान्य असल्याकारणाने याच भाषांतून शालेय अभ्यासक्रमाच्या गरजेतून सरकारी धोरणाच्या आवश्यकतेनुसार ग्रंथ निर्मिती केली गेली. त्यानंतर धोरण बदलू लागले. त्यामुळे एतद्देशीय भाषांतून प्रतिकूल परिस्थितीत ग्रंथ निर्मिती होऊ लागली. त्याचवेळी त्या प्रतिकूल परिस्थितीतही स्वयंप्रेरणेने साहित्य निर्माण होऊ लागले. नव्या उदारमतवादी शिक्षणामुळे महाराष्ट्रात वैचारिकजागृतीने वाट पकडली. शिक्षण धोरणामुळे अभ्यास क्रमाचे स्वरूप बदलत गेले तस तसे मेकॉले, गिबन, स्पेन्सर, मिल्ल, ॲडम स्मिथ, कॉलाईल इत्यादींची छाप महाराष्ट्रीय विचारवंताच्या मनावर उमटली आणि त्यातून एतद्देशीय विचारवंताना लोकशिक्षणाचे महत्त्व पटले. लोकशिक्षणाच्या हेतुने नियतकालिके लोकशिक्षणाचे एक उचित

माध्यम म्हणून निघू लागली. नियतकालिकांच्या माध्यमातून महाराष्ट्रात लोकशिक्षणाचे कार्य होऊ लागले. जुन्या रूढी–परंपरा, जुन्या कल्पना, जातीभेद अशा गोष्टींना धरून बसलेला आपला देश इंग्रजांच्या गुलामगिरीत आहे याची जाणीव करून देण्यास सुरुवात झाली. या दिशेने प्रयत्न करण्यासाठी कृष्णशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर या विचारवंतानी वर्तमानपत्रे, मासिके यांच्याद्वारे निबंध लेखन केले. लोकांमध्ये ज्ञानाची आसक्ती निर्माण केली.

इ. स. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी सुरू केलेले 'दर्पण' त्यानंतर १८३७ मध्ये निघालेले 'दिग्दर्शन', इ. स. १८४० मध्ये भाऊ महाजन यांनी सुरू केलेले 'प्रभाकर' हे वृत्तपत्र लोकशिक्षण, ज्ञानप्रसार करण्याचे कार्य करत होती. प्रत्येक नियतकालिकाच्या उदयामागे कोणते ना कोणते उद्दिष्ट होते असे म्हणावे लागेल. उदाः इ. स. १८४२ मध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याच्या हेतुने 'ज्ञानोदय' हे वर्तमान पत्र काढले. 'ज्ञानोदय' या मासिकात हिंदुधर्मावर केलेले टिकात्मक लेख प्रसिद्ध होत होते.

धार्मिक गोष्टीवर विचार विनिमय करण्याच्या हेतुनेही अनेक नियतकालिके निघू लागली होती. उदाहरणात 'वर्तमानदीपिका', प्रार्थना समाजाचे 'सुबोध पत्रिका' (१८७४) ही नियतकालिके धार्मिक विचारांचे प्रर्वतन करीत असे. त्याचबरोबर राजकीय व सामाजिक चर्चा करणारीही नियतकालिके निघाली. उदाः 'ज्ञानप्रकाश' (१८४९), 'इंदुप्रकाश' (१८६२) लोकहितवादी कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादी मंडळी 'ज्ञानप्रकाश'ची प्रवर्तक होती. यात सुधारणावादी विचारवंत बाबा गोखले अशासारख्या विचारवंतांचे वैचारिक लेख येत होते. या वरील दिलेल्या माहितीनुसार तत्कालीन कालमानानुसार आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याकरिता विविध नियतकालिके या काळात निघाली.

इ. स. १८७४ पूर्वीची महाराष्ट्राची परिस्थिती आणि त्यानंतरची परिस्थिती वेगळी होती. एका बाजूने भौतिक सुधारणा तर दुसऱ्या बाजूने लोक समाजातील गुलामगिरी जाणवत होती. या गुलामगिरीची जाणीव लोकांना करून देण्याची गरज होती. ही जाणीव विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबंधमाला' या मासिकाद्वारा होऊ लागली. सन १८७४ मध्ये

चिपळूणकरांनी ‘निबंधमाला’ हे मासिक सुरू केले. हिंदुस्थानातील माणसांमाणसामधील स्वभिमान जागृतीसाठी त्यांचे ते लेखन होते.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी एतद्देशीय समाजाला जागृत केले. त्यांच्या निबंधमालेने मराठी निबंधाला चालना दिली. आपल्या ‘निबंधमाले’तून स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश याबाबत मराठी माणसाच्या मनामनात स्वभिमान जागृत केला. त्यांच्या निबंध लेखनातून त्यांनी आपल्या देशाविषयी उत्कृष्ट मतांचा आविष्कार केला. यातून विचारांची दिशा बदलली. त्यांच्या स्वभिमान जागृतीच्या प्रेरणेने मराठी निबंध लेखनाला नवी प्रेरणा दिली. ‘निबंधमाले’च्या काळात विचारवंताना समाजाला ब्रिटिश आणि एतद्देशीय यांच्यातील फरक जाणवू लागला. त्यानंतर लोकमान्य टिळक, बाळ गंगाधर टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांनी आपल्या निबंध लेखनातून चिपळूणकरांचे कार्य पुढे चालविण्याचे काम केले.

‘निबंधमाला’ (१८७४), ‘मराठा’, ‘केसरी’ (१८८०) आणि आगरकरांनी सुरू केलेले ‘सुधारक’ (१८८८) या चार वृत्तपत्रांनी महाराष्ट्रात क्रांती घडवून आणली. त्या आधीची नियतकालिके ज्ञानप्रसार किंवा लोकशिक्षण अशा उद्दिष्टाने निघाली होती. या चार वृत्तपत्रांनी महाराष्ट्रातील मनामनात स्वभिमान जागृत करण्याचे कार्य केले. समाजात बळावलेल्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यामुळे पिचून गेलेल्या समाजाची दुःखे आगरकरांनी आपल्या निबंधातून मांडली. परकीयांच्या तावडीत सापडलेल्या आपल्या देशाला स्वातंत्र्य लाभावे हे टिळकांचे ध्येय होते. याविषयीचे दर्शन त्यांच्या लेखनात जाणवते.

त्यानंतरच्या काळात शि. म. परांजपे यांच्या ‘काळ’ या वर्तमानपत्रामध्ये अनेक निबंध लिहिले गेले. त्या निबंधात सरकारविषयी निर्भर्त्सना आणि उपरोध दिसत होता. त्यामुळे सरकारने त्यांचे निबंध ताब्यात घेतले होते. लघुनिबंधाला आवश्यक असलेला घटक म्हणजे लेखकाचा अनुभव. या त्यांच्या अनुभवांचा आविष्कार त्यांच्या लेखात जाणवतो. परांजपे यांच्या लेखनात कवीमनाचे उत्कृष्ट दर्शन घडते. त्यांच्या लेखातील अनुभवांची शैली भावना संवेदनांनी रसरसलेली, व्याजेक्ती, वक्रोक्ती यांनी भरलेली आहे. त्या काळात त्यांनी लिहिलेले लेख ‘निबंध’ म्हणूनच ओळखले जात होते, पण आज आपण त्यांना ललित निबंध म्हणू शकतो अशा ललित निबंध लेखनाच्या साच्यात बसणारे त्यांचे लेखन आहे.

अच्युतराव कोल्हटकरांनी वृत्तपत्रीय वाङ्मय चटकदार बनविले. 'बी विश्वनाथन' या टोपण नावाने त्यांनी 'मनोरंजन'मध्ये लेख प्रसिद्ध केले. त्यानंतर १९१२ मध्ये मुंबईत आल्यावर त्यांनी 'संदेश' नावाचे वृत्तपत्र चालू केले. बहुजन समाजाला वर्तमानपत्रे वाचण्याची ओढ लावली. वृत्तपत्र जगात नवीन लेखनशैली आणणारा पत्रकार म्हणून कोल्हटकरांची ओळख आहे. वाचकांना विश्वासात घेऊन आपल्या मनातील विचार व्यक्त करण्यासारखी त्यांची लेखन शैली आहे. 'आमचा राम राम घ्यावा' अशासारखे त्यांचे लेख महत्त्वाचे ठरले आहे. राजकारणासारखे गंभीर विषयानांही विनोदाची बाजू असते हे प्रथम अच्युतराव कोल्हटकरांनी सांगितले. त्यांच्या लेखनाला कल्पनेची जोड होती. 'पुणेरी जोड', 'नाटक झाले जन्माचे', 'बायकोचे दागिने', 'हजामती का करत?', 'माधवाश्रमात शिवाजी' इत्यादी लेखात त्यांची कल्पकता दिसून येते. परांजपे–कोल्हटकर अशा लेखकांनी लघुनिबंधाला जवळचे असे लेखन केले आहे.

न. चि. केळकर हे एक उत्कृष्ट लेखक होते. साहित्यसम्राट अशी उपाधी त्यांना दिली आहे. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक, राजकीय अशा विविध क्षेत्रांमधील विषय त्याने निबंध लेखनासाठी निवडले. १८९७ साली टिळकांना शिक्षा झाल्यावर ऑगस्ट १८९७ पासून 'केसरी'चे संपादकपद स्वीकारून मन लावून त्यांनी कामगिरी निभावली. त्यांच्या प्रकाशनाची पृष्ठ संख्या १५,००० पृष्ठांच्या आसपास असल्याचे जाणवते. 'समग्र केळकर' एकूण बारा खंड आहेत. 'दिल्लीचा बादशाही दरबार', 'भविष्यकथन' अशासारखे कितीतरी निबंध त्यांनी लिहिले आहेत.

न. चि. केळकर यांनीही आपल्या लेखनामध्ये लालित्य आणण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. एक आदर्श निबंधकाराच्या जवळ असावे लागणारे सर्व गुण साहित्यकार न. चिं. केळकर यांच्याकडे होते. विस्तृत वाचन, सूक्ष्म विनोद, रसिकता, व्यासंग, लेखनाची अनिवार ओढ यामुळे न. चि. केळकर यांचे विपुल निबंध लेखन झाले आहे. आपण केलेला वाचनाचा योग्य ठिकाणी उपयोग करून घेण्याचा गुण केळकरांकडे होता. बुद्धि आणि कल्पनेच्या बळावर स्वतःचे लेखन ते साकार करतात.

१९३० पूर्वीच्या काळात जे निबंध लेखन होत होते त्यांचे विचार प्रवर्तकता किंवा ज्ञानप्रसार ही प्रमुख वैशिष्टये असल्याची आपल्या लक्षात येते. आपल्या लेखनातून लोकजागृती घडवून आणून समाजरूप बदलण्याच्या हेतुने हे लिखाण होत होते.

'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' या पुस्तकात १९३० पूर्वीच्या निबंध वाङ्मयाचा आढावा घेताना अ. ना. देशपांडे लिहितात, "केवळ सौंदर्य दर्शनात न रमता समाजाच्या जागृतीला आणि उन्नतीला उपकारक होतील अशा सद्भावनांचा आणि सद्विचारांचा प्रचार करणे. हे मुख्यतः मराठी निबंधाने आपल्यापुढे ध्येय ठेवलेले आहे. त्याकरिता कधी शास्त्रपूत युक्तिवादाचें कधी बुद्धिनिष्ठ कोटिक्रमाचे, कधी बोचक उपहासाचे तर कधी विदग्ध वक्रोक्तीचे अशी नानाविध अस्त्रे मोठया कौशल्याने त्याने वापरली आहेत. महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय जागृती घडवून आणावयाच्या श्रेयाचा मोठा वाटा प्रस्तुत कालखंडातील निबंधेत्तर वाङ्मयापेक्षा निबंधानाच मिळाला पाहिजे"[१९]

"अव्वल इंग्रजीतला लेखक हा केवळ लेखक नव्हता मूलतः तो समाज शिक्षक होता; शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक विचारांतील ऐतिकतावादी, मानवतावादी नवी तत्त्वे त्यांच्या लेखनातून प्रसूत होत होती. एका बाजूला 'अनेक विद्या मूलतत्त्वसंग्रह' आणि दुसऱ्या बाजूला 'नवमतप्रचार' अशा दुहेरी पण परस्परपूरक प्रयोजनांनी हे वाङ्मय लेखन होत होते."[२०] असे व. दि. कुलकर्णीही आपल्या 'साहित्यविचार' या लेखाद्वारे सांगतात.

वैचारिक, चिंतनात्मक असे गंभीर निबंध लिहून तत्कालीन निबंधकारांनी समाज सुधारणेचे कार्य केले. १९३० पूर्वीच्या निबंधातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व आविष्कृत होत नव्हते, असे नाही तर आविष्कृत होणारे व्यक्तिमत्त्व हे वैचारिक पातळीवरचे होते.

"विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंध' हा एक वाङ्मयप्रकार आहे या जाणिवेने त्याची हाताळणी केली. त्यांच्या निबंधाच्या भाषेत प्रसाद, ओज, विनोद, उपहास, वक्रोक्ती, दृष्टान्त यांचा विलास दिसून येतो. ती चटकदार आणि डौलदार झालेली आहे. निबंधाच्या भाषेत त्यांनी लालित्य गुणांचा जाणिवपूर्वक वापर करायला शिकविले."[२१] त्याचबरोबर शि. म. परांजपे याच्या लेखांमध्ये तर लघुनिबंधाच्या अनेक गुणवैशिष्टयांची प्रकर्षाने जाणीव होते. "लघुनिबंधाला आवश्यक असलेला घटक म्हणजे लेखकाच्या अनुभवांचा वाङ्मयीन

आविष्कार होय. तो परांजपे यांच्या अनेक लेखातून जाणवतो. परांजपे यांच्या व्यक्त होणाऱ्या अनुभवांची शैली संवेदनांनी मोहरलेली, व्याजोक्ती–वक्रोक्ती यांनी ध्वनिगर्भ झालेली, भावनांनी रसरसलेली, संस्कृत भाषेतील शब्दांचा व विभ्रमांचा उत्तम उपयोग करणारी अशी आहे."[२२] अशा प्रकारची विधाने आनंद यादव करतात.

मराठी लघुनिबंध जन्माला येण्याअगोदर श्री. कृ. कोल्हटकर, शि. म. परांजपे, न. चि. केळकर अशा अनेक लेखकांनी लघुनिबंधाच्या जन्माला उपकारकअसे लेखन केलेले दिसते.

मराठी निबंध पाच टप्याने प्रकटत गेला आहे.

१. "१८७० पूर्वीचा प्राथमिक निबंध
२. १८७४ पासूनचा चिपळूकर वळणाचा निबंध
३. परांजपे वळणाचा ललित गुणयुक्त निबंध
४. केळकर वळणाचा निबंध व
५. लघुनिबंध"[२३]

१९२० च्या आसपास नवी पिढी उदयाला आली. आपल्या रोजच्या जीवनातील अनुभव घेऊन आपल्या दृष्टिकोणातून मांडणे, त्यासाठी खेळकर वृत्ती, प्रसन्न शैली आणि कल्पनेच्या बळावर तो निबंध वाचनीय करणे अशी लघुनिबंधाला आवश्यक वाटणारी वैशिष्टये १९२० नंतरच्या निबंधात दिसतात. या वैशिष्टयांबरोबर लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये व त्याला आलेला एखादा अनुभव, विषय केंद्रवर्ती घेऊन लघुनिबंध मराठी साहित्यात अवतरला.

'रत्नाकर' मासिकात जानेवारी १९२६ मध्ये ना. सी. फडके यांची 'सुहास्य' ही पहिली गुजगोष्ट प्रसिद्ध झाली. याच सुमारास इंग्रजीतील नव्या निबंधाकडे त्यांचे लक्ष होते. १९२० मध्ये मुंबई विद्यापीठामध्ये 'Alpha of the plough' हे ए. जी. गार्डिनरचे लघुनिबंधाचे पुस्तक लावले गेले. इंग्रजी लेखकांनी लिहिलेले निबंध फडक्यांना मराठीत आणावेसे वाटले. याचे उदाहरण म्हणजे 'माझ्या साहित्य सेवेतील स्मृती' मध्ये फडके लिहितात, "चेस्टरटन गार्डीनर, लिंड इत्यादींचे निबंध वाचले की, माझ्या मनात येई असे निबंध मराठीत का लिहिले जाऊ नयेत? आणि या लेखकांहूनही माझी इच्छा जागृत करण्याचे काम कोणी अधिक केले असेल

तर ते रिचर्ड किंवा या लेखकाने इतर सर्व निबंधकारांपेक्षा या लेखकाच्या निबंधात विनोद, सूक्ष्म उपहास, जिव्हाळा अन् वाचकांशी हितगुज केल्याप्रमाणे बोलल्याचा भास मला अधिक प्रमाणात आढळतात; व folded hands आणि over the fireside with silent friends इत्यादी त्यांचे निबंधसंग्रह वाचून मी मनाशी निश्चय केला की, निबंधाची ही मोहक तऱ्हा आपण मराठीत आणावयाची!"[२४]

'पर्सनल एसे', 'इंटिमेट एसे' अशा नावाने संबोधले जाणाऱ्या इंग्रजी निबंधावरून फडक्यांनी मराठी निबंधाला 'गुजगोष्टी' हे नाव दिले. निबंध लेखनाचे स्वरूप आपल्या मित्राशी केलेल्या गोष्टींसारखे असावे असे त्यांना वाटू लागले.

"आपल्या अनुभवांच्या बऱ्या वाईट गोष्टी, आपण केलेली सत्कृत्ये आणि आपल्या हातून घडलेल्या चुकाही, आपल्या आवडी—निवडी, खोडी—लहरी सारं काही निबंधाच्या ओघात लेखक खुशाल सांगत असतो. लेखक आणि वाचक यांच्यामधलं अंतर जितके नाहीसे होईल तितका लघुनिबंध सरस वाटेल. वाचक म्हणजे आपल्या अंतरंगातले मित्र आहेत अशा भूमिकेवरून लघुनिबंध लिहिला जातो. या कारणानेच मी या वाङ्मयप्रकाराला 'गुजगोष्टी'च म्हणतो."[२५] निबंध या साहित्यप्रकाराला गुजगोष्टी म्हणणे योग्य आहे असा अटटाहास ना. सी. फडके धरतात. "गुजगोष्टी म्हणजे निबंधाचाच एक प्रकार खरा. परंतु लघुनिबंधाहून तिचे स्वरूप वेगळे कल्पुन मी ती प्रचारात आणली आहे. मला नुसते लहान निबंध लिहावयाचे असते तर 'लघुनिबंध' अशी संज्ञा मी त्यास दिली असती."[२६] अशा विधानातून ना. सी. फडके निबंध या सहित्यप्रकाराला 'गुजगोष्टी' योग्य नाव असल्याचे पटवून देतात.

१९३३ मध्ये 'गुजगोष्ट' या पहिल्या लघुनिबंध संग्रहानंतर 'नव्या गुजगोष्टी', धुम्रवलये, 'पडछाया', 'निबंध सुगंध' असे लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध करतात. १९२६ मध्ये त्यानी एकूण आठ 'गुजगोष्टी' लिहिलेल्या दिसतात. १९३० अखेरपर्यंतच्या गुजगोष्टीचे स्वरूप पाहिले तर लघुनिबंधाची सुरुवात, शेवट, त्याची निवेदनपद्धती, मांडलेली मते यांचा विचार केल्यावर हे ललित भाषेत लिहिले गेलेले निबंध आहेत हे लक्षात येते. या निबंधात स्वतःची मते दुसऱ्याला पटवून देण्याचा प्रकार दिसतो. अशा पद्धतीचे निबंध ना. सी. फडके यांनी लिहिले होते व त्या काळात ते सफळही झाले.

१९३० नंतरचे ‘पाऊस’, ‘हरवली म्हणून सापडली’, ‘न वाचलेल्या ग्रंथांची गोडी’ या फडके यांच्या निबंधांनी खऱ्या लघुनिबंधाचे रूप घेतले म्हणता यईल. फडके हे सौंदर्याला प्राधान्य देणारे साहित्यिक होते. आपल्या नेहमीच्या जीवनात क्षुद्र वाटणाऱ्या घटना प्रसंगांना त्यांनी आपल्या लघुनिबंधांचे विषय बनविले आहेत. निसर्ग, साहित्य, खेळ, कुस्ती—नृत्य—संगीत, स्त्री अशा विषयांना त्यांनी आपल्या लेखनात महत्त्व दिलेले दिसते. आपल्या लिखाणात त्यांनी तंत्राचा जाणिवपूर्वक वापर केलेला जाणवतो. लेखाच्या आरंभी काव्यमय ओळी टाकून सुरुवात मनोरंजक, वाचनीय करण्याचा प्रयत्न ते करतात. वाचकवर्ग स्वतःहून त्यांच्या लेखनाकडे खेचला जाईल या गोष्टीकडे नेहमी लक्ष पुरवून वाचकांची उत्सुकता वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. निबंधाचा आरंभ जसा ते मनोरंजक करतात तथा त्यांच्या निबंधाचा शेवटही ते जाणिवपूर्वक परिणामकारक भाषेत करतात.

१९३० च्या शेवटाला त्यांनी रचलेली निबंधात्मक मांडणी मागे पडून जुलै १९३१ मध्ये त्यांच्या ‘हरवली म्हणून साडली’ अशा निबंधात लघुनिबंधाची वैशिष्टये सापडतात. फडके यांच्या लघुनिबंधाची भाषा काव्यमयतेला प्राधान्य देत होती. संस्कृत भाषेचा वापर, थोडा कल्पनाविलास, अलंकारिक भाषा इत्यादी गोष्टी त्यांच्या लेखनात पहायला मिळतात.

‘नव्या इमारती’, ‘शब्द! शब्द!! शब्द!!!’, ‘सहज’ यासारखे त्यांचे काही निबंध आकर्षक झालेले आढळून येतात. पण १९३१ नंतर त्यांच्या लघुनिबंधाच्या भाषेत साधेपणा आला. वाचक वर्गाला आपल्या स्वतःकडे खेचणारी भाषा आता त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करू लागली. अशाप्रकारची भाषा त्यांच्या ‘गुजगोष्टी’ संग्रहात वाचायला मिळते.

त्यांच्या ‘पहिला पांढरा केस’ या लघुनिबंधात हुकमी वळणाची भाषा पहायला मिळते. काही वेळा त्यांची भाषा भाववृत्तीशी तल्लीन होते. ‘जागेपणाची स्वप्नं’, ‘वाट चुकल्याचा आनंद’, ‘कोमेजणारी फुलं’ अशा लघुनिबंधात तिचा प्रत्यय येतो. ना. सी. फडके यांच्या लघुनिबंधातील अनुभव त्यांच्या सामान्य जीवनातील असल्याचे जाणवते. त्यांचे राहणीमान, नाटक सिनेमाचे वेड, त्यांची साहित्याची आवड—निवड, त्यांच्या जीवनातील सुट्टीचे दिवस, बाजार, त्यांना भावणाऱ्या वस्तू, त्यांची स्वप्ने त्यांच्या लघुनिबंधातून अनुभवायला मिळतात. यातून फडके यांची जीवनाकडे पाहण्याची वेगळी अशी दृष्टी नजरेत भरते. समाधानी, सदा आनंदीत

राहण्याची त्यांची वृत्ती त्यांनी मांडलेल्या अनुभवातून प्रत्ययास येते. त्यांनी स्वतःचे अनुभव लघुनिबंधातून मांडत असताना त्याला स्वतःची दृष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे. रोजच्या जीवनातील सर्व सामान्य जनतेला हवेहवेसे वाटणारे अनेक विषय घेऊन हा साहित्यप्रकार लोकप्रिय केला आहे.

१९२७ पासून लेखक वि. स. खांडेकर यांनी 'वैनतेय' मधून निबंध लेखन केले. सुरुवातीच्या काळात 'लघुलेख' असे नामोनिर्देश करणाऱ्या खांडेकरांचे लघुलेख म्हणजे 'मी' ला भोवतालच्या जीवनात आलेला एखादा अनुभव आरंभी हसत खेळत मांडून त्यानंतर त्यावरचे चिंतन मांडणे व हे चिंतन मांडत असताना आपल्या विचारांना पूरक अशी उदाहरणे देऊन त्यातून तात्पर्य मिळाल्यानंतर लेखाचा शेवट करणे अशा पद्धतीचे लेखन आहे. 'मोत्या', 'अहंकार' अशासारखे त्यांचे लेख प्राथमिक दशेतील लघुनिबंध म्हणून सांगता येईल. त्यानंतरच्या लेखनाला लघुनिबंधाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

१९३० पासून वि. स. खांडेकरांची 'वायुलहरी' (१९३६), 'चांदण्यात' (१९३८), 'अविनाश' (१९४१), 'मंदाकिनी' (१९४२), मंजिऱ्या' (१९४४), 'कल्पकता' (१९४६), 'तिसराप्रहार' (१९४८), 'मंझधारा' (१९५९) अशी लघुनिबंधांची पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

माणूस, जीवन, निसर्ग, प्रवासातील अनुभव, साहित्य, बालपण असे विविध विषय त्यांनी लघुनिबंधात हाताळले आहेत. अशा विषयांवर लेखन करत असताना आकर्षक सुरुवात व परिणामकारक शेवट त्यांच्या लेखनात दिसत आहे. अधूनमधून ते शाब्दिक कोटया व कधी विषयांतर करताना दिसतात. त्यातून त्यांच्या लेखनाला विस्कळीतपणा आलेला जाणवतो. एखादे विधान करून त्या विधानाला संवादी विरोधी अशा गोष्टी त्यांना आठवत असतात व त्यातून उपमा, दृष्टान्त, प्रतिके इत्यादी अलंकार वापरून साध्ये साध्ये विचार कल्पनाशक्तीच्या बळावर कौशल्यपूर्ण रचना करतात. त्यांच्या लेखनाला स्मरणशक्तीची जोड आहे. आपल्या लेखनात संस्कृत शब्दांचा, वाङ्मयीन संकेतांचा वापर त्यांनी योग्यपणे केलेला दिसतो.

सुरुवातीच्या काळात खांडेकरांच्या लेखांमध्ये अलंकरण, कृत्रिम शैली दिसत होती; मात्र १९३५ नंतर ते कमी कमी होत गेलेले दिसते. त्यांच्या विषयांच्या विविधतेत, निसर्गवर्णनात,

चमत्कृतीत, त्यांच्या उच्च दर्जाच्या भाषाशैलीत त्यांच्या लघुनिबंधांचे सौंदर्य जाणवते तसेच ते त्यांच्या चिंतनात विशेष स्वरूपात जाणवत राहते. चिंतनशीलता हा खांडेकरांच्या लघुनिबंधांचा विशेष आहे. त्यांना आलेल्या अनुभवांचे ते व्यापक व सखोल चिंतन करतात. तिथे त्यांची गंभीरवृत्ती जाणवते. त्यांच्या चिंतनात जीवनाविषयीची अनिवार ओढ दिसून येते. आनंद यादव खांडेकरांच्या लघुनिबंधाविषयी लिहितात, "खांडेकरांच्या लघुनिबंधाची जातकुळी मराठी आहे. मराठी साहित्य परंपरेत तो जन्माला आला आहे. तसेच अनुभवाच्या आविष्कार पद्धतीच्या शोधातून तो आरंभी प्रेरित झाला आहे. इंग्रजीतून मराठीत आणलेल्या फडके यांच्या लघुनिबंधांच्या आधारे तो काही काळ वाढला, विकास पावला हे खरे. पुढे त्याने इंग्रजीतील इतर लघुनिबंधकारांचे काही प्रमाणात अनुसरण केले हेही खरे. नंतर मात्र तो स्वयंविकसित झालेला आहे, स्वतंत्रपणे वाढला आहे. १९२० पर्यंतच्या मराठी साहित्याची चिंतनशील परंपरा त्याने आत्मसात केलेली आहे."[२७] खांडेकरांच्या लेखनात मराठी मन व्यक्त होते. त्यांच्या लेखातील जीवनविषयक मनन चिंतन सखोल, व्यापक, सूक्ष्म आणि विपुल सर्व ंकष झाले असून मानवतावादी भूमिकेतून त्यांच्या विचारांची अभिव्यक्ती झालेली दिसून येते.

फडके व खांडेकर यांच्या इतकेच महत्त्वाचे निबंधकार म्हणून अनंत काणेकरांचा उल्लेख येथे अभिप्रेत आहे. १९३३ च्या आसपास काणेकरांनी निबंध लेखन सुरू केलेले जाणवते. 'पिकली पाने' (१९३४), 'शिंपले आणि मोती' (१९३६), 'तुटलेले तारे' (१९३८), 'उघडया खिडक्या' (१९४५), 'नवेकिरण' (१९४७), 'विजेचीवेल' (१९५६), 'पांढरी शिडे' (१९५७) हे त्यांचे लघुनिबंधांचे संग्रह प्रकाशित झालेले आहेत. वाचकांना आपल्या लेखनातून विचार देणे या हेतुने त्यांचे लेखन झालेले दिसते. प्रारंभी कुशलतेने विषयाला आधारित विचार सांगितला जातो. त्यानंतर त्यांना संवादी किंवा विरोधी अशी दोन चार उदाहरणे घेतली जातात. ही उदाहरणे जीवनातील वेगवेगळया क्षेत्रांतील असतात. ही उदाहरणे चटकदार व मनोरंजक व वाचनीय झालेली असतात. त्यात एखादी व्यक्ती त्याच्या वैशिष्टय दर्शनामुळे जिवंत झालेली असते. आणि शेवटी परत एकदा त्या विषयाला आधारित विचाराचा परिणामकारकतेने उल्लेख करून लघुनिबंधाचा शेवट केला जातो. विचार प्रतिपादन शुष्क वाटू नये म्हणून गणूकाका हे पात्र काणेकरांच्या लघुनिबंधात वारंवार आलेले असावे. या पात्राला त्यांच्या लेखनात महत्त्वाचे स्थान आहे. गणूकाका हे पात्र विचारांचे प्रतिनिधित्व करत असताना स्वभाव

वैशिष्टयांनी व्यक्त होताना जाणवते. मराठी लघुनिबंधात अशी पात्रनिर्मिती इतर कुणाच्याच लेखनात दिसत नाही. ही मराठी लघुनिबंधातील काणेकरांची विशेष स्वरूपाची पात्रनिर्मिती आहे.

काणेकरांना माणूस त्यांच्या गुणदोषांसह प्रिय आहे. माणूस त्यांना प्रिय असल्याकारणाने माणसात त्यांचे मन रमताना दिसते. मानवी स्वभाव, त्यातील गुंतागुंती अनेक पापुद्रे अशा अनेक अंधारात राहिलेल्या बाजूंवर ते बारकाईने प्रकाश टाकतात. काणेकर अनेकवेळा भांडवलशाहीवर टीका करत असतात. तसेच समाजातील इतर प्रवृत्तींवर विनोद वृत्तीने टीका करत असताना दिसतात. म्हणून अनंत काणेकरांना 'नवमतवादी लघुनिबंधकार' मानले जाते.

सामाजिक विषमता, दलितांवर होणारे अन्याय अत्याचार अशा विषयांवर काणेकरांनी लिहिले आहे. जीवनातील एखाद्या प्रसंगांचा संस्कृतीचा, संकेताचा, समाजातील दृष्टीस पडलेले घटना–प्रसंग, रूढी–परंपरा यांचा विचार करुन जे त्यांना सूचते जे सत्य त्यांना जाणवते ते आपल्या लघुनिबंधात मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

आपल्या लघुनिबंधाद्वारे काणेकर; समाजातील, व्यवहारातील त्याचबरोबर ग्रंथातील पूरक अशी उदाहरणे, पुरावे देऊन विचार व्यक्त करताना दिसून येतात. शहरात राहणाऱ्या मध्यमवर्गीय समाजाच्या समस्यांवर त्यांनी आपल्या लेखात टिका केली आहे. समाज आणि जीवनावर केलेली टिका काणेकरांच्या लेखांचे खरे वैशिष्टय आहे. जीवन जगण्याची ओढ, उत्साह काणेकरांच्या लेखनातून दिसून येतो. सामान्य माणसाविषयीची आपुलकी त्यांच्या लघुनिबंधातून व्यक्त होते. विविध आठवणींनी, व्यवहारातील उदाहरणे, विनोदी गोष्टींनी काणेकरांचे लघुनिबंध लेखन भरून गेले आहे.

लेखक अनंत काणेकर यांच्या लघुनिबंधाची भाषा सरळ साधी आहे. जेथे आवश्यकता असते तेथेच त्यांनी विशेषणे वापरण्याचा प्रयत्त्न केला आहे. आपण जसे बोलण्यात वापरतो तशाच पद्धतीची भाषा ते आपल्या लेखनात वापरतात. त्यांच्या निबंधातील भाषेचे वर्णन करताना लेखक वि. स. खांडेकर म्हणतात, "विचारप्रधान लघुनिबंधाला अशी, त्यांची भाषा साधी, सोपी, रोखठोक, अर्थवाहक, संस्कृतचा अथवा इंग्रजीचा प्रभाव नसलेली, अस्सल मराठी बाण्याची आहे."[२८] लेखक काणेकर यांचे लेखन खांडेकरांच्या लेखनाला मिळते जुळते आहे.

आपल्या लेखनातून वाचक वर्गाला काही जीवनाविषयी ज्ञान मिळावे अशा प्रकारची धडपड त्यांच्या लेखनातून जाणवते. त्यांनी आधुनिक विचार आपल्या लघुनिबंधाद्वारे लोकांपर्यंत पोहचवायचा प्रयत्न केला. आपला विचार वाचकांना पटवून देत असताना तो कसा रोचक बनेल यांच्याकडे त्यांचे जास्त लक्ष असते. त्यांच्या लघुनिबंधाची मांडणी आटोपशीर असली पाहिजे याकडे त्यांचा कल होता.

१९२० पूर्वी मराठी वाचकांनी चिपळूणकर, आगरकर अशा लेखकांचे गंभीर लेख वाचले होते. त्यामुळे फडके खांडेकर काणेकर यांचे खेळकर सौंदर्याला जोपासून अनुभव आविष्कार करणारे अलंकारिक भाषेतील लेखांना निबंध संबोधणे वाचकांना बरोबर वाटले नसावे; व फडक्यासह त्या काळातील इतर अनेक लेखकांचे लहान आकाराचे लेख पूर्वीच्या लेखाहून वेगळे वाटल्याने त्यांना फक्त निबंध न म्हणता लघुनिबंध असे संबोधण्यात आले असावे.

१९३३ ते १९५० या काळात अनेक लेखकांनी फडके यांच्याप्रमाणे लघुनिबंध लेखन केल्याचे आढळून येते. वि. पा. दांडेकर यांचे ‘फेरफटका’ (१९३६), ‘टेकडीवरून’ (१९३७), वा. भा. पाठक यांचा ‘नकोत त्या गोष्टी’ (१९३४), रघुवीर सामंत यांचे ‘पणत्या’ (१९३९), ‘तरांगण’ (१९४०), ‘एक पाऊल पुढे’ (१९४१), ‘काळ खेळतो आहे’ (१९४८), ‘पंचवीस वर्षानंतर’ (१९४९), न. चि. केळकर यांचा ‘पालापाचोळा’ (१९४३), बाळशंकर देशपांडे यांचे ‘शोभेचे सैभाग्य’ (१९४८), ‘शिव्या आणि ओव्या’ (१९४९), ‘तांडव आणि लास्य’ (१९५०) अशा काही लेखकांचे लघुनिबंध या काळात प्रसिद्ध झाले होते.

लघुनिबंधाची रचना संपुष्टात येत असताना गं. भा. निरंतर, कुसुमावती देशपांडे व ना. मा. संत या तीन लेखकांनी निबंध लेखनाला नवे रूप देणारे निबंध रचले.

१९३४ ते १९५० या काळात गं. भा. निरंतर यांनीही निबंधलेखन केले आहे. ‘साखरझोप’ (१९३८), ‘नवी साखरझोप’ (१९४८) हे त्यांचे दोन लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. फडके–खांडेकर–काणेकर अशा लेखकांनी निर्माण केलेली लघुनिबंध लिहिण्याची तऱ्हा मोडून काढणारे, सर्वार्थाने निराळे असे त्यांचे लेख आहे. त्यांचे लघुनिबंध गंभीर स्वरूपाचे आहे. लेखनात अनुभव केवळ खेळकरपणे न मांडता त्यांच्या खोलात जाऊन अभिव्यक्तीचे नवीन

मार्ग शोधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. यांत्रिक 'मी' ला नाकारून 'मी' च्या व्यक्तिमत्त्वाचे दर्श न घडविणारे त्यांचे लघुनिबंध आहे. त्यांच्या लेखनात चिंतनशीलता, गंभीरता, काव्यात्मकता, प्रफुल्लित अशा विविध भाववस्थांतून अनुभव व्यक्त झाले आहे. त्यांच्या लघुनिबंधाना सामाजिक दृष्टिकोणही लाभला आहे.

कुसुमावती देशपांडे यांचे 'दीपकळी' (१९३५), 'दीपदान' (१९४१), 'मोळी' (१९४६) हे लघुनिबंधाचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यामधील निःसंशयपणे लघुनिबंध म्हणता येईल असे 'दीपदान' मधील 'मध्यान्ह' व 'मध्यरात्र' आणि 'मोळी' मधील 'चंद्रास्त' हे लघुनिबंध आहेत. हे तीनही लेख तंत्रबद्ध लेखनापेक्षा वेगळे आहेत. खोटया, उथळ काव्यात्मतेला नाकारून अस्सल काव्यात्मता कशी येऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले आहे. निसर्गाच्या वर्ण नातून 'मी'च्या व्यक्तित्वाचा आविष्कार त्यांच्या प्रतिमायुक्त भाषेने केला आहे. त्यांचे मन चिंतनशील होते. 'मी'ला उच्च व व्यापक पातळीवर कसा नेता येईल हे त्यांनी लघुनिबंधातून दाखवून देण्याचा प्रयत्त्न केला आहे. गंभीरपणे अस्सल अनुभवातून त्यांचा लघुनिबंध अवतरताना दिसतो. कुसुमावतींचे लघुनिबंध म्हणजे या साहित्यप्रकाराच्या आजच्या विकासाची खुणा म्हणता येतील.

ना. मा. संत यांचा 'उघडे लिफाफे' (१९४४) हा लेख संग्रह प्रसिद्ध आहे. संतांबद्दल आंनद यादव लिहितात, "ना. मा. संत यांनी फडके पद्धतीच्या आत्मनिवेदनशील लघुनिबंधाचे निखळ रूप शोधायचा प्रयत्न केला. फडके यांच्या लघुनिबंधाला हळूहळू कृत्रिम तंत्राने, आपण जगावेगळे जगणारे आहोत, असा कृत्रिम पवित्रा घेतलेला 'मी'च्या व्यक्तिमत्त्वाने शबलित केले होते. गोडगोड शैलीदार गप्पा मारणे, वाचकांचे आवडते विषय गोंजारणे, वाचकाला खऱ्या 'मी' पासून दूर ठेवणे इत्यादी दोष त्यात उद्‌भवले होते. त्यापासून त्याला मुक्त करण्याचा प्रयत्न ना. मा. संतांनी केला."[२९] फडके यांच्या लेखात जाणवणारे दोष नाकारून त्याला मुक्त करण्याचा प्रयत्न करून या लघुनिबंधाला सच्चे प्रामाणिक स्वरूप संत यांनी प्राप्त करून दिले. फडके यांच्या लघुनिबंधाला लागलेले तंत्र नाकारून संतांनी लघुनिबंधाच्या मांडणीत निखळपणा स्वीकारला. भाषेतील नाटयात्मकता नाकारून तिला सच्चेपणा प्राप्त करून दिला. या काळात असे विपुल लेखन झालेले दिसून येते.

इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेने लघुनिबंध हा साहित्यप्रकार हाताळणे इतर सामान्य लेखकांना सोपे वाटत असावे कारण १९३० ते १९४९ पर्यंतचे फडके यांच्या लघुनिबंधाच्या साच्यात बसणारे जे लेखन होत होते त्या लेखनाला गप्पांचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे आपण मित्रांशी गप्पा मारतो तसे लिहून जरा अलंकारिक भाषेत मांडले म्हणजे लघुनिबंध झाला अशी सामान्य लेखकांची समज होणे साहजिक होते. या काळात सामान्य निबंधकारांनी फडके–खांडेकर–काणेकर यांनी निर्माण केलेली चौकट स्वीकारली. आपल्या लेखनात एखादा अनुभव घेऊन त्याचा प्रारंभ करणे. त्यांची अलंकारिक भाषेत सजावट करणे व त्यानंतर त्या अनुभवांद्वारे आपल्याला समजलेल्या जीवनमूल्यांच्या आधारे लेखाचा शेवट करणे; अशा फडके–खांडेकर आणि काणेकर या लेखकांनी निर्माण केलेल्या साच्याचे ढोबळ स्वरूप स्वीकारून केलेले लेखन होऊ लागले. त्यांच्या लेखनातील मर्म त्यांनी स्वीकारले नाही. नुसते ढोबळ दिसणारा साचा स्वीकारला. अशाप्रकारे साचात बसणाऱ्या साहित्यप्रकाराबद्दल वा. ल. कुलकर्णी म्हणतात, “कोणत्याही वाङ्मयप्रकाराचा साचा बनू लागला की, त्याच्या ठिकाणीची नवनवीन सौंदर्य प्रकट करण्याची शक्ती मंदावते व हळूहळू वाचकांना त्याच्याविषयी कुतूहल वाटेनासे होऊन या सर्व गोष्टींचा परिणाम तो वाङ्मयप्रकाराला दुर्बल बनविण्यात होतो.”[३०] नेमकी अशी गोष्ट मराठी लघुनिबंधाच्या बाबतीत घडली. या काळातील लघुनिबंध हा लेखकांच्या व वाचकांच्या कौतुकाचा प्रकार बनला. मध्यमवर्गीय चाकोरीच्या जीवनातील लहानसहान गोष्टींचे, त्यांच्या उणिवांचे, दोषांचे, मर्यादांचे लेखन या काळात इतक्या कौतुकाने होत होते की हे सारे शेवटी निरर्थक वाटू लागले. लघुनिबंधाला अप्रतिष्ठा लाभून लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार त्या काळात उतरणीला लागला.

१९४५–४६ च्या आसपास इरावती कर्वे यांचे लघुनिबंध लेखन सुरू झाले. ‘परिपूर्ती’ (१९४९) हा त्यांचा लेखसंग्रह प्रकाशित झाला. या संग्रहात नव्या वळणाच्या निबंधांचा समावेश आहे. त्यामुळे नव्या–जुन्या लघुनिबंधाच्या संदर्भात इरावती कर्वे यांच्या प्रयत्नांना महत्त्व लाभले. त्यांच्या लेखनात त्यांच्या व्यापक व सखोल अनुभवविश्वाचे दर्शन घडते. स्वतःच्या घरातील माणसापासून जगाच्या पाठीवरच्या अनेक देशातील माणसांच्या संस्कृतीपर्यंत त्यांचे अनुभव विश्व पसरलेले आहे. त्यांच्या लेखनात जाणवणारे चिंतन हे समाजशास्त्रज्ञ मनाचे आहे. तशीच त्यांची संशोधक दृष्टीही लेखनात जाणवत राहिल्याने त्यांच्या लेखनाला एक खंबीर

स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यांच्या वेगळया दृष्टिकोणामुळे त्यांचे लेखन सतत वाचकांचे लक्ष वेधून घेते.

१९५० पर्यंतच्या मराठी लघुनिबंधांचे स्वरूप सामान्यतः वर सांगितल्याप्रमाणे होते. लेखक गं. भा. निरंतर, कुसुमावती देशपांडे, ना. मा. संत आणि १९४८–५० च्या आसपासचे इरावती कर्वे यांचे लेखन उत्तम दर्जाचे झालेले दिसते. १९५० नंतर निर्माण होणाऱ्या नव्या ललित निबंधांची जणू ती सुरुवात होती.

## १.३.२ स्वातंत्र्योत्तर काळातील निबंध लेखन

'निबंध', 'गुजगोष्टी', 'लघुलेख', 'लघुनिबंध' अशा विविध नावांनी ओळखला जाणारा हा साहित्यप्रकार आज 'ललित लेखन', 'ललित निबंध' या नावांनी ओळखला जात आहे. आजच्या ललित लेखनाविषयी सांगताना लक्ष्मीकांत तांबोळी लिहितात, "लघुनिबंधाचा आजचा अवतार म्हणजे संध्याचा ललित लेख. लघुनिबंधाने जसे निबंधाचे 'बंधन' झुगारले तसेच आजच्या ललित लेखाने लघुनिबंधाचे 'लघुत्त्व' आणि 'साचेबंद' स्वरूप झुगारले आहे. आजचा ललित लेख हा बहुरूपी आहे."[३१] ललित निबंध या वाङ्मयप्रकाराला फडके यांनी 'गुजगोष्टी' हे नाव दिले होते. पण पुढे १९४१ मध्ये फडके यांनीच या वाङ्मयप्रकाराला 'ललित निबंध' हे नाव सांगितले. या नावाला खांडेकरांचा विरोध होता खरा पण पुढे हेच नाव साहित्याच्या क्षेत्रात रूढ झाले आहे. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य लाभल्याने लेखकांच्या मनावरचा पारतंत्र्याचा ताण नष्ट होऊन स्वातंत्र्यामुळे लेखकाची लेखणी स्वतःकडे वळली. स्वातंत्र्योत्तर काळात साहित्याकडे पाहण्याची नवी दृष्टी तयार झाली होती. या काळात अनुभव, आत्माविष्कार यांना साहित्याच्या क्षेत्रात एक प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. या काळात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला महत्त्व आले. आपल्या नेहमीच्या जीवनातला अगोदरच्या काळात एकदम क्षुद्र वाटणारा 'अनुभव' याला साहित्यात मोल आहे अशी दृष्टी स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झाली. त्यामुळे जीवनातील अस्पष्ट असलेले वैयक्तिक पातळीवरचे अनुभव स्वातंत्र्योत्तर काळात या नवसाहित्यात उतरू लागले होते.

स्वातंत्र्योत्तर काळातील ललितनिबंध हा साहित्यप्रकार 'मी'चे अनुभव—आठवणी मांडण्याच्या हेतुने जन्माला आला असे म्हणता येते. १९५० नंतर ललित निबंध किंवा ललित लेख अशा नावाने प्रस्तापित झालेल्या या साहित्यप्रकारात पुष्कळ लेखन झाल्याचे आढळून येते. लघुनिबंध, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रणे यांनी व्यापलेल्या ललितनिबंध या लेखनप्रकाराची व्याप्ती खूप मोठी आहे. शांता शेळकेलिहितात, "ललित लेख लवचिकप्रसरणशीलतेची साक्ष पटवतात. कधी ते कथेच्या वळणाने जातात तर कधी कवितेशी असलेले आपले अंगभूत नाते व्यक्त करतात. कधी ते आत्मकथनात रंगतात, तर कधी प्रवासवर्णनाच्या वाटेला वळतात. कधी ते व्यक्तिचित्रे रेखाटतात तर कधी स्थलवर्णन करतात. कधी पत्र लेखनातून तर कधी काळाच्या एखाद्या तुकडयाच्याच चित्रणातून ते स्वतःचा व भोवतालचा शोध घेताना दिसतात."[३२] ललितनिबंध लेखनात आठवणी, अनुभव, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रणे यांचा संकर झालेला दिसून येतो.

१९४५ ते १९६० या काळापासून लघुनिबंधाची शैलीलेखन करणारे ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, गो. रा. दोडके, सरोजिनी बाबर, वि. पा. दांडेकर इत्यादी लेखक १९६० नंतरही लेखन करताना दिसतात. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात ज्या लेखकांनी आठवणी—अनुभव यांच्या अंगाने लेखन केले त्यांचा परामर्श घेताना प्रथम त्यात न. वि. गाडगीळ यांचे नाव महत्त्वाचे वाटते. 'सालगुदस्त' (१९४७), 'अनगड मोती' (१९५५), 'स्मृतिशेष' (१९५८), 'पाव आणि मिसळ' (१९६३) असे त्यांचे चार संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. बालपणात, तारुण्यात त्याचबरोबर त्यांच्या राजकीय जीवनक्षेत्रात जे जे प्रसंग घडले; त्या घटना—प्रसंगांचा त्यांच्या जीवनावर झालेला परिणाम व त्यांच्या मनात निर्माण झालेल्या भावभावना यावर त्यांची वरील चारही पुस्तके आधारित आहेत.

राजकीय जीवनात आलेल्या अनुभवांकडे ते विनोदाने पाहतात. त्यांच्या या लेखांची भाषा मराठी मनाचे प्रतिबिंब असलेली दिसत आहे. आपल्या लेखनात त्यांनी अनेक उपमादी अलंकाराचा वापर केलेला दिसून येतो. विनोदी शैलीने वाचकांना हास्यमय करण्याची त्यांची वृत्ती चटकन लक्षात येते. गाडगीळ हे राजकीय क्षेत्रातील अनुभव घेतलेले एकमेव ललित निबंधकार होते. ज्यांनी आपले राजकीय जीवनातील अनुभव—आठवणी समृद्धपणे आपल्या लेखात उतरवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

‘स्पर्शाची पालवी’ (१९५९), ‘आकाशाचा अर्थ’ (१९६५) असे गो. वि. करंदीकरांचे लघुनिबंध संग्रह प्रकाशित झाले आहेत. १९५५ पूर्वीचे त्यांचे निबंध फडके व खांडेकर वळणाचे होते पण त्यांच्या १९५५ नंतरच्या निबंधांचे स्वरूप बदलल्याचे लक्षात येते. त्यांच्या लेखांची सुरुवात थेट विषयाला धरून असते. त्यांच्या निबंधात अधूनमधून विषयांतर केलेले दिसून येते. पण ते विषयाशी निगडित असते. त्यांच्या लघुनिबंधाचा शेवट सखोल, अर्थदर्शक, त्यांच्या विचारातील बौद्धिक क्षमता दाखविणारा, काव्यात्मक स्वरूपाचा असतो.

करंदीकरांच्या लेखनामध्ये काव्यात्मता अधिक प्रमाणात जाणवते. ‘पहिला पाऊस’, ‘स्पर्शाची पालवी’, ‘या माझ्या पाऊलवाटा’ अशा त्यांच्या लघुनिबंधांमध्ये काव्यात्मकता प्रकर्षाने जाणवते. करंदीकरांचे अनुभवविश्व सखोल होते. जीवनातील विविध अनुभव वेगवेगळया तऱ्हेने अभिव्यक्त होताना दिसतात. विचार आणि चिंतन करंदीकरांच्या लेखनाची महत्त्वाची अंगे आहे. त्यांनी नेहमीच आशयात वास्तवता आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लेखनाची शैली साधी, सरळ तशीच ती अर्थनिवेदकआहे. काही वेळा त्यांची शैली काव्यात्मक रूपही धारण करते; त्यावेळी त्यांची प्रतिमायुक्त अभिव्यक्ती झालेली दिसते. त्यांची भाषाशैली विषयाच्या भाववृत्तीनुसार बदलत असते. त्यांच्या वास्तववादी शैलीत असलेल्या निबंधांची शैली साधी सरळ आहे. तर बुद्धिनिष्ठ शैलीत त्याच्या बुद्धिचा आणि कल्पनेचा प्रत्यय येतो.

दुर्गा भागवत या स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महत्त्वाच्या निबंधकार आहे. ‘ऋतुचक्र’ (१९५६), ‘भावमुद्रा’ (१९६०), ‘व्यासपर्व’ (१९६२), ‘रूपरंग’ (१९६७) व ‘पैस’ (१९७०) असे त्यांचे ललित निबंधांचे संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांच्या निबंधात आपल्याला भाववृत्ती दिसते. त्यांच्या ‘भावमुद्रा’ या संग्रहातील लेख भक्तीने भरलेले आहे. निसर्गाच्या सान्निध्यात त्यांच्या मनातील संवेदनशीलतेबरोबर त्यांच्या मनातील भाववृत्ती उमलून येते. त्यामुळे त्यांच्या अनेक निबंधात निसर्ग सातत्याने अवतरत असतो. त्यांच्या निबंधात त्यांच्या मनाला लागलेली निसर्गाची ओढ दिसते. निसर्गातील प्रत्येकहालचाली त्यांच्या निबंध लेखनाचा भाग होताना जाणवतात. त्यांच्या निबंधातील निसर्ग चैतन्यमय आहे. अशा निसर्गाच्या हालचाली आपल्या निबंधात नमूद करत असताना त्या भावमग्न होताना जाणवतात. त्यांच्या लेखनाला कवितेची जोड आहे. भागवतांचे लेखन शृंगारिकभाषेत नसले तरी ते लेखन वाचकांच्या मनात भरते. त्यांनी

केलेली निसर्गवर्णने, संवेदनशीलता, संस्कृत शब्द, वाक्यांची चढ उतार यामुळे त्यांच्या लेखनाला वेगळयाच तऱ्हेचे सौंदर्य प्राप्त झालेले दिसते. भावमग्नतेनुसार त्यांच्या लेखांची भाषा बदलत जाते.

निबंध लेखनाची पुर्वी एक चाकोरी निर्माण झाली होती. त्या चाकोरी बाहेर जाऊन स्वतंत्रपणे निबंधलेखन करून मराठी लघुनिबंधाला एक वेगळे रूप प्राप्त करून देण्यामागे इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर यांचा महत्त्वाचा वाटा आहे; आणि हे नवीन रूप म्हाणजे ललित निबंध होय.

'निंबोणीच्या झाडामागे' (१९५६), 'आले मेघ भरूनी' अशी मंगेश पाडगावकरांची ललित निबंधांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या निबंध संग्रहाच्या शिर्षकावरून त्यांचे कवीमन निबंधात उतरलेले दिसते. त्यांच्या कोणत्याही साध्या अनुभवाचे वर्णनदेखील प्रतिमायुक्त भाषेने भरले आहे. त्यांच्या काही लेखात विचार किंवा चिंतन येत असले तरी ते सामान्य स्वरूपाचे वाटतात. पण एखादी निसर्गस्थिती जेव्हा त्यांना काव्यमय, उत्सुक करत असते त्यावेळी मात्र त्यांची लघुनिबंधाची भाषा लेखनातील विचार, चिंतनामुळे उंची गाठते. पाडगावकरांच्या काही ललित निबंधावर फडके–खांडेकर यांच्या लेखनाची थोडीशी छाप असलेली दिसून येते. परंतु त्यांचे जास्तसे लेख वेगळया वळणाचे आहेत. या काळात पाडगावकरांचे निबंध अव्वल दर्जाचे ठरले आहे.

माधव आचवलांचा 'किमया' हा ललित निबंधाचा संग्रह १९६१ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. आचवल हे व्यवसायाने वास्तुकलाशास्त्राचे तज्ञ असल्याकारणाने त्यांच्या 'किमया' संग्रहात वास्तुकलेसंबंधीचे अनुभव व्यक्त झालेले दिसतात. त्यांच्या लेखनाला त्यांच्या कलाशास्त्राची घनिष्ठ जोड आहे. आचवलांचे मन संवेदनशील, काव्यमय आहे. लेखातील अनुभव कथनातील शब्दांचा वापर ते मार्मिकपणे करत असताना जाणवतात. त्यांचे विपुल लेखन नसले तरी त्यांचे हे लेखन गुणात्मक वैशिष्टयांनी भरले आहे.

श्रीनिवास कुलकर्णी यांची 'डोह' (१९६५), 'सोन्याचा पिंपळ' (१९७५), 'पाण्याचे पंख' (१९८७), 'कोरडी भिक्षा' (२०००) अशी ललित निबंधांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. डोह' या संग्रहात त्याचे कवी मन जाणवते. त्यांचे संपूर्ण लेखन काव्यात्मकतेचा आविष्कार करत

असताना दिसते. त्यांनी बालपणात अनुभवलेला परिसर, परिसरातील माणसे, तिथली प्राणिसृष्टी, लोकसंस्कृती, रूढी, श्रध्दा, संकेत, भाषा यांनी गोवलेल्या समूह जीवनाचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून येतो. प्रत्येक गोष्ट वर्तमान काळात घडत आहे व स्वतः वाचक त्यांचा अनुभव घेत आहे असा भास निर्माण करणारे त्यांचे लेखन आहे. प्रत्येक प्रसंग सांगत असताना तो समोर घडत आहे असे शाब्दिक चित्र ते वाचकांसमोर आपल्या लेखनाद्वारे उभे करतात. दुर्गा भागवत यांच्या लेखनाशी जवळचे नाते सांगणारे श्रीनिवास कुलकर्णी यांचे लेखन आहे.

कुलकर्णी यांच्या निबंध लेखनाचा आरंभ विषयाला धरून होतो. जसे त्यांना अनुभव आले तसेच ते त्यांच्या लेखात उतरतात. त्यात कल्पनात्मक बदल होत नाही. त्यांच्या लेखनात येणारे विनोद, संवाद, घटना हे अनुभवाला पूरक असा भाग म्हणून येत असतात. त्यांच्या अनुभवांच्या मांडणीत अनुभवांची विविधता आहे. त्यातून त्यांचे लेखन अर्थपूर्ण रूप घेताना जाणवते.

कुलकर्णी यांच्या 'डोह' या संग्रहात प्रत्येक लेखातील अनुभवामागे बालजिज्ञासा दिसते. बालपणात मनात अनेक प्रश्न निर्माण झाल्याने त्या प्रश्नाची उत्तरे शोधण्याकरिता त्यांचे मन त्यांना प्रेरित करत असल्याचे दिसून येते. त्यांच्या 'डोह' मधील बालमनावर खेडया गावातील ब्राम्हण कुटुंबातील संस्कार झालेले दिसतात. बालमनाला पडलेले प्रश्न, हिंदू संस्कार, हिंदू धर्म कल्पना, प्राण्याविषयी हिंदू मनात असणाऱ्या समजूती आणि आपल्या अवतीभवतीच्या गुढ निसर्गाची ओढ अशा वैशिष्टयांनी भरलेले त्यांचे लेखन आहेत. तसेच या हिंदू संस्कारित प्रश्नांना; संवेदनशील आणि जिज्ञासू मनाची जोड असल्याने हे अनुभव वाचकांना त्यांच्या लेखनाकडे खेचून घेणारे आहेत.

कुलकर्णी यांच्या लेखांमध्ये काव्यात्मकता अधिकतेने जाणवते. त्यांच्या लेखनात त्यांच्या संवेदनशील मनाचा प्रत्यय येतो. त्यांची भाषा प्रत्येकअनुभवाच्या ठिकाणी आपले रूप बदलत असते. काही वेळा त्यांच्या भाषेला हळुवार गती प्राप्त झालेली असते. त्यांच्या लेखात शब्दांची विशेष निवड दिसते. त्यांच्या 'सोन्याचा पिंपळ' मध्ये वय वाढत गेलेले मन अध्यात्म हिंदू संस्कार अशा संदर्भात अधिक विचार करू लागल्यावर त्यांच्या बालपणातील अनुभवांना हिंदू संस्कारांचा अन्वयार्थ लाभलेला दिसून येतो. 'सोन्याचा पिंपळ' मधील वय वाढलेले मन जरी

आधुनिक जीवनपद्धतीने लेखन करीत असले तरी त्या मनाला हिंदू संस्कारित मनाची संवेदना आहे.

'डोह', 'सोन्याचा पिंपळ' या दोन्ही पुस्तकांतील अनुभवांना मानसिक संबंध असल्याचे जाणवते. मराठी ललित निबंधाला साजेल अशाप्रकारची भाषा आणि अनुभवसृष्टीमुळे त्यांच्या लेखनाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

ग्रेस यांचे 'चर्चबेल' (१९७४), 'मितवा' (१९८७), 'संध्यामग्न पुरुषाची लक्षणे' (२०००) हे लेखसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. भावनांची उत्कटता, आत्ममग्न वृत्ती, गुढ, प्रतिमा–प्रतिके असलेली कलात्मक भाषा ही ग्रेस यांच्या लेखनाची वैशिष्टये आहेत. निसर्गाची विविध स्पंदने त्यांनी नेमकी टिपली आहे. निसर्ग प्रतिमांतून ते आशय व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या लेखनाला काव्यात्मकतेची जोड आहे. काव्यात्मकता हेच खरे तर ग्रेस यांच्या लेखनाचा मुख्य विशेष वाटतो.

मधुकर केचे यांचे 'आखर आंगण' (१९६७), 'पालखीच्या संगे' (१९६५), 'चेहरे मोहरे' (१९६९), 'झोपलेले गाव' (१९७८), 'माझी काही गावं' (१९८२) हे प्रसिद्ध झालेले संग्रह आहेत. केचे यांचे सर्व लेख गतआयुष्यातील अनुभव आठवणींनी भरलेले आहेत. बालपणात पाहिलेली स्थळे, त्यांना घडलेले व्यक्तिदर्शन, त्यांनी पाहिलेले घटना–प्रसंग, वस्तू हे त्यांच्या लेखनाचे विषय झाले आहेत. त्यांनी पूर्व आठवणीत रमून केलेले लेखन त्यांच्या वैशिष्टयपूर्ण भाषेने वाचनीय केले आहेत.

१९७५ पासून ललित लेखन करणाऱ्या वासंती मुझुमदार यांचे 'नदीकाठी' (१९८२) व 'झळाळ' (२००१) हे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. मुझूमदार यांचे बालपण कऱ्हाड येथे कृष्णकाठी गेले. त्यांच्या लेखनात व्यक्त होणारा 'मी' हा कृष्णकाठच्या पन्नास वर्षापूर्वीची तिथली जीवनसृष्टी, तेथिल निसर्ग, प्राणीसृष्टी, संस्कृती यांचे दर्शन घडवतो. त्यांच्या लेखनशैलीत लोकभाषेतील लोकगीते, आरत्या, अभंग, पदे, सुभाषिते, कवितेतील अवतरणे, श्लोक आलेले दिसतात. काव्यात्मकता व त्यांच्या संवेदनशील मनाचे दर्शन त्यांच्या लेखातून होत आहे.

चि. त्र्यं. खानोलकर यांचे 'वारे वाहे रूणझुणा' (१८७२) व 'दिपमाळ' (१९७४) असे संग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या पहिल्या संग्रहात त्यांच्या दैनंदिन जीवनातील घटना—प्रसंग, त्यांना भेटलेली माणसे, साहित्यात घडलेल्या घडामोडींचे दर्शन होते. तर 'दिपमाळ' या दुसऱ्या संग्रहात व्यक्तिचित्रांचा समावेश आहेत.

विजय तेंडुलकर हे प्राख्यात नाटककार असले तरी त्यांनी ललित लेखनही केलेले दिसून येते. 'रातराणी' (१९७१), 'फुगे साबणाचे' (१९७४), 'कोवळी उन्हे' (१९८५), 'हे सर्व कोठून येते?' (१९९२), 'राम प्रहर' (१९९४) हे त्यांचे ललित लेखसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. काव्यात्मकता, नाटयात्मकता, भीषणता इत्यादी विशेष या लेखनाला लाभले आहेत. समकालीन मुंबई शहरातील सामाजिक, राजकीय परिस्थिती, सभोवतालची माणसे व त्यांचे परस्परसंबंध हे सर्व त्यांच्या ललित मनाने टिपले आहेत. ललित गद्यात सामाजिक भीषणता रेखाटून त्यावर जीवनासापेक्ष विचार करूनही अशा प्रकारच्या वास्तविक रूपातील लेखन ललित रूप घेऊ शकते हे तेंडुलकरांच्या लेखनाने मराठी ललित निबंधाला प्रथम जाणीव करून दिली. 'कोवळी उन्हे' या लेखात त्याने काल्पनिक व्यक्तिरेखा निर्माण केल्या आहेत. दुरदर्शनवरील एखादा कार्यक्रम, एखादे वाचनात आलेले पुस्तक, त्यांना भेटलेली प्रवासातील माणसे यांचा उल्लेख करून त्यावर ते जीवनविषयक भाष्य करताना दिसतात.

माधव गडकरी यांचे वृतपत्रीय लेखनाच्या कालात्तरात देश विदेशातील भ्रमंतीमधून लेख आकाराला आले आहेत. 'असा हा महाराष्ट्र' भाग १ व २ (१९६५), 'असा हा गोमंतक' (१९७५), हे दोन संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्याचप्रमाणे 'चौफेर' या सदर लेखनातील सहा संग्रह १९८२ ते २००० या कालखंडात प्रसिद्ध झाले आहेत. 'साहित्यातील हिरे आणि मोती' (१९८४), 'चिरंतनाचे प्रवासी' (१९९२), 'गुलमोहराची पाने' (१९९९), 'प्रतिभेचे पंख लाभलेली माणसे' (२०००) अशी पुस्तके त्यात येतात. गडकरी यांचे लेखन वृत्तपत्रीय गरजेतून निर्माण झाले असलेतरी लालित्यपूर्ण भाषेतून ते व्यक्त होत असते. भोवतालचे जीवन, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादीतले वास्तव सूक्ष्मपणे न्याहाळून ते त्यांच्या साहित्यात व्यक्त करतात. त्यांचे लेखन समाज प्रबोधनाच्या हेतुने झाले आहे असे म्हणता येते.

गडकरी यांच्याप्रमाणे अरुण टिकेकर यांनीदेखील वृत्तपत्रीय गरजेतून गंभीर लेखन केले आहे. 'तारतम्य– भाग १ ते ५' (१९९३, ९४, ९५, ९६, ९७), 'जनमत' (१९९५), 'कालमीमांसा' (२००१), 'सारांश' (२००१), 'लेले आण मी' (१९९८), 'ओच्या कोच्या' (२००२), 'स्थलकाल' (२००४) असे त्यांचे लेखन आहेत. त्यांच्या लेखनात त्यांची इतिहास संशोधकाची भूमिका जाणवते. धार्मिक, राजकीय, साहित्यिकआणि महाराष्ट्रातील थोर व्यक्तींच्या जीवनावर त्यांनी भाष्य केले आहेत.

'पांढऱ्यावर काळे' (१९७१), 'वाटा' (१९७६), 'रानमेवा' (१९७८), 'नागझिरा' (१९७९), 'पांढरी मेंढरं हिरवी कुरणं' (१९७९), 'चित्रे आणि चरित्रे' (१९८३), 'जंगलातील दिवस' (१९८४), 'सरडा' (१९८४), 'परवचा' (१९९४), 'प्रवास एका लेखकाचा' (१९९४), 'डोहातील सावल्या' (२०००) हे व्यंकटेश माडगुळकरांचे प्रसिद्ध संग्रह आहेत. 'मी' ला आलेल्या समाज जीवनातील अनुभव, कौटुंबिकजीवन, प्राणी, निसर्ग असे त्यांच्या लेखनाचे विषय झाले आहेत. 'आरण्यके', 'नागझिरा' अशी प्राणी जीवनाशी, निसर्ग जीवनाशी संबंधीत असलेल्या पुस्तकांमधील अनुभवचित्रे तशाची तशी त्यांच्या लेखनात उतरली आहेत. वस्तुनिष्ठपणे त्यांनी आपल्या अनुभवांचे कथन केले आहे. त्यांच्या लेखनाला परिश्रम व व्यासंगाची जोड आहे असे जाणवते. त्यांचे लेखन नेहमी टवटवीत वाटते. त्यांचे अनुभव शब्दबद्ध होत असताना त्यांच्या मनाची तटस्थता लेखनात सतत जाणवत राहते.

सरोजिनी वैद्य यांचा 'पहाट पाणी' हा निबंधाचा संग्रह १९७५ साली प्रसिद्ध झाला. त्यांनी घेतलेल्या विविध साहित्यकृतींचा आस्वाद हा त्यांचा 'पहाट पाणी' या पुस्तकातील लेखांचा आशय आहे. वाचलेल्या साहित्यकृतीत जे मानवी जीवन त्यांनी अनुभवले ते त्यांनी लेखांमध्ये रेखाटले आहे. तसेच त्यांच्या 'शब्दायन' या लेखसंग्रहातून त्यांनी त्यांचा सभोवतालचा समाज, त्या समाजातील माणसे, त्या माणसांचे जगणे यावर त्यांनी नेमकेपणाने भाष्य केलेले दिसून येते. त्यांच्या या लेखनातील स्पष्टीकरणाला त्यांच्या जीवनानुभवांचा स्पर्श आहे.

विजया राजाध्यक्ष यांनी कथा लेखनाबरोबरीने ललित लेखनही केलेले दिसून येते. 'कदंब' (१९७९), 'स्वच्छांद' (१९८७), 'अवतीभवती' (१९९२), 'तळयात मळयात' (१९९७), 'अनुबंध' (१९९८) असे त्यांचे लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. साहित्याकडे त्या अभ्यासू वृत्तीने पाहतात.

त्यांनी अनेक वर्षे नियतकालिकांसाठी सदरलेखन केलेले दिसते. राजाध्याक्ष यांचा लेखनाचा प्रवास विकासशील आहे. भूतकाळ, अवतीभवतीचा परिसर, सभोवतालची माणसे, त्यांनी वाचलेले साहित्य आणि त्यांनी जाणलेली संस्कृती याविषयी वास्तव त्यांच्या लेखनात येते. त्यांच्या लेखनात त्यांची संवेदना, चिंतनशीलता जाणवत राहते. त्यांच्या तरल भावभावना, संवाद असलेले त्यांचे मुक्त चिंतनपर ललित लेखन वैशिष्टयपूर्ण झाले आहे.

या काळात लेखन करणारे आणखी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व शान्ता शेळके हे आहे. त्यांनी सातत्याने विपुल लेखन केलेले दिसून येते. गतकाळातील आठवणींचा भाग त्यांच्या लेखनात मोठया प्रमाणात दिसतो. 'धूळपाटी' (१९८२), 'वडीलधारी माणसे' (१९८९), 'एकमानी' (१९८९), 'जाणता अजाणता' (१९९५), 'इतस्ततः' (१९९८) हे त्यांचे लक्षणीय लेखसंग्रह आहेत.

१९६० नंतर कथा, कादंबरी त्याचबरोबर ललित गद्य या स्वरूपाचे लेखन करणारे प्रमुख लेखक म्हणजे मधु मंगेश कर्णिक. 'सोबत' (१९६२), 'जिवाभावाचा गोवा' (१९८६), 'नैऋत्येकडला वाटा' (१९९०), 'माझा गाव माझा मुलूख' (१९९०), 'अबीर गुलाल' (१९९०) हे त्यांचे प्रसिद्ध संग्रह आहेत. कर्णिकयांनी नागर व ग्रामीण जीवनाचे चित्रण केलेले आढळते. त्यांच्या 'सोबत' या संग्रहात त्यांनी आंबा, फणस, चिंच, केळ, शेवगा, बकुळ ही झाडे तसेच कावळे, चिमण्या, कुत्र्याची पिल्ले अशी पशूपक्षीसृष्टी यांच्या सहवासात अनुभवलेले क्षण रेखाटले आहेत. त्यांच्या लेखनात झाडांमध्ये असलेल्या मानवी स्वभावातल्या गुणधर्माची शोधाशोध दिसून येते. त्यांचे ललित लेखन सहज साध्या भाषेत झालेले दिसून येते.

पुढे १९७८ मध्ये प्रभाकर पाध्ये यांच्या प्रसिद्ध झालेल्या 'चिवारीची फुले' या संग्रहातून त्यांच्या अनुभवसमृद्ध व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. निसर्गाची ओढ असणारे, जगातील वेगवेगळया शहराचा प्रवास करून त्या प्रदेशाच्या संस्कृतीचा अनुभव घेणारे, महान व्यक्तिमत्त्वाच्या दर्श नाने भाळणाऱ्या त्यांच्या व्यक्तित्त्वाचे दर्शन त्यांच्या लेखनात होते. त्याकाळी मराठीत असे व्यक्तिमत्त्व क्वचितच सापडत असे.

ग्रामीण साहित्य, ग्रामीण साहित्यावरील समीक्षा असे लेखन करणारे लेखक म्हणजे आनंद यादव. त्यांना मराठी साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. 'मातीखालची माती' (१९६५), 'स्पर्श

कमळे' (१९७८), 'पाणभवरे' (१९८२) ही यादवांची ललित निबंधांची पुस्तके. जीवन जगत असताना जीवनाच्या विविध टप्प्यांवर पुरुषाच्या जीवनात स्त्री कशी येते आणि त्या विशिष्ट टप्प्यांवर पुरुषाच्या मनातील स्त्रीचे स्थान हे त्यांच्या 'स्पर्शकमळे' या ललित निबंधातून प्रत्ययाला येते.

शृंगारिक भावना, त्याला साजेल अशी काव्यात्मक भाषा यादवांच्या लेखनाला लाभली आहे. १९७० ते १९८० च्या दरम्याने शृंगारिक रूपातील निबंधलेखन करणारे लेखक म्हणून त्यांची वेगळी ओळख आहे. याच काळात ते ग्रामीण अनुभवांचे रेखाटन करताना दिसतात. जन्म गाव सोडून शहरात आलेल्या त्यांच्या मनाला त्यांचा गाव कसा आठवतो; त्या गावात जगलेले बालपण, त्या गावातील मातीची ओढ त्याचबरोबर नव्या शहरात त्यांच्या मनाची झालेली अवस्था ते आपल्या 'पाणभवरे' या ललित लेखात रेखाटताना दिसतात. यादवांच्या लेखनातील 'मी' स्वतःचे अंतरंग, सभोवतालचे ग्रामीण वास्तव, संस्कृती स्थित्यंतरे तटस्थपणे पाहतो. त्यामुळे त्यांचे लेखन जीवनाविषयी गंभीरपणे विचार करायला भाग पाडणारे झाले आहे.

ग. दि. माडगूळकर यांचे १९६२ मध्ये 'मंतरलेले दिवस' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. चित्रपटकथा, गीते लिहिणारे व कवी अशी साहित्य क्षेत्रात ग. दी. माडगुळकरांची ओळख आहे. 'मंतरलेले दिवस' या संग्रहातील लेखनाला अनुभव, आठवणीचे स्वरूप लाभले आहे. ग्रामीण जीवनातील जीवन मूल्यांकडे ते भावुक होऊन पाहतात. त्यांचे पूर्व आयुष्य ग्रामीण भागात गेले होते व उत्तर आयुष्य शहरात गेले. ग्रामीण जीवनातील त्याचे दारिद्रयातील दिवस ते शहरी जीवनातील प्रतिष्ठित जीवन इथपर्यंतचे त्याचे अनुभव, आठवणी त्यांच्या लेखात आल्या आहेत. ग्रामीण जीवनातील सांस्कृतिक मूल्यांकडे त्यांनी भावुक होऊन पाहिल्याचे त्यांच्या लेखनातून जाणवते. कुठे तरी पूर्व आयुष्यात हरवलेले त्यांचे स्वप्नाळू मनाचे दर्शन त्यांच्या लेखनात होते. आपल्या जीवनात जे घडले; जो अनुभव आला ते फक्त मुक्तपणे आठवणीच्या रूपात एका पाठोपाठ एक सांगत जाणे अशा पद्धतीचे त्यांचे लेखन आहे.

अंनतराव पाटील यांचे 'झडीचे दिवस' हे ललित निबंधाचे पुस्तक १९८१ मध्ये प्रसिध्द झाले. स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारे हे लेखन आहे. ग्रामीण समाजातील

रीतीभाती त्यांची संस्कृती, तेथिल माणसे कुटुंबजीवन, दारिद्रय याचे दर्शन 'झडीचे दिवस' या पुस्तकात घडते. या लेखनाची भाषा साधी व सरळ आहे.

मुक्तीनंतरच्या काळातील ललित निबंधांचा विचार करताना बा. भ. बोरकरांच्या निबंध संग्रहाचा विचार करणे योग्य ठरते. 'चांदण्याचे कवडसे' (१९८२), 'पावलापुरता प्रकाश' (१९८३) आणि 'घुमटावरचे पारवे' (१९८६) हे त्यांचे स्वातंत्र्योत्तर काळातील निबंधांचे संग्रह आहेत. त्यांच्या निबंध लेखनातून त्यांच्या सौंदर्यसक्त मनाचे दर्शन होते. त्यांच्या निबंध लेखनाद्वारे त्यांचे रसिक, सौंदर्यसक्त, चिंतनशील तसेच जीवनाकडे प्रसन्नतेने पाहणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. निसर्गातील झाडे–झुडपे, पशू–पक्षी यांच्यातच फक्त त्यांचे मन रमत नाही; तर समाजातील माणसात, पाहिलेल्या स्थळातही त्यांचे मन रमताना जाणवते. सत्य, मांगल्य, स्वातंत्र्य इत्यादी मूल्यांवर त्यांची अफाट श्रध्दा आहे. जीवनातील विविध पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्त्व बनलेले आहे तसेच ते त्यांच्या ललित निबंधातही आविष्कृत होताना जाणवते.

१९८५ मध्ये प्रसिद्ध झालेला चंद्रकुमार नलगे यांचा 'गावाकडची माती' हा ललित निबंध संग्रह ग्रामीण जीवनातील निसर्ग, शेती, रूढी–परंपरा, तेथिल माती, त्यांची संस्कृती यांचे दर्शन घडविणारा आहे. त्यांच्या लेखातील 'मी' हा ग्रामीण जीवनाच्या ओढीने व्याकूळ होताना दिसतो. ग्रामीण जीवन चित्रित करत असताना त्यांचे मन काव्यात्म व भावूक होताना जाणवते. निसर्गातील विविध हालचालींना टिपणारे त्यांचे लेखन आहे.

वि. वा. शिरवाडकर यांनीही ललित लेखन केलेले दिसते. 'आहे आणि नाही' (१९५७), 'विराम चिन्हे' (१९७०), 'प्रतिसाद' (१९७६), 'वाटेवरल्या सावल्या' (१९८२), 'एकाकी तारा' (१९८२), 'अंतराळ' (१९९१), 'एखादं पान एखादं फुल' (१९९६), 'बरे झाले देवा' (१९९७) हे एकूण तीन वर्षातच प्रसिद्ध झालेले संग्रह आहेत. या संग्रहातील काही लेख निसर्गचित्रणपर तर काही लेख बाबा आमटे, बालकवी, विनोबा भावे याचे व्यक्तिचित्रणपर आणि साहित्यातील प्रश्नांवर भाष्य करणारे आहेत.

मराठी साहित्यात निसर्गचित्रणाबरोबरीने व्यक्तिचित्रणपर विपुल लेखन झालेले दिसते. दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगुळकर, श्रीनिवास कुलकर्णी, आनंद यादव, मधू मंगेश कर्णिक यांच्या

लेखनात निसर्ग सृष्टीचे दर्शन घडते. याशिवाय प्रकाश गोळे– 'द्विजगण अवघे वृक्षी' (१९७८), अशोक बेंडखळे– 'ऋतुस्पर्श' (१९९०), शरदिनी डहाणूकर– 'फुलवा' (१९९१), 'वृक्षगान' (१९९८), बाळ गाडगीळ– 'सकाळचे उन्ह' (१९९५), द. ता. भोसले– 'पार आणि शिवार' (२००२), शंकर सखाराम– 'गावदरणी' (२००२), 'आगरातली माणस' (२००३) अशा लेखकांनीही निसर्गवर्णनपर तसेच व्यक्तिचित्रणपर ललित निबंध लेखन केलेले आढळते.

१९७० ते १९८५ च्या काळात ललित गद्यात सामाजिक जाणिवांचे रेखाटन होऊ लागले होते. खेळकर वृत्तीने किंवा लालित्य बाजुला सारून समाजातील वेगवेगळया स्थितिगतीचे वर्णन लेखक अनुभवाच्या रूपाने करू लागले होते. अशा पद्धतीचे लेखन अनिल अवचट यांनी केलेले दिसून येते. 'माणसं' (१८८०), 'मोर' (१९८९), 'स्वतः विषयी' (१९९०), 'अमेरिका' (१९९२), 'आप्त' (१९९७), 'छंदाविषयी' (२०००) अशी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. आपल्या गत आयुष्यातील आणि वर्तमान वास्तवातील अनुभव, आठवणी लालित्याच्या सहायाने रेखाटून त्यांनी सामाजिकतेची जाणीव करून देण्याचा प्रयत्त्न केला आहे. १९८० व १९८५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'माणसं' आणि 'कोंडमारा' या दोन्ही पुस्तकात सामाजिक जाणिवा आहे. त्यांच्या लेखनातील वास्तविक अनुभव व कष्टपूर्ण जीवन विश्लेषण वाचकांचे मन वेधून घेणार आहे.

रत्नाकर मतकरी यांनी नाटक या प्रकाराबरोबरीने ललित निंबंध लेखनही केलेले आहे. 'सोबत', 'महाराष्ट्र टाइम्स', 'आपलं महानगर' अशा नियतकालिकांमध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या जीवनातील घटना–प्रसंग, त्यांना भेटलेली माणसे, कला, साहित्य, समाज, राजकारण, इत्यादींनी मतकरी यांना स्फुट लेखन करण्यास प्रवृत्त केले आहे. 'सहज' (१९८६), 'गोंदण' (१९८६), 'रंगत' (१९८९), 'सोनेरी सावल्या' (१९९७), 'शांततेचा आवाज' (१९९८), 'शब्द...शब्द...शब्द' (१९९९), 'तृप्त मैफल' (२००१) हे रत्नाकर मतकरी यांचे प्रसिद्ध लेख संग्रह आहेत.

१९७५ नंतर लेखन करणारे श. ना. नवरे हे महत्त्वाचे लेखक ठरले आहे. दैनंदिन जीवनात साध्या सुध्या प्रसंगातून, त्यांना भेटलेल्या माणसांतून आणि भूतकाळातील आठवणींतून त्यांचे लेख निर्माण झाले आहे. 'कवडसे' (१९७५), 'शन्नडे' (१९९०), 'झोपाळा' (१९९८), 'ऊन

सावल्या' (२०००) हे त्यांचे ललित लेखसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या या लेखनात त्यांचा प्रामाणिकपणा लक्षात येतो.

'मृद्गंध' (१९९६), 'फुलवेल' (१९९७) हे इंदिरा संत यांचे ललित लेखसंग्रह. शान्ता शेळके, अरुणा ढेरे अशा लेखिकांप्रमाणे इंदिरा संत यानी कविता लेखनाबरोबरीनं ललित लेखनही केले आहे. त्यांच्या लेखनातील 'मी' आठवणीत रमणारा, भावुक होणारा आहे.

शिरिष पै या इंदिरा संताप्रमाणे कवयित्री आहे. 'आतला आवाज' (१९६१), 'आजचा दिवस' (१९७४), 'टिप् फुले टिप् ग' (१९९५), 'सय' (१९९७), 'कोलाज' (१९९८) हे शिरिष पै यांचे सदर लेखनाचे संग्रह आहेत. भूतकाळातील आठवणीत रमणारे पै यांचे मन आहे. त्यांच्या लेखातून त्यांच्या जीवनातील सुख दुःखाचे क्षण, यश अपयश याविषयीचा आलेख येतो. आंतरिक घुसमटीतून त्यांचे हे लेखन झालेले दिसून येते.

अरुणा ढेरे यांनी कविता लेखनाबरोबरीन ललित लेखनही केले आहे. त्यांच्या लेखनात त्यांची अभ्यासूवृत्ती दिसून येते. इतिहासातील घटना, स्थळे, व्यक्ती त्यांना ललितनिबंध लेखन करण्यास प्रवृत्त करतात. 'लावण्ययात्रा' (१९८७), 'मनातलं आभाळ' (१९९४), 'आठवणीतले आंगण' (१९९९) हे त्यांचे प्रतिष्ठित लेख संग्रह आहेत. त्यांच्या अधिकशा लेखामध्ये त्यांनी स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर भाष्य करून स्त्रियांच्या भावभावनांचे विवेचन केलेले दिसून येते.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी धार्मिक, सामाजिक समस्यांवर 'सुवात' मासिकात संपादक या नात्याने प्रवास वृत्तपर तसेच चिंतनपर लेखन केल्याचे आढळते. 'तेजाची पाऊले' (१९९५), 'ओॲसिसच्या शोधात' (१९९६), 'सृजनाचा मोहर' (२००२) ही त्यांची स्फुट लेखनाची सदर लेखनातून निर्माण झालेली पुस्तके आहेत. चिंतनशीलता, काव्यात्मकता, भावनांची कोमलता त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत. त्यांच्यातील 'मी' तटस्थ, विचारशील 'मी' आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात ललित निबंध म्हणून निर्देशित केलेला साहित्यप्रकार अशा अनेक लेखकांनी हाताळला. जीवनातील प्रत्यक्ष घटित अनुभव घेऊन 'मी'च्या भावस्थितीचा आविष्कार करणारे हे ललित निबंध लेखन १९५० नंतर विपुल प्रमाणात लिहिले गेले आहे. या कालखंडातील ललित लेखनाचा आढावा घेताना इरावती कर्वे, शांता शेळके, दुर्गा भागवत,

आनंद यादव, प्रभाकर पाध्ये, इंदिरा संत, विंदा करंदीकर, श्रीनिवास कुलकर्णी, विजय तेंडुलकर, विजया राज्याध्यक्ष, अरुणा ढेरे, माधव आचवल, मधु मंगेश कर्णिक, ग्रेस, शिरिष पै या लेखक लेखिकांनी ललित निबंध लेखनात महत्त्वाची भर घालून हा वाङ्मयप्रकार समृद्ध करून त्याला चालना देण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे ललित निबंध लेखनाचे दालन आज विस्तृत होत चाललेले दिसून येते.

## १.४ निष्कर्ष:

१. १८१८ पासून इंग्रजी निबंधाचे अनुकरण करून मराठी साहित्यात आलेल्या 'निबंध' या वाङ्मयप्रकाराची निर्मिती ज्ञानप्रसार करण्याच्या प्रयोजनातून झाली होती.

२. १८१८ ते १८५० या काळात मुख्यतः सामाजिक आणि धार्मिक विषयांवर निबंध लिहिलेले आढळून येतात.

३. १८५० ते १८७४ हा कालखंड वैचारिक साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा कालखंड होता. या काळातील निबंध लेखनाचे स्वरूप गंभीर, विचारप्रधान होते.

४. १८८५ नंतर नियतकालिकांद्वारे बहुतांशी निबंध लेखन झाले असून या निबंध लेखनाने बरीच वैचारिक जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. या काळातील निबंध लेखनामागे समाज प्रबोधन, ज्ञानप्रसार, व्यवहारिक सदूपदेश अशी प्रयोजने दिसत होती.

५. १८७४ ते १९२० हा मराठी वाङ्मयाचा महत्त्वाचा कालखंड होता. या कालखंडात निबंध या वाङ्मयप्रकाराची स्पष्ट जाणीव लेखकांना झाली होती. या काळातील निबंधात मोठया प्रमाणात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक विषयांवर विचारमंथन झालेले दिसून येते.

६. १९२० नंतरचा काळ हा लघुनिबंधाचा काळ मानला तरी १९२० पूर्वीचे परांजपे, कोल्हटकर, केळकर यांचे लेखन लघुनिबंधाची जवळीक साधणारे असल्याने या तिन्हीं लेखकांनी लघुनिबंध लेखनाला हातभार लावलेला दिसतो.

७. १९२० ते १९५० हा लघुनिबंधाचा काळ होता. १९२० च्या आसपासच्या पिढीतील मराठी लेखकांनी आत्मपर, काहीसा रंजक स्वभावाचा लघुनिबंध स्वीकारला. सर्वसामान्य माणसांना

रोजच्या जीवनातील जे घटना–प्रसंग महत्त्वाचे वाटत नाही अशा घटना–प्रसगांना त्यांनी आपल्या लेखांचे विषय बनविले आहे.

८. फडके, खांडेकर आणि काणेकर या तिन्ही लेखकांच्या लेखनाची वैशिष्टये पाहिली तर आजच्या ललित निबंधाला उपकारक ठरणारे लेखन त्यांनी लघुनिबंध लेखनाच्या काळात केलेले दिसते.

९. १९५० नंतर काही लेखकांनी लघुनिबंध लेखनाच्या तंत्रालाच महत्त्व दिल्याकारणाने त्यांचे लेखन फडके खांडेकरांच्या लघुनिबंधाच्या दर्जाचे झाले नसावे. त्यामुळे मराठी लघुनिबंध लेखन उतरणीला लागले. परंतु याच काळात वि. पां. दांडेकर, ना. मा. संत, वा. भा. पाठक, रघुवीर सामंत, गो. रा. दोडके, वि. श. बर्वे अशा लेखकांनी केलेल्या लघुनिबंध लेखनाला फडके, खांडेकर व काणेकर यांच्या लघुनिबंधा एवढीच लोकप्रियता लाभली होती.

१०. १९५० नंतर लघुनिबंध लेखनाने नवीन वळण घेतले. लघुनिबंधातील मित्राशी गप्पा मारण्याची भूमिका जाऊन 'मी'च्या आत्मविष्काराला महत्त्व आले. लेखकाच्या स्वतःच्या अनुभव–आठवणींना, भावनांना, कल्पनांना, चिंतनाला व विचारांना येथे प्राधान्य मिळाले व १९५० नंतर लघुनिबंधाला 'ललित निबंध' असा शब्द रूढ झाला.

११. १९५० नंतर ललित निबंध लेखन होऊ लागले. यापूर्वीही काही प्रमाणात लालित्य काही साहित्यिकांच्या लेखनात सापडत होते. परंतु प्रत्यक्ष घटित अनुभवांचे विश्लेषण, अभिव्यक्तीतील सच्चेपणा, प्रांजळ निवेदन, आत्मनिष्ठा, एखाद विषयावर सखोल चिंतनाच्याबरोबरीने आलेले विचार, 'मी' चा आत्माविष्कार, सौंदर्यानुभव रेखाटन, निसर्ग प्रतिमांच्या साहाय्याने केलेले लेखन, काव्यात्मकता, चिंतनशीलता, विचारगर्भता, खेळकर शैली, कल्पकता, विनोद ही वैशिष्टये १९५० नंतरच्या ललित निबंधाला मिळालेली देणगी आहे.

१२. १९५० नंतर लघुनिबंधातील उपदेशकाची भूमिका जाऊन आत्मविष्काराला महत्त्व आले. लेखकाच्या जीवनातील अनेक  बरेवाईट अनुभव–आठवणी, निसर्गचित्रण प्रवासातील आठवणी, व्यक्तिचित्रे यांच्या आनुषंगाने वाचकांचा लेखकाच्या वास्तव जीवनाशी संपर्क येतो.

१३. १९५० नंतरच्या ललित निबंध लेखनात आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गचित्रणे, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रणे, चिंतनशील लेख अशा उपप्रकारांचा संकर झालेला दिसून येतो.

१४.निबंधकाराच्या बालपणातील जीवन, तेथिल लोकसंस्कृतीशी समरस झालेले संवेदनशील मन आजच्या ललित निबंधाच्या माध्यमातून आविष्कृत झालेले आहे.

१५. आजच्या ललित निबंधात केलेल्या निसर्ग चित्रणातून 'मी' चे मनोविश्व प्रकर्षाने प्रकट झालेले दिसते. बहुतेक ललित निबंध भाववृत्तीने ओथंबलेले असून वाचक मनाला मोहून टाकणारे आहे.

१६.लेखिका इरावती कर्वे आणि अरुणा ढेरे यांच्या लेखनातील संशोधन दृष्टीत साम्य आढळते.

१७. आजच्या ललित निबंध लेखनाला मुक्तरूप आले आहे. पूर्वी स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून ओळखले जाणारे आत्मकथनपर लेखन, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रणे असे सर्व प्रकारचे लेखन आजच्या ललित निबंधात पहायला मिळते.

१८. लेखकाचे बालपणातील जीवन, तेथिल निसर्गाशी, लोकसंस्कृतीशी समरस झालेले संवेदनशील मन १९५० नंतरच्या ललित निबंधात आविष्कृत झालेले आहे.

१९. इ. स. १८१८ पासून निबंध लेखनाने सुरू झालेला प्रवास आज ललित लेखन या नावाने सुरू आहे. या लेखनाची कक्षा दिवसेंदिवस वाढत चाललेली जाणवते. 'निबंध', 'लघुनिबंध', 'ललित लेख', 'ललित निबंध' अशा विविध नावाने ओळखला जाणारा हा वाङ्मयप्रकार आपल्या आकारात आणि आशय विषयात बदल मान्य करून मराठी साहित्यात रूढ होऊन अनेक टप्पे ओलांडत आज यशस्वी झाला आहे.

## १.५ संदर्भ सूचीः

१. शेरे निळकंठ, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिकवाङ्मय', सुविद्या, प्रकाशन, पुणे, प्र. आ., २००५, पृ. २८

२. गोखले द. ना. (संपा.) 'साहित्यविचार', व्हीनस प्रकाशन पुणे, पृ. २४७

३. प्रभुदेसाई सुधाकर, (संपा.) 'English English, Marathi navneet advance dictionary', पृ. १०६

४. फडके विजय नारायण, (संक) ,'समग्र ना. सी. फडके खंड १० भाषणे व लघुनिबंध', ना. सी. फडके फाऊंडेशन, प्र. आ., ऑगस्ट २०१०, पृ. ५७

५. गंभडी वि. श., 'साहित्याचे तत्त्वज्ञान', मेहता पब्लिशिंग हाऊस, प्र. आ., मार्च १९९७, पृ. ३९७

६. वडेर प्रल्हाद, 'ना. सी. फडके एक चिकित्सक अभ्यास', राजहंस वितरण, प्र. आ. १९९०, पृ. १६३

७. फडके विजय नारायण (संक), 'समग्र ना. सी. फडके खंड १० भाषणे व लघुनिबंध', उनि, पृ. ५९

८. भावे ह. अ., 'विस्तारित शब्दरत्नाकर', वरदा प्रकाशक प्रा. लि., पुणे, २रे पुनर्मुद्रण जानेवारी २००४, पृ. ५६५

९. शेरे निळकंठ, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङ्मय', उनि, पृ. ३३

१०. नेमाडे भालचंद, 'सहित्याची भाषा', सांकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ., १९९८, पृ. १७

११. फडके विजय नारायण (संक), 'समग्र ना. सी. फडके खंड १० भाषणे व लघुनिबंध', उनि, पृ. ५७

१२. तत्रैव, पृ. ५९

१३. यादव आनंद, 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पुनर्मुद्रण ऑगस्ट २०१६, पृ. ५३

१४. खांडेकर भालचंद्र, 'खांडेकरांचा लघुनिबंध एक लेणे एक देणे', सुविद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००६, पृ. ४२

१५. सावंत वसंत, 'प्रवासवर्णन आणि लघुनिबंध किंवा ललित निबंध, प्रवासवर्णनः एक वाङ्मयप्रकार', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबइ, १९८७, पृ.१३९

१६. यादव आनंद, 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास', उनि, पृ. ११७. तत्रैव, पृ.२

१८. शेरे निळकंठ, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङ्मय, उनि, पृ. ३२

१९. शेळके मोहन, 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, पारतंत्र्यकाल ते स्वतंत्रकाल (१८१८ ते १९५०)', अल्फा पब्लिकेशन्स, नादेड, पृ. ८७

२०. कुलकर्णी व. दि., 'साहित्यविचार', 'प्रदक्षिणा खंड–१', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण. १९९७, पृ. ३३२

२१. यादव आनंद, 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास', उनि पृ. ५

२२. तत्रैव, पृ. ५

२३. तत्रैव, पृ. ६

२४. फडके विजय नारायण (संक), 'समग्र ना. सी. फडके खंड १० भाषणे व लघुनिबंध', उनि, पृ. ५७

२५. फडके ना. सी., 'गुजगोष्टी प्रस्तावना', दि. इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणे, आ. पाचवी १९५८, पृ. ७

२६. तत्रैव, पृ. ७

२७. यादव आनंद, 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास', उनि, पृ. ९

२८. तत्रैव, पृ. १४

२९. काणेकर अनंत, 'पांढरी शिडे, प्रस्तावना', प्र. आ. १९५७, पृ. २३

३०. यादव आनंद, उनि, पृ. २१

३१. तत्रैव, पृ. २३

३२. तांबोळी लक्ष्मीकांत, 'ललित लेखनाची व्याप्ती', प्रतिष्ठान, (संपा) सुधीर रसाळ, रा. र. बोराडे व इतर, 'प्रतिष्ठान' ललित गद्य विशेषांक, वर्ष २६ वे, अंक ५ वा, जून–जुलै १९७९, पृ. ७

# प्रकरण दुसरे

# शान्ता ज. शेळके यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

# प्रकरण दुसरे

## २. शान्ता ज. शेळके यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

### २.१ प्रास्ताविक

आधुनिक मराठी साहित्यात प्रगल्भ चिंतनाच्या सहाय्याने विशेष स्वरूपाचे ललित साहित्य निर्मिती करणाऱ्या शान्ता शेळके या महत्त्वाच्या लेखिका आहे. जीवनाच्या अखेरपर्यंत लेखिकेने अविरत लेखन करून मराठी साहित्य क्षेत्रात अतिशय मोलाची भर घातलेली दिसून येते. २० व्या शतकात कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन, गीत लेखन अशा विविध साहित्यप्रकारांमधील त्यांचे ललित निबंध लेखन वाचकमनावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष ठसा उमठवताना दिसते. त्यांनी केलेले ललित निबंध लेखन विपुल आणि अतिशय प्रभावी झालेले दिसून येते. या प्रकरणात त्यांच्या ललित निबंध लेखनाचा अभ्यास झाला आहे.

### २.२ शान्ता शेळके यांच्या ललित निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

शान्ता शेळके यांच्या ललित लेखनाची सुरुवात वृत्तपत्रीय लेखनाच्या माध्यमातून झालेली दिसून येते. आपल्या ललित लेखनाबद्दल 'माझे सदरलेखन' या लेखात लेखिका लिहितात, "हे लेखन मी आपण होऊन केले नाही. जेव्हा कुणीतरी मला गीते लिहायला सांगितली तेव्हा मी गीत लेखनाकडे वळले; मासिकातल्या, वृत्तपत्रातल्या सदर लेखनाबद्दलही असेच म्हणता येईल. बाहेरून कुणीतरी मला हे लेखन करायला सांगितले तेव्हाच मी ते लिहिले. एरव्ही आत्माविष्काराचे हे सुंदर माध्यम मला कधी गवसलेही नसते." (धूळपाटी, पृ. १७१) आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग' साप्ताहिकात सहसंपादकम्हणून काम करत असताना त्यांच्या आज्ञेवरून लेखिकेने ललित निबंध हा लेखनप्रकार हाताळला. या काळातील त्यांच्या लेखनाला 'नवयुग' मध्ये केलेली कामगिरी पोषक ठरली. अत्र्यांच्या 'नवयुग' मध्ये काम करत असताना त्यांनी अत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक साहित्यकृती वाचल्या, तिथे त्यांची नकळत भाषा सुधारण्यास मदत झाली. नवयुगच्या कार्यालयात त्यांना जे शिक्षण मिळाले ते पुढे त्यांना अनेक दृष्टीनी लाभदायक ठरले.

कुणाच्यातरी सांगण्यातून लेखिकेने ललित लेखन केले असले तरी हा साहित्यप्रकार त्यांना भावलेला दिसतो. आपल्या धूळपाटी' या संग्रहात त्या आपल्या ललित लेखनाविषयी लिहितात, "आणखी एक साहित्यप्रकार म्हणजे ललित लेख. हा प्रकार मला मनापासून आवडतो. माटे म्हणत असत, "काही अनुभव बचकेने घ्यायचे असतात तर काही चिमटीने उचलायचे असतात. ललित लेखनातला अनुभव हा असाच चिमटीने उचलायचा अनुभव आहे. दैनंदिन जीवनात असे सूक्ष्म अनुभव येत असतात. क्वचित काही वाचनात येते ते अर्थ पूर्ण असते. मला ते आतून अस्वस्थ करुन सोडते. पण त्याला कथारूप देता येत नाही, त्याचा आवाका फार मोठा नसतो. असे अनुभव ललित लेखनातूनच मांडण्याजोगे असतात. मला जेव्हा असे काही सूक्ष्म, अस्पष्ट, धूसर जाणवले, भावले तेव्हा ते मी ललित लेखातून व्यक्त करीत गेले. या प्रकारचे लेखन मी विपुल केले आहे त्यात काहीतरी मोठे साधता यावे ही मनातली इच्छा आहे." (धूळपाटी, पृ. २१३) लेखिकेला जीवनात जे काही भावले ते त्यांनी ललित निबंधात मांडले. जीवन जगत असताना त्यांना जे काही जाणवले त्यांच्या अनुभवास आले ते दुसऱ्याला सांगावे त्यातून वाचकांना नवी दृष्टी, नवा विचार देता यावा याच इच्छेतून त्यांचे ललित निबंध लेखन झाले.

त्यांना जे आवडले ते दुसऱ्या कुणाला तरी सांगितल्याशिवाय चैन पडत नव्हते आणि या प्रकृतीला मानवणारा प्रकार म्हणजे ललित निबंध लेखन; हे जाणून घेऊन आपल्या मनाचे कवडसे उघडून वाचकांच्या मनापर्यंत त्यांनी झेप घेतली. भूतकाळात रमण्याची वृत्ती, रसिकता, जीवन प्रेम, माणसांबद्दलचे कुतूहल, निसर्ग प्रेम, त्यांना भेटलेली अत्रे, रा. श्री. जोग, माटे सारख्या त्यांच्या मनाच्या जवळच्या माणसांकडून मिळालेली शिकवण, मार्गदर्शन आणि स्वतःचे अनुभव इतरांपर्यंत पोहचवण्याची त्यांची तीव्र इच्छा या त्यांच्या ललित लेखनामागच्या प्रमुख प्रेरणा आहेत.

## २.३ शान्ता शेळके यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

लेखिकेने विपुल प्रमाणात ललित निबंध लेखन केले आहे. 'शब्दांच्या दुनियेत' (१९५९), 'आनंदाचे झाड' (१९८२), 'धूळपाटी' (१९८२), 'पावसाआधीचा पाऊस' (१९८५), 'एकपानी'

(१९८९), 'मदरंगी' (१९८९), 'वडीलधारी माणसे' (१९८९), 'संस्मरणे' (१९९०), 'जाणता अजाणता' (१९९५), 'इतस्ततः' (१९९८), 'ललित नभी मेघ चार' (१९९८), 'रंगरेषा' (१९९९), 'मनातले घर' (२०००), 'आतला आनंद' (२०१०) व 'नक्षत्रचित्रे' (२०१०) असे त्यांचे एकूण १५ ललित निबंध लेखनाचे संग्रह आहेत.

आत्मपर लेख, स्त्रीविषयकलेख, साहित्यविषयकलेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख तसेच चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशा प्रकारांना सामावून घेणारे लेखन त्यांनी केले आहेत. काहीवेळा अशा प्रकारांचे मिश्रणही त्यांच्या ललित निबंध लेखनात दिसून येते. त्यांचे काही लेख दोन गटामध्येही बसू शकतील अशाप्रकारचे आहे. उदाहरणात 'तोंडे' हा लेख आत्मपर लेखही होतो आणि स्त्रीविषयक या गटातही मोडतो. परंतु अभ्यासाच्या सोयीसाठी त्यांच्या लेखांचे खालील प्रमाणे गट करण्यात आले आहेत.

## २.३.१ आत्मपर लेख

लेखिकेच्या आत्मपर लेखनात त्यांच्या गतजीवनातील विविध वैयक्तिक अनुभव, आठवणी व्यक्त झाल्या आहेत. त्यांनी बालपणात उपभोगलेल्या शेळक्यांच्या वाडयातील आठवणी आजोळच्या घरातील आठवणी, त्यांच्या आईकडून मिळालेल्या संस्काराच्या आठवणी, बालपणात खेळलेल्या खेळांच्या, खाण्यापिण्याच्या आठवणी, शिक्षणाच्या प्रवासातील आठवणी, नोकरीच्या दिवसांच्या आठवणी अशा विविध आठवणींचा संग्रह त्यांच्या आत्मपर लेखनात आहेत.

**शेळक्यांचा वाडा–** या लेखात लेखिकेने शेळक्यांचा कुलवृतांन्त सांगितला आहे. शेळक्यांच्या वाडयातील त्यांच्या अपरिमित आठवणी येथे आविष्कृत झाल्या आहेत. वाडयाचा भूगोल, शेळक्यांचे कोष्टीकाम, वाडयातील प्रत्येक घरातील माणसांतील नातेसंबंध, त्यांचे मागसलेपण, अज्ञान अशा गोष्टींचा उलगडा येथे झाला आहे. मंचर मोटारस्टँड ते शेळक्यांच्या वाडयाची भौगोलिक ओळख त्या या लेखात करून देतात. त्याचबरोबर त्यांनी मांडलेल्या आठवणींतून त्यांच्या प्रत्येक नात्यातील माणसांची ओळख होते.

त्यांचे वडील वारल्यानंतर शिक्षणासाठी त्या पुण्याला काकांकडे राहिल्याने या वाडयाशी त्यांचा संबंध तुटला असला तरी या वाडयाने त्यांना त्यांच्या जातीची जाणीव करून दिली, प्रेम दिले असे त्यांचे म्हणणे आहे. लेखिका लिहितात, "वाडयाने मला जातीची जाणीव दिली. आपल्याला जसे आईवडील असतात, भावंडे असतात, आपले राहते घर असते, तशी आपली एक विशिष्ट जात असते हे शेळक्यांच्या वाडयाने मला सांगितले. तिथले खाणेपिणे, तिथली पूर्ण गावंढळ भाषा, तिथले माग, सूताचे आणि खळीचे वास, तिथल्या बायकांचे नेसणे सवरणे या साऱ्यांचा माझ्या व्यक्तिमत्त्वाशी, माझ्या घडणीशी कुठेतरी खोल संबंध होता. गतजन्मातल्या गोष्टी जशा विसरल्या जातात तसाच तो वाडाही मी जवळ जवळ विसरले जाते. पण माझ्या अबोध मनात, माझ्या रक्तात, माझ्या व्यक्तिमत्त्वात ते सारे कुठेतरी भिनलेले असेलच. कधी तरी एखादा शब्द कानी पडतो, डोक्यावरुन पदर घेतलेली एखादी म्हातारी दिसते, कोऱ्या लुगडयाचा वास येतो, आणि मनाच्या तळाशी खळबळ होते, काही तरी ढवळून वर येते. गडद काळोखात काहीतरी चमकून जाते." (धूळपाटी, पृ. २३) शळक्यांच्या वाडयात बालपणात उपभोगलेल्या दिवसांच्या अनेक आठवणी लेखात शब्दबद्ध झाल्या आहेत.

**आईने पाजलेले बाळकडू –** बालपणात त्यांच्या आईकडून त्यांच्यावर झालेल्या संस्काराविषयी हा लेख आहे. आईविषयी वाटणारा आदर या लेखात जागोजागी व्यक्त झाला आहे. आईने त्यांना जन्मभरासाठी लागणारे जगण्याचे बळ दिले त्याविषयी सांगताना त्या लिहितात, "मला बाळपणी आईकडून मिळाले ते बाळकडू हे असे आहे. बालवयात त्याचे घुटके घेताना मी कधी तोंड वाकडे केले असेल, कधी ओठांशी भिडलेला घोट कडू म्हणून थुकुनही टाकला असेल. पण आता या प्रौढ वयात मला जाणवते आहे की, ते बाळकडूच मला जन्मभर प्रेरणा, जगण्याचे बळ देत आले आहे." (मनातले घर, पृ. १३) आपल्या समृद्ध जीवनाचे श्रेय लेखिका त्यांच्या आईला देताना दिसतात. या लेखात आविष्कृत झालेल्या त्यांच्या आईच्या व्यक्तिदर्शना निमित्ताने त्यांचे स्वतःचे अनुभवदेखील प्रकटत जातात.

स्वतःच्या आणि आईच्या नात्याचे पदर त्या या लेखात उलगडताना दिसतात. लेखिका लिहितात, "मी कुठेतरी वाचलेले आहे, बीजामध्ये काही गुण अंगाचे असतात. पण ते बीज ज्या जमिनीत पडले असेल तीदेखील बीजाला आपले म्हणून काही विशेष गुण देते. तिचे सकसपण किंवा निकसपण बीजाला पोषक किंवा मारक ठरते." (मनातले घर, पृ. ७) त्यांनी

जीवनात वेगवेगळे मार्ग स्वीकारले पण कधी अपयशाने त्या खचून गेल्या नाही. जीवनाचे उत्कट प्रेम टिकून ठेवण्यासाठी आवश्यक असणारी मानसिक शक्ती हा गुण त्यांना त्यांच्या आईकडून मिळाला होता. आईने दिलेली शिकवण त्यांना जीवनात वेळोवेळी उपयोगात आली. हेच त्यांनी वरील वाक्यांतून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**ते दिवस ते खाणे–** या लेखाद्वारे लेखिकेने बालपणीच्या खाण्यापिण्याविषयीच्या अनेक आठवणी सांगितल्या आहेत. त्यांच्या वामनदादाच्या लग्नात घेतलेला सहभोजनाचा अनुभव त्यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर तत्कालीन लग्न परंपरेतील रीतीरीवाज अस्सल देशी पदार्थ याविषयी मनात घोळत असलेल्या आठवणी सांगितल्या आहे. त्यावेळच्या दुधशेवयांची चव त्यांना आठवते. त्यांच्या वामनदादाच्या लग्नाच्यावेळी नवरदेवासह अनेकांच्या घरी जाऊन दुधशेवयांचा घेतलेला आस्वाद, त्यावेळीच नाही तर सतत त्यांच्या मनाला आनंद देत राहिला. लग्नसमारंभात केलेले विशेष खाद्यपदार्थ म्हणजे चुरमुऱ्यांचे, डाळयांचे, गोडया शेवाचे, बिबोटयाचे किंवा चंदन चारोळयांचे लाडू गुळाच्या पुऱ्या, कुर्डया, पापडया अशा काही आठवणींद्वारे लेखिकेने तत्कालीन सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

**मनातले घर–** लेखिका काही काळ त्यांच्या आजोळी खेड या गावात राहिल्या होत्या. त्या गावातील आजोबांचा प्रशस्त वाडा, कौटुंबिक जीवन, प्रादेशिकतेचे हुबेहूब वर्णन या लेखात आले आहे. त्यांनी अतिसूक्ष्मतेने न्याहाळलेले खेड गावाचे चित्र लेखात उतरले आहे. लहानपणी आजोळच्या घरात त्यांचे झालेले कोडकौतुक त्यांना मिळालेला जिव्हाळा, एकंदरीत त्या माणसांकडून त्यांच्यावर झालेले संस्कार, गावातील माणसांकडून मिळालेले आपलेपण या साऱ्या आठवणी लेखात व्यक्त झाल्या आहेत. या खेड गावातील प्रत्येक गोष्टींशी त्यांचा मायेचा संबंध होता. त्यामुळे तेथिल आठवणी सांगत असताना त्या भावुक होताना जाणवतात. त्या म्हणतात, “माझे आजोळ म्हणजे नुसते आजोळ नाही तर आजोळ आणि बालवयातील मी यांचा मिळून सिद्ध झालेला तो एक सुंदर भावानुभव आहे.” (मनातले घर, पृ. १५)

त्यांच्या आजोळचा वाडा मोमीन ओळीत होता. मोमीन म्हणजे मुसलमानातले विणकर. त्यांचे आणि आजोबांच्या घरचे संबंध किती घरोब्याचे होते हे सांगताना लेखिका लिहितात, “मुसलमान शेजाऱ्यांशी आमचे फार जिव्हाळयाचे ऋणानुबंध होते. दिवाळीचा सण आला की आम्ही त्यांच्याकडे फराळाचे ताटे भरभरून पाठवत असू. मोहरमच्या सणात त्यांच्याकडूनही

आम्हाला भट्टीमध्ये भाजलेले खमंग खुसखुशीत रोट येत. या मुसलमान शेजाऱ्यांचा आणि आमचा इतका घरोबा होता की आमच्या घरातल्या बायका त्या बायकांना लतिफावहिनी, जमिलावन्सं अशा नावानी हाका मारत असत आणि त्याही माझ्या आजीशी, माम्या मावशींशी असेच नाते जोडून बोलत. या शेजाऱ्यांमुळे जात, धर्म यांतला भेदभाव माझ्या मनातून फार लहानपणीच पुसून गेला.” (मनातले घर, पृ. १९, २०) एकंदरीत त्यांच्या बालपणातील आजोळ कसे संस्कारी, तेथिल वातावरण किती सुंदर नितळ होते, अशा वातावरणामुळे त्यांचे जीवन कसे संस्कारमय झाले हेच त्यांना या लेखातून सांगायचे होते.

**मुंबईने मला काय दिले—** यामध्ये सहसंपादकाचे काम करत असतानाच्या आठवणींनी जागा घेतली आहे. त्यांच्या या मुंबईच्या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात आपण काय मिळविले हे सांगताना लेखिका लिहितात, “पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिने एका विशाल, व्यापक, पैलूदार आणि रंगीबेरंगी जीवनाशी माझा घनिष्ठ परिचय घडवून आणला. अनेक सरकारी आणि खाजगी समित्या, फिल्म सेन्सॉर बोर्ड आणि ड्रामा सेन्सॉर बोर्ड, रेडिओ आणि दुरदर्शन, चित्रपटसृष्टी आणि हिज मास्टर्स व्हाइस कंपनी, मासिके आणि वृत्तपत्रे, लेखक आणि प्रकाशक यांच्याशी माझा इतका निकट संपर्क घडून आला तो केवळ मी मुंबईला राहत होते म्हणूनच जीवनाची इतकी क्षेत्रे, जीवनसरणीच्या इतक्या पातळया आणि माणसांचे इतके नमुने मी पहिले की स्वतःकडे बघण्याची एकअलिप्त वस्तुनिष्ठ दृष्टी आपोआप सिद्ध झाली.” (धूळपाटी, पृ. १९९) अशा शब्दांतून त्या स्वतःच्या आयुष्यातील मुंबईचे महत्त्व विशद करतात. एकंदरीत त्यांना मुंबईविषयी वाटणारी आत्मीयता, स्नेहभाव व कृतज्ञतेची भावना या लेखात व्यक्त झालेली दिसून येते.

**माझ्या कवितेची धूळपाटी—** लेखिकेची कवयित्री व गीतकार म्हणून जी जडणघडण किंवा त्यांची आजची ओळख याविषयी या लेखात लेखन झाले आहे. लहानपणी ऐकलेली गीते, ओव्या, जेष्ठ कलाकारांचा मिळालेला सहवास यातून त्यांना शिकायला मिळाले होते. त्यांचा ऋणानुबंध या लेखात व्यक्त झाला आहे. कला, कलावंत, कलाविश्व व मिळणारी लोकप्रसिद्धी यांचा वेध घेण्याची आघतीकता येथे दिसून येते.

**बदाम बागेच्या आवारात —** यात मॅट्रिकपर्यंतच्या प्रवासातील आठवणी सांगितल्या आहेत. हुजूरपागेतील शिक्षकशिक्षिका, त्यांचे विद्यार्थी मित्रमैत्रिणी यांच्या सहवासामुळे त्या कशा

घडल्या हे सांगत असताना हुजूरपागेमधली ती वर्षे त्यांच्या मनोविकासाला कशी कारणीभूत ठरली याचे चित्र या लेखात उमटले आहे. शाळेने त्यांचे हस्ताक्षर सुधारले, पाठांतराची सवय लावली, संस्कृत, मराठी, इंग्रजी हे विषय त्यांच्या आवडीचे होते हे समजावून सांगितले, तसेच चित्र, साहित्य, संगीत अशा कलांची प्राथमिक समज याच शाळेने त्यांना दिली असे त्यांचे म्हणणे आहे. हा लेख हुजूरपागेच्या भौगोलिक वातावरणावर आणि तिथे होणाऱ्या ज्ञानदानावर प्रकाश टाकणारा असून यामधून त्यांनी त्यांच्या लेखक या जडणघडणीचा शोधही घेतलेला दिसून येतो.

**नवयुगचे दिवस–** एम. ए. झाल्यानंतर मुंबईत नवयुग साप्ताहिकात आचार्य अत्रे यांच्या सोबत काम करण्याची संधी लेखिकेला लाभली. तिथे काम करत असतानाचे अनुभव आठवणी त्यांनी या लेखात नोंदविल्या आहेत. नवयुगमध्ये काम करत असताना त्यांनी भरपूर वाचन केले. अनेक पुस्तके वाचण्यास अत्र्यांनी त्यांना प्रवृत्त केले आणि उत्तमोत्तम इंग्रजी लेखकांशी त्यांचा परिचय झाला. या काळात घडून आलेल्या अनेक लेखकांच्या भेटी आणि त्यावेळी झालेला हर्ष व्यक्त करत असताना लेखिकेने अत्र्यांबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली आहे. त्यांच्या साहित्यिक बनण्याच्या बाबतीत 'नवयुग'चा मोठा महत्त्वाचा वाटा असल्याचे त्या या लेखात आवर्जुन सांगताना दिसतात.

**सेन्सॉर बोर्डचे दिवस–** शान्ता शेळके अध्यापिका होत्या त्याचबरोबर त्याच काळात दोन तीनदा त्यांची सेन्सॉर बोर्डवर सदस्य म्हणून नेमणूक झाली होती. अवघी पंधरा वर्षे त्यांनी तिथे काम केले. सेन्सॉर बोर्डवर काम करत असतानाच्या अनेक आठवणी या लेखातून व्यक्त झाल्या आहेत. त्यावेळी वेगवेगळया भाषा, प्रांतातील माणसांशी त्यांचा संबंध आला. सॅन्सार बोर्डच्या सदस्यांत प्राध्यापक, लेखक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, गायक, चित्रकार अशा विविध प्रकारच्या व्यक्तींशी त्यांचा परिचय झाल्यामुळे त्यांच्या अनुभवात पडलेली भर व त्यांच्या जीवनात झालेला बदल त्यांनी या लेखात नोंदविला आहे. त्याचबरोबर त्या सेन्सॉर बोर्डवर सदस्य असताना त्यांच्या कुटुंबियांसहित चित्रपट पाहिल्याचा त्यांचा सुखद अनुभव त्यांनी आठवणीच्या रूपाने मांडला आहे.

## २.३.२ स्त्रीविषयक लेख

लेखिकेने काही मोजक्यं स्त्रीविषयक स्वतंत्र लेख लिहिले आहेत. ज्या कुटुंबात त्या वाढल्या त्या आपल्या कुटुबांतील किंवा सहवासात आलेल्या, आजूबाजूला भेटलेल्या स्त्रियांच्या जीवनानुभवाचे निवेदन लेखात झाले आहे. या लेखामधून त्यांनी स्त्रीच्या जीवनातील विविध समस्या, दुःखाचा आढावा घेतला आहे. 'आजचे बदलते स्त्रीजीवन', 'एक अवघड वळण', 'नवरी', 'आरशाचे कपाट', 'तोडे' असे काही मोजक्यं स्त्रीविषयक स्वतंत्र लेख त्यांनी लिहिले आहेत.

**आजचे बदलते स्त्रीजीवन–** या लेखात लेखिकेने स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीजीवन आणि स्वातंत्र्योत्तर आधुनिक काळातील स्त्रीजीवनाची तुलना केली आहे. इंग्रजांच्या काळात स्त्रीच्या वाटयाला आलेले दुःख, बालविधवेचं दुःख अशा स्त्री दुःखांचा वेध या लेखात त्यांनी घेतला आहे. स्त्रीजीवन बदलण्यासाठी सुधारकांनी, विचारवंतानी केलेल्या धडपडीचा वेध घेत असताना आजच्या जगात स्त्रीचे अंतरंग बदलण्याची अपेक्षा त्या या लेखात व्यक्त करताना.

**एक अवघड वळण–** या लेखात पूर्वीपासून ते आजपर्यंतच्या स्त्रीजीवनाचा आणि त्यात झालेल्या बदलांचा वेध घेतला आहे. इंग्रज पूर्वकाळात संत, पंत आणि शाहीरांनी वासनाविकारी, पापी या दृष्टीने स्त्रीकडे पाहून आपल्या अभंगातून, कवितेतून स्त्रीची लंपट लोलुप शब्दांतून चित्रे रेखाटली. त्यानंतर इंग्रजाची राजवट आली. या काळात स्त्रीच्या जीवनाच्या दृष्टीने सुधारणेला सुरुवात झाली. अनेक सुधारकांनी विचारवंतांनी, समाज सेवकांनी अफाट परिश्रम घेऊन स्त्रीजीवनात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीशिक्षणासाठी लेखणी झिजवली या सर्वांचा परिचय या लेखात करुन दिला आहे. आजच्या काळात स्त्रीकडे शिक्षण आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रात त्या मुक्त संचार करताना दिसतात. परंतु पुरुषाचे सर्वप्रकारचे दास्य तिने पत्करून लाचार झालेली, विकृतपणे पुरुषाची शिकार होत असलेली पाहिल्यावर मन भयभीत आणि चिंतातुर बनते अशी खंत लेखिका या लेखात व्यक्त करतात.

स्त्रीच्या सामर्थ्याची जाणीव करून देत असताना लेखिका लिहितात, “स्पर्धा, इर्ष्या, संघर्ष हा तिचा मूळ स्वभाव नाही, तर प्रेम, दया, करूणा, सहानभूती हेच तिच्या अंगाचे मूलभूत गुण आहेत. जो इतरांना दुबळेपणा वाटतो ते खरोखर तिचे सामर्थ्य आहे.” (मनातले घर, पृ. ७८) आपले सामर्थ्य ओळखून प्रपंच व एकूण जीवनात शांत, समंजस वातावरण निर्माण करणे हे आजच्या स्त्रीचे खरे सामर्थ्य आहे असे त्यांना वाटते.

**नवरी–** या लेखात एका अपंग कुमारिकेचे दुःख व्यक्त झाले आहे. लेखिका आपल्या विद्यार्थीनीच्या लग्नाला गेल्या असता त्यांना तिथे एक शोभा नावाची मुलगी भेटते. तिला पॉलिओ– झाल्यामुळे तिचे लग्न जुळत नाही. तिच्या लग्नाविषयी लेखिका तिला विचारतात त्यावेळी ती म्हणते, “माझ्या मनात आहे, आई वडिलांच्यावर जन्मभर कसं अवलंबून रहायचं? म्हणून तर शिकते आहे. अन् बाई एका फर्ममध्ये लहानशी नोकरी करते आहे. पण माझ्यासारख्या पांगळया मुलीशी कोण लग्न करणार?” (आनंदाचे झाड, पृ. ९६) या वाक्यांतून तिची धडपड, स्वतःच्या पायावर उभं राहण्याचा प्रयत्न, स्वतःच्या दुःखाचा भार सांभाळत धैर्याने सामना करण्याची जिद्द लक्षात येते. या लेखात वरील संवादातून एका स्त्रीमनाची जाणीव करून दिली आहे

**आरशाचे कपाट–** पूर्वी ‘वुमन’ या नावाचे स्त्रियांसाठी एक ब्रिटिश साप्ताहिक निघत होते. त्यामधून स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाचे अनुभव निवेदन केले जायचे. त्या पत्रातून वाचायला मिळालेल्या अनुभवांवर आधारित हा लेख आहे.

ही पत्रलेखिका आणि तिची मैत्रीण ऑफिसमध्ये एकत्र काम करत होत्या. तिच्या मैत्रिणीचे लग्न होते आणि ती नोकरी सोडते. पुढे ही पत्रलेखिका बदली होऊन दुसऱ्या गावी जाते. त्यामुळे त्या दोघींचे भेटणे अवघड होते. परंतु काही काळानंतर ही नोकरी करणारी मैत्रीण बदली होऊन परत तिच्या मैत्रिणीच्या गावी येते. एकदिवस तीला समजते की तिच्या नवऱ्याचे निधन झाले. त्यामुळे तिची भेट घ्यायला ही नोकरी करणारी मैत्रीण त्या विधवा मैत्रिणीला भेटायल जाते. तिच्या घरात नवे कोरे पूर्णाकृती बिलोरी आरसा बसवलेले स्टीलचे कपाट उभे असलेले पाहिल्यावर विधवेने आरशाचे कपाट खरेदी करणे योग्य नाही असे जेव्हा सांगते त्यावेळ ती विधवा मैत्रीण नवरा गेल्याने आपण एकटे झाल्यामुळे खोलीत वावरताना आपलच

प्रतिबिंब त्या आरशात दिसले तरी सोबतीला कुणीतरी आहे असे वाटावे यासाठी कपाट विकत घेतल्याचे स्पष्ट करते. विधवेने पती निधनानंतर श्रृगार करू नये. आरशात पाहू नये असा जो समाज मनाचा विचार आहे तो लेखिकेने येथे निदर्शनास आणून दिला आहे.

**तोडे–** बालवयातील तोडे घालण्यासाठी केलेला हट्ट, त्यांचे निरागस बालमन तसेच पारंपरिक स्त्रीचा स्वभाव, वागणे याविषयी लेखन झाले आहे. लेखिकेला पायात तोडे घालायची इच्छा होते. त्यावेळी त्यांच्या आजोबांनी घरातील चांदीचे दागिने विकून त्यांना नवे तोडे करुन आणले. ते तोडे त्यांच्या पायांना कसे जड झाले होते. नवे कोरे तोडयांची कड लागून त्यांचे पाय कसे रक्ताळले होते. याविषयी आठवण सांगितली आहे. एके दिवशी दुपारच्यावेळी असाच तोडयांचा विषय निघाला आणि त्यांची आजी म्हणाली, "एवढेसे तोडे तर ही पाय दुःखतात म्हणून रडत बसते. माझ्या लग्नात मला तोडे घातले होते, त्यांचं वजन शेर सव्वाशेर असेल. पण असे जड तोडे पायात घालून आम्ही नदीवरुन दुडीच्या खेपा आणीत होतो बंर." (आनंदाचे झाड, पृ. ६९) अशा संवादातून आपण त्यावेळी किती सोसले, परिस्थितीचा समंजस स्वीकार कसा केला, आपण कसे वेगळे आहोत हे सूचविण्याचा स्त्रीस्वभाव नजरेस पडतो. स्त्रीची मानसिकता त्या त्या काळाच्या परंपरेत तयार झालेली असते. त्यामुळे ती त्या त्या काळात परिस्थितीला शरण जाताना दिसते. पूर्वीची स्त्री रूढी परंपरेच्या जाळयात इतकी सापडली होती की, तिला स्वतःचा मान सन्मान, अधिकार, इच्छा आकांक्षांची जाणीव नव्हती. अशा पारंपरिक स्त्रीमनाचे चित्र रेखाटणारा हा लेख आहे. स्त्री ही पुरुषापेक्षा संवेदनशील, प्रेमळ, लगेच भावनांच्या आधिन होणारी आहे. ती आपल्या भावना लगेच व्यक्त करत असते. तशीच तिची बोलण्याची भाषाही पुरुषांपेक्षा वेगळी आहे. काही वेळा ती रागात येऊन कठोर पण होते तर काही वेळा तिची भाषा मृदु होते. स्त्रीचे बोलणे, वागणे अशा तिच्या स्वभावात विशेष वेगळेपण असते. तिचे वेगळेपण आपल्याला तिच्या भाषेच्या माध्यमातून जाणवू लागते. असे स्त्रीचे भाषिक वेगळेपण या लेखात विशेष जाणवते.

### २.३.३ साहित्यविषयक लेख

लेखिकेने साहित्यविषयक अनेक लेख लिहिले आहे. वाचनात आलेल्या, त्यांच्या मनाची पकड घेतलेल्या साहित्यिकांवर, साहित्यकृतींवर व लेखन प्रक्रियेवर, शैलीवर त्यांनी विवरण केले आहे. एवढेच नव्हे तर वाचनात आलेल्या शब्दांवरही लेखन झालेले दिसून येते. शिवाय त्यांचे काही लेख कलावंत आणि त्यांची कलाकृती, कलावंत आणि नीती, कलावंत आणि समाज यामध्ये निर्माण होणाऱ्या गुंतागुतीच्या संबंधातून निर्माण होणाऱ्या समस्यांवर आधारित आहेत.

**शब्दांच्या सावल्या–** या लेखात त्यांनी त्यांच्या वाचनात आलेल्या किंवा ऐकीवात आलेल्या शब्दांचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. 'चित्रळ' म्हणजे चितळ हरिण, 'आभाळ' म्हणजेच ढग, 'उमाप' म्हणजे विपुल, पुष्कळ, 'लालगुंज' म्हणजे लालबुंद अशा शब्दांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. शब्द आतून एकमेकांशी नाते जोडणारे असतात. त्यांची जातकूळी एकच पण वरून पाहायला ते वेगळे वाटतात. म्हणजेच एका शब्दांची सावली दुसरा शब्द असतात, शब्द अनेक पण त्यांचा अर्थ एक असतो असा निष्कर्ष लेखिकेने या लेखाच्या शेवटी मांडला आहे.

**'नवनीत' विषयी थोडेसे–** या लेखात लेखिकेने परशूराम तात्या गोडबोले यांच्या 'नवनीत' या प्राचीन मराठी वाङ्मयाचे संकलित पुस्तकांचा आशय, रूपबंध आणि भाषा यांचा अभ्यास करून तो ग्रंथ वाचकांची विद्वत्ता वाढवण्यासाठी किती मोलाचा आहे हे स्पष्ट केले आहे. थोडक्यात या लेखात 'नवनीत' या ग्रंथाचे श्रेष्ठत्त्व विशद झाले आहे.

**प्रस्तावना आणि प्रस्तावना–** या लेखात ललित वाङ्मयातील प्रस्तावनेचे विविध प्रकार सांगून त्यामधील दोष दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. वडीलधाऱ्या किंवा समीक्षकांना लिहायला दिलेल्या प्रस्तावनेत वडीलकीचा अधिकार दाखवला जातो. रसिकतेचे केलेले गुणग्रहण, वाङ्मयप्रकाराची चोखंदळ चर्चा किंवा गोल गोल शब्दांतून केलेली औपचारिक पाठ थोपटणी पहिल्या प्रकारच्या प्रस्तावनेत असते असे त्या सांगतात.

दुसऱ्या प्रकारची प्रस्तावना म्हणजे समवयस्क सहृदाला लिहायला दिलेली प्रस्तावना. त्यात अनौपचारिकपणे, घरगुती जिव्हाळा, ममता असते. तर तिसऱ्या प्रकारच्या प्रस्तावनेत लेखक स्वतःच आपल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहितो. त्यामध्ये स्वतःविषयीचा अभिमान, आत्मगौरव

असतो तर काही प्रस्तावना भलत्याच चटपटीत लाख चक्वे घालून वाचकांची दिशाभूल करणाऱ्या आहेत. असे प्रस्तावनेविषयीचे विवरण या लेखात झाले आहे. त्यांच्या अशा उचित अनुचिततेचा वेध घेतलेल्या लेखातून त्यांच्या विवेकी मनाचे दर्शन घडते.

**साहित्य आणि नितिमत्ता—** या लेखात लेखिकेने साहित्यातील नीतिमत्ता आणि अनीतीबद्दल स्वतःची मते व्यक्त केली आहे. सर्वसामान्य माणसाइतकाच क्लावंतही नीतीने वागला पाहिजे. एक क्लावंत म्हणून आपल्या कशाही वागण्याला समाजाने सवलत द्यावी, क्षमाशील वृत्ती दाखवावी अशी अपेक्षा क्लावंताने कदापी ठेवू नये असे त्यांचे मत लेखात व्यक्त झाले आहे. अशी मते मांडून त्यांनी साहित्यक्षेत्रातील, साहित्यबाह्य दृष्ट प्रवृत्तींवर प्रखर ओरखडे ओढले आहे. लेखिकेला माणसांच्या वृत्ती—प्रवृत्तीची, नीती—अनीतीची असलेली योग्य जाण येथे लक्षात येते.

**अहंकार, हीनगंड इत्यादि—** या लेखात लेखिकेने क्लावंत हा अहंकारी असतो की हीनगंड याची चर्चा केली आहे. त्यांना वाटतं की या दोन्ही प्रवृत्ती लेखकाकडे असतात. त्या विचित्र अनाक्लनीय रीतीने एकमेकींत मिसळून गेलेल्या असतात. समाजात वावरताना अहंकार ही लेखकाची गरज असते. कारण त्या काळात लेखकाची आर्थिक दैन्यवस्था असल्यामुळे निदान आपण लेखन करू शकतो असे तो समाजातील श्रीमंत प्रतिष्ठित लोकांपुढे स्वतःचा आत्मगौरव जपण्यासाठी करतो असे त्यांचे मत आहे. अहंकार करणे हे त्याचे तिथे साधन असते आणि दुसरे म्हणजे लेखकाकडे अहंकार नसेल तर तो लेखन करायला धजणारच नाही अशी दोन कारणे त्यांनी या लेखात स्पष्ट केली आहे.

लेखकाच्या वरवरच्या अंहकाराखाली प्रामाणिक लेखक आतून मात्र गोंधळलेला हीनगंडाने ग्रस्त असतो. किंबहुना लेखक जितका थोर, चिंतनशील तितके त्याला लेखन कार्य अवघड होते त्यामुळे आतून हीनगंडाने ग्रस्त व बाहेर अहंकाराने मिरवणे हे श्रेष्ठ क्लावंताचे भागधेय असते असे लेखिकेचे म्हणणे आहे.

**शकुंतला सासरी जाते—** या लेखात लेखिकेने कालिदासाच्या 'शाकुन्तल' नाटकाच्या चौथ्या अंकाच्या रसग्रहणातून श्रेष्ठत्त्व विशद केले आहे. यात कालिदासांपाशी असलेल्या अलौकिक कल्पनासौंदर्याचे दर्शन घडते. मुलीला सासरी पाठवताना मुलींच्या बापाला होणारे दुःख तसे

पाहिले तर सर्व सामान्य आहे. परंतु याच दुःखाला कालिदासाच्या प्रतिभेने असामान्यत्व स्वरूप प्राप्त करून दिलेले दिसते. या विश्लेषणातून लेखिकेने 'शाकुंतल' नाटकाचे श्रेष्ठत्व अचूकपणे नेमक्या शब्दात उलगडून सांगितले आहे.

**माळ—** या लेखात बालकवी, रेंदाळकर, कुसुमाग्रज आणि माधव जूलियन अशा चार कवींच्या कवितेत दिसणाऱ्या माळांची भावचित्रे रेखाटली आहेत. प्रत्येक अनुभवाबरोबरच साहित्यकृतीतून भेटलेल्या माळासारख्या निसर्गघटकाचे चित्रण लेखिका करताना दिसतात. येथे लेखिकेने माळाचे सौंदर्य कवितेच्या सहायाने उलगडले आहे. ही माळाची प्रतिमा मराठी साहित्यात अनेक कवितेत पाहायला मिळतात. परंतु प्रत्येक वेळी कविपरत्वे आशयाची वेगवेगळी परिमाणे त्यांना लाभलेली दाखवून दिली आहे. 'खेडयातील रात्र' या बालकवींच्या कवितेतून भयाण आणि ओसाड माळाचे चित्र दिसते तर रेंदाळकरांनी 'अजुन चालतोच' या कवितेत वास्तवातला माळ व कवीच्या जीवनातील रोजची कष्टमय पायपीट आणि त्यातून त्याला आलेले वैफल्य या साऱ्यांचा उत्कट आविष्कार झालेला दाखवला आहे.

तसेच कुसुमाग्रजांनी 'माळाचे मनोगत' या कवितेत रूक्ष ओसाड, कसली निर्मिती करू न शकणारा असे चित्रण केले आहे. कुसुमाग्रजाचा माळ हे एक रूपक आहे. त्याचबरोबर माधव जूलियन यांच्या 'माळवाटा' या कवितेत असेच रूक्ष माळाचे चित्र रेखाटले आहे. प्रत्येक कवीने आपआपल्यापरीने माळ शब्दाचा वापर विविध तऱ्हेने करून कविता लिहिल्या याचे दर्शन त्यांनी या लेखातून घडविले आहे.

**माडगूळकरांच्या गीतांमधील संदर्भसंपन्नता—** या लेखात लेखक माडगूळकर यांच्या गीतांमधील संदर्भसंपन्नतेचे, सौंदर्याचे विवेचन झाले आहे. माडगूळकरांनी कधी संदर्भ जसेच्या तसे वापरले नाही गीतातल्या आशयाच्या दृष्टीने त्यात बदल करून घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या कविता विशेष परिणामकारक झाल्या आहे. त्यांची संदर्भ निवड अचूक असून सामान्य वाचकांनाही ते समजतील असे लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्या गीतांना अशा संदर्भ संपन्नतेमुळे यश प्राप्त झाले आहे. या गोष्टींचे विवेचन या लेखात झालेले दिसून येते.

**ज्ञानेश्वरीः माझी माझ्यापुरती—** या लेखात लेखिकेने 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाची वैशिष्टये सांगितली आहे. या ग्रंथाचे सौंदर्य, शब्दसामर्थ्य, प्रतिमेचा वापर, मराठी भाषेचा केलेला गौरव,

त्यात उतरलेली कृष्ण आणि अर्जुनामधल्या प्रेमाच्या भावछटा, शब्दसंपदा अशी विविध वैशिष्टये लेखात नमूद केली आहेत. बालपणापासून अनेक वेळा वाचलेली ज्ञानेश्वरी त्यांना कशी भावली याविषयीही लेखन झाले आहे.

**काही पसायदाने–** वेगवेगळया कवींच्या पसायदानातून एकच भावना कशी प्रतित होत असते हे दाखवून देण्याचा हा प्रयत्न आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, रामदास, मोरोपंत, कुसुमाग्रज, मर्ढेकर या कवींनी पसायदाने लिहिली आहे. यांच्या पसायदानाविषयी विवेचन करताना लेखिका लिहितात, "प्रत्येक कवीला जनसामान्यांबद्दल वाटणारी अपार करुणा आणि प्रत्येकाला त्यांच्या हिताची, सुखाची लागलेली तळमळ, त्या तळमळीनेच त्यांनी ईश्वराला साद घातली आहे." (एकमानी, पृ. ८६) येथे संत पंत आणि आजच्या मराठी कवींच्या कवितेतील उतरलेल्या समान भावछटेचे दर्शन घडवले आहे.

**जाणिवेची मक्षिका–** निर्मळ, निर्भर, उत्कृष्ट अशा कलास्वादाच्या आड अहंकार कसा व किती प्रकारे येतो याविषयी विवेचन झाले आहे. कलाकृतीचा आस्वाद घेताना समीक्षकाने अहंकाराची झापडे उतरणे गरजेचे आहे. विद्वत्ता, व्यासंग, विपुल वाचन यांचा अहंकार निखळ आस्वादामध्ये अडथळा ठरू शकतो. असा अहंकार पुष्कळ समीक्षक बाळगतात त्यामुळे एखाद्या चांगल्या साहित्यकृतीचे सौंदर्य अशा समीक्षकाला दिसू शकत नाही असे लेखिकेला वाटते. त्यामुळे ही 'जाणिवेची मक्षिका' घशात अडकू नये याचे भान प्रत्येकाकडे असणे गरजेचे आहे असे मत या लेखात व्यक्त झाले आहे.

## २.३.४ प्रवासवर्णनपर लेख

लेखिकेने देशपरदेशात प्रवास केला होता. त्यांचे केवळ दोन लेख प्रवासवर्णनपर आहे. परदेश प्रवासात पाहिलेली स्थळे, घडलेल्या घटना, तिथे भेटलेली माणसे व उपभोगलेला आनंद या सगळयांचे चित्रण लेखनात झाले आहे.

**हर्शी पार्क–** 'हर्शी पार्क' हा लेख त्यांच्या भ्रमंतीतून लिहिला गेला आहे. येथे अमेरिकेतील 'हर्शी पार्क' या ठिकाणाचे वर्णन आले आहे. अमेरिकेतील हर्शी पार्क या ठिकाणी फिरायला गेली

असताना त्यांना 'हर्शी चॉक्लेट टाऊन' हे अगदी सुंदर, नितळ, मनात मोह निर्माण करणारे ठिकाण पाहायला मिळाले. तेथिल स्वाधिष्ठ, सुंदर चॉक्लेट, तिथे असलेली कर्मणुकीची साधने, अमेरिकन माणसाच्या निराळया अशा हौसेविषयी लेखात मनमोहक  वर्णने आली आहे. त्यावेळी ते ठिकाण पाहून त्यांच्या मनाला झालेला आनंदही लेखात शब्दांकित्त झाला आहे. त्या ठिकाणाचे आणि तेथिल वातावारणाचे रसयुक्त वर्णन वाचक  मनालाही आनंद देणारे आहे. आपण घेतलेला प्रवासातील आनंद वाचकांना देता यावा या हेतुने हे लेखन झालेले दिसून येते.

**मोनालिसाः न भेटलेली, भेटलेली–** पॅरिसमध्ये फिरत असताना त्या शहरात जे जे त्यांच्या पाहण्यात आले, जे त्यांच्या अनुभवास आले याची नोंद या लेखात घेतली आहे. लेखिकेला एफेल टॉवर, लूव्हर म्यूझियमातील मोनालिसा पाहायची होती. परंतु मॅट्रोच्या कामगारांचा आणि लूव्हर म्यूझियमच्या अधिकारी, कामगारांचा संप असल्याने ही दोन्ही स्थळे त्यांना पाहता आली नाही. पॅरिसमध्ये भटकंटी करत असताना तिथे पाहिलेल्या निटनेटक्या स्त्रीया, दुकानाचा काचा पुसणारा फ्रेंच मुलगा, कुत्रा घेऊन भेटलेला फ्रेंच म्हातारा आणि लेखिकेशी आपणहून बोललेली क्रिशा नावाची मुलगी या साऱ्यांविषयी तपशीलाने वर्णने आली आहेत. त्यांना मुझियमातील मोनोलिसा पाहायला मिळाली नाही. असे असताना त्या भेटलेल्या माणसांतून आपल्याला मोनालिसा भेटली अशी स्वतःच्या मनाची समजूत घालताना दिसतात. त्यांच्या या लेखात मनाची निराशा आणि मनाचा थक्वा जाणवत असला तरी तितक्याच प्रतिने तिथे भेटलेल्या माणसांच्या सहवासातील गोड क्षणांच्या आठवणी व्यक्त झाल्या आहे. त्या माणसांच्या माध्यमातून आपण अप्रत्यक्ष मोनालिसाचे दर्शन घेतले असे त्यांचे म्हणणे आहे.

## २.३.५ व्यक्तिचित्रणपर लेख

लेखिकेचे एकूण एकोणीस लेख व्यक्तिचित्रणपर आहेत. त्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे विविध क्षेत्रातील आहेत. ज्या माणसांनी त्यांच्या जीवनाला आकार दिला, त्यांचे व्यक्तिमत्त्व

घडवण्यात ज्या माणसांनी हातभार लावला त्यांचीच व्यक्तिचित्रे त्यांनी रेखाटली आहे. ही व्यक्तिचित्रे त्यांच्या अनुभवविश्वातून साकार झालेली दिसून येतात.

## कौटुंबिक व्यक्तींची चित्रणे

**वहिनी–** या लेखात लेखिकेने आपल्या आईचे व्यक्तिमत्त्व सर्वार्थाने साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. वहिनी म्हणजेच त्यांच्या आई. अतिशय बिकट परिस्थितीतही स्वतःच्या मुलांच्या जीवनाला त्यांनी दिशा दिली होती. त्यांची आई ही त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची खरी शिल्पकार होती. शिक्षणाच्याबाबतीत तसेच लेखिकेच्या रसिक व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी त्यांच्या आईचे योगदान फार मोठे आहे. शब्दांची ओळख होण्याआधी त्यांच्या आईनेच त्यांना वाचायला शिकवले होते. कवितेची, गाण्याची आवड आपल्याला आईकडून लाभली असे लेखिकेचे स्पष्ट मत आहे. या लेखात लेखिकेने आईविषयी सांगत असताना स्वतःच्या जीवनात आईचे किती महत्त्व आहे यावर जास्त भर दिलेला दिसतो.

कोणालाही न दुखावणारी, जात धर्म न पाळणारी, आधुनिक विचारांची, मनमोकळया स्वभावाची समंजस अशा आपल्या आईच्या स्वभावाचे विविध पैलू लेखिकेने रेखाटले आहेत. त्याचबरोबर त्यांच्या विणकामाची उदाहरणे देऊन आपल्या आईच्या कलासक्त मनाची ओळख पटवून दिली आहे.

श्रीमंतीत लोळणाऱ्या लेखिकेच्या आईने वैधव्य आल्यानंतर कष्टाची कामे केली, अपमान सोसले, अनेक दुःखे पचवली परंतु तिची जीवनासक्ती मात्र कमी झालेली दिसली नाही असे खंबीर व्यक्तिमत्त्व लेखात चित्रित झाले आहे. एकदिवस लेखिका त्यांना विचारतात, "वहिनी, खरंच या आयुष्याला काही अर्थ असतो का ग? त्यावेळी वहिनी चटकन म्हणाली कसला आला अर्थ? अर्थ नसतोच आपण देऊ तो अर्थ दुसरं काय?" (वडीलधारी माणसे, पृ. १९) या एका संवादरूपी वाक्यात त्यांच्या आईच्या सर्व जीवनाचे सार सामावलेले आहे असे लेखिकेला वाटते. याचाच अर्थ जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या आईला कळला होता हे पटवून देऊन, श्रीमंत विचारांची सोशिक स्वभावाची आई लेखिकेने लेखात उभी केली आहे.

## प्रकाशकाचे व्यक्तिचित्रण

**कोठावळे—** या लेखात मॅजिस्टिक प्रकाशक केशवराव कोठावळे यांचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. कोठावळे व त्यांच्या कुटुंबाशी लेखिकेच्या असलेला घनिष्ठ संबंध लेखात निदर्शनास येतो. अत्यंत सौजन्यशील, कुणावर न चिडणारे, अपशब्द न बोलणारे, शांत समंजस, निस्वार्थी स्वभावाचे कोठावळे लेखात चित्रित झाले आहे. त्यांचा समंजस स्वभाव त्यांना व्यवसायात फार उपकारक ठरला असे लेखिकेचे मत लेखात व्यक्त झाले आहे.

एक उत्कृष्ट प्रकाशक म्हणून कोठावळे यांची नेमकी ओळख या लेखात होते. प्रत्येक लेखकाच्या स्वभावातले कंगोरे तितक्याच बारीखतेने न्याहाळून त्यांचा उपहास न करता कधी विषय निघाला म्हणजे कोठावळे त्यांना फार सुरेख, यथार्थ वर्णन करत बारीखसारीख खाचाखोच दाखवून देत असे. लेखकांवर भरपूर प्रेम करणारे, लेखकांविषयी जिव्हाळा जपणारे श्रीमंतीचा, वैभवाचा गर्व, मोठेपणा नसलेले उदार मनाचे कोठावळे लेखात चित्रित झाले आहे. अनेक लेखकांना लिहिते करण्याचे कार्य कोठावळे यांनी केले होते. अशा त्यांच्या बहुमूल्य कार्याचा आढावा लेखिकेने लेखात घेतला आहे.

एखादी गोष्ट सुरू केली की ती शेवटपर्यंत न्यायची अशी चिकाटी थोडयाच संपादक प्रकाशकांकडे असते ही चिकाटी कोठावळे यांच्याकडे होती असे त्यांचे म्हणणे आहे. आजच्या जगात असे निराळे ठरवणारे व्यक्तिमत्त्व त्यांनी स्नेहभावाने उभे केलेले दिसून येते.

## संगीत क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे

**आशा—** या लेखात सुप्रसिद्ध आशा भोसले यांचे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. गायिका आशा भोसले यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलूचे दर्शन 'आशा' या लेखात घडते. 'स्वराज्याच्या शिलेदार' चित्रपटाची गीते लिहिण्याच्या निमित्ताने जी त्यांची पहिली भेट झाली त्या भेटीविषयी लेखिका येथे आवर्जून सांगताना दिसतात. त्यांची दोघींची निकटची निखळ, गोड मैत्री, स्नेह 'आशा' या लेखात दिसत आहे.

लेखिकेने आशा भोसले यांच्या रसिकतेला, त्यांच्या स्वभावातील सच्चेपणाला, त्यांच्या गुणवत्तेला महत्त्व देऊन, त्यांच्यातील कलाकाराचे कौतुक करून त्यांच्या माणूसपणावर भाष्य केले आहे. अत्यंत साधे, मनमोकळेपण, मन मिळावू, लाघवी, थट्टेखोर विनोदी व्यक्तिमत्त्व 'आशा' या लेखात प्रकट झाले आहे.

वेळेचे भान न ठेवता गाणे चांगले व्हावे यासाठी अपार श्रम घेणाऱ्या, अगदी जीव तोडून गायन करणाऱ्या,गाण्यातले शब्दोच्चार निर्दोष, स्पष्ट असावेत याकडे कटाक्षाने लक्ष पुरवणाऱ्या, बुद्धीमता, सच्चेपणा, आवाजाचे नानारंग अशा गुणांमुळे आपल्या कष्टाने आणि जिद्दिने संगीत क्षेत्रात महत्त्वाचे स्थान निर्माण करणाऱ्या आणि जे स्वतःला समजले नाही ते मोकळेपणाने दुसऱ्याना विचारणाऱ्या आशाताईंचा उदार, मनाचा मोठेपणा निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला आहे.

आशाताईकडे असलेली नम्रवृत्ती, शिकाऊपणा, कष्टाळूपणा अशा त्यांच्या गुणांची ओळख पटवून देण्यासाठी लेखिकेने सुधीर फडके यांनी आशाताईंविषयी काढलेल्या उद्‌गाराची जोड दिली आहे. सुधीर फडके म्हणतात, “शिल्पकार पाषाणातून सुंदर मूर्ती घडवतो तसे आशाने स्वतःवर छिन्नीचे घाव घेऊन त्यातून स्वतःला घडवले आहे. तिच्या इतकी कष्ठाळू कलाकार मी दुसरी पाहिलेली नाही.” (वडीलधारी माणसे, पृ. ९३) या उद्‌गारामुळे आशाताईचे व्यक्तिमत्त्व अधिक उठावदार झाले आहे. यश, किर्ती यांचे शिखर गाठूनही आशा भोसले यांना गर्व, अहंकाराचा स्पर्श झाला नाही ही गोष्ट लेखिकेला महत्त्वाची वाटते. स्वतःच्या कलेबद्दलचा अभिमान बाळगून इतर दुसऱ्या चांगल्या कलावंताला दिलखुलास दाद देणाऱ्या दिलदार वृत्तीच्या आशा भोसले लेखात काही प्रसंगाद्वारे आविष्कृत केल्या आहे. एक श्रेष्ठ गायिका म्हणूनच नव्हे तर एक  सर्वश्रेष्ठ माणूस म्हणूनही आशा भोसले यांचे व्यक्तिचित्र चित्रित करण्याचा लेखिकेचा प्रयत्न दिसत आहे.

**वसंत पवार–** पहिल्याच भेटीत गीत लिहिण्यासाठी संकोचलेल्या लेखिकेच्या मनात आत्मविश्वास जागविणारे फार मोठे संगीत दिग्दर्शक वसंत पवार यांच्या आठवणी सांगण्याच्या हेतुने हे व्यक्तिचित्र साकार झाले आहे. चित्रपटगीते लिहिण्याच्या हेतुने लेखिका आणि वसंत पवार यांनी बऱ्याच वेळा एकत्र काम केल्याचे ‘वसंत पवार’ या लेखात स्पष्ट होते. वसंत पवार यांचा साधेपणा, त्यांच्या वर्तनातील निगर्वी वृत्ती, हसण्यातील प्रसन्नता, दुसऱ्याच्या भावनांना महत्त्व देण्याची वृत्ती, दुसऱ्याबद्दल असणारा जिव्हाळा, चेहऱ्यावरील प्रसन्नता, बोलण्यातील मोकळेपणा अशा पवारांच्या गुणांची उखल या लेखात झाली आहे.

वसंत पवारांची कामाची अनौपचारिक पद्धत, गप्पा मारताना पेटीवर छान छान गाणी वाजवायची कला, जिथे एक चाल हवी तिथे दहा चाली ऐकवणे या साऱ्या जोडीला विनोदी

किस्से सांगणे, माणसांच्या नक्ला करणे अशा वसंत पवारांच्या वागण्यातून लेखिकेने त्यांची तीव्र बुद्धिमत्ता दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

वसंत पवारांच्या जीवनात त्यांना करावी लागलेली ओढाताण आणि त्यातून अनेक लोकांनी त्यांच्या परिश्रमाचा घेतलेला फायदा, वेळप्रसंगी पवारांनी दोन दोन रुपयांलादेखील गीतांना चाली लावून दिल्याचे किस्से सांगून वसंत पवारांच्या दारिद्र्यापर्यंतच्या गोष्टी लेखिकेने मोकळेपणाने व्यक्त केल्या आहे. वसंत पवारांसारख्या मनमोकळया माणसांबरोबर काम करत असताना त्यांच्या मनाला जो आनंद होत असे तो आनंद व्यक्त करण्यासाठी त्यांनी त्यांच्या चालीची प्राजक्ताचे झाड हलवण्यावर फुलांचा पडलेल्या सडयाशी बरोबरी केली आहे. येथे पवारांची असाधारण प्रतिभा निदर्शनास आणून दिली आहे. पवारांच्या विध्वंस जीवनामुळे त्यांच्यापाशी असलेल्या कलेची झालेली मानहानी दर्शविण्याकडे लेखिकेचा कल दिसून येतो. पवारांच्या निस्वार्थी जीवनाचा आणि एक कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख आठवणींच्या रूपाने मांडला आहे.

**हृदयनाथ–** संगीत दिग्दर्शक हृदयनाथाच्या कुटुंबीयांशी लेखिकेचा जवळचा संबंध आला. त्यामुळे त्या घरातील माणसांविषयी वाटणारा जिव्हाळा या लेखात व्यक्त झाला आहे. कलेवरील अव्यभिचारी निष्ठेबरोबर कष्टाळूपणा, जिद्द आणि चिकाटी अशा हृदयनांथाच्या गुणांचा परामर्श लेखात घेतला आहे. दिलदार, संवेदनशील, न बोलता आपली सहानुभूती दुसऱ्यापर्यंत पोहचवणारे असे हृदयनाथांचे व्यक्तिमत्त्व त्यांनी उलगडले आहे.

हृदयनाथांच्या स्वररचनेबद्दल त्यांच्या चालीबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त करून इतरांच्या मतांनाही लेखिकेने खोडून काढण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. लेखिका लिहितात, “गुप्त लिपीतली अक्षरे प्रकट व्हावीत तशा अंतरंगात उमटतात आणि मग आपली इतकी पकड घेतात की सोडतच नाहीत. बाळनी केलेल्या स्वररचना अवघड असतात असे बऱ्याच जाणांचे मत आहे. पण मला वाटते, अवघवडपणापेक्षा त्या चालीत आणखी काहीतरी असते. या स्वररचनांना आपणही सामोरे जावे लागते. पूर्वग्रहरहित दृष्टीने त्यांच्याकडे बघावे लागते. त्या रचना आपल्याकडून काही प्रतिसाद मागत असतात, आणि तो प्रतिसाद आपण देऊ शकलो नाही तर त्या आपल्याला भिडत नाही. आपल्याशी जवळीक साधत नाहीत. मला वाटते हे बाळच्या प्रतिभेचे वैशिष्टय आहे. मन दचकून सोडणारी अनपेक्षितता साहसी

प्रयोगशीलता, नव्या वाटावळणांनी जाणे, पूर्वी कधी न गेलेल्या ठिकाणी आपणाला नेऊन सोडणे आणि तिथले अष्टपूर्व सौंदर्य दाखवणे हे बाळच्या स्वररचनांचे वेगळेपण आहे, तेच त्यांचे सामर्थ्यही आहे.” (वडीलधारी माणसे, पृ. १३९) हृदयनाथ एक प्रयोगशील वृत्तीचे संगीतकार होते. प्रत्येक वेळी त्यांच्या स्वररचनेत वेगळेपणा आणण्याचा त्यांचा प्रयत्न असत. त्यामुळे ती रचना श्रोत्यांच्या अंतरंगाची पकड घेणारी ठरत असत. असे त्यांच्यापाशी असलेल्या सामर्थ्याची ओळख गुप्त लिपीतल्या अक्षरांची उपमा देऊन केली आहे. त्यांची रचना परंपरेने मिळालेल्या वाटा सोडून वेगळया वाटेने जाते. त्यामुळे त्यांची रचना समजून घेण्यासाठी सांकेतिक दृष्टीने त्यांकडे बघणे सोडून देऊन त्यांना ऐकले पाहिजे तरच त्या रचना आपल्या मनाची पकड घेतील असे लेखिकेचे म्हणणे आहे.

हृदयनाथांनी अनेक गीतांचे प्रयोग करून लोकप्रियता मिळवली होती. हे लेखिकेने उदाहरणासह पटवून दिले आहे. त्यांनी हृदयनाथांबद्दल केलेले लेखन हृदयनाथांची संगीतकार म्हणून योग्यता स्पष्ट करते. त्याचबरोबर संगीत क्षेत्रातील त्यांचे योगदानावर प्रकाश टाकताना दिसतात.

साहित्याविषयी त्यांना अभिरुची होती. त्यामुळे वाचलेल्या साहित्यावर चर्चा करत अनुकूल प्रतिकूल मते आग्रहाने ते व्यक्त करत. या चर्चेत कितीदा तरी लेखिकेने वाटा घेतला होता. त्यामुळे त्यांच्या वाङ्मयाविषयीची आवड, मराठी भाषेवरील असलेले अप्रतिम प्रेम लेखिकेच्या अनुभवातून लेखात व्यक्त होताना जाणवतात. हृदयनाथांनी लेखिकेला अनेक वेळा मदत केली. गीत गायनाच्यावेळी आपलेपणाने समजून घेतले याविषयी अने किस्से लेखिका लेखात आवर्जून सांगतात. हृदयनाथांनी बाळपणातील अनेक वर्षे पायाच्या दुखण्याने अंथरूणावर काढली होती. त्यांच्या जीवनातील या दुःखाचाही उलगडा त्यांनी केला आहे.

या लेखात हृदयनाथांची एक संगीतकार म्हणून माहिती मिळते तशीच त्यांच्या कुटुंबीयांविषयीही त्या आस्तेने लिहिताना दिसतात. हृदयनाथांच्या स्वभावातील बारकावे त्यांनी नेमकेपणाने टिपले आहे.

**लताबाई–** या लेखात सर्वप्रसिद्ध गायिका लता मंगेशकर यांचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबीत झालेले आहे. गाणे करण्याच्या निमित्ताने त्यांची एकमेकींशी भेट झाली व त्यानंतर त्यांच्या ओळखीचे मैत्रीत रुपांतर झालेले या लेखात आढळून येते. लताबाईंचे सूक्ष्म अवलोकन, त्यांची

स्मरणशक्ती, पाहिलेल्या वा ऐकलेल्या गोष्टींतला गमतीदार तपशील, त्यांची तल्लख विनोदबुद्धी लेखिकेने प्रत्यक्ष अनुभवातून सांगितली आहे.

स्वतःची कामे स्वतः करणे हा लताबाईंचा महत्त्वाचा गुण सांगत असताना लताबाईंचा साधेपणा स्वतःच्या अनुभवातून निदर्शनास आणतात. सुंदर वस्तू खरेदी करून सहज दुसऱ्याला भेट म्हणून देणारे लताबाईंचे उदार व्यक्तिमत्त्व निदर्शनास आणून दिले आहे. लताबाईंचे प्रसन्न चैतन्यमय रूप तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला लाभलेले उंच मधूर स्वराची व मंजूळ मनवेधून घेणाऱ्या हसण्याची जोड मिळालेली आहे ती फोटोतल्या स्थिर चित्रणात प्रत्ययाला येत नाही. अशा उदाहरणासह 'घरात असलेल्या वैभवामुळे लताबाई घरातील कामे करत नाही' ही लोकांची भावार्थताही लेखिकेने खोटी ठरवली आहे. आपल्या भारतात महान गायिका लता मंगेशकर असे त्यांचे संगीत क्षेत्रात अद्वितीय स्थान आहे आणि त्यांना प्रसिद्धीस नेणारी गाणी गाताना लेखिकाही त्यांच्याबरोबर होत्या. त्यामुळे त्यांच्या स्वररचनेतील सहजता, सोपेपणा, चालीचे अस्सल मराठमोळ वळण आणि विलक्षण गोडवा अशा त्यांच्या वैशिष्टयांची नोंद लेखात झाली आहे.

लताबाईंचे व्यक्तिमत्त्व रेखाटत असताना लेखिकेने लताबाईंची विविध रुपे रेखाटली आहेत. घरात एकदम घरगुती वाटणाऱ्या म्हणजे गप्पा, थटट्ा मस्करी, मुलांचे कौतुक, आल्यागेल्याची विचारपूस करणारे; तर कधी कधी मोठेपणाचे, प्रसिद्धीचे, कीर्तीचे ओझे डोक्यावरून उतरून ठेवून मुलांबरोबर स्वतःही दंगा करण्यात मग्न होणारे, कधीही कशानेही कोमेजून न जाणारे सुंदर शैशव बालमन लताबाईंना लाभले आहे. असे लेखिका निःसदिग्धपणे पटवून देताना दिसतात. कला, किर्ती, अफाट पैसा असूनही या साऱ्या मानसन्मानापासून अलिप्त राहून केवळ गाण्यावर उत्कट प्रेम करणाऱ्या लता मंगेशकर या लेखात दिसत आहे.

## चित्रपट क्षेत्रातील व्यक्तीचे चित्रण

**गीत लेखनः पहिला धडा–** निःस्पृह, निर्लोभी, प्रसन्न चेहरा, मोजकेच बोलणे असा पेंढारकरांचा स्वभाव लेखात आविष्कृत झालेला दिसतो. अर्धी पांढरी चडड्ी शर्ट, डोक्याबरोबर कापलेले केस असा साध्या पेहरावातील पेंढारकर वाचकांसमोर उभे केले आहे. पेंढारकरांच्या कुटुंबातील माणसांविषयी लेखिका आपुलकीच्या नात्याने बोलत आहे. प्रभाकर, जयसिंग, सरोजबेबी, आबीताई म्हणजेच आजच्या माधवी देसाई या त्यांच्या मुलांची ओळख करून देत

असताना त्यांच्या लीलाबाई विमलाबाई, बकुळामावशी अशा तीन बायकांचीही ओळख अगदी सहज मोकळेपणाने करून देतात.

पेंढारकर हे उत्तम दिग्दर्शक, निर्माते होतेच त्याचबरोबर ते प्रकर देशप्रेमी सुद्धा होते. पेंढारकरांनी लेखिकेला गीत रचनेत मदत केली, त्यांना समजून घेतले. चित्रपटासाठी लेखिकेचीच गाणी रहावी अशी कायम त्यांनी दक्षता घेतली. आज लेखिकेची गीतकार म्हणून जी ख्याती आहे त्यामागे पेंढारकरांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे त्या आवर्जून सांगतात दिसतात. लेखिका लिहितात, "त्यावेळी माझ्या ध्यानात आले नाही, पण आता मला कळते आहे की, गीत रचनेचा पहिला धडा मी बाबांकडे गिरवत होते." (नक्षत्रचित्रे, पृ. १८) या वाक्यातून त्या भालजी पेंढारकरांची कायम उपकृत असल्याचे लक्षात येते. चित्रपट गीते लिहित असताना पेंढारकरांनी त्यांना दिलेला धीर, आत्मविश्वास अशा गोष्टींविषयी कृतज्ञता व्यक्त करतात.

## गुरुवर्यांचे व्यक्तिचित्रण

**गुरुवर्य माटे–** या लेखात समर्पक शब्दांतून श्री. म. माटे यांचे कर्तृत्वशाली व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. श्री. म. माटे हे लेखकअसले तरी एकशिक्षक म्हणूनच लेखात दिसत आहे. उंच, हाडापेराने बळकट, रुंद बांधा, भरघोस मिश्या असे माटयांचे शरीरवर्णन तसेच धाक, दरारा निर्माण करणारे माटयांचे व्यक्तिमत्त्व लेखात उतरले आहे. वर्गात येताना काळा गाऊन घालणे अशा त्यांच्या रुपामुळे मुलांच्या मनात माटयांबद्दल कमालीचा दरारा असे परंतु त्यांचे वक्तृत्व इतकेरसाळ होते की वक्तृत्वाच्या मोहाने आणि विनोदाच्या लोभाने सर्व मुले त्यांच्या तासाला न चुकता हजर असे अशी माटयांच्या व्यक्तिमत्त्वाची निराळी थोरवी लेखात व्यक्त झाली आहे.

प्रा. माटे यांनी गुरू या नात्यानी त्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता कोणत्याही प्रश्नाचा स्वतंत्र विचार करायला शिकवले, रूढ आणि स्वीकृत परंपरांकडे वेगळया दृष्टीने बघण्याची शक्ती दिली, विद्यार्थ्यांना जीवनाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन दिला, मुलांना त्यांनी वाचनाकडे प्रवृत्त केले, विद्यार्थ्यांची कुवत ओळखून त्यांना लेखनाकडे वळवले याविषयी लेखिका त्यांच्या ऋणी आहे. त्यांचे अफाट वाचनाचा प्रत्यय आणि शिकवण्याची पद्धत येथे आविष्कृत झाली आहे.

माटयांची लेखनशैली, त्यांची वाङ्मयीन जाणीव किती सजक होती व त्यांच्या नजरेचा पल्ला किती दूरवर पोहचणारा होता हे सांगत असताना लेखिका लिहितात, “माटयांचे कुठलेही लेखन जुने वा कालबाहय वाटत नाही. उलट नव्या काळाने ज्या नव्या समस्या निर्माण केल्या आहेत, त्यांच्या संदर्भात आज कदाचित ते अधिक अर्थपूर्ण व आवश्यक ठरत आहे.” (वडीलधारी माणसे, पृ. ३२) असे सर्वथा नावीन्याने मडलेल्या लेखनशैलीवर लेखिकेने प्रकाश टाकला आहे.

जातिजमातीची गुंतागुंत, सामाजिक विषमता, संतांचा, मानवतावाद, रामदासांची प्रवृत्तीपर शिकवण, पंडित कवींचे भाषिक चमत्कार, मानवी मनाच्या अतर्क्य हालचाली, कौटुंबिक नातेसंबंधातला हळूवार गोडवा आणि जिव्हाळा अशा कितीतरी गोष्टींवर वर्गात माटयांनी केलेले भाष्य लेखिकेला सतत आठवत राहते. असे रसिक, ममताळू माणूसकीने ओथंबलेल्या माटयांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय ‘गुरुवय’ माटे या लेखात येतो.

स्त्रीची होणारी कुचंबणा, स्त्रीचे शारीरिक दुर्बल्य, स्त्री चारित्र्यावर सहज उडवले जाणारे शिंतोडे अशा गोष्टींवर माटे पोट तिडिकीने बोलणारे, स्त्री पुरुष समानतेची मागणी करणारे, अन्यायाविरूद्ध उघड बोलणारे; असे आधुनिक विचारांचे माटे चित्रित झाले आहे. आयुष्याच्या अखेरपर्यंत माटयांने लेखन केले. परंतु बरेच लेखन त्यांना आर्थिक निकडीमुळे करावे लागले हे सांगताना माटयांचे आर्थिक दारिद्रयविषयी लेखिका खंत व्यक्त करतात.

विद्यार्थीदशेत कोवळया आणि अपरिपक्व वयात माटयांसारखे प्रेमळ आणि विचारवंत गुरू लाभले हे लेखिकेला स्वतःचे भाग्य वाटते. माटयांनी केलेल्या संस्कारातून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले आहे. त्यामुळे ‘गुरुवर्य माटे’ या लेखात माटयांचे व्यक्तिमत्त्व उलगडत असताना गुरुवर्याविषयीची कृतज्ञता आणि आदराची भावना लेखात जागोजागी विखुरलेली दिसून येते.

## साहित्य क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे

**जोग सर–** लेखिका प्रा. माटयांप्रमाणेच रा. श्री. जोग यांचाही उल्लेख आदरार्थी करताना दिसतात. रा. श्री. जोग यांची पहिली अप्रत्यक्ष ओळख लेखिकेला जोग्याच्या ‘अभिनव काव्यप्रकाश’ या ग्रंथातून झाली होती. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीपूर्वीच त्या जोगांकडे असणारी

विद्वत्ता, रसिकता, अभ्यासूपणा त्यांच्या विवेचनशक्ती या गुंणामुळे प्रभावित झालेल्या दिसून येतात. एक विद्वान ग्रंथकार, चिकित्सक, समीक्षक म्हणून दुरत्वाने जाणवणारे जोग त्यांना जवळचे वाटत होते हे त्यांच्या लेखनातून समजते.

जोगांचा शांतपणा, समजूतदारपणा, दुलखुलासपणे वाङ्मयीन प्रश्नांवर बोलणे, हलक्या, सौम्य, प्रसन्न विनोदाचे शिंपण, वरवर गंभीर वाटणारे पण अंतर्यामी प्रेमळ जोगांचे लेखिकेने सूक्ष्मपणे चित्रण केले आहे. वडील, पत्नी, त्यांच्या लहान मुलांकडू जोगांच्या होणाऱ्या स्वागताविषयी लेखिका आवर्जून सांगताना दिसतात. जोगांच्या कुटुंबाविषयीच नव्हे तर त्यांच्या घराचे वर्णन करून तेथिल प्रत्येक वस्तूबद्दल माहिती लेखात आली आहे.

कॉलेजमधल्या अभ्यासाव्यतिरिक्त होणारे कार्यक्रम, मुलांचा सहवास, तसेच कॉलेज बाहेरच्या जगातून मनात झिरपत राहणारे विविध पुस्तकांतून थोरामोटयांची संगत त्याचबरोबर वर्गात आणि वर्गाबाहेर प्राध्यापकांची लाभलेली जवळीक यातून विद्यार्थी मनावर योग्य ते संस्कार होत असतात. असा दुरगामी संस्कार आपल्यावर रा. श्री. जोग यांनी केल्याचे लेखिका सांगतात. जुन्या संत वाङ्मयाची गोडी त्यांना माटयांनी लावली त्याप्रमाणे आधुनिक मराठी कवितेचे प्रेम जोगांनी त्यांच्या वृत्तीत निर्माण केले. असे सांगून 'जोग सर' या लेखात जोगांबद्दल आदर सन्मान व्यक्त केला आहे.

जोगांच्या समीक्षेबद्दल लेखिका लिहितात, "जोगांच्या रसग्रहणातदेखील एक प्रकारचा संथपणा, थंडपणा, अलिप्तता मला जाणवत राही आणि ती माझ्या मनाला खोल कुठे तरी बोचत असे. उत्कृष्ट करण्याचा किंवा कोणत्याही उत्कृष्ट कलाकृतीचा रसास्वाद घेताना मन कसे भरुन ओसंडून यायला हवे, वृत्ती कशा बेहोश, तडाकार हव्यात असे मला वाटे त्यामुळे जोगांच्या थंड हिशेबी रसग्रहणात मूल्यमापनात अपुरेपणा जाणवत राही." (वडीलधारी माणसे, पृ. ४०) अशा शब्दांत रा. श्री. जोग यांच्याबद्दल स्वतःची मते लेखात निर्भिडपणे व्यक्त झाली आहे. औचित्य, विवेक, संयम आणि सभ्यता हे जीवनाप्रमाणेच त्यांच्या लेखनाचेही बळकट अधिष्ठान होते. त्यामुळे समीक्षा क्षेत्रात आपले स्वतंत्र स्थान ते निर्माण करू शकले. कविता लिहिणे आपल्याला जमणार नाही हे समजून घेऊन त्याबद्दल कुठेही हळहळ व्यक्त केली नाही. काव्ये लिहून आपली सामान्य काव्ये चांगली म्हण्याचा कधी अटट्हासही जोगांनी केला नाही. अशा जोगांची अनासक्ती या गुणाचा परिचय त्यांनी करून दिलेला दिसतो.

प्रा. जोग यांनी कधी प्रसिद्धीची हाव बाळगली नाही तर कधी टीकाकार लेखकांना आपल्या भोवती जमवून आपले 'पीठ' स्थापन केले नाही. कारण त्यांच्या स्वभावालाच ते जमण्याजोगे नव्हते असे जोगांचे वेगळेपण लेखिकेने दर्शविले आहे. त्यांची निस्वार्थी वृत्ती, स्वतः बोलून दाखवण्या ऐवजी कृतीतून व्यक्त होण्याची त्यांची वृत्ती यामुळे एक लेखक, समीक्षक याहीपेक्षा एक माणूस म्हणून ते कसे श्रेष्ठ होते हे प्रा. जोग यांच्या व्यक्तिचित्रणातून स्पष्ट होते.

**साहेब–** अत्रे यांना जवळून जाणून घेण्याची संधी लेखिकेला मिळाली आणि त्यातूनच अत्रे यांचे 'साहेब' हे व्यक्तिचित्रण निर्माण झाले. आचार्य अत्रे यांनी लेखिकेला मुंबईत आणले मुंबईत त्यांची राहण्याची सोय केली. 'नवयुग' साप्ताहिकात सहसंपादकाची नोकरी दिली. ऑफिसमध्ये नेणे, त्यांच्यासाठी घरून जेवण आणणे या सर्व आठवणी लेखात आल्या आहेत. यातून लेखिका व अत्रे यांचे स्नेहाचे, जिव्हाळयाचे नाते दिसून येते.

शेळके यांच्या लेखक या जडणघडणीत अत्रे याचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्यावर लेखक मनाचे संस्कार करण्यास, त्यांच्या जीवनाला आकार देण्यास अत्रे समर्थ ठरले आहे. अशी अत्र्यांबद्दलची कृतज्ञता लेखात व्यक्त झाली आहे.

प्रामाणिकपणा, नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा अशा अत्र्यांच्या स्वभावाविशेषांची आणि कामातील शिस्तीबद्दलही लेखात आवर्जून नोंद केली आहे. अत्रे स्वतःकडून काही चूक झाली तर स्वतःला 'गाढव' ही त्यांची आवडती शिवी देत. अशा अत्रे यांच्या सवयीबद्दल लेखिका सांगताना दिसतात.

समाजातील कुठल्याही थरातली माणसे त्यांना जवळची वाटते हे खरे असले तरीपण ब्राम्हणांपेक्षा बम्हणेत्तराबद्दल विद्वानांपेक्षा अविद्वांनाबद्दल, शहरी लोकांपेक्षा मध्यमवस्तीच्या खेडयातल्या लोकांबद्दल अत्रे यांना अधिक जिव्हाळा वाटे. अशी अत्रे यांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल लेखिका या लेखात सांगतात.

अत्रे यांच्या मनात जीवनाविषयी असणाऱ्या तर्काविषयी लेखिकेने लिहिले आहे. अत्रे म्हणत असत, "आपण आयुष्यात अपयशी माणसाची संगत धरू नये. जो आपल्यापेक्षा अधिक गुणी, अधिक बुध्दिमान, अधिक कर्तबगार आणि अधिक यशस्वी आहे. त्याच्यापाशी स्नेह करावा. त्याची संगत धरावी." (वडीलधारी माणसे, पृ. ६६) अशी अत्रे यांची संवादरूपी वाक्ये लेखात

दिली आहे. माणसाने नेहमी स्वतः पेक्षा अधिक गुणी, बुद्धिमान कर्तबगार व यशस्वी माणसाची संगत करावी. अशाप्रकारचा त्यांचा विचार लेखात आला आहे.

या लेखात लेखिकेने अत्रे यांच्या व्यक्तिरेखेमधून मानवी मनाचे विविध पैलूंवर भाष्य करून भरघोस, समृद्ध, चैतन्यमय, कर्तृत्वसंपन्न अत्र्यांचे व्यक्तिमत्त्व रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

**दुर्गाबाई–** दुर्गा भागवत यांचे व्यक्तिचित्र या लेखात यथातथ्य उतरले आहे. दुर्गाबाईचा बोलण्याचा झपाटा आणि स्वच्छ, निर्मळ, एखाद्या अर्भकासारखे निरागस हसणे लेखिकेने जसे अनुभवले तसेच ते लेखातही मांडले आहे. त्यांच्याकडे असणारी अभ्यासूवृत्ती, तल्लख निरीक्षणशक्ती हे गुण लेखात आविष्कृत झालेले आहेत.

लेखिका दुर्गाबाईंची तुलना भाऊसाहेब खांडेकरांशी करत असताना लिहितात, "जीवनाबद्दलचा अपार आशावाद आणि हाती घेतलेल्या कामावरची उदंड श्रध्दा हेच ते या दोघांमधले साधर्म्य असावे." (वडीलधारी माणसे, पृ.११४) जीवनाबद्दल अपार आशावाद आणि हाती घेतलेल्या कामावरची उदंड श्रध्दा दुर्गाबाई व भाऊसाहेब यांच्यातील साधर्म्याचे धागे आहे असे लेखिकेला वाटते.

समोरच्या माणसासमोर त्यांची स्तुती करणे अशा गोष्टी दुर्गाबाईंना उभ्या जन्मात कधी जमल्या नाही हे सांगत असताना बाहेरून परखड, स्पष्ट वक्त्या, काहीशा उग्र वाटणाऱ्या दुर्गा बाई आतून मात्र साध्या व प्रेमळ आहे असे स्पष्ट मत व्यक्त करून लोकांचा दुर्गाबाईबद्दल असलेला गैरसमज लेखिका दूर करू इच्छितात.

दुर्गाबाईंच्या साहित्यासंबंधीही लेखात लेखन झाले आहे. काही अपवादात्मक लेखन सोडले तर दुर्गाबाईंचे जास्तशा लेखनाचे विषय सनातन स्वरूपाचे आहे हे सांगून लेखनाची शैली, भाषेचे वळण, येणारे संदर्भ व संकेत अस्सल भारतीय आहेत, असे मूल्यमापन प्रांजळपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. दुर्गाबाईने कधी लौकिक हिशेब सांबाळला नाही तसे धूर्त अंदाजाने कधी पाऊलही टाकले नाही. त्यामुळे स्वतःचे 'पीठ' निर्माण करण्यास त्या मागे राहिल्या. यातून त्यांच्या स्वभावधर्मावर लेखिका नेमकेपणाने बोट ठेवतात. दुर्गाबाईंचे अंतरंग जाणून घेऊन त्यांचा स्वभाव, आचारविचार, मानसिकता, सामजिक स्थान, त्यांच्या जीवनातील यश अपयशासह त्यांना शब्दांतून समोर आणण्याचे कार्य या लेखातून झाले आहे.

**बालमित्र–** भा. रा. भागवत यांची पहिली अप्रत्यक्ष ओळख लेखिकेला भा. रा. भागवतांच्या साहित्याद्वारे झालेली दिसून येते. भा. रा. भागवत हे बालमित्र होते. अतिशय उत्साही, लगबगिने आणि मनःपूर्वक हसणारे, मुलांबद्दल जिव्हाळा असलेले, मुलांसाठी हौसेने लेखन करणारे भा. रा. भागवत यांचे व्यक्तिमत्त्व या लेखात दिसून येते.

भा. रा. भागवत साहित्यप्रेमी होते. त्यांचे घर नुसते पुस्तकांनी ओसंडत होते. जुने कोश, जुनी इंग्रजी पुस्तके, इंग्रजीतल्या दुर्मिळ मासिकांचे बांधलेले अंक अनेक मराठी बालसाहित्याची पुस्तके असा पुस्तक संग्रह त्यांच्यापाशी होता. हे सांगून साहित्यप्रेमी लेखक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व पारदर्शक केले आहे.

भागवतांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला, तुरुंगवास भोगला परंतु त्यांच्यातील लेखक मात्र कायम जीवंत राहिला असे लेखिकेचे म्हणणे आहे. तसेच त्यांच्याबरोबर केलेल्या चर्चा, वाचन, लेखनाविषयी सांगत असताना भागवत व त्यांची पत्नी लीलाबाईबरोबर घालवलेल्या क्षणांच्या आठवणी लेखात उतरल्या आहे.

लेखिका लिहितात, "भागवतांची जीवनकथा थक्क करणारी होती त्याहून थक्क करणारे होते त्यांचे लेखन मुलांसाठी इतके रसाळ लेखन करणारा दुसरा लेखक मराठीत दाखवून देणे अवघड; किंबहुना अशक्य आहे." (नक्षत्रचित्रे, पृ. ५८) भागवतांनी मुलांसाठी केलेले लेखन इतके रसाळ झाले आहे की त्याहून चांगले लेखन करणारे लेखक मिळणार नाही असे सांगून एक कलंदर प्रतिभावंत लेखक, एक सच्चा साहित्यसेवकाची प्रतिमा वाचकांपुढे उभी केली आहे. भागवतांचे अतिशय विवक्षित असे व्यक्तिमत्त्व या लेखात उतरले आहे.

**मामा वरेरकर–** 'नवयुग' मध्ये काम करत असताना लेखिकेला मामा वरेरकर यांचा निकटचा सहवास लाभला. प्रत्यक्ष भेटीपूर्वी लेखक म्हणून मामा वरेरकर त्यांना त्यांच्या लेखनातून कसे जाणवले हे सांगताना त्यांच्या साहित्याने आपल्या मनावर खोल संस्कार केले असे म्हणत एक निर्मळ मनाचे, जीवनाचे बरेवाईट चढउतार बघितलेले, स्वतःच्या खास बुद्धीने जीवनाला स्वीकारणारे, जन्मभर निष्टापूर्वक साहित्य सेवा केलेले तसेच विडया, त्यांचा खादीचा पोषाख, त्यांच्या अखंड गप्पा, कधी अश्लील तर कधी पोरकट वाटणाऱ्या कोटया अशा गोष्टींचे विवेचन करून मामांचे अंर्तबाह्य अनोखे व्यक्तिमत्त्व लेखिकेने रेखाटले आहे.

मामा वरेरकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देताना मामांच्या नाटयप्रवासाचा आढावा घेतलेला आहे. एक लेखक म्हणून त्यांनी कधी माणसांपासून अलिप्त राहून लेखन केले नाही. त्यामुळे लेखक हा स्वतःच्या व्यक्तिगत खाजगी जीवनात आत्ममय राहणारा जीव आहे या माणसांच्या कल्पनेला वरेरकरांनी खोटे ठरवले आहे. माणसांच्या वेडातून मामांनी इतर भाषांतील साहित्यिकांशी मैत्री जोडली आणि शरदचंद्र, बंमकिमचंद्र अशा बंगाली साहित्यिकांचे साहित्य मामांनी मराठीत अनुवादित केले. अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष, वेगळेपण मांडत असताना त्याचे साहित्य क्षेत्रातील योगदान निदर्शनास आणून दिले आहे. लेखिका लिहितात, "मामा मला म्हणाले "खरं तर आयुष्यात याच दोन गोष्टी महत्त्वाच्या 'भेजा' आणि 'कलेजा' त्या तू नीट सांभाळ मग तुला दुसरी कसलीच चिंता करायला नको!" (वडीलधारी माणसे, पृ. ७७) या परिच्छेदातून मामांना माणसांविषयी असणारा जिव्हाळा आणि मामा आपल्या माणसांना जीवनविषयक तत्त्वज्ञान कशा साध्यासुध्या गोष्टींतून समजावून सांगण्याचा प्रयत्न करतात याचे यथार्थ दर्शन लेखात घडविले आहे.

## २.३.६ चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख

रोजच्या जीवनातील एखादी गोष्ट, अनुभव किंवा मनात अचकित येऊन जाणारा विचार त्यांच्या लेखाचा विषय बनतो. माणूसपण, माणसाची कुत्सित प्रवृत्ती, माणसाचा स्वार्थी आणि संकुचित स्वभाव, समाजातील नीती नियम, वैश्विक एकता, जनरेशन गॅप हे लेखिकेचे चिंतनाचे विषय आहे.

**सलगी देणे–** जीवन जगत असताना माणसाने माणूसपण जपले पाहिजे असे लखिका या लेखातून पटवून सांगताना. हे पटवून देण्यासाठी जर्मनीतील क्रम कंपनीचे मालक व त्यांची पत्नी, अमेरिकेतले करोडपती व त्यांची पत्नी, छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर यांची उदाहरणे देतात. आजच्या काळातील माणूस ढोंगी आहे. तो तोंडाने समतेच्या सर्वधर्म समभावनाच्या गोष्टी सतत करतो. परंतु दुसऱ्या बाजूने आपले धार्मिक, जातीय, आर्थिक व सांस्कृतिक वेगळेपण उच्चपण दाखवण्याकडे त्याचा कल असतो. अशा शब्दांत लेखिका ढोंगी, स्वार्थी माणसाची नियत स्पष्ट करतात.

माणसाच्या वृत्ती प्रवृत्तीवर विवेचन करत असताना लेखिका माणसाला स्वतःच्या वागण्याचा विचार करायलाही भाग पाडतात. त्या लिहितात, “मनावरची ही सारी ओझी दूर लोटून, सारी जाळीजळमटे झटकून अगदी सहजसुंदर साधेपणाने आपणाला एकमेकांशी वागता येणार नाही का? माणसाचे माणूसपण एवढाच त्याच्या असण्याचा अर्थ आपण ध्यानात घेणार नाही का?” (सांगावेसे वाटले, म्हणून, पृ. १६) असे प्रश्न विचारून वाचकांना त्याची उत्तरे शोधण्यास प्रवृत्त करतात.

**आई देवकी दायी यशोधा–** पूर्वी आपल्याकडे एकत्र कुटुंब पद्धती होती त्यावेळी आईचा मुत्यू झाला तर त्या नवजात अर्बकाचा सांभाळ कुटुंबातील वडीलधारी स्त्री करत असत. एकत्र कुटुंबात रूढ नैतिक परंपरा पाळून धर्मसंमत विवाहबंधनातून निर्माण झालेल्या मुलांना पोरकेपणाची वागणूक मिळत नसे. समाजाने मान्य केलेल्या रीतीभातींच्या चौकटीत त्यांना संरक्षण दिले जायचे. परंतु ते मुल जर कुमारीकेचे समाजाच्या दृष्टीतून अनैतिक संबंधातून जन्मलेले असेल तर त्या मुलाला जन्मभर कलंकीत जीवन जगावे लागते. त्याला जननिंदेला सामोरे जावे लागते अशा समाजाच्या नीती नियमाचा लेखिका या लेखात निर्देश करतात. यावर स्वतःचे विचार मांडताना लेखिका लिहितात, “माणसांच्या जगातली ही नीतीची, परंपरेची बंधने निदान मानवेतर प्राणिसृष्टीत नाहीत हे किती बरे आहे! पण तिथेही, आपण माणसांना अगम्य असणाऱ्या अशा काही कारणांनी आया मुलांचा त्याग करताना दिसतातच.”(रंगरेषा, पृ. ८०) येथे लेखिका सामाजिकनीति अनीतीच्या कल्पनांना नाकारताना जाणवतात.

**वार्धक्य : एकवेगळा दृष्टिकोन–** या लेखात म्हाताऱ्या माणसांच्या कुटुंबातील स्थानावर चिंतन केले आहे. पूर्वीच्या काळात ही वृद्ध माणसे केंद्रस्थानी असत. त्या काळात एकत्र कुटुंब पद्धती असल्याकारणाने त्यांना घरात सहज सामाहून घेतले जात. त्यांना कुटुंबात एक मानाचे आदराचे स्थान होते. कुटुंबियांना तसेच नातेवाईकांना ही वृद्ध माणसे हवी हवीशी वाटत होती. स्वातंत्र्यपूर्व काळात एका प्रमाणात ध्येयवाद आदर्शवाद हे समाजातील मागदर्शक तारे होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विभक्त कुटुंब पद्धती आली आणि माणसे ज्या कौटुंबिकभावबंधनाने परस्परांशी निगडित होती ते बंधन नकळत शिथिल झाले. या काळात वृद्धाशी जुळवून घेणे तरुणांना अवघड झाले असे लेखिकेचे मत या लेखात व्यक्त झाले आहे.

काही वृद्ध मंडळी वरवर देखावे करतात किंवा शरीर सजवतात. हे त्यांना चूकीचे वाटते. अशा वृद्धांना सल्ला देताना लेखिका लिहितात, "तारुण्याचा असा कृत्रिम आभास निर्माण करण्याऐवजी आपले वार्धक्य उमदेपणाने स्वीकारून मनाचा तजेला टिकवणे, ते तरूणपण, ताजे राखणे हे या वयाला हितकारक ठरते." (मनातले घर, पृ. १२२) लेखिकेला मनाचे तरुणपण अधिक योग्य वाटते. त्यामुळे त्यांनी आजच्या वृद्धांना मनाचा तजेला राखण्याचा सल्ला दिला आहे.

**घटातील पोकळी–** या लेखात वैश्विक एकतेची जाणीव व्यक्त झाली आहे. आपल्या सर्वांचे एकच विश्व आहे आणि या विश्वात सर्वांचा अंतिम विराम एकाच ठायी असतो. त्यामुळे सर्वा ंनी येथे प्रेमाने वागले पाहिजे. असा उपदेश करत असताना येथे त्यांनी आत्म्याला महत्त्व दिलेले दिसून येते. आपले शरीर नष्ट होणार परंतु आत्मा अमर राहणार असे त्यांचे म्हणणे आहे. शरीरासारख्या घटाला महत्त्व नसते. ते त्यातील पोकळी म्हणजेच आत्मा जो आहे; जो दिसत नाही त्याला अधिक महत्त्व आहे. हे वेगवेगळया उदाहरणासह या लेखात त्या स्पष्ट करतात.

**खोटे कधी बोलू नये–** लेखिकेला खोटे बोलणे, खरे बोलण्यापेक्षा जास्त अवघड वाटते. असत्य हे देखील एका वेगळया पातळीवर उत्कटपणे सत्यच असते. हे पटवून देण्यासाठी त्या इतिहासाचा आधार घेतात. पानिपतच्या पराभावाची अनेकांनी अनेक परींनी मीमांसा केली आहे. त्या सगळया मीमांसा आपल्या भूमिकांतून सत्यच आहेत. मग त्यांतली कोणती खरी मानायची आणि कोणती खोटी मानायची? काही ऐतिहासिक घटना आपण 'सत्य' म्हणून स्वीकारतो. असे म्हटले जाते की मुळात त्या घडलेल्याच नाहीत; नसतील पण म्हणून काय झाले? वास्तव अर्थाने नसल्या, तरी प्रतिकात्मक अर्थाने त्या सत्याहून सत्य असतात. खोटे बोलणे हे नेहमीच चूकीचे असू शक्त नाही असे त्या सांगताना दिसतात. इंग्रजी मासिकात असलेला मानसशास्त्रीय विषयावरचा एक लेख वाचल्याने त्यांना ते पटले आणि त्यातून त्यांना 'खोट कधी बोलू नये' या लेखाचा विषय सूचलेला दिसतो.

**मराठी वाचवा....कोणीतरी?–** हा लेख लेखिकेच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला अभिमान व्यक्त करतो. या लेखात त्यांची मराठी भाषेविषयीची तळमळ व्यक्त झाली आहे.

मराठी वाचवण्याकरिता आधी प्रत्येकाने शुद्ध भाषा लिहिली पाहिजे असे मत त्या व्यक्त करतात. मराठी बोलणाऱ्यांचे दोष दाखवून देत असताना प्रत्येकाने त्यावर विचार करायला हवा असा इशाराही त्या करतात. आपली लेखनातील हुशारी दाखवण्याकरिता मराठी लेखन करत असताना इतर भाषेतील शब्दांचा जाणिवपूर्वक वापर करणे त्यांना चूकीचे वाटते. मराठी माणसाचे दोष दाखवत असताना मराठी भाषा टिकून ठेवण्यासाठी मराठी माणसाने कसे वागावे याचे मार्गदर्शन त्यांनी या लेखातून केले आहे.

**नातेसंबंध जुने आणि नवे–** या लेखात जुनी नाती व त्यांची जागा घेतलेल्या आजच्या नातेसंबंधावर चिंतन झाले आहे. जुन्या कुटुंब पद्धतीतील विविध नातेसंबंधातला भिन्न भिन्न गोडवा त्यांनी अनुभवातून मांडला आहे. आपल्या बालपणातील नातेसंबंधावर लिहित असताना त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील, आजच्या आधुनिक काळात हरवत चाललेल्या जुन्या नात्याबद्दल जाणीव करून दिली आहे. जुने नातेसंबंध आज दिसत नाही त्याला जबाबदार आपली आजची विशिष्ट जीवनसरणी आहे असे त्यांना वाटते. एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव, माणसांचा परस्परसंबंधात येऊ लागलेली तटस्थ उदासीनता यातून जुनी नाती कालबाहय झाली असे मत त्यांनी मांडले आहे. एवढेच नाही तर आजच्या जगात जुन्या नात्याची जागा नव्या नात्यांनी घेतली हे सत्य सांगताना नातेसंबंध कायम मिटले नाही याचे समाधानही व्यक्त केले आहे. लेखिका लिहितात, “जुने नाते संबंध हरवले तरी त्यांची जागा हे नवे नातेसंबंध घेत आहेतच की! खंत करण्याचे फारसे कारण नाही” (रंगरेषा, पृ. ६९) एखादा मित्र, आईची मैत्रीण, एखादी प्रौढ वत्सल शेजारीण यांच्याशी आजची मुले नाते जोडतात त्यामुळे समाजात नाते ही संकल्पना आजही टिकून आहे याची जाणीव त्या या लेखात करून देतात.

**अशीही जनरेशन गॅप–** वयाच्या अंतरामुळे तरुण मुले आणि वयस्कर माणसे यांच्या विचारात कसा फरक जाणवतो याविषयी लेखन झाले आहे. प्रौढ माणसे स्वतःचे वय स्वीकारायला तयार होत नाही. आपण कित्ती तरुण आहोत हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यावेळी त्यांच्या हातून त्यांना न शोभणाऱ्या गोष्टी घडतात. परंतु त्यांनी कित्तीही तरुण वागण्याचा प्रयत्त्न केला तरी तरुण मुले मात्र त्यांना स्वीकारायला तयार होत नाही आणि त्यामुळे ही प्रौढ माणसे सतत दुःखी असलेली जाणवतात. अशी प्रौढ माणसांची व्यथा त्यांनी व्यक्त केली आहे. प्रौढ

माणसांनी आपले वय समजून वागले पाहिजे आपले वय स्वीकारले पाहिजे तरुण पीढीच्या भावविश्वावर अतिक्रमण करू नये असा सल्ला लेखिका या लेखातून देताना दिसतात.

**जीवनाविषयी थोडेसे–** या लेखात लेखिकेने माणसाच्या जीवनावर विचार करून स्वतःची मते, निरीक्षणे मांडली आहे. जीवन हे सुख दुःखाच्या असंख्य क्षणांनी अखंड चालू राहणार हे निश्चित आहे. त्यामुळे दुःखात खचून न जाता हाती आलेले काम नेमाने निर्विकारपणे पार पाडणे त्यांना कर्तबगार माणसाचे लक्षण वाटते. लेखिका लिहितात, "या जगात प्रत्येक पुरुषाला आणि प्रत्येक स्त्रीला, ईश्वराने म्हणा, निसर्गाने म्हणा, समाजाने म्हणा त्याचे किंवा तिचे असे काही ठराविक काम नेमून दिलेले आहे. हे काम करताना आपली खाजगी सुख दुःखे, विचारविकार, अडचणी, संकटे काहीही त्यांनी आड येऊ देता कामा नये. अडचणी येतात त्या यायच्याच. संकटे येतात ती ही यायचीच पण त्या अडचणींना किंवा त्या संकटांना आपल्या ठरीव कर्तव्याआड आपण कधीही येऊ देता कामा नये." (रंगरेषा, पृ. २५) जीवनावर प्रेम करणाऱ्या, जीवनाकडे आशाळभूत नजरेने पाहणाऱ्या शान्ता शेळके लिहितात, "the show must go on" (रंगरेषा, पृ. २५) जीवनाच्या रंगभूमीवर स्वतःच्या वाटयाला येणाऱ्या भूमिका पार पाडत असताना जीवनाचा हा खेळ अखंड चालू राहीला पाहिजे ही एक गोष्ट माणसाने लक्षात ठेवायला हवी असे त्यांचे स्पष्ट मत लेखात व्यक्त झाले आहे.

**मैत्रीचे निकष आणि मर्यादा–** या लेखात लेखिकेने माणसाच्या संकुचित स्वभावावर टिप्पणी केली आहे. मैत्रीत जीवलग मैत्रिणीला मित्राला बंधन घालणे त्यांना अप्पलपोटेपणाचे वाटते. माणसाची वृत्ती दर्शवताना लेखिका लिहितात, "आपला मित्राचा शत्रू तो आपला शत्रू आणि आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र असा काहीसा संकेत राजकारणात रूढ आहे म्हणतात." (रंगरेषा, पृ. १९) असा संकेत राजकाराणात एकवेळी जोपासला तरी चालेल परंतु सच्चा मैत्रीच्या नात्यात हा नियम पाळू नये असे त्यांचे प्रांजळ मत आहे.

**जेथे जातो, तेथे...–** आज सुखी जीवन जगण्याकरिता प्रत्येक मनुष्याचे मन आतुर होत असते. आणि हे सुखी क्षण अनुभवण्याकरिता तो वेगवेगळया ठिकाणांची निवड करत असतो. परंतु आनंदासाठी बाहेर पडत असताना भूतकाळातील कटू अनुभवांना मात्र तो विसरू शकत नाही. त्यामुळे आलेल्या ठिकाणी निखळ आनंद अनुभवण्याजागी त्याचे मन विवंचनेत

बुडालेले असते. हे लेखिका निःसंकोचपणे कबूल करतात. आनंदीत राहण्यासाठी माणसाने कोणती गोष्ट ध्यानात ठेवावी हे सांगताना लेखिका लिहितात, "कुठल्याही आनंद यात्रेला जाताना आपल्यातला क्षुद्र, हिशेबी, व्यवहारी, अतिशहाणा, कोडगा, क्षुद्र, लाचार वगैरे वगैरे जो एक दूसरा 'मी' असतो ना, त्याला आपण कटाक्षाने टाळून, मागे ठेवून जावे. तरच ती यात्रा सुफळ संपूर्ण होते." (सांगावासे वाटले म्हणून, पृ. ८) तरच आपण जीवनात सुखी क्षणाचा आनंद लुटू शकतो असे त्यांचे मत आहे. हे मत त्यांनी वेगवेगळया उदाहरणाद्वारे पटवून दिले आहे.

**दळण सरलं सरलं म्हणू कशी?–** जपान व भारत यांच्या परंपरेत दिसणारे साम्य येथे उलगडले आहे. कोणतीही गोष्ट असो ती संपवणे म्हणजेच जीवनाचा अंत करणे अशी या दोन्ही देशातील माणसांची समजूत आहे. अशा उदाहरणातून लेखिकेने जपानी माणसांची समजूत स्पष्ट केली आहे. जपानी माणसे घर बांधत असताना एक दोन विटांची जागा रिकामी ठेवतात. हे वाचून त्या अंतर्मुख होतात. त्यावेळी आपल्या भारतातही अशीच समजूत असल्याची त्यांच्या लक्षात येते. या भारतातील चाली रीती, समजूतीची उदाहरणे देऊन लेखिकेने समाज मनाचा विचार निदर्शनास आणून दिला आहे.

पूर्वी आापल्याकडे गिरणीचा जास्त प्रमाणात वापर केला जात नसत. बायका स्वतः जात्यावर दळण करत होत्या. याचा अनुभव लेखिकेने घेतला होता. त्यांच्या बालपणात बायका जात्यावर दळण दळत असताना सगळं धान्य न संपवता मुठभर धान्य आवर्जुन मागे ठेवत आणि ती मुठ त्या जात्याच्या तोंडात टाकत असे. निरोप घेताना 'जातो' असे न म्हणता 'येतो' असे म्हणायची प्रथा तसेच, धार्मिक ग्रंथातील एका अध्यायाचे पठण करून झाल्यावर पुढच्या अध्यायाला सुरुवात करून ठेवणे अशी बालपणी अनुभवलेली भारतीय संस्कृतीतील कितीतरी उदाहरणे सांगून जीवनाचे सातत्य टिकवण्याची माणसाच्या मनातील कल्पना लेखिकेने या लेखात मांडली आहे.

**स्वार्था तुझा रंग कसा?–** व्यवहारिक जीवनात माणसाला पैसा द्रव्य महत्वाचा वाटतो. त्या पैशाची, द्रव्याची अभिलाषा बाळगून माणूस वाईट मार्गाने इतरांच्या पैशांचा अपहार करत असतो. त्यांचे नुकसान करतो. खोटे बोलतो, नको ती कृत्ये करुन निंदेत सहज सहभागी होतो. हे करताना माणसाला तात्पुरता आनंद लाभतो खरा; परंतु त्याचे परिणामही त्याला भोगावे

लागतात. जीवनात स्वार्थ कसा माणसाला अधोगतीकडे नेत असतो हे म्हणींतून पटवून देताना लेखिका लिहितात, "आज ना उद्या, या आनंदाची चोख किंमत चुकती करावी लागते, हा विचार मनाला शिवत नाही. तथापी आपण तो विचार केला नाही. तरी काळ प्रत्येक प्रमादाची किंमत वसूल केल्याखेरीज राहत नाही. पेरावे तसे उगवते. करावे तसे भरावे अशा म्हणी काळाच्या याच निष्ठूर कायद्याच्या द्योतकआहेत." (आतला आनंद, पृ. ६३) जीवनात निस्वार्थी भावनाच माणसाला शेवटपर्यंत आनंदीत ठेवू शकतात हे सत्य त्यांनी या लेखातून पटवून दिले आहे.

## २.४ शान्ता शेळके यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

### २.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

लेखिकेने विपुल प्रमाणात ललित निबंध लेखन केले आहे. १९५० नंतरचे त्यांचे ललित लेखन असले तरी त्यांचे लेखन जुन्या व नव्या अशा दोन्ही परंपरेशी संबंधीत आहे. त्यांचे अधिकशे लेख जुन्या रूढ परंपरेनुसार लिहिलेले दिसून येतात. एखादा अनुभव आल्यावर त्यावर लेखिका साधकबाधक चिंतन करतात व त्यानुसार त्या अनुभवाचा अर्थ लावून लेखाचा शेवट करताना दिसतात. विचारप्रधान, चिंतनशील, विवेचनात्मक अशी त्यांच्या लेखांची मांडणी दिसून येते. अगदी साध्या सोप्या भाषेत त्यांचे लेख निर्माण झाले आहे. त्याचबरोबर त्यांचे काही लेख अनुभवांच्या जोडीने ललित भाषेत मुक्तपणे विचार प्रकट करणारे आहे.

गतकाळातील अनुभव–आठवणी, साहित्याविषयी कुतूहल, त्यांच्या सहवासात आलेली माणसे, आठवणीतील निसर्ग, त्यांना आवडणारी मांजरे, जीवन जगत असताना त्यांना आलेले लहान मोठे अनुभव त्यांच्या लेखांचे विषय झाले आहे. भूतकाळाशी लेखिकेचे भावनिक नाते असलेले दिसून येते. भूतकाळातील अनेकआठवणी अनुभवांनी त्यांचे लेखन गजबजलेले आहे. लेखिका लिहितात, "माझ्या एकूणच स्वभावात बालपणीच्या आठवणींमध्ये रमण्याचा स्मरणरंजकाचा भाग फार मोठा आहे." (धुळपाटी, पृ. १२९) एकंदरीत माणसाची भूतकाळात रमण्याची वृत्ती असते. ती वृत्ती त्यांच्यापाशी असलेली दिसून येते. बालपणातील आठवणीं सांगण्यात त्या ज्यास्त रमलेल्या दिसतात. आपल्या लेखनाद्वारे भूतकाळात वळून पाहून पुन्हा एकदा त्या घडून गेलेल्या क्षणांचा आनंद लूटताना दिसतात. शेळक्यांच्या वाडयातील किंवा

खेड या आजोळच्या गावात घालवलेल्या दिवसांच्या गोड आठवणी सांगत असताना त्यांच्या निरागस मनाचे दर्शन घडते. अगदी साध्या सोप्या शब्दकळेने लहानपणीच्या आठवणी लेखात आविष्कृत झाल्या असून त्या विस्कळतपणे लेखात मांडलेल्या आहेत. त्यांच्या बालपणातील घटना त्यांना वर्तमानात घडवण्यास कशा कारणीभूत झाल्या याचा शोध त्यांनी या लेखनातून घेतला आहे.

मानवी जीवनाकडे बारकाईने पाहून सनातन काळ व आधुनिक काळातील जीवनाची तुलनाही त्यांनी केलेली दृष्टीस पडते. 'ते दिवस ते खाणे...' या लेखात स्वतःच्या बालपणातील खाण्यापिण्याच्या आठवणी रेखाटताना दोन पिडयातील अंतर लेखिकेने अचुकपणे मांडला आहे.

त्यांच्या आठवणी वर्णनात्मक पद्धतीने लेखात उतरल्या आहे. उदाहरणात, "हौदामध्ये सतत धोधो वाहणारा नळ होता, या हौदापाशी बसून आम्ही मैत्रिणी आमचे डबे खात असू. तो हौद, ते सावरीचे झाड, तो थंड परिसर यांच्यांशी माझी लौकरच गट्टी जमली." (धूळपाटी, पृ. ७४) आठवणी सांगत असताना गोष्टींचे वर्णन अशाप्रकारे आले आहे.

ललित लेखनात 'मी' च्या जीवनातील कडू गोड अनुभव व्यक्त होत असतात असे म्हटले जाते. परंतु लेखिकेचे लेखन केवळ गोड आठवणीतूनच निर्माण झालेले दिसून येते. खरंतर त्या आपल्या जीवनातील कटू अनुभव आठवणी सांगू पाहत नाही असेच त्यांच्या लेखनातून जाणवत राहते.

त्यांचा 'धुळपाटी' हा संग्रह आत्मनिवेदनपर संग्रह असला तरी त्यामधील लेखांमध्ये त्यांचा सलग जीवनवृत्तांत उलगडत नाही. 'मंबईने मला काय दिले' या लेखात त्या 'माझ्या व्यक्तिगत जीवनात काही अनपेक्षित घटना घडल्या. एक मोठा उत्पात झाला.' असे वरवर सांगून पुढे जातात. या लेखनात त्यांनी केवळ गोड आठवणी लिहून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि साहित्यिक जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे येथे संदिग्धता, अस्पष्टता जाणवत राहते. त्यांच्या आठवणी अनुभवांतून त्यांचा संपूर्ण जीवनपट लक्षात येत नसला तरी त्यांचे सकल व्यक्तिमत्त्व उलगडत जाते. एक सकारात्मक जीवनदृष्टी ठेवणारे प्रांजळ, रसिक, बहुश्रृत असेच त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या आठवणी अनुभवातून दिसून

येते. माणूस म्हणून त्यांना जाणून घेण्यासाठी त्यांच्या अनुभव–आठवणी उपयोगी ठरणाऱ्या आहेत.

शान्ता शेळके यांच्या ललित लेखनातून स्त्रीजीवन दर्शन घडते. केवळ स्त्रीचित्रण करणारे त्यांचे लेख संख्येने अगदी थोडे आहे. आठवणी, अनुभव कथन करत असताना त्यांच्या कुटुबांतील किंवा सहवासात आलेल्या स्त्रियांच्या अनुभवांचे निवेदन लेखात झालेले दिसते. त्यांचे स्त्रीचित्रण वास्तव स्वरूपाचे असून ते प्रभावी झाले आहे. स्त्रीजीवनातील विविध समस्यांचा शोध त्यांनी वेगवेगळया पातळीवरून घेतलेला दिसून येतो. लहान वयातील मुलगी, कुरूप स्त्रीचे दुःख, अपंग प्रौढ कुमारीकेचे दुःख, विधवा स्त्री अशा अवस्थेतील स्त्रीजीवनाचा वेध लेखिकेने घेतला आहे. स्त्रीचे दुःख, स्त्री मनाची घुसमट, रूढी परंपरेच्या नावाने त्यावर घातलेली बंधने यामुळे त्रासलेले स्त्रीजीवन गंभीरपणे नेमक्या शब्दांतून व्यक्त झाले आहे.

त्यांचे स्त्रीविषयक लेखन सामाजिक स्त्रीजीवनाकडे झुकले आहे. त्यांच्या लेखनातून स्त्रीची स्वातंत्र्यपूर्व काळातील तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक स्थितीची माहिती मिळते. या लेखनात चित्रित झालेली स्त्रीची मनोवृत्ती, तिचे भावविश्व, तिचे कुटुंबातील वर्तन हे पारंपरिक सामाजिक मूल्यांशी बद्ध झालेले आहे. पुरुषसत्ताक समाज मुल्यांच्या किंवा नियमांच्या परिघात फिरणारी ही स्त्री आहे.

लेखिकेने स्त्री भावभावना व मानसिक आंदोलने प्रभावीपणे रेखाटली आहे. या भावनांना शब्दरूप प्राप्त झालेली संवादरूपी वाक्ये वापरल्याने हे स्त्रीजीवन चित्रण हृदयस्पर्शी झाले आहे. उदाहरणात, त्यांच्या 'नवरी' या लेखातील शोभा म्हणते, "माझ्या मनात आहे. कारण आईवडिलांच्यावर जन्मभर कसं अवलंबून राहायचं? म्हणून तर शिकते आहे. अन् बाई, एका फर्ममध्ये लहानशी, नोकरीही करते आहे. पण माझ्यासारख्या पांगळया मुलीशी कोण लग्न करणार?" (ललित नभी मेघ चार, पृ. ७२) अशा संवादरूपी वाक्यांतून स्त्री मनाची जाणीव करून देत असतानाच स्त्रियांपाशी असलेली संवेदनशीलता आणि भावनाशीलतेचे दर्शन लेखनात यथार्थपणे घडवले आहे.

आजोळी सासूरवाशिणी आणि माहेरवाशिणी एका लांबलचक अंथरुणावर बसून दुपारच्या वेळी घरातल्या एकमेकींना विश्वासात घेऊन आपआपली गुपिते, रहस्ये, सुखदुःखे सांगताना लेखिकेने पाहिले होते. अशासारख्या आठवणीतून त्यांनी स्त्रीसुलभतेचा प्रत्यय आणून दिला आहे.

पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीची शारीरिक व मानसिक घुसमट होत असते. या अवस्थेचा स्वर लेखिकेच्या ललित निबंधात सतत जाणवत राहतो. आजच्या आधुनिक जगातही स्त्रीला अत्यंत गौण स्थान दिले जात असल्याने स्त्रीपुरुष समानतेची मागणी करण्यासाठी आजही स्त्रीला भांडावे लागते. अशी स्त्री जीवनाची शोकांतिका त्यांच्या लेखनात व्यक्त झाली आहे.

लेखिकेच्या लेखनात मांडलेले दुःख अखिल स्त्री जातीचे आहे. स्त्रीचे समाजातील स्थान, तिचे दुःख लेखात चित्रित करत असताना आजच्या आधुनिक जगातील स्त्रीला स्वतःविषयी विचार करण्यास लावणारे लेखन त्यांनी केले आहे. डॉ. केतकर म्हणतात, "स्त्री आणि पुरुष यांच्यात जो जातितः भेद आहे. त्यामुळे पुरुषांना स्त्रियांचे मन केवळ आपल्या मनावरून तर्क काढत गेल्यामुळे समजणार नाही. स्त्रियांचे मन समजून घेण्यास स्त्रियाच पाहिजे."[१] पुरुषाला स्त्रीचे मन समजून घेणे अवगड जाते. कारण स्त्रीला येणारे अनुभव शारीरिक तसेच मानसिक दृष्टया पुरुषापेक्षा पूर्णता वेगळे असतात. त्यामुळे स्त्रीमनाचा योग्य ठाव स्त्रीच घेऊ शकते हे त्यांचे मत योग्य वाटते. एक स्त्री या नात्याने स्त्रीमनावरचा पेच लेखिकेने नेमकेपणाने ओळखला आहे. स्वतःच्या कुटुंबातील तसेच त्यांना भेटलेल्या स्त्रियांच्या व्यथा वेदना जाणून घेताना स्त्रीची मानसिकता लेखिकेने नेमकेपणाने हेरली आहे. स्त्रीजीवन चित्रित करण्यामागे लेखिकेचे दडलेले संस्कारित मन, त्यांचे अभिजात व्यक्तिमत्त्व आपल्याला जाणवत राहते. चांगल्या वाईटाची पारक त्यांना नेमकी होती. त्यामुळे त्या इतक्या तिव्रतेने आणि नेमकेपणाने तत्कालीन समाजातील स्त्री जीवनविषयक लेखन करू शकल्या. त्यांच्या स्त्रीविषयक लेखनाने स्त्रीवादी चळवळीची भूमिका घेतली नसली तरी त्यांच्या मनाला स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची जाण होती; हे त्यांच्या या लेखनातून दिसून येते. या लेखनातून लेखिका अप्रत्यक्षपणे स्त्रीपुरुष समानतेची मागणी करताना दिसतात. समाजाने स्त्रीला मान सन्मान दिला पाहिजे असेच जणू त्यांच्या लेखनातून त्या सूचवत आहे. त्यांच्या स्त्रीविषयक लेखनात

कुठेच आक्रोश दिसत नाही. अतिशय शांत चित्तवृत्तीने हे लेखन झाले असून वास्तव आणि संयमी स्वरूप या लेखनाला लाभले आहे.

साहित्य हा लेखिकेचा आवडता विषय होता. अगदी बालवयातच त्यांनी वाचनाला सुरुवात केली होती. त्यामुळे साहित्याची जाण त्यांना होती. त्यांनी अनेक साहित्यिकांच्या साहित्यकृतीचा सूक्ष्मपणे आस्वाद घेतला होता. त्या साहित्यिकांच्या साहित्यकृतीचा सखोल परामर्श या लेखनात घेतलेला दिसून येतो.

त्यांनी आपल्या लेखनातून साहित्याचे श्रेष्ठत्व उलगडले आहे. 'नवनीत' विषयी थोडेसे', प्रस्तावना, 'सुगी'चे दिवस', 'ज्ञानेश्वरीः माझी माझ्यापुरती', 'काही पसायदाने' या सारख्या लेखातून त्यांनी वाचलेल्या साहित्यकृतीचे विशेष, वेगळेपण, नावीन्य नेमकेपणाने दाखवून दिले आहे. एवढेच नाही तर साहित्यकृतीचे मूल्यमापन करून त्या साहित्यकृतीचे गुण दोषही दाखवून दिले आहे. काही लेख त्यांच्या आवडत्या कवींवर त्या कवींच्या कवितांवर लिहिले गेले आहेत. शिवाय वेगवेगळया साहित्यकृतीत एकसारखा आशयविषय असलेल्या त्या साहित्यकृतींवरही लेख अवतरले आहे. याचे उदाहरण म्हणून 'तीन चुंबने!' या लेखाचा उल्लेख येथे करता येतो. 'तीन चुंबने' या लेखात लेखिकेने मराठी साहित्यात सापडलेल्या तीन चुंबनांची नोंद घेतली आहेत. पहिले 'मोरोपंताच्या 'आर्याभारता'तील महादेवाने श्री गणेशाच्या बालमुखाचे घेतलेले चुंबन. दुसरे बालकवींच्या 'फुलराणी' कवितेत सापडलेले चुंबन आणि तिसरे चुंबन म्हणजे त्यांना चिंतामण गणेश भानू यांच्या 'शृंगेरीची लक्ष्मी' या जुन्या कादंबरीत सापडलेले. या कादंबरीत नायक लक्ष्मण सराफ यांनी आपला मित्र मोरोबा यांच्या सोळा वर्षाच्या बहिणीचे तिला धीर देण्यासाठी चुंबन घेतले होते. या तिन्ही चुंबनात त्यांना वात्सल्य दिसते.

बालवयात वाचनात आलेल्या अनेक शब्दांचा अर्थ शोधण्याचा प्रयत्नही लेखिकेने या प्रकारच्या लेखनातून केलेला दिसून येतो. त्या शब्दांचे उगम, विविध अर्थछटा याचा शोध त्यांनी या लेखनातून नेमकेपणाने घेतला आहे. अशावेळी त्यांच्या तीव्र स्मरणशक्तीचे दर्शन होते.

कलावंताच्या निर्मितीप्रक्रियेविषयी लिहित असताना लेखिका त्या कलावंताच्या निर्मितीप्रक्रियेचे विविध पैलू शोधून ते त्यांच्या व इतरांच्या दृष्टिकोणातून व्यक्त करताना दिसतात. शिवाय

त्यांचे काही लेख कलावंत आणि त्यांची कलाकृती, कलावंत आणि नीती, कलावंत आणि समाज यामध्ये निर्माण होणाऱ्या गुंतागुतीच्या संबंधातून निर्माण होणाऱ्या समस्यांवर आधारित आहे. 'अहंकार, हीनगंड', 'जाणिवेची मक्षिका' अशासारखे लेख याचे उदाहरण म्हणून सांगता येई ल.

साहित्यविषयक लेखांमध्ये लेखिकेने स्पष्टीकरणासाठी संदर्भ म्हणून कवितेच्या ओळी घेतल्या आहे. लेखात वेगवेगळया कवितेच्या ओळी घेऊन त्यातील आस्वादक दृष्टया अर्थ स्पष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसत आहे. साहित्यिकांच्या निर्मितीप्रक्रियेविषयी लिहित असताना त्यांनी विविध लेखकांची, समीक्षकांची मते मांडली आहे. त्याचबरोबर म्हणी, वाक्प्रचार यांचाही योग्यरीतीने वापर केला आहे. प्रगल्भ भाषेत हे लेखन झाले असून या लेखनातून विविध साहित्यिकांची, साहित्यकृतींची, शब्दांची ओळख होत आहे.

लेखिकेचे 'हर्शी पार्क' आणि 'मोनालिसाः न भेटलेली, भेटलेली' असे केवळ दोनच लेख प्रवासवर्णनपर आहे. स्मृतीरूपाने राहिलेल्या परदेशगमनात आस्वादलेल्या प्रत्येक लहान मोठया क्षणांनी येथे शब्दरूप घेतले आहे. या लेखनात स्थळवर्णने व लेखिकेचे अनूभव घेतलेले व्यक्तिमत्त्व सारख्याच प्रमाणात दिसत आहे.

'हर्शी पार्क' या लेखात त्यांनी अमेरिकेत मिळणाऱ्या हर्शी चॉक्लेट टाऊन या ठिकाणाचे मनोज्ञ वर्णन केले आहे. तिथे मिळणारी रूचकर चॉक्लेट तसेच तिथे पाहण्यात आलेल्या करमणूकीच्या साधनांचे वर्णन करताना त्यांचा आत्मसंतोष त्यांच्या प्रत्येक वर्णनातून दिसून येतो. या लेखातील चॉक्लेटची वर्णने रसाळ झाली असून चॉक्लेट टाऊनचे प्रत्येक वर्णन तपशीलाने रेखाटले गेले आहे.

फ्रान्सची राजधानी पॅरिस या शहरामध्ये गेल्या असत्या जे अनुभव त्यांना आले ते अनुभव त्यांनी 'मोनालिसाः न भेटलेली, भेटलेली' या लेखात व्यक्त केले आहे. संपामुळे तेथिल इच्छित स्थळे त्या पाहू शकल्या नाही. त्यामुळे या लेखात निराशेच्या भावनांनी शब्दरूप घेतलेले दिसून येते. मात्र यामुळे हे प्रवासवर्णनपर लेखन रूक्ष वाटत असून पूर्णतया वाचकांना समाधान देऊ शकत नाही.

व्यक्ती हा समाजातून घडत असतो. याविषयी दुर्गा भागवत लिहितात, "सामान्यतः व्यक्तिस्वभाव फारसा न्यारा नसतोच. न्यारे असते व्यक्तिमत्त्वाचे अनुभवविश्व, अनुभवाच्या क्रिया, प्रक्रिया व प्रतिक्रियांनी व्यक्तीजीवन सकस किंवा निकस बनते. त्याला रंगरूप प्राप्त होते."[२] माणसाच्या अवतीभवती माणसाने भरलेला समाज वावरत असतो. त्या समाजातील आजूबाजूच्या माणसाचे त्यांच्यापासून आलेल्या अनुभवांचे जे संस्कार व्यक्तीवर होत असतात. त्यातून त्यांचे व्यक्तित्त्व निर्माण होते. अशी अनेक माणसे अनेकांना भेटलेली असतात. परंतु त्यांना शब्दांच्या सहाय्याने जीवंत करण्याचे कार्य एखादा लेखकच करताना दिसून येतो. साहित्यातील व्यक्तिचित्रण या प्रकाराद्वारे हे कार्य केले जाते. एखाद्या माणसाचे बाहयस्वरूप म्हणजेच शरीरवर्णन तसेच त्या माणसाचे अंतरंग म्हणजे स्वभाव, विचार, दृष्टी, सवयी, त्यांच्या जीवनातील यश अपयश, समाज जीवनातील कार्यकर्तृत्त्व या सर्वांचा आलेख ज्या लेखनात आलेला असतो त्या लेखनाला व्यक्तिचित्रण असे संबोधले जाते. अशाच पद्धतीचे व्यक्तिचित्रणपर लेखन शान्ता शेळके यांनीही केलेले दिसून येते.

कुटुंबातील माणसांची, गुरुवर्याचे, प्रकाशकाचे, साहित्य क्षेत्रातील, संगीत क्षेत्रातील तसेच चित्रपट क्षेत्रातील अशा वेगवेगळया क्षेत्रातील एकंदरीत एकोणीस व्यक्तींची चित्रणे लेखिकेने 'वडीलधारी माणसे' व 'नक्षत्रचित्रे' या दोन स्वतंत्र पुस्तकात रेखाटली आहे.

लेखिकेला त्यांच्या जीवनात ज्या ज्या माणसांचा दीर्घकाळ सहवास लाभला, ज्या माणसांनी त्यांच्याशी जिव्हाळयाची, प्रेमाची, आपुलकीची भावना ठेवली अशा माणसांच्या अंर्तबाह्यचा साध्या अलंकृत शैलीत त्यांनी वेध घेतलेला दिसतो. या लेखांतील भाषेचा ताजेपणा व निरीक्षणातील नेमकेपणामुळे वाचक या लेखनात सहज रमून जातो.

लेखिका माणसाकडे एका अदम्य कुतुहलाने पाहताना दिसतात. शान्ता शेळकेंविषयी अरुणा ढेरे लिहितात, "शांताबाईजवळ एकूणच माणसांविषयीच मोठं जिवंत कुतूहल होतं. माणसांच हसणं बोलणं, राहणं वागणं, त्याचे घर, त्याचं कुटुंब सगळया गोष्टी त्यांच्या कुतूहलाचा विषय असत. साध्या सामान्य माणसांना त्या भेटल्या तरी त्याच्यांजवळच्या एखाद्या लहानशा गोष्टीची किंवा त्यांच्या घरातल्या लहानशा वस्तूचीही कुतूहलानं त्या चौकशी करत मन मोकळी दाद देत नातेसंबंधामधला गोडवा किंवा जिव्हाळा त्यांना फार आनंददायी वाटे." (नक्षत्रचित्रे, पृ. ७,८) अरुणा ढेरे यांनी प्रस्तुत लेखिकेविषयी मांडलेली निरीक्षणे अचूक असल्याची साक्ष

लेखिकेच्या व्यक्तिचित्रणातून पटते. त्यांच्या मनात माणसांविषयी जिव्हाळा होता. माणसांना जाणून घेण्याची उत्सुक्ता होती. माणसांचे बोलणे, त्यांचा स्वभाव, त्यांची घरे, कुटुंबाविषयी माहिती त्यांच्या व्यक्तिचित्रणात तपशीलाने आली आहे. लेखिका व त्या रेखाटलेल्या व्यक्तींच्या नात्यातील गोडवा, त्या माणसांविषयीचा जिव्हाळा अलगद व्यक्तिचित्रणात उतरलेला दिसून येतो.

त्यांच्या लेखांमध्ये व्यक्तींची चित्रमय स्वरूपाची शरीरवर्णने आली आहे. त्यांच्या आईविषयी सांगताना त्या लिहितात, "वहिनी गोरी, नाकेली, नाजूक बांध्याची आणि अशक्त प्रकृतीची. डोक्यावरुन आबदार घेतलेला पदर, रूंद कपाळावर रेखलेले मोठे आडवे कुंकू बालिश चेहरा, हसरे उल्लासित डोळे अशी." (वडीलधारी माणसे, पृ. ९) अशा त्यांच्या चित्रमय शरीरवर्ण नातून त्यांच्या आईचे मुर्तीमंत रूप वाचकांच्या डोळयासमोर उभे राहते.

सुधीर फडके, लता मंगेशकर, अशा भोसले, हृदयनाथ, दुर्गा भागवत इ. माणसांबद्दल लोकांच्या मनातील गैरसमज लेखिका स्वतःची मते नोंदवून दूर करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. उदाहरणात दुर्गा भागवताबद्दल लिहितात, "सौजन्याबद्दल दुर्गाबाई तशा प्रसिद्ध नाहीत. त्यांचे रागद्वेष तीव्र आहेत. बोलण्यात फटकळपणाच्या सीमेला भिडणारा परखडपणा आहे. मनात असेल ते ताडदिशी तोंडावर सांगून टाकण्याची हिमंत आहे. पण त्यांच्या या स्वभावविशेषांची झळ मला कधीच पोहचलेली नाही. इतरांच्या लेखी उग्र असलेले हे दैवत मला सतत पावलेले आहे."(वडीलधारी माणसे, पृ. ११३) दुर्गाबाईंचे रागव्देष तीव्र असल्याने मनातील झटकन बोलण्याची हिंमत दुर्गाबाईंकडे होती. परंतु 'इतरांच्या मते उग्र असलेल्या दुर्गाबाईच्या स्वभावाची झळ आपल्याला कधी लागली नाही' हे सांगून 'आपल्याला त्या सतत पावल्या' असे दुर्गाबाईंबद्दल आदरार्थी आणि अभिमानास्पद उद्‌गार लेखिका काढताना दिसतात. दुर्गाबाई सौजन्याबद्दल फार प्रसिद्ध नव्हत्या याचे कारण म्हणजे माणसांपेक्षा सत्याला अधिक भाव देण्याची त्यांची वृत्ती. मात्र लेखिकेला त्यांच्या अनुभवातून दुर्गाबाई सौजन्यशील वाटल्या असेच त्यांच्या बोलण्यातून निदर्शनास येते.

कोठावळे, हृदयनाथ, लता मंगेशकर, कुसुमाग्रज, आचार्य अत्रे अशासारख्या कर्तृत्वान व्यक्तींच्या कार्याचा आढावा त्यांनी भक्तिभावाने घेतला असून एकंदरीत रसाळ शब्दरचना येथे दिसत आहे.

विद्यार्थी दशेत किंवा नोकरी करत असताना ज्या व्यक्तींनी, अनुभवांनी त्यांच्या मनावर संस्कार केले, त्यांच्या आयुष्याला चांगली दिशा दिली याविषयी लेखिका कृतज्ञतेचे भाव प्रकट करताना दिसतात. 'गुरुवर्य माटे' या लेखात लेखिका माटयांच्या ऋणाबद्दल लिहितात, "सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी मला जातीयतेकडे बघण्याचा एक स्वच्छ, निर्मळ दृष्टिकोन दिला. मी ब्राहमणेतर समाजातली आहे, हे त्यांना माहित होते. माझे त्यांना कौतुकही वाटे. पण ते जादा कौतुक नव्हते. त्यामुळे मागासलेल्या वर्गातल्या माणसांत जो एक लाडावलेपणा, एक विचित्र आणि उफराटा अहंगड निर्माण होतो तो माटयांच्या या वागणुकीमुळे माझ्यात कधी निर्माण झाला नाही. हे त्यांचे ऋण केवढे मोठे आहे ते आज मला उमगते." (वडीलधारी माणसे, पृ. २७) ही वाक्ये लेखिकेच्या कृतज्ञ भावनेची साक्ष पटवणारी आहे.

लेखिकेचे व्यक्तिमत्त्व त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रणातून स्पष्ट जाणवत राहते. माणसांबद्दल त्यांना अपार कुतूहल होते. नैसर्गिक वाटणारी व्यक्तिचित्रे रेखाटण्यामागे त्यांची माणसांशी मनसोक्त संवाद साधण्याची वृत्ती दिसून येते. मनसोक्त बोलण्यातून त्यांनी माणसांशी स्नेह जोडला आणि त्यांना जवळून जाणून घेतले. याला अनुभवातून पुष्टी देणारे अरुणा ढेरे यांचे मत उपयोगी ठरते. माणसांशी आपुलकीने संवाद साधण्याची लेखिकेची प्रवृत्तीविषयी सांगताना अरुणा ढेरे लिहितात, "गप्पा ही शांताबाईच्या घरात तयार होणारी सर्वात सुंदर गोष्ट, इतक्या रसरशीत, ताज्या आणि रसाळ गप्पा रूचिर आणि रंगीन गप्पा! त्यांच्या घराला ते वेडच आहे."[३] शान्ता शेळके यांना स्वतःला भेटलेल्या माणसांशी बोलण्यात, त्यांना कुतूहलाने जाणून घेण्यात रस असल्याने त्यांना आवडलेल्या प्रत्येक माणसांशी सुरेख गप्पा मारण्यात त्या गढून जात असे. ढेरे यांनी त्यांच्याबद्दल मांडलेल्या मताची साक्ष देणारी त्यांची व्यक्तिचित्रणे झाली आहे. त्यांच्या प्रत्येक लेखात व्यक्तींशी केलेल्या गप्पा संवाद रूपात आल्या आहेत. उदाहरणात कुसुमाग्रजांचे व स्वतःचे संभाषण त्यांनी 'आठवणींतले कुसुमाग्रज' या लेखात दिले आहे. त्या लिहितात, "कुठे आला आहे हा शब्द? त्यांनी विचारले. "ना. धों. ताम्हणकरांचा 'दाजी' आठवत असेल तुम्हांला," मी म्हटले. "हा दाजी एकदा आपले मृत्युपत्र लिहून ठेवतो. पण त्यासाठी त्याने इच्छापत्र हा प्रतिशब्द वापरला आहे." "अरे वा! कुसुमाग्रज म्हणाले. "मग तेव्हाच हा शब्द रूढ व्हायला हवा होता!" (नक्षत्रचित्रे, पृ. ३९) असे मनमोकळया निवांत गप्पा लेखात आविष्कृत झाल्या आहेत.

‘वडीलधारी माणसे’ या संग्रहाबद्दल शंकर सारडा म्हणतात, “आशा भोसले, लता मंगेशकर आणि हृदयनाथ मंगेशकर या तिघांवरचे लेख हे या संग्रहाचे खरे वैभव. मंगेशकर भावंडाबद्दल मराठी माणसाला विलक्षण प्रेम आहे तसेच कुतूहलही! शांताबाईंचे त्यांच्याशी घरगुती संबंध. त्यामुळे त्यांच्याकडून खास आतल्या गोटातली माहिती मिळावी ही अपेक्षा आणि शांताबाई या लेखातून ती पूर्णही होते.

शांताबाईचा भावजीवनात दीर्घकाळ स्थिरावलेल्या हया व्यक्तिरेखा त्या त्या व्यक्ती इतक्याच शांताबाईचा रसिक, सौशिक, गुणग्राही व्यक्तिमत्त्वाची ही झलक त्यातून प्रकट होते.

वडीलधारी माणसे’ मधील ‘वडीलधारी’ हा शब्द यातील काही व्यक्तिंना लागू होणार नाही कदाचित; परंतु शांताबाईंच्या आप्त परिवाराशी होणारी आपली ही जान पहचान केवळ वरवरची न राहता हृदयाच्या अंतर्हृदयाचा ठाव घेऊन जाते हे निःसंशय!”[४] मंगेशकर कुटुंबातील व्यक्तींशी लेखिकेचा जवळचा संबंध होता. त्यामुळे त्यांच्याबद्दल लेखात खास माहिती आली आहे. हे सारडा यांचे मत योग्य ठरते. कारण लेखात जागो जागी त्यांचे व्यक्तींशी असलेले जिव्हाळयाचे, घरगुती संबंध प्रकर्शाने जाणवत आहे.

विविध क्षेत्रांतील अनेक दिग्गज व्यक्तींशी त्यांचा घट्ट ऋणानुबंध जुळला होता. त्या माणसांना लेखिकेने ‘वडीलधारी माणसे’ या पुस्तकात शब्दांच्या सहाय्याने जिवंत केले. त्यांना विशेष आवडणाऱ्या माणसांची सतत आठवण राहिल, त्यांच्यातला प्रेमाचा धागा सतत टवटवीत राहिल यासाठी त्यांनी व्यक्तिचित्रणात्मक पुस्तके लिहिली आहे. त्यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रणातून त्या माणसांच्या उणीवा किंवा त्यांच्यातील दोषांचे वर्णन अल्प प्रमाणात झाले असून त्या व्यक्तींच्या गुणांचे विश्लेषण अधिक प्रमाणात झालेले दिसून येते.

लेखिकेने रसिक, आस्वादक दृष्टीने व्यक्तींना टिपले आहे. ‘वडीलधारी माणसे’ आणि ‘नक्षत्रचित्रे’ या त्यांच्या दोन्ही संग्रहातील व्यक्तिचित्रणांमध्ये वाचकांना प्रत्यक्ष भेटल्याचा आनंद देण्याची क्षमता आहे.

लेखिकेच्या अनेक  लेखांनी चिंतनाची पातळी गाठली आहे. एखादा विचार घेऊन त्या विषयासंदर्भात सर्वोपरि सखोल अभ्यास करून त्यांनी त्यावर आपले मौल्यवान विचार मांडले आहेत. त्यांचे अनुभवविश्व विस्तृत व सखोल आहे. त्यामुळे स्वतःला आलेल्या अनुभवांतून

विविध विषयांवर त्या भाष्य करताना दिसतात. कोणत्याही प्रसंगावर उलट सुलट चिंतन करून त्यांनी स्वतःचे विचार, मते मांडली आहे.

डॉ. आनंद यादव म्हणतात, "ललित गद्य विकसनशील राहायचे असेल तर 'मी' चे व्यक्तिमत्त्व हे अनेक अंगांनी समाजजीवनाशी प्रत्यक्षाच्या पातळीवर भिडणे आवश्यक असते. तरच ते सतत नव्या विषयवस्तूही त्याला प्राप्त होत जातील."[५] साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. कारण समाजात जे काही घडते त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले दिसून येते. साहित्य लिहिणारा लेखक समाजाचा एक घटक असल्याकारणाने त्याच्या अवतीभवती घडणाऱ्या घटना प्रसंगाचे प्रतिबिंब साहित्यात येणे साहजिकआहे. त्यामुळे अगोदर लेखकाचे व्यक्तिमत्त्व समाजजीवनाशी प्रत्यक्षाच्या पातळीवर भिडणे गरजेचे आहे तरच लेखक समाजातील वास्तव, समाजातील विषयांवर लेखन करू शकतो. डॉ आनंद यादवांच्या वरील मताला अनुसरून शान्ता शेळके यांचे लेखन आहे. समाजातील अनेक विषयांवर त्यांनी भाष्य केले आहे. समाजातील स्त्रीजीवन, नाते संबंध, मानवी स्वभाव असे विविध प्रश्न त्यांच्या मनाला अस्वस्थ करून सोडतात. आणि त्यातून त्यांची विचार प्रक्रिया सुरू होते. अशा अनेक विषयांवर त्यांनी चिंतनाच्या साहाय्याने विचारमंथन केलेले दिसून येते.

'जीवनाविषयी थोडेसे', खुंटया ईगो टांगण्यासाठी' अशासारख्या लेखातून त्यांचा मानवी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट दिसून येतो. मानवी स्वभाव, मानवी भावभावनांना स्पर्श करणारे त्यांचे लेखन असल्याने त्यावर त्यांचे चिंतन सुरू होते व त्यातूनच जीवनविषयक विचारही व्यक्त होत जातात. माणूस हा विचारी प्राणी आहे. बऱ्यावाईटाची समज त्याला आहे. परंतु काही माणसे आयुष्य जगत असताना कालबाह्य झालेल्या, निरुपयोगी गोष्टी कायम बरोबर बाळगून असतात. कुणी किरकोळ यशाचे सतत कौतुक करतात तर कधी एखाद्या जुन्या अपमानाची जखम मनात कायम ठेवून जगतात. कुणी आयुष्यात आलेल्या शत्रूवर डूक धरुन राहतात, कुणी तरुणवयात झालेल्या मनोभंगाचे भांडवल करुन इतरांकडून जन्मभर सहानभूतीया जोगवा मागत फिरतात. म्हणजेच निरुपयोगी गोष्टीला कवटाळून बसतात. त्या निरुपयोगी गोष्टी झाकून टाकण्याचे शहाणपण त्या माणसांकडे दिसत नाही. याविषयी लेखिका खंत व्यक्त करतात. लेखिका लिहितात, "आयुष्याचा जो भाग निर्जीव झाला आहे तो स्वतःच स्वतःवर शस्त्रक्रिया करुन तोडून टाकायला हवा, हे त्याना का कळत नाही" (आतला

आनंद, पृ. ३८) वर्तमानात सुखी जीवन जगायचे असेल तर भूतकाळात जे वाईट घडलेले आहे ते विसरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जीवन जगत असताना माणसाने भूतकाळातल्या आठवणीनी रडत न बसता वर्तमानकाळात कसे प्रफुल्लीत होऊन जगावे हे लेखिकेने पटवून दिले आहे. त्यांचे लेखन वाचकांना अंतर्मुख करून मांडलेल्या विषयावर विचार करायला लावणारे आहे. मानवी मनामध्ये सुधारणा किंवा बदल घडवणारे लेखन त्यांच्या हातून झालेले दिसते.

प्रस्तुत लेखिकेने जीवनाविषयी मार्गदर्शन, शिक्षण देणारे लेखन केले आहे. त्यांच्या लेखनात अनुभवांच्या अनुषंगाने चिंतन व चिंतनाच्याबरोबरीने वैचारिकताही येताना दिसते. ही वैचारिकता अनुभवांची नेमके सुत्र पकडून काव्यात्मकतेबरोबर आल्यामुळे लेखनातील लालित्याला मारक ठरताना दिसत नाही.

## २.४.२ आत्माविष्कार

लेखिकेच्या लेखनात त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि आशय यांचे एकरूपत्त्व झालेले आहे. त्यांनी स्वतःच्या आयुष्यात पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टींना स्पर्श करत स्वतःला व्यक्त केले आहे. त्यांच्या लेखनातून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. त्यांच्या लेखनाला वास्तवाची आधारभूमी आहे. याचे उदाहरण म्हणून त्यांनी लिहिलेला 'मांजर आणि मी' घेता येईल. त्यांना माजंराविषयी फार आकर्षण होते. माजंराना बघितल्यावर त्यांना विलक्षण आनंद होत असे. ही गोष्ट त्यांच्या 'मांजरे आणि मी' या लेखात सहा सात वर्षाच्या असतानाच्या माजंराविषयीच्या मांडलेल्या आठवणीतून स्पष्ट होते. नाशिकजिल्हातील नांदगाव येथे राहत असताना त्यांच्याकडे एक मांजर होते. त्या मांजराशी त्यांची चांगली दोस्ती जमली होती. लेखिका त्यांचे अतिशय लाड कौतुक करत असत. एक दिवस लाडाच्या भरात लेखिकेने त्या मांजराच्या गळयात आपली सोन्याची साखळी घातली आणि त्याचे ते मखमली रूप पाहत असताना ते एकाएकी कुठे पसार झाले. त्यानंतर एकदम त्यांच्या मनात आपली साखळी गेल्याची आठवण झाली. अशा निष्पाप बालवयात घडलेली गोष्ट त्यांच्या लेखाचा विषय बनली आहे. या मांजराविषयीच्या आठवणीतून त्यांचा मांजराविषयीचा विशेष प्रेम, आवड

लक्षात येते. माणसांवरच नव्हे तर मुक्या प्राण्यावर प्रेम करणारं त्यांच व्यक्तिमत्त्व येथे दिसून येतं.

### २.४.३ काव्यात्मकता

"ललित कला ही प्रतिभाजन्य कला आहे."[६] असे कांटने प्रतिभा या संकल्पनेला महत्त्व दिले आहे. या प्रतिभेच्या बळावर लेखक साहित्यकृती आकर्षक बनवत असतो. लेखक जेवढा प्रतिभाशाली असतो तेवढेच त्याच्या लेखनाला लालित्य प्राप्त होते. लालित्य हा ललित साहित्याचा एक महत्त्वाचा गुणविशेष आहे. एखादी गोष्ट सुंदर करून आकर्षक शैलीत मांडणे हे ललित लेखनाचे एक महत्त्वाचे वैशिष्टय सांगता येतील. शब्दअलंकार तसेच अर्था अलंकरामुळे त्या शब्दांना किंवा त्या भाषेला एक तऱ्हेचा नाद, सूर, ताल प्राप्त होतो. लेखिकेच्या लेखनाला काव्यात्मकता प्राप्त झाली आहे. माणसाने कसे जगावे याविषयी सांगताना त्या लिहितात, "माणसाने आनंदाने उचबंळून यावे. दुःखाने व्याकूळ व्हावे आशेने प्रफुल्ल व्हावे. निराशेने खचून जावे थोडक्यात म्हणजे माणसाने आपले माणसासारखे वागावे आणि माणसासारखे जगावे." (रंगरेषा, पृ. ७७) रडणे, हसणे, व्याकुळ होणे, प्रफुल्लीत होणे हे सगळे भाव माणसाने अनुभवल्याशिवाय माणसाचे जीवन परिपूर्ण होणे शक्य नाही हे लेखिकेने काव्यात्मक शैलीत व्यक्त केले आहे. येथे शब्दालंकार दिसून येतो. वाक्याच्या शेवटी यमक जुळवण्याची कला त्यांच्या ठायी दिसून येते. त्यांच्या वाक्यांना लय ताल प्राप्त झाल्याने लेख वाचताना कविता वाचल्यागत वाटत राहते. "अर्थालंकारांचे आवाहन जसे बुद्धीस, तसेच शब्दालंकाराचे श्रवणेंद्रियास असते. यमक, अनुप्रास इत्यादींनी केवळ चमत्कृतीच निर्माण होते असे नाही; श्रवणसुगम अशा माधुर्याचा परिपोषही त्यांच्याद्वारे होत असतो."[७] नाद, सूर, ताल यांनी व्यापलेल्या शब्दकळेतून केलेले वर्णन लेखनाला काव्यात्मकता प्राप्त करून देते. वेगवेगळया प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त झालेले लयबद्ध वर्णन वाचताना रसिकाला एक वेगळाच आनंद देऊन जाते. वर दिलेल्या उताऱ्यातील त्यांच्या वाक्यांना लय ताल प्राप्त झाल्याने श्रवणसुगम अशा माधुर्याचा परिपोषही त्यातून होताना दिसत आहे.

## २.४.४ चित्रमयता

कोणत्याही गोष्टीचे, व्यक्तीचे, घटना, प्रसंगाचे हुबेहूब, जशास तसे चित्रण करणे लेखकाच्या लेखनाला परिणामकारक बनवत असते. आपण जसे पाहिले तसेच चित्र वाचकांना आपल्या लेखनातून अचूकपणे सविस्तर वर्णन करुन सांगता आले पाहिजे. आपण प्रत्यक्ष तो प्रसंग पाहत आहोत असे जिवंत चित्र वाचकाला साहित्यकृती वाचत असताना जाणवते; म्हणजेच ती साहित्यकृती वाचकाला आनंद देऊन जाते. लेखनात आविष्कृत झालेल्या चित्रमय शैलीमुळे त्या लेखकाचा तसाच त्याच्या लेखनाचा दर्जा आपोआप उंचावत जातो. ही चित्रमयता लेखिकेच्या लेखनातही दिसून येते. 'आनंदाचे झाड' या संग्रहात आगगाडीत भेटलेल्या भीक मागणाऱ्या मुलाचे वर्णन लेखिकेने हुबेहूब केले आहे. लेखिका लिहितात, "अंगाने ते पोरगे अगदी टणक होते. रंग काळा असला, तरी रापलेला नव्हता. त्यावर एक तजेला होता. शरीराच्या मानाने डोके काहीसे मोठे होते. कमरेला मळकी चड्डी आणि सतरा भोके पडलेला गंजिफ्रॉक असा त्याचा पोशाख होता. केसांत खंडीभर धूळ होती पावलावर अनवाणी कळा होती. तरीही ते पोरगे दीनवाणे वाटत नव्हते, त्याच्या पायांत ठामपणा होता. हालचालीत सराईत आत्मविश्वास होता काळयाभोर जांभळांसारख्या डोळयात तल्लख पाणी होते. त्याने आपल्या गळयात साईबाबांचा फोटो लटकवला होता. त्या पोराची भीक मागण्याची तऱ्हाही विलक्षण होती. ते तोंडाने अवाक्षर बोलत नव्हते. काही मागतही नव्हते. ते फक्त गाडीतल्या प्रवाशांसमोर जाऊन उभे रहायचे." (आनंदाचे झाड, पृ. १०८) त्या मुलाचा रंग, चेहऱ्यावरील तजेला, मोठे डोके, मळकी चडडी, फाटलेला पोषाक, केसातील धूळ, चेहऱ्यावरील केवीलवाणे भाव अशा अंतर्बाह्य वर्णनातून लेखिकेने त्या मुलाच्या शांत स्वभावाचे व त्याच्या दारिद्रयाचे चित्रण केले आहे. या मुलाचे चित्र उभे करण्यासाठी लागणारे सर्व तपशीलवार गोष्टी हावभावांसह सूक्ष्मपणे वर्णिल्या आहे. थोडक्यात असे म्हणता येते की लेखिकेने घेतलेला अनुभव बारकाव्यानिशी तिव्रतेने लेखात उतरला आहे.

## २.४.५ चिंतनशीलता

'चिंतनशीलता' हा प्रत्येक साहित्यिकाकडे असणारा महत्त्वाचा गुण आहे. परंतु कोणत्या गोष्टीवर सखोल चिंतन केले आहे; किंवा त्यातून वाचक वर्गाला जीवनविषयक दृष्टी देण्याची क्षमता आहे का? यावर लेखकआणि त्यांच्या साहित्यकृतीचा दर्जा ठरत असतो. साहित्यकृतीत एखाद्या विषयावर केलेले चिंतन वाचकाला अंतर्मुख करत असते. वाचकवर्गाला त्या विषयावर विचार करण्यास भाग पाडत असेल तर ते चिंतन उच्च दर्जाचे आहे असे म्हटले जाते. आपल्याला चिंतनशीलता हा गुण आज सगळयाच साहित्यिकाकडे कमी अधिक प्रमाणात पहायला मिळतो. त्यामुळे शान्ता शेळकेअशा नामवंत लेखिकेकडे तो असणे स्वाभाविकआहे. आपल्या लेखनात त्यांनी कलावंताविषयी चिंतन केलेले दिसून येते. रसिकाला कधी कधी कलावंताच्या खाजगी जीवनाकडे अनुकंपेने बघण्याची सवय असते. खरं तर एखाद्या लेखकाच्या वाईट गोष्टींचा संदर्भ न घेता त्याच्या कलेकडे बघितले पाहिजे. कारण कलावंतसुद्धा माणूस आहे त्यालाही इतर माणसांप्रमाणे सुख दुःखे असतात. तसेच दुसरीकडे निर्मितीची तितकीच प्रबल प्रेरणा त्याला आपल्याकडे खेचत असते. त्यांचे खाजगी आयुष्य असमाधानी बनते. याविषयी लेखिका लिहितात, "निर्मितीची ही प्रचंड शक्ती कलावंताची सर्व ताकद अशी खाऊन टाकते, की त्याचे व्यक्तिगत पातळीवरचे जगणे केवळ नकारात्मक बनते त्यातून एक विचित्र हीनगंड त्याच्या ठायी निर्माण होतो. मग आपल्या त्या नगण्य जीवनावर स्वतःचा अधिकार गाजवण्यासाठी इतरांप्रमाणे आपणही जगत आहेत हे स्वतःला जाणून देण्यासाठी बहुतेक कलावंत व्यसनांचा अवलंब करतात. ते स्वार्थी, निष्ठूर, दुराचारी, विकृत होतात. तो त्यांचा दोष नसतो. दुदैंव असते. थोर कलावंतावर बाळपणापासून नियतीने सर्ज नशीलतेचे एक भंयकर ओझे लादलेले असते. कलावंत या ओझ्याखाली गारद होतात." (एकमानी, पृ. २६) अशा दुदैवी कलावंताच्या जीवनांवर लेखिकेचे चितंन दिसते. वाचक किंवा रसिक कलावंताकडे एक माणूस म्हणून का पाहत नाही हा प्रश्न त्यांना सतावत असलेला दिसतो. त्यांच्या या म्हणण्यात सत्यता असलेली जाणवते. त्यांनी केलेल्या चिंतनातून त्यांचे प्रकट झालेले विचार बोध घेण्यासारखे आहे.

## २.४.६ घटनांचा संदर्भ

लेखिकेच्या ललित निबंध लेखनाला घटनांचा संदर्भ आहे. त्यांच्या जीवनात घडलेल्या घटनांचा, अनुभवांचा, प्रसंगांचा, व्यक्तींचा संदर्भ व त्या सर्वाकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्या लेखनातून व्यक्त होतो आहे. याचे उदाहरण म्हणून त्यांचा 'तोडे' हा लेख सांगता येतो. पारंपरिक स्त्रीचा स्वभाव, वागणे चित्रित करण्यासाठी त्यांनी बालवयातील तोडयांचा प्रसंग सांगितला आहे. त्यांच्या आजोबांनी घरातील चांदीचे दागिने विकून त्यांना नवे तोडे करुन आणले. ते नवे कोरे तोडयांची कड लागून त्यांचे पाय कसे रक्ताळले होते हे सांगून त्यावेळच्या त्यांच्या आजीच्या संवादांचा संदर्भ देऊन पारंपरिक स्त्रीची मानसिकता निदर्श नास आणून दिली आहे.

## २.४.७ व्यासंग

साहित्य ही एक कला आहे. कला दर्जेदार करण्यासाठी त्याला व्यासंगाची जोड देणे अत्यावश्यक असते. लेखिका शान्ता शेळके यांची व्यासंगी वृत्ती त्यांच्या लेखनाद्वारे जाणवते. त्यांना बालवयापासूनच वाचनाची आवड होती. लहानपणात त्यांना विविध प्रकारच्या पुस्तकांची ओळख झालेली दिसते. लेखिका लिहितात, “साहित्याइतके दुसऱ्या कोणत्याही गोष्टीने मला कधी भारुन टाकलेले नाही. बालवयापासून मी शब्दाच्या प्रेमात पडले शब्दांनी नादावून गेले शब्दांशी खेळत राहिले. शब्दांच्या वेडया वाकडया आकृती जुळवीत राहिले. शब्दाच्या नादाने वेडावून जाताजाता अर्थाच्या विशाल परिसरात मी कधी शिरले ते मला आता आठवतही नाही.” (धूळपाटी, पृ. २०४)

लेखिकेच्या वाचनात रामायण महाभारत काव्यापासून संत पंडितांची मराठी काव्ये, आधुनिक काव्ये, लावण्या, पोवाडे, बालपणात घरातील वृद्ध स्त्रियाच्या तोंडून ऐकलेले अभंग, ओव्या, लोकगीते तसेच भारत गौरवमाला ग्रहलक्ष्मी मासिक, किर्लोस्कर मासिकांच्या वाचनाने त्यांच्या शब्दभांडारात भर घातली होती. अशा ओव्या, कविता, गीते यांचे संदर्भ त्यांच्या लेखनात आलेले जाणवतात. त्यांनी संस्कृत, इंग्रजी, हिंदी अशा इतर भाषातील वाङ्मय वाचल्याने त्या वाङ्मयातील संदर्भ त्यांच्या लेखनात आले आहेत. अनेक लेखक, कलावंत, विचारवंत

यांचे विचार त्यांच्या लेखनात येतात. धुळपाटी सारख्या त्यांच्या पुस्तकातून त्यांनी वाचलेल्या, अनुभवलेल्या साहित्यकृतीच्या माहितीतून त्यांच्या अफाट व्यासंगाची साक्ष पटते.

## २.४.८ भाषाशैली

शब्द भांडार, अचूक शब्दांची निवड, लेखन मांडण्याची कला यामधून एखाद्या लेखकाची शैली बनत असते. या शैली संदर्भात लेखक भालचंद्र नेमाडे म्हणतात, "एखाद्या द्रव्याला विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्च्याची पद्धती म्हणजे शैली."[८] प्रत्यके लेखकाची लेखन करण्याची एक स्वतंत्र पद्धत असते. त्या पद्धतीवरून किंवा त्या शैलीवरून त्याच्या साहित्याचा दर्जा ठरत असतो. शान्ता शेळके यांचीही एक विशिष्ट प्रकारची भाषाशैली असलेली दिसून येते. त्यांची भाषाशैली विविधतेने नटलेली आहे.

लेखिका ललित निबंध लेखनात जास्त रमलेल्या जाणवतात. आपले लेखन झाले पाहिजे याच्याकडे त्याचा रोख नाही पण ते लेखन चांगले झाले पाहिजे एवढेच त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या ललित निबंधांची भाषा साधी सरळ, सोपी तशीच ती रसाळ ही झाली आहे. कृत्रिम शब्दरचना त्यांच्या लेखनात दिसत नाही. त्यांची भाषा अर्थपूर्ण आहे. वाचकांना समजेल अशी शब्दरचना त्यांनी केली आहे.

आपल्या ललित लेखनातून लेखिका साध्या सुलभ पण सौंदर्यपूर्णरित्या मानवी जीवनाचे मोठे तत्वज्ञान सागून जातात. सहजता हे त्यांच्या निवेदनशैलीचे वैशिष्टय आहे. त्यांची ओघवती शैली त्यांच्या लेखनाला सौंदर्य प्राप्त करून देताना दिसते. लेखिकेने आपले विचार सखोलरित्या व्यक्त केले त्यामुळे त्यांनी मांडलेल्या अनुभवातील सूक्ष्मता आणि निराळेपणा वाचकांच्या मनाला भावताना दिसतात. त्यांच्या भाषेत कुठेही आक्रोश दिसत नाही. शांत चित्ताने त्यांचे लेखन पुढे सरकते. त्यांची भाषा लालित्याने नटलेली आहे. त्या भाषेला विशेष सौंदर्य लाभून गोडवा निर्माण झाला आहे. असंख्य विषयातून त्यांचे ललित निबंध लेखन बनले आहे. ते विषय त्यांनी लालित्यपूर्ण भाषेत व्यक्त केले आहे.

## विचारगर्भीत वाक्ये

'बालवय हे ओल्या मातीच्या गोळयासारखे असते.'

'जीवीत म्हणजे असंख्य क्षणाचा गुंफलेला एक सुंदर हार आहे!'

अशा सहज वापरलेल्या वाक्यांतून जीवनावश्यक आशय व्यक्त होत असतो. त्यांच्या लेखात विखुरलेल्या अशा वाक्यांतून त्यांच्या जीवनविषयक निरीक्षणाची साक्ष तर पटतेच त्याचबरोबर त्यांच्या निवेदनाला विचारांचे मोल प्राप्त झालेले दिसून येते.

## म्हणी

कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय म्हणीमुळे व्यक्त होत असतो. अशा म्हणींचा वापर लेखिकेने आपल्या लेखनात केलेला दिसतो. उदाहरणात–

'करावे तसे भरावे'

'माय मरो मावशी उरो' अशा सारख्या म्हणींचा वापर करून लेखिकेने लेखांचा आशय परिणामकारकतेने साकार केला आहे.

## संवाद

संवादातून मनुष्य भावभावनांची अभिव्यक्ती होत असते. संवादामुळे त्या व्यक्तीचा स्वभाव, विचार आपल्याला जाणवत राहतो. अशा संवादरूपी भाषेचा वापर लेखिकेने आपल्या लेखनात केला आहे. त्यामुळे लेखातील घटना प्रसंगाला जीवंतपणा प्राप्त झालेला दिसून येतो. लहानपणी लेखिकेच्या घरात त्यांची शेजारीण बाई गप्पा मारायला आली असता त्या बाईने त्यांच्या आईच्या खऱ्या सोन्याला खोटे म्हटल्यामुळे ती बाई निघून गेल्यावर लेखिका त्यांच्या आईला म्हणतात,

'आई, लाखेचे मणी म्हणजे काय, ग?'

‘अग, जास्त सोनं परवडत नसलं, म्हणजे मग लाख नावाच्या पदार्थाचे मणी बनवतात आणि त्यांना वरून नुसता सोन्याचा पातळ पत्रा चढवतात’

‘मग तुझ्या गळयातल्या माळेचे मणी लाखेचे आहेत?’ मी त्या माळेकडे बघत म्हटले संशयी नजरेने बघत म्हटले.

हसत हसत ती म्हणाली, एवढा चेहरा पाडायला काय झालं? अग या माळेचे मणी लाखेचे नाहीत, अगदी निखळ शुद्ध सोन्याचे आहेत ,’

होय ना?’ ‘तर मग तू त्या बाईला स्पष्ट तसं सांगून का टाकलं नाहीस? त्या या मण्यांना लाखेचे मणी म्हणाल्या, ते तु मुकाटयानं ऐकून का घेतलंस?’

‘अग काय करायचं सांगून? आपल्याला निखळ सोनं परवडत नाही, या कल्पनेनं त्यांना जो आनंद झाला, तो खोटा असला, तरी कशासाठी हिरावून घ्यायचा?’ या संवादातून लहान वयातल्या लेखिकेला त्या बाईचा आलेला राग आणि त्यांच्या आईचा समंजसपणा, प्रेमळ उदार स्वभाव व भावना या वरील संवादरूपी वाक्यांतून येथे प्रभावीपणे व्यक्त होताना जाणवतात.

लेखिकेने निर्मिलेल्या साहित्यकृतीत भाषाशैली ही विशेष महत्त्वाची आहे. इतर साहित्यप्रकाराप्रमाणे ‘ललित निबंध’ या साहित्यप्रकारामध्ये भाषाशैलीमुळे आकर्षण निर्माण होऊन, विषय निवेदनात भाषाशैली अधिक महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते. साहित्यातील भाषा आकर्षक, प्रसन्न बनते ती समर्पकअवतरणे वापरल्याने.

निबंधाच्या विषय विस्ताराला चैतन्याचा साज निर्माण करते ती संस्कृत, इंग्रजी इ. इतर भाषांतील समर्पक अवतरणे. पूर्वी चिपळूणकर, टिळक, केळकर सारख्या लेखकांच्या निबंधात अनेक मथळे, श्लोक, अभंग, म्हणी, अर्थपूर्ण वाक्ये येत असे आणि आजही अशी अवतरणे वापरलेली पहायला मिळतात. याची साक्ष म्हणजे शान्ता शेळके यांचे ललित निबंध लेखन. त्यांचे ललित निबंध अभ्यासत असताना त्यांना निवेदन कौशल्याची अप्रतिम देणगी लाभली होती. हे लक्षात येते. स्वतः जवळ असलेल्या भाषिक ज्ञानाचा वापर करून आपले लेखन अधिक वाचनिय करण्याचे कौशल्य लेखिकेजवळ होते हे मान्य करावे लागते.

## कवितेच्या ओळी

लहानपणी आवडणाऱ्या कवींच्या अनेक कवितांचे वाचन लेखिकेने केले होते. त्यावेळी त्यांच्या मनाला भावलेल्या कविता त्यांच्या स्मरणात कायम टिकून राहिल्या त्या कवितांचे उपयोजन त्यांनी आपल्या लेखनात केले आहे. त्यांच्या ललित निबंध लेखनात अनेक कवींच्या कविता आढळून येतात.

कवी माधव जूलियन हे लेखिकेचे सर्वात आवडते कवी होते. माधव जूलियनच्या कविता त्यांनी आवडीने वाचल्या व स्मरणात ठेवल्या होत्या. अशीच एक 'माझा आवडता कवी माधव जूलियन' या लेखात आलेली कविता खाली उदाहरण म्हणून नमूद केली आहे.

'जीव तूझा लोभला माझ्यावरी रे मोहना

या ऋणाची विस्मृती तीना कधी होवो मना'

कवी ग. दि. माडगूळकरांपाशी असलेल्या प्रतिभेचे सामर्थ्य पटवून देण्याकरिता त्यांच्या अनेक कवितांच्या ओळी लेखिकेने उदाहरणादाखल वापरल्या आहे. त्यातली ही खाली दिलेली एक कल्पनारम्य कविता आहे.

'माध्यान्ही भास्कर भूतल न्याहाळी

बघाया तेजाची प्रतिमा कोवळी'

## श्लोक

संस्कृत भाषेवर लेखिकेने विशेष प्रेम केले. पूर्वी कधी वाचलेल्या संस्कृत श्लोकांचा अर्थ वाचकांना समजावून सांगण्याच्या हेतुने लेखिकेने 'एकपानी' या संग्रहात विविध अर्थछटा उलगडणारे अनेक लेख लिहिले आहे. त्यामधील 'रामरक्षा—एकअर्थ' हा एक लेख आहे. या लेखात माधव

जूलियन यांनी आपल्या कवितेत मुलबाळ नसणाऱ्या माणसांची व्यथा व्यक्त करण्यासाठी रामरक्षेतील श्लोकांचा वापर केला आहे. तो श्लोक लेखिकेने उदाहरणादाखल उद्‌धृत केला आहे. तो म्हणजे–

'माता रामो मत्पिता रामचंद्रः

स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः

सर्वस्वंमे रामचंद्रो दयालु

र्नान्यं जाने नैव जाने न जाने'

'हारो नारोपितः कण्ठे मया विरहभीरूणा

रानीमन्तरेजाता सरित्सागर पर्वता'

या श्लोकाच्या अर्थाशी लेखिका काही वर्षापूर्वी वाचलेल्या लावणीतील ओळींचा संबंध जोडताना दिसतात.

## अभंग

संताच्या अभंगात समाजाबद्दल नेहमीच निर्व्याज, निखळ प्रेमभाव दिसून येतो. संत आपल्याहून निराळे आहे. त्यांच्या अवतीभोवतीच्या माणसाने त्यांचा कित्तीही अपमान केला तरी त्यांच्या बरोबर चांगला विचार घेऊन ते फिरत असतात. परंतु आपण माणसे केवळ दुसऱ्याने आपला केलेला अपमान आठवून जिथे जातो तिथे ती आठवण काढत राहतो. संत व साधारण माणसांमधला फरक पटवून देताना लेखिकेने खालील दिलेल्या तुकारामाच्या अभंगाचा आधार घेतला आहे.

'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालविसी हात धरूनिया॥'

'आयुष्य वेंचुनि कुटुंब पोसिलें। काय हित केले सांग बापा॥'

माणसाला स्वतःचे सुख ओळखता आले पाहिजे. आपले खरे सुख कशात आहे हे जाणून घेऊन जीवनाचा गाढा चालवला पाहिजे तरच निर्वाणाच्या वेळी माणसाला पश्चाताप होणार नाही. हे पटवून देण्याकरिता लेखिकेने वरील अभंग उद्‌धृत केलेला आहे.

## वचने

आपल्या संतानी आपल्याला प्रतिकूल परिस्थितीवर मात करायला शिकवले. त्याचबरोबर आपल्याला आपल्याकडे असलेल्या शक्तिचे महत्त्व वचनातून समजावून सांगितले आहे.

'यत्न तो देव जाणावा' हे समर्थ रामदासानी सांगितलेले वचन कष्टाचे महत्त्व सांगण्याकरिता लेखिकेने लेखनात वापरले आहे.

संतानी व्यवहार शिकवण दिली असतानादेखील माणूस खोटे बोलण्याचे टाळत नाही. हे खोटे बोलण्यामागचे कारण सांगताना लेखिकेने 'आपण खोटे का बोलतो?' या लेखात 'बरें सत्य बोला, तथा तथा चाला' असे वचन वापरले आहे.

## ओव्या

वाचनात आलेल्या शब्दांचा अर्थ शोधण्याचा नाद लेखिकेला होता. त्यामुळे कधीकाळी वाचनात आलेल्या शब्दांना गाठीला बांधून ठेवून त्या शब्दांचा अर्थ समजेपर्यंत शोध घेणे त्या आत्मीयतेने करत होत्या. असा 'आभाळ' या शब्दाचा अर्थ शोधत असताना मुक्तेश्वरांचे 'वनपर्व ' यामधील ओवीतून आभाळाचा अर्थ त्यांना नेमकेपणाने गवसला हे सांगण्याकरिता

'अभाग्य भाग्याची आभाळे | येती अपुल्या काळे|

परि निश्चयाच्या ध्रुवे अचळे | चळत्व सर्वथा न पाहिजे ||' या ओवीचा वापर 'शब्दांच्या सावल्या' या लेखात केला आहे.

काही कल्पनांचे पडसाद आपल्याला निरनिराळया साहित्यकृतीत उमटलेले दिसून येतात. हे पटवून देण्याकरिता लेखिकेने 'पडसाद' हा लेख लिहिला आहे. या लेखात कालिदासाच्या

काव्यातील विरह अवस्थेच्या दुःखाचा जशास तसा पडसाद एका बाईच्या पारंपरिक ओव्यात सापडल्याने लेखिकेला नवल वाटते.

'मातिये मढले । मांडिये चढले

मातेने मानिले । मोक्षसुख ॥' ही आवी लेखिकेने उदाहरणादाखल दिलेली आहे.

## गीते

बालवयात घरात वडिलधाऱ्या माणसांकडून ऐकलेली गीते लेखिकेच्या ललित लेखनात उतरल्याने त्यांच्या लेखातील आशयाला वजन प्राप्त झाले आहे.

'बानु चालगंसा चाल गं सारंग्या बाजारी

तिथं उतरला उतरला जेजुरीचा वाणी

त्यानं आणील्या आणील्या साखरेच्या गोळी'

'बाई माझे लाडके सीताबाई

बाळपणाचे कौतुक वदू कायी? तुझे जेव्हा मी पाहतसे मूख

काय मजला तैं होय वदू सूख!' अशा सारखी गीते उदाहरण म्हणून घेता येईल.

## प्रतिमा प्रतिके

लेखिकेने आपल्या लेखात प्रतिमा प्रतिके वापरली आहेत. 'डोळे या मानवी अन्तःकरणाच्या खिडक्या आहेत.', 'मदिरेच्या प्याल्यात दुःख बुडवू पाहणे काय आणि तत्वज्ञानाचे जाड उबदार कांबळे अंगाला लपेटून दुःखाचे दंश चुकवणे काय, दोन्ही गोष्टींतल्या पलायन वादाचे स्वरूप सारखेच आहे.' अशा सारख्या प्रतिमा प्रतिमांच्या वापरामुळे त्यांच्या भाषेला सौंदर्य लाभले आहे. आपले म्हणणे पटवून देण्याकरिता लेखिका प्रतिमांच्या भाषेत बोलताना दिसतात.

शान्ता शेळके यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष सांगताना त्यांच्या लेखनाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरीत त्यांच्या भाषेला सौंदर्य प्राप्त होऊन ही भाषा निबंध लेखनाला पोषक ठरली आहे.

## २.५ शांता शेळके यांच्या लेखनाचे वेगळेपण

शान्ता शेळके यांच्या लेखनात वास्तव स्वरूपाचे अनुभव आठवणीं आल्या आहेत. लेखिकेने विविध विषयांवर लेखन केलेले दिसून येते. त्यांच्या लेखनाविषयी पुरूषौत्तम धाक्रस म्हणतात, “त्यांचे जे ललित गद्य त्यांच्या या निवडक साहित्यात घेतले आहे ते पाहिले की शांताबाई साहित्याच्या अथांग सागरात बुडया मारून काय काय रत्ने बाहेर काढीत असतात याचा अचंबा वाटतो.”[९]

लेखिकेचे व्यक्तिमत्त्व सर्वसामान्याहून निराळे आहे. जीवनातील प्रत्येकअनुभवाकडे त्या एका वेगळया नजरेने पाहतात. त्यांचे लेखन जीवनातील अस्सल अनुभवांच्या निमित्ताने होताना दिसते. सर्वसामान्याना अगदी शुद्र वाटण्याजोगे अनुभव त्यांच्या लेखनात इतक्या कलात्मक शैलीने आविष्कृत झाले आहे की त्या अनुभवांचा आस्वाद घेताना वाचक त्यात गुंग होतो.

लेखिकेचे लेखन म्हणजे समृद्ध जीवनाची अभिव्यक्ती आहे. परंपरेच्या दृष्टिकोणातून विचार करायचा झाला तर लेखिकेने सर्वात अधिक लेख लिहिले आहे. ते लेख विविध विषयांवर लिहिले आहेत. त्यांच्या विषयांचे नाते ‘मी’ शी जोडलेले दिसून येते. त्यांचे वैयक्तिकअनुभव, पाहिलेले घटना प्रसंग, दैनंदिन जीवन जगत असताना अवलेकनातून मिळालेले अनुभव, पुस्तकातून मिळालेले अनुभव, सहवासात आलेल्या माणसांच्या आठवणी, अनुभव अशा साऱ्यातून त्यांचे ललित निबंध लेखन बनले आहे. लेखिका ललित निबंध लेखनात वैयक्तिक आठवणी, अनुभव मांडण्यात रमलेल्या दिसतात. त्या आठवणी, अनुभव व्यक्त करण्याची सहजता वाचक मनाला भिडल्या वाचून राहत नाही.

लेखिकेचे स्त्रीविषयकलेखन वाचकमनाला भिडणारे आहे. एक स्त्री असूनही त्यांनी स्वतःचे वैयक्तिक अनुभव मांडले नसले तरी हे लेखन स्त्रीच्या काळजीपोटी आत्यंतिक कळवळयाने

झालेले आहे. परंतु यात कुठेही विद्रोहाची भूमिका दिसत नाही. अतिशय शांत चित्तवृत्तीने झालेले हे लेखन वाचकांना अंतर्मुख करण्यास समर्थ ठरले आहे.

साहित्यविषयक लेखन करत असताना त्यातून त्यांचे साहित्यावरचे प्रेम व साहित्यावरील निष्ठा दिसून येते. आपल्या स्वतंत्र विचारातून, वाङ्मयीन दृष्टीतून मूल्य निकष सांभाळून साहित्यावर भाष्य केल्यामुळे त्यांचे लेखन इतर लेखकांच्या समीक्षात्मक लेखनाहून वेगळे ठरते.

आपल्या विचारांनी वाचकांना नवी जाणीव करून देऊन वाचकांच्या विचारांची कक्षा रूंदावण्याचे काम लेखिकेने केले आहे. चिंतनाचा सखोल पाया असलेले लेखन लेखिकेने केले आहे. त्यांनी निरीक्षणातून मानवी मनाचे बारकावे टिपले आहे. माणसाच्या प्रवृत्तीवर चिंतन करून वाचकालाही त्यावर विचार करायला भाग पाडून त्यातून अनमोल सल्ला देणे, उपदेश करणे, मार्गदर्शन करणे अशी विशेष स्वरूपाची भूमिका लेखिकेने घेतली आहे. लेखिकेने लेखनातून घेतलेला प्रत्येक गोष्टीचा वेध अत्यंत समंजस व संवेदनशील आहे. आपल्या लेखनातून विद्रोहाचे विचार मांडणे किंवा कृत्रिम शब्दरचना करून उगाचंच आपले लेखन काव्यमय बनवणे यात त्यांना रस नाही. आपण काही अनन्य मांडतो याचा आवही आणताना दिसत नाही. आपल्या साध्या व सरळ शब्दरचनेतून सामान्य माणसापर्यंत विचार, जीवनावश्यक तत्त्वज्ञान पोहचवण्याचे कौशल्य लेखिकेपाशी आहे. हेच त्यांच्या लेखनाचे मोठे यश आहे असे म्हणता येते.

ललित निबंध लेखनात लेखकाच्या स्वैर आत्माविष्काराला महत्त्व असते. लेखकाने कोणत्याही विषयावर लेखन केले असले तरी त्या लेखनातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचे अंतरंग जाणवत राहते. मनोहर आळतेकर ललित निबंधाबद्दल लिहितात, “निसर्गदत्त प्रतिभा, स्वतंत्र व संपन्न व्यक्तिमत्त्व, अनुभवांचा अस्सलपणा, बहुश्रुतता या गोष्टी, एका दृष्टीने इतर वाङ्मयप्रकारांपेक्षाही ललित निबंधाला अधिकआवश्यकअसतात.”[१०] हे सर्व गुण शान्ता शेळके यांच्यापाशी होते. त्यांच्या संपूर्ण लेखनातून त्यांच्या अंतरंगाचे दर्शन घडते. भूतकाळात रमणारे, निसर्ग सान्निध्यात रमणारे, मांजरांवर प्रेम करणारे, साहित्यावर अफाट प्रेम करणारे, वाचनाची गोडी असलेले, जीवनाकडे आशावादी दृष्टीने पाहणारे रसिक, बहुश्रुत, प्रतिभावंत,

समृद्ध, उत्साही मनाबरोबरीने आनंददायी जीवन जगलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व लेखनात दिसत आहे.

लेखकेच्या लेखनात व्यक्त झालेल्या अनुभव आठवणी परिचयाच्या वाटतात. त्यामुळे त्यांचे ललित लेखन वाचक मनाला स्पर्श करणारे झाले आहे. अगदी साध्या व सरळ निवेदनातून जीवनावश्यक तत्त्वज्ञान वाचकांच्या गळी उतरवण्याची किमया त्यांच्या ललित लेखनाला वेगळया पातळीवर नेऊन ठेवते. त्यांच्या लेखनामागे त्यांचा व्यासंग आणि बहुश्रृतता असलेली जाणवते. लेखन परिणामकारक बनवण्यासाठी चटकन योग्य ते संदर्भ वापरण्याची कला त्यांच्याकडे होती. त्यांच्याकडे केवळ व्यासंग असता तर एकवेळ त्यांचे लेखन बोजड, कंटाळवाणे झाले असते. परंतु त्यांच्या भावना, कलात्मकता, शब्दयोजना, बहुश्रृतता, व्यासंग, त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन व उदात्त सुसंपन्न व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्या लेखनाला वेगळेच परिणाम लाभले आहे. त्यांचे लेखन येत्या काळाबरोबर प्रवाही व विकासशील आहे असे म्हणण्याजोगे आहे.

१९५० पूर्वी ललित लेखनाचे स्वरूप पाहिलेतर लालित्यपूर्ण भाषेत वाचकांचे मनोरंजन करणे हेच त्याचे स्वरूप होते. परंतु १९५० नंतर हे आत्मपर अधिक मुक्त व लवचिक होऊन चिंतन आणि विचारही त्यात अभिव्यक्त होऊ लागले आहे. आणि अशा बदलांना स्वीकारणाऱ्या लेखिका शान्ता शेळके या १९५० नंतरच्या एक महत्त्वाच्या लेखिका आहे असे म्हणता येतील.

## २.६ निष्कर्ष:

१. आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गवर्णनपर लेख, प्रवासवर्ण नपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशा विविध प्रकारचे लेख लेखिकेने लिहिले आहेत.

२. लेखिकेचे अनुभवविश्व विविधांगी, व्यापक व सखोल आहे. वास्तव स्वरूपाचे अनुभव त्यांच्या लेखनात व्यक्त झाले आहेत.

३. भावुकतेने भूतकाळात रमणे हा लेखिकेचा स्वभावविशेष असून जुन्या स्मृतींना चिकटून राहणारे त्यांचे मन त्यांच्या लेखाद्वारे जाणवते.

४. लेखिकेच्या आत्मपर लेखनात कौटुंबिक जीवनक्षेत्रातील सांस्कृतिक परिसर, तिथले सामाजिक जीवन यांचे सूक्ष्म कथन आले आहे.

५. परिस्थितीला जाणून घेऊन गोष्टींचा स्वीकार करणारे, जिज्ञासू, अभ्यासू तसेच सौंदयप्रेमी, रसिक लेखिकेचे मन आहे याची त्यांच्या ललित लेखनातून अनुभूती येते.

६. नात्यातील माणसे, अन्य ऋणानुबंधी, समवयस्क यांच्याबद्दलच्या लेखनात लेखिकेच्या आवेगी वृत्तीचे दर्शन घडते.

७. माणसाच्या मनाचा शोध घेणे हा लेखिकेच्या लेखांचा विषय बनला आहे. माणसांच्या अंर्तमनाचे सूक्ष्म निरीक्षण त्या अचूकपणे करताना दिसतात.

८. लेखिकेच्या ललित लेखनात काव्यात्मतेबरोबरच वैचारिकता आलेली आहे.

९. विषयवैविद्य हे त्यांच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

१०. लेखिकेने भोवतालच्या स्त्रियांचे दुःख, संघर्षाचे विश्लेषण नेमकेपणाने केलेले आहे. हे लेखन अतिशय शांत वृत्तीने झाले असले तरी लेखिका या लेखनातून स्त्री जीवन सुधारणेची मागणी करताना जाणवतात.

११. सूक्ष्म निरीक्षण, सौंदर्यवेदी दृष्टी, संवेदनशील, रसिक, विचारशील, चिंतनशील वृत्ती, ज्ञानपिपासू वृत्ती, प्रतिभावंत, जिज्ञासू, बहुश्रृत, व्यासंगी ही लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये त्यांच्या ललित निबंधाद्वारे जाणवतात.

१२. लेखिकेचे विद्यार्थी जीवन पुण्यात गेले. तर त्यांची वयाची चाळीस वर्षे नोकरीच्या निमित्ताने त्यांनी मुंबईत घालवली होती. त्यामुळे पुणे व मुंबई शहरातील जीवनाबद्दल, वातावरणाबद्दल त्यांनी आत्मीयतेने लिहिले आहे.

१३. विविध क्षेत्रांतील अनेक माणसांना लेखिकेने शब्दांच्या सहाय्याने जिवंत केले. व्यक्तींच्या अंतरंगाचे दर्शन घडविताना त्या व्यक्तींचे स्वभाव वैशिष्टये व विशिष्ट लकबींवर अधिक भर

देतात. त्यामुळे त्या व्यक्तिरेखा वाचकांच्या नजरेसमोर चित्रमय स्वरूपात उभ्या राहण्यासाठी सबब ठरल्या आहे. त्यांच्या व्यक्तिचित्रणात गुणांचे अधिक विश्लेषण तर दोषांचे मुल्यमापन कमी प्रमाणात झालेले दिसते. संपर्कात आलेल्या माणसांविषयी आलेल्या लहान लहान अनुभवांना लेखिकेने भावस्पर्शी रूप दिलेले जाणवते. चित्रित झालेल्या व्यक्तिंबद्दल कृतज्ञता व आदर लेखनात व्यक्त झाला आहे.

१४. लेखिकेचे साहित्यावर लिहिलेले लेख पाहिले तर त्यांची वाचनाची आवड लक्षात येते. त्यांनी अनेक साहित्यकृतीवर विवेचन केलेले दिसते. तसेच इंग्रजी संस्कृत, हिंदी अशा भाषेतील संदर्भ पाहिल्यावर लेखिकेला या भाषांची नेमकी जाण असलेली जाणवते. त्यांच्या लेखनात अनेक पुस्तकांची नावे आली आहे. यातून त्यांच्या अभ्यासू मनाचेही दर्शन घडते. त्यांनी विविध प्रकारचे विविध भाषेतील साहित्य वाचले आहे. तथा त्यातील आशयाचा विचार विनिमय त्यांच्या लेखात आला आहे. लहानपणी ऐकलेल्या अनेक शब्दांचे अर्थ लावण्याचा प्रयत्न त्यांच्या लेखनातून झाला आहे. एखाद्या साहित्यकृतीचे मूल्यमापन करत असताना स्वतंत्र वाङ्मयीन दृष्टी व समीक्षेचे मूल्य निकष सांभाळून हे लेखन झाले आहे. साहित्यकृतीचे मूल्यमापन करून त्या साहित्यकृतीचे श्रेष्ठत्व, वेगळेपण, विशेष दाखवून देण्याचा लेखिकेचा प्रयत्न आहे.

१५. लेखिकेचे केवळ दोन लेख प्रवासवर्णनपर आहे. त्यांच्या प्रवासवर्णनात प्रवासात उपभोगलेल्या प्रत्येक लहान मोठया क्षणांनी शब्दरूप घेतले आहे. त्यांच्या एका लेखातील वर्णने रसाळ झाली असून ती वर्णने तपशीलाने रेखाटली आहे. काही इच्छित स्थळे त्या पाहू शकल्या नाही. त्यामुळे दुसऱ्या लेखात निराशेचे भाव प्रकट झाले आहे. मात्र यामुळे ते प्रवासवर्णनपर लेखन रूक्ष वाटत असून पूर्णतया वाचकांना समाधान देऊ शकत नाही. एकंदरीत त्यांनी रेखाटलेल्या प्रवासवर्णनातून त्यांचे रसिक, सौंदर्यवेधी, प्रवासाची आवड असलेले मन दिसून येते.

१६. समाजजीवन दर्शन, स्वानुभवकथन, आठवणी, व्यक्तिदर्शन व विचारमंथन असे अनेक परिमाण त्यांच्या लेखनाला प्राप्त झाले आहेत.

१७. स्वतःच्या जीवनातील विविधारंगी अनुभव सांगत असताना चिंतनाच्या पातळीवर जाऊन सहज साध्या, सरळ भाषेत विचार व्यक्त करणे हे त्यांच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

१८. त्यांच्या लेखनात जीवनाबद्दल निराशा कुठेही व्यक्त होताना दिसत नाही. जीवनाबद्दल त्यांनी अतिशय उत्साहाने उत्कठंतेने लिहिलेले असून; जीवनाकडे पाहण्याच्या आशावादी दृष्टिकोणामुळे वाचकांना नवी दृष्टी देण्यास हे लेखन समर्थ ठरले आहे.

१९. आत्माविष्कार, काव्यात्मकता, चित्रमयता, चिंतनशीलता, घटनांचा संदर्भ, व्यासंग, भाषाशैली असे वाङ्‌मयीन विशेष त्यांच्या ललित निबंधाला लाभले आहे.

२०. लेखिकेची भाषा लालित्यपूर्ण असून ती आशय विषयाला अनुसरून लिहिली आहे. त्यामुळे ती कधी संवेदनशील, चिंतनशील तर काही ठिकाणी गंभीर बनते. साधे साधे विचार प्रतिभाशक्तीच्या जोरावर आकर्षक करण्याची किमया त्यांना सहज साधलेली आहे. मुद्देसूद मांडणी, आकर्षकशीर्षके, सरळ साध्या, नेमक्या शब्दात आपले विचार व्यक्त करण्याचे कौशल्य त्यांना सहज प्राप्त झाले आहे. श्रृतयोजना आणि विचार यातून निवेदन सहज सुंदर केलेले आहे.

२१. लेखिकेने विपुल लेखन केल्यामुळे काही वेळा त्यांच्या लेखनात आशयाची व वाक्यांची पुनरावृत्ती झालेली आहे. पण सहज साध्या, अनौपचारिक लेखन शैलीमुळे त्यांचे लेखन वाचकप्रिय ठरले आहे.

## २.७ संदर्भ सूचीः

१. फडके भालचंद्र, 'मराठी लेखिकाः चिंता आणि चिंतन', श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, प्र. आ., १९८०, पृ. ४७

२. भागवत दुर्गा, 'रंगरूप', 'प्रतावना', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वि. आ. १९८९, पृ. १

३. ढेरे अरुणा, 'अर्ध्या वाटेवर', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, द्वि. आ. २०१९, पृ. १२९

४. सारडा शंकर, 'ग्रंथसंवत्सर', पुष्प प्रकाशन पुणे, प्र. आ. १९९३, पृ. ८९

५. यादव आनंद, 'ललित गद्याचे तात्त्विकस्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रणः २०१६, पृ. ८४,८५

६. पाटणकर रा. भा.,'सौंदर्यमीमांसा', मौज प्रकाशन, मुंबई, चवथी आ. २००६, पृ. ९६

७. जोग रा. श्री., 'अभिनव काव्यप्रकाश', व्हीनस प्रकाशन, पुणे, अकरावी आ. २००४, पृ. १२२

८. हातकणंगलेकर म. द. (संपा), 'वाङ्मयीन शैली आणि तंत्रे', अभिनव प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. १९८१, पृ. १३९

९. धाक्रस पुरुषोत्तम, 'निवडक शांता शेळके', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, द्वी. आ. २००३, पृ. १३

१०.आळतेकर मनोहर, 'मराठी निबंध', सुविचार प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९६३, पृ. १८४

# प्रकरण तिसरे

# सुनीता देशपांडे यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

## प्रकरण तिसरे

## ३. सुनीता देशपांडे यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

### ३.१ प्रास्ताविक

सुनीता देशपांडे यांनी आपल्या ललित लेखनाद्वारे मराठी साहित्यात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. संवेदना आणि भावनांच्या अंगाने अनुभव कथन करत असताना त्यात आलेल्या विचारगर्भतेमुळे त्यांच्या लेखनाला नवे रूप लाभले आहे. अनुभवांच्या आधाराने केलेल्या चिंतनातून आलेले लेखिकेचे विचार मराठी वाचकांना नीतिमत्तेकडे प्रवृत्त करणारे आहे. सुनीता देशपांडे या परंपरेला धरून थोडया वेगळया पद्धतीने लेखन करणाऱ्या लेखिका आहे. या प्रकरणामध्ये त्यांच्या ललित निबंध लेखनाचा अभ्यास केला आहे.

### ३.२ सुनीता देशपांडे यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

सुनीता देशपांडे या लहानपणापासूनच मेहनती होत्या. सूक्ष्म निरीक्षण, चिंतनशील वृत्ती, कलासक्त अशा गुणांनी संपन्न त्यांचे व्यक्तिमत्त्व आजही त्यांच्या लेखनातून निदर्शनास येते. भाषा आणि गणित हे त्यांचे आवडते विषय. त्यामुळे कविता वाचणे, इंग्रजी 'क्लासिक्स' अभिजात साहित्य वाचणे, पाश्चात्य विचारवंतांचे साहित्य वाचणे त्यांना शक्य झाले. पुलंबरोबर लग्न केल्याने त्यांना अनेक साहित्यिकांचा सहवास लाभला. त्याच्यातून त्यांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व अधिक सुदृढ झाले; असे म्हणण्यास हरकत नाही.

वयाच्या साठ वर्षापर्यंत त्यांच्या नावाने एकही पुस्तक प्रसिद्ध झालं नव्हतं. याबद्दल लेखिका मंगला गोडबोले लिहितात, "सुनीताबाई अनेक वर्षे स्वतंत्र लेखनाकडे वळल्या नाहीत, हे वास्तव आहे. पुलंचा संसार आणि लेखन संसार चालवण्याचं, स्वतःच्या आवडीप्रमाणे 'हाकण्याचं' मोठं काम होतं यात शंका नाही. पण सुनीताबाईंनी अमुक गोष्ट करू नये असं बंधन त्यांच्यावर कधीही नव्हतं आणि बंधन असतं तरी ते मानणाऱ्यापैकी त्या नव्हत्या. ते काहीही असो, एक परिणाम नक्की होता. वयाच्या साठीपर्यंत सुनीताबाईंच्या नावानं त्यांचं स्वतंत्र लेखन फारसं कधी कुठे प्रसिद्ध झालं नाही. पुढे एका क्षणी सगळं अनावर झालं आणि

मनात मावेनासं होऊन कागदावर आलं, असा काहीसा प्रकार घडला."[१] १२ जून १९९० साली 'आहे मनोहर तरी...' हे त्यांचं आत्मचरित्राचं पुस्तक प्रसिद्ध झालं. या पुस्तकासाठी त्यांना न. चिं. केळकर व केशवराव कोठावळे असे दोन पुरस्कार प्राप्त झाले. या पुस्तकाच्या लेखनामुळे लेखिकेला लोकांकडून भरपूर प्रतिसाद मिळाला. त्यामुळे लेखिकेच्या सृजनशीलतेला अधिक जोड मिळाली. आपण लिहू शकतो याची त्यांना खात्री पटली आणि निर्मळ, वेधक शैलीत त्या लेखन करु लागल्या. त्यानंतर 'समांतर जीवन' हे त्यांच दुसरं पुस्तक प्रसिद्ध झालं व पुढे त्या ललित निबंध लेखनाकडे वळल्या.

## ३.३ सुनीता देशपांडे यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

लेखिकेने अल्प प्रमाणात ललित निबंध लेखन केलेले दिसून येते. 'सोयरे सकळ' (१९९८), 'मण्यांची माळ' (२००२), 'मनातलं अवकाश' (२००६) असे त्यांचे एकूण ३ ललित निबंध लेखनाचे संग्रह प्रकाशित झाले आहेत. बालपणातील मनात खोलवर रूतून बसलेल्या आठवणी, निसर्गाविषयी अतूट प्रेम, संगीत, साहित्य क्षेत्रातील व्यक्तींचा लाभलेला सहवास, अन्य भाषेतील भावलेल्या कलाकृती अशातून त्यांच्या लेखनाला विषय मिळाले आहेत.

आत्मपर लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गवर्णनपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख व चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशा प्रकारचे लेख त्यांनी लिहिले आहेत.

### ३.३.१ आत्मपर लेख

लेखिकेचे अनुभवविश्व विस्तृत आहे. त्यांचे निबंध लेखन त्यांच्या वैयक्तिक आठवणी–अनुभवांनी बद्ध आहे. त्यांचे घर, बालपणात खेळलेले खेळ, शिक्षण, स्वातंत्र्य लढयात भाग घेतल्यावेळच्या आठवणी, लग्नाविषयी आठवणी, पुलंकडून मिळालेली वागणूक, त्यांच्या सोबतच्या आठवणी, वैवाहिक जीवनात भोगलेले त्रास अशा बालपण, तरुणपण ते

म्हातारपणातील आठवणींचा, खाजगी घटना—प्रसंगांचा उलगडा त्यांनी आत्मपर लेखनात केला आहे.

**आठ आण्यांतलं लग्न—** या लेखात लेखिकेने त्यांची आणि पुलंची पहिली ओळख कुठे झाली त्यानंतर ओळखीचे प्रेमात रूपांतर कसे झाले व त्यांनी अवलंबलेली लग्न पद्धतीविषयी आठवणी सांगितल्या आहेत. जुवळे आडनावाचे एकशिक्षकप्रेमी गृहस्थ मुंबईच्या दादर माटुंगा विभागात 'ओरियंट हायस्कुल' नावाची एक शाळा चालवत होते. या ना त्या कारणाने इतर प्रवेश मिळू न शकलेले विद्यार्थी आणि नोकरीच्या शोधात असलेले शिक्षक यांना या शाळेत प्रवेश दिला जात होता. पु. ल. देशपांडे यांनी त्या शाळेत शिक्षक म्हणून प्रवेश केला आणि काही काळाने लेखिकाही शिक्षिका म्हणून काम करतानाच त्यांची दोघांची तिथे ओळख झाली आणि पुढे ते एकमेकांच्या प्रेमात पडले. अशा आठवणींना त्यांनी या लेखात उजाळा दिला आहे.

त्यांना लग्न हे कृत्रिम बंधन अनावश्यक वाटत होते. अशा प्रतिगामी, सनातनी विचारांचा विरोध असूनही त्यांनी पुलंच्या आग्रहामुळे लग्न हे बंधन स्वीकारले. पण ते लग्न रजिस्टर पद्धतीने झाले. केवळ आठ आण्याच्या छापील फॉर्मवर साक्षीदार आणि त्यांच्या दोघांच्या सहयांनी दोन चार मिनिटांत त्या कु. सुनीता ठाकुर पासून सौ. सुनीता देशपांडे झाल्या. अशी लग्नाविषयीची आठवण व कर्मकांडांविषयी त्यांना असलेला तिटकारा 'आठ आण्यांतलं लग्न' या लेखात व्यक्त झाला आहे.

**यक्षाचं तळं—** त्यांचा भाचा संदीप याने प्रेजेन्ट म्हणून दिलेल्या फ्रेममधील चित्राला बघितल्यावर त्यांच्या मनात बालपणातील धामापूरच्या आठवणी जाग्या होतात. त्यातून हा लेख निर्माण झाला आहे. धामापूरच्या तलावाच्या काठावर खेळलेले खेळ, तिथे पाहिलेले मासे, बालवयात वडीलधाऱ्या माणसांनी तळयावर जाऊ नये म्हणून घातलेली सुसरीची भीती, रात्रीच्यावेळी तलावात पडलेले चांदण्याचे सौंदर्य, काठाशी फुलेला चाफा अशा गोष्टींची वर्णने आठवणीच्या रूपात लेखात शब्दबद्ध झाली आहेत. या तलावाच्या काठी घालवलेले एकटेपणाचे अनेकक्षण त्यांच्या अंतकरणात कायम टिकून होते. त्या क्षणांच्या आठवणी रेखाटत असताना तलावाविषयी स्वतःच्या मनातील भावना लेखात जागोजागी व्यक्त झाल्या आहेत.

**रत्नागिरीः माझे माहेर–** या लेखात लेखिकेच्या रत्नागिरीतील लहानपणीच्या आठवणी आल्या आहेत. मुंबईतून गोव्याच्या दिशेला जाणाऱ्या आणि गोवा, वेंगुर्ला वगैरेहून मुंबईला जाणाऱ्या बोटीतून त्यांच्याकडे कुणी पाहुणे यायचे असले की त्या त्यांच्या अंगणात काळोखात वाट पाहत बसण्याची निरागस आठवण लेखात व्यक्त झाली आहे. उन्हाळयाच्या सुट्टीत रत्नागिरीला आंबे खायला म्हणून नात्यागोत्यातली सगळी मुले कुठूनकुठून जमून आंब्याच्या आढया फोडल्या की खोलीभर आंबे निवडून खावून हातातोंडाबरोबर कपडेही पिवळे करत होते. अशा निष्पाप बालपणात मनाला सुखावणाऱ्या, मनाला आनंदीत करणाऱ्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला आहे. घराच्या अंगणात मुलांचे चाललेले खेळ, रात्रीच्यावेळी खुर्च्या टाकून मोठया माणसांच्या चालणाऱ्या गप्पागोष्टी अशा गोष्टींचे मनभुलवणारी वर्णने त्यांच्या या लेखनात आली आहेत.

रत्नागिरीच्या हायस्कुलमध्ये शिकत असताना एक मुलगी म्हणून आलेले त्यांचे अनुभव या लेखात व्यक्त झाले आहेत. त्या लिहितात, “माझ्या लहानपणीची रत्नागिरी ही त्या काळाच्या एखाद्या घरंदाज बाईसारखीच रूढिप्रिय आणि कर्मठ होती. तिला भाषा विषयापेक्षा गणिताचे, कलेपेक्षा शीलाचे, गुणांपेक्षा विद्वत्तचे वगैरे महत्त्व अधिक वाटत होते असावे. सावरकरांचे वास्तव्य त्याकाळी रत्नागिरीत होते. पण कवी, नाटककार, लेखक सावकरांपेक्षा स्वातंत्र्यवीर आणि विचारवंत सावरकरांचा रत्नागिरीला अधिक अभिमान वाटे.” (सोयरे सकळ, पृ.३३) अशी त्याकाळची रत्नागिरीची स्थिती चित्रित करुन तत्कालीन रत्नागिरीतील लोकांच्या स्वभावधर्मावर त्यांनी भाष्य केले आहे. त्यांच्या आठवणीतील सनातनी विचारांच्या पाशात गुरफटलेल्या रत्नागिरीचे वर्णन या लेखात आले आहे.

**होते म्हणून स्वप्न एक.. –** या लेखात बेचाळीस सालच्या स्वातंत्र्य लढयातील आठवणी रेखाटल्या आहे. या स्वातंत्र्य लढयावेळी त्यांच्यावर ओढवलेल्या जीवघेण्या प्रसंगाची आठवण त्या विस्तृतपणे सांगतात. रात्रीच्यावेळी मुंबईहून शिवाजी पार्कला येत असताना त्यांच्या शेजारच्या मोकळया जागेवर एक माणूस येऊन बसला. कोहिनूर मिलपाशी उतरून खोलीवर जाण्यासाठी त्या दुर्गाप्रसादच्या दिशेने चालत असताना त्या गल्लीवजा छोटया रस्त्यावर अगदी सामसूम जागेत तो माणूस त्यांच्याच मागून येतोय हे कळताच त्यांना वाटलेली भिती, धावत इमारतीपाशी पोहचल्यावर त्या माणसाच्या छातीवर त्यांनी जोरात

मारलेली लाथ अशा भयभीत करणाऱ्या अनुभवाचे हुबेहूब वर्णन लेखात आले आहे. इतक्या रात्री एकट्या असूनही त्यांनी धीर सोडला नाही. एक स्त्री असूनही कुशलतेने त्या पुरुषाशी लढल्या. त्यावेळी त्यांनी दाखवलेले धैय आणि मनाची ताकद येथे जाणवते. मुळात पुरुषी लालसा कशी असते याविषयी त्यांना वाचकांना सांगायचे असेल असेही त्यांच्या या लेखनातून जाणवत राहते.

**'गोष्ट वंदे मातरम्'ची (आणि पु. रा. भिडयांचीही)–** या लेखात '**वंदे मातरम'** या चित्रपटावेळचे लेखिकेचे अनुभव व्यक्त झाले आहे. या चित्रपटातील त्यांची भूमिका, या चित्रपटासाठी त्यांनी घेतलेली मेहनत, शूटिंगचे अनुभव, त्यावेळी चित्रपटसृष्टीत नावलौकिक मिळवलेल्या लोकांशी झालेल्या ओळखीबद्दल आठवणी आल्या आहेत. लहानपणी सिनेमा शूटिंग पाहण्याचा पहिल्या अनुभवाचे कथनही या लेखात आलेले दिसते.

सिनेमा करण्यात त्यांना आवड असल्याकारणाने पु. रा. भिडयांच्या 'वंदे मातरम्' या सिनेमात त्यांनी नायिकेची भूमिका केली होती. त्यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता आणि हा चित्रपट याच स्वातंत्र्य संग्रामावर आधारलेला असल्यामुळे तो करण्यात त्यांना कसा सोपा गेला याचे विवेचन लेखात झाले आहे. या चित्रपटाचे निर्माते पु. रा. भिडे यांचे वागणे, त्यांच्या अनपेक्षित मुत्युची आठवणही लेखात व्यक्त झालेली दिसते. या लेखाविषयी लेखिका लिहितात, "या 'वंदे मातरम्' चित्रपटाच्या आणि पर्यायाने त्याचे निर्माते पु. रा. भिडे यांच्या अद्यापही मनात रेंगाळणाऱ्या काही आठवणींना दिलेलं हे शब्दरूप." (मण्यांची माळ, पृ. ३१) या चित्रपटाची शूटिंग चालू असताना महात्मा गांधींची हत्या झाली होती. त्यावेळी कोल्हापुरात चाललेली जाळपोट, नासधुस, ती भयानक स्थिती त्यांनी आठवणीच्या रूपाने या लेखात व्यक्त केली आहे.

**सप्रेम नमस्कार–** या लेखात लेखिकेने पुलंना लिहिलेल्या पत्राबद्धल खुलासा करताना स्वतःच्या भावनांना शब्दरुप दिले आहे. टेबलाचे खण साफ करत असताना कधी मधी अर्धवट लिहून पडलेली किंवा पाठवू न मिळालेली पत्रे लेखिकेच्या हाती लागतात. त्या पत्रात लिहिलेला मजकूर या लेखात सांगितला आहे. पुलंच्या आठवणी येथे भरभरून आल्या आहेत. पुलंचा स्वभाव व लेखिका त्यांच्याशी कशा वागल्या याविषयी त्या या लेखात उघडपणे सांगताना दिसतात.

लेखिका लिहितात, “नुकतेच, काही मिनटांपूर्वी आमच्या शेजारच्या हॉस्पिटलात तीनचार दिवसांपूर्वी तुम्ही दाखल झाला होता, पण मला पत्ता नव्हता तुम्ही आम्हां कुणालाच काही कळवले नाही. बहुधा कळवूही दिले नसावे. म्हणजे हे असेच व्हायचे होते तर! मी लगेच हॉस्पिटलात आले. आत तुम्ही शेवटच्या क्षणी जिथे झोपला होता. तिथे गेले. झाकलेल्या चेहऱ्यावरचे पांघरुण दूर केले आणि क्षणात ते पुन्हा होते तसे करून बाहेर आले. त्या क्षणात आणखीही एक गोष्ट घडली मनातल्या मनात तुमच्या कपाळावरून हात फिरवून मी म्हटले, मित्रा, तू माझ्याशी असा का वागलास? मनातल्या मनात” (सोयरे सकळ, पृ. ३२) पुलंच्या आजारावेळी त्यांच्या मनाची झालेली स्थिती, पुलंनी त्यांचा केलेला अवमान याविषयीच्या भावना लेखात शब्दबद्ध झाल्या आहेत. “मृत्यूला टाळता येत नाही पण थोपवण्याचा, लांबवण्याचा प्रयत्न तरी निश्चितच करता येतो पण तीही संधी तू आम्हांला दिली नाहीस स्वतःच्या जीवाशी (आणि आमच्या भावनांशी) नाही तो खेळ खेळलास.”(सोयरे सकळ, पृ.३२) पुलंच्या निर्वाणाच्या वेळीसुद्धा पुलंच्या जिद्दी स्वभावामुळे लेखिका व पुलंचा हृदयसंवाद होऊ शकला नाही, पु. ल. देशपांडे व लेखिका एकत्र येऊ शकल्या नाही याची हळहळ, खंत लेखात व्यक्त झाली आहे. एक स्त्री म्हणून हवा असणारा नवऱ्याचा सहवास त्यांना कधी मिळाला नाही. नवऱ्याच्या निर्वाणाच्यावेळीतरी त्यांना नवऱ्याने जवळ करावे अशी त्यांची अपेक्षा येथे निदर्शनास येते. एकंदरीत या लेखात लेखिका पुलंच्या आठवणीने अस्वस्थ होऊन त्यांच्याबद्दल असणाऱ्या शंका कुशंकांना वाट करून देताना दिसतात.

## ३.३.२ साहित्यविषयक लेख

लेखिकेचं वाचन विपुल व विविध होतं. मराठी साहित्याबरोबरीनं पाश्चात्य विचारवंत, तत्त्वचिंतक त्यांनी वाचले होते. त्यातूनच त्यांचे साहित्यविषयक लेख निर्माण झाले आहेत.

**गोष्ट ‘एका कोळीयाने’ची–** या लेखात लेखिकेने अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या ‘The old man and the sea’ या पुस्तकाचे कथानक सांगून या पुस्तकाचे पु. ल. देशपांडे यांनी केलेल्या मराठी भाषांतराविषयी लिहिले आहे. प्रकाशक रा. ज. देशमुख यांनी भाषांतराची जबाबदारी

पु. लं देशपांडे यांच्या अगोदर अनेकांकडे सोपविली होती. परंतु त्या लेखकांना भाषांतर करणे शक्य झाले नाही. यामुळे उदास झालेल्या रा. ज. देशमुखांच्या मनाची स्थिती दर्शविण्यासाठी लेखिकेने रा. ज. देशमुख यांनी पु.ल. देशपांडे यांना लिहिलेले पत्र लेखात नमुन्यादाखल दिले आहे. त्यानंतर 'The old man and the sea' या शिर्षकाचे 'एका कोळीयाने' हे शिर्षक कसे निश्चित केले हे सांगण्याकरिता पु. ल. देशपांडेनी रा. ज. देशमुखाला पाठवलेले पत्र दाखला म्हणून लेखात दिले आहे.

त्या मूळ पुस्तकातल्या कोळयाच्या मनात मरण्यापूर्वी मोठा मासा पकडण्याची इच्छा होती. एक दिवस त्याच्या जाळयाला तो मोठा मासा लागतो. त्याच्या मनाला अफाट आनंद होतो. म्हातारा प्रेमाने त्या माशाला 'फिश...' अस म्हणून हाक मारतो. आता फिश याचे भाषांतर पु. ल. देशपांडे यांनी 'माशा' असं न करता त्या कोळयाच्या प्रेमाच्या, आनंदाच्या भावना त्या शब्दात उतराव्या यासाठी 'माशा रे' असा शब्द निवडला. त्यासाठी हे मराठी भाषांतरीत पुस्तक वाचकांच्या डोळयात अश्रु आणणारं ठरलं असे त्या सांगतात. या पुस्तकाचे भाषांतर करत असताना पु.ल. देशपांडे यांनी शब्दशहा भाषांतर न करता त्या शब्दांच्या भावनांना शोभेल असे शब्द वापरले हे उदाहरणे देऊन सिद्ध करतात. पुस्तकाची ओळख करून देत असताना मूळ पुस्तकातील भावनांना आणि अर्थाला तशाचा तसा टिकून ठेवण्याची कुवत पु. ल. देशपांडे यांच्यामध्ये होती हेही त्यांना या लेखातून पटवून द्यायचे होते.

**सोबती पुराकथा–** या लेखाच्या माध्यमातून लेखिका पुराकथेतील अदृश्य आणि काल्पनिकतेवर भाष्य करतात. त्याचबरोबर या पुराकथांच्या शब्दांतून व्यक्त होणारे शहाणपणावर लिहिताना, पुराकथांची खोली, उंची व महात्म्याला त्या महत्त्व देताना दिसतात. जादू, मंत्र, प्रेम, माया या गोष्टी आपल्याला प्रत्यक्षात दिसत नसल्या तरी यांचा संचार आपल्याला जाणवू लागतो म्हणून आपण या पुराकथेवर विश्वास ठेवू पाहतो. तसेच जन्म आणि मृत्यू प्रत्यक्ष आपण पाहू शकतो. पण त्या दोहोंनाही सोबत करत असताना काहीतरी अदृश्य असतं याची जाणीव आपल्याला पुराकथा करुन देतात. काळानुसार संस्कृती दुभंगतही असते तशीच ती एकमेकीत मिसळतही असते. त्यानुसार या पुराकथांच्या स्वरूपातही थोडाबहुत बदल होत जातो. परंतु पुरातन संस्कृतीच्या आठवणी पुराकथांतून चिरंजीव झाल्या आहेत. कालांतराने लक्षात येते की

प्रत्यक्षात ते सर्व जीव आता अस्तित्वात नाही पण आठवणीतून पुराकथांतून जीवंत आहेत. अशी पुराकथांची महती त्यांनी या लेखात उलगडली आहे.

**बोरकरांची 'ग'–** या लेखात कवी बा. भ. बोरकर यांच्या निर्मिती शक्तीबद्दल व काव्याविषयी लेखन झाले आहे. बोरकरांच्या कवितेत प्रत्येकवेळी दिसणारे 'ग' हे अक्षर म्हणजे लेखिकेला त्यांच्या कवितेची जन्मदाती वाटते. 'ग' या अक्षरामुळेच ते कवी बनू शकले. त्यानेच रसिक मनात त्यांच्या कवितांबद्दल ओढ निर्माण केली असे लेखिकेचे म्हणणे आहे.  त्यांच्या त्या कवितेत येणाऱ्या 'ग' या अक्षराबद्दल लेखिका लिहितात, "त्या 'ग' खेरीज एकट्या बोरकरांच्या दर्शनाने 'पानांनी टाळया पिटल्या' नसत्या, 'वारा हंबर अंबर' झाला नसता. आणि गोपींनादेखील पान्हा फुटला नसता, त्या 'दुधाच्या धारा' झाल्या नसत्या, 'ग' हे त्यांच्या लेखी केवळ एकस्त्रीलिंगी अक्षर नव्हतं, ती त्यांची निर्माणशक्ती होती. तिच्याविना ते 'पोएट बोरकर' म्हणून जन्माला आले नसते. ती या कवीची खरी जन्मदात्री. ती त्यांची खरीखुरी दैवी सखी होती, त्यांच्या जाणिवेबरोबरच जन्माला आलेली आणि त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांच्या साथीला राहिलेली." (मनातलं अवकाश, पृ. ६४) ज्याज्यावेळी हिरवळ, पाणी, पावसाच्या सरी हे सृष्टीसौंदर्य त्यांच्या डोळयासमोर उभं राहायचं त्यावेळी त्यांची कविता 'ग' अक्षर सोबत घेऊन अवतरत असे. कवी बोरकरांना गाणं सूचायला ती गोष्ट प्रत्यक्ष डोळयासमोर असायची गरज नव्हती. कल्पनेच्या माध्यमातूनही ते गाणं लिहित होते. पण ती ऐकायला मात्र त्यांच्यासोबत कोणीतरी असण्याची गरज होती. अशाप्रकारे बोरकरांच्या लेखन प्रक्रियेविषयीची खास ओळख त्या या लेखात करून देताना दिसतात.

बोरकरांची मातृभाषा कोकणी; तरी त्यांनी कोकणीबरोबर मराठीतल्या कविताही इतक्या सुंदर लिहिल्या की मराठीतल्या श्रेष्ठ कवींच्या पंगतीत बोरकरांचं मानाचं स्थान निश्चित झालेलं दिसतं. अशा त्यांच्याकडे असणारे दुधारी शस्त्रामुळे ते विख्यात, नामवंत कवी बनले. त्यांच्या दोन्ही भाषेतील कवितांबद्दल लेखिका लिहितात, "अशा जुळया कवितांत कोणती अधिक सरस ते ठरवणं कठीण." (मनातलं अवकाश, पृ. ६५) कवी आपल्या प्रतिभेच्या बळावर कविता रचतात पण सगळेच कवी त्या कविता गाऊन म्हणत नाही. बोरकर स्वतःच्या कविता गाऊन म्हणायचे. त्यांच्या त्या गायनात भारतीय घरंदाज संगीताची परंपरा वगैरे काही नसायचे. परंतु त्यातले अस्सल संगीत असायचे. असे सर्वांहून वेगळे बोरकरांचे व्यक्तिमत्त्व,

त्यांच्यापाशी असलेली प्रतिभाशक्ती व त्यांच्या लेखनप्रक्रियेविषयी विवेचन या लेखात झालेले दिसते.

## ३.३.३ निसर्गवर्णनपर लेख

निसर्ग लेखिकेच्या जीवाभावाचा सोबती होता. सुख दुःखाच्या क्षणी त्यांनी निसर्गाचा आधार घेतला होता. निसर्गाच्या सान्निध्यात राहून; निसर्गाला बारकाईने न्याहाळून; जाणून घेऊन त्या निसर्गाला आपल्या ललित लेखनात आविष्कृत केला आहे. निसर्गावर लेखिकेने भरभरून लिहिले आहे.

**आनंदमयी सृष्टीची जीवनासक्ती–** लेखिकेला निसर्ग अतिशय प्रिय होता. त्यामुळे निसर्गातील हालचालीकडे त्यांनी बारकाईने पाहिले. त्या निसर्गाचे गुणधर्म, त्याच्या भावना समजून घेण्यास त्या समर्थ ठरल्या. त्या ज्ञानाच्या आधारे त्यांनी मानवेतर सृष्टीची जीवन जगण्याची रीतीविषयी लिहित असताना मानव व निसर्गसृष्टी यांच्या जगण्यातील भेद दर्शविला आहे. या दोहोंची तुलना करून सृष्टीची प्रबळ जीवनासक्ती दाखवून दिली आहे. त्यांना मानवाहून निसर्ग अधिक समंजस वाटतो. या लेखात त्या माणसाच्या वर्तनाविषयी प्रश्न उपस्थित करतात. त्या लिहितात, "प्रत्येक ऋतू येणाऱ्या ऋतूच्या स्वागताची जय्यत तयारी करत करतच निरोप घेत असतो. वनस्पतिसृष्टी, मानवेतर जीवसृष्टी इतकी सुसंस्कृत, समंजस असताना आपण माणसंच अविचारी का होतो? ती झाडं तोडतोड का तोडतो? झाडं स्वतःची फळंदेखील स्वतःच न खाता पाखरांसाठी, आपल्यासाठी धारण करतात, पिकेपर्यंत त्यांचा भार वाहतात, कीड–मुंगी–शाकाहारी जनावरं–माणसं सगळयांच्या भुका भागवत असतात. त्यांना लाभलेलं त्यांचं आयुष्य त्यांना जगू न देता झाडांची 'लाकडं' करण्याचा अधिकार आपल्याला कुणी दिला? माणसाला लाभलेल्या बुद्धीची प्रगती ही अधिकप्रमाणात विध्वंसाच्या दिशेनेच व्हायला हवी का?" (मण्यांची माळ, पृ. ८१) अशाप्रकारे लेखिका माणसाच्या कुत्सित बुद्धीवर भाष्य करताना दिसतात. माणूस आपल्या बुद्धीचा वापर चांगल्यासाठी न करता त्याच्या बुद्धीची प्रगती विध्वंसाच्या वाटेना का जाते यावर त्या चिंतन करताना.

**माझं वाळवंट—** इतरांना रूक्ष, कोरडं वाटणारं वाळवंट लेखिकेला चैतन्यमय वाटतं. वाळवंट म्हणजे फक्त अखंड रखरखाट असं समजणं त्यांना वेडेपणा वाटतो. तिथे ऋतूचक्र असतं, उन्हाळा—पावसाळा—हिव्हाळा—दिवस—रात्र असते. परंतु त्या वातावरणाशी, प्राणिमात्रांशी, वनस्पतिजीवनाशी माणसाला जुळवून घ्यावं लागतं. तरच त्या वाळवंटाच सौंदर्य आपल्याला समजू शक्तं असे त्यांचे मत आहे. लेखात त्यांनी त्यांच्या मनात रूतून बसलेल्या, त्यांना आवडलेल्या, भावलेल्या वाळवंटाचे सौंदर्य उलगडत असताना वाळवंटा विषयीच्या आपल्या मनातील भावनांना शब्दरूप दिले आहे. लेखिका लिहितात, "वाळवंट म्हणजे काय? मनाच्या दारावर टकटक करत, आतल्या स्वतःलाच प्रश्नावर प्रश्न विचारणाऱ्या, माझ्या पावलांना हुळहुळणारा स्पर्श करणाऱ्या कणांची गर्दी! असंख्य वेळा असंख्य तऱ्हांनी तुडवलं जात असतानादेखील कधीही तक्रार न करणारी सोशीक शांतता! वाऱ्याशी भूलभूलय्या खेळताना क्षणात कोरडया लाटांचा डोंगर उभा करणारी, तर क्षणात तो डोंगर गिळून टाकणारी किमया!"(मण्यांची माळ, पृ. ७२) हे वाळवंट स्वतःविषयी चिंतन करण्यासाठी अधिक योग्य आहे असे लेखिकेला वाटते. चिंतनासाठी वाळवंटा इतकं परिपूर्ण, सुंदर, शांत, पवित्र असं दुसरं स्थान नाही असे वाळवंटाचं महत्त्व या लेखात विशद झाले आहे.

### ३.३.४ प्रवासवर्णनपर लेख

लेखिकेने देशपरदेश गमन केले होते. परंतु ललित लेखनात त्याविषयी लेखन झाले नाही. केवळ दोन लेख प्रवासवर्णनपर लिहिले आहे.

**दर्शनमात्रे...—** या लेखात लेखिकेने आनंदवन फिरायला गेल्या असतानाच्या आठवणी सांगितल्या आहे. आनंदवन कुटुंबियांकडून त्यांचे कसे स्वागत झाले याची तपशीलवार नोंद घेतली आहे. त्याचबरोबर तिथे असलेले नियम, तिथे सैर करण्याचा वेळ अतिथिगृहातला डिनर, ब्रेकफास्ट, लंच, तिथे असलेल्या गाद्यागिरद्या याविषयीची माहितीही लेखात आली आहे. आनंदवनात फिरायला गेल्या असताना त्या जंगलात पहायला मिळालेल्या वाघाचे तपशीलवार वर्णन त्या या लेखात करतात. सर्वसाधारण वाघांपेक्षा अधिक उंचीचा, प्रकाशाचा किरण झोत प्रत्यक्ष त्याच्या गळयावर, छाताडावर पडल्यामुळे उत्सुल्ल, हासऱ्या, तेजस्वी

डोळयांतले त्याच्या उमद्या काळजाचे ओलसर प्रतिबिंब पडलेल्या वाघाचे दर्शन होते. जंगलातील जवळून वाघाला बघण्याचा त्यांचा अनुभव नवलाईचा होता त्यामुळे त्यावेळच्या मनातील भावना लेखात शब्दबद्ध झाल्या आहेत.

**रुपेरी कडा—** या लेखात प्रवास करत असताना गाडीतील प्रसंगाची आठवण व्यक्त झाली आहे. मुंबई डेक्कन एक्सप्रेसने प्रवास करत असताना त्यांना गाडीत भेटलेल्या पारशी व इराणी मुली आणि दुसरी प्रौढ मराठी बाई व त्यांच्या सोबत पाळण्यात असलेली चार तान्ही मुले या प्रवाशांविषयी तो अनुभव आहे. ही चारही मुले भारतातून दत्तक म्हणून दुसऱ्या देशात जाणार होती. पण गाडी बंद पडल्याने उशीर होऊन त्यांना विमान चूकण्याची शक्यता असल्याकारणाने त्यावेळी त्यांचा पुढचा प्रवास सुखकर व्हावा, गाडी बंद पडल्याने त्यांना विमान तळावर जायला उशीर होईल या भावनेने अस्वस्थ झालेले गाडीतील लेखिकेबरोबर इतरही लोकांची घालमेल लेखिकेने येथे व्यक्त केली आहे. गाडीतील प्रवाशांपासून ते एरपोर्ट वरच्या अधिकाऱ्यापर्यंच्या लोकांनी आपआपल्या परीने केलेल्या मदतीची नोंद लेखात घेतली आहे. प्रवासातील प्रत्येक प्रवाशाची धडपड लेखात दिसत आहे. या लेखात वर्णिलेल्या अनुभवातून लेखिकेचे भारावलेले भावविश्व दिसून येते. हा प्रत्येक प्रवाशातील माणूसकीला एकदम असा पाझर का फुटावा? हे गुढ लेखिका सोडवण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक माणसात असा बौद्धिक पातळीवरचा आत्मविसर्जनाचा संभव लपलेला असतो असे लेखिका सांगतात. या अनुभवाने त्यांच्या मनाला झालेला आनंद व्यक्त करताना त्या लिहितात, "आज पाहावे तिथे काँग्रेस गवतासारखी बेपर्वाईच फोफावलेली दिसत असताना एका पुणे—मुंबई प्रवासात त्या अनुभवाची आठवण, मोहरलेल्या आंब्याच्या झाडावरून येणाऱ्या गार वाऱ्याच्या झुळकीसारखी किंवा एखाद्या संध्याकाळी काळयाकुट्ट ढगांना लाभणाऱ्या रूपेरी कडांसारखी सुखावून जाते." (सोयरे सकळ, पृ. १०९) वाचकांनादेखील प्रत्यक्ष अनुभवल्याचा प्रत्यय देणारी लेखिकेची भाषा येथे निदर्शनास येते. निरागस मुलांविषयी माणसाला वाटणारी आत्मीयता या लेखात जागोजागी व्यक्त झालेली दिसते. या लेखात त्यांनी माणसांच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्त्न केला आहे.

### ३.३.५ व्यक्तिचित्रणपर लेख

सुनीता देशपांडे या लोकप्रिय साहित्यिकपु. ल. देशपांडे यांच्या पत्नी. पु. ल. देशपांडे यांच्याशी लग्न केल्यामुळे त्यांना अनेक माणसांचा सहवास प्राप्त झाला. परंतु जी व्यक्ती त्यांच्या जवळची होती, ज्या माणसांचे कार्यकर्तृत्व किंवा स्वभाव त्यांना भावला त्यांचीच व्यक्तिचित्रणे त्यांनी रेखाटली आहेत. त्यांचे एकूण आठ स्वतंत्र लेख विविध क्षेत्रातील व्यक्तिंवर लिहिले गेले आहे.

### प्रकाशकाचे व्यक्तिचित्रण

**रा. ज. दे.–** रा. ज. देशमुख हे त्याकाळचे मराठीतले एक नामवंत प्रकाशक. त्यांचे व्यक्तिचित्र लेखिकेने रेखाटले आहे. शाळा–कॉलेजात शिक्षण न घेता बनलेल्या या प्रकाशकाबद्दल लेखिकेच्या मनात कुतूहल निर्माण होते. प्रकाशकाच्या व्यवसायात कसे पोहचल्याचे विचारल्यावर त्यावेळी त्यांनी दिलेलं उत्तर लेखिकेने 'रा. ज. दे.' या लेखात नमूद केलं आहे. "अहो, मी एक प्रकृतीने धडधाकट, पण अशिक्षित, रांगडा, मराठमोळा माणूस. पोटासाठी चार पैसे मिळवायचे तर काही तरी धडपड करायला हवी, म्हणून मी कोळशाच्या वखारीतून कोळशाची पोती पाठीवर टाकून घरोघरी पोहोचवण्याचं सोपं काम सहज मिळालं, ते सुरू केलं. पण मग लक्षात आलं, सदरा पाठीवर मानेपाशी फार मळतो आणि साबण लावून चोळून धुवायचा म्हणजे आणखी वर साबणाचा खर्च वाढतो. म्हणून मग त्याऐवजी छापखान्यातून, पुस्तकांचे नीट कागदांत बांधलेले गठ्ठे त्या त्या प्रकाशकाकडे किंवा पुस्तकांच्या दुकानांत नेऊन पोहोचवणे सुरू केले. इथून माझा पुस्तकांशी संबंध आला. मग एकएक गोष्ट पाहत, समजावून घेत, शिकत गेलो आणि स्वतःही प्रकाशक होण्यापर्यंत येऊन पोहोचलो" (मनातलं अवकाश, पृ. ७८) मेहनती, प्रामाणिकता, चिकाटी यामुळे देशमुखांना आलेले यश लेखिकेने येथे निदर्शनास आणून दिले आहे. व्यवहार करण्याचे कौशल्य देशमुखांजवळ होते. प्रत्येक गोष्टीवर पुरेपूर विचार करून निर्णय घेणे त्यांना सहज जमत असे. असे हुशार जिद्दी देशमुख 'रा. ज. दे.' लेखात आविष्कृत झाले आहे.

## संगीत क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे

**आमचा वसंता—** या लेखात वसंतराव देशपांडे यांची विविधांगी रूपे वर्णिली आहेत. त्यांच्या लेखात येणारा वसंता म्हणजे गाण्याच्या बैठकीत गाणारा वसंता, त्यांचे प्रवास करत असतानाचे रूप, त्यांच्या घरात वावरताना दिसणारा वसंता, गप्पात रंगणारा ज्ञानी वसंता अशी वसंत देशपांडे यांची विविध रूपे चित्रित केली आहे.

या लेखात वसंतराव यांच्या कार्यक्षेत्राविषयी लेखिका लिहितात, "वसंताचे कार्यक्षेत्र हे असे गाण्या—नाटकांचे. रात्री जागवण्याचे. कलावंत स्त्रियांशी संबंध आणणारे, फैय्याजपासून रोहिणी भाटयांपर्यंत आणि जोस्नाबाईपासून बेगम अख्तरपर्यंत. या क्षेत्रांतल्या अनेक गुणवंत कलाकारांशी वसंताची फार निकटची मैत्री होती. विमल—वसंताच्या संसाराच्या गाडयाला सुदैवाने तसला कसला अपघात झाला नाही. वसंताच्या गाण्या—बजावण्याला विमलचा विरोध नव्हता; पण त्यात तिचा सहभागही नव्हता. अशावेळी 'बौद्धिक भूक' किंवा 'कलात्मक भूक' अशा गोंडस नावाखाली माणसे पळवाटा शोधतात. वसंतामधल्या सद्‌गृहस्थाने त्याच्यातल्या कलावंतावर मात केली होती, की त्याच्या घरसंसाराला दृष्ट लागली नाही, हाही एक अपघातच म्हणायचा" (सोयरे सकळ, पृ. ५२, ५३) एक कलावंत आणि एक पती म्हणून वसंतराव यांनी सच्चेपणाने निभावलेली जबाबदारी लेखिकेने दाखवून दिली आहे.

वसंतरावांच्या सुखी समाधानी संसाराचे दर्शन येथे घडविले आहे. चाळीतला एका खोलीतला त्यांचा संसार. त्यात हव्या त्या सुखसोयी नव्हत्या. तरीसुद्धा आपल्या परिस्थितीविषयी कधी तक्रार न करणारी वसंतरावाची समाधानी, सोशिक, सकारात्मक वृत्ती प्रवृत्ती लेखिकेने दाखवून दिली आहे. एकेक आजार त्यांच्या शरीरात घर करत होता. त्यांचे परिणाम काय काय होऊ शकतील याची त्यांना पुरेपूरे जाणीव असूनही जणू काय हे सगळे चाळीतले शेजारी असावेत अशा थाटात त्यांबद्दल चेष्टेत, किडनी स्टोनला 'ज्योतिर्लिंग' तर छातीला 'लोहाराचा भाता' बोलणारे, आजारातही प्रवास, नाटकांचे दौरे करणारे, लोकांची आमंत्रणे स्वीकारणारे सकारात्मक दृष्टीचे वसंतराव लेखात चित्रित झाले आहे. गाण्याच्या बैठकीत चांगला गायला तरी क्षणात कंठाळवाणे बेसुरे गायन करणारे, मोठेपणा, खोटा दिमाख याची सोस नसलेल्या निर्मळ व्यक्तिमत्त्वाचा शोध लेखिका या लेखात अतिशय सूक्ष्मपणे घेताना दिसतात.

**शोक–** हा स्वतंत्र लेख कुमार गंधर्वांवर लिहिला आहे. या लेखात लेखिकेने मुलासारखाच निरागस, खटयाळ, स्वच्छंदी असा कुमार गंधर्वांचा स्वभावविशेष टिपण्याचा प्रयत्न केला आहे. लेखिका लिहितात, "बोलताना ते छान हसत असे. ते हसणे मिस्कील असे की कसे ते मला कधीच ठरवता आले नाही. पण सुगंधासारखे ते उपस्थितांच्या चेहऱ्यावर दरवळे हे मात्र खरे." (सोयरे सकळ, पृ. ७६) असे कुमारांच्या चेहऱ्यावरील निरागस भाव लेखिका टिपतात. या लेखात लेखिकेने कुमारांच्या संगीत क्षेत्रातील अलौकिकत्वाचा शोध घेतलेला दिसतो. त्या लिहितात, "कुमारची रंगलेली बैठक पाहताना एखाद्या अष्टपैलू खेळाडूचा रंगलेला सामनाच पाहताहोत असे वाटत राही. सूरलयींशी ते स्वतः मनसौक्त खेळे आणि त्यांना खेळवेही. त्यांच्या खोडया काढी, थट्टा करी, गुदगुल्या करी, गोंजारी, त्यांच्या खांद्यावर हात टाकून त्यांच्याशी कानगोष्टी करी. संगीत आणि कुमार या दोघांचे एकमेकांशी बाळपणीच्या सवंगडयांसारखे अतूट नाते होते." (सोयरे सकळ, पृ. ७४) अशा शब्दांनी त्यांनी कुमारांचे आणि गाण्याचे नाते उलगडले आहे.

कुमार गंधर्वाची पहिली पत्नी भानूमती. तिच्या मृत्युनंतर कुमारांने दुसरे लग्न केले ते वसुंधरेशी. अशा त्यांच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल लेखिका मोकळेपणाने सांगताना दिसतात. त्या दुसऱ्या पत्नी वसुंधरेने त्यांचा घरसंसार, व्यवसाय जबाबदारीने सांभाळला तरी आपल्याला कुणी जवळचा माणूस नाही अशी खंत कुमारांच्या तोंडातून क्षणोक्षणी व्यक्त होत असे. हा एकटेपणा, निराधारपणा, हरवलेपणा त्यांना का वाटत असेल याबद्दल लेखिकेच्या मनात प्रश्न उपस्थित होत असताना जाणवतो. त्यांचे उत्तर त्या आपल्या कुवतीनुसार सूक्ष्मपणे शोधताना दिसतात.

क्षयरोगाने पिडीत असूनही त्याविषयी दुःख व्यक्त न करता त्याला जणू आपला सखा, 'म्हारा ओळगिया' म्हणून स्वागत करणारे, शरीराच्या व्याधीने पछाडलेले कुमार लेखिकेने रेखाटले आहे. गाण्याच्या प्रत्येक बैठकीत या शिवपुत्राला गंधर्वांचे ऐश्वर्य लाभत गेले. आणि आजारातही अनेक घरात त्यांना अतिशय लाडक्या एकुलत्या एका मुलासारखे, कुल दैवतासारखे जपले गेले. असे जपणे म्हणजे लेखिकेला त्यांच्या वाटयाला आलेले भाग्य वाटते. या लेखातून त्यांनी कुमार गंधर्वांचे जीवन आणि त्यांचे संगीताशी असलेले घनिष्ट नाते आविष्कृत केले आहे.

**मल्लिकार्जुन अण्णा–** इतर गवंयाप्रमाणेच पंडित मल्लिकार्जुन अण्णा यांचेही व्यक्तिचित्रण लेखिकेने अतिशय सहृदयतेने रेखाटले आहे. मल्लिकार्जुन अण्णांचे लेखिकेच्या घरी वारंवार येणे जाणे असल्याकारणाने मल्लिकार्जुन आणि लेखिका यांच्यामध्ये असलेले आपुलकीचे नाते लेखात दिसत आहे. अण्णांचा स्वभाव, ठाम अशी त्यांची विचारसरणी, त्यांच्या गरजा, गाण्याशी असलेले त्यांचे अतूट नाते, गाण्यासाठी जात असताना धोतर, कोट, टोपी असा पोशाख, डोळयांवर चष्मा, कपाळावर भस्माचे पट्टे ओढण्याची त्यांची पद्धत अशा त्यांच्या अंतरंगाची व बाह्य स्वरूपाची वर्णने लेखिकेने या लेखात सूक्ष्मरीतीने केली आहे. त्याचबरोबर त्यांना लागणाऱ्या ठरावीक विडयांची बंडले, उकळून गार केलेले पाणी, उदबत्त्या अशा अण्णांच्या गरजांचीही नोंद बारीकतेने घेतली आहे.

जातपातीचे कडक बंधन पाळणाऱ्या अण्णांच्या देवघरात देवादिकांच्या जोडीनेच अल्लादिया खॉसाहेबांच्याही तसबीरीला रोज पूजा आणि नमस्कार घडे. मग जातपात, धर्म वगैरेबद्दल त्यांची निश्चित मते काय असेल या प्रश्नांची उत्तरे शोधताना दिसतात.

अण्णांच्या व्यक्तिगत आयुष्या इतकेच त्यांच्या गाण्याविषयीही लेखिकेने लिहिले आहे. त्या लिहितात, “त्यांचे गाणे सुरू झाले की क्षणात जादूची कांडी फिरवल्यासारखे दृश्य बदलून जाई. त्यांची बैठक रंगायला थोडादेखील वेळ लागत नसे. पहिला सूर कानांवर पडे तो सिद्ध होऊनच अवतरलेला असे. मग पुढेच सगळे गाणे, अखंड बैठक, श्रोत्यांनाही अशा काही तल्लीनतेचा अनुभव येई की तो सूर, ते मुखमंडल, ती लय हे सगळे मिळून एक अलौकिक शिल्प आपल्यापुढे साकार होत आहे. आणि आपला सारा जीव, कान आणि डोळे या दोन इंद्रियांत एकवटून कसल्यातरी दिव्य साक्षत्काराचा सुखकारी अनुभव आपण घेत आहोत. गातानाचे त्यांचे दर्शन फारच लोभसवाणे, डोळे भरून पाहत राहावे असे असे. रेशमाच्या धाग्यासारखा तलम, सात्त्विकमोत्यासारखा आत्मतेजाने तेवणारा सूर त्यांच्या मुखातून बाहेर पडताना त्यांचा चेहरा दृष्ट लागण्याइतका मोहक दिसे” (सोयरे सकळ, पृ. १२९) अशा शब्दांतून लेखिकेने अण्णांचे गाण्याशी असलेले आत्मीयतेचे नाते उलगडले आहे. एकंदर मन वेधून घेणारे मल्लिकार्जुनांचे व्यक्तिमत्त्व या लेखात चित्रित झाले आहे.

## सिने–नाटय क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे

**नागपुरचे नाना जोग–** सिनेनाटय क्षेत्रातील नागपूरचे नाना जोग हे व्यक्तिमत्त्व लेखिकेला आवडले. त्यांचा स्वभाव, त्यांनी केलेली कामगिरी त्यांना भावली आणि त्यातून हे व्यक्तिचित्रण तयार झाले. या लेखात नानांचा स्वभाव, त्यांचे घरदार, कौटुंबिक तपशील, त्यांचे शिक्षण, त्यांचे कार्यकर्तृत्त्वाविषयी तपशीलाने लेखन झाले आहे.

लेखिका आणि नाना यांच्यातील नाते किती दृढ होते हे त्यांच्या या लेखातून दिसून येते. लेखिका लिहितात, "प्रखर बुद्धिच्या जोडीला खूप हळवं मन त्याना लाभल होतं. अथक परिश्रमांची आवड हे त्यांच्यात आणि माझ्यात असणारं मोठं साम्य होतं बहुधा तोच आमच्या मैत्रीचा आधार होता." (मण्यांची माळ, पृ. १५), "त्यांच्या मानाने मी सर्वार्थानेच फार अपरिपक्व होते. म्हणूनच बहुधा मी जरी त्यांची लाडकी लेख होते. तरी मला समजून घेणारा भाई त्यांचा मना जोगा जावई होता." (मण्यांची माळ, पृ.१५) यातून नानांशी असलेले व्यक्तिगत स्नेहाचे दर्शन होते.

नागपूरच्या न्यायालयात मुख्य न्यायाधीशांचे 'स्टेनो' म्हणून नोकरी करत असताना नानांनी लिहून काढलेल्या मजकूरावर न्यायाधीश पुढेपुढे न वाचताच सरळ सही करून मोकळे होत. असे नानांचे हुशार व्यक्तिमत्त्व या लेखात साकार झाले आहे.

नानांच्या स्वभावाविषयी लेखिका लिहितात, "स्वतःच्या वाटचालीकडे उघडया डोळयांनी पाहाणं, त्यांत आवश्यक त्या सुधारणाही वेळेच्यावेळी करणं हा तर नानांचा स्वतःचा पिंडधर्म च होता. इतक्या मोकळया मनाचा, कोणताही आडपडदा नसलेला माणूस विरळाच" (मण्यांची माळ, पृ. १२) असे नानांचे समंजस, सौजन्यशील व्यक्तिमत्त्व या लेखातून प्रत्ययाला येते.

पतंजली अभ्यासावा, कार्ल मार्क्सही वाचावा, कम्युनिझम म्हणजे काय ते मुळातून समजून घ्यावं, लेनिन स्टॅलिन वगैरे पुढाऱ्यांचं बोलणं आणि प्रत्यक्ष कृती यांची गणितं मांडून पडताळे न्याहाळणे, जागतिक राजकारणात कुठे काय घडेल याचा अंदाज लावणे आणि प्रत्यक्षात कधी तस घडलं नाही तर ते कां घडलं नाही याचा शोध घेणे, त्या वेळचं वैचारिक राजकारण, त्यासाठीचं वाचन–मनन–चिंतन करणे अशा त्यांच्या सवयी लक्बीही लेखात नमूद झाल्या

आहेत. अशा सवयीने पोसले गेलेल्या नानांचे, निष्ठा आणि कष्ट यात कमी न पडता नाटकासाठी थिएटर बांधण्याचे स्वप्न पाहणाऱ्या नानांचे व्यक्तिमत्त्व इतरांना स्फुर्तीदायी वाटेल असेच आहे.

## साहित्य क्षेत्रातीली व्यक्तींची चित्रणे

**माधव आचवल–** देव, परमेश्वरी कृपा–अवकृपा, चमत्कार वगैरेंवर विश्वास ठेवणारे, घडलेली कोणतीही शुभ घटना ईश्वरी कृपाच मानणारे असे आस्तिक श्रध्दाळू स्वभावाचे माधव येथे चित्रित झाले आहे.

मानवाच्या कृती–उक्तितून त्याचा स्वभाव शोधता येतो असाच शोध लेखिका माधव आचवल यांच्याबद्दल घेताना दिसतात. लेखिका आणि पु. ल. देशपांडे यांनी 'गडकरी दर्शन' हा कार्य क्रम बडोद्याला केला होता. त्यावेळी माधव आचवल तो कार्यक्रम पाहायला आले होते. त्यावेळी त्यातील सिंधू त्यांना सर्वांत जास्त आवडली. हे सांगत असताना लेखिका लिहितात, "आयुष्याच्या पुढच्या वाटचालीत त्याच्या पावलांनी अशीही वळणे घेतली की विवाहित जीवनाची चौकट त्याला मान्य होती असे म्हणता येणार नाही. मग त्याला सिंधू आवडली ती कोणत्या कारणाने? अशी भोळी समृद्ध बाई ही माधवची आदर्श स्त्री होती का?" (सोयरे सकळ, पृ.९५) अशा शब्दांतून माधव आचवल यांच्या व्यक्तिमत्त्वातील अंतर्मन लेखिकेने येथे दर्शविले आहे.

देखणी, अल्पखर्चात बांधता येणारी मजबूत घरे बांधण्याची कला आचवलांकडे होती. त्यासाठी विशिष्ट घर बांधणीवरची चर्चासत्रे, परिषदे, शोधनिबंध वाचन, व्याख्याने करत जगभर प्रवास करूनही त्यांना या कामात यश येत नव्हते. त्यांच्या कामात मदत करण्याची भूमिका लेखिकेनेही घेतली पण त्याही त्यांना सहाय्य करू शकल्या नाही. याचे दुःख त्यांनी लेखात व्यक्त केले आहे. माधव आचवलांच्या दुःखात सामील झालेले लेखिकेचे मन येथे जाणवत राहते. शरीरवर्णन, त्यांच्या वाटयाला आलेले अपयश, त्यांची कमी उत्पन्नता, त्यांची लहान सहान गोष्टींतले सौंदर्य टिपण्याची वेधक दृष्टी अशा गोष्टींचा सखोल परामर्श या लेखात घेतला आहे.

**कालेलकर काका–** या लेखात लेखिकेने डॉ. कालेलकरांच्या स्वभावाचे सूक्ष्म अवलोकन करून त्यांच्या मानसिक प्रवृत्तीचे विवेचन केले आहे. वरवर अत्यंत संतापी, ज्वालाग्राही, चिडखोर, तिरसट स्वभावाचे पण आतून मऊ, हळवे काटकसरीने राहणारे, बुद्धिमान व्यक्तिमत्त्व 'कालेलकर काका' या लेखात चित्रित झाले आहे.

कालेलकरांच्या चिडण्यामागे काही तरी कारण असल्याने त्यांच्या मनात असा संताप निर्माण होत असेल. अशी लेखिकेच्या मनातील शंका लेखात व्यक्त झाली आहे. कालेलकरांचा लोकांच्या मागाहून बोलण्याचा स्वभाव होता. त्यामुळे कालेलकर आणि लेखिकेमध्ये होण्याऱ्या वाद विवादावेळचे संवाद या लेखात आले आहे. लोकांच्या मागून बोलण्याची कालेलकरांच्या विकृत प्रवृत्तीविषयी किंवा त्यांच्या संतापाविषयी जरी लेखन झाले असले तरीदेखील त्यामागे त्यांची दडपून टाकलेली प्रेम करण्याची प्रचंड ऊर्मी आहे असे सांगून लेखिका कालेलकरांची विशुद्ध प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न करतात.

या लेखात लेखिकेने कालेलकरांच्या अंतःकरणाचा शोध घेतलेला आहे. लेखिका लिहितात, "सगळया अनुभवांची गोळाबेरीज केली तर आज वाटते, हा तसा एक फार चांगला माणूस. हवा हवासा वाटणारा खूप हुशार, कष्टाळू खूपच प्रगतीशील विचारांचा. त्यांचे विद्वत्तेतले, व्यासंगातले, भाषाशास्त्रविषयकनिर्मितिक्षम विचारसरणीतले वगैरे संचित खूपच मोठे आहे." (सोयरे सकळ, पृ. १५९) अशा शब्दांनी लेखिकेने त्यांचा गौरव केला आहे. प्रेमभंग झाल्या कारणाने त्यांच्या मनाची अशी अवस्था झाली तसेच कालेलकरांनी कुटुंबातील कुणाशीही फारसे संबंध ठेवले नव्हते अशा कालेलकरांच्या वैयक्तिक खाजगी जीवनाचाही उलगडा या लेखात केला आहे. कालेलकर यांची बुद्धिमत्ता, शिक्षणाबद्दलची, ज्ञानाबद्दलची त्यांची खरीखुरी आस्था, ओढ लेखात निदर्शनास येते. शिक्षणाबद्दलच नव्हे तर जीवनाबद्दलही त्यांना असलेली ओढ लेखात दिसून येते. जरा काही दुखलेखुपले की पहिला फोन ते लेखिकेला करून डॉक्टरांना लगेच घेऊन येण्याची भाषा करायचे. यातून त्यांचे व लेखिकेचे घनिष्ट मैत्रीचे नातेसंबंध चित्रित झाले आहे.

### ३.३.६ चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख

विविध विषयांवर केलेल्या चिंतनाच्या अनुशंगाने लेखिकेचे विचारप्रधान लेख साकार झाले आहे. चिंतनशील वृत्ती, सूक्ष्म निरीक्षण व अफाट व्यासंगातून या लेखांनी शब्दरूप घेतले आहे.

**प्रवाह ओलांडता ओलांडता—** या लेखात जीवनाविषयीचे सत्य उलगडले आहे. आपण माणसं काळानुसार पुढे पुढे सरकत असतो. आपली माणसे, आपली नाती, इतर माणसांची झालेली ओळख यातूनच तो प्रवाह बनलेला असतो. परंतु आपलं आयुष्य उतरणीला लागल्यावर आपण मागे वळून पाहिले तर बरोबरीने चालणारी माणसे अधेमधे आपली साथ सोडून निघून गेलेली असतात. केवळ त्यांच्या आठवणी आपल्या सोबतीला असतात. जीवनाचा प्रवाह ओलांडता ओलांडता आठवणीचे संचितच आपल्या बरोबरीने असतं. आपण जन्माला आल्यापासून, जन्माच्या काठापासून ते मृत्यूच्या काठापर्यंत पोहचवणारा साकव तयार करत असतो आणि त्यावरूनच आपण चालत असतो. माणसं, माया, नातीगोती म्हणजेच साकव; आपला तात्पुरता आधार असतो. अशा शब्दांतून लेखिकेने जीवनाचे सत्य उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

**सोयरे सकळ—** अनुभवांच्या माध्यमातून मनुष्यप्राणी व मनुष्येतर जीवसृष्टी यांच्यातील नाते स्पष्ट करत असताना लेखिकेने माणसाच्या विध्वंसक बुद्धिवर भाष्य करून स्वतःचे विचार मांडले आहे. वनस्पतीसृष्टी, प्राणीसृष्टी, मनुष्यसृष्टी हे एकमेकांचे सगेसोयरे आहे असा संदेश त्या या लेखातून देताना दिसतात. वनस्पतीसृष्टी किंवा प्राणीसृष्टी स्वतःच्या आनंदोत्सवाबरोबरच माणसालाही धन्य करतात. अशी जीवंत देवघेव दुसरी कोणतीही नसेल असे त्यांना वाटते. परंतु माणसाकडे बुद्धी असूनही तो असंस्कृत, बेपर्वाईने वागत असतो. विनाकारण मजा म्हणून झाडे तोडतो. निष्कारण प्राण्याची शिकार करतो. माणसाचे अविवेकी वागणे त्यांनी या लेखात दाखवून दिले आहे. माणूस असा विचार न करता का वागत असतो यावर चिंतन करत असताना लेखिका लिहितात, “मनुष्यप्राणी आणि मनुष्येतर जीवसृष्टी यांच्यातले नाते हे शत्रुत्वाचे, परकेपणाचेच कशासाठी राहायला हवे? निष्कारण हिंसा हा माणसाच्या सुखाचा, आनंदनिर्मितीचा आवश्यक घटक आहे का? आपल्यातल्या विध्वंसक शक्तींचे मोकाट प्रदर्शन हेच स्वतःच्या बुद्धीचे सामर्थ्य सिद्ध करण्याचे एकमेव साधन असायला

हवे का? बुद्धिमत्तेप्रमाणेच संस्कृती हेही माणसाचेच व्यवच्छेदक लक्षण आहे ना? मग त्या मार्गानेच आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा आनंद आपण का गमवायचा? परिणामी विध्वंसक ठरणाऱ्या बुद्धिजन्य कर्तृत्वापेक्षा सुसंस्कृतपणाचा अभिमान आपण का बाळगायचा नाही?" (सोयरे सकळ, पृ. ५९) बुद्धी, विचार करण्याची क्षमता असूनही माणसाच्या अशा वागण्यामुळे त्या चिंतित होताना जाणवतात. जीवो जीवस्य जीवनम् हे एकमेकांसाठीचे नाते सर्वत्रच, अगदी रानावनातही असतेच. पण जगण्याच्या या मर्यादा उल्लंघण्यासाठी नसतात. सोयरे सकळ हा जीवसृष्टीचा धर्म आहे हे लक्षात ठेवून त्याप्रमाणे वागणे हे माणसाचे कर्तव्य यांची जाणीव लेखिकेने या लेखाद्वारे करून दिली आहे.

**क्षितिज—** या लेखात माणसाच्या बुद्धिवर, विचार क्षमतेवर भाष्य केले आहे. प्रत्येक माणसाच्या विचार शक्तिला मर्यादा असते. त्या मर्यादेला क्षितिज म्हटले असले तरी नेमके कुठे आणि कधी हे दोन्हीं शब्द वापरात आणायचे हे लक्षात घेणे लेखिकेला त्या माणसाचे शहाणपण वाटते. लेखिका लिहितात, "माणसा माणसात प्रजाजन आणि राजा ही दोन्ही माणसंच असली, तरी त्यांचे वास्तव्याचे स्तर जसे वेगवेगळे असतात तसेच 'मर्यादा' आणि 'क्षितिज' या शब्दांच्या वापराच्या, साहित्यातल्या वास्तव्यातले म्हणजे नेमके कुठे कधी कोणत्या संदर्भा त ते शब्द वापरायचे त्या स्थळ काळातल्या विवेक क्षणांचे स्तर असू शकतात." (मनातलं अवकाश, पृ. १३) मर्यादा आणि क्षितिज हे दोन एकाच अर्थाचे शब्द वाटले तरी त्यांचा वापर वेगवेगळया संदर्भात होतो हे लेखिकेने उदाहरणातून पटवून दिले आहे.

**बंडखोर—** या लेखात गुन्हेगार आणि बंडखोर, सुधारणा आणि क्रांती या शब्दांमधला फरक दर्शविला आहे. गुन्हेगार आणि बंडखोर या माणसांची लक्षणे सांगितली आहे. माणसाचे विचारी किंवा अविचारी वर्तन अगोदर समजून घ्यावे आणि विचारपूर्वक त्याला शिक्षा करावी किंवा न्याय द्यावा. माणसाला वर्तनानुसार गुन्हेगार ठरवावा. जगात सुधारणा व्हावी यासाठी लढाई करणे आणि त्याला शिक्षा झाली म्हणजे तो गुन्हेगार असे म्हणणे योग्य नाही. माणसाने या दोहोंमधला फरक ओळखायला हवा असा विचार या लेखात मांडला गेला आहे.

**निमित्त १२ मार्च—** आधुनिक जगात ऱ्हास पावलेल्या मूल्यव्यवस्था आणि वाढत चाललेली सामाजिक विषमता 'निमित्त १२ मार्च' या शीर्षकाखाली शब्दबद्ध झाली आहे. १२ मार्चच्या मुंबई बॉंब स्फोटामुळे लेखिकेच्या मनात चाललेली अनेक विचारांची आणि प्रश्नांची खळबळ

या लेखात व्यक्त करतात. हे स्फोट किंवा अशी दंगल आम्ही निवडून दिलेल्या स्वार्थी पुढाऱ्यामुळे, बुरसटलेली शासन व्यवस्थेमुळे होतात असा बेधडक आरोप त्यांनी केला आहे. स्वातंत्र्यानंतर सामाजिक मूल्यांची घसरणीला इंदिरा गांधी जबाबदार होती असे सांगताना लेखिका लिहितात, "देशाच्या हिताची, प्रजेच्या कल्याणाची, अजिबात काळजी न करता सत्तेचे राजकारण खेळणाऱ्या या बाईंनी संजय गांधीसारख्या आपल्या अत्यंत बेजबाबदार मुलाला पाठीशी घालून अनेक भ्रष्ट मार्गांचा अवलंब केला." (मण्यांची माळ, पृ. ५५) असा निर्भयपणे इंदिरा गांधींवर आरोप या लेखात झाला आहे. या लेखात मुंबईच्या बाँब स्फोटनंतर मुसलमान आणि हिंदूविषयीची लोकांच्या मतांवर विचारमंथन केले आहे. तसेच स्वातंत्र्यानंतर मुंबई शहरातील महानगरपालिकेच्या कारभार शहरातले रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिकआरोग्यसेवा, स्वच्छता या सर्व बाबतीत वाढत चाललेली दुर्दशा, वशिलेबाजी आणि लाचलूचपणावर लेखिका अंगुलीनिर्देश करतात. देशाविषयी प्रेम, भविष्याबाबतचे मनात उद्भवणारे अनेकप्रश्न त्यांनी लेखात मांडले आहे. 'निमित्त १२ मार्च' या लेखात सामाजावर परखडपणे लिहिणाऱ्या वेगळया अशा सुनीता देशपांडे आपल्या समोर येतात.

**निरूद्देश–** या लेखात लेखिकेने माणसाच्या वृत्ती–प्रवृत्तीवर, मानसिकतेवर विचार विनिमय करून स्वतःची मते मांडली आहे. माणसाला निरूद्देश रानात एकटं भटकंतीला जाऊन मनमोकळेपणाने त्या रानावनातील वातावरणाचा, तेथिल प्रत्येक गोष्टींचा आनंद घेता आला पाहिजे असे त्यांना वाटते. माणसं मनमोकळ जगण्यासाठी जातात पण तिथे जाऊन सतत विचारात मग्न होतात. अशा माणसांच्या मानसिकतेवर त्यांनी चिंतन करून स्वतःचे विचार प्रकट केले आहे. जीवनात कुठल्याच गोष्टीला अमरत्त्व नाही. येथे सर्वच नाशिवंत आहे. त्यामुळे माणसाने चिंतेत न राहता जीवनात येणाऱ्या प्रत्येकक्षणाला आनंदीत रहावं, निरूद्देश जगावं असा उपदेश करताना दिसतात.

**वाळूच्या कणातील अवकाश–** स्वातंत्र्य हा प्रत्येकप्राण्याचा जन्मसिद्ध हक्कअसला तरी त्या स्वातंत्र्याला शिस्त, नम्रता असायला हवी असे मत लेखिकेने या लेखात मांडले आहे. आणि हे पटवून देण्यासाठी त्यांनी फ्रेंच लेखकअँथेनिओ दी सेन्ट एक्सूपॅरी यांच्या लेखनाचा, त्यांच्या विचारांचा आधार घेतला आहे. क्षितिजापर्यंत पसरलेल्या वाळवंटात एकट्या माणसाचे अस्तित्त्व वाळूच्या कणा इतक्या तोडीचं असतं. तशीच या अफाट पसाऱ्यात किरकोळ

माणसाची महत्त्वकांक्षा ही कस्पटासमान असते. यातून माणसाला स्वतःच्या दुबळेपणाची जाणीव राहते. परंतु माणसाने इतरांची पर्वा करावी, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी व्हायला आतुर असावे आणि याच गोष्टीचे समाधान मानून जगावे हेच आपले खरे मोल आहे. असे जीवनावश्यक मार्गदर्शन त्यांनी केले आहे. काळजाला भिडणारी सुसंस्कृतता प्रत्येक माणसाच्या जीवनाला अर्थ व प्रयोजन देत असते. त्यामुळे माणसाने उदार, सौजन्यशील व क्षमाशील असायला हवे असा संदेश लेखिका या लेखातून देताना दिसतात.

## ३.४ सुनीता देशपांडे यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

### ३.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

सुनीता देशपांडे यांचे लेखन इतर ललित निबंध लेखन करणाऱ्या लेखकांच्या लेखनाहून निराळे वाटते. अर्थपूर्ण वाक्य, एखादा श्लोक, प्रश्न किंवा वाचनात आलेल्या लेखकाच्या माहितीने त्यांच्या लेखांची सुरुवात होते. त्यांचा लेख भाववृत्तीच्या दृष्टीने पुढे सरकतो, त्यात चिंतन केले जाते व कोणत्या तरी निर्णयाला येऊन लेखाचा शेवट होतो. त्यांनी मुक्त स्वरूपाचे ललित लेखन केले आहे. विवेचनात्मक अशी त्यांच्या लेखांची मांडणी आहे.

आत्मपर लेखनात त्यांनी स्वतःच्या गतआयुष्यातील आठवणी तसेच काही खाजगी घटना–प्रसंग अगदी प्रांजळपणे रेखाटले आहे. त्यातून त्यांच्या जीवनाचे सखोल दर्शन घडते. गतकाळातील आठवणीत रमण्याची मानवी मनाची प्रवृत्ती त्यांच्या लेखनातून दिसून येते. गतआयुष्यातील आठवणी मांडून आपल्या भूतकाळात पुन्हा एकदा डोकावून पाहण्याचा त्यांचा प्रयत्न दिसत आहे. त्या आठवणी कधी त्यांच्या मनाला सुखावतात तर कधी त्या आठवणींने त्यांना वेदना होते. त्यांचे आत्मपर लेख अंतरीच्या उमाळयाने उमलून आलेले आहे. संवेदना आणि भावना त्यांच्या लेखात जागोजागी सापडतात.

घराच्या अंगणात मुलांचे चाललेले खेळ, रात्रीच्या वेळी खुर्च्या टाकून मोठया माणसांच्या चालणाऱ्या गप्पागोष्टी अशा गोष्टींचे मनभुलावणारे दर्शन त्यांच्या लेखातून घडते. 'गोष्ट 'वंदे मातरम'ची या लेखात सांगितलेली बालपणातील सिनेमा शूटिंग बघण्याची आठवण,

तिथे भेटलेल्या माणसांविषयीच्या आठवणी सांगताना त्यांची समाधानी वृत्ती दिसून येते. अशा भूतकाळातील सुखी क्षणांच्या आठवणींना कुरवाळत एकटेपण विसरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

त्यांच्या आत्मपर लेखनात पुलंच्या आठवणी भरभरून आल्या आहेत. पुलंच्या आठवणी सांगताना त्या संवेदनशील बनताना दिसतात. या आठवणी भावनेवर आरूढ होऊन अवतरल्या आहे. या आठवणी अभिव्यक्तित निराश, अस्वस्थतेची भावना जाणवत राहते. त्यांच्या या लेखनात त्यांचे दुःखाने व्यापलेले व्याकूळ अंतकरण वाचक मनाचा ठाव घेणारे ठरले आहे. आत्मपर लेखनातील आठवणी अनुभवांच्या अनुषंगाने त्यांच्या स्वभावाचे सखोल दर्शन घडते. उदाहरणात त्यांच्या 'आठ आण्यातील लग्न' या आत्मपर लेखात त्या कर्म कांडाला विरोध करताना दिसतात. या संदर्भात मंगला गोडबोले आपल्या 'सुनीताबाई' या पुस्तकात लिहितात, "सुनीताबाईंना कर्मकांडांच कधीच प्रेम नव्हतं. अर्थशून्य रूढींचा तिटकारा होता. लग्नात नवऱ्या मुलीचं नाव बदलण्याची प्रथा त्यांना त्या काळातही खटकत होती."[२] आत्मपर लेखांतून जाणवणारा लेखिकेचा स्वभाव गोडबोले यांनी नेमकेपणाने हेरलेला दिसतो. स्वतःच्या नशिबाचा कौल मानणाऱ्या, स्वतःच्या तत्त्वांना शेवटपर्यंत जपणाऱ्या, प्रत्येक वेळी पतीपत्नीच्या नात्यात तडजोड करणाऱ्या, सोशिक, समजूतदार असे त्यांचे साधे व्यक्तिमत्त्व त्यांच्या आत्मपर निबंध लेखनातून निदर्शनास येते.

लेखिकेने स्त्रीविषयक स्वतंत्र लेख लिहिले नसले तरी त्यांच्या वैयक्तिक अनुभवांच्या माध्यमातून स्त्रीजीवनाचा उलगडा होतो. सुनीता देशपांडे या एकआदर्श स्त्री होत्या. पत्नीची भूमिका त्या समर्थपणे पार पाडताना दिसतात. परंतु एक पत्नी म्हणून त्यांना त्यांच्या पतीचं सुख लाभलं नाही हे त्यांच्या आत्मपर लेखनातून दिसून येते. एक स्त्री म्हणून त्यांच्या वाटयाला आलेले काही वेगळे अनुभव त्यांच्या लेखांमध्ये वाचायला मिळतात. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या वेधना, स्त्रीच्या विवाहोत्तर जीवनातील संघर्ष हे त्यांच्या लेखनातील चिंतनाचे विषय आहे.

जगभर १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून साजरे करण्यात आल्यानंतर स्त्री मुक्तीच्या चळवळीला गती मिळाली असे जरी म्हटले तरी आजही समाजात पुरुषी वर्चस्वाखाली जगणाऱ्या कितीतरी स्त्रीया आहेत. या सर्व स्त्रीया याचा कमी अधिक प्रमाणात

अनुभव घेत असतील याची प्रचिती आणणारे लेखिकेचे अनुभव लेखन आहे. समाजातील स्त्रियांच्या स्थानावर प्रकाश टाकणारे लेखिकेचे लेखन आहे.

स्त्रीचे बोलणे तिच्या जीवनाशी संबंधीत असते. तिचा घरसंसार, पती हे तिच्या बोलण्याचे मुख्य विषय असतात. आपला सुःखी संसार असावा, नवऱ्याकडून प्रेम मिळावा याकडे तिचा जास्त ओढा असतो. लेखिकेची मनोरचना अशाच पद्धतीची आहे. त्यांचे नवऱ्याबद्दलचे कितीतरी अनुभव त्यांच्या लेखनात व्यक्त झाले आहेत. त्या अनुभवांचा संबंध फ्रायडने सांगितलेल्या त्यांच्या अचेतन (uncouncious) मनाशी आहे. 'सप्रेम नमस्कार' या लेखात लेखिका लिहितात, "तुम्हांला आवडणारे 'मांसाहारी चमचमीत' जेवण तुम्ही 'कुणाचे उपकार नकोत' म्हणून, अगर संकोची स्वभावामुळे, हॉटेलात घेत होता. ही एवढीएवढीशी सुखेदेखील आपल्या नशिबी नाहीत या प्राक्तनापुढेही आम्ही मान वाकवली" (सोयरे सकळ, पृ. १५) अशाप्रकारच्या पती सुखाला मुकलेल्या कितीतरी आठवणी त्यांनी आापल्या लेखनात मांडल्या आहेत. त्यावरून आपण असं म्हणू शकतो की त्यांच्या मनाच्या नेणीवेतील दुःखाच्या परिणामातून हे लेखन झाले आहे.

काही वेळा काही पती किंवा कुटुंबातील माणसे स्त्रियांच्या भावनाची कदर करत नाही. त्यामुळे प्रेमाची, आपुलकीची कमतरता त्यांच्या जीवनाला भासू लागते. प्रत्येक क्षणी तिला यंत्राप्रमाणे वागवल्यामुळे त्या स्त्रीच्या मनात एकटेपणाची भावना निर्माण होते. अशीच एकटेपणाची भावना लेखिकेच्या लेखनातून उघडपणे प्रतित होते. लेखिका लिहितात, "असा तू वेगळा आणि मीही वेगळी. मग हा इतका प्रवास आपण केलाच कसा? हा प्रश्न इतर कुणाला पडला, तरी आपणां दोघांना पडायचं कारण नव्हतं कसा विरोधाभास आहे पहा! एकत्र प्रवास, पण आपआपल्या मार्गाने वास्तव्य एकाच घरात, पण जगणं स्वतंत्र" (मण्यांची माळ, पृ. ६) ती दोघं नवरा बायको एकत्र राहूनही त्यांच्या स्वतंत्र विचारांनी त्यांना एकटे केले होते. स्त्रीला फक्त प्रेमाच्या शब्दांची गरज असते. ते पण नवऱ्याकडून न मिळणे याहून मोठे दुःख ते कोणते? अशी त्यांच्या जीवनातील शोकांतिका अखिल स्त्रीच्या शोकांतिकेला वाचा फोडणारी आहे. यावरून असे म्हणावे लागते की, स्त्री मनाची दुःखे लेखिकेने स्वतःच्या अनुभवातून पारदर्शक शैलीत रेखाटली आहे. त्यांच्या जीवनातील अशा कित्येक तीव्र अनुभवांचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते.

मुलींवर अनेक प्रकारची बंधने घातली जातात. अशा बंधनामुळे मुलींच्या मनाची घुसमट होते. त्यांना इतरांच्या मर्जीप्रमाणे जगावं लागतं. अशीच बंधने एक मुलगी म्हणून लेखिकेनेही अनुभवलेली होती. त्या लिहितात, "रत्नागिरीतल्या चौथी ते मॅट्रिक या चार वर्षांच्या शिक्षणात गॅदरिंग, नाच, गाणी वगैरे तर सोडाच, पण खेळ किंवा पी. टी. हेही माझ्या वाटयाला आले नाही. खेळाच्या तासाला मुले मैदानावर जात त्या वेळी लेडीज—रूम नामक अडगळीच्या खोलीत बसू व मुलींनी वाटल्यास अभ्यास करावा अशी अपेक्षा होती. माझे सख्ये भाऊही त्याच शाळेत शिकत होते, पण तिथे आम्ही एकमेकांशी बोलणे तर सोडाच, पण ओळख दाखवणे हेही रत्नागिरीच्या नीतीनियमात त्या काळी बसत नव्हते."(सोयरे सकळ, पृ. ३३) अशाप्रकारच्या लेखनातून लेखिकेने तत्कालीन समाजप्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. अशा वैयक्तिक अनुभव कथनातून समाजाविरूद्ध केलेले त्यांचे लेखन स्त्रीपुरुष समानतेची मागणी करताना दिसते.

पुरुषप्रधान संस्कृतीचे चित्र रेखाटणारे लेखन लेखिकेने केले आहे. लेखिका लिहितात, "लग्नाच्या नोंदणी—अर्जावर सही करताना मीच नव्हता का सामाजिक बांधिलकी वगैरेला राजीनामा दिला? लग्नाची काय आणि समाजाची काय, बांधिलकी एकदा मानली की पर्याय दोनच एकतर फाटकन घेऊन मोकळं व्हायचं, किंवा स्वतःला विसरून जबाबदारी स्वीकारायची मी हा दुसरा पर्याय निवडला."(मण्यांची माळ, पृ.७) या अनुभवकथनाच्या अनुषंगाने त्यांनी पुरुषप्रधान संस्कृतीवर अंगुलीनिर्देश केला आहे. प्रत्येक वेळी स्त्रीनेच माघार घ्यायची हा समाजाचा दृष्टिकोन किंवा पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीवर जबरदस्तीने लाधलेले जबाबदारी; याची स्पष्ट जाणीव करून देणारे त्यांचे अनुभव रेखाटन आहे.

स्त्रीचे निराळे भावविश्व, स्त्री संवेदना त्यांच्या लेखनात जाणवतात. शारीरिक क्रिया, स्नायु क्रिया अशा क्रिया; शरीरात तयार होणाऱ्या स्त्रावामुळे स्त्री—पुरुष यामध्ये मानसिक दृष्टयाही भिन्नता निर्माण करतात. "तारुण्यावस्थेत पुरुषामध्ये Androgen हा अंतस्त्राव उत्पन्न होतो तर स्त्रियांमध्ये Estrogen व progest हे दोन स्त्राव उत्त्पन्न होतात."[३] स्त्री ही पुरुषापेक्षा शारीरिक दृष्टयाच नव्हे तर मानसिक दृष्टीनेही वेगळी असते. पुरुषापेक्षा स्त्रीचे अनुभवविश्व काही प्रमाणात वेगळे ठरते. पुरुषापेक्षा त्यांचा विचार, त्यांचा स्वभाव वेगळा

असतो. यामुळे पुरुषाच्या भाषेहून स्त्रीच्या भाषेत आपल्याला वेगळेपण जाणवते. अफाट परिश्रम कष्टणे, इतरांसाठी त्याग करणे, स्वतःचे दुःख लपवून ठेवणे, आपल्या कुटुंबातील माणसांच्या आवडीनिवडी सांभाळणे हे करत असताना कधीकधी तीच्या मनाचा तोल जातो. आणि नकळत ती हळवी होते. हे तिचे हळवे मन तिच्या बोलण्यातून आपल्याला जाणवू लागते. स्त्रीच्या संवेदनशील मनाचे नेमके दर्शन घडवणारे लेखिकेचे लेखन आहे. लेखिका लिहितात, "तुला शारीरिक दुःख अजिबात सहन होत नसायचं आणि परावलंबन खुप आवडायचं; आणि तुला हा जो शेवटला आजार आला, तोही शारीरिक दुःख, वेदना, असलं काहीही न आणता फक्त परावलंबन घेऊनच आला. हे परावलंबनही सतत वाढत जाणारं. त्याने माझी जबाबदारी ही वाढतच नेली. मनावरचा ताण वाढत गेला आणि आतून खूप थकत गेले रे मी!" (मण्यांची माळ, पृ. ७) वरील वाक्यातून त्यांच्या संवेदनशील मनाचे नेमके दर्शन घडते.

आपल्या लेखातून नकळतपणे स्त्री जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा वेगळा दृष्टिकोन लक्षात येतो. त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात त्यांनी कधी पुरुषप्रधान संस्कृतीला खंबीर पणे विरोध केलेला जाणवत नाही. ती संस्कृती मिटवण्यासाठी प्रयत्नही केलेला दिसत नाही. केवळ एक पारंपरिक स्त्रीच्या नावाखाली त्या जगत राहिलेल्या जाणवतात. स्त्रीपुरुष समानता व स्त्री मानसन्मान मिळावा अशी प्रत्यक्ष मागणी केली नसली तरी त्यांची स्वानुभावातून रेखाटलेला त्यांचा जीवनसंघर्ष, त्यांचा जीवनपट अप्रत्यक्षपणे वरील मागणीला सूचक ठरतो आहे. अशाप्रकारे स्त्रीजीवनाचा आलेख मांडणारे त्यांचे लेखन आहे.

लेखिकेने विपुल प्रमाणात वाचन केले होते. त्यांना ज्या लेखकांचे साहित्य भावले त्या लेखकांविषयी आणि त्यांच्या साहित्यकृतींविषयी त्यांनी लिहिले आहे. वाचनात आलेल्या पुस्तकांतील मजकूर त्यांनी आठवेल तसा सांगितला आहे. त्या मजकूराच्या जोडीने त्यांचे सखोल विचार व्यक्त झाले आहे.

'बोरकरांची' ग' या लेखात कवी बोरकर यांच्या लेखनप्रक्रियेवर विवेचन करुन एक लेखक म्हणून त्यांचा सर्वांगीण वेध लेखिकेने घेतला आहे. बोरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंवर त्यांनी आवर्जून प्रकाश टाकला आहे. 'महात्मा थोरो' सारख्या लेखात थोरोंच्या व्यक्तिमत्त्वार भाष्य करत असताना त्यांच्या 'दि मेन वूड्स' या साहित्यकृतीच्या आशयाच्या अनुषंगाने स्वतःची

मते, विचार मांडले आहे. थोरे यांच्या साहित्यप्रक्रियेवर भाष्य करत असताना त्यांनी त्यांच्या लेखनाचे उदाहरणासहित स्पष्टीकरण देऊन वेगळेपण उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे साहित्यावर आधारित लेखन माहितीपर आहे. या लेखांची भाषा साधी, सरळ व चित्तवेधक झाली आहे.

इतर साहित्यप्रकारांपेक्षा ललित निबंधात निसर्ग चित्रणाला अधिक वाव असतो. कारण कथा, कादंबरी, नाटक अशा साहित्यप्रकारांच्या वृत्तांत निवेदनासाठी काही बंधने असतात. तशा प्रकारची बंधने ललित निबंधामध्ये आढळत नाही. 'परिजात' या लघुनिबंध संग्रहाला लिहिलेल्या दीर्घ प्रस्तावनेमध्ये वि. स. खांडेकर यांनी लघुनिबंध संग्रहामागील काही प्रेरणांचा उल्लेख केला आहेत. ते म्हणतात, "सर्वच लघुनिबंध काही गंमतीच्या किंवा विरोधी विचारातून निर्माण होत नाहीत. निसर्गाच्या दर्शनाने अंतर्मुख बनल्यानेही काही तयार होतात."[४] सुनीता देशपांडे यांचे निसर्गवर्णनपर लेखनही याच प्रेरणेतून निर्माण झालेले दिसून येते. त्यांच्याकडे जन्मतः जिज्ञासा होती. याच जिज्ञासेच्या बळावर त्यांनी निसर्गाला न्याहाळला. निसर्गाच्या रूप गुणांच्या दर्शनाने त्या अंतर्मुख बनल्या. त्यांनी निसर्गाचे आणि माणसाचे नाते समजून घेतले आणि लेखनात एकाच वेळी निसर्गसौंदर्य, मानव आणि निसर्ग यांचे नाते तसेच मानवी सृष्टी आणि मानवेतर सृष्टी यांच्या स्वतःच्या व एकत्रित व्यवहाराविषयी निरीक्षणातून भाष्य केले.

लेखिकेतील 'मी' हा निसर्गात रमणारा होता. त्यांनी रेखाटलेल्या निसर्गसौंदर्याहून त्यांचे निसर्गाशी एकरूप झालेले व्यक्तिमत्त्व अधिक प्रमाणात निदर्शनास येते. त्यांच्या लेखनातील 'मी' निसर्गातील भाव समजून घेणारा आणि त्या निसर्गाबरोबर संवाद साधणारा आहे. आपल्या लेखनात त्यांनी निसर्गाला हानी पोहचवणारी माणसाची प्रवृत्ती दाखवून देऊन त्या निसर्गाला माणसाने कसा अनुभवावा याविषयी विवेचन केले आहे.

लेखिकेच्या निसर्ग चित्रणाची भाषा वाचार्थ्याशी संबंधीत आहे. त्यांनी जे निसर्गविषयक लेखन केले आहे त्या लेखनातून त्यांना निसर्गाचे सौंदर्य चित्रित करायचे होतेच त्याचबरोबर माणसाच्या जीवनात निसर्गाचे किती महत्त्व आहे हे ही सांगायचे होते. जे त्यांनी सरळ साध्या शब्दांतून मांडले आहे.

“माणसाची बुद्धी हीही निसर्गदत्तच असते. ती वापरत राहून तिची धार वाढवता येते, सारासार विचार असेल तर ज्ञान पचवता येतं, प्रगल्भ होत म्हणजेच ज्ञानाची पुढची पायरी जे शहाणपण तेही हळूहळू येत जातं. निसर्ग हा आपला शत्रू नव्हे, आपण स्वतः हा त्या निसर्गाचा अंश आहोत ही गोष्ट जर आपल्या श्वासोच्छवासासारखी हृदयात सदैव जागृत असेल तर तो निसर्गच आपलं सर्व भांडार खोलूनच बसला आहे, तिथे कडया—कुलप नाहीत; आपण त्याच्या कुशीत शिरलं तर तोही आपल्याला मायेने पदराखाली घेतो याचा सहज प्रत्यय येत राहतो.” (मण्यांची माळ, पृ. १०३) माणसाने निसर्ग कसा अनुभवावा निसर्ग आपला शत्रू नसून मित्र आहे. असे समजावून सांगून निसर्गाचे संरक्षण हे माणसाचे संरक्षण आहे हे सत्य त्यांनी वरील उताऱ्यातून पटवून दिले आहे. माणसाच्या जीवनाला उपकारक असे सद्सद्विचार देण्याचे त्यांचे ध्येय येथे दिसून येते.

“‘पक्षांचे लक्ष थवे’ पैकी एखादा थवा अलगद वाटेतल्या एखाद्या डौलदार झाडाचं लक्ष वेधून घेतो आणि त्या झाडाचं आमंत्रण स्वीकारुन तिथे वस्तीला जातो, तिथला पाहुणचार घेतो. ऋतूप्रमाणे आपले रंग बदलणारी ही झाडं कुणाला कधी मोहात टाकतील काय सांगावं! छोटीमोठी तळी तर डोंगरकपारीत खूप ठिकाणी भेटतातच. या डोंगरकपारीतून कधीकधी वाराही असा मस्त वाहत सुटतो, की वाटेतल्या रानामधल्या गवत पात्यांनाही कंठ फुटतो. झाडांच्या लहान—मोठया फांद्या, पानं यांचाही सूर त्यात मिसळतो. आणि ‘संगीत’ हा शब्द सार्थ होतो. शब्दांची अशी बारशी होतात त्या सोहळयांना हजर असण्याचं भाग्य क्वचितच एखाद्याच्या नशीबी येतं.” (मण्यांची माळ, पृ. १०३) अशाप्रकारची मन भुलावणारी सौंदर्यवर्णने त्यांच्या लेखनात आली आहे. निसर्ग सौंदर्याविषयी भावना आकर्षक अचूक शब्दात टिपण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे हे या उताऱ्यातून सिद्ध होते आहे.

लेखिकेने चित्रित केलेला निसर्ग लेखात जीवंत होतो. वाचकांपुढे प्रत्यक्ष उभा असल्याचा भास होण्याजोगे त्यांचे निसर्गचित्रण आहे. त्यांचे निसर्गसौंदर्य तरल शब्दात व्यक्त झाले आहे. वरील उताऱ्यातून त्यांनी निसर्ग कसा अनुभवला हे तर लक्षात येतेच त्याचबरोबर त्या निसर्गाशी अतूट अनुबंध असलेला ‘मी’ ही जाणवत राहतो.

लेखिकेने निसर्ग पाहिला अनुभवला, त्याला जाणून घेण्याचा प्रयत्नही केला परंतु त्यांच्या मनात विविध प्रश्नांनी थयमान घातलेले दिसून येते. लेखिका लिहितात, “या धबधब्याचं

निश्चित वय कित्ती? कुठल्या डोंगराच्या कुशीत कोणत्या खडकातून अब्जावधी वर्षांपूर्वी त्याने प्रथम प्रकाशाचं दर्शन घडतं? त्या क्षणी त्याचा कोणता थेंब सर्वप्रथम चमकला? तो थेंब त्या प्रवाहाचं अद्याप नेतृत्त्व करतोय, की प्रवाह म्हटल्यावर थेंबाथेंबाला स्वतंत्र अस्तित्त्व नसतं? गोकाक–गिरसप्पापासून ते अब्जावधी वर्षे वयाच्या जुन्यापुराव्या नायगरापर्यंतचे बरेच धबधबे प्रवासात त्या त्या वेळी डोळे भरून पाहिले. क्षणार्धात प्रेक्षकांची वाचा बंद करून कानठळया बसणारे धबधबे! त्या पाण्याला थकवा येतच नसेल का? वाटेतले खडक किंवा गाळसाळ इजा करत नसतील का? वर्षानवर्षे फक्त वाहत राहणाचा कंठाळा येत नसेल का? आवडनिवड काही? म्हणजे दिवसा वाऱ्याच्या झुळका, रात्री, चांदण्याचं किंवा काळोखाचं पांघरूण अशी कुणाकुणाची आठवण येत असेल? अशा शंका कुशंकातूनच त्या पाण्याशी ओळख करून घ्यावी, मैत्री करून जन्मभराचं नातं जोडावं, अशी ओढ लागून राहिली." (मनातलं अवकाश, पृ. ६ ,७) अशाप्रकारे काही लेखात निसर्गविषयक लेखन करत असताना त्यांची चिंतनशील वृत्ती निदर्शनास येते. येथे त्यांच्या निरागस मनाचे दर्शन घडते. त्यांनी निसर्ग बारकाईने न्याहाळला व त्यातील गुढतेचा शोध घेण्याचाही प्रयत्न केलेला दिसून येतो.

सृष्टीवरील सजीवांना पाण्याची मोठी गरज असते. त्यामुळे या पाण्याला आपण सदैव तिर्थ म्हणून ओळखायला हवं, त्यांचं महत्त्व पटवून घेऊन मगच त्यांचा वापर करायला हवा असे लेखिकेचे मत आहे. त्या लिहितात, "पाणी 'पाऊस होऊन येतं तेव्ह त्याच्याशी खेळावं. त्यावेळी ते मातीचा चिखल करतं पण वनस्पतीसृष्टीला आणि प्रणीसृष्टीला न्हाऊ घालतं. ते ढगात वस्तीला असतं तेव्हा अनेकदा आपल्याला हुलकावण्या देऊन कुठे नाहीसही होतं. पण तेच ढग त्याचा भार वाहून जड झाले की ते चूपचाप त्यांच्या सोबत आपल्याकडे झेपावतं." (मनातलं अवकाश, पृ. ७) लेखिकेच्या लालित्यपूर्ण भाषेमुळे पाण्याचा गुणधर्म योग्य रितीने वाचकांपर्यंत पोहचलेला दिसतो. त्यांनी केलेल्या वर्णनातून पावसाची पृथ्वीवर येण्याची प्रक्रिया व्यक्त झाली आहे. पाण्याच्या विशृंखल स्वभावधर्माविषयीही लेखिका येथे सहज सांगून जाताना दिसतात.

पाण्याशी संवाद साधताना त्या लिहितात, "आज सकाळी खास त्याच्या भेटीला, त्याच्याशी मनमोकळं बोलायला म्हणून मुद्दाम वेळ काढून इथे आले, तर ते पाणी शांत झोपलं होतं. धबधब्यासारखं उडया मारत कुठे तरी जाऊन कोसळतही नव्हतं, की नदी सारखं धावतही

नव्हते. खूप थकलं असावं." (मनातलं अवकाश, पृ. ८) निसर्गाची अशी चित्रे टिपताना त्यांची भाषा संवेदनशील बनते. त्यांच्या संवेदनक्षम मनाचे अनेक विभ्रम आहेत. हे मन कधी कधी स्वतःच कोणत्याही गोष्टीचा शोध घेत फिरत असते. व प्रात्यक्षिक अनुभलेल्या दृश्यातील गुढार्थ शोधण्याचा प्रयत्न करताना दिसते.

त्यांच्या निसर्ग वर्णनांना विचारांची जोड आहे. कोणत्याही निसर्गातील घटकाचे वर्णन करत असताना विचार त्याबरोबरीने येत असताना जाणवतात. लेखिका लिहितात, "ससे—हरिणांपासून लांडग्यांसारख्या हिंस्त्र प्रण्यांनाही, किंबहुना सर्वच सजीव निर्जीव सृष्टीला पर्वतराजी मात्र कोणताही आपत्वभाव न दाखवता आसरा आणि विश्वास देत असते. नदीला निरोप देते, झऱ्यांना जोजावते, झाडांच्या मुळांना कुशीत घेते. यच्चायावत प्राणिमात्रांना बागडायला, लपायला, जगायला आणि मरायलाही तिथं मोकळीकअसते. इतका तटस्थपणा या पर्वतराजीला कुणी शिकवला? त्यांच्या आकारमानानं की वयानं?" (मनातलं अवकाश, पृ. ४०) विविध रूपातून निसर्ग जीवनावश्यक तत्त्वज्ञान सांगत असतो असे लेखिकेला येथे सूचवायचे आहे. आपल्याबरोबर चालणाऱ्या प्रत्येक जीवाला सहकार्य करणं, त्यांना सांभाळून घेणं, त्यांचं रक्षण करणं, त्याला आपल्या जगात सामावून घेणं हे निसर्गा तील प्रत्येक घटकांचा स्वभाव असलेला दिसून येतो. माणसांनेही असच एकमेकांना सहकार्य करावं असा उपदेश लेखिका आपल्या लेखनाद्वारे करताना दिसतात. निसर्गविषयक लेखनातून समृद्ध जीवनविषयक मूल्यांचे ज्ञान वाचकांना देण्याचा प्रयत्त्न त्यांनी केला आहे. त्यांचे निसर्ग वर्णन बोलके आहे. त्यांचे काही लेख केवळ निसर्गाविषयी लेखन करण्यासाठीच बनले आहे. त्यांच्या संपूर्ण निसर्गविषयक लेखनाचा आढावा घेतल्यावर त्यांचे निसर्गचित्रण वाचक मनावर प्रचंड परिणाम करणारे आहे यात शंका नाही.

'दर्शनमात्रे' व 'रुपेरी कडा' हे केवळ दोन लेख प्रवासवर्णनपर आहे. आनंदवनात जात असताना ते परत येईपर्यंतच्या प्रत्येक सूक्ष्म हालचालींची नोंद लेखिकेने लेखात घेतली आहे. या लेखात आनंदवनाचे वर्णन कमी प्रमाणात आले असून प्रवास करत असताना त्याचे चाललेले संभाषण, वाघाचे दर्शन उशिरा झाल्यामुळे शब्दबद्ध झालेले निराशेचे भाव, मनाचा थकवा याविषयी अधिक प्रमाणात लेखन झाले आहे. केवळ एका ओळीत वाघाचे वर्णन लेखात आले आहे.

‘रूपेरी कडा’ हा लेख प्रवास करत असताना पाहिलेल्या एका प्रसंगावर आधारित आहे. प्रवास करत असताना गाडीत भेटलेल्या लहान मुलांपासून तो सुरू होतो आणि ती सुखरूप दुसऱ्या देशात पोहचल्यावर त्याचा शेवट होतो. या मुलांना विमान चुकू नये अशा वाटणाऱ्या गाडीतील माणसांच्या भावना येथे तीव्रतेने व्यक्त झाल्या आहे.

स्वतः पाहिलेली, अनुभवलेली, दिर्घकाळ सहवासात आलेल्या व्यक्तींची चित्रणे लेखिकेने सहृदयतेने रेखाटली आहे. रेखाटलेल्या व्यक्तिबद्दलचा जिव्हाळा, आपुलकीची भावना लेखनात उतरली आहे. त्यातून ही व्यक्तिचित्रणे भावपूर्ण झालेली दिसून येतात.

साहित्य क्षेत्रातीली व्यक्ती, संगीत क्षेत्रातीली व्यक्ती, सिनेनाटय क्षेत्रातीली व्यक्ती, प्रकाशकाचं व्यक्तिचित्रण अशी विविध क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे त्यांनी रेखाटलेली आहेत. या माणसांच्या कार्याचा जो ठसा त्यांच्या मनावर उमटला त्यातून त्यांची व्यक्तिचित्रणे साकार झाली आहेत.

लेखिकेच्या व्यक्तिचित्रांचे स्वरूप हे विविधांगी आहे. व्यक्तींची शरीरवर्णने, स्वभाववर्णने व्यक्तींची घरे, त्यांचा कौटुंबिकतपशील, त्यांचा खाजगी जीवनवृत्तांत, त्यांचे कार्यकर्तृत्त्व त्यांचे यश अपयश आणि त्यांचे दुखणे लेखात तपशीलाने आविष्कृत झाले आहे. लेखनात चित्रित झालेल्या त्या व्यक्तींच्या मानसिक प्रवृत्तीचा, अंतरंगाचा शोध घेत लेखिकेने आपल्या अनुभवविश्वातून ती व्यक्तिचित्रे लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. या व्यक्तिचित्रणांच्या अनुषंगाने लेखिकेचा स्वभाव व जीवनविषयक दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो.

त्यांनी ज्या ज्या माणसांविषयी लिहिले आहे त्या माणसांचा निकटचा सहवास त्यांना लाभला होता. त्यामुळे त्या माणसांचा दुरावा किंवा त्यांची आठवण त्यांना अस्वस्थ करताना जाणवते. खरंतर या दुराव्याच्या अस्वस्थेतून ही व्यक्तिचित्रणे साकार झाली आहे.

लेखिकेने लिहिलेली व्यक्तिचित्रे तपासली तर त्या वृत्तिगांभीर्याला महत्त्व देताना दिसतात. या लेखनात त्यांनी माणसांची जाणवलेली वैशिष्टये शब्दांकित केली आहे. त्यांनी रेखाटलेली सर्व व्यक्तिचित्रणे कौतुकाने भरलेली आहे. प्रत्येक व्यक्तिचित्रणात त्या व्यक्तींकडे असलेल्या कलेविषयी त्या आवर्जुन लिहितात. त्यातून त्यांचा कलाप्रेमही जाणवत राहतो. त्यांच्यापाशी असलेले त्या व्यक्तींच्या आठवणी अनुभवातून आणि त्या व्यक्तींच्या जीवनातील घटना

प्रसंगांची भर घालून चित्रमय स्वरूपात त्यांनी ही व्यक्तिचित्रे उभी केली आहे. त्यामुळे ही व्यक्तिचित्रणे त्यांच्या सामर्थ्यानिशी वाचक मनावर बिंबणारी आहे.

सुनीता देशपांडे यांचे लेखन विचारगर्भ आहे. त्यांनी चिंतनातून व विचारांतून येणाऱ्या आदर्श जीवनमूल्यांची रुजवण करणारे लेखन केले आहे. त्यांच्या अधिकशा लेखांमध्ये विषयाच्या संदर्भात विविध अनुभवांच्या अनुषंगाने त्यांचे विचार व्यक्त झाले आहेत.

लेखिकेपाशी मानव जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन होता. तो दृष्टिकोन त्यांच्या चिंतनशील लेखनात दिसून येतो. माणूस कसा असावा यावर भाष्य करून त्यावर साधकबाधक चिंतन करून त्यांनी आपले विचार मांडले आहे. उदाहरणात, 'बंडखोर' लेखात लेखिका लिहितात, "माणूस केवळ 'चांगला' असून पुरेसं नाही. आपण कशासाठी चांगलच असायला हवं हे ज्याला कळतं, त्याच्याच चांगुलपणाला काही अर्थ असतो. धैर्य किंवा खरा बेडरपणा त्यालाच म्हणता येईल, ज्या धैर्याला तौलनिक बुद्धीचा, सारासार विचारांचा भक्कम आधार असतो." (मनातलं अवकाश, पृ. ३१) कोणत्या माणसाला चांगला म्हणता येईल यावर हे विचार प्रकट झाले आहे. 'निरूद्देश', 'बंडखोर', 'प्रवाह ओलांडता, आलांडता' सारखे त्यांचे लेख वाचकांना विचार करायला भाग पाडणारे आहे.

लेखिकेचे मन निसर्गाशी एकरूप होताना दिसते. त्यांनी निसर्गाला मानवी भावभावनांची जोड दिली आहे. माणसाहून निसर्ग त्यांना जास्त समंजस वाटतो. किंबहुना माणसांची कुत्सित बुद्धि त्यांना अस्वस्थ करते. माणूस असा का वागतो यातून त्यांच्या चिंतनाला सुरुवात होते. आणि या चिंतनातून त्यांचे जीवनावश्यक विचार प्रकट होत जातात. त्यांच्या चिंतनाला संवेदनशीलतेची जोड आहे. त्यांच्या अनुभवातील सूक्ष्मता, त्यांची अभ्यासू वृत्ती, त्यांच्या विचारातील वेगळेपणा वाचक मनाला स्पर्श करणारा आहे.

### ३.४.२ आत्माविष्कार

लेखिकेच्या ललित लेखनातून त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि आशय यांचे एकरूपत्त्व दिसून येते. जीवन जगत असताना त्यांनी अनुभवलेल्या विषयांना लेखनाद्वारे स्पर्श करत असताना

त्यातून नकळतपणे त्यांचे व्यक्तिमत्त्वही उलगडत जाते. सुनीता देशपांडे या स्पष्ट, निर्भय होत्या. याचा प्रत्यय त्यांच्या अनेक लेखांच्या आशयातून येतो. उदाहरणात, 'निमित्त १२ मार्च ' या लेखात त्या लिहितात, "स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात ही मूल्यांची घसरण नैसर्गिक गतीने होत होती, त्यामुळे ती फारशी जाणवली नाही. पण इंदिरा गांधींनी ताळतंत्रच सोडला. खरे तर बांगलादेशाच्या निर्मितीनंतर इंदिराबाईंची लोकप्रियता शिखराला पोचली होती. त्यानंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्या पक्षाला आणि त्यांच्या स्वतःच्या पंतप्रधानकीच्या स्थानाला यत्किंचितही धोका संभवत नव्हता. पण देशाच्या हिताची, प्रजेच्या कल्याणाची, अजिबात काळजी न करता सत्तेचे राजकारण खेळणाऱ्या या बाईंनी संजय गांधीसारख्या आपल्या अत्यंत बेजबाबदार मुलाला पाठीशी घालून अनेक भ्रष्ट मार्गांचा अवलंब केला." (मण्यांची माळ, पृ. ५५) स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळातील भ्रष्टाचाराला इंदिरा गांधी कशा जबाबदार होत्या हे त्यांनी स्पष्ट व बेधडक शब्दात पटवून दिले आहे. या उताऱ्यातून त्यांचा स्पष्टपणा व निर्भयता या गुणांचा प्रत्यय येतो.

### ३.४.३ काव्यात्मकता

लेखिकेचे लेखन काही ठिकाणी काव्याची पातळी गाठताना दिसते. अनुभव कथनातील साधेपणा आणि काही ठिकाणी आलेली लयबद्ध वाक्यरचना त्यांच्या लेखनाला काव्यात्मकता प्राप्त करून देताना दिसते. निसर्गातील मनमोहक दृश्याची वर्णने त्यांनी काही ठिकाणी अचूकपणे टिपली आहे. निसर्गाचे सौंदर्य उपभोगण्याचा योग आपल्या जीवनात अनेकवेळी आला हे सांगत असताना लेखिका लिहितात, "दवबिंदूच्या एवढयाशा आयुष्यात कोवळया सूर्यकिरणांचं इंद्रधनुष्य चमकून जावं, नदी उगम पावावी, दोंगरांनी ताठ मानेनं संसरा थाटावेत, उत्तम जूळवलेले तंबोरे छेडले जात असताना त्यांतून फुलणाऱ्या गाण्यासारखी, समुद्राच्या गाजेच्या सुरावर किनाऱ्यावर येणाऱ्या जाणाऱ्या लाटांच्या फेसाच्या रंगीबेरंगी फुलांची पखरण होत राहावी, अशा असंख्य निर्मितींशी कसलही संबंध नसताना, हे सारं वैभव वेळोवळी भोगण्याचे योग माझ्या आयुष्यात अनेकदा येत राहिले आणि 'अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशिल दो कराने' अशी संधी माझ्या आयुष्यात वरचेवर मिळत

राहिली." (मनातलं अवकाश, पृ.२२) निसर्गातील अशा सुंदर निमितींची वर्णने त्यांनी अचूक व तरल शब्दांत मांडली आहे. काही ठिकाणी आलेले असे भाषिक सौंदर्य वाचकांना आनंदित करणारं आहे.

## ३.४.४ चिंतनशीलता

चिंतनशीलता हे लेखिकेच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. बऱ्याच ठिकाणी त्यांच्या लेखनात चिंतनशीलतेचा प्रत्यय येतो. माणूस आणि निसर्ग त्यांच्या लेखनात चिंतनाचा विषय बनला आहे.

त्यांना निसर्गाविषयी आदर आहे. त्यांच्या मते निसर्ग हा माणसाहून समंजस असतो. अशा निसर्गाची विल्हेवाट लावणाची माणसांची प्रवृत्ती त्यांना निसर्गाच्या भवितव्याविषयी आणि माणसाच्या वाईट कृतीविषयी विचार करण्यास भाग पाडते. लेखिका लिहितात, "प्रत्येक ऋतू येणाऱ्या ऋतूच्या स्वागताची जय्यत तयारी करत करतच निरोप घेत असतो. वनस्पतिसृष्टी इतकी सुसंस्कृत, समंजस असताना आपण माणसच अविचारी का होतो? ती झाडं तोड तोड का तोडतो? झाडं स्वतःची फळदेखील स्वतःच न खाता पाखरांसाठी, आपल्यासाठी धारण करतात, पिकेपर्यंत त्यांचा भार वाहतात, कीड–मुंगी–शाकाहारी जनावरं, माणसं सगळयांच्या भूक भागवत असतात. त्यांना लाभलेलं त्यांचं आयुष्य त्यांना जगू न देता झाडांची 'लाकडं' करण्याचा अधिकार आपल्याला कुणी दिला? माणसाला लाभलेल्या बुद्धीची प्रगती ही अधिक प्रमाणात विध्वसांच्या दिशेनेच व्हायला हवी का?" (मण्यांची माळ, पृ. ८१) निसर्गाचे गुर्णधर्म सांगत असताना लेखिका माणसाच्या विकृत प्रवृत्तीवर चिंतन करताना दिसतात. चिंतनशीलतेमुळे त्यांचे लेखन वैचारिक पातळी गाठताना दिसते. एकंदरीत त्यांचे अधिकशे लेखन विचारांनी व्यापलेले आहे.

## ३.४.५ घटनांचा संदर्भ

लेखिकेच्या ललित लेखनाला घटनांचा संदर्भ आहे. त्यांच्या जीवनात घडलेल्या घटना प्रसंगांचा, अनुभवांचा आविष्कार त्यांच्या लेखनात झाला आहे. जीवन जगत असताना त्यांनी जसे अनुभव घेतले तसेच ते अनुभव अभिव्यक्त केले आहे. यातून त्यांचे अंतरंग, त्यांच्या मनाच्या अवस्थांचे नेमके दर्शन घडते.

'होते म्हणून स्वप्न एक..' या लेखात लेखिकेने बेचाळीस सालच्या स्वातंत्र्य लढयावेळी त्यांच्यावर ओढवलेल्या जीवघेण्या प्रसंगाची नोंद घेतली आहे. रात्रीच्यावेळी मुंबईहून शिवाजी पार्कला येत असताना लेखिकेच्या शेजारच्या मोकळया जागेवर एक माणूस येऊन बसला. कोहिनूर मिलपाशी उतरून खोलीवर जाण्यासाठी त्या दुर्गाप्रसादच्या दिशेने चालत असताना त्या गल्लीवजा छोटया रत्यावर अगदी सामसूम जागेत तो माणूस त्यांच्याच मागून येतोय हे कळताच त्यांना वाटलेली भिती, धावत इमारतीपाशी पोहचल्यावर त्या माणसाच्या छातीवर जोरात मारलेली लाथ अशा भयभीत करणाऱ्या प्रसंगाचे हुबेहूब वर्णन लेखात आले आहे.

## ३.४.६ व्यासंग

साहित्यिकाच्या व्यासंगाची कक्षा जेवढी मोठी तेवढेच त्याचे लेखन अधिक परिणामकारक बनते. त्यामुळे साहित्यिकाचा व्यासंग महत्त्वाचा असतो. साहित्य लेखनासाठी प्रतिभेची आवश्यकता असते. त्यासाठी वाचन महत्त्वाचे असते. असे अफाट वाचन लेखिकेने केले आहे. त्यांच्या लेखनातून त्यांची अभ्यासू वृत्ती निदर्शनास येते. लेखिका स्वतः लिहितात, "कवितेशी आणि एकूणच पुस्तकांशी दोस्ती झाली की आपलं आयुष्य हळूहळू अधिकाअधिक समृद्ध होत जातं असं मला फार वाटते." (मण्यांची माळ, पृ. ११४) त्यांना वाचनाची आवड होती. त्यामुळे त्यांच्या लेखनाने मराठी साहित्यात निश्चितपणे भर घातलेली जाणवते. लेखिका मंगला गोडबोले आपल्या 'सुनीताबाई या पुस्तकात लिहितात, "संदर्भाची समृद्धी आणि चिंतनशीलता ही त्यांच्या लेखनाची दोन मोठी बलस्थानं आहेत. त्यांनी वेगवेगळया कारणानं विपुल आणि व्यामिश्र जीवनानुभव मिळाला किंवा त्यांनी अथक धडपडीतून तो मिळवला

असही म्हणता येईल."[५] लेखिकेने अनेक कवितांची पुस्तके अभ्यासली होती. याचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून वेळोवेळी येतो. त्यांच्या लेखनात अनेक कवितेतील ओळी आल्या आहेत. संस्कृत, इंग्रजी, हिंदी भाषेतील कितीतरी वाक्ये त्यांच्या लेखनात वाचायला मिळतात.

लेखिकेला निसर्गाची ओढ होती. त्यामुळे त्यांनी अनेक निसर्गप्रेमी यांच्या पुस्तकांचे वाचन केले होते. याची साक्ष म्हणजे त्यांचा 'महात्मा थोरो' हा लेख. त्यांचे लेखन पाहिले तर अफाट वाचनाने त्यांचे व्यक्तिमत्त्व परिपक्व झाले आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

त्यांच्या लेखनात अनेक संदर्भ आले आहेत. उदाहरणात, 'महात्म थोरो' या लेखात रानावनात राहून आनंद घेत त्या रानावनांशी मैत्री करणारे किंवा त्याला आपलसं करणारी काही माणसं असतात हे सांगण्यासाठी त्यांनी जॉन मूर यांची वाक्ये संदर्भासाठी घेतली आहे. "रानातला एखादा महावृक्ष उभा राहायला चारपाचशे वर्षं लागतात, पण तोच चारपाच मिनटांत पाडता येतो. जॉन मूरच कुठे तरी म्हणाला होता. जगाच्या पाठीवर सगळेच वावरतात, पण गाभ्यात शिरुन अंतरंग जाणून घेण्यात त्यांना फारसा रस नसतो. असा सर्वांगाने खोलवर विचार करण्याची कळकळ आणि पात्रता मोजक्याच लोकांना असते." (मण्यांची माळ, पृ. १०४) अशाप्रकारचे अनेक संदर्भ त्यांच्या लेखनात आले आहे. त्यांचे अफाट वाचन आणि त्यांना अनेक साहित्यिकांचा लाभलेला सहवास यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अधिक भर पडली आहे.

## ३.४.७ भाषाशैली

सुनीता देशपांडे यांची भाषा वैचारिकतेकडे झुकलेली असून काही प्रमाणात काव्यमय झालेली जाणवते. त्यांच्या भाषेमुळे त्यांच्या हळूवार मनाचे दर्शन घडते. कल्पना, संवेदना, भावना त्याचबरोबर आलेले चिंतन इत्यादींतून त्यांचे लेख अवतरले आहे. त्यांनी जे लेखन केले ते सहज, प्रांजळ असल्याकारणाने, त्यांच्या जीवनविषयक भाष्याने वाचक वर्ग अंतर्मुख होतो. असे म्हटले जाते की, साहित्यिकाचे पांडित्य त्याच्या भाषेपेक्षा त्याच्या भाषेतून प्रकट झालेल्या विचारात सामावलेले असते. साहित्यिकाच्या भाषेतील जिव्हाळा त्या त्याच्या सतेज चैतन्यमय व्यक्तिमत्त्वाची साक्ष पटवतो. अशाप्रकारची लेखिकेची भाषा आहे. त्यांच्या भाषेत जबर जोश आहे. तसेच भावनांचा उचंबळा आहे. तशीच त्यांची भाषा वाचकाला विचार करण्यास भाग

पाडणारी आहे. त्यांच्या लेखनात निसर्गाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. काही ठिकाणी त्यांनी आपल्या लेखनात स्त्रीमनाचा शोध घेतलेला जाणवतो. अशा वेळी त्यांची भाषा आशयानूसार नाजूक, उत्कट बनते, तर कधी चिंतनशीलतेचे रूप धारण करताना दिसते. त्यांच्या भाषेतून त्यांची सोशिक, समंजस, त्यागी, चिंतनशील, भावनाशील वृत्तीचे दर्शन घडते. अफाट वाचनामुळे त्यांच्या भाषेत कवितेच्या ओळी आलेल्या दिसतात.

सुनीता देशपांडे या बहुश्रृत, जिज्ञासू, स्पष्टवक्ता, सामाजिकभान असलेल्या, सखोल विचार करणाऱ्या लेखिका आहे. 'पाणी' या लेखामध्ये त्या लिहितात, "क्षणार्धात प्रेक्षकांची वाचा बंद करून कानठळया बसवणारे धबधबे! त्या पाण्याला थकवा येत नसेल का? वाटेतले खडक किंवा गाळसाळ इजा करत नसतील का? वर्षान वर्षे फक्त वाहत राहण्याचा कंटाळा येत नसेल का? आपण सपनात तर नाही ना? भुटाटकी, मायाजाल वगैरे सगळं खोटं आहे, हे नक्की ना?" अशा प्रश्नार्थक शैलीचा वापर त्यांनी बहुतेक सगळयाच लेखांमध्ये केला आहे.

## विचारगर्भीत वाक्ये

लेखिकेच्या लेखनात कितीतरी विचारगर्भीत वाक्ये आली आहे. जी वाचकांना जीवन जगण्यासाठी बळ, विश्वास देणारी आहे. उदाहरणात—

'जन्म आणि मृत्यू! यांचाच विचार केलातर कुठे यायचे आणि कधी जायचे हे आपल्या इच्छेवर किंवा आपल्या हाती नसते.'

'विहिरीत पडलेलं चंद्राचं प्रतिबिंब, बालदीतून वर काढता येत नसतं'

'होत्याचं नव्हतं करायला त्या अखंड काळातला तो एकक्षणही पुरेसा असतो.'

'खरा मोठेपणा किती साधा असतो! एखाद्या निरागस बालकासारखा.'

'धैर्याचा परिस्थितीशी फार संबंध असतो.'

'आत्मविश्वास आणि धैर्य यांच्यासारखे पाठीराखे दुसरे कुणीही नाही.'

'ओढ असेलतर चाल सुरू होते आणि मग वाट सापडू लागतात.'

'उत्तम स्वार्थ साधण्याचा मार्ग देखील विचारपूर्वकआखावा.'

## म्हणी

आशय अधिक उत्तमरित्या स्पष्ट करण्यासाठी साहित्यिक आपल्या लेखनात म्हणींचा वापर करत असतो. हे तंत्र लेखिकेनेही वापरलेले दिसून येते. त्यांनी वापरलेल्या म्हणी उदाहरणादाखल खाली दिल्या आहे.

'बळी तो कान पिळी'

'उरला दिवस अल्प, घोडे थकून चूर'

'स्पर्शाची भाषा स्पर्शालाच कळावी'

'धुळीच्या कणाला महाभूतांची सोबत!'

'जुनं ते सोनं'

## संवाद

इतर साहित्यप्रकाराप्रमाणे निबंध लेखनातही कधी कधी संवादांचा वापर केला जातो. संवादातून बोलण्यातील भाव लवकर लक्षात येत असतो. असे संवाद लेखिकेच्या लेखनात अधूनमधून आले आहेत.

लेखिका आणि त्यांचे पती पु. ल. देशपांडे हे जरी लग्नाच्या बंधनात एकत्र होते तरी त्यांच्या स्वतंत्र विचारामुळे ते एकमेकांपासून मनातून दुरावलेले होते. पुलंनी आपल्या आजारपणाबद्दल सुनीताबाईना कळू दिलं नव्हतं याचे दुःख सुनीताबाईला लागून राहिले होते. पुलंच्या निधनानंतर पुलंच्या आठवणीने लेखिकेचे मन भावनाशील होते. 'एक पत्र' या लेखात आपल्या भावना व्यक्त करताना लेखिका लिहितात, 'असे आम्ही सगळे जवळपास असताना, पोरक्यासारखी, ज्या तऱ्हेने आणि ज्या परिस्थितीत तुम्ही मुत्यूच्या दिशेची वाट धरलीत, ते पाहता दुसरे काय म्हणावे?'

पॅरीसच्या मुक्कामात लेखिका व पुलंबरोबर माधव आचवलही पॅरिसला गेले असता तिथे राहण्यासाठी खोली घ्यायला जातात. त्यावेळी त्या हॉटेलची मालकिण हे वाक्य माधव आचवलांना उद्देशून म्हणतात, ‘तुला कुणी सांगितलं एकटं राहायला? तूही दुसऱ्या कुणाला सोबतीला घेऊ शकतोस’

माधव आचवल यांना विदेशी भाषा शिकण्याची आवड होती. परंतु फ्रेंच भाष्या शिकायला त्यांना जमले नाही. त्यांचे फ्रेंच भाषेवर प्रभुत्व नसल्याची त्यांची हळहळ खालील संवादातून व्यक्त झाली आहे. माधव आचवल लिहितात, ‘आम्ही कुठ ही यांच्यापेक्षा कमी नाही. पण ते सिध्द करायला साली ही भाषा आड येते! तो वैतागून सांगत होता.’

## कवितेच्या ओळी

लेखिका जितक्या निसर्गावर प्रेम करायच्या तितक्याच मानाने त्यांना कविताही भावायच्या. त्यांच्या अनेक लेखांत कवितेच्या ओळी आलेल्या आहेत. अशा ओळींमुळे त्यांच्या भावना वाचकांपर्यंत लगेच पोहचायला मदत होते. इतकेच नव्हे तर स्मृतीरूपाने दडलेल्या कविता पुन्हा आठवून त्यांच्या मनाला आनंद लाभण्याची शक्यता आहे.

‘इकडे तिकडे चोहिकडे’

‘अस्फुट विश्वाचें, प्रेमाचें गाणें आनंदाचें’

‘हे देवा घरचे लेणें, नशिबाने देणे—घेणे’

‘महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती’

‘काढ सखे गळयातील तुझे चांदण्याचे हात, क्षितिजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत’

## ३.५ सुनीता देशपांडे यांच्या लेखनाचे वेगळेपण

ललित निबंधात आत्माविष्काराला महत्त्व असल्याकारणाने इतर साहित्यप्रकार न हाताळता लेखिकेने 'ललित निबंध' हा साहित्यप्रकार हाताळला. त्यांचे ललित निबंध लेखन आंतरिक उमाळयातून झाले आहे. दैनंदिन जीवनातील सर्वसामान्याना अनावश्यक वाटणाऱ्या त्यांच्या स्वतःच्या विविध आठवणी, अनुभवांना, भावनांना, विचारांना त्यांनी आपल्या ललित लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखिकेचे सगळे लेख पूर्व स्मृतीने ओतप्रोत भरलेले आहे. वैयक्तिक जीवनातील आठवणी सांगण्यात त्या गर्क झालेल्या दिसतात. शाळकरी वयातील अनुभव, स्वातंत्र्य लढयात भाग घेतल्यावेळचे अनुभव, स्वतःच्या वैवाहिक जीवनातील अनुभव–आठवणी, वाचनातील अनुभव, निसर्ग सहवासातल्या आठवणी, प्रवासातील आठवणी, सहवासात आलेल्या माणसांचे अनुभव आठवणी या साऱ्यातून त्यांचे लेख तयार झाले आहे. त्यामुळे त्यांच्या ललित निबंध लेखनाचा आढावा घेतला तर "स्वतःचं वाचन, ज्येष्ठांचा–नामवंतांचा सहवास, मोठया कलाकारांबरोबर आदानप्रधान, देशपरदेश भटकंती या सर्व कारणामुळे सुनीताबाईपाशी श्रीमंत अनुभवाचा मोठा साठा जमला."[६] हे लेखिका मंगला गोडबोले यांचे त्यांच्याविषयीचे मत सार्थ ठरताना दिसते.

सुनीता देशपांडे हे एक बहुचर्चित व्यक्तिमत्त्व. त्यांच्या ललित लेखनाविषयी अरुणा ढेरेही लिहितात, "त्यांनी लिहिलं ते त्यांच्या भवतीच्या, सहवासातल्या मोजक्या माणसांविषयी आणि झाडा–पानांच्या, मुक्या प्राण्यांच्या, चंद्र–ताऱ्यांच्या अशा या सृष्टीविषयी. आणखी नेमकं सांगायचं तर त्यांनी लिहिलं सृष्टीच्या आणि माणसांच्या त्यांनी घेतलेल्या अनुभवांविषयी, त्यातून त्यांच्या मनात उमटणाऱ्या विचार–भावनांच्या तरंगांविषयी आणि स्वतःचा शोध घेण्यात असणाऱ्या त्या सगळयाच्या सामीलकीविषयी. खरं तर वेगवेगळया निमित्तानं त्या स्वतःलाच लिहित होत्या आणि त्या होत्या अत्यंत कसदार. बुद्धिमान. तरल सौंदर्य जाणिवांनी ओतप्रोत. जीवनाच्या गुंत्यात उतरण्याची तयारी असणाऱ्या निर्भय आणि चिंतनशील. म्हणून त्यांचं ते लिहिणं म्हणजे त्यांच्या एकांतातलं जे इतरांशी आणि स्वतःशी बोलत राहणं होतं, त्याचाच पर्याय होता. त्यांच्या जातीच्या माणसांमध्ये अत्यंत दुर्मिळ अशी

जी गुणसूत्रं साडतात, तशी गुणसूत्रं काही अंशी ज्यांच्यामध्ये आहेत आणि असतील त्यांना भावणारं, हेलावून टाकणारं ते लेखन होतं."[७] त्यांचे लेखन विपुल नसले तरी त्यांच्या मोजक्याच शब्दकळेने वाचकांचे मन वेधून घेतलेले दिसून येते. आठवणी, अनुभवांची समृद्धी आणि चिंतनशीलता व त्यातील विचार यामुळे त्यांच्या लेखनाला निराळे रूप प्राप्त झालेले दिसते. त्यांच्या विचारांना भावनांची साथ आहे.

एका स्त्री लेखिकेने केलेले लेखन म्हणून हे लेखन महत्त्वपूर्ण वाटते. स्त्रीजीवनातील भावभावनांची स्पंदने त्यांच्या लेखनातून व्यक्त होतात. लेखिका व त्यांचे पती पु. ल. देशपांडे यांचे कोरडे नातेसंबंध लेखात विवृत होताना दिसतात. अशा सारख्या लेखांमध्ये त्यांच्या संवेदनशील मनाचे दर्शन घडते. त्यांचे बरेचसे लेख पुलंच्या मृत्यूनंतर लिहिले आहेत. या घटनेनंतर लेखिकेला आलेलं एकटेपण, उदासी भावना, चिंतनशीलता बहुतेक लेखांमध्ये आढळते. त्यांच्या लेखातून त्यांच्या मनातील दुःख, वेदनेची भावना व्यक्त होते. तिथे जाणवणाऱ्या उदासीनतेमुळे त्यांचे लेखन नैराश्येकडे झुकलेले दिसते.

लेखिका दुर्गा भागवत, कुसुमावती देशपांडे अशा सारख्या लेखिकांच्या निबंध लेखनात भरभरून निसर्ग सौंदर्य चित्रित केलेले जाणवेल. त्या मापाने सुनीता देशपांडे यांच्या निबंधामध्ये काही प्रमाणात निसर्गसौंदर्य येऊन, निसर्गाची विल्लेवाट लावणारा मानव स्वभाव अधिक प्रमाणात चित्रित झालेला दिसतो.

लेखिकेने निसर्ग केवळ पाहिला नव्हता; तर तो निसर्ग पूर्णतया अनुभवलाही होता. त्यामुळे त्यांचे मन विचारप्रवण होते. निसर्गसौंदर्य चित्रित करत असताना त्यांचे विचारही तितक्याच प्रभावितरित्या लेखात व्यक्त होताना जाणवतात. मानव व निसर्ग यांच्या नात्याचा शोध घेण्यासाठी त्यांचे मन त्यांना प्रवृत्त करताना दिसते. माणसाने निसर्गाकडे मित्रत्वाच्या नात्याने पाहिले असते तर आजच्या युगात माणसाकडून निसर्गहानी झाली नसती. असा लेखिकेने दिलेला संदेश लेखक वि. स. खांडेकरही आपल्या 'नाना वृक्षा वसुंधरा' या लेखात देताना दिसतात. ते म्हणतात की मनुष्य हा निसर्गाचा शत्रू नसून मित्र आहे. हे यांत्रिक युगाच्या धावपळीत आजच्या माणसाला समजत नाही. ही समज जर माणसाला असती तर जशी प्राचीन काळातील ऋषींच्या जीवनात या निसर्गाने उदात्तता आणली होती तशी आजच्या पंडितांच्या आणि कलावंतांच्या आयुष्यातही प्रकट झाली असती. निसर्ग आणि माणूस

एकमेकांचे शत्रू नसून मित्र आहे. या विचाराचे साम्य लेखिका आणि वि. स. खांडेकर यांच्या निसर्गविषयक लेखनात दिसून येते. जीवन, मानव, निसर्गाबद्दल स्वतःची मते त्या व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या मनाची कोवळीकता त्यांच्या लेखनात वेळोवेळी जाणवत राहते.

लेखिकेच्या ललित लेखनात वैचारिक परिपूर्णता आहे. त्यांच्या लेखनात जीवनासंबंधी तत्त्वज्ञान आले आहे. त्यातून त्या वाचक मनाला नवी दृष्टी देताना दिसतात. माणूसकी, सहानभूती, भावना, निसर्गप्रेम वगैरे पैलू त्यांच्या लेखनातून वेळोवेळी व्यक्त झाले आहेत. मनाचा प्रामाणिकपणा, प्रांजळपणा त्यांच्या लेखनात जागोजागी आढळून येतो.

लेखिकेचे लेखन लौकिक अनुभवातून चराचरातल्या अंतर्मुख करणाऱ्या अनुभवांकडे वाटचाल करते. एखाद्या गोष्टीच्या गाभ्याला, मर्माला महत्त्व देणारे त्यांचे लेखन आहे. अतिशय गंभीरपणे अनुभवांच्या प्रामाणिकपणातून त्यांचे लेख अवतरलेले दिसते. वास्तवता त्यांच्या लेखामध्ये जाणवते. आशयाला अनुसरून, योग्य अशी उदाहरणे, संदर्भ देऊन वाचकांना उपदेश, मार्गदर्शन करण्याची भूमिका त्यांनी घेतलेली दिसते.

लेखिकेच्या लेखनात अल्प प्रमाणात काव्यात्मकता डोकावते. कृत्रिम लालित्य त्यांच्या लेखनात कुठेच दिसत नाही. त्यांच्या प्रत्येक लेखात त्यांच्या विचारांनी जागा घेतली आहे. त्यांनी मांडलेले विचार वाचक मनाला बौद्धिक आनंद देतात. परंतु ते विचार सुसुत्रपद्धतीने न आल्याने लेखांना विस्कळीतणा आणताना दिसतात. त्यांचे काही लेख दिर्घ स्वरूपाचे झाले आहे. त्याचबरोबर लेखनात कीतीतरी प्रश्न जागोजागी आले आहे ज्यांची उत्तरे शोधण्याचे काम त्यांनी वाचकांवर सोपवलेले दिसते.

ललित निबंध लेखनाला आवश्यक तेवढं अंगभूत लालित्य लेखिकेच्या लेखनाला लाभलं नसून ते जास्तसे वैचारिकतेकडे झुकणारे आहे. अशा काही उणीवांमुळे त्यांचे लेखन आजच्या ललित निबंध लेखनाहून थोडया वेगळया वाटेने जाणारे आहे.

## ३.६ निष्कर्ष:

१. सुनीता देशपांडे यांचे अनुभवविश्व व्यापक व सखोल आहे. वास्तव स्वरूपाचे अनुभव लेखात व्यक्त झाले आहे.

२. लेखिकेच्या ललित निबंध लेखनात विविध स्तरावरचे अनुभवविश्व दिसून येते. बालपणातील आठवणी, निसर्गविषयक लेखन, त्यांचा चित्रपट क्षेत्रातील अनुभव स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यावेळी आलेले अनुभव–आठवणी, वाचनातील विविध संदर्भ, त्यांना भेटलेली माणसे अशा विविध विषयांवर लेखिकेने लिहिले आहे.

३. आत्मपर लेख, निसर्गवणनपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, साहित्यविषयक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशा उपप्रकारांना सामावून घेणारे लेखिकेचे ललित लेखन आहे.

४. लेखिकेने आपल्या निसर्गविषयक लेखनात केवळ निसर्गसौंदर्य रेखाटले नसून मानव व मानवेतर सृष्टी यांचे आपआपले स्वतंत्र व्यवहार व मानव आणि निसर्ग यांचा एकमेकांशी असलेला संबंध दाखवला आहे. निसर्गसौंदर्य रेखाटत असताना निसर्गासाठी घातक ठरलेल्या विध्वंसक मानवी प्रवृत्तीचे चित्रणही लेखनातून झाले आहे.

५. लेखिकेने अनेकक्षेत्रातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली असून साहित्य, संगीत क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे अधिक प्रमाणात लिहिली आहे. त्यांच्या या लेखनात व्यक्तींशी असलेले वैयक्तिक संबंध अधिक स्पष्ट झाले आहेत. व्यक्तींच्या कार्यकतृत्त्वाचा आढावा घेत व्यक्तींच्या गुणांचे अधिक विश्लेषण तर दोषांचे मूल्यमापन कमी प्रमाणात केले आहे. त्याचबरोबर या लेखनातून लेखिकेचे स्वतःचे व्यक्तिचित्र नकळतपणे उमटत गेले आहे.

६. संस्कृत, मराठी, इंग्रजी या भाषांतील साहित्य वाचनाचे पडसाद लेखिकेच्या लेखानात उमटलेले आहेत. साहित्यकृत्तीच्या रसग्रहणातून त्यांना भावलेला अर्थ त्यांनी लेखात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

७. प्रस्तुत लेखिकेच्या लेखनात त्यांच्या आयुष्यातील सुख दुःखाचे क्षण, आशा निराशा, जयपराजय अशा सगळया गोष्टींचा आलेख येतो. आंतरिक उर्मीतून हे लेखन झालेले दिसून

येते. लेखिकेने स्वतःला सुखी करण्यासाठी किंवा त्यांचे एकटेपण घालवण्याकरिता हे लेखन केले आहे किंवा असे वाटते की हे सगळे व्यक्त करण्याची त्याची मानसिक गरज होती.

८. इतर लेखकांच्या निसर्गविषयक लेखनाचा आढावा घेत असताना त्या लेखकांच्या मनाचा शोध लेखिकेने घेतला आहे. त्यांच्या या लेखनाने चिंतनाची पातळी गाठली आहे.

९. निर्भयता, अंतर्मुखता, विचार मग्नता, संवेदनशील, सहनशील, रसिक, विचारशील, तत्त्वजिज्ञासू, चिंतनात्मक वृत्ती, प्रज्ञावंत, अभ्यासू, जिज्ञासू, निसर्गप्रेमी, माणसांविषयी जिव्हाळा, माणूसकी, प्रामाणिकपणा, प्रवासाची हौस ही लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये त्यांच्या ललित निबंधाद्वारे जाणवतात.

१०. लेखिकेचे लेखन कोणत्याही गोष्टीतल्या वरवरच्या रूपगुणांपेक्षा त्या गोष्टीच्या गाभ्याला, मर्माला महत्त्व देणारे आहे.

११. माणूसपणाचा शोध घेणे हे प्रस्तुत लेखिकेच्या लेखनाचे सूत्र आहे.

१२. आत्माविष्कार, चिंतनशीलता, घटनांचा संदर्भ, व्यासंग व भाषाशैली असे वाङ्मयीन विशेष त्यांच्या लेखनाला लाभले आहे.

१३. लेखिकेच्या ललित लेखनाची भाषा सरळ, साधी असून संवेदनशील, भावनाशील झालेली दिसते. त्यांच्या लेखनात अगदी अल्प प्रमाणात काव्यात्मकशैलीचे दर्शन होते. हे लेखन जास्त प्रमाणात वैचारिकतेकडे झुकले आहे. श्रृतयोजने आणि विचार लेखनात आल्यामुळे त्यांचे लेखन वाचक मनाला नवी दृष्टी देणारे ठरते. परंतु विचारांमधली स्वैरता यामुळे लेखात आलेला विस्कळीतपणा आणि काही लेखांची प्रदीर्घता वाचक मनाला खटकणारी आहे.

१४. लेखिकेचे लेखन संवेदनशीलते बरोबरच विचारांना स्पर्श करणारे असल्याकारणाने ललित निबंधाच्या प्रवाहात आपली वेगळी अशी नाममुद्रा उमठवत असताना दिसून येते.

## ३.७ संदर्भ सूची:

१. गोडबोले मंगला, 'सुनीताबाई', राजहंस प्रकाशन पुणे, २०१९, पाचवी आवृती, पृ. ७३

२. तत्रैव, पृ. १९

३. दाभाळे जे. आर, हिरवे आर एस, 'सामाजिक मानसशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., पृ. ५१

४. कुलकर्णी विष्णु नारायण, 'मराठी ललित साहित्यातील निसर्ग', मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, नोव्हेंबर १९७२, पृ. ७२२

५. गोडबोले मंगला, 'सुनीताबाई', उनि, पृ. ९३

६. गोडबोले मंगला, 'सुनीताबाई', उनि, पृ. ९३,९४

७. तत्रैव, पृ. १८१

# प्रकरण चौथे

# इंदिरा संत यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

## प्रकरण चौथे

# ४. इंदिरा संत यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

## ४.१ प्रास्ताविक

इंदिरा संत यांनी मराठी साहित्यात विशेष स्वरूपाची कामगिरी केली आहे. रविकिरण मंडळात प्रगल्भ जाणिवांनी प्रभावी कविता लेखन केल्याने मराठी साहित्यात त्यांची ओळख उल्लेखनीय ठरली आहे. लेखिकेने कविता लेखनाबरोबरीने उत्कृष्ट दर्जाचे ललित लेखनही केलेले दिसून येते. त्यांचे ललित निबंध लेखन म्हणजे त्यांच्या आयुष्यातील असंख्य आठवणी–अनुभवांचा संग्रह आहे. या प्रकरणामध्ये त्यांच्या ललित निबंध लेखनाचा अभ्यास केला आहे.

## ४.२ इंदिरा संत यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

इंदिरा संत यांच्या ललित लेखनाची सुरुवात वृत्तपत्रीय लेखनाच्या माध्यमातून झाली. कोल्हापूरच्या 'रविवार सकाळ' साठी १९८४ साली साठ आठवडे 'सकाळ' च्या लेखक परिवाराच्या सांगण्यावरून लेखिका ललित लेखनाकडे वळल्या. या अगोदर त्यांनी कविता, कथा अशा प्रकारचे लेखन केले होते. सदरासाठी लिहिलेल्या लेखातून त्यांच्या ललित लेखनाला सुरुवात झाली असली तरी ललित लेखन हा वाङ्मयप्रकार त्यांना मनापासून आवडत होता. हे त्यांच्या पुढील वाक्यांतून जाणता येते. लेखिका आपल्या 'मृद्‌गंध' या ललित लेख संग्रहाविषयी लिहितात, "ललित लेखन हे गद्य लेखन असले तरी काव्याच्या अंगाने जाणारे आहे. त्याचा एकूण गाभा लालित्य असतो. कोणत्याही विषयाचा आविष्कार असो. तो ललित शैलीतच असावा, असे वाटते. ललित लेखात विषयाची मांडणी सुखद सुंदर आणि कलात्मक हवी असते. ज्यांनी सरस्वतीच्या पायांशी ही ललित फुले प्रथम वाहिली, त्या ना. सी. फडके यांच्यापासून आजपर्यंतच्या ललित लेख लिहिणाऱ्यांनी हे सिद्ध केले आहे, असे म्हणायला हरकत नाही. लेखनाच्या आविष्काराचा हा प्रकार माझा फार आवडता आहे. म्हणूनच 'कोल्हापूर सकाळ' मधील माझे 'सदर' स्वरूपातले लेखन केवळ 'सदर' या रूपात न राहता, 'मृद्‌गंध' या नावाने पुस्तक रूपात आले आणि ललित लेख म्हणून मानले गेले, असे मला

वाटते.” (मृद्गंध, पृ. १७) लेखिकेला ललित लेखन या प्रकाराच्या रूप आकाराची पूर्णता जाण होती. त्याचबरोबर त्यांच्याकडे असलेली प्रतिभाशक्ती, आविष्काराची शैली, ‘सकाळ’ या वार्ता हरच्या परिवाराकडून मिळालेले प्रोत्साहन आणि साहित्यप्रकाराची आवड या गोष्टी त्यांच्या ललित लेखनाच्या निर्मितीस प्रेरणा ठरल्या.

## ४.३ इंदिरा संत यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

‘मृद्गंध’ (१९८६) आणि ‘फुलवेल’ (१९९७) हे त्यांचे दोन ललित निबंधांचे संग्रह प्रकाशित झाले आहेत. केवळ दोन लेखसंग्रह असले तरी त्यामधील लेखांची संख्या एकूण ९० आहेत. त्यांचे लेख म्हणजे त्यांच्या जीवनातील अनुभवांचे, त्यांच्या सभोवतालच्या जगाचे, त्यांनी अनुभवलेल्या निसर्गाचे, सहवासात आलेल्या माणसांचे, वाचनात आलेल्या साहित्यातील टिपत गेलेल्या गोष्टींचे पडसाद आहेत.

त्यांचे दोन्ही संग्रह अभ्यासल्यानंतर आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशाप्रकारचे लेख त्यांनी लिहिलेले आढळले. या गटांनुसार त्यांच्या लेखांच्या आशयाचा अभ्यास या भागात केला आहे.

### ४.३.१ आत्मपर लेख

लेखिकेच्या आत्मपर लेखांमध्ये बालपणातील आवडीनिवडी, छंद, घराच्या गोड आठवणी, मुलांच्या आठवणी, संतानी आणि त्यांनी एकमेकांच्या सहवासात उपभोगलेल्या क्षणांच्या आठवणी, वैवाहिक जीवनातील आठवणी अशा बालपण, वैवाहिक ते नोकरीतून निवृत्त होई पर्यंतच्या जीवनातील कडूगोड अनुभव आठवणी व्यक्त झाल्या आहेत.

**संदूक–** लहानपणी लेखिकेला वेगवेगळया वस्तू जमा करण्याचा छंद होता. शेतात, डोंगरावर फिरायला जात असताना त्या वेगवेगळया वस्तू जमवून आणून ठेवीत असे. ही त्यांची सवय भविष्यात कायम राहिली. त्यांच्या संदूकात असलेल्या आगळया वेगळया वस्तुंचा उल्लेख या लेखात झाला आहे. त्यांच्यापाशी निरनिराळया वस्तुंचाच नव्हे तर त्यांच्या ऐकण्यात पाहण्यात आलेल्या गोष्टींचा भरपूर साठा जमला होता. त्यांच्यापाशी असलेली संदूक त्यांच्या मनाला

कायम आनंद देत राहिली. अशा लहानपणापासून जोपासलेल्या छंदाविषयी; त्यातून मिळालेल्या आनंदाविषयी त्या संदूक या लेखात लिहिताना दिसतात.

**झोपाळयावरी बसू–** या लेखात लेखिकेची झोपाळयावर बसण्याची आवड व्यक्त झाली आहे. लहानपणापासून त्यांना झोपाळयावर बसून झुलण्यात आनंद वाटत असे. नागपंचमीच्या सणाच्यावेळी त्यांच्या घरी झोपाळा बांधला जाई. परंतु सात आठ दिवसात हा झोपाळा उतरवला जात असे. त्यावेळच्या त्यांच्या दुःखी मनाच्या भावना लेखात शब्दबद्ध झाल्या आहे.

लेखिका ज्यावेळी तवंदीला राहत होत्या त्या घरातील पाटाच्या झोपाळयाच्या आठवणी, त्या पाटाच्या झोपाळयावर बसण्यासाठी त्यांची धाकटी बहिण व त्यांच्यामध्ये होणारी शर्यत अशा अनुभवलेल्या गोड क्षणांच्या आठवणी लेखात व्यक्त झाल्या आहेत. त्यानंतर बहिणीच्या प्रशस्त घरात तसाच मुंबई, पुण्यात वेगवेगळया ठिकाणी झोपाळयाचा घेतलेला आनंद व मनाला लाभलेले समाधान त्यांच्या या लेखात उतू जात आहे.

**तप्तमुद्रा–** या लेखात लेखिकेने प्रेम प्रवासात भोगलेल्या वेदनेची आठवण आणि संतांच्या शेवटच्या क्षणी अनुभवलेल्या प्रेमाची सुखद आठवण; अशा दोन आठवणी सांगितली आहेत. त्यांचे वडील वारल्यानंतर त्यांची जबाबदारी त्यांच्या काकांनी घेतली होती. पुण्याच्या महाविद्यालयात शिकत असताना त्या व संत एकमेकांच्या प्रेमात होते. त्या दिवाळीच्या सुट्टीत घरी आल्यावर संतानी त्यांना पत्र पाठवले होते. ते प्रेमपत्र त्यांच्या काकांच्या हाताला लागल्यावर त्यांच्या काकांनी त्यांचा हात कंदिलाच्या आगिवर दाबून धरला होता. त्यावेळी झालेली शारीरिक तशीच मानसिक वेदना, तो महिनाभर त्यांच्या वाटयाला आलेले दुःख आणि भोगाच्या आठवणी या लेखात तिव्रतेने व्यक्त झाल्या आहेत. दुसरी त्यांच्या मनाला शेवटपर्यंत सुखावणारी आठवण म्हणजे संताच्या शेवटच्यावेळी संतानी त्यांचा उजव्या हाताचा तळवा आपल्या ओठांवर धरला होता त्यावेळी त्यांच्या मनावर उमटलेली सुखमुद्रा व शेवटच्या सुखसंवादाची आठवण. अशा या सुख दुःखाच्या दोन आठवणी या लेखात सखोलरित्या वर्णिल्या आहेत.

**मिळवती होताना–** शिक्षक म्हणून पहिल्याच वेळी नोकरी करत असताना घरात सासरच्या माणसांकडून मिळालेली क्लेषदायक वागणूक व अपमानास्पद अनुभवांच्या आठवणी या

लेखात व्यक्त झाल्या आहेत. लेखिकेला मुंबईच्या 'सायंटिफिक अॅन्ड लिटररी एज्युकेशन सोसायटी'च्या मुलींच्या शाळेत पहिल्याचवेळी नोकरी मिळाली होती. त्यावेळी त्यांच्या सासूने त्यांच्याशी अबोला धरला, घरातील प्रत्येक माणूस त्याच्यांकडे परक्या नजरेने पाहत होता. रोज त्यांच्याकडून बोलणे ऐकून घ्यावे लागल्याने त्यांना चोरटयासारखे वाटे. सासरच्या घरात सहन करावे लागलेले त्रास, पहिल्या पगारावेळी त्यांच्या पतीने सासऱ्याच्या हातात दिलेले ३५ रूपया पगारातील ३० रूपये व त्यांना शाळेत चहासाठी दिलेले केवळ ३ रूपये, शाळेत चहासाठी पैसे खर्च करतात म्हणू सासऱ्यांकडून ऐकून घ्यावी लागलेली बोलणी, स्वतःच्या कष्टाचे पैसे वापरू न मिळाल्याचे दुःख व त्यानंतर चहा सोडल्याची आठवण अशा दुःखदायक आठवणी लेखात मार्मिक शब्दकळेने रेखाटल्या आहेत. आपला मिळवतीचा पहिला अनुभव सांगत असताना लेखिका लिहितात, "आतल्या पावलाला उंबऱ्याची ठेच लागली आणि बाहेरचे पाऊल आपल्या क्षेत्रात रमताना दुखावले." (मृद्‌गंध, पृ. २४५) जीवनातील अशा दुःखदायकआठवणी व्यक्त होताना त्यांच्या मनातील भावना लेखात तीव्रतेने उतरल्या आहे.

**मी आणि माझी कविता—** या लेखात लेखिकेने स्वतःच्या काव्य लेखनाविषयी लिहिले आहे. लहानपणापासून लाभलेला एकटेपणा, घरात वडिलांनी आणून ठेवलेली पुस्तके, घरातील साहित्यिकवातावरण या गोष्टी त्यांच्या कविता रचनेला कशा पोषक ठरल्या याविषयी लेखात लेखन झाले आहे. त्यांच्या कविता लेखनाची सुरुवात, लेखनकाळ, प्रकाशन काळाची नोंद या लेखात झालेली दिसते. त्याचबरोबर कवितेविषयीच्या त्यांच्या मनातील भावना लेखात व्यक्त झाल्या आहेत. लेखिका पाचवीत असताना बेळगावला साहित्यसंमेलन भरले होते. त्या संमेलतात 'गुलामांचे गाऱ्हाणे' ही कविता ऐकल्यावर त्यांच्या डोळयात पाणी येते. त्याच भावनेच्या भरात त्यांच्याकडून 'अनाथ' नावाची कवितेची निर्मिती होते. मनातील भाव कवितेत उतरावे लागतात याची जाणीव त्यांना त्यावेळी झाली होती. म्हणून त्यांच्या कविता लेखनाची ही खरी सुरुवात होती असे त्यांना वाटते. या लेखात त्यांनी त्यांच्या प्रत्येक कविता संग्रहाविषयी उलगडा केला आहे. 'शेला' सारख्या प्रसिद्ध संग्रहातील कवितांचा आशय व वैशिष्टयांची नोंदही लेखात झाली आहे.

**अष्टमीचे चांदणे—** या लेखात त्यांच्या व संतांच्या सुखी संसाराविषयीच्या आठवणींचे मनोज्ञ दर्शन घडते. लेखिका व संत यांची ओळख कॉलेजमध्ये झाली होती. त्यानंतर त्यांनी एका

सांजवेळेच्या साक्षीने लग्न केले. एकमेकांच्या सहवासात त्यांनी जे सुख उपभोगले, संसार सजवत असताना त्यांच्या पदरात जे जे आनंदाचे क्षण आले त्यांचे वर्णन लेखिकेने मनोवेधकरित्या केले आहे. मुंबईला असताना वाचन करणे, गाण्यांच्या कार्यक्रमाला जाणे, मासिकांसाठी कथा कविता लिहून त्या पैशातून नवीन पुस्तके विकत घेणे अशा दोघांनी एकमेकांच्या सहवासात उपभोगलेल्या सुखी क्षणाच्या आठवणी लेखात उतरल्या आहेत. केवळ दोन खोल्यांच्या संसारात, असेल त्यात समाधानात जीवन जगण्याची शक्ती त्यांना निसर्गाने दिली असे त्यांना वाटते. या त्यांच्या दोघांच्या अकरा वर्षाच्या चिमुकल्या संसाराला त्यांनी अष्टमीच्या चांदण्याची उपमा दिली आहे. ज्यात पौणिमेचा भडकपणा नाही आणि काळखाची तीव्र अंधारकळाही नाही. म्हणजेच त्यात अतिसुख किंवा अतिदुःखही नाहीत. अशा त्यांच्या संसाराचे चित्र न्याहाळले तर त्यांनी त्यांच्या संसाराला दिलेली उपमा अगदी समर्प क वाटते.

**कर्मभूमी आणि स्वप्नभूमी—** माणूस कर्मभूमीला स्वप्नभूमी का मानत असतो हे लेखिकेने स्वतःच्या अनुभवातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या गावात माणूस लहानाचा मोठा होतो तिथल्या मातीशी, निसर्गाशी, माणसांशी तो जिव्हाळयाच्या बंधनात बांधला गेलेला असतो. त्यामुळे ती भूमी त्याला प्रिय असते. तथा लेखिका ज्या गावात राहिल्या त्या गावाशी त्यांचे मनाचे भावनीक नाते जुळले होते हे त्यांना या लेखात सांगायचे आहे. त्यांचे बालपण तवंदी, बेळगाव या ठिकाणी गेले. त्या गावाशी त्यांचे जिव्हाळयाचे नाते होते. तसेच लग्नानंतर त्या अनेक गावांमध्ये राहिल्या. त्या गावांशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. त्या ज्या ज्या गावात राहिल्या त्या गावांना परत एकदा भेट दिल्यानंतर त्यांच्या मनाला झालेला आनंद या लेखात प्रकट झाला आहे.

**चांदणे भरलेले दिवस—** या लेखात स्वतःच्या मुलांच्या लहानपणातील आवडी निवडीविषयी आठवणी सांगत असताना एकआई म्हणून त्यांनी त्यांचा अनुभव व्यक्त केला आहे. चंदू, रवी आणि पुष्पा ही त्यांची तीन मुलं. मुलांच्या शिक्षणात, प्रत्येक गोष्टीत त्यांचा सहभाग होता. चंदू व रवी या दोन्हीं मुलांना लहानपणी चित्रकलेचा छंद होता. चित्रकलेसाठी लागणारी सर्व सामुग्री त्या त्यांना नेमाने आणून देत असत. त्यांची मुलगी पुष्पा हिला बागकाम, विणकाम व घरकामाची आवड होती. ही तिनही मुले स्वतःचा अभ्यास सांभाळून आपआपले छंदही

व्यवस्थित जोपासत होती. परंतु पुढे त्यांनी अभ्यासालाच अधिक महत्त्व दिले. चंदू जिऑलॉजी शाखेत गेला, रवी वास्तुतज्ञ झाला तर पुष्पाने गृहशास्त्राचा अभ्यास निवडला. मुलांनी आपापली क्षेत्रे निवडल्याने त्यांच्या मनाला झालेले समाधान लेखात जाणवत आहे. मुलांच्या आनंदात त्याही तितक्याच आनंदात राहिल्या. त्यामुळे त्या आनंदमयी दिवसांना त्यांनी 'चांदणे भरलेले दिवस' असे संबोधले आहे. या लेखात स्वतःच्या मुलांविषयीचा अभिमान व्यक्त होताना त्यांनी आई म्हणून आपली जबाबदारी कशी निभावली याचेही चित्र उमटलेले दिसते.

**सहशिक्षणातील आंबटगोड–** या लेखात शालेय व महाविद्यालयीन जीवनातील कडू गोड आठवणी व्यक्त झाल्या आहेत. शालेय शिक्षण त्यांनी मुलांच्या शाळेत घेतले होते. मुलांच्या शाळेत शिकत असल्याकारणाने इतर मुलींसारखे त्यांना छान परकर पोलके पावडर लावून नटून थटून फिरता आले नाही. याचे दुःख व्यक्त होताना त्या काळात स्त्रीला शिक्षण घेणे किती कठीन होते याचे चित्र रेखाटले आहे. हे शिक्षण घेत असताना त्यांना वर्गातील मुलांकडून त्रास सहन करावा लागला. घरात आणि शाळेत दोन्हींकडे त्यांच्यावर दबाव होता. परंतु महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्या फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहात राहत होत्या तिथे त्यांना मोकळया वातावरणात मनमोकळे जगता आले. त्यावेळच्या सुखकारकआठवणी लेखात व्यक्त झाल्या आहेत. या लेखात मांडलेल्या अनुभवांतून समाज मनातील स्त्रीच्या स्थानाविषयी लेखन झालेले दिसते.

## ४.३.२ स्त्रीविषयक लेख

लेखिकेने आपल्या ललित निबंध लेखनातून स्त्रीजीवनाचा वेध घेतला आहे. स्त्रियांचे म्हणून वेगळे असे अनुभवविश्व त्यांच्या लेखनात आविष्कृत झाले आहे. स्त्रीच्या भावभावना, स्त्रीसुलभता, स्त्रीच्या वैवाहिक जीवनातील प्रश्न, सासरी होणारी अवहेलना त्यामुळे स्त्रीमनाला होणाऱ्या वेदना हा त्यांच्या स्त्रीविषयक लेखांचा आशय आहे.

**अस्सं माहेर सुरेख बाई–** या लेखात लेखिकेने स्त्रीच्या मनातील माहेरा विषयीच्या भावना व्यक्त केल्या आहे. प्रत्येक स्त्रीला आपले माहेर हेच जास्त प्रेमाचे, जिव्हाळयाचे वाटत असते

याची कारणे येथे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. वागण्यातील मोकळेपणा, आपल्या माणसांचा सहवास, आईची माया, भावाने केलेले कौतुक तिच्यापाशी असते. त्यामुळे सासुरवाशीणीचा जीव माहेराकडे लागलेला असतो अशी कारणे लेखिकेने पटवून दिली आहे. स्त्रीला सासर आपलेसे वाटायला हवे तर सासूने सुनेचे मनभरून कौतुक करावे, तिला कामात मदत करावी, तिला काळजी वाटणार नाही अशा तऱ्हेने घर सांभाळावे तरच सुनेला सासर माहेरासारखे वाटेल असा बोध या लेखात दिला आहे. सासूकडून जर सुनेला प्रेम लाभले तर सुनेला सासर नक्की आवडेल अशी खात्री लेखिकेने या लेखात दिली आहे.

**बरा संसार संसार–** या लेखात सासरी स्त्रीची होणारी अवहेलना दाखवून देऊन त्यावर उपाय सूचवीला आहे. आपले माहेर सोडून लग्न होऊन सासरी जाणाऱ्या स्त्रीचे वर्णन करताना लेखिका लिहितात, "वधू म्हणजे एका जागेतून उपटून काढून दुसरीकडे लावण्यासाठी आणलेले रोप. काही बारीक मुळे दुखावलेली; नवी माती, नवे पाणी, अज्ञात असे काळजी घेणारे जग, असे त्या केविलवाण्या रोपासारखे हे मानवी रोप. पण रूजलेल्या जमिनीचा आधार सुटलेले." (मृद्‌गंध, पृ. १२६) अशा शब्दांतून स्त्रीचे जीवनचित्र मांडताना तिच्या मनाचा योग्य ठावही लेखिकेने घेतलेला आहे. सासरच्या घरात पाऊल ठेवताच त्या घरातील माणसांकडून बोलणं ऐकून घ्यावं लागतं. अशावेळी स्त्रीने स्वतःचे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतःची मानसिकता बदलली पाहिजे, आपण आश्रीत आहोत ही कल्पना स्त्रीने मनातून काढून टाकावी असा उपदेश स्त्रीला करत असताना त्यांनी पतीपत्नीच्या नात्याविषयीही आपले विचार मांडले आहे. संसार हा दोघांचा असावा आणि तो सुखाचा होण्यासाठी त्यांच्यात मित्रत्त्वाचे नाते असावे तरच या संसाराला चव येईल. असे सुखी संसाराविषयीचे त्यांचे मत या लेखात व्यक्त झाले आहे.

**आंधळयांची माळ–** शिक्षण असूनही स्त्रीमध्ये अजूनही विचार करण्याची क्षमता निर्माण झाली नाही ती अजूनही खंबीर झाली नाही याची खंत लेखिकेने या लेखात व्यक्त केली आहे. या लेखात त्यांनी चित्रा नावाच्या स्त्रीच्या उदाहरणातून स्त्री खऱ्या अर्थाने शिक्षित नाही तिच्यामध्ये निर्भयता निर्माण झाली नाही हे पटवून दिले आहे. चित्रा ही स्त्री डॉक्टर व हुंडाविरोधीची सदस्य असूनही स्वतःच्या लग्नात सासरकडून मागितलेल्या हुंडयाला विरोध करू शकली नाही. समाजाच्या प्रश्नांना तिने वाचा फोडली, चळवळ केली. परंतु घरची

प्रश्नचिन्हे उलटी तिच्या पायात लंगर झाली. शिक्षण घेऊन चांगला पती मिळावा, मिळवती व्हावे एवढाच हेतू पालकांनी मुलींच्या मनात रूजवला असल्याकारणाने प्रत्येक स्त्री याच हेतुने शिक्षण घेते. त्यामुळे स्वावलंबी, निर्भयता, खंबीरता त्यांच्यात दिसत नाही. आणि त्यासाठी देशात कुठेच प्रयत्न केलेले दिसत नाही अशी खंत लेखात व्यक्त झाली आहे.

**जाता जाता आणि येता येता–** या लेखात स्त्री सुलभतेचा वेध घेतला आहे. घरातील कोणी माणसं बाहेर जात येत असेल तर त्यांना कामं सांगण्याची सवय स्त्रीला असते. ज्या ज्या घरात स्त्री असेल त्या त्या घरात अशा कामाच्या तक्रारी सुरू असताना दिसतात. घरातील गृहिणीच्या या स्वभावाला घरातील इतर माणसांना कंठाळा येत असतो. कारण वेळ काळ त्या माणसांचा बेत न समजूत घेता ती घरातील एक एक काम त्या मंडळीला सांगत असते. हे पटवून सांगण्यासाठी लेखिकेने आपल्या मैत्रीचे उदाहरण दिले आहे. लेखिका एक दिवस आपल्या मैत्रिणीच्या घरी गेल्या होत्या. त्या मैत्रिणीचा मुलगा चांगला पोषाक करून बाहेर जायला निघतो त्यावेळी त्यांची मैत्रीण त्या मुलाला डाळ आणण्याचे काम सांगते. ते ऐकून तो मुलगा आपल्या आईवर चिडतो. या घटनेचा आधार घेऊन लेखिकेने स्त्रीच्या कामे सांगण्याच्या स्वभावावर भाष्य केले आहे.

## ४.३.३ साहित्यविषयक लेख

लेखिकेला वाचनाची आवड होती. बालपणात लिहायला वाचायला आल्यापासून त्यांनी वाचनाला सुरुवात केली होती. त्यांना आवडणाऱ्या साहित्यिकाचे साहित्य त्यांनी आवर्जून वाचलेले दिसून येते. त्यातून त्यांच्या वाङ्मयीन जाणिवेत भर पडली. त्यांच्या वाचनात आलेल्या साहित्यावर आणि साहित्यिकांवर आधारित लेख त्यांनी लिहिलेले दिसतात.

**'दिशा उसवल्या' वाचल्यानंतर–** या लेखात वाचनात आलेल्या 'दिशा उसवल्या' या विजय कुवळेकर यांच्या लेखनाविषयी विवेचन झाले आहे. या लेखनाला त्यांनी दीर्घ भावकविता असे संबोधले आहे. या लेखनाचा लेखनकाळ आणि प्रसिद्धीचा काळ लेखात नमूद केला आहे. हे लेखन चार भागात विभागले गेले असून त्या चारही भागांच्या आशयाचे विश्लेषण लेखात झाले आहे. त्याचबरोबर त्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्येही सांगितली आहे.

'दिशा उसवल्या' या पुस्तकाचे वाचन केल्यानंतर त्यांना जे उमजले ते या लेखात मांडले गेले आहे. 'दिशा उसवल्या' हे नाव पहिल्याचवेळी वाचल्यानंतर जे भाव त्यांच्या मनात निर्माण झाले त्याविषयी सांगताना लेखिका लिहितात, "दोन शब्दांच्या अक्षरांचा मेळ मुलायम आहे. चंदनी पाकळयांचा घडीचा पंखा हातात घ्यावा आणि घडया उलगडून वर्तुळकार करावा... सूर्योदयापूर्वी उघडया माळावर उभे राहावे आणि भोवतालच्या क्षितिजाशी आठही दिशा उजळत असताना पाहाव्या. त्या झळाळीत वरचे आकाश व खालचा माळही धूसरसा झळाळत असावा, असेही दृश्य मनाशी आकार घेऊ लागले." (फुलवेल, पृ. १३८) या पुस्तकाचे दोन तीन वेळा वाचन करून लेखकाचे तसेच त्याच्या लेखनाचे श्रेष्ठत्त्व व यश लेखात नोंदवण्याचा प्रयत्न केला आहे.

**सुनीताची कविता—** हा लेख लेखिकेच्या सुनीता जोशी नावाच्या मैत्रिणीच्या काव्य लेखनाविषयी आहे. या लेखात त्यांनी सुनीताच्या निर्मिती शक्तीविषयी, प्रतिभेविषयी, भाषाशैलीविषयी विवेचन करून तिच्या कवितांचे श्रेष्ठत्त्व सांगण्याचा प्रयत्न केला आहे. येथे केवळ आशय सांगितला नाही तर त्या कवितांच्या विषयासंबंधी विवेचन झाले आहे. तिच्या कवितेत आविष्कृत झालेल्या निसर्गरूपांची तुलना बालकवींच्या निसर्गरूपांशी करून कवितांचा दर्जा दाखवून दिला आहे. काही वर्षे सुनीताने कविता करायचे सोडून दिले होते. परंतु तिच्या काव्यविषयक जाणिवेत व लेखन कौशल्यात काही फरक जाणवला नाही. पुन्हा तिची कविता त्याच जाणिवेतून अवतली हे सांगताना लेखिका लिहितात, "दहा वर्षांचा खंड पडूनही पुन्हा १९९० साली जी तिची कविता प्रकटली, ती काही काळ जमिनीत गडप प्रवाहित राहून पुन्हा उमटलेल्या झऱ्यासारखी अनुभवविश्वातील काव्यबीजे फक्त निराळी सापडली. पण कवितारूप आत्मनिष्ठ आणि भाव कवितेचेचे राहिले." (फुलवेल, पृ. १५७) त्यांना सुनीताची कविता का आवडते याविषयीचे स्पष्टीकरणही त्यांनी या लेखात दिले आहे.

**ओवीची वाटचाल—** या लेखात ओवीच्या वाटचालीचा आढावा घेतला आहे. पूर्वीपासून ओवीची रचना होते. पण पूर्वी ती लिखित स्वरूपात नसून मौखिक स्वरूपाची होती हे सांगून ओवी रचनेचे श्रेय त्यांनी स्त्रियांना दिले आहे. सगळयात आधी ओवी हाच मराठी कवितेचा पहिला छंद होता असेही त्या सांगतात. स्त्रीने जी ओवी रचली ती केवळ विरंगुळयासाठी

होती. परंतु नंतर ओवी रचना तत्त्वज्ञान सांगण्यासाठी रचली गेली अशी ओवीची महती वर्णी ली आहे. कवितेच्या इतिहासात जेव्हा भावकवितेचं युग सुरू झालं त्यावेळी कवींना ओव्याच जवळच्या वाटू लागल्या व ओवीचा प्रवास आता काव्य या पदाला येऊन कसा पोचला हे सांगत असताना पूर्वीपासून ते आजच्या काळापर्यंत ओवीचा प्रवास कसा झाला याविषयी विवेचन केले आहे.

भावकवितेचं युग केशवसुतांपासून झाले असे म्हटले जाते. परंतु केशवसुतांनी कधी ओवी लिहिली नाही असे त्यांचे मत आहे. शिवाय कवी तांबे, माधवराव पटवर्धन, बा. भ. बोरकर, मर्ढेकर अशा काही लेखकांनी रचलेल्या ओव्या लेखात नमूद करून त्या ओव्यांचे सत्त्व या लेखात उलगडले गेले आहे.

## ४.३.४ व्यक्तिचित्रणपर लेख

लेखिकेने व्यक्तिचित्रणपर स्वतंत्र लेख लिहिले आहे. एक साहित्यिक म्हणून त्यांचा संबंध अनेक माणसांशी आला. पण ज्या माणसांच्या स्वभावाचा आणि कार्याचा ठसा त्यांच्या मनावर उमटला त्यांचीच चित्रणे त्यांनी केली आहे.

## कुटुंबातील व्यक्तीचे चित्रण

**थोरली आई—** या लेखात लेखिकेने आपल्या सावत्र आईचे व्यक्तिचित्रण रेखाटले आहे. सावत्र आईचा स्वभावविशेष, वृत्तीप्रवृत्ती तसाच तिचा जीवनसंघर्ष लेखात चित्रित झाला आहे. त्यांची थोरली आई निस्वार्थी, स्वतःच्या सुखदुःखाचा विचार न करता इतरांसाठी जगणारी होती हा त्यांचा स्वभावविशेष सांगितला आहे. सर्वसाधारण विवाहित स्त्रीच्या वाटयाला येणारी सुखे थोरल्या आईला कधीही उपभोगता आली नाही. वयाच्या नवव्या वर्षी तिचे लग्न झाले, पण सासर सोडून त्या कधी माहेरी राहिल्या नाही. नवऱ्याचे बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत नवरा आपल्या मामाकडे आणि त्या सासरी होत्या. त्यामुळे सासूसासऱ्याच्या हाताखाली त्यांना दहा—बारा वर्षे राहावे लागले. त्यांना स्वतःचे मुल नव्हते. परंतु तिने आपल्या सवतीच्या मुलांचा कधी हेवा केला नाही उलट त्यांच्यावर स्वतःच्या आई हून जास्त माया केली. त्यांना चांगल्या गोष्टींची शिकवण दिली. त्यांच्यात विविध गोष्टींची

आवड निर्माण केली. याविषयी सांगत असताना लेखिका लिहितात, “सडा सारवण, रांगोळी यासारख्या कामात तिनेच मला गोडी लावली. तिचा माझ्यावर प्रभाव पडला. आईकडून जे बरेवाईट देणे येते, ते मला माझ्या थोरल्या आईकडून मिळाले आणि या जिव्हाळयाने माझी आई मला दुरावली.” (मृद्गंध, पृ. १४९–१५०) अशा वाक्यांतून त्यांच्या जीवनातील त्यांच्या सावत्र आईचे महत्त्व विशद झाले आहे. त्यांना त्यांच्यासाठी काही करता आलं नाही याची खंत लेखात व्यक्त झाली आहे. या लेखात लेखिका व त्यांची सावत्र आई यांच्यातले प्रेमाचे, आपुलकीचे नाते दृष्टिस पडते. काही महत्त्वाच्या प्रसंगातून त्यांच्या सावत्र आईची प्रतिमा त्यांनी डोळयांसमोर उभी करण्याचा प्रयत्न केला आहे.

## साहित्य क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे

**खांडेकरः एकऋणानुबंध–** लेखिका खांडेकरांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी न लिहिता त्यांच्या भेटीच्या आठवणी, त्यांच्या कार्याबद्दल व आपल्या साहित्यनिर्मितीमधील खांडेकरांचे योगदान स्पष्ट करतात. आत्यंतिकजिव्हाळयाने खांडेकरांच्या सहवासातील आठवणी या लेखात व्यक्त झाल्या आहे. खांडेकरांचे विचार, त्यांचे बोलणे कसे वेगळे होते हे त्या नेमकेपणाने शब्दबद्ध करतात.

१९३६ साली लेखिका दादरला राहत होत्या. त्यावेळी कमलाबाई शाळेत त्यांच्याबरोबरीने शिक्षक म्हणून काम करत असलेल्या वि. ह. कुलकर्ण्यांमुळे त्यांची खांडेकरांशी ओळख झाली. लेखकवि. स. खांडेकर आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहचवण्यासाठी स्वतः इतकेच दुसऱ्याला पटवून देण्यासाठी तळमळीने बोलत असे. बोलत असताना मोठया मनाने सहज दोन तीन वाक्यातून स्वतःचे विचार पटवून सांगण्याची त्यांची शैली लेखात आविष्कृत झाली आहे. केवळ एका भेटीच्या ओळखीने खांडेकर त्यांना कोल्हापूरात भेटायला आले याविषयी त्या आश्चर्य व्यक्त करतात.

या लेखात खांडेकराबद्दलचा त्यांच्या मनातील आदर प्रकट झाला आहे. प्रत्येक भेटीत खांडेकरांनी साहित्यविषयक चर्चेतून त्यांच्या साहित्यिक मनाला, त्यांच्या कविता लेखनाला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला. चांगल्या कविता लेखनासाठी वेगळया गोष्टींची त्यांना

जाणीव करून दिली. या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी 'खांडेकरः एक ऋणानुबंध' या लेखात केला आहे. केवळ त्यांनाच नव्हे तर आपल्या समाजाला खांडेकरांनी स्वतःच्या साहित्यातून कसे संस्कारमय केले याविषयी लेखिका लिहिताना दिसतात. खांडेकरांच्या साहित्याचे महत्त्व विशद करताना लेखिका लिहितात, "आपण आपले जीवन चांगले करावेच, पण आपल्याभोवती असणाऱ्या मोलकरणी, कामकारणी, मजूर स्त्रीया, त्यांचे आयुष्य, त्यांचे मन हेही जाता जाता विचारपूर्वक जाणून घ्यावे हा धडा त्यांच्या साहित्याने दिला." (फुलवेल, पृ. ८८) एक श्रेष्ठ साहित्यिक म्हणून खांडेकरांची ओळख करून देताना लेखिका लिहितात, "त्यांच्या या मोठेपणाने मी लहानाहूनही लहान होऊन गेले." (फुलवेल, पृ.८९) अशाप्रकारे लेखिका व खांडेकर यांचा असलेला अतूट स्नेहबंध लेखात व्यक्त झाला आहे.

**साहित्य सृष्टीतील जादूगार–** या लेखात नामवंत साहित्यिक ना. सी. फडके यांचे व्यक्तिचित्र रेखाटले गेले आहे. जवळ जवळ चाळीस हजार पानांचे फडके यांचे लेखन आहे. त्यांचा प्रत्येक लेख वा प्रकरण आकर्षक असल्यामुळे तरुणांपासून सर्व वाचकांना त्यांचे साहित्य नेहमीच वाचावेसे वाटत राहिले. अशा त्यांच्या साहित्य क्षेत्रातील अनमोल कामगीरीविषयी लेखन झाले आहे. कादंबरी, कथा, गुजगोष्टी, नाटक, साहित्यसमीक्षा, इंग्रजी कादंबऱ्यांची आस्वादपर ओळख, साहित्यविचार, व्यक्तिचित्रे, थोरांची चरित्रे, त्यांच्या स्वतःच्या साहित्यावर त्यांचे विचार, आत्मचरित्र असे अनेक साहित्यप्रकार हाताळून त्यांनी त्यात मोलाची भर घातली आहे. अशा त्यांच्या लेखन कार्याचा आढावा त्यांनी या लेखात घेतलेला दिसतो.

ना. सी. फडके यांची व्याख्याने गाजत होती ती त्यांच्या भाषण कलेमुळे. त्यांच्या भाषण कलेविषयी लेखिका लिहितात, "मला अतिशय जाणवला तो त्यांचा आवाज खर्जाकडे झुकलेला, किंचित रूद असा आणि एक प्रकारचा त्याचा मऊशारपणा आणि त्यांची वाक्यांची लय. कागदावर फेल्ट पेनने लिहिण्याने मनाला व कानाला जी एक मऊशार जाणीव होते त्या जाणिवेचा प्रत्यय त्यांचा आवाज देत असे." (फुलवेल, पृ. ९६) अशा शब्दात फडके यांच्यापाशी असलेल्या कलागुणांचा वेध लेखिकेने घेतला आहे. त्यांनी फडके यांच्या घराचे वर्णनही केले आहे. जुन्या पद्धतीच्या एक मजली घरातील निटनेटकेपण हे लोकांसाठी असामान्य असले तरी अत्यंत साधेपणाने ते राहत होते हे त्यांच्या घराच्यावर्णनातून समजून सांगितले आहे.

फडके हे अतिशय शिस्तप्रिय होते. त्यांच्या रोजच्या कामाचे वेळापत्रक ठरलेले असायचे. जेवणाबद्दल त्यांचे काही नियम होते. झोपताना डोळयांवर लहान टॉवेलची घडी करून घेणे, गरम व गार अशा पाण्याची तासभर आंघोळ करणे, जेवत असताना गप्पा करणे, त्यांनतर मुलांबरोबर पत्ते खेळणे, पेटी वाजवणे अशा त्यांच्या सवयी लकबींवर लेखिकेने प्रकाश टाकला आहे. त्यांच्या वाढदिवसादिवशी ते आनंदी असे. त्यांचा वाढदिवस दरवर्षी मोठया थाटात साजरा केला जायचा आणि मुख्य म्हणजे याच एका दिवशी ते आपले लेखन वाचन बंद ठेवत असे. असे इतराहून त्यांचे निराळे व्यक्तिमत्त्व लेखात चित्रित केले आहे. 'साहित्यसृष्टीतील जादूगार' या लेखात लेखिकेने फडके यांच्या स्वभावाचा, जगण्याचा, त्यांच्या साहित्याचा सखोल वेध घेतलेला दिसून येतो.

## संगीत क्षेत्रातील व्यक्तीचे चित्रण

**गीतकार आणि कवी ग. दि. माडगूळकर–** या लेखात लेखिकेने सुप्रसिद्ध गीतकार ग. दि. माडगूळकर हे त्यांच्या गीतातून लोकमानसात कसे पोहोचले हे पटवून दिले आहे. माडगूळकर हे लहानापासून जनमानसात समरस झाले होते. त्यांनी रचलेली गीते, त्यांना लावलेल्या सुरेख चाली खेडयापाढयातील लोकांनाही गुणगुणाव्याशा वाटत असे. इतकी सुंदर गीत रचना त्यांनी केली आहे. अशी कितीतरी गीते आहे जी मराठी माणसांच्या मनात कायमची घर करून आहे. जरी त्यांची प्रत्यक्षात भेट झाली नसली तरी गीतातून ते खेडयापाडयात पोहचले. अशी त्यांच्या गीत लेखनाची थोरवी लेखिकेने लेखात सांगितली आहे. त्यांच्या गीतांचे वेगळे सामर्थ्य सांगताना लेखिका लिहितात, "गीतांचे विषय, त्यातील भाव, त्यांची जडणघडण करणारे शब्द, त्या चाली हे सगळे सामूहिक मनाच्या मालकीचे असते. असा भास सामूहिक मनाला व्हावा असे गीत निर्माण करायला तपश्चर्या लागते. गीत रचताना एखादा शब्दच असा वापरतात की ते संबंध गीत त्याने जवळून जाते आणि ऐकणाऱ्याच्या मनावर सुखद उर्मी उमठवून जाते. हे कसब त्यांचेच आहे. आणिकांना हे साधणे नाही." (फुलवेल, पृ. १३२) असे त्यांचे लेखन सामार्थ्य पटवून देण्याकरिता लेखिकेने त्यांची काही गीते संदर्भासाठी दिली आहे. या लेखात माडगूळकर गीतकार म्हणूनच उतरले आहे. नामवंत गीतकर म्हणूनच त्यांची येथे स्तुती झालेली दिसून येते. एक सुप्रसिद्ध गीतकार या नात्याने त्यांच्या प्रतिभेची वैशिष्टये येथे

उलगडली आहे. या लेखात माडगूळकरांच्या गीतांनी त्यांच्या मनाची पकड घेतली आहे हे लक्षात येते. हे व्यक्तिचित्र माडगूळकरांच्या गाण्याविषयीच्या आंतरिक बंधातून साकार झालेले दिसून येते. अचूक शब्दात आणि नेमक्या गीतांच्या ओळी देऊन ग. दि. माडगूळकरांची एक सर्वश्रेष्ठ लोककवी म्हणून परिपूर्ण ओळख सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४.३.५ चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख

लेखिकेचे काही लेख चिंतनशील व विचारप्रधान आहे. प्रत्येक गोष्टीचा सर्वांगीण विचार करण्याच्या पद्धतीमुळे, वाचकाला विश्वासात घेऊन विषयाच्या सर्व बाजू उलगडून दाखवणारे लेख त्यांनी लिहिले आहे.

**विनोदाचे करूणाष्टक—** या लेखात माणसाच्या जीवनात हास्य विनोद किती महत्त्वाचा आहे हे पटवून देताना विनोदी साहित्य किंवा विनोदी वृत्तीकडे आज कसे दुर्लक्ष केले जाते यावर चिंतन झाले आहे. विनोदाने माणसाच्या मुखावर हास्य येते. मोठयाने हसल्यावर माणसाच्या मनातील निराशा निघुन जाऊन आनंद निर्माण होतो. असे महत्त्व विशद करून या विनोदाचा फायदा लहान मुलांना तसाच मोठयांना कशा पद्धतीने होतो हे समजून सांगताना आज आपल्या देशात विनोदी साहित्य आणि विनोदी वृत्तीला नाकारले जाते. याची कारणे शोधून लेखिका त्यावर आपले विचार मांडताना दिसतात. या सर्वाला आपली संस्कृती जबाबदार आहे असे त्यांना वाटते. मोठयाने हसणे आपल्या संस्कृतीत बसत नाही असे म्हटले जाते. अशा कारणास्तव कुठेतरी हास्यविनोद कमी झाला असून आपल्या जीवनात विनोदाचे किती महत्त्वाचे स्थान आहे हे लेखात उदाहरणाद्वारे पटवून दिले आहे.

**कारल्याचा वेलाचा मांडव—** या लेखाद्वारे लेखिकेने माणसाच्या स्वार्थी वृत्तीवर अंगुलीनिर्देश केला आहे. माणसांच्या स्वभावावर विचारमथंन करून कारल्याची तुलना माणसाशी केलेली दिसते. स्वतःला आलेल्या अनुभवातून माणसातला हरवलेल्या माणूसपणावर भाष्य करत असताना स्वार्थी स्वभाव माणसात कसा निर्माण होतो यावर चिंतन केलेले दिसून येते. माणसाची कारल्याशी तुलना करून माणसाचा स्वार्थी, कुत्सित स्वभाव, वृत्ती—प्रवृत्ती, आचार—विचार निदर्शनास आणून देण्याचा प्रयास केला आहे. कारले बाहेरून हिरवेगार

देखणे वाटते. परंतु आतून मात्र कडू असते. त्याला गोड चव आणण्यासाठी गूळ, स्वादिष्ट मसाल्यासारखी सामुग्री आपल्याकडे असावी लागते. तसे काहीवेळा आपण त्याची चव बदलूही शकत नाही. माणूसही अशाच पद्धतीचा आहे. बाहेरून तो कितीही देखणा वाटला तरी आतली त्याची स्वार्थी, कुत्सित बुद्धी आपल्याला दिसत नाही. आणि दिसली तरी काही वेळा आपण त्याला चांगला विचार देऊन बदलू शकत नाही. असे त्यांचे मत आहे.

**अंगार तुच्छतेचा—** परिस्थितीमुळे माणसाच्या मनावर होणारा आघात आणि त्यातून त्याची झालेली घडण लेखिकेने एका मुलाच्या उदाहरणातून दाखवून दिली आहे. इथे त्यांनी एका गरीब कुटुंबातील कष्टाळू मुलाचे व्यथित झालेले मन टिपले आहे. शिवाजी नावाचा गरीब मुलगा अतिव कष्ट करून पैसा गोळा करतो परंतु शेवटी तो आजारी पडल्यावर त्याचे वडील ते सर्व पैसे दारू पिऊन उधळून टाकतो हे पाहून तो मुलगा अविचारी होऊन द्वेशाने धुमसत राहतो. यातून माणसाच्या कठोर वागण्याचा लहान मुलाच्या कोवळया मनावर होणारे विपरीत परिणाम दर्शविले आहे. माणूस असा का वागतो यावर लेखात चिंतन झालेले दिसून येते.

**मनावरची ओझी—** माणसाच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न येथे झाला आहे. अति दुःखाने त्रासलेली माणसे कोणतीही वाट मिळाल्याकारणाने कोणावरतरी विश्वास ठेवून मंदिराकडे किंवा ज्योतिष्यांकडे वळतात. अशा गोष्टींवर विश्वास नसूनही त्या क्षणी त्या मनोभावे श्रध्दा ठेवून जगू पाहतात. पण शाळा कॉलेजची मुलेमुली मंदिराकडे वळताना पाहिल्यावर लेखिका अस्वस्थ होतात. जे पाय वाचनाकडे, कलेकडे, निसर्गाकडे जायला पाहिजे होते ते पाय मंदिराकडे का वळले यावर त्या चिंतन करतात, याचे कारण काय असेल याचा शोध त्या घेऊ पाहतात. त्या विचार करतात की आजचे युग हे विज्ञानाचे तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगाने माणसांना सुविधा दिल्या खऱ्या पण त्याबरोबर स्पर्धेचा शापही दिला. त्यामुळे माणूस त्यात पूर्ण गुरफटून जातो. त्यांना असुरक्षित वाटू लागते आणि हे मनावरचे ओझे काढून ठेवण्याकरिता त्यांनी मंदिराची वाट धरली. पण हे कुठे तरी योग्य नाही, हे धोक्याचं आहे असे त्या या लेखात पटवून देण्याचा प्रयत्न करतात.

**शिक्षण... भाषाः काही विचार—** हा लेख म्हणजे १९७१ साली कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतील लेखिकेचे अध्यक्षीय भाषण आहे. कर्नाटकातील मराठी भाषेच्या जनतेच्या मनात

मराठी भाषेविषयी प्रेम, अस्मिता जागवण्यासाठी लेखिकेने भाषण केले होते. या भाषणात त्यांनी मराठी भाषेवर स्वतःचे विचार मांडले आहे. कर्नाटकात मराठी भाषेची झालेली दुर्दशा दाखवून देऊन मराठी भाषेचे संरक्षण करण्याची सरकारकडे मागणी करून काही उपाय सूचवले आहे. मराठी भाषेची महती वर्णन करत असताना मराठी भाषा टिकवून ठेवण्यासाठी ज्या ज्या माणसांनी प्रयत्न केले त्यांचा उल्लेख लेखामध्ये आला आहे. मराठी भाषा टिकून ठेवण्यासाठी लेखिकेने सरकारकडे विविध योजना आकायची मागणी केली आहे. सरकारने मराठी चौथीपर्यंतचे शिक्षण देणाऱ्या शाळांचा भरपूर विस्तार करावा, मराठी शिक्षण देण्याची व्यवस्था असावी, प्रत्येक तालुक्यात, गावात वा मोठया गावात मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र असे वाचनालय असावे, मराठी पुस्तक प्रकाशनासाठी सरकारने कोणत्या ना कोणत्या रीतीने मदत करावी अशी उपाय योजना सूचवलेली दिसते.

## ४.४ इंदिरा संत यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

### ४.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

इंदिरा संत यांच्या ललित निबंध लेखनाने मराठी साहित्यात विशेष अशी भर घातलेली दिसून येते. त्याचे ललित निबंध लेखन पूर्णता नव्या परंपरेशी नाते जोडणारे आहे. एखादा विषय घेऊन त्या अनुषंगाने दैनंदिन जीवनातील अनेक संबंधीत अनुभव आठवणी सांगून त्यावर आकर्षक भाषेत आपली मते विचार प्रकट करून शेवट परिणामकारक करणे अशा पद्धतीचे त्यांचे लेखन आहे. त्यांच्या लेखनाला आत्माविष्काराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यांचे लेखन माहितीपर तसेच नीतीपर आहे. त्यांच्या ललित लेखनाची मांडणी स्पष्टीकरणात्मक, विवरणशील असलेली दिसून येते.

लहानपणापासून नकळत मनात जपून ठेवलेल्या आठवणी अनुभवातून त्यांचे आत्मपर लेख साकार झाले आहेत. बालपणातील आठवणी सांगण्यासाठी त्यांनी स्वतंत्र लेखांची निर्मिती केलेली आहे. गतजीवनातील सुखदुःख मिश्रित आठवणी सांगण्यात त्या गर्क झालेल्या दिसून येतात.

त्यांच्या आत्मपर लेखनातून आत्मशोधाचा प्रत्यय येतो. त्यांनी उपभोगलेले बालपण, त्या बालपणातील तसेच सासरच्या सुखदुःख मिश्रित आठवणी, खेडयातील निसर्गसानिध्यात घेतलेले जीवनानुभव व कालांतराने संसारी जीवनात आलेले अनुभव वर्णनात्मक पद्धतीने त्यांच्या व्यक्तिमत्त्वासह लेखात व्यक्त झाले आहेत. अतिशय प्रांजळपणे अतिशय सूक्ष्मरित्या तपशीलाने त्यांच्या जीवनातील अनेक लहान मोठे अनुभव लेखात शब्दबद्ध झालेले दिसून येतात. या आठवणी अनुभवांच्या अनुषंगाने त्यांच्या स्वभावाची, वृत्तीची, आवडी—निवडीची नेमकी ओळख पटत जाते. या आठवणी अनुभवांच्या रेखाटनातून त्यांच्या रसिक, चिंतनशील, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणारे, संवेदनशील, भावनाशील अशा व्यक्तिमत्त्वाच्या पैलूवर प्रकाश पडतो. त्या बऱ्यावाईट आठवणी अनुभवांच्याबरोबरीने मांडलेले त्यांचे विचार मोलाचे वाटतात. त्यांच्या बालपणात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण कशी झाली याविषयीचे सखोल विवेचन लेखनात झालेले दिसते.

त्यांचे जीवनानुभव, त्यांच्या आयुष्यातील सुख दुःखे, त्यांचा जीवनसंघर्ष यांची सहृदय वर्णने लेखनात आली आहेत. बालपणातील सुखकारक आठवणी सांगताना त्यांच्या प्रसन्न वृत्तीचे दर्शन घडते. जीवनातील उफाळून आलेल्या आठवणींतून नकळत त्यांच्या जन्मभूमी व कर्म भूमीशी समरस झालेल्या संवेदनशील मनाचे दर्शन घडते. अगदी सरळ साध्या व सोप्या भाषेत त्यांच्या आठवणी लेखात चित्रित झाल्या असून त्यांच्या काही लेखांना कथेचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

संपूर्ण समाज मनावर असणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या पगडयाखाली लेखिकेचे जीवनही दडपले होते त्यामुळे वैयक्तिक आठवणी अनुभवांच्या अनुषंगाने त्यांचे स्त्रीविषयक लेख साकार झाले आहेत. एक स्त्री म्हणून पुरुषप्रधान विचारसरणीच्या वर्चस्वाखाली दबलेले स्त्रीचे वेगळे असे अनुभवविश्व त्यांच्या लेखनात उतरत असताना स्त्री मनातील भावनांचा उद्रेक लेखनात स्पष्टपणे जाणवत राहतो. हे लेखन स्त्रीविषयक कळवळयातून झालेले असून त्याचे रेखाटन सहृदयतेने झालेले दिसते. त्यांच्या लेखनात त्यांच्या स्वतःच्या व इतर स्त्रियांच्या व्यथा वेदना तिव्रतेने व्यक्त झाल्या आहे.

पुर्वीच्या काळात मुलींना स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागण्यास, मुलांशी बोलण्यास, त्यांच्याशी मैत्री करण्यास बंधन होते. हे वातावरण लेखिकेनेही अनुभवले होते. मुलींना वेळोवेळी घातलेल्या मर्यादांविषयी लेखिका लिहितात, "कोणतीही आकांक्षा बाळगून ती पुरी करून घेणे यात मुलगी अपुरी पडते. घराची साथ, पैशाची मुबलकता आणि स्वाधीनता या गोष्टी असल्या तरच मुलगी पुढचे मनोरथ पुरे करू शकते. कित्ती असमाधान झाले तरी घराविरूद्ध जाऊ शकत नाही. कारण पुढचे मार्ग घर सोडल्याशिवाय दिसत नाहीत. त्याला जो धीटपणा लागतो तो मुलीत नसावा अशीच बाहेरची व्यथा असते. मुलीला कुणी आधार देण्याचा प्रयत्न बाहेरून होत नाही." (फुलवेल, पृ. ७३) अशा शब्दात तत्कालीन समाज मनाचे चित्र लेखनात यथातथ्य मांडून स्त्रीच्या व्यथा बोलक्या करण्याचे कार्य लेखिकेने केले आहे. स्त्रीच्या भावना अतिशय हळूवारपणे रेखाटण्याचे कौशल्य त्यांच्या स्त्रीविषयक लेखनातून दिसते. स्त्रीजीवन चित्रित करत असताना त्या भावविवश होताना जाणवतात. स्वतःचे अनुभव रेखाटन वरवर न करता त्या अनुभवांच्या अनुषंगाने अखिल जगातील स्त्रीच्या व्यथा वेदनांचे चित्र त्यांनी परिणामकारक बनवले आहे. अतिशय शांत चिंत्तवृत्तीने हे लेखन झालेले असून स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारावे अशी भूमिका त्यांनी आपल्या लेखनातून घेतलेली दिसते.

लेखिकेच्या मनाला जे साहित्य भावले त्याचा वेध घेत असताना त्या साहित्याचे आणि साहित्यिकाचे श्रेष्ठत्त्व त्यांनी नेमकेपणाने उलगडून दाखवले आहे. इतर साहित्यिकांच्या साहित्याविषयी त्यांना काय वाटले, त्यांचे साहित्य त्यांना का आवडले? याविषयी सखोल चर्चा त्यांच्या लेखनात झाली आहे. त्यांना आवडलेल्या साहित्यकृतीच्या रसग्रहणातून त्यांना भावलेला अर्थ स्पष्ट करत साहित्यातील चांगले वाईट, वेगळेपण नावीन्य, विशेष त्या नेमकेपणाने उदाहरणासह दाखवून देतात. त्यामुळे या लेखांना स्पष्टीकरणात्मक तसेच दिर्घ स्वरूप प्राप्त झालेले दिसते. त्यांनी लिहिलेल्या साहित्यविषयक लेखनात वाङ्मयीन संदर्भ अफाट आले आहेत. येथे त्यांच्या अफाट व्यासंगाचे व तीव्र स्मरणशक्तिचे दर्शन घडते. अशा प्रकारच्या लेखांची भाषा साधी सरळ असून ती भाषा सुंदर चित्तवेधक झाली आहे.

लेखिकेने कुटुंबातील, साहित्य आणि संगीत अशा क्षेत्रातील मोजक्याच चार व्यक्तींची चित्रणे आपुलकीने लिहिली आहेत. त्या चित्रणातून त्या व्यक्तींचे अंतरंग म्हणजेच त्या व्यक्तींचा

स्वभाव, त्यांच्या सवयी, आचारविचार, त्यांचे दुःख, त्यांचे कार्यकतृत्त्व यांचा सखोल वेध घेतला आहे. त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वातील कंगोरे उलगडून दाखवित असताना चारही व्यक्तिचित्रणात त्यांच्या मनातील त्या व्यक्तीबद्दलचा आदरभाव व्यक्त झाला आहे. त्या व्यक्तींच्या दुःखाशी लेखिका एकरूप होताना जाणवतात. त्यातून त्या व्यक्तींचा अतूट स्नेहबंध लेखात प्रकर्षाने व्यक्त झालेला दिसून येतो.

साहित्यिकांच्या किंवा गीतकारांच्या सहवासातील गोड आठवणी सांगत असताना त्यांच्या क्षेत्रातील त्यांनी केलेली कामगिरी किती महान आहे हे अधिक पटवून सांगण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. साहित्य क्षेत्रातील सुप्रसिद्ध लेखकांच्या भेटीच्या अनमोल आठवणी रेखाटत असताना स्वतःला कविता लेखनासाठी त्यांच्याकडून झालेल्या मार्गदर्शनाबद्दल ऋणानुबंध लेखनात व्यक्त झाला आहे. त्याचबरोबर रेखाटलेल्या माणसांचे साहित्य सृष्टीतील योगदानाचा परिचय व्यक्तिचित्रणपर लेखनात करून दिला आहे. या चारही व्यक्तिचित्रणात त्या व्यक्तींच्या गुणांची कदर करून त्यांच्या जीवनाचे विविध पैलू व कार्याची महती वर्णिल्याने ही व्यक्तिचित्रणे गुणगौरवपर झाली आहे. एकंदरीत या व्यक्तींशी समरस होऊन लेखन केल्याने या लेखनाला लालित्याचे निराळे परिमाण लाभले आहे.

लेखिकेचे काही लेख विचारप्रधान व चिंतनशील आहे. त्यांच्या चिंतनशील मनाला काही गोष्टी अस्वस्थ करताना दिसतात. त्या अनुषंगाने त्यांच्या लेखनात चिंतनाला सुरुवात होते. त्यांच्या लेखनात मानव स्वभावावर चिंतन झालेले असून या चिंतनातून त्यांचे प्रगल्भ विचार प्रभावितरित्या व्यक्त झाले आहेत. जीवन जगत असताना त्यांना जे जे अनुभव आले, मानव स्वभावाचे, मानवी मनाचे त्यांना जसे दर्शन घडले, त्या आधारे त्यांनी लेखन केले आहे. 'अंगार तुच्छातेचा', 'मनावरची ओझी', 'शिक्षण... भाषाः काही विचार' या लेखांमध्ये लेखिका माणसांच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्त्न करतात व आपले समंजस दृष्टीने पारखून घेतलेले दिशादर्शक विचार सहृदयतेने, साधेपणाने व्यक्त करतात. त्यातून त्यांचे लेखन चित्तवेधक झाले आहे. वाचकांना सहज उमजून त्यावर विचार करण्यास प्रवृत्त करणारे त्यांचे लेखन आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनातील माणसाविषयीचे प्रग्लभ चिंतन वाचकांशी हितगूज करणारे आहे असे आपल्याला म्हणता येते.

## ४.४.२ आत्माविष्कार

ललित लेखनात मांडलेल्या साहित्यिकाच्या स्वतःच्या आयुष्यातील अनुभवांच्या, घटना प्रसंगांच्या निमित्ताने त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रतीत होते. इंदिरा संत या हळव्या, संवेदनशील, सहनशील, रसिक, माणूसकी जपणाऱ्या तशाच प्रगल्भ विचारांच्या होत्या. त्यांचे हे व्यक्तिमत्त्वाचे विशेष त्यांच्या प्रत्येक अनुभव कथनाच्या निमित्ताने विशेष स्वरूपात प्रकटत जातात. उदाहरणात, पतीपत्नीच्या नात्यात जीवाभावाचे नाते असले पाहिजे. तरच त्या दोघांचा संसार सुखाचा होतो. याविषयी लेखिका आपल्या लेखनात विचार व्यक्त करताना लिहितात, "संसार हा दोघांचा असला पाहिजे. तरच स्त्री मोकळेपणाने वागेल. पतीची गुलाम न होता त्याच्या खांद्याला खांद्या लावून संसारात भाग घेईल." (मृद्गंध, पृ. १२९) असा मोलाचा सल्ला त्यांनी आपल्या लेखनातून दिला आहे. अशा लेखनातून प्रगल्भ विचारांचे त्यांचे व्यक्तिमत्त्व आपल्याला जाणवत राहते.

## ४.४.३ काव्यात्मकता

सूर, नाद, लय यांनी एकरूप झालेल्या शब्दकळेने नटलेले लेखिकेचे लेखन आहे. त्यांची वर्णने लयबद्ध आकर्षक काव्यात्मकभाषेत व्यक्त झालेली दिसून येतात. प्रीतीच्या पत्रांना 'रुणझुण पाखरू' असे नाव देऊन त्यांचे वर्णन करताना लेखिका लिहितात, "हे रुणझुण पाखरू आपला सांगावा माहेरीच पोहचवते असे नाही. आपल्या प्रीतीच्या विश्वातदेखील ते भरारी मारते. पायात बांधलेला नाजूक  घुंगूर, चोचीत सांगाव्याचा मोतीदाणा असे सजलेले, ते गोंडस पाखरू, आपल्या जिव्हाळयाच्या माणसाच्या ओंजळीत उतरते. प्रीतीच्या आकाशात झेप घेणारे हे पाखरू मला तर वेड लावून जाते!" (मृद्गंध, पृ .२२९) हे पाखरू दोन मने कशे जुळवते हे लेखिकेने आकर्षक शब्दांत सांगितले आहे. त्यांची वाक्ये लयबद्ध झालेली आहे. त्यातून ते वर्णन मनोज्ञ ठरले आहे.

### ४.४.४ चित्रमयता

चित्रमयता हा गुण लेखिकेच्या लेखनाचा विशेष आहे. कोणत्याही दृश्याकडे बारकाईने पाहून त्यांचे सखोल प्रतिबिंब त्यांच्या लेखात उमटलेले दिसून येते. निसर्गात रमणारे त्यांचे मन असल्याने निसर्गाचा घटक असलेल्या पाखरांच्या हालचालीकडे लेखिका बारकाईने पाहत असत. सकाळच्यावेळी पाखरांचे सौंदर्य नोंदवताना लेखिका लिहितात, "हिवाळयात भल्या सकाळी, नोकरीसाठी घुमटमाळावरून जाताना धुक्यातून रस्त्यावरील विजेच्या तारांच्या तोरणमाळा झालेल्या दिसायच्या. काळपट तपकिरी रंगाच्या बारीक बारीक चिमण्या खो–खोच्या रांगेप्रमाणे बसलेल्या असायच्या. शेपूट सारखी हालत असायची. त्या उडून जाईपर्यंत मला पाऊल पुढे टाकवत नसे. कागदाचे बारीख बारीक कपटे उधळावे, तशा त्या तार चिमण्या आभाळात फिरायच्या." (मृद्गंध, पृ. ११०) विजेच्या तारेवर बसलेल्या पक्षाच्या रांगा लेखिकेला तोरणासारख्या वाटत होत्या. त्या बसलेल्या पाखरांना तोरणाची उपमा देऊन किंवा आभाळात फिरणाऱ्या पाखरांना उधळणाऱ्या बारीकबारीक कागदाच्या कपडयाची उपमा देऊन त्यांनी वाचकांपुढे ते चित्र हुबेहूब प्रकट केलेले दिसून येते.

### ४.४.५ चिंतनशीलता

इंदिरा संत यांच्या ललित निबंधातून त्यांचे चिंतनशील मन प्रकट झाले आहे. त्यांचे ललित निबंधाचे स्वरूप एकंदरीत विचारप्रधान आहेत. स्वःजीवनातील अनुभवातून त्यांचे लेख साकारले आहेत. त्यामुळे लेखात जे चिंतन आले आहे, ते वरवरचे नसून त्याला अनुभवांची जोड लाभली आहे. त्यांचे मन सतत जागृत होते हे त्यांच्या लेखातील चिंतनातून लक्षात येते. त्यांनी मांडलेले प्रश्न किंवा केलेले चिंतन वाचकांना विचार करण्यास भाग पाडणारे आहे.

आजच्या युगात माणसांच्या जीवनातील श्रम यंत्रणामुळे कमी झाले असले तरी आजच्या माणसाच्या मनावर स्पर्धेच्या भीतीचे दडपण, ताप दिसत आहे. आणि हा भय हा ताप कमी

करण्यासाठी माणूस आज निसर्गाकडे न जाता मंदिराच्या वाटा चालू लागला आहे. आजचा माणूस निसर्गाकडे ज्ञानमंदिराकडे म्हणजेच वाचनालयाकडे, प्रयोगशाळेकडे जायला हवे तसे न होता वेगवेगळया मंदिरांकडे वळला आहे. याविषयी चिंतन करताना लेखिका लिहितात, "आजचे युग हे विज्ञानाचे यंत्राचे. या युगाने माणसांना जीवनात अनेक सुविधा दिल्या, त्याचबरोबर एक शापही दिला स्पर्धेचा. स्पर्धा हीच जीवनाला विळखा घालून राहते आहे. या स्पर्धेने माणसाचा आत्मविश्वास कमी होतो. त्याला अस्थिर आणि असुरक्षित वाटते. आणि या सर्वांतून क्षणाक्षणाला निर्माण होऊन व्यापून टाकणारे भयही आले. भय तरी या कोवळया जिवाना किती प्रकारचे? अभ्यासाचे, परीक्षेचे, मिळालेल्या गुणांच्या शेकडेवारीचे, नवशिक्षणातील प्रवेशाच्या स्पर्धेचे आणि शिक्षण पुरे झाल्यावर त्या स्पर्धेच्या जगडव्याळ चक्रात सापडण्याचे. हे सगळे क्षणभर तरी दूर ठेवण्यासाठी खुंटया हव्याच. अज्ञानाने जितक्या खुंटया जवळ केल्या त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक खुंटया या विज्ञानाने दिल्या; म्हणून जे पाय ज्ञानमंदिराकडे, वाचनालयाकडे, प्रयोगशाळेकडे कलांच्या खजिन्याकडे वा निसर्ग निरीक्षणाकडे उत्साहाने आणि उत्सुकतेने वळायचे हे हरिमंदिराच्या आणि साईबाबा, सिध्दिविनायकाला वाटा चालू लागले. रांगा लावून तिष्ठत उभे राहू लागले. केवळ त्या खुंटयांवर आपल्या मनावरची ओझी टांगण्यासाठी माझ्या डोळयांसमोर या भयग्रस्त आयुष्याला टांगून घेतलेल्या रांगाच रांगा दिसू लागतात आणि मन सुन्न होऊन जाते, कारण या रांगा निष्क्रिय जीवनाच्या असतात." (मृदगंध, पृ. ८४) आजच्या यंत्रयुगाने जीवनाविषयी लेखिकेला चिंता होते. इतक्या साधन सुविधा असूनही माणसाला आज ताण का आहे यावर चिंतन करून लेखिका याची कारणे शोधताना दिसतात.

### ४.४.६ घटनांचा संदर्भ

लेखिकेच्या ललित निबंध लेखनात त्यांच्या जीवनात घडलेल्या घटना प्रसंगांचे, आठवणी अनुभवांचे संदर्भ जागोजागी विखुरले दिसून येतात. ते अनुभव लेखनात हकिकतीसारखे अभिव्यक्त झाले आहेत. त्यांच्या अनुभव अभिव्यक्तीला संवेदनांची जोड मिळाली आहे. त्यामुळे त्यातून त्यांच्या मनाच्या विशिष्ट अवस्थेचे दर्शन घडते. त्यांच्या 'कारल्याच्या वेलाचा

मांडव' या लेखात त्यांनी नातेवाईकांच्या कुत्सित प्रवृत्तीवर भाष्य करत असताना त्यांना त्यांच्या नातेवाईकांकडून आलेला कटू अनुभव टिपला आहे. त्यांच्या मुलाला वास्तुशास्त्राच्या अभ्यासक्रमासाठी बडोद्याला जायचे होते. तो लहान असल्याकारणाने लेखिकेने त्याला बडोद्याला राहणाऱ्या त्यांच्या नातेवाईकाकडे ठेवण्याचा निर्णय घेतला आणि पत्राद्वारे त्यांची परवांगी मागितली व त्यावेळी त्यांनी ती मान्य केली. परंतु ज्यावेळी कॉलेज सुरू होते त्यावेळी त्यांच्या या निर्णयाला त्यांच्या नातेवाईकांनी थेट नकार दिला. या अनुभवलेल्या प्रसंगावर भाष्य करताना लेखिका लिहितात, "असा हा नातेवाईकांचा हिरवागार मांडव! कडू अनुभव देणारा! माणसातील विश्वास घालवणारा! हे दूरचे नातेवाईक असे वागले, तर नवल नाही. कारण खरे म्हणजे त्यांचा आपला संबंध केवळ जीवनशास्त्रीय नात्याचा असतो. त्यात स्नेहभाव नसतो. पण कधीकधी आपली म्हणवणारी, सख्ख्या नात्यांनी बांधलेली माणसेही अशी दूरची नातेवाईकच होतात... तेव्हा तर जगावरचा का परमेश्वरावरचाही विश्वास उडून जातो. अशीच एकदा मी कडू रसाचा पेला रिकामा करत अशा मांडवातून बाहेर पडले पाहिजे." (मृद्गंध, पृ. १५२) त्यांच्या या अनुभव अभिव्यक्तीला संवेदनांची जोड मिळाली आहे. यातून त्यांच्या मनाची दुर्बल अवस्था लक्षात येते. असे कितीतरी घटनांनी, प्रसंगांनी लेखिकेचे ललित लेखन बनले आहे.

## ४.४.७ व्यासंग

इंदिरा संत यांचा व्यासंग सखोल होता. बालपणापासून त्यांना वाचनाची गोडी होती. त्यांचे वडील शिक्षित असल्याकारणाने घरात शिक्षणाचे वातावरण होते. वाचनाची आवड त्यांना त्यांच्या वडिलांकडून आली. अक्षर गिरवायला आणि वाचायला जमल्यापासून त्यांनी रामायण महाभारतासारख्या महाकाव्याचे वाचन केले होते. संस्कृत, इंग्रजी वाङ्मयाचे वाचन त्यांनी आवडीने केले होते. लहानपणापासून त्यांना ओव्या ऐकून त्या जमवण्याचा छंद होता. त्यांनी अनेक कविता वाचून, त्यांचा सखोल अभ्यास केला होता. त्याचबरोबर बाळगाण्यांचा त्यांचा सखोल अभ्यास आहे. केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशातील बाळगाणी अभ्यासून त्यांचा अर्थ लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हे त्यांच्या लेखातील आशयातून लक्षात येते.

प्रत्येक दिसणाऱ्या दृश्यातील हावभाव लेखिका अचूकपणे टिपतात. ते मांडण्याकरिता त्या अनेक संदर्भ देतात. त्यातून त्यांच्या सखोल व्यासंगाची जाण होते. अफाट वाचनातून त्यांच्या लेखनाला संदर्भ लाभले आहे. लेखनात अचूक संदर्भ वापरल्याने त्यांचे लेखन दर्जेदार झालेले दिसून येते. त्यांनी संदर्भाकरिता दिलेल्या ओव्या पाहिल्या तर त्यांच्या अभ्यासूपणावर प्रकाश पडतो. लेखातील वर्णने करण्यासाठी त्यांनी वापरलेली भाषा वाचक मनाला अंतर्मुख करण्यासाठी लक्षणीय ठरते. त्यांच्या लेखात त्यांनी स्वतःच्या आठवणी, अनुभव मांडत असताना विचारांची सुरेख गुंफण केली आहे. त्यांच्या निबंधामध्ये आत्माविष्काराच्या विलोभनीय रूपकळा बघायला मिळतात. माणसाच्या मनाचा ठाव त्यांना आहे. तसेच निसर्गातील सौंदर्य टिपण्यासाठी त्यांची रसिक वृत्ती तल्लख आहे. एकंदरीत या सर्वांची जाणीव त्यांच्या ललित निबंध लेखनातून होत राहते.

### ४.४.८ भाषाशैली

भाषेबद्दल पु. ग. सहस्त्रबुद्धे म्हणतात, “भाषा हे व्यक्तिदर्शनाचे कित्ती अचूक साधन आहे.”[१] या मतानुसार लेखिकेच्या भाषेच्या माध्यमातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पारक करता येते. लेखिकेचा पिंड कवयित्रीचा असल्याकारणाने त्यांच्या ललित लेखनातील निवेदनाला काव्यात्मक संवेदनांची जोड आहे. कवितेत येतात तशाच पद्धतीचे शब्द त्यांच्या लेखनात येताना दिसतात. सहजता, भावनाशीलता, काव्यात्मकता, संवेदनशीलता हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहे.

त्यांच्या मनाला ज्या गोष्टींनी आकर्षित केले. त्या जसेच्या तशा टिपण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे. त्यांची भाषा लालित्यपूर्ण असून वाचकांचे चित्तकर्षक करणारी आहे. काव्यात्मकतेच्या जोरावर त्यांच्या भाषेला गोडवा प्राप्त झाला आहे. त्यांच्या भाषेतून व्यक्त होणारा निर्भर आनंद वाचक मनाशी सहज संवाद साधणारा आहे. त्यांची भाषा कधी कोमल होते तर कधी चिंतनाची पातळी गाठते. स्त्री अनुभवविश्व मांडण्याकरिता त्यांची भाषा भावोत्कट, हळूवार बनते. तर निसर्गवर्णनावेळी त्यांची भाषा सुंदर चित्रदर्शी होते. एकंदरीत

वाचक मनाला अंतर्मुख करून त्यावर विचार करायला लावणारी त्यांची भाषा त्यांच्या लेखनाला विशेष दर्जा प्राप्त करून देताना जाणवते.

## विचारगर्भित वाक्ये

लेखिकेच्या ललित निबंधात अशयघन विचारगर्भित वाक्ये सापडतात. त्यातून त्यांच्या सखोल ज्ञानाचे, त्यांच्या निरीक्षणशक्तिचे तसेच त्यांच्या दृष्टिकोनाचे दर्शन होते. त्यांनी लिहिलेली वाक्ये अर्थपूर्ण असून वाचकांना ज्ञान देण्याचे सामर्थ्य त्यात असलेले दिसून येते. ती पुढील प्रमाणेः

'संसाराच्या नावेत बसणे आणि वल्हवणे आपल्या हाती असले तरी आपल्या लहरी बाजूला सारून प्रवाहाच्या लहरी लाटांप्रमाणे नाव हाकावी लागते.'

'काही अनुभव, आठवणी अशा असताना त्याच्यावर काळाचे कितीही थर बसले तरी त्यांची जाणीव झाल्याखेरीज राहत नाही.'

## म्हणी

लेखिकेने आपल्या लेखनात म्हणींचा वापर केला आहे. म्हणीच्याद्वारे त्यांनी स्पष्टीकरणाला बळ दिले आहे. म्हणींचा वापर करून नेमक्या मोजक्या शब्दांत विचार वाचकापर्यंत पोहचवण्याकडे त्यांचा कल आहे. उदाहरणात–

'कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडू ते कडू'

'पुरूषाच्या हृदयाची वात त्यांच्या पोटातून असते.'

## संवाद

इंदिरा संत यांच्या लेखनात संवाद आले आहेत. संवादामुळे एखाद्या व्यक्तीचा स्वभाव, त्याचे विचार, त्याच्या भावना, संवेदनाचे प्रक्टीकरण होत असते. असे संवाद लेखिकेने आपल्या ललित लेखनात वापरले आहे. उदाहरणात–

लेखिका तिच्या मैत्रिणीची मुलगी लीला यांना पुढच्या शिक्षणाविषयी बोलत असताना म्हणतात, "लीला, आता इंग्रजी विषय घेऊन एमए हो!" तर ती जरा नाराजीने म्हणाली, "एमए काय होते! अक्का, आई बाबा लग्नाचं बघताईत माझ्या!"

"खरंच? मंग छानच आहे की!" मी म्हटले "छान कसलं! प्रथमग्रासेचं मक्षिकापात झाला आक्का.

मी आई बाबांना स्पष्ट सांगून टाकलं की, स्थळ बघताना सासू असणार नाही, असं स्थळ बघा. मला घरात सासू नको, ही माझी एकच अट."

"कमाल तुझी तर!" मी चकितच झाले. "तुला सासू नको. पण मुलाला आई हवी ना गं? तुझा दादा तर अजून नोकरीवरून आला की, 'आई' करतच येतो... मग?"

"मग काय? ज्या मुलीचं माझ्यासारखं मत असेल, ती त्याला पसंतच करणार नाही मुळी! आणि मी काही सासूचं मरण चिंतत नाही. असेना बापडी पण माझ्या घरात नको."

मला जरा हायसे झाले आणि वाटले, आता हिचा नवरा वर्षाकाठी माहेरी जाऊन येणार मग ती माझी समजूत घालत म्हणाली, "मी तुम्हाला दृष्ट वाटते ना? पण मग ठरवूनच लग्न करायचं, तर माझ्याही अटी असणारच. मुंलाच्या नसतात? 'चष्मा नको. उंची इतकी हवी. घरचे वळण दहा जणांतील हवे. एक गंमत सांगू? मुलाला मात्र बायकोचे आई वडील हवे असतात. त्याशिवाय हुंडा, जावयाचं कौतुक, देणं घेणं, बायकोचं कमी अधिक बघणं हे कसं होणारा तशीच मीही स्वार्थी आहे. माझा संसार, माझं घर म्हणून मी ज्या घरी जाणार, तिथल्या सुखाच्या घासात मला खडे परवडणार नाहीत. तुम्हाला हे पटेलच." या संवादातून लीलाच्या मनातील लग्नाबद्दलचे विचार, तिचा स्पष्ट बोलण्याचा स्वभाव नेमकेपणाने स्पष्ट होतो आहे.

## प्रश्नार्थक शैली

लेखिकेच्या लेखात प्रश्नार्थक शैली अवतरली आहे. त्यांच्या काही प्रश्नांची उत्तरे त्यांना शेवटपर्यंत मिळत नाही. ते प्रश्न तशाच पद्धतीने लेखात मांडून वाचकांना त्यावर विचार करण्यास भाग पाडतात. उदाहरणात खाली दिलेला उतारा–

"वाटते, ही शाळकरी मुले काय वाचत असतील? खरच वाचून खो खो हसत असतील? 'मला मराठी येतयं म्हणणाऱ्या बाळांच्यापेक्षा जी मुले असंख्य गरिबांची, शेतकऱ्यांची, दूरदूर खेडयांत राहणाऱ्यांची आहेत, त्यांचे काय होत असेल? 'ऊ'च्या गोष्टीतील 'टू' काय वाचून आपले ताण विसरत असेल? मोकळे मोकळे हसत असेल? तिच्यापर्यंत पाठयपुस्तकापेक्षा अधिक पोहोचणारे दुसरे कोणते पुस्तक असणार? आणि ते तर हे असे मला वाटते हा विनोदाचा चष्मा त्या मुलांना आपण वेळीच दिला नाही तर त्यांचे पुढचे दिवस कसे जातील?" अशा प्रकारचे अनेक प्रश्न त्यांनी आपल्या लेखनात उपस्थित केले आहे.

## ग्रामीण भाषा

इंदिरा संतांनी त्यांच्या काही लेखांमध्ये ग्रामीण भाषा वापरली आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाला विशेष दर्जा प्राप्त झाला आहे. उदाहरणात, लेखिकेच्या घरात काम करण्यासाठी शिवाजी नावाचा मुलगा येत होता त्या मुलाचे लेखिकेशी चाललेलं संभाषण लेखिकेने यथातथ्य खालील प्रमाणे लेखात मांडले आहे.

"मी माझा पगार बाईच्याकडे ठेवणार. त्यातनं मी पहयला तीन कापडाचे जोड घेणार, एक कुलूप किल्लीची टरंक घेणार फसक्लास रेडिओ घेणार. अन साहेब घेत्यात तसली सबनम. तसंच फणी, तेल चामडयाच्या चेपल्या...."

मी मुद्यामच विचारले, "आणि सिनेमा रे?"

"त्याने लगेच सांगितले, 'न्हाईबा, दिसभर ढोरांसारखं राबायचं अन् रातचं मुडद्यासारखं पडायचं. सिनेमा आमला लागतच न्हाई. भाजाराच्या दिशी आई चार आनं देती. त्यात हाटेलातचचा भजी घेतो क्वा–क्वा."

## उपमा अलंकार

लेखिकेच्या लेखनामध्ये अधून मधून उपमा अलंकाराचा वापर झाला आहे. यातून त्यांच्या भाषेला सौंदर्य प्राप्त झालेले दिसते. वाचकाच्या मनाला भूरळ घालणारी त्यांची वाक्यरचना आहे. उदाहरणात—

'त्या पाऊसधारा म्हणजे गुहेतील काळोखात नृत्य करणाऱ्या जलदेवताच वाटायच्या.'

'वाघाचे झडप घालावी तशी बोटाएवढया पाऊसधारांनी आणि झोंबऱ्या वाऱ्याने आमच्यावर झडप घातली.' अशी वाक्ये उदाहरण म्हणून सांगता येतील.

## ४.५ इंदिरा संत यांच्या लेखनाचे वेगळेपण

इंदिरा संत यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली दिसून येते. रोजच्या जीवनातील शुल्क वाटणारे त्यांचे अनुभव आठवणी त्यांच्या लेखनाचे विषय बनतात.

लेखिकेने आपल्या ललित लेखनातून स्वतःलाच व्यक्त केले आहे. त्यांच्या अनुभव आठवणींतून त्यांचे व्यक्तिमत्त्व लेखनात स्पष्ट होत जाते. याची जाणीव त्यांना आहे. स्त्री म्हणून त्यांचा जीवनसंघर्ष, जीवनातील ताणतणाव, त्यांच्या मनातील भावभावना त्यांच्या लेखनात सातत्याने जाणवत राहतात. जीवनावर अफाट प्रेम करणाऱ्या या प्रतिभावंत लेखिकेचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते. स्वतःच्या अनुभवांकडे लेखिका भावगर्भतेने तर काही वेळा गंभीरपणे पाहताना दिसतात. त्यांचे वैवाहिक जीवन दुःखाने व्यापलेले दिसते परंतु त्यातून त्या कधीच खचलेल्या दिसत नाही यातून त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन लक्षात येतो. त्यांच्या जीवनात त्यांना शतपावली, झोपाळा, झाडे, घराची खिडकीनेही दुःखच्यावेळी साथ दिली होती. अशा साध्या विषयातून लेखिका उच्च दर्जाचा विचार देऊन जातात. आणि हेच खरे त्यांच्या लेखनाचे यश आहे.

माणसावर आणि निसर्गावर अतिव प्रेम करणारे हे व्यक्तिमत्त्व असल्याचे त्यांच्या लेखनावरून जाणवत राहते. जीवन जगत असताना निसर्ग व मानव त्यांना ज्या तऱ्हेने भावले तसेच ते लेखनात आविष्कृत झाले आहे. निसर्गवर्णन करत असताना पाहिलेल्या निसर्गचित्रातील संवेदना व भावना त्यांनी सहज प्रकट केल्या आहे. लेखिकेच्या निसर्ग आकर्षणाविषयी रमेश तेंडुलकर म्हणतात, "इंदिराबाईच्या भावविश्वाचा एक अविभाज्य घटक म्हणजे निसर्ग."[२] यावरून लेखिकेला असणारी निसर्गाची ओढ प्रकट झाली आहे. निसर्गसौंदर्य वर्णने त्यांनी आकर्षक भाषेत व चित्रमय शैलीत केली असून वाचकाच्या मनाला भुरळ घालणारी ती वर्णने झाली आहे.

लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाविषयी स्वतःचे मत व्यक्त करताना प्रतिमा केसकर लिहितात, "इंदिराबाईची रसिकता अभिजात आहे. स्त्री जीवनाविषयी असणारा त्यांचा जिव्हाळा देखील तितकाच व्यापक आहे. त्यामुळे बायाबापडयांच्या ओव्यांना इंदिराबाई सर्वांगाने भिडल्या आहेत."[३]

लेखिकेच्या लेखनात जिव्हाळा व विचारात सखोलता असलेली दिसून येते. त्यांचे व्यक्तिमत्त्व बुद्धिमान, विचारी, संवेदनशील असल्याचा प्रत्यय लेखनातून येत राहतो. त्यांचे लेखन चित्तआकर्षक झाले आहे. त्यांचे सखोल विचार वाचकाला बौद्धिक तसेच कलात्मक आनंद देताना जाणवतात.

इंदिरा संत यांचे लेखन कोणतीही भुमिका न ठेवता झाले आहे. सरळ साध्या भाषेत लिहिल्यामुळे त्यांचे लेखन वाचकांच्या मनाला भिडणारे ठरते आहे. हे लेखन साधे सरळ असले तरी मर्माला स्पर्श करणारे आहे.

## ४.६ निष्कर्षः

१. लेखिकेचे अनुभवविश्व व्यापक व सखोल आहे. वास्तव स्वरूपाचे अनुभव त्यांच्या ललित लेखनात व्यक्त झाले आहेत.

२. बालपणातील अनुभव–आठवणी, वैवाहिक जीवनाच्या आठवणी, सहवासात आलेल्या माणसांच्या आठवणी, निसर्ग सहवासातल्या आठवणी, वाचनात आलेले साहित्य अशातून लेखिकेच्या लेखनाला विषय मिळाले आहे.

३. आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशा प्रकारचे लेखन लेखिकेने केले आहे.

४. जीवनात त्यांना करावा लागलेला संघर्ष, त्यांची सुखदुःखे, सहवासात आलेली विविध स्वभावाची माणसे, निसर्गसौंदर्य यांविषयी सह्रदय वर्णने लेखिकेच्या लेखनात उतरली आहेत.

५. लेखिकेने अगदी अल्प प्रमाणात व्यक्तिचित्रणे लिहिली असून त्या व्यक्तिचित्रणात त्यांनी त्या व्यक्तींच्या कार्य कतृत्त्वाचा आढावा अधिक प्रमाणात घेतला आहे. त्यांची व्यक्तिचित्रणे गुणगौरवपर झाली आहे.

६. माणसाच्या मनाचा शोध हे लखिकेच्या चिंतनशील लेखनाचा गाभा आहे.

७. लेखिकेच्या लेखनातून त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.

८. सूक्ष्मकथन, तपशीलवार वर्णने, पारदर्शकता, भावगर्भता, मनोवेधक निवदेनशैली त्याचबरोबर प्रत्येक गोष्ट अगदी समजून सांगणे ही लेखिकेच्या ललित निबंध लेखनाची महत्त्वाची वैशिष्टये आहेत.

९. सूक्ष्म निरीक्षण, अंतर्मुखता, सौंदर्यवेदी वृत्ती, संवेदनशील, सहनशील, रसिक, विचारशील, अभ्यासू, जिज्ञासू, गरीबांविषयी दयाभाव, माणूसकी, प्रामाणिकपणा अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये त्यांच्या ललित निबंधाद्वारे जाणवतात.

१०. स्वःनुभवातून तसेच सहवासात आलेल्या इतर स्त्रियांच्या अनुभवातून स्त्रीजीवनाची व्यथा वेदना, स्त्रीचे निराळे जीवनानुभव लेखिकेने आपल्या ललित लेखनात मांडले आहे. हे लेखन शांत चित्तवृत्तीने झाले आहे.

११. संस्कृत, मराठी, इंग्रजी या भाषांतील साहित्य वाचनाचे पडसाद लेखिकच्या ललित लेखात उमटले आहे. त्यांना आवडलेल्या साहित्यकृतीचे रसग्रहण लेखात झालेले आहे. वाचनात आलेल्या साहित्यकृतीचे श्रेष्ठत्त्व, नावीन्य आणि विशेष यांची नोंद लेखिकेने नेमकेपणानी घेतली आहे.

१२. लेखिकेचे लेखन कोणत्याही गोष्टीतल्या वरवरच्या रूप गुणांपेक्षा त्या गोष्टीच्या गाभ्याला महत्त्व देणारे आहे.

१३. आत्माविष्कार, काव्यात्मकता, चित्रमयता, चिंतनशीलता, घटनांचा संदर्भ, व्यासंग व भाषाशैली असे वाङ्मयीन विशेष लेखिकेच्या लेखनाला लाभले आहे.

१४. लेखिकेची भाषा लालित्यपूर्ण असून ती आशय विषयाला अनुसरून नाजूक, संवेदनशील व काही वेळा चिंतनशील बनते. सहज साधी अनौपचारिक लेखनशैली, आकर्षक शिर्षके, मुद्देसूद मांडणी, श्रुतयोजने, नेमक्या शब्दात आपले विचार व्यक्त करण्याचे कौशल्य त्यांना सहज प्राप्त झाले आहे.

## ४.७ संदर्भ सूची:

१. सहस्त्रबुद्धे पु. ग., 'स्वभाव लेखन', मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९३८, पृ. ३८

२. तेंडुलकर रमेश, 'मृंण्मयी', सुविचार प्रकाशन, पुणे, प्र आ. १९८५, पृ. ११

३. केसकर प्रतिमा, 'माणूस' (साप्ताहिक), २७ एप्रिल १९८५, पृ. २१

# प्रकरण पाचवे

# प्रतिमा इंगोले यांच्या ललित व वैचारिक निबंध लेखनाचे स्वरूप

# प्रकरण पाचवे

## ५. प्रतिमा इंगोले यांच्या ललित व वैचारिक निबंध लेखनाचे स्वरूप

### ५.१ प्रास्ताविक

साठोत्तरी मराठी साहित्यविश्वात आपल्या ग्रामीण साहित्यनिर्मितीने महत्त्वाचे स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून लेखिका प्रतिमा इंगोले या सर्वश्रुत आहे. वऱ्हाडी भाषेतील कथा लेखनाबरोबरच कविता लेखन, कादंबरी लेखन, बालसाहित्य, स्फुट लेखन, ललित व वैचारिक निबंध लेखन अशाप्रकारचे विपुल लेखन त्यांनी केले आहेत. ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण भागातील समस्या, ग्रामीण स्त्रीजीवन त्याचबरोबर नागर संस्कृतीचे चित्रण करण्यासाठी लेखिकेने स्वतःचे अनुभव, आठवणी आपल्या निबंध लेखनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. येथे त्यांच्या ललित व वैचारिक निबंध लेखनाचा अभ्यास अभिप्रेत आहे.

### ५.२ प्रतिमा इंगोले यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

प्रतिमा इंगोले यांचे बालपण खेडयात गेले असल्याकारणाने ग्रामजीवन तसेच शिक्षण घेत असताना नागर संस्कृतीशी त्यांचा परिचय झाला. आजच्या आधुनिक जगात औद्योगिकरणामुळे एक नवी संस्कृती निर्माण होऊन पारंपरिक भारतीय संस्कृती नष्ट होत आहे ती टिकली पाहिजे याची जाणीव त्यांना झाली. आणि हिच त्यांच्या लेखनाची प्रेरणा ठरली. या ग्रामीण संस्कृतीविषयी त्यांच्या मनात प्रेम, जिव्हाळा आहे. त्यामुळे ती टिकून राहावी यासाठी त्यांनी लोकसंस्कृतीचा, लोककथांचा, लोकगीतांचा वर्षाव आपल्या लेखनातून केला. पूर्वीची संस्कृती, लोकजीवनाचे, समाजाचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले असते हे लेखिकेला माहित होते. त्यामुळे लोकसाहित्याच्या आधारे जुन्या काळातील जीवन रेखाटून लोककथा, लोकगीतांतून लोक संस्कृतीचे जतन करणे ही त्यांच्या लेखनामागची भूमिका आहे.

## ५.३ प्रतिमा इंगोले यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

लेखिकेच्या ‘बयनाचे बोल’ हा ललित लेख संग्रह एप्रिल १९९८ साली प्रकाशित झाला. या संग्रहात लेखिकेने पारंपरिक लोकगीते तसेच लोककथांच्या आधारे खेडयातील स्त्रीजीवन उघडपणे मांडले आहे. पारंपरिक लोकगीते स्त्रियांनी आपले सुखदुःख सांगण्याकरिता लिहिली असावी असा समज आहे. या लोकगीतात स्त्रीया एकमेकींबद्दल बोलताना ‘बयना’ शब्द वापरत असत. ‘बयना’ म्हणजे बहिण. पूर्वीच्या काळातील स्त्रीया सगळया स्त्रियांना सख्या बहिणीसारख्या मानत असत. लोकगीतांमध्ये ‘बयना’ या शब्दाद्वारे त्यांचा स्नेहभाव व्यक्त झालेला दिसून येतो. त्यामुळे ‘बयना’ हाच शब्द वापरून ‘बयनाचे बोल’ असे या लेख संग्रहाला शिर्षक दिले. कारण या संग्रहातील अकरा लेखामधील नऊ लेख स्त्री जीवनाशी निगडित आहे. त्यामध्ये स्त्रीचे आपुलकीचे, प्रेमाचे, जिव्हाळयाचे बोल आविष्कृत झाले आहे. त्यामुळे ‘बयनाचे बोल’ हे शिर्षक या लेख संग्रहाला उचित ठरते आहे.

‘झेंडवाईचे दिवे’ हा लेखसंग्रह जानेवरी २००२ साली प्रकाशित झाला. यात एकूण ११ लेख समाविष्ट केले आहेत. या संग्रहातील लेखांमध्ये लेखिकेने आपल्या जीवनातील आठवणी सांगितल्या आहे. त्यांनी ग्रामीण जीवन अनुभवले असल्याने या ग्रामीण संस्कृतीशी त्यांचा जवळचा परिचय आहे. ही ग्रामीण संस्कृती अनुभवत असतानाच आजच्या औद्योगिकीकरणामुळे झपाटयाने उदयाला आलेल्या नव्या कोऱ्या संस्कृतीचा परिणाम समाजमनावर होत आहे हे पाहिल्यावर त्यांना रहावलं नाही. या नव्या प्रवाहात जुन्या गोष्टी वाहून जाताना पाहून आपण स्वतःकडे जपून ठेवलेल्या गोष्टी ‘झेंडवाईचे दिवे’ या लेख संग्रहात नोंदवण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो.

‘उजाड अभयारण्य’ हा ललित लेखांचा संग्रह २००९ साली प्रकाशित झाला. लेखिकेने ज्या ज्या प्रदेशांना, स्थळांना भेटी दिल्या तेथिल मंदिरांची, प्रदेशांची, परिसराची, शिल्पांची वर्णने लेखनात उतरली आहेत.

आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, प्रवासवर्णनपर लेख अशा प्रकारचा संकर त्यांच्या ललित निबंध लेखनात दिसून येतो. भूतकाळातील तशाच वर्तमान काळातील

अनुभव, आठवणी, लोककथा, लोकगीते, प्रवासातील अनुभव, प्रवासात पाहिलेल्या अनुभवलेल्या स्थळ प्रदेशांच्या आठवणी, भेटलेली माणसे त्यांच्या ललित लेखनाचे विषय झाले आहेत. लेखिकेने व्यक्तिचित्रणपर स्वतंत्र लेख लिहिलेले दिसून येत नाही. परंतु 'कोरीव शिल्प', 'पुंढलीकाचे भेटी' अशा प्रवासवर्णनपर आणि आत्मपर लेखांमध्ये अधिकतेने व्यक्तींचे चित्रण आले आहेत. त्यामुळे व्यक्तिचित्रणपर लेख या प्रकारामध्ये वरील लेखांचा समावेश केला आहे.

## ५.३.१ आत्मपर लेख

लेखिकेच्या आत्मपर लेखांमध्ये त्यांच्या बालपणातील अनुभव–आठवणी व्यक्त झाल्या आहेत. बालपणात खेळलेले खेळ, गमती–जमती, अनुभवलेली संस्कृती, निसर्ग सानिध्यातल्या आठवणी, घडलेल्या घटना प्रसंगांच्या आठवणी, जुन्या माणसांकडून ऐकलेली लोकगीते याविषयी अनेक अनुभव, आठवणी लेखनात उतरल्या आहेत.

**बोरांची टपटप–** या लेखात बालपणात अनुभवलेल्या बोरांविषयीच्या सुखी क्षणांच्या आठवणी सांगितल्या आहेत. एक दिवस लेखिकेच्या विद्यार्थीनीने बोरं आणली होती. त्यावरून त्यांच्या मनातील बोरांविषयीच्या आनंददायी आठवणी जाग्या होतात. वेगवेगळया ठिकाणी असलेली बोरांची झाडे, बोरं विकण्यासाठी येणाऱ्या माणसांविषयी आठवणी, गावातील प्रसिद्ध बोरीची झाडे, पलीकडच्या गावातील बोरबन अशा गोष्टींची नोंद लेखात केलेली दिसते. बालपणात बोरं वेचायला जाण्यासाठी लेखिकेला परवांगी नव्हती. कधी कधी त्या आईला चोरून बोरं खायला जात असे. तसेच कधी आईला खूष करून त्या मुलांबरोबर बारीच्या झाडाकडे जायच्या. लेखिका लिहितात, "कधी कधी आईला खूष केलंच तर बोरं आणायला सुट्टी मिळायची, तेव्हा स्वर्ग जिंकल्याचा आनंद व्हायचा. काळया भुईवरील केशरी सडा टिपताना मजा यायची. ताजं टपोरं बोर हाताशी आलं की ते उचलताना स्वर्गीय आनंद व्हायचा." (झेंडवाईचे दिवे, पृ. ५८) असा मनात साठवून ठेवलेला आठवणींतला आनंद लेखात व्यक्त करतात. बालपणात पाहिलेल्या बोरांच्या रंग गंधाचे व चवीचे वर्णनही लेखात करताना दिसतात.

शाळेत मुलं बोरं घेऊन यायची. त्यावेळी लेखना, कंच्या, खडू अशा वस्तूंच्या बदल्यात मुलांकडून बोरं मिळायची. आजी व नातवंडे बरोबरीने बोर वेचत असताना घडलेल्या अनेक गमतीजमती लेखात उतरल्या आहेत. एकंदरीत या लेखात लेखिकेने बालपणातील जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे.

**केळीचं तांड...–** मामाच्या केळीच्या मळयात बालपणात त्यांच्याकडून घडलेल्या प्रसंगाची आठवण त्यांनी आठवणीच्या रूपाने या लेखात सांगितली आहे. हा लेख कृषीसंस्कृतीशी निगडित असला तरी लेखात त्यांच्या आठवणी अधिकरित्या व्यक्त झाल्या आहे. केळीचे घड कोणी तरी विनाकारण कापून टाकले होते या प्रसंगाद्वारे त्यांनी माणसाचे विध्वसंक मन चित्रित केलेले दिसते. केळीच्या मळयातील विध्वंसक चित्र आठवून त्यांचे मन उदास होताना जाणवते. याच केळींच्या तांडात लहानपणी मोरपिसं एकत्रित करत असतानाची मोराची पिसे उपटून काडल्यावर मोराने वेदनेने केलेल्या आक्रोशाची दुःखदायक आठवण लेखात चित्रित केली आहे. ही घटना त्यांच्याकडून अजाणतेपणी घडली होती. परंतु ती तोडलेली पिसं पाहिल्यावर तो प्रसंग आठवल्यावर त्यावेळी त्यांच्या मनाला झालेली वेदना त्यांच्या या लेखात तीव्रतेने व्यक्त होताना जाणवते. या लेखात त्यांनी केळीच्या झाडाचे वर्णनही केलेले आढळते. केळीचे खोड, पाने, केळीचे रंग रूप, केळीचे झाड दारात लावत नाही याबद्दल असलेली लोकमनाची समजूत त्यांनी योग्य शब्दांत मांडली आहे. केळीच्या तांडातल्या प्रत्येक आठवणींना लेखिकेने लेखात उजाळा दिला आहे.

**भुलाईचं गाणं–** या लेखात माळी पौर्णिमेला म्हणजेच कोजागिरी पौणिमेच्या दिवशी भुलाई पूजण्याच्या परंपरेचा वेध घेताना आपल्या बालपणातील भुलाईच्या पूजेच्या आठवणी व्यक्त करताना दिसतात. बालवयात या सणाचा घेतलेला आनंद लेखात शब्दबद्ध झाला आहे. त्यांच्या बालपणात अशा भुलाईच्या पूजेत मुले एकत्र येऊन भुलाबाईची गाणी म्हणत. भुलाईचा काळ, म्हणजे पोरींचा आनंदोत्सव होता. त्यावेळी जुन्या काळात भुलाईच्या गाण्याने संपूर्ण गाव दुमदुमत होता. परंतु आजच्या काळात भुलाईची गाणी मुले विसरलेली दिसतात. त्यांच्याकडे एका दिवसासाठी पूजलेल्या भुलाईच्या पूजेत मुले गाणी म्हण्यास नाकारतात. ही गाणी आज नष्ट होत चालली आहे आणि त्यांची जागा आज सिनेमातील गाण्यांनी घेतली

आहे असे त्या सांगतात. या सिनेमातील गाण्याचा परिणाम मुला मुलींच्या कोवळया मनावर होताना बघितल्यावर त्या मनातल्या मनात दुःखी होताना जाणवतात. आजच्या आधुनिकीकरणाच्या आवर्तात सापडलेल्या मनाला ग्रामसंस्कृतीचा विसर पडलेला आहे. हे सत्य या लेखातून दाखवून देण्यासाठी बालपणात अनुभवलेल्या कोजागिरी पौणिमेच्या अनेक आठवणी या लेखात व्यक्त झाल्या आहे.

**झेंडवाईचे दिवे–** या लेखात दिवाळीच्या सणाला येणाऱ्या झेंडवाईच्या सणाची बालवयातील आठवण व्यक्त झाली आहे. त्यांच्या बालपणाच्या काळात गुराखी गुरांना ओवाळण्यासाठी झेंडवाई घेऊन गावात फिरत असतानाची आठवण त्यांच्या मनात जागी होते. ही झेंडवाई कशी बनवतात, ती करण्यामागची श्रध्दा, ती बनवण्यासाठी लागणारे सामुग्री यांची यादी अशा गोष्टींच्या आठवणी लेखात नमूद केल्या आहेत.

त्यांच्या लहानपणात गावातील सर्व लहान थोरांना झेंडवाईला म्हणणारी गाणी तोंडपाठ असायची परंतु ती गाणी आज नाहीशी होत चालली आहे. याचे दुःख लेखात व्यक्त होते. त्या जेव्हा सीता या बाईला झेंडवाईला का आली नाही? असा प्रश्न करतात त्यावेळी या झेंडवाईच्या उत्सवाला लोक नाकारतात असे उत्तर त्यांना मिळते. हे उत्तर ऐकून त्या अस्वस्थ होताना जाणवतात. आजच्या आधुनिक जगात पुरातन संस्कृतीला झिडकारणारे समाज मन या प्रसंगाद्वारे आविष्कृत केले आहे. त्याचबरोबर गुराख्याची गवत विणून झेंडवाई बनवण्याची कलाही शब्दबद्ध केली आहे. झेंडवाईची गाणी आधुनिक काळातही जिवंत रहावी असा भाव त्यांच्या या लेखात स्पष्ट झाला आहे.

## ५.३.२ स्त्रीविषयक लेख

'बयनाचे बोल' या संग्रहातील लेखांमध्ये लेखिकेने स्त्रीजीवनाचा वेध घेतला आहे. लोकगीतांच्या माध्यमातून स्त्रीचे निराळे असे अनुभवविश्व प्रकट झाले आहे. स्त्रीसुलभता, समाजात स्त्रीची होत असलेली कुचंबणा, सासरी सोसावे लागणारे कष्ट, संसार

चालवण्यासाठी तिला करावा लागणारा संघर्ष, तिचे कौटुंबिक नातेसंबंध अशा स्त्रीच्या अनुभवविश्वाचा व स्त्री समस्यांचे विविध पैलू लेखिका या लेखनात निदर्शनास आणून देतात.

**पाराबतीची साद—** या लेखात लोकगीतांच्या आधारे स्त्री—पुरुष नात्याची विण उलगडत असताना लेखिकेने आजच्या स्त्रीजीवनाची व्यथा सांगितली आहे. येथे दोघेही तितकेच महत्वाचे आहेत. पूर्वीच्या काळात लोकमनाने स्त्रीला पारबती तर पुरुषाला महादेव अशी प्रतिक नामे वापरली होती. लोकगीतांमध्ये आलेले हे महादेव—पार्वती म्हणजेच खऱ्या अर्थाने स्त्री पुरुषाचे पावित्र्य असे त्यांचे म्हणणे आहे. पूर्वी जीवासखा असलेले स्त्रीपुरुषाचे नाते आजच्या जगात ढळमळलेले दिसते. पूर्वी याच पारबतीच्या दुःखाने दुःखी झालेला महादेव आपल्याला दिसायचा. परंतु ही दृष्टी आज कायम राहिलेली नाही. स्त्रीच्या जन्मासमवेत आलेली काळजी, स्त्रीची समाजात होत असलेली कुचंबणा लोकगीतांच्या माध्यमातून चित्रित झाली आहे. स्वतःच्या जीवावर उदार होऊन समाज कल्याणासाठी स्वतः जळणारी ही पार्व ती म्हणजेच स्त्री, लेखिकेला वंदनीय आहे. पण पुरुषाला स्त्रीची महानता समजत नाही. पुरुष व्यसनाच्या आधिन झाल्याने कुटुंब पोषणासाठी घराबाहेर पडलेली स्त्री लौंगिक सुखाची बळी होऊ लागली. हे सर्व थांबवण्याकरिता आपल्याकडे आज कायदे बनले. परंतु ते कायदे शोभेचे झाले. अशी स्त्रीची आजची स्थिती पाहून त्यांना लोकगीतातील पार्वतीचे जीवन सुखी वाटते. या पार्वतीसारखा आदर आजच्या स्त्रीला मिळावा असा संदेश त्या या लेखातून देताना दिसतात.

**तुळस सखी—** या लेखात बालपणी ऐकलेल्या तुळशीवरच्या ओव्यातून स्त्रीचे आणि तुळशीचे नाते लेखिका लोकगीताच्या आधारे प्रकट करतात. ग्रामीण स्त्रीचा तुळशीवर असलेला विश्वास येथे निदर्शनास येतो. तुळशीला आपली सखी मानून स्त्री आपले सुखदुःख तिच्यापर्यंत पोहचवत असते आणि आपल्या लोकगीतातूनही तिचे कोडकौतुक करताना दिसते. तुळशीचा पूर्वजन्म वृंदेचा होता. त्या जन्मात विष्णू तिला फसवतो. त्यावेळी तिचा पती ऋषी तिला शाप देतो. तिला पापी ठरवली जाते. परंतु आज त्याच तुळशीला आपण देवस्वरूप दिले आहे. हे लोककथेतून पटवून देऊन त्याच तुळशीप्रमाणे आजच्या स्त्रीलाही आपण आदर द्यायला हवा असे लेखिकेला वाटते. तुळस आणि स्त्री यांचे अतुट नाते लोकगीतांच्या माध्यमातून त्यांनी 'तुळससखी' या लेखात उलगडले आहे.

**सीता सासूबाई–** या लेखात सासू व सुनेच्या नात्यातील संघर्ष चित्रित झाला आहे. स्त्री विरूद्ध स्त्री असा हा संघर्ष आहे. मुलगी लग्न होऊन आली की तिच्या वाटयाला नकळत हा सासूरवास येतोच. मुलगा लग्न झाला की सुनेने आपला मुलगा हिरावून घेतल्याची भावना सासूच्या मनात निर्माण होते. तिचं मन वैफल्यग्रस्त होते; व यातूनच सासू सुनेत दुस्वास निर्माण होतो. सासूला मुलाने बायकोचे केलेले कौतुक आवडत नाही. याच भावनेचा कोंडमारा मग सुनेला धारेवर धरण्यात व्यक्त होतो असे लेखिकेचे म्हणणे आहे. असे सासूचे भावजीवन या लेखातून मांडत असताना सासरी दुःखी असलेल्या सुनेच्या व्यथा, संघर्ष तिचे भावजीवन लोकगीतांच्या आधारे उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

“अस्तुरी जलम नोके घालू सीरहरी

सोळली आईबाई लोकाची ताबेदारी.” (बयनाचे बोल, पृ. ५७)

अशा लोकगीतातून स्त्रीच्या मनातील स्त्रीजीवनाविषयीचे मत व्यक्त झाले आहे. लग्न होऊन आलेल्या स्त्रीला सासूच्या या दुस्वासामुळे एकटेपणाचे जीवन जगावे लागते. एकवेळ दीर तिला समजून घेईल परंतु नवऱ्याकडून प्रेम मिळणे तिला कठीण होते. त्यावेळी त्या सुनेला कशी माहेरची आठवण येते, ती आपली व्यथा शेजारणीकडे कशी व्यक्त करते, सासूकडून त्रास सहन करूनही सासरच्या माणसांना आपले मानून माहेर विसरण्याचा प्रयत्न करून सासरी मन रमवण्याचा तिचा चाललेला प्रयत्न या सर्वांचा वेध लेखिकेने या लेखात घेतला आहे. सासुरवासाविषयी लेखिका लिहितात, “खरं तर सासुरवासाची ओरड म्हणजे आपलेच दात व आपलेच ओठ अशी आहे. घरातील फितुरीनं हैराण करावं तशी ही बाब आहे. कारण स्त्री विरूद्ध स्त्री असा हा संघर्ष आहे. अर्थात पुष्कळजणी सासुरवासाला कंटाळून गेलेल्या असतातही, तरीसुध्दा सासू व सुन या नात्यात सामंजस्य निर्माण व्हावं ही काळाची गरज आहे. उद्या पुढे मागे ते हाईलही, पण तोपर्यंत तरी लोकगीतातील ओव्या आपल्याला दिलासा देणाराहेत. कदाचित नवीन पिढीत तडजोड करण्याची उमेद जुन्या पिढीपेक्षा जास्त असते असा संदेशही देणाराहेत.” (बयनाचे बोल, पृ. ६०) लोकगीतातून हा सासूरवास अनुभवल्यानंतर या सासू सुनेच्या नात्यात कधी तरी समंजसपणा यावा अशी अपेक्षा लेखिका या लेखात व्यक्त करतात.

हे पुर्वीच्या सुनेचे जीवन उलगडत असताना त्यांना आताच्या काळातील सुनेचे जीवन थोडे कमी त्रासदायक वाटते. आताच्या सुनेला नवऱ्याच्या प्रेमाची साथ असते असे त्यांचे निरीक्षण आहे.

**लाडाची लाडकी—** या लेखात लेकीचं होणारं कौतुक लोकगीतांच्या आधारे उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. माहेरवाशीण आपल्या मुलीला घेऊन माहेरी येते. त्यावेळी तिथे मामाने भाचीचे पुरविलेले लाड लेखात सर्वत्र पसरलेले आहे. आई व लेक यांच्या नात्याची ओळख करून देताना हा लेख संवेदनशील बनलेला दिसतो. आईला आपल्या मुलीचे वाटणारे कौतुक, मायलेकीचा प्रेम लेखिकेने लोकगीतांतून दाखवून दिला आहे.

“गोरी माय लेक गोरी हनवटी

सोभा देते बाई कुकावर मेनपटी.”

“गोरी मायी लेक गोऱ्या वानावरी

सोभा देते बाई हिरवं गोंदन गालावरी” (बयनाचे बोल, पृ. ४७) अशा नाजूक लेकीचं खूपच कौतुक आईला वाटतं. जगाच्या वाईट नजरेपासून लेकीचं संरक्षण करण्यासाठी आईची धडपडही लेखात दिसून येते.

या लेखात लेखिकेने मामाभाचीचे जिव्हाळयाचे नाते स्पष्ट केले आहे. मामाला भाचीचे जास्त कौतुक वाटते. लोकमानसात एक श्रध्दा आहे की मामाच्या घरी भाची आली की मामाला काशीला जाऊन आल्याचे पुण्य मिळते. लोकगीतांत मामा व भाची यांचे नाते उलगडून दाखवणारी कितीतरी वर्णने लेखात आली आहे. उदाहरणात—

“लाडाची लेकबाई

खियाले गेली राती

पयजनाची माती

मामा काळे दियाजोती.” (बयनाचे बोल, पृ. ४६)

भाची खेळून आल्यावर हा मामा रात्री दिव्याच्या ज्योतीच्या मंद प्रकाशात आपल्या भाचीच्या पैंजणात खेळताना गेलेली माती काढत बसतो. यातून मामाचे भाचीवरचे अप्रतिम प्रेम नजरेस पडते. आईचं आपल्या मुलीवरचं प्रेम व आई ज्यावेळी लेकीला घेऊन आपल्या माहेरी जाते त्यावेळी तिच्या मुलीचे आजीकडून, मामीकडून माहेरीही होणारे कोडकौतुक या लेखात विविध लोकगीतांच्या आधारे उलगडून दाखविले आहे.

**बयनाचे बोल–** या लेखात आईलेकीचं नातं, सासूसुनेचं नातं, नणंदभावजयचं नातं, बहिणी बहिणीचं नातं अशी विविध नाती लोकगीतांच्या आधारे स्पष्ट केली आहेत. येथे स्त्रीच्या भावभावनांचे हृदयगम चित्र लेखिका रेखाटताना दिसतात. सासू सुनेचं नातं कितीही बदनाम असले तरी आपल्या सासूबद्दल सुनेच्या मनात आदर असतो. हे पुढील लोकगीतून स्पष्ट होते.

“सीता सासूबाई तुमची सोन्याची मिरी

तुमच्या मिरीखाली जलमले शिरहरी (बयनाचे बोल, पृ. ३०)

तसेच बहिणीबहिणींचे प्रेमळ नाते लेखिकेने खाली दिलेल्या गीतातून उलगडले आहे.

“दोघीई बयनी बाई एका वानावरी

नांगीलचं पान कुकुलेवू पानावरी

दोघीई बयनी एका माय कुशीतल्या

एका कुशीतल्या चोया लिवू काशीतल्या.” (बयनाचे बोल, पृ. ३२) अशा वेगवेगळया गावी दिलेल्या हया बहिणी माहेरवासाला येतात तेव्हा आपलं हृदय, आपल्या भावभावना एकमेकांकडे व्यक्त करतात. अशी स्त्रीची दुसऱ्या स्त्रीशी असणारी विविध नाती उलगडताना लेखिकेने स्त्रीच्या मनातील आत्मसन्मान, परस्परांबद्दल असलेला ओलावा, दुसऱ्या स्त्रीबद्दल असणाऱ्या विश्वासाची ओळख करून दिली आहे.

नात्यातील निरनिराळया भावनांचा आलेख मांडताना लेखिका तितक्याच भावूक होताना दिसत आहे. स्त्री मत्सरी असते असे म्हणणाऱ्या लोकांना ही नयनमनोहर व आत्मविभोर

उदाहरणं दाखवण्याची भाषा करताना दिसतात. पूर्वीच्या काळातील स्त्रीबद्दल सांगत असताना लेखिकेने आजच्या स्त्रीला पुढीलप्रमाणे उपदेश केला आहे. लेखिका लिहितात, "किमान प्रत्येक स्त्रीने दुसऱ्या स्त्रीकडे बघताना निकोप दृष्टीनं बघणं आवश्यक आहे. तेव्हाच ती स्त्रीऋणातून मुक्त होऊ शकते. जशी इतर ऋणातून मुक्त होण्याची मानवाची धडपड असते, तसं स्त्रीत्वाचंही एक ऋण असतं. आणि तेही काही खास मागणं मागत असतं." (बयनाचे बोल, पृ. ३७) अशा वाक्यांतून त्यांनी प्रत्येक स्त्रीच्या मनात दुसऱ्या स्त्रीबद्दल आदरभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ५.३.३ साहित्यविषयक लेख

प्रतिमा इंगोले लोकसाहित्याच्या गाढया अभ्यासक असल्याने लोकगीतांविषयी सखोल चिंतन करून त्यात येणाऱ्या ग्रामीण बोली भाषेतील म्हणी, वाक्प्रचार याविषयी लेखन केले आहेत.

**लावणीची गाणी–** या लेखात लोकगीतांच्या उगमाचा परामर्श घेतला आहे. झाडांचा, वृक्षवेलीचा माणसांशी असलेला संबंध लोकगीतातून कशाप्रकारे आविष्कृत झाला आहे हे या लेखातून दाखवून दिले आहे. भारतीय संस्कृतीचा उगम, विकास आणि संवर्धन वृक्षसान्निध्यात झाला. शिवाय भारतातील महाकाव्ये, लोकसाहित्य वृक्षांच्या छायेत स्फुरली गेली हे सांगत असताना माणसाच्या जीवनातील वृक्षाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी लोकगीतांमध्ये वृक्षाचा सापडणारा उल्लेख दाखवून दिला आहे. लोकसाहित्यात माणसं वृक्षवेलींना बिलगत होती. या झाडांशी त्यांचा जिव्हाळयाचा संबंध होता हे सांगण्यासाठी त्यांनी लोकगीतांतली सीता आगतिक होऊन भयाने वनाच्याच आधारानं उभी असलेली दाखवली आहे.

"निरमया वनात गोटयाचं आथरून

सीताबाई आंग टाके रामाच्या वयतागान

भयान्या वनात लळयाचा चाय येते

सीताबाई बायातीन लव आकुसाले न्हानते." (बयनाचे बोल, पृ.६) या लोकगीतात वृक्षवेली दयनीय शोषित, अन्यायग्रस्त सीतेसारख्या लोकांच्या सगेसोयरे होतात हे पटवून देऊन वृक्षाचा व माणसाचा घनिष्ट संबंध विशद केला आहे. लावणीच्या गाण्यामध्ये दिसणारा माणूस आणि निसर्ग यांच्यातील समभावही लेखिकेने रेखाटला आहे. माती आणि माता यांच्यातील साम्य गाण्यामध्ये आविष्कृत होताना दिसते. पृथ्वी म्हणजेच माती जशी वृक्षवेली, प्राणीमात्रांचे पुत्ररूपाने सांभाळ करत असते तशीच माता आपल्या लेकरांचा जिव्हाळयाने सांभाळ करते. नवनिर्मिती करण्याची शक्ती जशी पृथ्वीमध्ये असते. तीच सृजनाची शक्ती मातेमध्ये ही दिसून येते. असे समान गुणधर्म येथे निदर्शनास आणून दिले आहेत.

माणसांच्या जीवनातील झाडांचे महत्त्व सांगणारी लोकगीते या लेखात सर्वत्र विखुरलेली आहेत. या लेखात लेखिकेला झाडांचे महत्त्व विशद करायचे होतेच शिवाय ही लोकगीते कशी निर्माण झाली याविषयीही तितक्याच आतुरतेने सांगायचे होते.

**ग्रामीण म्हणी, विनोदाच्या खाणी—** या लेखात विदर्भातील ग्रामीण म्हणींमध्ये दिसून येणाऱ्या विनोदावर भाष्य केले आहे. विदर्भातील ग्रामीण म्हणी ग्रामीण भागातील भोळया भाबडया माणसांचं यथाशक्ती प्रतिनिधित्व करतात. या म्हणींमध्ये विनोद ठायी ठायी विखुरलेला दिसतो. विदर्भातील ग्रामीण म्हणीतील विनोदाविषयी लेखिका लिहितात, "विदर्भातील ग्रामीण म्हणीतील विनोद एखाद्या डोंगरावरील झऱ्याप्रमाणे झुळझुळता, अवखळ, मनोहर व नादमधुर असल्याचं दिसून येतं. डोंगरावरील झऱ्याचं पाणी त्याला उताराचं पाठबळ लाभल्यामुळे सहजगत्या वाहतं. त्याप्रमाणे हा विनोदही सहज व ओघवता वाटतो." (बयनाचे बोल, पृ. ६१) या म्हणींमध्ये आढळणारा विनोद हा उपरोधिक  असतो हे त्यांनी विविध म्हणींच्या आधारे पटवून दिले आहे.

"मी सांगतो लोकाले

शेंबूड माया नाकाले."

अशा सारख्या कितीतरी ग्रामीण म्हणींचा वापर करून त्या म्हणींचा अर्थ स्पष्ट केला आहे. या म्हणींमध्ये सापडणाऱ्या विनोदाची तुलना त्यांनी मधाच्या पोळीशी करून 'ग्रामीण म्हणी

विनोदाच्या खाणी' असे का म्हणावेसे वाटले याचे स्पष्टीकरण दिले आहे. लेखिका लिहितात, "मधाच्या पोळीत कप्प्याकप्प्यात मध भरलेला असावा तसा वऱ्हाडी बोलीचे कप्पे असणाऱ्या हया वऱ्हाडी म्हणींमध्ये विनोद भरलेला दिसून येतो. मधाच्या पोळीत जे स्थान कप्प्यांना असतं, तेच बोलीत म्हणींना असतं. कारण अस्सल ग्रामीण वऱ्हाडी माणसांच्या बोलीत दहा वाक्यांमागे एकतरी म्हण आढळते. आणि अशा दहा म्हणींमध्ये एकम्हण तरी विनोदी असतेच. त्यामुळे म्हणी विनोदाच्या खाणी असतात, असं म्हणावंसं वाटतं." (बयनाचे बोल, पृ. ६६) एकंदरीत या लेखात त्यांनी ग्रामीण म्हणींचे महत्त्व पटवून सांगितलेले दिसते.

**ग्रामीण म्हणी, अहेव लेणी–** लोकसाहित्याप्रमाणेच ग्रामीण म्हणी हा त्या त्या समाजाचा मौलिक साठा असतो हे पटवून देऊन वेगवेगळया म्हणी उदाहरणादाखल मांडल्या आहेत. प्रत्येक बोलीतील म्हणीमुळे त्या त्या बोलीचे सौंदर्य द्विगुणित होते शिवाय म्हणींमध्ये त्या त्या काळातील रूढी, प्रथा वा समाजजीवन शोधता येते. त्यामुळे म्हणी बोलीची लेणी असतात असे लेखिका पटवून सांगताना दिसतात.

संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी, नव्याने निर्माण झालेल्या गोष्टींचे ज्ञान होण्यासाठी, श्रीमंत सावकाराचे वैभव उलगडणाऱ्या म्हणी, विदर्भातील सामान्य माणसाची गरीबी दाखवणाऱ्या म्हणी, ग्रामीण जीवन प्रतिबिंबित करणाऱ्या म्हणी, जुन्या कष्टदायी जीवनाबद्दलच्या म्हणी, विदर्भातील वऱ्हाडी ग्रामीण स्त्रीच्या तोंडी असलेल्या म्हणी अशा विविध तऱ्हेच्या म्हणींची नोंद लेखात झाली आहे. लेखाच्या शेवटी या म्हणींचे महत्त्व उलगडताना लेखिका लिहितात, "एखाद्या गोष्टीचा अर्क काढून तो बाटलीत भरून ठेवावा तसाच अर्क ह्या म्हणींमध्ये आढळून येतो. ह्या म्हणी म्हणूनच जोपासल्या जातात. दागिन्याप्रमाणे समाजाकडून सांभाळल्या जातात. जतन केल्या जातात. अहेव लेणी ठरतात." (बयनाचे बोल, पृ. ७४) या म्हणीं जतन करून ठेवण्यामागचे कारण लेखिकेने अलंकारिक भाषेत, योग्य उदाहरणाद्वारे मांडले आहे.

## ५.३.४ प्रवासवर्णनपर लेख

प्रवासवर्णनासाठी लेखिकेने स्वतंत्र लेखांची निर्मिती केली आहे. त्यांनी ज्या ज्या स्थळांना भेटी दिल्या त्या स्थळांनी त्यांच्या मनात कायमचे घर केले. त्या स्थळांची वर्णने 'उजाड अभयारण्य' या लेख संग्रहात उतरली आहे.

**किनाऱ्याचा टाहो–** गोव्यातील पणजीच्या कला अकादमीमध्ये भरलेल्या 'पाचव्या लोकसाहित्य परिषदे'ला आल्यावेळी लेखिकेने इतर साहित्यिकांबरोबर गोव्याच्या समुद्र किनाऱ्यांना भेटी दिल्या होत्या. त्यावेळी 'वाघातोर' व 'कलंगूट' या समुद्र किनाऱ्यावर पाहिलेल्या दृष्याचे वर्ण न केले आहे. खडक, सोनेरी वाळूचा सपाट किनारा, नारळाच्या झाडांच्या केलेल्या झोपडया, रंगीबेरंगी तंबूसदृश्य झोपडया व हिप्पींचा तळ अशा गोष्टींचे चित्रण केले आहे. किनाऱ्याचे सौंदर्य वर्णन करत असतानाच तिथे दिसणाऱ्या अश्लिलतेविषयी लेखन झाले आहे. या दोन्ही किनाऱ्यावर नग्न अवस्थेत समुद्रस्नानाचा आनंद लुटत असलेल्या स्त्री पुरुषांकडे पाहिल्यावर ज्या भावना, जे विचार त्यांच्या मनात येत होते ते लेखात शब्दबद्ध झाले आहे. कलंगूट किनाऱ्यावर बेभान अवस्थेत अर्धनग्न असलेल्या जोडप्याला समुद्राच्या लाटांने वाहून नेतानाचा प्रसंग व त्यावेळी त्या जोडप्याची झालेल्या दुर्दशेचे चित्र लेखात प्रकट केले आहे. भारतावर कब्जा केलेली ही पाश्चात्य संस्कृती नष्ट व्हावी अशी अपेक्षा त्या बाळगतना दिसतात. ही अश्लिलता पाहून पोर्तुगीज संस्कृतीच्या अतिक्रमणाने दुखावलेला तो किनारा मदतीसाठी हाक मारत आहे. अशी जाणीव त्यांच्या मनाला होताना दिसते. एकंदरीत गोव्याच्या समुद्र किनाऱ्यावर पाहिलेले भावपूर्ण शब्दचित्र उभे झाले आहे.

**मंदिराचा गाव–** या लेखात जळगावपासून अवघ्या सहा मैलांवर बसलेल्या 'सिरसोली' या चिमुकल्या खेडया गावाचे वर्णन आले आहे. बालवयात लेखिका एकदा या गावात आल्या होत्या. आणि जळगावला साहित्य संमेलनाला आल्या असताना त्यांनी या गावाला परत एकदा भेट दिली. त्या गावाचे रूप अजून पूर्णता बदलले नव्हते. गावातील कच्चा रस्ता, शाळा, ग्रामपंचायत, गावातील भाबडी माणसे तसेच गावात नवीन आलेल्या विजेचे खांब, नळ व आकाशवाणी केंद्र या गोष्टींची नोंद लेखात घेतली आहे. गावात विज, नळ आकाशवाणी केंद्र व केंद्राची वसाहत गावाच्या रूपडयाला विसंगत वाटत होती असे त्या सांगतात.

या गावात राहणाऱ्या बारी समाजाचे राहणीमान, त्यांची जेवणाखाणाची पद्धत, त्या समाजाने टिकवून ठेवलेल्या आतिथ्यशीलतेविषयी लेखन झाले आहे. त्याचबरोबर गावात कित्येक वर्षा पासून असलेल्या महादेवाच्या मंदिराचे वर्णन आले आहे. या मंदिराला पाहिल्यावर त्यांना लासूरचे हेमाडपंथी व जुने शिवालयाच्या मंदिराची आठवण होते. सिरसोली गावातील शिव मंदिराची व लासूरच्या मंदिराची तुलना या लेखात करताना दिसतात. सिरसोली गावातील मंदिराचा परिसर व त्याच्या दगडी बांधकामाविषयी त्या आवर्जून लिहितात. सिरोली गावातील लोकांनी हे मंदिर जतन करून ठेवले होते. मंदिराचे पावित्र्य त्या वास्तूला प्राप्त व्हावे म्हणून पिंडी नसतानाही मंदिरात पिंडी बसवली होती व सांस्कृतिक ठेवा जतन करून ठेवण्यासाठी प्रयत्नही केले होते. याउलट लासूरच्या मंदिराला कोरिव नक्षीकाम असूनही ते मंदिर नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे सांगून त्याविषयी खंत व्यक्त केली आहे. खानदेशातील ह्या खेडयातील लोकांचे मोठेपण सांगत असताना ग्रामीण भागातील माणसांची वृत्ती प्रवृत्तीचे दर्श नही त्या घडवितात. हा गाव, गावातील माणासांचा स्वभाव, राखून ठेवलेले मंदिर पाहून त्यांच्या मनाला झालेला आनंद लेखात शब्दबद्ध झाला आहे.

**अस्पृश्य स्मारक–** कोल्हापुरच्या प्रवासात पाहिलेल्या काही स्थळांची वर्णने लेखात आली आहे. पुणे ओलांडताच दिसणाऱ्या ऊसाच्या मळयांची वर्णनेही लेखात उतरली आहे. या शेतीला पाहिल्यावर लेखिकेला विदर्भातील शेतकऱ्यांचे दुःख आठवते. विदर्भातील जमीन अधिक कसदार असली तरीही विदर्भातील शेतकरी नेहमी दरिद्री, कर्जबाजारी असतो. याउलट पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी लेखिकेला सुखी वाटतो. कारण या भागात पाण्याची कमतरता नसते, साखर कारखान्याशी त्यांचा करार होतो व सहकारी कारखान्याचे ट्रक शेतकऱ्याच्या शेतापर्यंत येऊन त्याचा ऊस कापून नेतात अशी त्यांच्या सुखी जीवनाची गाथा लेखात सांगितली आहे.

त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचा परिसर पाहत असताना तिथल्या शिवपुतळयाच्या पायथ्याशी असलेल्या हिरवळीचे वर्णन लेखिकेने मनोवेधक केले आहे. याच प्रवासात त्यांनी ज्योतिबाच्या लोकप्रियतेविषयी सांगितले आहे. कोल्हापुरात एकमेव उपेक्षित व मागे राहिलेले जीवा शिवाचे स्मारक पाहून त्यांचे मन खंती होताना जाणवते. जीवा शिवाच्या स्मारकाचे वर्णन त्यांनी 'अस्पृश्य स्मारक' अशा शब्दांत केले आहे. आजपर्यंत पन्हाळगडच्या सर्व पर्यटन स्थळांमध्ये

रूपांतर झाले. परंतु जिवा शिवाच्या स्मारकात कुठलाच बदल झाला नव्हता त्या स्मारकाचे दोन दगड तसेच पडून होते कारण ते जिवा शिवा अस्पृश्य होते. शिवाय शुद्रही होते. आपण या आधुनिक  जगातही अस्पृश्यता पाळतो; याची रूखरूख त्यांना लागून राहिलेली दिसून येते. या लेखात लेखिकेने समाज मनावर बोट ठेवून माणसाच्या शुद्र मनाचे दर्शन घडविले आहे.

**उजाड अभयारण्य–** या लेखात 'नवे गावबांध'च्या पक्षी अभयारण्य पाहण्यावेळच्या खडतर प्रवासाच्या, ओसाड व भकासलेपण घेरून उरलेल्या अभयारण्याचे चित्रण आलेले आहे. दलित साहित्य संमेलनाच्या निमित्ताने नवेगावबांधचं पक्षी अभयारण्य लेखिकेला पाहता आलं. तेथे जाण्याचा प्रवास दुर्गम होता तरी मालडब्यात बसून झालेला प्रवास कसा विनोदी झाला यांचे चित्र त्यांनी नेमक्या शब्दांत मांडले आहे. त्याचबरोबर प्रवासात मदत केलेल्या कथारसिक आणि मेश्राम यांच्या स्वभावाविषयी आणि त्यांच्या माणूसकीबद्दल त्या लिहितात.

नवेगावबांधच्या अभयारण्याच्या मार्गावर त्यांना मेलेला पक्षी दिसला यावरून भ्रष्ट अधिकाऱ्यामुळे अशी अभयारण्ये उजाड होत असल्याची जाणीव लेखात व्यक्त कली आहे. ती स्थळं माणसांची भोगस्थाने झाल्याकारणाने निसर्गाची झालेली हानी पाहून त्यांचे मन अस्वस्थ होताना जाणवते. तिथे असलेले तळे, हिरवळी एवजी वाळलेल्या गवताने भरले होते. त्या अभयारण्यात सर्वत्र पसरलेली उदासिनता, ओसाड व भकासलेपणाची जाणीव त्यांना चिंताग्रस्त करताना दिसते. नवे गावबांधच्या पक्षी अभयारण्याचे उजाड रूप त्यांच्या मनात कायम राहिलेले दिसून येते.

**हिरवी हळहळ–** या लेखात सातपुडयाच्या डोंगरावर असलेल्या हनुमंतरायाच्या वारीचे वर्ण न आले आहे. बालपणी केलेली वारी आणि आताची तरुणपणात केलेली वारी त्यात जाणवलेला फरक या लेखात दर्शविला आहे. त्या काळात शांत, निसर्गरम्य हिरव्या वनश्रीने वेढेलेले तिहेरी संगमावरील नयनमनोहर स्थळ आता नष्ट होत चालले होते. त्याचे उद्ध्वस्त रूप पाहून लेखिका दुःखी होताना जाणवतात. या देवस्थानाचे महत्त्व, तेथिल प्रथा परंपरांचे विश्लेषण या लेखात त्यांनी केले आहे. या देवालयाचं, तिथे असलेल्या वनराईचे विद्रुप रूप पाहून त्यांचे मन हळहळताना जाणवते. भौतिक सुखासाठी प्राकृतिक सुंदर भागाचा थोडा तरी

त्याग करणे गरजेचे आहे. असे सांगून त्या स्वतः स्वतःच्या मनाचे सांत्वन करत असताना दिसतात. निसर्गाची हानी होताना त्यांना बगवत नाही. त्यामुळे संपूर्ण लेखात त्या अस्वस्थ होताना जाणवतात.

## ५.३.५ व्यक्तिचित्रणपर लेख

लेखिकेने आपल्या लेखनात मोजक्याच दोन माणसांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहे. ही चित्रणे करण्यासाठी त्यांनी स्वतंत्र लेखांची निर्मिती केली नाही तर स्वतःचे प्रवासानुभव, आठवणी मांडताना त्यांच्या लेखनात व्यक्तींची चित्रणे आकाराला आली आहे.

**कोरिव शिल्प–** अजिंठयाच्या प्रवासात भेटलेल्या आझमच्याच्याच्या अंतरंगाचे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते. लेखिका आझमचाच्याच्या वाणीविषयी, त्यांच्या उत्साहाविषयी लिहिताना दिसतात. "अजिंठा भाग्यशाली आहे असंही जाणवलं. कारण त्या स्थळावर निस्सीम प्रेम करणारा खरा कलाप्रमी असा एक कलंदर माणूस त्याला भेटला होता. जणू तो त्या स्थळाचा कायम रखवालदार होता. गुप्त धनावर "नाग" रखवाली ठेवावा, तसाच जणू विधात्याने त्या कलेच्या गुप्तधनावर हा माणूस ठेवला होता. जो तिला जिवापाड जपत होता. जणू तोही त्या स्थळाचाच एकभाग होऊन गेला होता. त्या दालनातील आतील रंगाच्या तरी जिवंत वाटणाऱ्या मूर्त्यांप्रमाणे हाही बाहेरील एक जिवंत मूर्ती होता. अजिंठयाच्या त्या कोरीव लेण्यांतील त्या चित्रातीलच एकमूर्ती जणू बाहेर आली होती. पण तशी तीही त्या परिसराचीच एकभाग होती. कलेवर असं निस्सिम प्रेम करणं फार कठीण आहे. कारण त्याला जीवन झाकून द्यावं लागतं काकांनी ते दिलं होतं. कारण त्यांना हजारो रूपयांच्या मोहापेक्षा कलेवरील प्रेम तिचा मान मोठा वाटत होता. ह्या प्रेमाला पैशांची लालूच हरवू शकत नव्हती. गेल्या कित्येक दिवसांपासून काका कोणाबरोबर जात नव्हते. रोजगार बुडत होता. त्याचा परिणाम त्यांच्या राहणीमानावर होत होता. पण तरीही ते झुकत नव्हते. काकाही एक लेणंच होते. हया आगळया भावनेचं कारीव शिल्प!" (उजाड अभयारण्य, पृ. ९०) या वाक्यांतून आझमच्याच्या वाचकांच्या

डोळयासमोर उभा राहतो. आपल्या कामावर निस्सीम प्रेम करणारा कलाप्रमी, कलंदर, जाणकार, रसिक व इमानदार आझमचाच्या लेखिकेने लेखात उभा केला आहे.

**पुंडलिका भेटी—** लहानपणी गुरू मानलेल्या पुंडलिक बाबांचे शरीरवर्णन व त्यांच्या स्वभावाचे, वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन या लेखात घडविले आहे. या पुंडलिकांवर गावातील तसेच बाहेरील सर्व लोकांची असलेली श्रध्दा दाखवून देतात. पुंडलिक बाबांचे वर्णन करताना लेखिका लिहितात, "भव्य भालप्रदेश, तेजःपुंज चेहरा. त्या भोवती अद्‌भुततेचं वलय व त्याला अवखळ हास्याची महिरप! लहानखुरी देहयष्टी व तिला शोभणारं बोबडया बोलांचं आवरण! एकंदर सात्विक रंगरूप. तशीच नाजूक सुकुमार अलवार पावलं. भक्तांनी देहावर चढवलेली कफनी व कपाळावर बांधलेली रिबीन असा एकंदर साज! पण या शुंगारापासूनही बाबा अलिप्त! ती इतरांची हौस! त्यांना कशाचीच आसक्ती नव्हती! तर समाधानातून मिळालेली श्रीमंत विरक्ती व कायमची प्रसन्नावस्था!" (झेंडवाईचे दिवे, पृ. ७४) असे त्याच्या अंतरंगाचे व बाह्यांगाचे चित्रण त्यांनी केले आहे. एक निस्वार्थी, माणसांवर प्रेम करणारे, गरीबांविषयी दयाभाव असलेलं, श्रीमंत, गरीब, दलित, अस्पृश्य, स्त्री—पुरुष असा भेदभाव न करणारे, दर्शनाला आल्यावर त्यांना झेपेल व मानवण्यासारखा उपाय सांगणारे असे साधे निरागस वृत्तीचे पुंडलिक बाबांचे व्यक्तिमत्त्व लेखात चित्रित झाले आहे.

## ५.४ प्रतिमा इंगोले यांच्या ललित लेखनाचे वाङ्मयीन विशेष

### ५.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

प्रतिमा इंगोले यांचे ललित निबंधांचे तीन लेख संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे हे ललित लेखन ग्रामीण साहित्यात मोडणारे आहे. त्यांच्या प्रत्येक लेखामध्ये ग्रामीण संस्कृतीचा उल्लेख झाल्यामुळे हे लेखन इतर लेखकांच्या ललित लेखनाहून थोडे वेगळे ठरते. स्वतःचे अनुभव कथन करून वाचकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करून दिली आहे. एखादा विषय घेऊन त्यात लोकगीतांचा आशय व अर्थ सांगून तर कधी स्वतःचे अनुभव, आठवणी, स्वतःची मते व विचार प्रकट करत बोधपूर्वक निष्कर्ष मांडून लेखाचा शेवट केला आहे. विवरणशील,

स्पष्टीकरणात्मक, विवेचनात्मक, माहितीपर अशी त्यांच्या ललित निंबंध लेखनाची मांडणी आहे. अगदी साध्या सोप्या व सरळ भाषेत त्यांचे लेख प्रकट झाले आहे. त्यांनी मांडलेले अनुभव साधे वाटले तरी वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करणारे असल्याने ते अनुभव निवेदन उच्च दर्जाचे वाटते.

लेखिकेचे अनुभवविश्व समृद्ध आहे. वास्तव अनुभव त्यांच्या लेखनात व्यक्त झाले आहेत. त्यांच्या प्रत्येकअनुभवात प्रांजळपणा जाणवत राहतो. बालपणातील अनुभव आठवणी मांडून त्या अनुभवांच्या माध्यमातून माणसांच्या मनाचा, ग्राम संस्कृतीचा वेध त्यांनी घेतलेला दिसतो. पूर्वी बालपणात अनुभवलेल्या संस्कृतीविषयी अनुभव मांडून आजच्या आधुनिक काळात बदललेल्या संस्कृतीवर त्यांनी परखडपणे आपली मते मांडली आहे.

लेखिकेच्या आत्मपर लेखनातून प्रवासाची ओढ, प्रेमळ, त्यांची सोशिक वत्ती, संवेदनशील, प्रामाणिक, कलाप्रेमी असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू दिसून येतात.

लेखिका आपल्या ललित निबंध लेखनातून स्त्री जीवनाचा सर्वांगीण वेध घेताना दिसतात. आपल्या समाजात पुरुषसत्ताक पद्धतीमुळे स्त्री जीवनाची, स्त्री मनाची कशी कुचंबणा होते हे सांगत असताना त्यांनी स्त्रीचे पुरुषाहून निराळे अनुभव, तिचे बोलणेवागणे, तिच्या भावभावना इत्यादींचे दर्शन लोकगीतांच्या आधारे घडविले आहे. त्याचबरोबर लोकगीतांमध्ये चित्रित झालेले स्त्रीचे इतरांशी असलेले नातेसंबंध उलगडत त्या नात्यातील बारकावे नेमक्या शब्दांतून उदाहरणासह टिपले आहे. लोकमानसात स्त्रीकडे बघण्याची बुरसटलेली दृष्टी हा पुरुषप्रधान संस्कृतीचा परिणाम आहे असे त्या ठामपणे सांगताना दिसतात. ग्रामीण स्त्रीचे जीवनानुभव, भावजीवन सहानभूतीने रेखाटून आधुनिक स्त्रीजीवनाचा निर्देश करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

स्त्रीच्या हळव्या मनाचे, उदार स्वभावाचे, संवेदनशील वृत्तीचे दर्शन लेखिकेच्या लेखात सातत्याने घडते. झेंडवाईचे दिवे या लेखात लेखिका लिहितात , “नको गं सीता! ह्या झेंडवाई च्या गाण्याचा अर्थ किती मंगल आहे. असा मंगलतेचा त्याग करायचा? निदान तू तरी करू नकोस! कारण तोच तुमचा धर्म! तेच तुमचं चिरंतन गाणं! ह्या चालत्या बोलत्या आधाराला आव्हान देणाऱ्या दिव्याचीच तर आज समाजाला खरी गरज आहे?” (झेंडवाईचे दिवस, पृ.

४३) अशा सारख्या वाक्यरचनेतून स्त्रीच्या भावनिक ओलाव्याचे दर्शन लेखनात पदोपदी प्रत्ययकारी झाले आहे.

लेखिकेच्या लेखनात स्त्रियांचा भाषिक वेगळेपणा जाणवतो. प्रत्येक घरात सासूबाई आपल्या नवीन आलेल्या सुनेला नात्यातील माणसांची ओळख करून देत असते. सासूबाई सुनेहून वयाने मोठी असल्याने तिच्या बोलण्यात सुनेला जबाबदारीची जाणीव करून देण्याचा सूर दिसत असतो. अशा पद्धतीचा सूर लेखिकेच्या लेखनातील सासूबाईचा आहे. सासूबाई आपल्या सुनेला म्हणतात, "सूनबाई! तुये मामाजी आले, त्याइच्या पाया पळं त्याइचा आर्शी वाद घे. तुया नवऱ्याले त्याइनच लानाचं मोठं केलं." (बयनाचे बोल, पृ. २८) भावनेच्या भरात येऊन स्त्रीची सूरात बोलण्याची विशिष्ट पद्धत अशा वाक्यांतून दिसत आहे. शिवाय स्त्री आणि पुरुष या दोहोंच्या बोलण्यात असलेला फरक निश्चितपणे त्यांच्या लेखनात विशेष रूपाने जाणवतो आहे.

त्यांच्या लेखनात स्त्रीच्या अनुभवविश्वाचा विचार साध्या व सरळ सामान्य माणसाला सहज समजेल अशा भाषेत व्यक्त झाला आहे. लेखनात लोकगीतांचा वापर केल्याने लोकसाहित्याचे स्वरूप या लेखनाला प्राप्त झाले आहे. त्यांचे स्त्रीविषयक लेखन समाज मनाचे, लोकश्रध्दांचे, संस्कृतीचे, ग्राम जीवनाचे अचूक ज्ञान देणारे ठरते. या लेखनात वापरलेल्या स्त्रीसुलभ भाषेतील निवेदनामुळे त्यांच्या लेखनाच्या लालित्यात अधिक भर पडलेली दिसते.

लेखिकेच्या लेखनातून त्यांच्या लोकसाहित्याच्या अफाट व्यासंगाचे दर्शन घडते. आपल्या भारतीय लोकसाहित्यात जी लोकगीते आहेत ती कशी निर्माण झाली, त्या लोकगीतांमध्ये येणाऱ्या आशय विषयाचा विचार त्यांनी 'लावणीची गाणी' या लेखात केला आहे. लोकगीतांमध्ये येणाऱ्या झाडांचे, स्त्रीजीवनाचे संदर्भ कशाप्रकारचे असतात हे त्यांनी उदाहरणादाखल समजून सांगितले आहे. त्यामुळे या लेखनाला स्पष्टीकरणाचे स्वरूप लाभले आहे. त्यांच्या लेखनात लोकसाहित्यातील लोकगीतांचे अनेक संदर्भ विखुरलेले आहे.

बोली भाषेत वापरल्या जाणाऱ्या म्हणींचा वापर साहित्यात का केला जातो. यावर विचार मांडण्यासाठी या म्हणींवर लेखिकेने स्वतंत्र लेख लिहिले आहेत. म्हणींचे महत्त्व, त्या म्हणींतून प्रतित होणारा अर्थ, विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या म्हणी, या म्हणी कोणकोणत्या

प्रकारच्या असतात याविषयी नेमकेपणाने सूसुत्र पद्धतीने लेखात उदाहरणादाखल निवेदन केले आहे. अशासारख्या लेखनातून लेखिका लोकसाहित्याच्या सखोल अभ्यासक असल्याची साक्ष पटते.

प्रवास करत असताना सहन केलेले कष्ट, पाहिलेल्या स्थळांची वर्णने, स्थळांचे महत्त्व, प्रवासात भेटलेल्या माणसांचा स्वभावविशेष त्याचबरोबर प्रवास करत असताना आलेले कडूगोड अनुभव, आठवणी, प्रवासातील गमतीजमती अशांचे मनोवेधक चित्रण लेखनात झाले आहे.

त्यांनी लिहिलेले प्रवासवर्णनपर लेख दिर्घ स्वरूपाचे आहे. पाहिलेल्या स्थळांचे, परिसराची वर्णने लेखात चित्रमय शैलीत नेमक्या शब्दांतून उतरली आहेत. लेखनात आलेल्या अधिकशा स्थळांना त्यांनी बालवयात भेटी दिल्या होत्या. त्याच स्थळांना परत एकदा अनुभवताना तिथे जाणवणारा फरक सूक्ष्मतेने नोंदविला आहे. त्या स्थळाचं हरवलेलं सौंदर्य पाहून त्या दुःखी होताना जाणवतात. प्रवासात घडलेल्या घटना प्रसंगांची वर्णने लेखनात हुबेहूब उतरली आहे. एकंदरीत त्यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनात प्रवासातील स्थळांची, अनुभवांची वर्णने करत असताना माणसांच्या मनाचा, वृत्ती—प्रवृत्तीचा ठावही त्यांनी प्रत्येक लेखात घेतलेला दिसतो. लेखनात आलेल्या बारीकसारीक तपशीलामुळे तो प्रवास वाचक  स्वतः प्रत्यक्षात अनुभवतो आहे असा भास निर्माण करणारी त्यांची प्रवासवर्णने झाली आहे. त्यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनपर लेखनातून त्यांची प्रवास करण्याची हौस, त्यांच्यापाशी असलेला सूक्ष्म निरीक्षण गुण, सौंदर्यदृष्टी, रसिकता, प्रवास करण्यासाठी लागणारी सहनशीलता या गोष्टींचे प्रकर्षाने दर्शन घडते.

लेखिकेने लिहिलेली व्यक्तिचित्रणे माणसांच्या अंतरंगाचा अधिकतेने ठाव घेणारी आहे. या व्यक्तिचिणात त्या व्यक्तींच्या जीवनाचा सर्वोपरिने वेध घेतला नसला तरी त्या माणसांचा स्वभावविशेष, त्यांचे बोलणे, कार्यकतृत्त्व व त्यांच्या एका व्यक्तिचित्रणात व्यक्तीच्या बाह्यांगाचाही वेध घेतला आहे. व्यक्तींच्या मोठेपणाचा बारकाईने शोध घेताना त्यांचे मन त्या व्यक्तींमध्ये अडकलेले जाणवते.

त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रणात त्या व्यक्तींच्या गुणांचे अधिक विश्लेषण झालेले दिसते. त्यांनी ज्या माणसांवर लिहिले ती माणसे त्यांच्या जवळची नसून कधीतरी प्रवासात भेटलेली किंवा एकदा दोनदा इतर कुठेतरी भेटलेली माणसे आहे. त्यामुळे त्या माणसांचा सर्वांगीण वेध त्यांना घेता आला नसावा असे म्हणावे लागते.

## ५.४.२ आत्माविष्कार

जीवन जगत असताना पाहिलेल्या, अनुभवलेल्या काही गोष्टी लेखिकेला व्याकूळ, उत्सुक करून टाकतात. आणि त्यातूनच त्यांचे ललित निबंध लेखन निर्माण झालेले दिसून येते. ग्राम संस्कृती, नागर संस्कृतीविषयीचे मुक्तचिंतन हे त्यांचे आशयविश्व आहे. यातून प्रतिबिंबित होणारे मानवी जीवन, मानवी वृत्ती—प्रवृत्ती त्यांनी उलगडून दाखविली आहे. यासर्वांची नोंद घेत असताना त्यांच्या लेखनातून त्यांच्या सुजाण, सुसंस्कृत, संवेदनशील, चिंतनशील तसेच अनुभवसमृद्ध व्यक्तिमत्त्व व्यक्त झाले आहे.

## ५.४.३ काव्यात्मकता

लेखिकेच्या लेखनात जागोजागी काव्यात्मक भाषा अवतरली आहे. त्यांच्या भाषेला लय प्राप्त झालेली दिसून येते. आपल्या 'भुलाईचं गाणं' या लेखात लेखिका लिहितात, "अतिशय उघडपणे चित्रित केलेल्या दृश्यांच्या परिणामांमुळे त्यांच्या मनावरील दडपण वाढणारच! वेगळाच बोझा त्यावर पडणारच! आणि त्यांची नवथरता गुंदमरणारच! शिवाय त्यातून धुक्यासारखे तरल, धुक्यातून झरणाऱ्या दवांसारखे सुकोमल आणि दवात भिजल्यागत अलवार असे दुर्मिळ काव्यच बघता बघता हातातून निसटणार! अगदी अजाणता व सहजगत्या!" (झेंडवाईचे दिवे, पृ. १०) प्रत्येक वाक्यात 'च' अक्षराची पुनरावृत्ती झाल्याने एक लय तयार झालेली दिसते. या वरील उताऱ्यावरून त्यांच्या लेखनातील काव्यात्मकतेचे सहज दर्शन होते. अशी काव्यात्मक भाषा त्यांच्या ललित लेखनात अनेक ठिकाणी सापडते.

### ५.४.४ चिंतनशीलता

चिंतनशीलता हा प्रत्येक साहित्यिकाकडे असणारा महत्त्वाचा विशेष आहे; जो लेखिकेमाशीही असलेला जाणवतो. त्यांनी आपल्या ललित लेखनात काही विषयांचे सखोल चिंतन करून त्यांवर स्वतःचे विचार मांडले आहेत. उदाहरणात ग्रामीण संस्कृतीविषयी त्यांना सार्थ अभिमान आहे. ही ग्रामीण संस्कृती नष्ट करू पाहणाऱ्या माणसांविषयी त्या राग व्यक्त करताना दिसतात. त्यांनी ज्या ज्या स्थळांना भेटी दिल्या त्या स्थळांची मुळची संस्कृती शोधण्याचा त्या प्रयत्न करतात व ती नष्ट होत आहे यामुळे चिंताग्रस्त होताना जाणवतात. गोव्याच्या समुद्र किनाऱ्याविषयी लेखन करत असताना लेखिका लिहितात, "सगळया भारताला तर ती संस्कृती मदतीसाठी हाक मारीत नसावी? आधीच पोर्तुगीज संस्कृतीच्या अतिक्रमणाने दुखावलेली ती संस्कृती. आता पुन्हा ह्या नव्या अतिक्रमणाने भांबावून तर गेली नसावी?" (उजाड अभयारण्य, पृ.१११) गोव्याच्या कलंगुट किनाऱ्यावरील अर्धनग्न अवस्थेतील अश्लिल दृष्य पाहिल्यावर भारतीय संस्कृती हरवल्याने लेखिका दुःखी होतात व त्यावर केलेल्या चिंतनातून वरील प्रश्न उपस्थित झालेले दिसून येतात.

### ५.४.५ घटनांचा संदर्भ

ललित निबंध या वाङ्मयप्रकारात द्विकेंद्रीय अवस्था असते. कधी लेखक स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्कारासाठी लेखन करत असतो तर कधी विषयवस्तूच्या अंगाने. तर पुष्कळ वेळा त्यात दोलायमान अवस्था असते. दोहोंच्या अंगाने लेखन होत असते. लेखिकेचे अधिकशे लेखन विषयवस्तूच्या अंगाने झाले आहे. त्यांनी आपल्या आयुष्यातील घटनांचा संदर्भ देऊन आपला विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लेखनातून सांस्कृतिक संक्रमण होत असताना मानवाच्या जीवनाचे आकलनही होत आहे. आधुनिक प्रवाहाच्या ओघात अनेक मूल्यवान जुन्या गोष्टी वाहून जाऊ नये यासाठी त्यांनी आपल्या अंतःकरणात जपून ठेवलेल्या घटनाप्रसंगाचा, अनुभवांचा खुलासा केला आहे.

'भुलाईचं गाणं' या लेखात भुलाई–भोंडल्याच्या परंपरेचा वेध घेत असताना आजच्या आधुनिक पिढीला भुलाईची पूजा, त्या पूजेला म्हणायच्या गाण्यांचा विसर पडला आहे हे

पटवून देण्यासाठी लेखिकेने त्यांच्या लग्नानंतर त्यांच्या आजोळावरून आलेल्या भुलाबाईच्या पूजेच्या वेळेला घडलेला प्रसंग चित्रित केला आहे. तसाच 'केळीचं तांड' या लेखात केळीच्या झाडाचे महत्त्व पटवून देताना त्यांनी स्वतःच्या आयुष्यात घडलेला केळीच्या बागेतील एक हृदयद्रावक प्रसंग चित्रित केला आहे. लहानपणात केळीच्या बागेत खेळत असताना त्यांनी जीवंत मोराची पिसे तोडली होती. त्यावेळी मोराला झालेल्या वेधनेने त्यांच्या मनाला अतोनात दुःख झाले होते. जशी मोराची पिसे त्यांनी तोडली त्याचप्रमाणे त्याच शेतीतील केळीचे शंभर घड काही विरोधी पार्टीच्या लोकांनी कापून टाकले होते. या प्रसंगाद्वारे लेखिकेने माणूस असा का वागतो याचा शोध घेतला आहे.

## ५.४.६ व्यासंग

प्रतिमा इंगोले यांचे आजोबा शिक्षक असल्याने घरात शिक्षणाचे वातावरण होते. त्यामुळे त्यांना अवांतर वाचनाची सवय जडली. घरात असलेल्या अनेक पुस्तकांचे वाचन त्यांनी लहानपणीच केले होते. शाळेत असताना त्यांच्या ओजोबांनी त्यांच्यासाठी खास मासिके लावली होती शिवाय आजोबांकडून मिळालेल्या भाषा व व्याकरणाच्या शिकवणूकीमुळे त्यांनी मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविलेले दिसून येते. त्यातून त्यांच्या लेखनाची भाषा स्पष्ट व अचूक आहे.

लेखिकेचा जन्म विदर्भातील एका खेडयात झाल्याने वऱ्हाडी भाषा त्यांना बालपणापासूनच अवगत होती. त्यामुळे त्या भाषेतील अचूक शब्द त्यांच्या निवेदनात दिसून येतात. विषयाचे स्पष्टीकरण देत असताना त्यांनी वऱ्हाडी भाषेतेली म्हणींचा, वाक्प्रचारांचा योग्यरित्या वापर केला आहे. त्यामुळे त्यांचे प्रमाण व वऱ्हाडी ग्रामीण बोलीतील लेखन ठळक व स्पष्ट स्वरूपाचे झाले आहे असे म्हणता येते.

## ५.४.७ ललित निबंध लेखनाची भाषाशैलीः

लेखिकेची भाषा पूर्णपणे आशयाशी एकरूप झालेली दिसून येते. कृत्रिम शब्दरचनेचा वापर त्यांच्या लेखात कुठेच दिसत नाही. त्यांच्या लेखनाची भाषा साधी सोपी व सरळ आहे. त्यांना अवगत असलेल्या लोकगीतांचा, लोककथांचा वापर करून त्यांनी लेखांचा आशय व्यक्त केला

आहे. प्रमाण व बोली अशा दोन्ही भाषेत त्यांनी लेखन केले आहे. काही वेळा विदर्भातील ग्रामीण बोलीचा वापर करून निवेदन मराठी प्रमाण भाषेत केलेले दिसून येते.

लेखिकेने आपल्या लेखनात वऱ्हाडी लोकजीवन आविष्कृत केले असून पात्रांच्या तोंडी वऱ्हाडी भाषा घातलेली दिसून येते. ग्रामीण साहित्याची भाषा सांगताना आनंद यादव म्हणतात, "ग्रामीण पात्रांच्या तोंडी, ग्रामीण लेखक ग्रामीण भाषाच आवर्जून संवादातून घालतो. याचे कारण त्या ग्रामीण माणसाच्या लकबीच फक्त लेखकास सांगायच्या नसतात तर त्याला तो माणूस उभा करावयाचा असतो हे ढोबळ सत्य असल्यामुळे ग्रामीण माणसाच्या तोंडी नागर भाषा घातली तर त्यातील विसंगती चटकन लक्षात येते."[१] या तत्वानुसार लेखिकेचे लेखन आहे. त्यांनी वापरलेल्या वऱ्हाडी बोलीमुळे पात्रातील संवाद सजीव होऊन त्यांच्या भाषेतील संवेदना, भावना लेखनात योग्यरित्या व्यक्त झालेल्या दिसून येतात. ग्रामीण संवादामुळे ते पात्र वाचकांपुढे प्रत्यक्ष उभे असल्याचा भास होतो. आपला विचार पटवून देण्याकरिता बऱ्याचवेळा त्यांनी ग्रामीण लोकगीते आणि लोककथांचा वापर केलेला दिसतो. त्यामुळे अशाप्रकारच्या निवेदनातून लेखातील आशय स्पष्टपणे व्यक्त झालेला दिसतो. इतकेच नव्हे तर आशय चटकदार व्हावा किंवा जे सांगायचे आहे ते वाचकांच्या लवकर लक्षात येण्याकरिता त्यांनी ग्रामीण म्हणीचा वापर केलेला दिसून येतो.

## विचारगर्भित वाक्ये

लेखिकेच्या ललित निबंध लेखनात विचारगर्भित वाक्ये सापडतात. ती उदाहरणादाखल खाली दिली आहेत.

'माणूस बदलला की समाज बदलतो.'

'जुन्या माणसांना पैशांपेक्षा शब्दांची किंमत जास्त.'

'माणसाला तोडता येते पण जोडता येत नाही.'

'खळाळत्या तारुण्याची सर! अवखळ झऱ्याशिवाय कोणालाच येत नाही.'

'झाकून गरिबी लपत नाही.'

मानवी जीवनाविषयी लेखिकेचे सूक्ष्मनिरीक्षण वरील वाक्यांतून लक्षात येते. त्याचबरोबर जीवनाविषयी असलेल्या सखोल ज्ञानाचे दर्शन घडते. अशी वाक्ये वापरून त्यांनी वाचक वर्गाला विचार करण्यास भाग पाडले आहे.

## म्हणी

प्रत्येक भाषेची बोलण्याची पद्धत निराळी असते. त्यामुळे त्या भाषेतील भाव त्या भाषेतील शब्दांतून नेमक्या पद्धतीने व्यक्त होत असतो. अशा म्हणींचा वापर लेखिकेने आपल्या लेखनात अनेक ठिकाणी केला आहे. उदा–

'बळी तो कान पिळी'

'भीक नको पण कुत्रं आवर'

'भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी'

'देव आला दियाले आन पदर नायी घियाले'

'तुले ना मले घाल कुत्र्याले'

लेखिकेने प्रमाण मराठीतील म्हणींबरोबर बोली भाषेतील म्हणींचा वापरही केलेला दिसतो. वऱ्हाडी संस्कृतीचे दर्शन घडविताना त्यांनी वऱ्हाडी भाषेतील म्हणींचा वापर केला आहे.

## वऱ्हाडी भाषेतील संवाद

लेखिकेने आपल्या ललित लेखनात प्रत्यक्ष ग्रामीण वऱ्हाडी भाषेतील संवाद खालीलप्रमाणे वापरले आहे. उदाहरणात–

'आजी, किसनाले मंजुऱ्याच काऊन पायजतवं?'

'अवं तो लंगडा किस्ने देव हाये ना त्याले तुयसी लयच आवळते.'

'आजी, किस्न त देव हाये.'

‘मग तुयसाबाई बी देवच हाये.’

अशा संवादरूपी भाषेमुळे त्यांचे लेखन सजीव झालेले दिसून येते. पात्रांच्या बोलण्यातील भाव योग्यरीतीने वाचकांपर्यंत पोहचण्यास संवादरूपी भाषेमुळे मदत झालेली दिसून येते.

## प्रतिमा/प्रतिके

लेखिकेने काही ठिकाणी प्रतिमा प्रतिकांचा वापर केलेला दिसून येतो. आपल्या लेखनात प्रतिमांचा वापर करून वाचकांच्या मनाला नेमका अर्थ पटवून देतात. तसेच प्रतिकांच्या आधारे अनुभवांची मांडणी करताना दिसतात. उदा–

‘वरच्या धांडयाच्या पात्या जणू हिरव्या पताकाच होत्या.’

‘खेडयातील युवतीला बळेबळेच शहरी पोषाख घालावा तसा गाव दिसत होता.’

‘सीताचं बोलणं ऐक्ता ऐक्ता एका हाताने आभाळाात ठिगळ लावण्यासारखं माझं म्हणणं फोल असल्याचं मला जाणवू लागलं’

‘मुंग्यांना साखरेची चाहूल बरोबर लागते तशीच ह्या बोरं पिकण्याची चाहूल लेकरांना बरोबर लागायची.’

## प्रश्नार्थक वाक्ये

लेखिकेच्या लेखनात काही ठिकाणी प्रश्नार्थक वाक्ये आली आहेत. ती पुढील प्रमाणेः

‘सगळया भारताला तर ती संस्कृती मदतीसाठी हाक मारीत नसावी?’

‘पण त्याला तुळस आवडायची ह्याला हेच एकमेव कारण असावं का?’

‘का इथे वाटेल तसा हैदोस घालण्याची मनाई नाही म्हणून?’

‘त्यांनी शिक्षणासाठी असे खास प्रयत्न करावेत म्हणूनही कदाचित गुप्त राहिली असावी?’

अशा वाक्यातून लेखिकेच्या चिंतनाला सुरुवात होते. या वाक्यांतून त्या स्वतः विचार करताना जाणवतात तथा वाचकानांही विचार करायला भाग पाडतात. यातूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या विषय विवेचनाला गती मिळाली आहे.

## ५.५ प्रतिमा इंगोले यांच्या वैचारिक साहित्याचा आशय

प्रतिमा इंगोले यांचे 'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता' (१९९८) आणि 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच!' (२००९) हे दोन वैचारिक लेख संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या दोन्हीं वैचारिक लेख संग्रहात लेखिकेने स्त्रीजीवन, पुरुषी स्वभाव, राजकारण, शिक्षण क्षेत्र अशा गोष्टींवर लेखन करत असताना स्त्री–पुरुष समानता व भेदभाव, हरवलेली माणूसकी, स्वार्थ, नीती मूल्यांची घसरण यावर प्रकाश टाकण्याची भूमिका घेतलेली दिसते. एक स्त्री म्हणून त्यांच्या मनातील स्त्रीजातीचा कळवळा, त्यांनी अनुभवलेले स्त्रीजीवन, लोकसाहित्याचा अभ्यास, स्त्री जीवनाविषयी सहानभूती या गोष्टी त्यांच्या वैचारिक लेखनाच्या प्रेरणा ठरलेल्या आहे.

प्रस्तुत लेखिकेच्या 'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता' हा संग्रह पूर्णता स्त्रीजीवन रेखाटण्यासाठी वाहिलेला दिसतो. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे समाजात स्त्रीचे स्थान उणावत चालले आहे. याचे चित्रण या संग्रहातील प्रत्येक लेखातून केलेले दिसून येते.

'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच' या वैचारिक संग्रहातील लेखांमध्ये लेखिकेने आजच्या शहरी जीवनात विज्ञान तंत्रज्ञानामुळे झालेला बदल निदर्शनास आणून दिला आहे. विविध क्षेत्रांतील स्त्रीच्या स्थानांचा विचार या संग्रहातील बहुतांशी लेखात झालेला दिसून येतो.

### ५.५.१ स्त्री दुःख व स्त्री समस्यांचे चित्रण करणारे लेख

**दारूबंदी आणि स्त्री–** या लेखाच्या आधारे माणसाची दारू पिण्याची कारणे सांगून पतीच्या दारूच्या व्यसनामुळे स्त्रीला कोणकोणत्या प्रसंगांतून जावे लागते आणि या व्यसनाच्या मुक्ततेसाठी काय उपाय करता येतील यावर लेखिका विचारविनिमय करतात. दारू पिणाऱ्याविषयी सांगताना लेखिका लिहितात, "अशिक्षित माणसांना दारूचे व्यसन लागणे, हे

समजू शकते. अती दुःखी व अती कष्ट करणाऱ्या माणसांना दारू पिण्याची सवय लागते हे समजू शकते. पण मोठमोठे विद्वान दारू पितात. तेव्हा आश्चर्य वाटते." (स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता, पृ. ३८) दारू पिल्यामुळे पिणारा पुरुष मरण पावतो. त्यामुळे मुलांचे पालनपोषण त्याच्या स्त्रीला करावे लागते. दारू पिणाऱ्याला त्या दारूचा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे या दारू व्यसनमुक्तीसाठी स्त्रियांनीच पुढाकार घेतला पाहिजे असे त्यांना वाटते. दारू पिण्याचे दुष्परिणाम सांगून वाचकमनाला दारूबंदी करण्यास प्रवृत्त करणारे त्यांचे लेखन आहे.

दारूबंदी करणे ही महत्त्वाची गरज आहे की नाही ही गोष्ट स्त्रियांवर सोपविताना लेखिका लिहितात, "उद्या जर मुलीचे लग्न करतो म्हटले तर दारू न पिणारा मुलगा सापडणे मुश्किल होईल? अर्थात दारू न पिणारा नवरा शोधायला वाटेल तेव्हाच! दारू पितो म्हणजे फॅशनेबल आहे हे घर मॉड आहे असा विचार केला तर काळजीच नको आता काळजी हवी का नको हे स्त्रियांनी ठरवायची वेळ आहे एवढे नक्की!" (स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता, पृ. ४४) अशा प्रकारे स्त्रीला जागृत करण्याचे काम या लेखातून झाले आहे.

**बहुजन समाजातील स्त्रियांचे शोषण त्यांचे प्रश्न व उपाय –** या लेखात बहुजन समाजातील स्त्रीच्या वाईट परिस्थितीचे निवेदन करून परिस्थितीची कारणं नोंदविली आहे. शिवाय त्यांच्यावर उपायही सूचवले आहे. स्त्रीला नोकरी करायला दिली तर समाजात आपला दर्जा कमी होणार, आपली प्रतिष्ठा धुळीला मिळणार अशी खोटी समजूत बाळगून पुरुष जगत असतो. या खोटया प्रतिष्ठेच्या कल्पनेला तो आजही चिकटून राहिला आहे. त्यामुळे स्त्री नोकरी करून स्वावलंबी न होऊन पुरुषावर अवलंबून राहते. ती स्वाभिमानपूर्वक जगू शकत नाही असे लेखिकेचे म्हणणे आहे.

मराठी जातीतील पुरुषाचा संबंध राजकारण्याशी आला. आणि महाराष्ट्रात आलेल्या मुस्लीम राजवटीच्या परिणामामुळे आलेली पडदा पद्धती मराठी जातीत आली. सावधगिरी किंवा अनुकरण म्हणून पडदा पद्धती त्यांनी अवलंबिली. त्यामुळे ही स्त्री अद्यापही परक्या पुरुषासमोर येऊ शकत नाही, ती मुक्तपणे बोलू शकत नाही. अशी समाजात रूढ झालेली पडदा पद्धतीविषयी या लेखात विवेचन केले आहे. बहुजन समाजातील स्त्री शिक्षणापासून ते

इतर स्त्री हक्कापासून वंचित राहिल्याची कारणे सांगून स्त्रीने शिक्षण घेणे आणि पुरुषाने स्त्रीबद्दल उदार दृष्टिकोन ठवणे असे दोन उपाय लेखिका या लेखात सूचविताना दिसतात. बहुजन समाजातील स्त्रीच्या समस्या, या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाय योजना हा लेखिकेच्या लेखाचा महत्त्वाचा मुद्दा असल्याचे दिसून येते.

**स्त्री सख्यत्वासाठी (स्त्रीत्वाचे सूत्र) –** स्त्रीही लक्ष्मीचे रूप आहे. असे म्हणत असतानाही समाजात आज स्त्रीची अवहेलना दुसऱ्या स्त्रीकडून होत आहे. हे जाणून घेऊन लेखिका लिहितात, “यापुढे तरी स्त्रियांनी इतर स्त्रियांची जर कुचंबणा होत असताना दिसत असेल तर हातावर हात वा डोळयावर हात ठेवून बसता उपयोगाचे नाही.” (स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता, पृ. ५६) म्हणजे एका स्त्रीच्या दुःखाला दुसरी स्त्री कारणीभूत असते. शिवाय या पुरुषप्रधान संस्कृतीच्या निर्मितीला स्त्रीच जबाबदार होते. म्हणजेच स्त्रीच्या स्वातंत्र्याला आळा घालण्याचे काम एक स्त्रीच करताना दिसून येते. याची जाणीव करून देताना अशा प्रतिगामी स्त्रीचा प्रतिकार करून स्त्रीला समजून घेण्याचा तिला आधार देण्याचा उपदेश लेखिका ‘स्त्री सख्यत्वासाठी (स्त्रीत्वाचे सूत्र)’ या लेखात करताना दिसतात.

**हुंडा प्रथा व स्त्री–** पूर्वीच्या काळात मातृसत्ताक समाजपद्धती अस्तित्वात असल्याने त्या काळात स्त्रीला स्वतंत्रता होती. तिचा सन्मान केला जायचा परंतु कालांतराने पुढे पुरुषप्रधान संस्कृती रूढ झाली. तसा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. पुरुष स्त्रियांवर वर्च स्व गाजवू लागले. तशी हुंडा प्रथा सुरू झाली. आणि आज या हुंडा प्रथेने सर्वव्यापी रूप धारण केलेले दिसते. हुंडयापायी बहुपत्नीची प्रथा सुरू झाली. हुंडा मिळाला नाही तर पुरुष एका पत्नीला नाकारून दुसरा विवाह करू लागला. आणि यातून त्या पहिल्या स्त्रीची अवहेलना होऊ लागली. प्रस्तुत लेखिकेने या लेखात हुंडा प्रथेला विरोध केला आहे. या हुंडा प्रथेच्या संदर्भात लेखिका लिहितात, “हुंडा घेणारा दोषी असतो असेही नाही तर देणाऱ्यानेसुद्धा या घातक प्रथेचा प्रतिकार करायला हवा. नाहीतर बोलक्याची बोंड खपतात त्याप्रमाणे हुंडयापायी श्रीमंत सुदैवी ठरतात व गरिबांच्या गुणी मुली खितपत पडतात व गरीब दुदैवाच्या घट्ट फेऱ्यात अडकतात.” (स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता, पृ. ६९) यातून लेखिकेने हुंडा प्रथेचा परिणाम निदर्शनास आणून दिला आहे. समाजाने प्रेमविवाह आणि आंतरजातीय

विवाह याचा पुरस्कार करायला हवा. कारण अशा विवाहात हुंडयाचा प्रश्नच येत नसतो. यातून नक्कीच हुंडा प्रथा थांबू शकते असा विश्वासार्ह उपाय लेखिका सूचवित आहे.

या लेखाद्वारे त्यांनी हुंडा प्रथा का बंद होत नाही याची कारणमीमांसा करून हुंडा प्रथा मोडून काडण्यासाठी उपाययोजना सूचवून स्त्रीवर्गाच्या जीवनात सुख यावं अशी इच्छा व्यक्त केली आहे.

**स्त्रीची संसारनिवृत्ती–** एक स्त्री म्हणून तिच्या वाटयाला नेहमीच जबाबदाऱ्या कष्ट, दुःख आलेले दिसून येतात.  मुले बाळे घरसंसाराचा गाढा चालवताना तिला विसावायला वेळच मिळत नाही. जीवनाच्या अखेरपर्यंत ती कुटुंबाकरिता झटत असताना दिसते. हे चित्र लेखिकेने या लेखात निदर्शनास आणून दिले आहे. वृद्ध अवस्थेत पुरुषाला मात्र संसारातून विसावा मिळतो. परंतु स्त्रीला नाही. हे लेखिकेला रूचत नाही. तरुणपणी स्त्रीने संसाराविना राहणे समाजात रूढ नाही. निदान प्रौढपणी तरी तिची संसारनिवृत्ती समाजाने मान्य करायला हवी अशी मागणी त्या या लेखाद्वारे करताना दिसतात.

**शहरी व ग्रामीण स्त्री एकच!** – ग्रामीण स्त्री व शहरी स्त्री दोघांच्याही व्यथा एकच असल्याचे मत लेखिका या लेखात मांडतात. समाजात स्त्रीबद्दल एकच मत असते.  मग ती शहरातील असो किंवा गावातील.  तिच्या वाटयाला स्त्रीदास्य कायम आहे. स्त्री नेहमीच दुय्यम स्थानी असलेली दिसून येते. असे स्त्री जीवनाचे चित्रण या लेखात केले आहे. या लेखात स्त्री समस्यांचे चित्रण करत असताना त्यावर उपायदेखील सांगण्याचा प्रयत्न केला आहे. शहरी व ग्रामीण असा भेद स्त्रियांनी करू नये. त्यासाठी ग्रामीण व शहरी स्त्रियांनी एकत्रित येऊन समाज व्यवस्थेविरूद्ध, पुरुषप्रधान संस्कृतीविरूद्ध लढा दिला पाहिजे. स्त्रीला स्त्रीत्वाचा अभिमान वाटणे त्यांना गरजेचे वाटते. एकमेकींबद्दल आत्मभाव वाटणे म्हणजेच स्त्रीची पुरुषप्रधान संस्कृतीपासून सुटका असे निर्विवाद सत्य त्या लेखात उलगडताना दिसतात.

**स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचे स्त्रीजीवन –** या लेखात भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतरच्या स्त्री जीवनाविषयी निवेदन केले आहे. स्त्रीच्या सामाजिक स्थानाचा विचार करत असताना लेखिका स्त्री पुरुष भेदभाव मिटवण्याकरिता उपाययोजनाही आखताना दिसतात.

स्वातंत्र्यापूर्वी स्त्रीच्या वाटयाला दुःख, दास्य, छळ, अवहेलना येत होती. १९४७ साली आपला भारत देश स्वतंत्र झाला आणि या घटनेने 'स्त्री'ला स्वातंत्र्य दिले, समता दिली त्याचबरोबर स्त्री संरक्षणासाठी विविध कायदे निर्माण केले. परंतु आज या स्त्रीचे जीवन बदलले आहे का? असा जर प्रश्न उपस्थित केला तर याचे उत्तर नकारार्थी येते. याचाच अर्थ स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही स्त्रीची परिस्थती पूर्णता बदलली नाही. आजही तिला दिलेले हक्क ती उपभोगू शक्त नाही. या आधुनिक जगातही समाजाची मानसिकता बदललेली दिसत नाही. अशी स्त्रीची स्वातंत्र्यकालीन परिस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. या परिवर्तनासाठी समाजाची मानसिकता अगोदर बदलणे गरजेचे वाटते. त्याचबरोबर स्त्रियांनी स्वतः जागृत होऊन आपला हक्क मागितला पाहिजे तेव्हाच तिचे हक्क तिला मिळतील आणि तेव्हाच या देशाची खऱ्या अर्थाने प्रगती होईल असे त्यांचे ठाम मत लेखात व्यक्त झाले आहे.

**स्त्रीचा पोषाख–** आजच्या समाजात स्त्रीच्या पोषाखावर मतभेद असलेला दिसून येतो. पोषाखाबाबत फॅशनचे प्राबल्य अधिक वाढलेले दिसते. आणि ही फॅशन चित्रपटातून समाजात आलेली आहे. कधी कधी हा पोषाख समाजाला घातकही ठरतो. या लेखामध्ये चित्रपटातील पोषाख व परंपरेने घालून दिलेला स्त्रीचा पोषाख या दोन्ही तऱ्हेच्या पोषाखाला लेखिका मान्यता देताना दिसत नाही. त्यांच्या मते हे दोन्हीकडून आलेले पोषाख तितकेच वाईट आहे. स्त्रीला सुटसुटीत वाटणारा, व्यवसायाला अनुरूप असणारा स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत असा पोषाख स्त्रीने स्वीकारावा. असा त्यांचा विचार आहे. पुरुषी पोषाख केला म्हणून किंवा आजच्या स्त्रीवरील बलत्काराला स्त्रीचा पोषाखच कारणीभूत आहे ही समाजाची मनोधारणा बदलायला हवी अशी मागणी त्या 'स्त्रीचा पोषाख' या लेखात करतात. लेखिका लिहितात, "पोषाखाचा प्रश्न हा ज्याचा त्याचा खाजगी प्रश्न समजून, त्यात इतरांनी नके खुपसण्याची गरज काय? लहान मुलांना बिचाऱ्याना स्वतःचे मत नसते. पण आजच्या स्त्रीला तर ते नक्कीच आहे. तेव्हा पुरूषांच्या पोषाखाच्या स्वातंत्र्य असावे. किमान स्त्रियांनी ते मान्य करावे. त्यातून स्त्री समभावही वाढीस लागेल." (आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?, पृ. ३०) समाजाची स्त्रीविषयीची मनोधारणा बदलायला हवी अशी अपेक्षा लेखिका या लेखात करताना जाणवतात.

**स्त्रियांबद्दलची समाजधारणा–** स्त्रीबद्दलची समाजाची विचारसरणीवर या लेखात भाष्य केले आहे. समाज स्त्री व पुरुष यांना समान मानत नाही जरी कायद्याने स्त्री हक्क तिला दिले तरी ते हक्क ती उपभोगू शकत नाही. परिणामी आजही स्त्री सुरक्षित नाही. कैदेत किंवा पोलिस स्टेशन असे कोणीच तिच्या सुरक्षिततेची खात्री देऊ शकत नाही. यासाठी जनजागरण आवश्यक ठरते आणि आज या जनजागरणासाठी चळवळीची अत्यंत गरज आहे असे त्या या लेखात पटवून सांगतात.

## ५.५.२ स्त्रीच्या मागास वत्तीवर भाष्य करणारे लेख

**ग्रामीण स्त्रीचे भावविश्व व आधुनिकता–** आजच्या आधुनिक जगात महाराष्ट्रातील ग्रामीण स्त्रीचे बहिरंग थोडे बदलले असले तरी तिचे अंतरंग अजून बदललेले दिसत नाही. ग्रामीण स्त्रीकडे शिक्षण नाही त्यामुळे शिक्षणाने मिळणारा आत्मविश्वासाचा अभाव तिच्यापाशी असतो. त्यातून लाचारीचे जीवन जगण्यास ती प्रवृत्त होते. परंपरागत समजूतींना कवटाळून बसणारे त्यात कलुषित झालेले तिचे मन जागृत करण्याची आवश्यकता आहे अशी वस्तुस्थिती लेखिकेने या लेखात दर्शविली आहे. समाजात अशी जागृता होण्यासाठी मुलींना सक्तीचे शिक्षण करणे आणि स्त्री कल्याणाविषयकअभ्यासक्रम असणे गरजेचे आहे. असा उपाय त्यांनी येथे सांगितला आहे.

**ग्रामीण स्त्री व स्त्री जागरण–** हा लेख ग्रामीण स्त्रीच्या भावविश्वावर आधारित आहे. ग्रामीण स्त्रीला स्त्रीमुक्ती या शब्दाची अजून तोंड ओळखही झाली नसल्याने खेडयात स्त्री जागरणाची गरज आहे असे लेखिका सांगतात. स्त्री समानता, शिक्षणाविषयी स्त्री अजाण आहे. या स्त्री जागरणासाठी ग्रामीण साहित्याने, दलित साहित्याने, स्त्रीवादी तसेच आदिवासी साहित्याने प्रयत्न करणे त्यांना अनिर्वाय वाटते. स्त्रीपेक्षा पुरुषांनीही नव्या भूमिकेचा विचार केला तर स्त्री नक्की त्याच्या बाजूनी उभी राहिल असे खात्रीदायक वाक्य बोलून पुरुषप्रधान संस्कृती नाकारून नवा समाज, नवी संस्कृती निर्माण व्हायला पाहिजे अशी अपेक्षा लेखिका या लेखात करताना दिसतात.

### ५.५.३ समाजाने स्त्रीला दिलेल्या दुय्यम स्थानावर भाष्य करणारे लेख

**शिक्षण क्षेत्रात स्त्री दुय्यम स्थानीच?–** स्वातंत्र्यानंतर जरी कायद्याने स्त्रीपुरुष समानतेचा हक्क दिला तरी आज ती स्त्रीपुरुष समानता दिसत नाही. आपण म्हणतो शिक्षणाने ही परिस्थिती बदलणार परंतु ह्याच शिक्षण क्षेत्रात स्त्री आणि पुरुष भेदभाव दिसून येतो. या शिक्षण क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व दिसून येते. ते टिकवून ठेवण्याकरिता पुरुष प्रसंगी नीतिशुन्य गोष्टी करताना दिसून येतो. याचा विचार लेखिकेने या लेखात केलेला आहे. लेखिका लिहितात, “भाषणबाजी करणाऱ्यांनी तरी निकोप दृष्टी बाळगावी. नाहीतर त्यांच्या विद्वतेचा तो एक प्रकारचा पराभवच ठरतो. पुढे मागे एखादी स्त्री जर शिक्षणामंत्री झाली तरच या क्षेत्रात काही परिवर्तन घडण्याची शक्यता आहे. एरवी मुखवटे चढविलेल्या विद्वानांनी ह्या क्षेत्राचा विचका होण्यास हातभर लावला हे कोणीच नाकबूल करणार नाही.” (आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?, पृ. ९) असा पुरुषी भ्रष्ट, विकृत प्रवृत्तीचा निर्देश लेखिका लेखात करताना दिसतात.

**न्यायालयात स्त्री दुय्यम स्थानी?–** आज स्त्रीला जे दुय्यम स्थान प्राप्त होते. त्याचे मुख्य कारण म्हणजे समाज व्यवहार. या समाजाला स्त्री विरोध करायला गेली तरी तिथे उलटे बोट तिच्यावरच येते. त्यामुळे ती कोणत्याही गोष्टीचा प्रतिकार करायला अडखळते आणि आहे त्या जीवनाचा समाज रीतीरिवाज, रूढी परंपरेसमवेत स्वीकार करताना दिसते. अशाप्रकारे समाजाने स्त्रीला सर्वोपरि बांधून ठेवले आहे. आज स्वतःच्या हक्कासाठी न्याय मागणे हा प्रत्येकाचा हक्क व तो त्यांचा अधिकार आहे. परंतु बऱ्याचदा कायदा कागदोपत्री राहतो. आज पुरुषाच्या दोन तीन विवाहित स्त्रिया एकत्र नांदताना दिसत नाही; हे जरी खरे असले तरी स्त्रीला टाकून देणे किंवा हुंडाबळी म्हणून नष्ट करण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येतात. आज स्त्रिया कोर्टात जाताना बघून पुरुषाच्या मानसिकतेत काही बदल झालेला नाही याची साक्ष पटते. स्त्री न्यायालयात जाताना सुरक्षित राहण्यासाठी भाऊ किंवा वडिलांना घेऊन जात असते. याचा अर्थ न्यायालयातही ती सुरक्षित नाहीये. अशाप्रकारच्या लेखनाद्वारे लेखिकेने आजची वस्तुस्थिती या लेखात पटवून सांगितली आहे.

ज्ञायालयाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या पुरुषांकडून स्त्रीला पुरुषी प्रवृत्तीचे शिकार व्हावे लागते. न्यायालयात स्त्रीची होणारी अवहेलना, तिला विचारले जाणारे अश्लिल प्रश्न पुरुषाविरूद्ध तक्रारीत तिलाच जबाबदार ठरविणारा समाज यामुळे स्त्रीला सोसावे लागणारे कष्ट याचे प्रतिबिंब 'न्यायालयात स्त्री दुय्यम स्थानी?' या लेखात पडलेले दिसून येते. निदान ज्ञायालयाच्या क्षेत्रात तरी स्त्रीला सहानभूती मिळावी, तिला न्याय हक्काबरोबरच स्त्रीत्त्वाचा सन्मानही मिळावा अशी मागणी लेखिकेने या लेखात केली आहे.

**मंत्रालयात काम करणाऱ्या स्त्रीची गाथा–** या लेखात मंत्रालयात काम करणाऱ्या स्त्रीची गाथा मांडलेली दिसून येते. आज स्त्री पुरुषाबरोबरीने नोकरी करत असताना दिसते; परंतु त्या नोकरीच्या जागी पुरुष कर्मचाऱ्यांकडून तिला त्रास सहन करावा लागतो. या स्त्री जीवनाचा शोध घेत असताना त्यांना जाणवणारी स्त्रीची व्यथा मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. एक स्त्री जरी निवडून आली तरी तिला मंत्रालयातील निर्णय घ्यायला दिले जात नाही. तिला केवळ साधन म्हणून वापरले जाते पण प्रत्यक्ष कारभार मात्र पुरुष चालवत असतो यावर त्यांनी पोटतिडकीने भाष्य केलेले दिसते.

**स्त्रीला अंत्येष्टीचे अधिकार असावेत?–** समाजाने अपत्यहीन बापाच्या मुलीला पित्याचे अंत्यसंस्कार करायला दिलेला नकार लेखिकेला चूकीचा वाटतो. हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी धर्मशास्त्राचा आधार घेतला आहे. 'धर्मसिंधू' हा मान्यताप्राप्त धर्मग्रंथ आहे. या ग्रंथाच्या "श्राद्धाद्यधिकारी निर्णय" प्रकरणात तिसऱ्या परिच्छेदात अंत्येष्टी व श्राद्धाचे अधिकार स्त्रियांना आहे याची नोंद केली आहे.

"यद्यप्य विभक्त स्यसृंष्टस्य वा

पत्य भावे विभक्ता संसृष्टस्यकन्या

पिण्डदाधनहारिणी। तत्रापि विवाहिततैव

पिण्डदाधनहरात्वूनूढाऽपि।" (आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?, पृ. १५)

याचा अर्थ मृत व्यक्ती विभक्त कुटुंबातील व संसुष्ट असेल तर त्याचा अंत्यसंस्कार करण्याचा प्रथम अधिकार पत्नीला असतो. पत्नी जीवंत नसल्यास कन्येला असतो तसेच धनावर विवाहित कन्येचा अधिकार असतो असे म्हटले आहे. त्याचबरोबर ‘जीवत्पितृकनिर्णय’ या ग्रंथात सर्वप्रथम अंत्यकर्म करण्याचा अधिकार त्या मृत व्यक्तीच्या पत्नीला असण्याची नोंद आहे. अशा दोन पुराव्यांच्या आधारे स्त्रीदेखील अंत्यसंस्काराच्या अधिकारी आहे हे पटवून दिले आहे.

## ५.५.४ सुधारकांवर आधारित लेख

**स्त्री शिक्षणाचा आद्यजनक (ज्योतीबांचा वारसा) –** या लेखात स्त्री सुधारणेसाठी ज्योतीबांने केलेल्या कामगिरीबद्दल सांगितले आहे. आपली भारतीय स्त्री अज्ञानाच्या व गुलामगिरीच्या जगात जगत होती. या स्त्रीला शिक्षित करून तिला तिचे सर्व हक्क मिळवून दिले त्यानंतर स्त्री शिक्षणाचे ध्येय घेऊन आपल्या पत्नीच्या सहायाने भारतात स्त्री शिक्षणाची जबाबदारीने सुरुवात केली. अशा ज्योतिबा फुले यांच्या कार्यक्तृत्वाचा उलगडा लेखात झाला आहे. ज्योतिबांच्या उदाहरणातून समाज मनाला जागृत करण्याचे काम लेखिकेने या लेखाद्वारे केले आहे. स्त्री शिक्षण कित्ती महत्त्वाचे आहे आणि या कार्यात आपणही सहभागी होऊन समाजात स्त्रीची स्थिती बदलली पाहिजे हा विचार प्रत्येक वाचकांच्या मनात रूजवण्याचा प्रयत्न दिसत आहे.

**बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार व स्त्री जागृतीचे कार्य–** या लेखात बाबासाहेबांनी स्त्रीच्या उन्नतीसाठी केलेले कार्य आणि समाजात दलित स्त्रीवर पाण्यासाठी होणारे अन्याय–अत्याचाराविषयी लेखन झाले आहे. आंबेडकरांच्या काळात आपल्या भारताच्या पवित्र भूमीवर अपृश्यतेचा अंधार पडला होता. त्याकाळी स्त्रीला हीन वागणूक मिळत होती. शुद्र जातीत जन्मलेल्या स्त्रीला सामुहिक विहिरीचे पाणी वापरण्याचा हक्क मिळवून देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. स्त्रियांना समाजाच्या अन्यायातून मुक्त केले. अशा बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्त्वाचा उलगडा करून त्यांचे मौलिक विचार ही लेखात मांडले आहे. लेखिका लिहितात, “बाबासहेबांना केवळ स्त्री पुरुष समानताच अभिप्रेत नव्हती. तर त्यांना संपूर्णतः स्त्रीशक्तीची जाणीव होती व तिचा उपयोग विकासासाठी करून घेण्याची तळमळ

होती. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, प्रज्ञा याबरोबरच त्यांनी स्त्रीत्वालाही उचलून धरले. यासर्व उत्थान प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीनेच स्त्रीने सहभागी झाले पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला." (स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता, पृ. ५०) अशा विचारांचा त्यांच्या शिकवणुकीचा नव्याने विचार होऊन किमान त्यांना मानणाऱ्या माणसांनी त्यांचा वारसा चालवावा असा उपदेश या लेखात झाला आहे.

## ५.५.५ स्त्री सामर्थ्याचे चित्रण करणारे लेख

**जागृत मातृत्व–** एखादे खंबीर व्यक्तिमत्त्व घडते तेव्हाच मातृत्व शक्तीच्या सामर्थ्याची जगाला कल्पना येते असे लेखिका उदाहरणासह पटवून देतात. स्त्री सामर्थ्य दाखवून देण्यासाठी जिजाऊच्या मातृत्वाचा उल्लेख येथे झाला आहे. जिजाऊने शिवाजी महाराजांना घडवले त्यामुळेच ते एवढे मोठे राजे होऊ शकले अशी मातृत्वाची साक्ष पटवून देऊन सर्व मातांना आपल्या मुलावर योग्य ते संस्कार देण्यास प्रवृत्त करतात. प्रत्येक मातेने आपल्या मुलांवर किमान स्त्री पुरुष समानतेचे संस्कार केले तर अधिक महत्त्वाचे ठरेल असा सल्ला देताना दिसतात. लेखिका लिहितात, "वत्सलरस तसा कोमल वाटतो पण प्रसंगी ते अग्नीजन्य खडकसदृश प्रखर तेजस्वी व्यक्तिमत्त्व घडवू शकतो. जे व्यक्तिमत्त्व कोणत्याही परिस्थितीतून मार्ग काढू शकेल व जगात उत्थात घडवू शकेल." (स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता, पृ.८३) असा विश्वास व मातृत्व शक्तीचा जयजयकार लेखात झाला आहे.

**स्त्रीचा राजकारणातील सहभाग–** स्वातंत्र्यानंतर स्त्रीला समानता मिळाली असे आपण म्हणत असतो; परंतु तसे चित्र आपल्याला कुठेच दिसत नाही हे सर्व बदलायला राजकीय क्षेत्रात स्त्रीचा मोठा सहभाग असणे गरजेचे आहे. राजकारणात जर स्त्रीची सत्ता आली तर संपूर्ण समाजातील स्त्रीचे प्रश्न सुटू शकतील. यासाठी राजकारणातील कार्यभार सांभाळण्यासाठी स्त्रियांना प्रवृत्त करावे असे लेखिकेचे मत आहे. केवळ स्त्री प्रश्नच नव्हे तर समाजातील भ्रष्टाचार हटविण्यास ती समर्थ आहे असे स्त्रीचे सामर्थ्य लेखिकेने या लेखातून उलगडले आहे.

## ५.६ प्रतिमा इंगोले यांच्या वैचारिक लेखनाचे वाङ्मयीन विशेष

### ५.६.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

प्रतिमा इंगोले यांनी स्त्री प्रश्नांवर तळमळीने विचार विनिमय केलेला दिसून येतो. आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे समाजात स्त्रीचे स्थान उणावत चालले आहे याचे यथायेग्य विवेचन त्यांच्या प्रत्येक लेखात झाले आहे. स्त्रीवादी चळवळीचा बाज या लेखनाला आला आहे.

या आधुनिक जगात जरी स्त्रीशिक्षित असली तरी तिच्या वाटयाला अवहेलना, उपेक्षा येतच असते. पूर्वीची स्त्री आणि आजची आधुनिक स्त्री या दोन्ही काळातील स्त्रीच्या व्यथा सारख्याच आहे असे त्यांचे ठाम मत व्यक्त झाले आहे.

आज समाज शिक्षित झाला तरीदेखील स्त्रीपुरुष भेदभाव आपल्याला सर्वक्षेत्रात दिसून येतो. आजही प्रथा, परंपरा, रीतीरीवाजामुळे स्त्रीचा बळी जाताना दृष्टीस पडतो. अशा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा प्रतिकार करणारे लेखिकेचे वैचारिक लेखन आहे. त्यांनी स्वतःची मते विचार लेखनात स्पष्ट व निर्भिडपणे मांडली आहे. वैचारिक लेखनाची व्याख्या सांगताना निर्मलकुमार फडकुले म्हणतात, “निबंध हा वाङ्मयप्रकार मनोरंजनाशी कधीच निगडित नव्हता. विचारांचे वेगवेगळे पैलू प्रकट करून वाचकांच्या जीवनदृष्टीला प्रगल्भता आणण्यासाठी निदान त्यांना विचार प्रवृत करण्यासाठी निर्माण झालेला हा वाङ्मयप्रकार आहे.”[२] याच तत्त्वाला अनुसरून लेखिकेचे वैचारिक लेखन आहे. टया आपल्या वैचारिक निबंध लेखनातून स्त्रीच्या व्यथा वेदना, तिच्या समस्या मांडून वाचकांना त्यांवर विचार करायला लावताना दिसतात. आजच्या समाज वास्तवाचे चित्रण करून परखड शब्दांतून त्याची चिकित्सा केलेली दिसते.

आपल्या भारतीय समाजजीवनाचे आकलन करून लेखिकेने वैचारिक लेखनाद्वारे स्त्री मुक्तिचा आवाज उचलून धरला आहे. त्यांच्या वैचारिक लेखनातून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय येतो. त्यांच्या समग्र वैचारिक लेखनातून त्यांच्या मनातील स्त्रीविषयी असणारी प्रचंड कणव व्यक्त झाली आहे.

त्यांचा जन्म ग्रामीण भागात झाल्यामुळे ग्रामीण स्त्रीचे जीवन त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांच्या प्रश्नांवर, होणाऱ्या शोषणावर अधिक भर देऊन, त्यांचे लेखन सामाजिक स्त्री प्रश्नांची यथायोग्य रीतीने उकल करणारे आहे. ज्या ज्या स्त्री जीवनाच्या समस्या त्यांनी मांडल्या त्या समस्या सोडवण्याकरिता शिक्षण घेणे हाच उपाय त्या सूचवताना दिसतात. त्यांच्या लेखनाला वास्तवाचा आधार आहे. त्यामुळे हे लेखन वाचकाला अधिक अंतर्मुख करणारे झाले आहे.

## ५.६.२ वैचारिक लेखनाची भाषाशैली

प्रस्तुत लेखिकेने आपल्या वैचारिक निबंध लेखनात स्त्री जीवनाच्या संदर्भात अनेक विचार मांडले आहे. ते समोरच्या माणसाला किंवा वाचकाला संबोधून मांडले आहे. सर्वसामान्य माणसांना सहज वाचून लक्षात येईल अशा साध्या सरळ सोप्या भाषेत आशयाचे निवेदन केलेले दिसते. 'स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे स्त्रीजीवन', 'स्त्री शिक्षणाचा आद्यजनक (ज्योतिबांचा वारसा)', 'दारूबंदी व स्त्री', हुंडाप्रथा व स्त्री' या वैचारिक लेखांच्या शिर्षकांवरूनच लेखातील आशय लक्षात येतो. या निवेदनाला भाषणाचे स्वरूप आले आहे. समोरच्या माणसाला संबोधून त्या बोलताहेत असे वाटत राहते. त्यांनी केलेली विधाने अर्थपूर्ण असून वाचकांच्या मनाला विचार करायला लावणारी आहे. त्यांनी त्यांच्या वैचारिक लेखनातील आशय उदाहरणाच्या आधारे पटवून सांगितला आहे. अनुभवातील घटना प्रसंगाचा नेमकेपणाने वापर केल्याने हे लेखन उठावदार व परिणामकारक झाले आहे असे म्हणता येते.

## विचारगर्भित वाक्ये

लेखिकेने आपल्या वैचारिक लेखनात स्त्रीला एक माणूस म्हणून पाहण्याची मागणी केली आहे. ही मागणी करताना त्यांनी काही विचारगर्भित परिणामकारक वाक्यांचे उपयोजन केलेले दिसून येते. उदा—

'अन्याय झाला तर न्याय मागण्याचा प्रत्येकालाच हक्क आहे, नव्हे तो त्याचा अधिकार आहे.'

'मूल्यात्मक बदल घडवून आणण्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.'

‘मनुष्याला स्वतंत्रता असणे ही मोठी जरुरीची गोष्ट आहे.’

‘जागृत मातृत्त्वामुळे जगात प्रचंड क्रांतिकारी बदल घडून येतात.’

अशा वाक्यांच्या उपयोजनातून लेखिकेने स्त्रीच्या अधिकारांची आत्यांतिक गरज व्यक्त केली आहे. ही वाक्ये वाचकांच्या मनावर प्रचंड परिणाम करणारी असून त्यांच्या निवेदनाला वजन प्राप्त करून देणारी आहे.

## म्हणी

लेखिकेच्या वैचारिक लेखनातही म्हणींचा वापर झाला आहे. कमीत कमी शब्दांतून निवेदन करण्याची प्रक्रिया येथे दिसत आहे.

‘माय मरो मावशी जगो’

‘एक नूर आदमी दसनूर कपडा’

‘मनी वसे ते जागृती दिसे’

‘सोनार, शिंपी, कुलकर्णी आप्पा यांची संगत नको रे बापा!’

## संवाद

लेखिकेने आपल्या वैचारिक लेखनात संवादरूपी भाषेचे उपयोजन केले आहे. त्यामुळे तो आशय योग्यरित्या वाचकांपर्यंत पोहचण्यासाठी मदत झाली आहे. उदाहरणात– ‘ग्रामीण स्त्रीचे भावविश्व व आधुनिकता’ या लेखात शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीचे चांदवड येथे झालेल्या अधिवेशनात एका स्त्री प्रतिनिधीचे बोलणे लेखिकेने लेखात वापरले आहे. “आम्हाला आमच्या शेतमालाला जास्त भाव नको. कारण जास्त भाव मिळाला तर हातात पैसा येणार व हा पैसा आमचा नवरा दारूत बुडविणार वर बाईकडे जाणार, मग आम्हाला जास्त भावामुळे काय फायदा मिळणार? उलट आमचे सुख बिघडणार.” (स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता, पृ. ७३) यातून स्त्रीचे त्रासलेले जीवन व पुरुषी वृत्ती स्पष्ट होते आहे. ह्या

वाक्यांतून त्या स्त्रीच्या मनातील नेमके भाव व्यक्त व्हायला मदत झाली आहे. असे संवाद लेखिकेच्या अनेक लेखात आलेले दिसून येतात.

## प्रश्नार्थक शैली

लेखिकेच्या ललित लेखनातच नव्हे तर त्यांच्या वैचारिक लेखनातही त्यांनी वाचकांपुढे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. भारतात मुलींची हत्या होते या अनुषंगाने त्या पूर्ण लेखात प्रश्नार्थ क शैलीचा वापर करताना दिसतात. उदाहरणात –

“मग हत्या मुलींच्या का होतात? ती तुमचे म्हणणे नाकारू बघते म्हणून? की, तुम्हाला अप्राप्त्य आहे म्हणून? भारतीच्या बाबतीत तर दुसरेच कारण सांगितले गेले आहे. तू मला नकार देतेस, मला मिळत नाहीस, मग कोणालाही मिळणार नाहीस. म्हणजे ती वस्तूच झाली. ह्याला प्रेम म्हणायचे? स्त्रीला वस्तू समजणाऱ्या मनोवृत्तीचा धिक्कार करायचा? की, मला जे हवे ते मला मिळायला हवे, हया पुरुषी अहंकाराचा आविष्कार म्हणायचा?” (आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?, पृ. ५१) असे एकाच उताऱ्यात त्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहे. हे प्रश्न वाचकांना विचार करायला प्रवृत्त करणारे आहे.

## ५.७ प्रतिमा इंगोले यांच्या लेखनाचे वेगळेपण

प्रतिमा इंगोले यांच्या लेखनामध्ये गतजीवनातील तसेच वर्तमानातील घडलेले घटना–प्रसंग, आठवणी, अनुभव, प्रवासकालीन अनुभव, ठिकाणे, भेटलेली माणसे, समाज जीवन, संस्कृतीचे अवशेष, मानव स्वभावविशेष इत्यादींचा संगम आहे.

ग्राम जीवनाविषयी त्यांच्या मनात असलेली जिव्हाळयाची भावना त्यांच्या अनेक लेखनातून दिसून येते. स्वतःचा बालपणातील काळ आजच्या काळाहून चांगला होता हे त्यांना या लेखनातून सांगायचे होते. ते योग्यरीतीने सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. बालपणातील अनेक घटना प्रसंगाचे चर्वण करून स्वतःच्या लेखीच्या वागण्यातून आधुनिक काळाचा फरक त्यांनी योग्यरितीने दर्शविला आहे.

लेखिकेने अनेक स्थळांना भेटी दिल्या. त्या प्रवासात त्यांना शारीरिक तसेच मानसिक कष्ट सोसावे लागले. परंतु त्यांनी कुठल्याच प्रसंगी हार मानली नाही. त्यांना ज्या ज्या ठिकाणी जायचे होते त्या ठिकाणाचे दर्शन त्यांनी घेतले. यातून त्यांच्यापाशी असलेली जिद्द, सहनशीलता, संवेदनशीलता अशा गुणांची ओळख होते. त्याचबरोबर त्यांची ग्रामीण संस्कृतीविषयीची ओढ लक्षात येते. त्यांनी ज्या ज्या स्थळांना भेटी दिल्या त्या स्थळांना सांस्कृतिक इतिहास असलेला दिसून येतो. त्या संस्कृतीचा त्यांनी नेमकेपणाने शोध घेऊन निवेदन केले आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासाविषयी प्रमोद मुनघाटे म्हणतात, "लोकसाहित्य आणि लोककथा या मानवी उत्क्रांतीच्या टप्प्यातील संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. त्यांच्या अभ्यासाशिवाय मानववंश शास्त्राचा व संस्कृतीचा अभ्यासही पूर्ण होत नाही."[३] यावरून असे म्हणावे लागते की, प्रतिमा इंगोले यांनी लोकसाहित्याचा अभ्यास करून आपल्या ललित लेखनात लोकसंस्कृतीचे दर्शन घडविले आहे. त्या शिवाय हे लेखन इतक्या योग्य पद्धतीने करणे त्यांना शक्य झाले नसते. त्यांच्या लेखनात लोककथा, लोकगीतांचे संदर्भ जागोजागी दिसून येतात. लोकगीतांविषयी डॉ. मधुकर वाकोडे म्हणतात, "लोकगीते ही सर्व सामान्यांची निर्मिती असल्याने समाजाच्या विविध स्तरांचे त्यात प्रतिबिंब पडलेले असते. त्यांच्या भावभावना, इच्छा आकांक्षा, रूढी परंपरा, आचार विचारांचे स्वच्छ दर्शन घडते."[४] याच तत्त्वाला अनुसरून लेखिकेचे ललित लेखन झालेले दिसून येते. बालपणातील अनुभव रेखाटण्यासाठी, पूर्वीचे ग्रामीण समाजजीवन, संस्कृती, मानवी भावभावना, स्त्री जीवन चित्रित करण्यासाठी त्यांनी लोकगीतांचा आधार घेतला आहे. त्यामुळे तत्कालीन समाजाच्या भावभावना, इच्छा, आकांक्षा, रूढी परंपरा, आचार विचार या सर्वांचे दर्शन त्यांच्या लेखनात नेमकेपणाने घडते.

ग्राम जीवन किंवा ग्राम संस्कृती हा प्रतिमा इंगोले यांच्या ललित लेखनाचा महत्त्वाचा विषय आहे. "मानवी समाजात संस्कृतीचे महत्त्व आहे. संस्कृती जोपासावी लागते. जोपासतानाच तिचे संवर्धन होते. साहित्य हे संस्कृतीची जोपासना करण्याचं, संस्कृतीचं रक्षण करण्याचे आणि संवर्धन करण्याचं कार्य करीत असते."[५] हे तत्त्व प्रतिमा इंगोले यांच्या लेखनाला अनुसरून आहे. त्यांनी आपल्या ललित साहित्यातून ग्राम संस्कृतीची पाळेमुळे जीवंन

ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. लोकसंस्कृतीचे जतन झाले पाहिजे या हेतुने त्यांचे ललित लेखन झालेले दिसते.

पूर्वीच्या काळात जो जिव्हाळा, जी प्रेमभावना लोकगीतांमध्ये दिसते ती आजच्या काळात हरवली आहे हे त्यांना त्यांच्या लेखनातून सांगायचे होते. त्यामुळे जुना काळ व आजच्या यंत्रयुगीन आधुनिक काळाची तुलना त्यांनी लोकगीतांच्या आधारे केलेली दिसते. त्यांनी जुन्या काळातील लोकगीतांचा अभ्यास करून त्या लोकगीतांचे महत्त्व आपल्या ललित लेखनात विशद केले आहे

स्वतःची सुखदुःखे सांगण्याकरिता स्त्रियांनी लोकगीते रचली. आणि ही गीते पूर्वी पिढयान पिढया चालू राहिली. पण आजच्या आधुनिक जगात या लोकगीतांचा कुठे तरी स्त्रायांनाच विसर पडलेला दिसतो. परंतु लेखिकेच्या या निवेदनातून ती या आधुनिक जगातही नक्की जिवंत राहणार असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांनी लोकगीतांचे केलेले निवेदन बोधपूर्ण आहे. लोकगीते समाजाला मिळालेली देणगी आहे. आणि लेखिकेने केलेल्या विश्लेषणामुळे आधुनिक पिढीला त्या वऱ्हाडी बोलीतील लोकगीतांसह त्यांचा अर्थ जाणून घेण्यास अधिक सोपे झाले आहे.

लेखिकेने ललित लेखनाबरोबरीने वैचारिक निबंध लेखन केलेले दिसून येते. या लेखनात त्यांनी स्त्री विषयक लेखनाला प्राधान्य दिले आहे. स्त्री प्रश्नांना वाचा फोडली आहे. स्त्री जीवनावरील एखादा विषय घेऊन त्या विषयाचा सविस्तर विचार या लेखनात झाला आहे. वाचकांना विचार करायला लावणारे स्त्रीविषयक वैचारिक लेखन लेखिकेने केलेले दिसते. त्यांच्या वैचारिक लेखनाची भाषा साधी सरळ असली तरी पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रतिकार करणारी असल्यामुळे हे लेखन परिणामकारक झाले आहे.

लेखिकेच्या ललित व वैचारिक निबंध लेखनाची भाषा साधी, सोपी सामान्य वाचकाला समजेल उमजेल अशाप्रकारची आहे. सर्व सामान्य माणसांना माहित असेल अशा म्हणींचा, वाक्प्रचारांचा वापर त्यांनी केलेला दिसतो. प्रसन्न शैली हे त्यांच्या निबंध लेखनाचे वैशिष्टय आहे. त्यांचे ललित तसेच वैचारिक निबंध लेखन वाचकाला अंतर्मुख करणारे आहे.

या लेखनात त्यांनी स्वतःच्या भावनांना, विचारांना वाट करून दिली आहे. आपल्या लेखनातून त्यांनी वाचक वर्गाला योग्य सल्ले, बोध व योग्य मार्गदर्शन करून विचार करण्यास प्रवृत्त केलेले दिसून येते. त्यांनी मांडलेले विषय वाचक वर्गाचे परिचयाचे आहे. त्यामुळे त्यांचे लेखन वाचक वर्गाला अधिक भावणारे आहे. अशा प्रकारचे ललित व वैचारिक निबंध लेखन करून लेखिका प्रतिमा इंगोले यांनी मराठी साहित्यात वेगळे व विशेष स्थान प्राप्त केलेले दिसून येते.

## ५.८ निष्कर्ष

१. लेखिकेच्या लेखनात वास्तव स्वरूपाचे अनुभव कथन आहे. बालवयातील आठवणी, प्रवासातील अनुभव आठवणी, सहवासात आलेली माणसे, लोकसंस्कृती, लोकसाहित्य अशातून लेखिकेच्या लेखनाला विषय मिळाले आहेत.

२. आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख अशा प्रकारचे लेख लेखिकेने लिहिले आहेत.

३. वऱ्हाडी भाषा, तेथिल निसर्ग, माणसे, संस्कृती, स्थळे लेखिकेच्या आस्थेचा विषय आहेत.

४. लेखिकेने आपल्या ललित निबंध लेखनात लोकसाहित्याचा काळ व आजच्या यंत्रयुगातील जीवनामधली विसंगती दर्शविली आहे.

५. लेखिकेच्या ललित लेखनात स्त्रीचे वेगळे जीवनानुभव, अनुभवविश्व पारंपरिक लोकगीतांच्या आधारे व्यक्त झाले आहे. स्त्रीला सासरी सोसाव्या लागणाऱ्या यातना, स्त्री–पुरुष नातेसंबंध, स्त्रीचे झाडांशी असलेले अतुट नाते, स्त्रीचे कुटुंबातील इतर स्त्रियांशी असलेले नातेसंबंध, स्त्रीची माहेरची ओढ, स्त्रीसुलभता या सर्वांचा वेध लेखिकेने लोकगीतांमध्ये दिसणाऱ्या स्त्रीजीवनाच्या आधारे घेतला आहे. स्त्री प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी लेखिकेने अशाप्रकारचे लेखन केले आहे.

६. प्रवासवर्णनपर लेख लिहिण्यासाठी लेखिकेने स्वतंत्र लेखसंग्रहाची निर्मिती केली आहे. प्रवासवर्णनपर प्रत्येक लेखात उद्ध्वस्त स्थळे पाहून निराशेचा भाव व्यक्त झाला आहे. त्यात पाहिलेल्या स्थळांची, मंदिरांची, शिल्पांची, तिथे भेटलेल्या माणसांची संस्कृती अशा गोष्टींची माहिती त्यांच्या लेखनात मिळते.

७. आपल्या भारतीय लोकसाहित्यात जी लोकगीते आहेत ती कशी निर्माण झाली, त्या लोकगीतांमध्ये येणाऱ्या आशय विषयाचा विचार साहित्यविषयक लेखांमध्ये झाला आहे. याचबरोबर लोकसाहित्यात येणाऱ्या ग्रामीण बोली भाषेतील म्हणी, वाक्प्रचार या साऱ्यांचे पडसाद लेखिकेच्या लेखनात आहेत. विदर्भातील ग्रामीण म्हणींमध्ये दिसून येणारा विनोद, बोली भाषेत वापरल्या जाणाऱ्या म्हणींचा वापर साहित्यात का केला जातो यावर लेखिकेने भाष्य केले आहे.

८. व्यक्तिचित्रणे लिहिण्यासाठी लेखिकेने स्वतंत्र लेखांची निर्मिती केली नसून अनुभव आठवणी किंवा प्रवासातील अनुभव कथन करतानाच त्यांना भावलेल्या व्यक्तींची व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. त्यात व्यक्तींचा स्वभावविशेष व कार्यकर्तृत्त्वाचा आढावा घेतला आहे. ही व्यक्तिचित्रणे गुणगौरवपर झाली आहेत.

९. सूक्ष्म कथन, तपशीलवार वर्णने, पारदर्शकता, ग्रामीण बोलीचा वापर, मनोवेधक निवदेन शैली अशी लेखिकेच्या ललित निबंध लेखनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

१०. माणसांविषयी जिव्हाळा, माणूसकी, संस्कृतीविषयी प्रेम, प्रामाणिकपणा, तत्त्वचिंतन, निर्भ यता, सडेतोडपणा, क्रांतिकारी विचार, प्रवासाची हौस ही लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची वैशिष्टये आहेत.

११. आत्माविष्कार, काव्यात्मकता, चित्रमय शैली, चिंतनशीलता, घटनांचा संदर्भ व्यासंग, भाषाशैली असे वाङ्मयीन विशेष त्यांच्या लेखनाला लाभले आहेत.

१२. लेखिकेच्या जीवनात माणसाच्या विचारांना, त्यांच्या भावभावनांना किंमत आहे. माणसाच्या मनाचा शोध घेत असताना त्यांच्या नात्यातील सूर लेखिकेने नेमकेपणाने उलगडले आहे.

१३. लोकगीतांच्या माध्यमांतून लेखिकेने अनेक नाते संबंध उलगडले आहे. आज समाजात संपुष्टात आलेले नाते संबंध दाखवून देऊन आजच्या पिढीने आधुनिक जगात नाते टिकून ठेवले पाहिजे असा उपदेश करून नात्याची श्रेष्ठता निदर्शनास आणून दिलेली दिसते.

१४. भुलाबाईची गाणी, झेंडवाईची गाणी, दिवाळीची गाणी अशा ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गाण्यातून दिसून येणारे नातेसंबंध, भावना आजच्या जीवनात किती महत्त्वाच्या आहे हे पटवून देऊन ही गाणी टिकवण्याचा संदेश लेखिका आपल्या लेखनातून देताना दिसतात.

१५. लेखिकेने केलेले ललित लेखन समाज वास्तवाचे प्रतिरूप आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही आपल्या समाजात सुधारणा झाली नाही याचे निराशाजनक चित्र त्यांच्या लेखनातून उमटले आहे.

१६. लेखिकेच्या ललित लेखनाची भाषा लालित्यपूर्ण असून साध्या सरळ भाषेत आशय निवेदन झाले आहे. आकर्षक शिर्षके, ग्रामीण बोली भाषेतील लोकगीते, मुद्देसूद व स्पष्टीकरणात्मक मांडणी, नेमक्या शब्दांची निवड लेखिकेने केलेली दिसते.

१७. स्त्रियांना केलेला हितोउपदेश लेखिकेच्या वैचारिक लेखनाचा महत्त्वाचा गाभा आहे. दारूचे व्यसन, हुंडाप्रथा स्त्रीच्या जीवनात दुःख आणणारी असून आजच्या समाजात या गोष्टीने लोकमानसावर ताबा मिळविला आहे. त्यामुळे अत्यंत समंजसपणाने हे प्रश्न सोडवण्याची नितांत गरज लेखनात व्यक्त झालेली दिसून येते.

१८. पुरुषी वर्चस्वाविरूद्ध धगधगणारे, स्त्रीची पारंपरिक प्रतिमा नाकारून माणूस म्हणून स्त्रीचा शोध घेणारे, पुरुषसत्ताक समाजातील स्त्रीचे दुय्यम दडपलेले स्थान उघड करणारे लेख लेखिकेने लिहिले आहे. आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून देशाला प्रगतीप्रथावर नेण्यास ती समर्थ आहे असे स्त्रीचे सामर्थ्य उलगडून स्त्री—पुरुषाला समान हक्क मिळावा, तिला सन्मान दिला जावा अशी स्त्री पुरुष समानतेची मागणी करत असताना लेखिकेने पुरुषप्रधान संस्कृतीला विरोध केला आहे.

१९. स्त्री जातीबद्दल त्यांना आत्यंतिक कळवळा आहे. स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूद्ध परखडपणे लिहिणे हा त्यांच्या वैचारिक लेखांचा विशेष आहे.

२०. लेखिकेने आजूबाजूच्या समाज वास्तवाचे बारकाईने निरीक्षण करून त्या समाजाच्या सांस्कृतिक संचिताचा शोध घेतला आहे.

२१. मनुष्यधर्म हे लेखिकेच्या वैचारिक लेखनाचे सुत्र आहे.

२२. वैचारिक लेखनातून लेखिकेने स्त्री सुधारणेची भूमिका घेतलेली दिसते. आपल्या वैचारिक लेखनातून वाचकाना नवी दृष्टी देऊन लेखिकेने मराठी साहित्याला समृध्द केलेले दिसते.

२३. लेखिकेचे लेखन अगदी साध्या व सोप्या भाषेत असले तरी ती भाषा थेट प्रतिपक्षाला भिडणारी झाली आहे.

## ५.९ संदर्भ सूची:

१. यादव आनंद, 'समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२. गेडाम–कांबळे विजया, 'वैचारिक निबंधाची परिक्रमा', गोदा प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ., २०११, पृ. १६

३. वाघ विठ्ठल, (संपा.) 'आमची बोली', मुनघाटे प्रमोद, "पथनाटक आणि लोकनाटक", शिवाजी प्रि. प्रेस, आकोला, १९८७, पृ. १०१

४. वाकोडे मधुकर, 'लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे', १९९४, पृ. १०४

५. कऱ्हाडे सदा, 'समाज आणि साहित्य', प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मय गृह मुंबई, दु. आ., पृ. ३

# प्रकरण सहावे

# अरुणा ढेरे यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

## प्रकरण सहावे

# ६. अरुणा ढेरे यांच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप

## ६.१ प्रास्ताविक

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्य क्षेत्रातील प्रसिद्ध लेखिका अरुण ढेरे यांचे नाव सर्व परिचित आहे. त्यांची साहित्य क्षेत्रातील कामगिरी अतिशय मोलाची आहे. कविता, कथा, कादंबरी, बालवाङ्मय, समीक्षात्मक लेखन अशा लेखनाबरोबरीने त्यांचे ललित निबंध लेखनही उत्कृष्ट दर्जाचे झालेले दिसून येते. त्यांच्या लेखनात त्या संशोधक व ललित लेखिका अशा दोन भूमिका बजावताना दिसतात. विविध विषयांवरील त्यांच्या अभ्यासातून त्यांचे ललित लेखन साकार झालेले दिसून येते. या प्रकरणात त्यांच्या ललित निबंध लेखनाचा अभ्यास केला आहे.

## ६.२ अरुणा ढेरे यांच्या निबंध लेखनाच्या प्रेरणा आणि भूमिका

प्रख्यात लेखिका अरुणा ढेरे यांचे लेखन प्रगल्भ आणि प्रगत व विपुल आहे. नामवंत लेखक, संशोधक डॉ. रामचंद्र ढेरे यांच्या त्या कन्या असल्याकारणाने साहित्यनिर्मितीचे संस्कार त्यांच्या वडिलांकडून त्यांना मिळाले व अनेक थोर साहित्यिकांशी त्यांचा संपर्क आला. त्यांचे घर पुस्तकांनी भरलेले असल्याकारणाने त्या पुस्तकांशी त्यांचे अधिक नाते जुळले. बालपणात त्यांनी अनेक पुस्तकांचे वाचन केले. त्यांचे वाचन अफाट असलेले दिसून येते. स्वतःच्या लेखनप्रेरणांविषयी लेखिका "मी'अस्वस्थ आहे' या लेखात लिहितात, "लहान होते तेव्हा मला शब्द मिळाला तो घरातल्या खूपच खूप पुस्तकांमधून,घरी येणाऱ्या खूपखूप माणसांमधून, दारावर येणाऱ्यां वासूदेव, भुत्ये, गोंधळी, भिक्षेकरी यांच्याकडून आई आत्यानं म्हटलेल्या जात्यावरच्या ओव्यांमधून आणि पंचमी हदग्याला धरलेल्या फेराच्या गाण्यांमधून. तेव्हा अगदी सहजपणे मला शब्द आवडायला लागले होते आणि मी त्यांच्याशी खेळत होते इतकंच. झपाटलेल्या देवचारानं ताबा घेतलेल्या माणसासारखी मी त्यांच्या ताब्यात गेले होते. एखादा शब्द वापरून बघावा, त्यामुळे होणाऱ्या आनंदानं स्वतःवर खूष व्हावं आणि इतरांकडून कौतुक मिळावं इतकी साधी, स्वार्थी प्रेरणा त्यामागे होती." (अर्ध्या वाटेवर, पृ. ३९) अशाप्रकारे त्यांच्या

वाङ्.मयीन व्यक्तिमत्त्वाची घडण बालवयात झालेली जाणवते. शालेय जीवनातच त्यांच्या लेखनाला सुरुवात झालेली दिसून येते. वयाच्या नवव्या वर्षी 'कळीचे स्वप्न' या पहिल्या लेखनाने लेखिकेने स्वतःचे शब्द जुळवले. बालपणापासूनच साहित्याशी, त्यातील शब्दांशी नाते जोडणाऱ्या अरुणा ढेरे यांनी इतर लेखनप्रकाराबरोबरीने विस्तारशील व विपुल प्रमाणात ललित निबंध लेखन केलेले दिसून येते. आपल्या ललित लेखनामागील भूमिकेविषयी सांगताना त्या म्हणतात, "डोळयांनी दिसतं त्याच्या पलीकडे भावनिक गोष्टी असतात. आपली संस्कृती, परंपरा या सर्वांसकट तुम्ही अनुभवता तेव्हा आपल्यालाच कळत जाते ही भूमिका. लेखन हे नुसतं आनंद देणारं नसतं. त्याच्या जोडीला अनुभवांनी माणसाला समृद्ध करणं हे काम करावं वाटतं; पण, म्हणजे उपदेश नव्हे, तत्त्वज्ञान नव्हे. ललित लेखक दुसरे डोळे देतो. लेखकाच्या डोळयाला जे दिसतं ते तुम्हाला दिसलेलं नसतं. जगाकडे, माणसांकडे, जीवनाकडे पाहण्याची एक दृष्टी लेखक देतो."[१] आपल्या अनुभवातून वाचकमनाला नवी दृष्टी देणे ही त्यांच्या लेखनामागची भूमिका त्यांच्या संपूर्ण लेखनातून जाणता येते.

## ६.३ अरुणा ढेरे यांच्या ललित निबंध लेखनाचा आशय

अरुणा ढेरे यांचे दहाहून अधिक ललित निबंध लेखनाचे संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. 'लावण्ययात्रा' (१९८७), 'रूपोत्सव' (१९८८), 'काळोख आणि पाणी' (१९९१), 'कवितेच्या शोधात' (१९९१), 'भगव्या वाटा' (१९९४), 'मनातलं आभाळ' (१९९४), नव्या—जुन्याच्या काठावरती (२००१), 'अर्ध्या वाटोवर' (२००२), 'वेगळी माती, वेगळा वास' (२००२), 'माणूस आणि माती' (२००४), कवितेच्या वाटेवर (२०१०) असे त्यांचे ललित निबंधांचे संग्रह प्रकाशित झाले आहेत.

लेखिकेचे ललित लेखन आठवणी, अनुभव स्वरूपाचे आहे. वैयक्तिक आठवणी, अनुभव, जीवनातील घटना—प्रसंग, सभोवतालची सृष्टी, समाज, लोकसंस्कृती सहवासात आलेले व्यक्ती, वाचनात आलेले साहित्य, प्रवासातील आठवणी, अनुभव त्यांच्या ललित लेखनात शब्दबद्ध झाले आहेत. या सर्वांविषयीच्या भावना लेखिकेने शब्दांतून प्रकट केल्या आहेत.

आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गवर्णनपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख अशाप्रकारचे ललित निबंध लेखन लेखिकेने केलेले दिसून येते. त्यांनी लिहिलेले काही लेख दोन गटातही मोडणारे आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर 'चाफा फुली आला फुलून' हा लेख निसर्गवर्णनपर तसाच साहित्यविषयक लेख अशा दोन विभागात मोडणारा आहे. या लेखात चाफ्याच्या झाडाचे वर्णन करत असताना बोरकरांनी चाफ्यावर लिहिलेल्या कवितांचे रसग्रहणही केलेले दिसून येते. 'माधवीची गोष्ट' हा लेख अशाच पद्धतीचा आहे. हा लेख स्त्रीविषयकतसाच व्यक्तिचित्रणपर लेखही होऊ शकतो. असे असले तरी अभ्यासाच्या सोयीसाठी या लेखांचा समावेश एकाच कुठल्यातरी गटात करण्यात आला आहे.

## ६.३.१ आत्मपर लेख

लेखिकेचे लेख स्मरणरंजनपर आहे. मनात जपून ठेवलेल्या गतकाळातील आठवणी, अनुभवलेले कडूगोड मिश्रित क्षण लेखात उतरले आहेत. गतकाळातील अगदी लहानसहान आठवणींचा साठा उपसून ते सांगण्यात लेखिका रमताना जाणवतात.

**बाळपणाचं देणं–** या लेखात लेखिकेने लहानपणातील आठवणी रेखाटल्या आहेत. लहान वयातील त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या घराचे वर्णन, उन्हाळयाच्या सुट्टीत खेळलेल्या खेळांविषयीच्या आठवणी त्याचबरोबर बालवयात निसर्गातील प्रत्येक हालचालीविषयी वाटणारे कुतूहल अशा आठवणींचा आढावा लेखात घेतला आहे. या बालपणातील निसर्गा विषयी मनात निर्माण झालेल्या कुतूहलाचे आजच्या निसर्गज्ञानाशी संबंध आहे असे स्पष्ट करताना लेखिका लिहितात, "आजही हिवाळयातल्या एखाद्या रात्री मनातली ही सगळी निसर्गरूपं उबदारपणे मनात जागी होतात. मी स्वतःशी म्हणते 'कधी ऐकलीच नसती निसर्गा ची हाक, तर एवढी श्रीमंती कुठून मिळाली असती? कहाणीत किंवा विचारतं कुणी तरी, 'मी येऊ?' त्या प्रश्नाला 'हो' म्हटलं, तर अनेकदा गुप्तधनही येतं म्हणे आपल्या मागून. तसं अगदी लहानपणी कधी मीही या सृष्टीच्या हाकेला, 'ओ' म्हटलं असणार. आता हाती लागलेल्या संपत्तीचं मोजमापही करता येत नाही, अशी स्थिती." (मनातलं अभाळ, पृ.१०) यावरून असे लक्षात येते की लेखिकेला लहानपणीच निसर्गाचा सहवास लाभला त्या निसर्गा

तील प्रत्येक  हालचालीशी त्या लहानपणापासूनच नाते जोडतात. त्यामुळे आजच्या जीवनातही ती निसर्गाची ओढ त्यांना धरून आहे. त्यांच्या बालपणानं त्यांच्यात निसर्गाची ओढ निर्माण करून दिली असे त्यांनी या लेखात पटवून दिले आहे.

**मी अस्वस्थ आहे—** या लेखात लेखिका लेखनाच्या उर्मीमुळे अस्वस्थ आहे असे सांगून अस्वस्थ शब्द हेच आपल्या जगण्याची वाट आहे असे सांगतात. बालपणातील काळात त्यांना कोणतीही भीती वाटत नव्हती त्यामुळे कोणतीही गोष्ट सहजपणे पूर्ण करता येत होती. असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु समाजाची बदलेल्या स्थितीने त्या अस्वस्थ होताना जाणवतात. बालपणात त्या सहजपणे स्वतःला आलेले अनुभव लेखनात मांडत असे पण मोठे झाल्यावर भ्रष्ट जीवनशैली शब्दातून व्यक्त करताना त्यांची अस्वस्थता वाढत जाते. लेखिका लिहितात, “माझ्यासाठी लेखन हा एक अटळ पण झुंझार असा पर्यायच होतो आहे. तिथे आपण आपल्याकडील सर्जकशक्ती विधायकतेनं पणाला लावू शकतो. आणि अस्वस्थतेची वेगवेगळी रूपं शोधता शोधता तिच्यावर मात करण्याचे संदर्भ शोधू शकतो. या विश्वासानं मी लिहिते.” (अर्ध्या वाटेवर, पृ. ४०) म्हणजे सभोवताली कितीही आक्रमकता असली तरी त्या स्वतः चागल्या पद्धतीने सृजनशील वृत्तीने लिहू शकतात हे त्यांना येथे सांगायचे आहे.

**मनातलं घर—** लेखिकेचे वडील रामचंद्र ढेरे शिक्षणासाठी पुण्यामध्ये राहिले. त्यावेळची दीड खणाची खोली असलेल्या घराच्या आठवणी त्या या लेखात सांगतात. या घराचे आंगण, उंबरे आणि मागच्या आंगणातील औदुंबर या गोष्टींमुळे हे घर त्यांना फार आवडत होते. त्याचबरोबर घरातले मसाले, वाटणां—धाटणांचे, पुरणा—वाटणांचे, चहापानाचे एवढेच नव्हे तर भांडणाचे, आनंदाचे वास शेजारच्या घरापर्यंत कसे पोहचत होते यांविषयी मनात जपून ठेवलेल्या आठवणी त्या या लेखात व्यक्त करतात.

**तेव्हाचे ते दिवस—** या लेखामध्ये लेखिकेने तुरुंगातील स्वतःचा अनुभव सांगितला आहे. १९७६ साली राजकीय आणीबाणीच्या काळात राजकीय परिस्थितीच्या विरोधी भूमिकेमुळे त्यांना ‘मिस’ खाली दोन महिन्याची कैद झाली होती. त्यावेळी शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात गेल्यानंतर त्यांना प्रतिष्ठेने वागवले जात होते. त्यांची ‘बराक’ वेगळी होती. तर इतर स्त्रियांना

गुन्हेगाराची प्रतिष्ठा होती. समाजापेक्षा वेगळा अनुभव त्यांना तुरुंगात आला यामुळे त्यांना ही शिक्षा वाटली नाही असे लेखिका सांगतात.

**बुडता बुडता सांजप्रवाही–** या लेखात लेखिकेने मनात निर्माण होणाऱ्या असंख्य सुखदुःखाच्या, हव्याशा व नकोशा वाटणाऱ्या जुन्या आठवणींना जाग आणणाऱ्या बुडत्या सांजवेळीविषयी सांगितले आहे. मनाच्या तळाशी दबली गेलेली सगळी अतर्क्यता, संदिग्धता सगळा हळवेपणा संध्याकाळी उफाळून वर येतो त्यामुळे संध्याकाळची वेळ त्यांना आवडते. या संध्याप्रवाहाविषयी सांगताना लेखिकेला अनेक कवींनी लिहिलेल्या संध्याकाळच्या कविता आठवतात. त्या कवितांच्या माध्यमातून त्यांनी स्वतःच्या मनातील सांजवेळीविषयीची भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

म. म. देशपांडे यांची 'बनफूल' या संग्रहातील एक साधीशी पण सुंदर अशी कविता लेखिकेला आठवते. त्या कवितेतील तहान या शब्दावरून लेखिकेने प्रत्येकांना लागणाऱ्या विविध तऱ्हेच्या तहानेविषयी सांगितले आहे. माणसाच्या ओळखीची म्हणजेच जगण्याची तहान, पिकांना लागलेली पावसाची तहान, पोटासाठी मैलनमैल फरफटत चालणाऱ्या माणसांची तहान अशा तहानेविषयी सांगत असताना त्यांनी काही भाग्यवंताना लागलेल्या ज्ञानाच्या तहानेविषयी विवेचन केले आहे. ही तहान म्हणजे अंधार पिण्याची तहान असते. अज्ञान हरवून ज्ञान संपादन करण्याच्या तहानेविषयी सांगताना लेखिकेने मानसिक व बौद्धिक पातळीवरही आयुष्य समजून घेण्यासाठी तडफडणाऱ्या बुद्धाच्या आयुष्याची आठवण मांडली आहे. सुंदर आयुष्य सोडून ज्ञान संपादन करण्याची थोडयाच भाग्यवंतांची दृष्ट लागावी अशी तहान असते असे त्यांना वाटते. स्वतः अनुभवलेल्या गोष्टींचा उलगडा करताना या लेखात लेखिकेने माणसांना लागून राहिलेल्या इच्छेविषयी सांगितले आहे.

## ६.३.२ स्त्रीविषयक लेख

लेखिकेने स्त्री विश्वाचे प्रकटीकरण आपल्या ललित निबंध लेखनातून केलेले दिसून येते. आपल्या भारतीय हिंदू संस्कृतीतील स्त्रीचे स्थान विशद करताना त्यांनी प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक युगापर्यंतच्या स्त्रीजीवन संघर्षाची दखल आपल्या लेखनातून घेतली

आहे. हे स्त्रीजीवन उलगडण्यासाठी लेखिकेने अनेक कथांमधील स्त्रीच्या आयुष्यातील घटना—प्रसंगांचे विवेचन केले आहे.

**माधवीची गोष्ट—** महाभारतातील नारदाने दुर्योधनाला सांगितलेली गोष्ट वाचल्यानंतर एक बाई म्हणून लेखिकेच्या मनाला झालेल्या यातना त्या सावरू शक्त नाही. त्याचवेळी व्यासाने सांगितलेली शांडिल्याची गोष्ट त्यांच्या मनाला सावरताना दिसते. माधवीची गोष्ट या कथेत माधवी नावाची ययातीची मुलगी गालवाबरोबर लग्न करायला तयार होते. विश्वामित्राने गालवाकडे एक कान काळा असलेले आठशे घोडे गुरूदक्षिणा मागितली होती. गालव गरीब असल्याने त्याला ते देणे शक्य नव्हते म्हणून त्याचा मित्र गरूड त्याला ययातीकडे आणतो. ययाती आपली मुलगी माधवी त्याला देतो. आणि माधवीच्या होणाऱ्या पुत्रावर नातू म्हणून आपला हक्कअसावा अशी अट घालतो. येथे लेखिकेने मुलीला नाकारून वंशाचा दिवा म्हणून पुत्र प्राप्तीची अभिलाषा करणाऱ्या समाज मनावर भाष्य करून माणसाच्या विकृत प्रवृत्तीवर अगुलीनिर्देश केला आहे. विश्वामित्राची गुरूदक्षिणा देण्याकरिता गालवाने माधवीला राजा हर्य श्व दिवोदास, उशीनर अशा राजाना उपभोगण्यासाठी दिली. त्यानंतर उर्वरित दोनशे घोडयाच्या बदलात विश्वमित्रही तिला उपभोगतो. परंतु माधवीनी कुठेच यांना विरोध केलेला कथेत जाणवत नाही. माधवीला त्या सर्वांपासून पुत्र प्राप्ती होते. परंतु शेवटी हे सर्व सोडून गालव तीला परत तिच्या बापाकडे सोपवीतो. त्यावेळी तिचे परत लग्न करण्याचा थाट घातला जातो. परंतु ती वनवास स्वीकारते. हे वाचल्यानंतर लेखिकेला माधवीची करुणा येते. या माधवीचा पुरुषांनी केलेला वापर पाहून लेखिकेच्या मनाला वेदना होताना जाणवतात. लेखिका लिहितात, “माधवीचे हे व्यक्तिगत दुःख माझ्या मनात माझे होऊनच जिवंत झाले. तेव्हा मला माझ्या स्त्रीत्त्वाची लाजच बाजारात उघडयावर मांडली गेल्यासारखे वाटते. मला वाटते की काळाच्या ओघात बाईमाणूस कित्तीही पुढे जगत आले, तरी हे दुःख जराही कमी व्हायचे नाही. तसेच जळते राहील.” (काळोख आणि पाणी, पृ. १३३) या कथेद्वारे लेखिका पुरुषी स्वभावाचे दर्शन घडवतात. एका वस्तूप्रमाणे समाजात स्त्रीचा वापर केला जातो याचे दुःख त्यांना आहे.

याच लेखात लेखिकेने शांडिल्याच्या कथेतून स्त्रीचा अपमान करणाऱ्याला कठोर शासन देणाऱ्या शांडिल्याविषयी अभिमानास्पद शब्द उच्चारले आहे. स्त्री ही शांडिल्यासारखी असावी असेच त्यांना वाटते. गालवाला घेऊन जाणाऱ्या गरूडाच्या मनात माधवीविषयी वाई

ट विचार आणल्यामुळे शांडिल्याने त्या गरूडाला त्याचे पंख छाटून टाकण्याचा दंड दिला. हे वाचल्यावर लेखिकेला धीर येतो. त्या म्हणतात माधवीच्या व्यक्तित्वातून जी माझी शक्ती नष्ट झाली ती आता मला शांडिल्याच्या व्यक्तिमत्वातून परत मिळाली. स्त्रीने पुरुषी स्वभावाला प्रतिकार करावा अशी त्यांची इच्छा या लेखातून व्यक्त झाली आहे.

**नदीकिनारी–** या लेखात लेखिकेने स्त्री धैर्याची ओळख करून दिली आहे. हाल सातवाहनाच्या गाथासप्तशतीतील एका लहानशा गाथेतील स्त्रीने प्रियकराला भेटण्यासाठी पावसाळयात पुरान उसळून वाहणाऱ्या गोदावरी नदी ओलांडण्याचे केलेले साहस लेखात चित्रित केले आहे. रात्रीच्या अंधारात धो धो वाहणाऱ्या नदीपलीकडे जाणाऱ्या स्त्रीकडे पाहून आदिम माणसाचे नदीला स्त्री म्हणून स्वीकारण्यामागे जे भावसंचित आहे ते लेखिकेला पटलेले दिसते. पहिल्यावहिल्या माणसांना 'जीवन देणारी' त्या माणसांसाठी विपुल वनस्पतींत आपल्या पाण्यातून पोसणारी नदी ही स्त्रीसारखीच सजीव पोषक व वत्सल आहे. म्हणून आदिकाळपासून आजवर माणसानी नदीला स्त्रीरूप मानलं असे त्या पटवून सांगताना. या लेखात स्त्री धाडस, स्त्री सामर्थ्याची ओळख करून देत असताना स्त्रीने मनात आणले तर स्त्री कोणत्याही परिस्थितीला धाडसाने तोंड देऊ शकते असा विश्वास लेखिकेला स्त्री मनात रूजवायचा आहे.

**गांधारीचे पहिले लग्न–** या लेखात कृष्णदास दाम्याच्या लोककथेविषयी सहोदर स्पष्टीकरण देताना लेखिकेने समाजात स्त्रीच्या होणाऱ्या विटंबनेवर भाष्य केले आहे. कृष्णदास दाम्याला ही कथा कशी सूचली व का लिहाविशी वाटली याविषयी उत्तर शोधत असताना डॉ. रा. चि. ढेरे यांनी लिहिलेला 'शिवी आणि समाजेतिहास' हा लेख त्यांच्या हाती लागतो. खरं तर गाढव हे लोकपरंपरेत अत्यंत नीच, मूर्ख, लोचट आणि लाचार जनावर मानले जाते. एखाद्याचा अवमान करायचा, त्यांच्या निचतेचा स्पष्ट शब्दात उच्चार करायचा झाला तर गाढवावरून शिवी देण्याची आपली प्राचीन परंपरा आहे. कितीतरी वाक्प्रचार आणि म्हणी गाढवावरून आहे हे लेखिकेला समजते. त्यावेळी त्यांच्या लक्षात येते की लोकपरंपरेने दुर्योधनाच्या दुवर्त नालाही कथेच्या रूपात शिवी दिली आहे. परंतु तिचा संबंध दुर्योधनाच्या जन्माशी लावल्याकारणाने दोष थेट गांधारीकडे जातो. हे पाहून लेखिका लिहितात, "परंपरेने स्त्रीची विटंबना करणाऱ्या पुरुषाला शिवी देतानाही नकळत ती दुसऱ्या स्त्रीच्या विटंबनेचीच दिली."

(काळोख आणि पाणी, पृ. ९०) म्हणजेच लोकपरंपरेने दिलेल्या न्यायाने बाईच्या जातीला तिचा काही अपराध नसतानाही वेदना दिल्या हे स्त्रीचे दुःख मांडण्याकरिता या लेखाचे लिखाण झालेले दिसून येते.

**पाचाची पत्नी–** या लेखात लेखिकेने महाभारतातील द्रौपदी या स्त्रीपात्राच्या माध्यमातून स्त्रीजीवनाची व्यथा व्यक्त केली आहे. पाच पुरुषांशी म्हणजेच पाच पांडवाशी लग्न करणारी ही स्त्री एकश्रेष्ठ पतिव्रता म्हणून तिचा उल्लेख केला जातो. परंतु समाजमनाला हे द्रौपदीचे बहुपतित्त्व मानवणारे नव्हते. तिचे श्रेष्ठत्त्व किंवा ती श्रेष्ठ पतिव्रता आहे ती व्यभिचारी नाही हे सिद्धकरण्यासाठी व्यासाने द्रुपदाला दोन दिव्यकथा सांगितल्या. शाप, उःशाप, वर, अवतार अशा साधनांचा वापर करण्यात आला. परंतु यातून द्रौपदीच्या चारित्र्यावर व्यभिचारी स्त्री म्हणून लागलेला कलंक महाभारतातील माणसे आणि समाजमनातून उतरलेला लेखिकेला दिसला नाही. कारण महाभारतातच कुणी द्रौपदीला उषा मानले आणि द्रौपदीच्या विवाहाने स्वतः द्रुपद, दृष्टयुम्न आदी माणसे अस्वस्थ होताना जाणवली. या द्रौपदीविषयी शोध घेताना लेखिकेच्या हाती कृष्णदास दामा नावाच्या मराठी कवीने रचलेले आदिपर्व येते. पाच पांडवांशी प्रत्येक वेळी लग्न करताना द्रौपदीला अग्निप्रवेश करावा लागतो याचे वर्णन या आदिपर्वात सापडते. ह्या वर्णनाने लेखिका संपूर्ण लेखात अस्वस्थ होताना जाणवतात. लेखिका लिहितात, “द्रौपदीला हे अग्निदिव्य करायला लावण्यामागे परंपरेला वाटलेली तिच्या अशुद्धतेची भीतीच आहे. जणू त्या अग्निस्नानाविना द्रौपदी पाच पांडवांची बायको होती, तर समाजाच्या लेखी ती व्यभिचारीच करती म्हणून समाजाने आपली शुद्धतेची कसोटी तिला लावली आहे. आणि त्या परीक्षेला ती उतरली, म्हणूनच तिचा पाच पांडवांशी विवाह वैध ठरवला आहे.” (काळोख आणि पाणी, पृ. ६१) द्रौपदीने आपली शुद्धत्वाची साक्ष पटविण्यासाठी दिलेली अग्नीपरीक्षा लेखिकेला परंपरेने स्त्रीचा केलेला अपमान वाटतो.

कृष्णदास दाम्याच्या आदिपर्वातील ही कथा द्रौपदीसारख्या अनेक स्त्रियांचा अपमान करणारी कथा वाटली. त्यावेळी लेखिकेला परंपरेने अशा अग्निदिव्य करायला लावलेल्या अनेकस्त्रिया आठवतात. लेखिका लिहितात, “सीतेलाही रावणाघरी राहिल्यावर स्वतःच्या शुद्धत्वाची साक्ष पटविण्यासाठी हेच दिव्य करावे लागले होते. परंपरेने आणखी कितीतरी स्त्रियांच्या अशा दिव्यांच्या कहाण्या आपल्याला सांगितल्या आहे. कुणी तापत्या तेलात उडी घेतली आहे, कुणी

निखाऱ्यावरून चालत गेली आहे. तर कुणी लोखंडाचा तप्त गोळा तळहातावर धरला आहे." (काळोख आणि पाणी, पृ. ६१) पातिव्रत्य सिद्ध करण्यासाठी अशा अनेक स्त्रियांना स्वतःच्या मान अपमानांचा, सुख दुःखाचा प्रतिष्ठेचा सार्वजनिक झाडा द्यावा लागला की जिवापेक्षा स्त्रीचे चारित्र्य मोठे मानणारी ही परंपरा जीवनभर आगीत स्नान करायला लावले तर हया स्त्री जीवनाला कोणी वाली नसणार. स्त्रीत्त्वाचा कुठेतरी अपमान होतो आहे. असे लेखिकेचे म्हणणे आहे. अशा स्त्री जीवनाच्या व्यथा त्यांनी या लेखाद्वारे वाचकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

## ६.३.३ साहित्यविषयक लेख

लेखिका पुस्तकांच्या सहवासात वाढल्याने बालवयातच त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण झाली. त्यांनी कानडी, बंगाली भाषा शिकून घेतल्या होत्या. त्यामुळे मराठीबरोबर अशा इतर भाषांतील साहित्याची त्यांना ओळख झाली. त्यांनी अनेक चांगली पुस्तके वाचून काढली होती. हाताला येईल ते वाचणे अशी त्यांची स्वागतशील वृत्ती आहे. अनेक लेखकांचे साहित्य त्यांनी आवडीने वाचले होते. त्या वाचनात आलेल्या साहित्यावर आधारित कितीतरी लेख लिहिलेले दिसून येतात.

**कविहृदयी महंत—** या लेखात लेखिका समर्थ रामदासांच्या कवित्त्वाविषयी लिहिताना. आपण सर्व सहसा रामदासांना कवी म्हणून संबोधित नाही. त्यांची ओळख नेहमीच दासबोधकार केल्याने त्यांचे श्लोकच आपल्याला अधिक महत्त्वाचे आणि जवळचे वाटतात. मात्र लेखिकेने समर्थांना एक श्रेष्ठ कवी मानला आहे.

"बाळपण मागें गेलें । पुढें तारुण्य आलें ॥

बोलतां चालतारे । वृध्द झाले निमाले ॥" अशा मानवी जीवन एकाच ओवीत गुंफून घेणाऱ्या ओळी लेखिकेला भारावून टाकतात. वाचनात आलेल्या प्रत्येक ओळीचा संदर्भ त्यांच्या लक्षात

येतो. रामदास एक श्रेष्ठ कवी होता हे त्याचे रूप त्यांना कसे भावले हे या लेखातून आपल्याला पाहायला मिळते.

रामदासांच्या विविध कविता लेखिकेसाठी जिवंत अनुभवांची साक्ष होत्या. आणि या कविता पडताळून त्या रामदासांच्या काव्यगुणांचे विवेचन या लेखात करतात.

**चंडीदासाची गीतसृष्टी–** या लेखात बंगालमधील बाऊल गीतांचे महत्त्व विशद झाले आहे. बाऊल गीते बंगाली जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. बंगाली गायकआपल्या बाऊल गीतातून त्यांच्या जयदेवाला आणि त्यांच्या आवडत्या चंडीदासाला आळवत असतात. या बंगाल गीतांवर बंगाली मनाने जीवापाड प्रेम केले आहे. अशा बंगालमधील बाऊल गीतांचे महत्त्व लेखिकेने लेखात उलगडले आहे. चंडीदास हा बाऊल गीतांचा सर्वश्रेष्ठ निर्माता होता. तो एक 'सहजिया' वैष्णव होता. सहजियांची देवत्वाकडे जाण्याची रीत माणूसपणाच्या पूजेतून आहे. माणूस हा सर्वश्रेष्ठ आहे असा त्यांचा गाढ विश्वास आहे. माणसावर दोषगुणासंह प्रेम करणं फार अवघड आहे. पण चंडीदासाने हे तत्त्वज्ञान आचरणात आणले. या लेखात लेखिकेने चंडीदास या बंगाली बाऊल गायकाचे कार्य सांगत असताना 'सहजिया' संप्रदायाची ओळख करून तत्त्वज्ञानही तितक्याच आतुरतेने सांगितले आहे. चंडीदासाच्या गीतांतून लेखिकेला चंडीदास माणूसपण सांभाळणारा वाटला. माणसाला महत्त्व देणारा वाटला. त्यांच्या विचारांना मिळत्या जुळत्या चंडीदासाच्या विचारामुळेच या लेखाची निर्मिती त्यांच्याकडून झाली आहे असे जाणवू लागते.

**कुंतीचा नातू–** या लेखात लेखिकेने ना. मा. पाठकांच्या 'कुंतीचा नातू' या लोककथेत मानवी वृषिकेतूला मिळालेला न्याय आजच्या जीवनात कसा मानवी आणि सहृदय आहे हे पटवून सांगितले आहे. या कथेत पाठकांनी कर्णाचा मुलगा वृषिकेतू युद्धानंतर पांडवासोबत राहतो असे दाखवत असताना कुंतीने अर्जुनाने मांडलेल्या अस्त्रापासून त्याला कसा वाचवला व कर्णा ला न मिळालेला न्याय त्याच्या मुलाला कसा मिळवून दिला हा या कथेचा सार आहे. कर्णाची पत्नी चंपावतीने वृषिकेतूला कुंतीकडे सोडून स्वतःला संपवले होते. या वृषिकेतूला कुंतीने अकरा वर्षे सरंक्षणाच्या पिंजऱ्यात ठेवून ज्यावेळी ती त्याला घेऊन पांडवाकडे जाते त्यावेळी पांडव कर्णाच्या मृत्यूला स्वतःला कारणीभूत ठरवतात. त्यावेळी झालं ते विसरून जाऊ असे

समंजसतेचं बोल वृषिकेतू बोलतो. ही जी वृषिकेतूने दाखवलेली क्षमाशील वृत्ती आहे. ती आजच्या मुलांसाठी महत्त्वाची आणि शिकवण घेण्यासारखी आहे. असे लेखिकेला वाटते. लोकपरंपरेने कुंतीच्या चांगुलपणाची खुण स्वीकारून, कुंतीने आपल्या नातवाला न्याय मिळवून दिला यावर कशी नव्याने गोष्ट घडवली या लोकमनाचा मागोवा लेखिका या लेखात घेताना दिसतात.

**संध्यामेघ—** हा लेख बालकवींच्या कवितेचं सौंदर्य टिपणारा आहे. बालकवींच्या कविता नेहमीच निरागस आणि टवटवीत आहे. त्याचा उत्साह निळया नाचणाऱ्या झऱ्याप्रमाणे मुक्त रूपात आहे. तर त्या कविता अकस्मात येणाऱ्या धुक्यासारख्या न समजण्यासारख्या आहे. असे लेखिका पटवून सांगतात. आपले हरवलेले बालपण प्रत्येक  माणसाच्या मनात कुठेतरी असतातच. परंतु सर्वांना ते प्रकट करता येत नाही. ते बालपण पुन्हा आपल्याला जगता येत नाही हे आपलं सगळयात मोठ दुःख असतं. परंतु लेखिकेला बालकवींची कविता म्हणजे आपल्या दुःखावर मात करणारी जादू वाटते. तीचे वाचन केल्याने वाचकाच्या मनावरची सगळी ओझी कुठल्याकुठे नाहीशी होतात. असा बालकवींच्या कवितेचा विशेष गुण त्यांनी निदर्शनास आणून दिला आहे. मराठी साहित्यात अशा कवितांची सर दुसऱ्या कुणालाच नाही असे बालकवींचे वेगळपण त्यांनी टिपण्याचा प्रयत्न केला आहे.

**दिवसामागून दिवस चालले—** लेखिका ज्यावेळी आशाताईंच्या आवाजातील ‘दिवसामागून दिवस चालले...’ हे माडगूळकरांनी लिहिलेले गीत ऐकतात त्यावेळी त्या गीतातून विरहिणींचं दुःख व्यक्त झाले आहे हे त्यांना जाणवू लागते. या गीतातील भावनेने त्यांना उचंबळून येते. त्यावेळी माडगूळकरांना हे गीत कसे सूचले असेल याचा विचार त्या करताना. अशावेळी त्यांना अनेक लोकगीतेही आठवू लागतात. त्याच वेळी त्यांच्या लक्षात येते की या काव्यप्रकारात बाराहमासातील गीतामध्ये विरहिणीचं दुःख आलेलं असतं. आपल्या प्रियकराची वाट पाहत ती ऋतूवर्णनातून आपले दुःख व्यक्त करत असते. हे जाणून घेतल्यानंतर लेखिकेने विविध प्रदेशातील अनेक लोकगीतांचा शोध घेऊन त्यावर अभ्यास केलेला दिसून येतो.

**कर्णभारातील कर्ण–** या लेखामध्ये लेखिकेने कर्णाची व्यक्तिरेखा मांडताना महाभारतातील कर्णापेक्षा भासाचा कर्ण कसा वेगळा आहे यावर भाष्य केले आहे. कर्णाचं व्यक्तिमत्त्व मेघमंडित आकाशासारखं विशालतेनं भारणारं असलं तरीही तगमग वाढवणारं आहे असे त्यांना वाटते.

या लेखात भासाच्या कर्णाचे वेगळेपण शोधताना महाभारतातील कर्णापेक्षा भासाला भावलेला कर्ण लेखिकेला वेगळा वाटला. महाभारतातील कर्णाप्रमाणे भासाला भावलेला कर्ण अहंकारी नाही. त्याच्या मनात पांडवाविषयी द्वेष तर नाहीच तथा द्रौपदीची अभिलाषाही त्याला नाही. कामापेक्षा त्यागाला आणि जीवापेक्षाही मृत्युला भासाचा कर्ण वाहिलेला जाणवतो.

मूळ महाभारता मधल्या कुंडलाहरण पर्वाच्या तिसऱ्या सर्गातला कवच कुंडलदानाचा प्रसंग भासानं कर्णपर्वातल्या कर्णाच्या अंताच्या कथेला जोडलेला आहे. या प्रसंगाच्या माध्यमातून भासाने कर्णाचे चारित्र्य उज्जवल केलेले दिसून येते. समोर मृत्यू उभा असतानाही जीवनमूल्य अबाधित राखून कर्ण आपले कवचकुंडल सहज दान करताना दिसतो. महाभारतातील अनिष्ट ठरलेली कर्णाच्या प्रतिमेला भासाने आपुलकीनं भारलेलं मन बहाल केलं आहे. भासाच्या अंतःसृष्टीत सदैव नांदणाऱ्या समर्थ कर्णाचे धनगंभीर व्यक्तिमत्त्व आणि महाभारतातील कर्णा पेक्षा भासाला भावलेला वेगळया अशा कर्णाचे व्यक्तिमत्त्व उलगडून दाखवणे हे भासाच्या लेखनाचे वैशिष्टय लेखिकेने या लेखाचे विशद केले आहे.

**फुलवित ये रे पिसारा–** या लेखात लेखिकेने लोकगीतातील मोराच्यावर्णनांवर विवेचन केले आहे. मोर आणि लोकगीत याचा संबंध लेखिका काव्यात्मक भाषेत पटवून देताना दिसतात. ज्या ज्या वेळी लेखिका राजस्थानी लोकगीते ऐकतात त्या त्यावेळी त्यांना त्यांचे शालेय जीवन आठवते. शाळेत असताना पुस्तकांच्या पानात ठेवलेले मोरपीस त्यांना आठवू लागते. अचानक एक लोकगीतांचे पुस्तक चाळत असताना त्यांना त्या पुस्तकात मोरांच्या असंख्य गीतांचा उल्लेख आढळतो. मानव आणि मोर या दोघांच्या संवादात भाषेचे बंधन असले तरी मानवी संवेदनाशी मोराचे नाते जोडलेले पाहून लेखिकेला थक्क झाले.

लोकगीतांतील मोराने मानवाच्या बालवयाशी विशिष्ट स्नेह जोडला याबरोबरच मानवाच्या यौवनावस्थेशी हा मोर मनापासून समरस झालेला दिसतो. यौवनातील प्रेम आणि विरहाची पीडा लोकगीतांमधून ज्याप्रमाणे व्यक्त झालेली आहे तशी इतर कुठेच नाही असे लेखिकेला

वाटते. लोकगीतांमध्ये मोराची आलाली वर्णने पाहून लेखिका लिहितात, “जोवर श्रावण बरसणार आहे. जोवर रेशीमांनी मोर पिसारा फुलणार आहे. आणि जोवर या दृश्याने मानवी मन हर्षभरित होऊन उठणार आहे, तोवर लोकगीतांमधल्या मोराचे नर्तन थांबणार नाही, नित्यनव्या प्रतिमा–प्रतिकांमधून तो प्रतिभेला, मोरपिर्शी स्पर्श घडवीतच राहील. आणि नित्य–नव्याने मोराचे स्वागत सजल नयनांनी मनामनांतून होतच राहील.” (लावण्ययात्रा, पृ. ८२) मोराचा आणि मानवाचा जो संबंध लोकगीतांतून व्यक्त झाला आहे. तो अभ्यासून वाचकांना ते ज्ञात करून देण्याची लेखिकेची भूमिका या लेखात दिसून येते.

**लखलखणारी अग्निरेखा–** भट्टनारायण यांनी केलेल्या ‘वेणीसंहार’ नाटकामध्ये द्रोपदीचे जे वर्णन आले आहे त्यावर हा लेख लिहिला आहे. द्रौपदीच्या वेदना, त्यांचे दृश्य प्रतीक म्हणजेच द्रौपदीचा मोकळा केशसंभार आहे. यावर भट्टनारायणानी हे नाटक लिहिले आहे. द्रौपदीचे मोकळे सोडलेले केस पाहिल्यावर भारतीय युद्धातील अनेक संदर्भ भट्टनारायणाच्या मनामध्ये जागृत होतात. कुरूक्षेत्रावर जो भयानक संहाराला चालना देणारा संदर्भ द्रौपदीच्या केसात रूतलेला दिसून येतो. त्यामधूनच ‘वेणीसंहार’ हे नाटय निर्माण झाले असे लेखिका सांगतात.

भारवींन ‘किरातार्जुनीया’त द्रौपदीला नागीण म्हटलेले आहे. परंतु नागिणीसारखे तिचे रूप किनारार्जुनात पहायला मिळत नाही. मात्र भट्टनारायणाच्या नाटकात नागिणीसारखे रूप दिसते. दौपदी जशी सोशिक वाटते तशीच ती आगी इतकी दाहकही असते. द्युतप्रसंगी द्रौपदी ही नाथवती असूनदेखील ती अनाथ झाली हे तिचे दुःख आहे. यावेळेला लेखिकेला इरावतीबाईंनी द्रौपदीची आणि सीतेची केलेली तुलना आठवते. आपल्या पतींना क्षात्रतेजाचा विसर पडू नये या कारणास्तव द्रौपदीने आपले सर्व सामर्थ्य पणाला लावले त्या तिच्या सामर्थ्याला आगीचे तेज होते. स्त्रीच्या मनस्वीपणाची धार होती. या धारेवर चालायची किमया एकटया भीमानं केली हे भीमाचं वेगळेपण भट्टनारायणाला भावले आणि संपूर्ण नाटकभर भट्टनायकाने भीम–द्रौपदीचे संबंध खेळवित नेले असे मत लेखिकने व्यक्त केले आहे. भीमाने केलेला पराक्रम आणि द्रौपदीचा तडफदार नाटकात जागोजागी आले आहेत. या नाटकात सामान्य स्त्रीप्रमाणे रडणाऱ्या द्रौपदीचे चित्र लेखिकेला विजोड वाटते. नाटकातील द्रौपदी त्यांना दुबळी वाटते. याविषयी लेखिका लिहितात, “व्यासप्रतिभेनं तिचं मोठेपण पेललं, पण भट्टनारायणाची शक्ती मात्र ते पेलायला अपुरी पडली असेल. त्याच्या कल्पनेची भरारी तिच्या

इच्छा—आकांक्षाच्या आभाळापर्यंत पोहोचूच शकली नसेल." (लावण्ययात्रा, पृ. ७३) याकारणावरून लेखिकेला भट्टनारायणाची प्रज्ञा अल्प वाटली. या लेखाचे वाचन केले तर लेखिकेने महाभारताचे, इरावतीबाईंचे मत आणि भट्टनारायणाचे लिखाण यावर चिंतन करून स्वतःची मते मांडलेली दिसून येतात.

## ६.३.४ निसर्गवर्णनपर लेख

लहानपणी लेखिकेच्या वडिलांनी लेखिकेला निसर्गाची सैर घडवली होती. वडिलांसोबत त्यांनी दूर दूरचा प्रवास केला होता. तिथे दिसणारी झाडे, फुलांनी डवरलेली फुलझाडे, एखादी अनोळखी वाट, त्या वाटेची वेडीवाकडी वळणे, उन्हांचे सौंदर्य, मावळत्या सुर्याचे सौंदर्य, चांदण्याने भरलेला आकाश त्याचबरोबर त्यांच्या नेहमीच्या जीवनात त्यांच्या सहवासात येणाऱ्या निसर्गाच्या विविध रूप रंगाचे, क्रीडांविषयीचे त्यांना कुतूहल वाटे. त्या पाहिलेल्या अनुभवलेल्या निसर्गाचे दर्शन त्यांच्या लेखनात होते. पृथ्वीवर होणारे बदल, सृष्टीच्या निर्माणशक्तीमध्ये निसर्गाचे, ऋतूचे असणारे महत्त्व आणि त्याप्रमाणे साजरे होणारे मानवी सण याविषयी लेखन झाले आहे. निसर्गवर्णनपर अनेक लेख लेखिकेने आवर्जून लिहिले आहे.

**शरदाची रूपमाया—** लेखिकेने शरदऋतूच्या वेळी निसर्गात पृथ्वीवर होणाऱ्या बदलाना बारकाईने न्याहाळले आहे. या ऋतूत शुभ्र आणि सोनेरी या दोन रंगांना अती महत्त्व आहे असे त्या सांगतात. शरदात पांढरा रंग फुलांवर असतो. ढगही पांढरे दिसते तसेच या ऋतूत आभाळ चांदण्याने भारलेले असते. हा पांढरा रंग म्हणजे शांतीचा रंग जो शरदात आपल्याला निसर्गात पाहायला मिळतो. दुसरा लाडका रंग सोनेरी. शरद ऋतूत शेत, धान्य पिकलेले असते. हा रंग वैभवाचा आहे. हे दोन्ही रंग सामान्य माणसांच्याही अनुभवाला येतात. शरदात होणारे बदल सामान्य माणसांनाही जाणवतो. या महिन्यात माणसाचे मन शांत समाधानी होते; तरीदेखील माणसे दुःखी असतात. सुखात हसत असताना उचक्ति डोळयात येणाऱ्या पाण्यासारखं हे त्यांचं दुःख असतं. या शरद ऋतूतील बदलांविषयी सांगत असताना मनाला सुखावणाऱ्या शरद ऋतूचे महत्त्व लेखिकेने वर्णिले आहे.

**वसंतनाद–** या लेखात लेखिकेने लहानपणातील आठवण सांगत असताना वसंत ऋतूतील सृष्टीसौंदर्य टिपले आहे. लेखिका व तिची बहिण भेंडयाच्या खेळात 'मेंदूलाही वसंतनाद असतो, तो मागतो मोगरा या' या ग्रेसच्या कवितेच्या ओळी गुणगुणतात. त्यावेळी लेखिकेच्या मनात त्या गाण्याविषयी जिज्ञासा निर्माण होते. त्यांना चाफा आठवतो, रवींद्रनाथ टागोर ते बा. भ. बोरकर यांच्या कवितेपासून सांची भरतच्या शिल्पापर्यंत त्याचे संस्कृतीशी असलेले नाते त्यांना आठवू लागते. त्यातूनच त्यांच्या मनात वसंत ऋतूविषयीचे कुतूहल निर्माण होते. या ऋतूत झाडे फुलांनी भरलेली असतात. गुलमोहर, पळस, पांगारा अशी झाडे या वसंत ऋतूत फुलतात यांची नोंद लेखिकेने लेखात घेतली आहे. हे फुलांचे मनभुलावणारे देखणे रूप पाहून निसर्गाच्या मनातील कोवळया निसर्गभावना या फुलांतून उतू जात आहे अशी भावना लेखात व्यक्त झाली आहे. झाडं फुलांनी भरलेली, पाण्यात कमळ तरंगताहेत, वाऱ्यावर फुलांचा दरवळणारा सुगंध आणि कामिनींच्या मनात बहरलेली प्रणय भावना असे वसंतातील निसर्गाचे सौंदर्य, अतिसुंदर रूप लेखिकेने लेखात टिपले आहे.

**चाफा फुली आला फुलून–** या लेखात लेखिकेने उन्हाळयात फुलणाऱ्या एकमेव चाफ्याच्या झाडाच्या रंगरूपाचे, त्याच्या प्रकृतीचे वर्णन केले आहे. चाफ्याच्या झाडालाच उन्हाळयांच विमनस्क पूर्णपणे माहित आहे असे त्यांना वाटते. एरवी काळया खडबडीत बोथट फांदया पसरून असलेले हे झाड; उन्हाळयाची चाहुल लागताच या झाडाचा रंग बदलतो. त्याचा माथा पिवळसर फुलांनी गच्च भरून जातो. या फुललेल्या झाडाला लेखिकेने शिवाच्या रूपाची उपमा दिली आहे. चाफ्याच्या झाडाची आठवण झाल्यावर त्यांना आपलं बालपणातील चाफ्याच्या झाडाशी मांडलेला खेळ आठवतो. आणि त्यांचे मन प्रफुल्लित होते. चाफ्याच्या झाडावर लिहिलेल्या ज्या कविता आहे त्या कविता त्यांना आठवतात. त्या कविता त्यांनी संदर्भा साठी घेतल्या आहेत. जसे खानोलकरांचे, पु. शि. रेग्यांचे 'चाफ्याची पिवळी पवळण' तसेच कवी 'बी' ने लिहिलेले गाणे 'चाफा बोलेना, चाफा चालेना'. या कवितेत जे चाफ्याचे वर्णन आले आहे त्यांचे स्पष्टीकरण लेखात दिले आहे. एकूण लेखात उन्हाळयात मन सुखावणारे हे चाफ्याचे झाड या झाडाचे वैभव किंवा सौंदर्य रेखाटले आहे.

**जाई–जुई–** या लेखात जाईजुईच्या फुलांचे गुणधर्म सांगितले आहे. जाईजुईच्या फुलांचे वर्ण न करण्यासाठी लेखिकेने कवी ग्रेस, कुसुमाग्रज अशा कवींनी केलेल्या कवितांचा संदर्भ दिला

आहे. जाईजुईच्या झाडाचे पाकळयांचे वर्णन त्यांनी बारकाईने केलेले दिसते. चमेलीचा फुलण्याचा देखणा आवेग आणि त्यांचा गोड धुंद करणारा वास यांचं नातं प्रणयाचा उत्कट धुंदीशी जुळवणे त्यांना योग्य वाटते. या फुलाची कोवळीक लेखात व्यक्त झाली आहे. ती नाजूक शुभ्र कोवळी फुलं त्या झाडांवर उगवलेली पाहून त्यांच्या मनाला होणारा आनंद लेखातही तितक्याच प्रतिने व्यक्त झाला आहे. निसर्गातील बारीख नाजूक गोष्टीकडे त्यांचे लक्ष आहे. या लेखात निसर्गाचे वेगवेगळया वेळी बदलणारं रूप जाईजुईच्या रूपाने रेखाटले आहे. रात्री निवांत प्रहराच्यावेळी उमलणारी जाईजुईची फुलं पाहिल्यावर जो आनंद मनाला होता त्यांचे वर्णन करताच येत नाही असे या फुलांचे निराळे सौंदर्य लेखात आविष्कृत झाले आहे.

**जगाचा जन्मोत्सव—** आपल्या दिव्य सृष्टीची निर्मितीविषयी आणि हे अखंड फिरणारे चक्र कुणी निर्माण केलं व ते कुठवर फिरत राहणार याचा शोध घेण्याचा प्रयत्न पूर्ववत चालू आहे. पण याचं स्पष्ट उत्तर आजवर कुणाला मिळालेलं नाही. मात्र प्राचीन माणसाने एका वेगळया पातळीवर या प्रश्नांचा शोध घेऊन अन्वयार्थ लावला. याविषयी विवेचन या लेखात आले आहे. लेखिकेने येथे प्राचीन माणसाच्या तर्कबुद्धीचा जयजयकार केला आहे. प्राचीन माणसाने निसर्ग व मानवाचे शोधलेले नाते लेखिका येथे स्पष्ट करतात.

आधीम मानवाने गुढी पाडवा हा नव वर्षाचा प्रारंभ मानला. चैत्राचा हा पहिला दिवस. या दिवशी सूर्य राशिचक्रातील प्रथम राशीत पुनः प्रवेश करतो. हा दिवस अत्यंत अर्थपूर्ण विधीनं साजरा केला जातो. ही मानवाने मानलेली या दिवशीची निर्मितीची पूजा लेखिकेला अर्थपूर्ण वाटते. हा चैत्राचा काळ आहे. त्याची ओळख पटण्याची खुण प्राचीन मानवाने जपून ठेवली आणि ती आजवर मानली जाते. आपल्या धर्मातील पाडव्याच्या दिवसाचे महत्त्व सांगणाऱ्या अनेक कथा या लेखात उलगडल्या आहे. या गुढी पाडव्याला लागून राहिलेल्या संकल्पनाही लेखात नोंदवल्या आहेत. असा हा उत्सव म्हणजे मृत्यूवर मात करणारा उत्सव, म्हणून पाडव्याची गुढी ही जीवनाची गुढी मानली जाते. अशा काही संकल्पना व अर्थपूर्ण संदर्भाचा स्वीकार केलेला आहे. याचा उलगडा करताना लेखिकेने उत्पत्ती, स्थिती व लय यांचे या उत्सवातील महत्त्व या लेखात नमूद केले आहे.

**निर्माणशक्तीची पूजा—** आश्विन महिन्यामध्ये होणारे सृष्टीतील बदलांकडे सर्वसामान्य माणसाचे लक्ष नसते. मात्र लेखिका हे बदल अगदी बारकाईने न्याहाळताना दिसतात. आश्विन महिन्यातील निसर्गाच्या निर्मितीचे मनभुलावणारं दर्शन या लेखात घडवतात. हे सौंदर्य पाहायला माणसाला शहर सोडून गावाकडे जाणे त्यांना गरजेचे वाटते.

नवनिर्माणशक्तीचा उत्सव म्हणजे आपण साजरा करतो तो घटस्थापनेचा सण. या सणाचा विधी लेखिकेला प्रतिकात्मक वाटतो. नवरात्रामध्ये स्थापला जाणारा घट हा आपल्या मातृदेवतेच्या गर्भाशयाचे प्रतीक आहे. माणसांच्या गर्भातून जन्माला येणाऱ्या जीवाचं ज्या पद्धतीने स्वागत होत असते; तसेच स्वागत आपण नवरात्राच्या सणाने सृष्टीच्या निर्मितीचे करतो. प्राचीन मानवाने घट रूपाने आपल्या भूमीची कूस पूजली. त्यात बीज रोवलं आणि नऊ दिवसाचा नवरात्रांच्या सणाने नव्या अंकुराचे स्वागत केले. या लेखात लेखिकेने निसर्गा चे नियम, मानवी सण आणि निर्मितीशक्तीचे महत्त्व पटवून दिले आहे.

## ६.३.५ प्रवासवर्णनपर लेख

अरुणा ढेरे यांनी देशपरदेशात भटकंती केली आहे. विविध कारणाने केलेल्या प्रवासावेळी आलेले अनुभव, तिथे पाहण्यात आलेल्या स्थळ प्रदेशांच्या आठवणी सांगणारे त्यांचे स्वतंत्र लेखसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

**एक निर्जन नगरात—** या लेखात मानव करत असलेल्या सर्जकशक्तीच्या पूजेविषयी लेखन झाले आहे. दक्षिण भागात अनेक ठिकाणी लेखिकेने आदिशक्तीची कित्येक रूपं पूजलेली पाहिली होती. चितापूर येथे नागवेलांबेला रेणुका म्हणजेच यल्लमाची मूर्ती पूजलेली दिसते. परंतु ती रेणुकेसारखी दिसत नव्हती. तिच्या शेजारी भैरवमूर्ती आणि नागयुगुल व पुढे दोन पाण्याने भरलेले कुंडं पाहायला मिळतात. त्यावेळी त्यांना जळरूपात पाहिलेली नेपाळमध्ये काठमांडूतली देवी भगवती आणि आसाममधील जळरूपातील कामांख्या आठवते. त्यावरून पाणी म्हणजेच सर्जनाचं आदिप्रतीक, पाणी हेच खरं देवीचं मूळ रूप आहे असा शोध लेखिका घेताना दिसतात.

या मंदिराच्या परिसरात मंदिराभोवती प्राचीन अवशेषांना पाहिल्यावर हा बिनमाणसांचा गाव कसा बनला आणि हे सगळं इथं दिसणारं प्राचीन संस्कृतीच्या गाथ्यातलं अर्थसंचित उलगडणारं मंदिर आहे असे लेखिकेला वाटते. हा सगळा प्रदेश सर्जक शक्तीच्या पूजेचा प्रदेश आहे असे त्या सांगतात. प्राचीन माणसानं पृथ्वीचे सर्वच सर्जनाचे आविष्कार पवित्र मानले आणि आदिशक्तींची पूजा माणसांनी अशा कमलयोनीच्या माध्यमातून केली हे सांगण्याच्या हेतुने हा लेख निर्माण झाला असे म्हणता येईल.

**कालिंजरच्या परिसरात–** लेखिकेने उत्तर प्रदेशातील कालिंजरच्या परिसराला भेट दिली. तिथे जपून ठेवलेले पुरातन संस्कृतीचे सौंदर्य, हिरव्यागार वनश्रीने वेडलेले परिसर, अधेमधे वाहणारे निर्झर, असा सुखावणारा अजून पर्यटकांनी गढूळ न केलेला परिसर पाहिल्यावर लेखिका तो परिसर शुद्ध असल्याची साक्ष पटवते.

कालिंजर या स्थानाला प्राचीन भारताच्या धार्मिक इतिहासात महत्त्वाचं स्थान आहे. या परिसरात कित्येक शतकांपूर्वी ऋषी–महर्षी वास करत होते. असं सांगितलं जातं की श्रीरामही अज्ञात वासाच्या काळात आपल्या राणीसह इथं राहून गेला होता. कालिंजर हे प्रसिद्ध आणि जाज्वल्य असं शिवक्षेत्र आहे. अशा कालिंजर या स्थानाचे महत्त्व लेखात विशद झाले आहे.

कालिंजरच्या परिसरात दिसणाऱ्या शिल्पाविषयी लेखिका आवर्जून लिहितात. या परिसरातील शिल्प पाहिल्यावर त्यांना खजुराहोमध्ये पाहिलेल्या शिल्पांची आठवण होते. परंतु इथली शिल्प त्यांना सगळयाहून वेगळी वाटली. आईबाळाच्या नात्यातला जिव्हाळा भरून असणारी ही शिल्पे आहे असे त्या सांगतात. याच परिसरात त्यांना इंग्रजानी फितुरी करून जिंकलेला भारतातला सर्वात उंच असा किल्ला पाहायला मिळाला. हा किल्ला मुदपाक खात्यातल्या आचाऱ्यांशी संधान बांधून इंग्रजांनी विश्वासघात करून मिळविला होता. आणि इथल्या शुद्र स्वयंपाक्यानी कवडीमोलानं तो कसा विटून टाकला यांची आठवण त्यांना अस्वस्थ करते. कालिंजर निसर्गसौंदर्याने नटलेला परिसर, तेथिल सर्वाहून निराळी शिल्पं आणि तिथे घडलेल्या इतिहासाविषयी लेखिका या लेखात सांगताना दिसतात.

**अनेपेक्षित देणं–** दक्षिण भारताच्या प्रवासात मंदिरसौंदर्य, त्या मंदिरावर आदी काळापासून कोरलेल्या शिल्पसौंदर्य तसेच तेथिल निसर्गसौंदर्य व प्राचीन मानवाच्या संस्कृतीचा शोध

लेखिका या लेखात घेताना दिसतात. दक्षिण प्रवासावेळी त्या नागरकोईल गावातील नाग मंदिर, कन्याकुमारीच्या वाटेत भेटणाऱ्या शुचिन्द्रमचा मंदिरसमूहला भेट दिल्यावर या मंदिराचे सौंदर्य, त्या मंदिराच्या परिसरातील निसर्गसौंदर्य, तेथिल माणसाची शिवावर असलेली श्रद्धा त्या बारकाईने न्याहाळतात. परंतु प्रत्येक मंदिर पाहताना त्यांनी त्या देवाच्या श्रद्धेपेक्षा मंदिर सौंदर्य व देवळातील देवाचे मूल्य शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

गावाला 'शुचिन्द्रम्' हे नाव कसे मिळाले याचा शोध घेऊन लेखिकेने लेखात त्याविषयी पुराकथा सांगितली आहे. अहिल्येला इंद्राने फसवल्याकारणाने अहिल्येने इंद्राला शाप दिला. इंद्राने शिवाकडे शापमुक्त होण्याकरिता उपाय विचारला त्यावेळी शिवाने त्याला या गावात येऊन तपश्चर्या करायला लावली आणि शापातून मुक्ती मिळविली. इंद्राच्या शूचित्त्वाला कारण झालेलं हे स्थळ 'शुचिन्द्रम्' या नावाने आज प्रसिद्ध आहे. या पुराकथेच्या आधारावर शूचिन्द्रम् या गावाचे गुपीत लेखात मांडले गेले आहे. अशा द्रविडी भागातील भेट दिलेल्या प्रत्येक मंदिराच्या उदयाची, निर्मितीची माहिती पुराकथांचा शोध घेऊन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शूचिन्द्रमला असलेल्या निरनिराळया पद्धतीचे मंडप, स्त्रीरूपाने असलेल्या गणपतीच्या दुर्मिळ शिल्पाविषयीची पुराकथा लेखिका लेखात सांगतात.

पालू दक्षिण भागात शिवा सोबत त्याच परिसरात असलेल्या नागाच्या मंदिराचे वर्णन करत असताना या द्रविड भूमी स्थापलेल्या नागमंदिराविषयी लोककथाही लेखिका स्पष्ट करताना दिसतात. या लेखात त्यांनी दक्षिण भारतात माणसाच्या जीवनाला लागलेली शिवतत्त्वाची ओढ स्पष्ट करत असताना दक्षिण भारताच्या संस्कृतीचा शोध घेतला आहे. अशा वेगवेगळया दक्षिण भागातील मंदिराना भेटी दिल्यावर इतर भारताच्या भागात कधी न पाहिलेल्या गोष्टी पाहून त्याविषयी जाणून घेत असताना त्यांना निसर्गाकडून, त्या माणसांकडून पुष्कळ काही मिळाले. आपले आयुष्य सुंदर आहे असं मनात वाटायला लावणारं हे ज्ञान, प्रवासातील देणं हे अनपेक्षीत मिळालेलंच देणं असतं असे लेखिकेला वाटते.

**अखंड तेवणारा दिवा—** लेखिकेने 'माझी साक्ष' हे पंडित रमाबाईचे आत्मचरित्र वाचले होते. त्यात उडुपीला माध्वचार्यांनी उभारलेल्या परंपरेच्या आदिकेंद्राविषयी वाचल्यावर त्यांना उडुपीला जाण्याची इच्छा होते. नंतर काही दिवसांनी त्या उडुपीला जातात. उडुपीच्या कृष्ण

मंदिराला पाहिल्यावर त्यांना माध्वचार्यांविषयी आणि कृष्ण मंदिराविषयी इतिहास आठवू लागतो. त्याद्वारे त्यांनी उडुपी या गावाचे नाव शिव महेशावरून कसे पडले याविषयी कथा सांगितली आहे.

उडुपीमध्ये असलेली चंद्रमौलिश्वर आणि अनंतेश्वराची शिवाची मंदिरे पाहिल्यावर उडुपीत प्राचीन काळापासून शिवसंप्रदाय होता हे स्पष्ट करतात. त्यानंतर माध्वचार्यांनी कृष्णाच्या स्थापनेने वैष्णव परंपरेचे वाढीस लावलेले महात्म्य, शैवकेंद्री उपासनेला मागे सारून जी वैष्णवभक्तीची परंपरा माध्वमठाच्या विध्वत्तेच्या आश्रयाने सगळीकडे पसरली आणि आजही माध्व उपासनेची कीर्ती दक्षिण भारतात गाजत आहे याचा उलगडा लेखिका लेखात करतात दिसतात. त्याचप्रमाणे कनकदास हा माध्व परंपरेतला मोठा भक्त होता. तो अस्पृश्य असल्याने मंदिरात त्याला प्रवेश नव्हता. अपार भक्ती त्याच्यापाशी होती. त्याच्या भक्तीचे सत्त्व जाणून घेऊन कृष्ण त्याला दर्शन देण्याकरिता पश्चिमाभिमुख झाला. पश्चिमेकडच्या भिंतीला लहानसं खिंडार पडलं. तेव्हापासून देव पश्चिमेकडे वळून उभा आहे. आणि त्या खिडकीसमोर बाहेर कनकदासाचा पुतळाही आहे. ते पाहून लेखिकेला चोखोबाची आठवण होते. चोखोबा आणि कनकदास या दोघांच्या जातीचे आणि त्यांच्या अपार भक्तीचे साम्य लेखिकेला जाणवू लागते. याच परिसरात पेजावाच्या मठामध्ये लेखिकेला विट्ठलाची मूर्ती दिसते. त्यावेळी लेखिकेचे मन आतून सुखावते. माध्वचार्यांनी आपल्या चार धर्मकेंद्रांमधलं एक केंद्र म्हणून पंढरपूरला मान दिला. पंढरपूरचा विट्ठल आज उडुपीच्या कृष्णाशी नातं सांगतो. वर वर आपल्याला भिन्नता जाणवली तरी माणसाच्या आंतरिकएक्तेची खूण सगळीकडे सारखीच असते. असे लेखिकेला सांगायचे आहे.

माध्वचार्यांनी घालून दिलेल्या भक्तिचा दिवा आजही कर्नाटकात अखंड तेवत आहे. काळ लोटला तरी आजही माध्वचार्यांची आठवण उडुपीत आहे असेच लेखिकेला वाटते. या लेखात त्यांनी उडपीच्या मंदिर परिसराचे सूक्ष्मरित्या वर्णन केले आहे.

**खजुराहो–** या लेखात लेखिका दिल्लीपासून सुमारे सहाशे क्लिोमिटरवर लोक आणि अभिजात यांचा संघर्ष दुबळया स्वरूपात चालू असणाऱ्या मध्यप्रदेशातल्या खजुराहो गावाविषयी सांगताना. खजुराहोला जातात त्यावेळी खजुराहोमध्ये असलेल्या कंडारिया,

महादेव, लक्ष्मण आणि जगदंबा या मंदिरावर असलेली शृंगारशिल्पे, कामशिल्पं पर्यटकांची मने कशी गुंतवून ठेवतात याविषयी लिहितात. या खजुराहो गावाला जागतिक पातळीवर सांस्कृतिक संचिताचे स्थळ म्हणून युनेस्कोने मान्यता दिली आहे. या गावातील शिल्प सुंदर आहे. परंतु मंदिरावर अशी प्रणयशिल्प पाहून त्या आश्चर्यचकित होताना जाणवतात. ही कामशिल्प पहायला दरवर्षी तिथे अफाट लोकांची गर्दी होते; असे सांगून त्यांनी माणसाच्या प्रवृत्तीवर अंगुलीनिर्देश केला आहे. लेखिका लिहितात, "योग आणि भोग यांचा असा संगम आपल्या संस्कृतीत खरं तर असंख्य वेळा, असंख्य तऱ्हांनी केलेला इथे त्यांचं एक सर्वांगी डवरलेलं दर्शन. जीवनाची आदिप्रेरणा एका रसरशीत मस्तीनं मिरवलेली देहाचं देऊन ज्या सर्जनाच्या ओढीनं भरून जातं, ज्या कामाग्रीनं उजळतो. आतला गाभारा त्या सनातन प्राकृतिक भावनेचं अगदी थेट निखळ दर्शन." (वेगळी माती, वेगळा वास, पृ. ९९) योग आणि भोग यांचा संगम आपल्या भारतीय संस्कृतीन शिल्पामधून कसा व्यक्त होत आहे. हे लेखिकेने या लेखातून पटवून दिले आहे.

**रूपोत्सव—** या लेखात लेखिकेने हिमालयातील नैनीताल, अल्मोरा आणि कौसवी अशा नयनरम्य स्थळांना भेट दिल्यावर त्यांच्या मनात आलेले विचार व्यक्त केले आहे. नैनीताल पाहिल्यावर त्यांना पूर्वजांनी या स्थळाला गौरीचं माहेर, शिव—पार्वतीच्या विवाहाचं स्थळ का म्हटले आहे हे संदर्भ आठवतात. येथील सौंदर्याला त्यांनी स्वर्गाची उपमा का दिली हे लक्षात येते. ज्या ठिकाणी आपण काही पाहण्याच्या इच्छेने जातो त्यावेळी आपल्याला तेथिल स्थानिक लोकांचे खरे जीवन, त्यांचे दुःख, अडचणी समजत नाही. परंतु नैनीतालमध्ये एखाद्या गारूडी आणि होडीवाल्याला भेटल्यावर लेखिकेला मात्र या लोकांचे दुखणे, त्यांचा आक्रोश ऐकू येतो. त्यांच्या मनात तो आवाज शेवटपर्यंत भरून राहतो.

लेखिकेला अल्मोरा परिसरातले पावसाचे उग्र भयंकर रूप पाहून मरणाची भीती काय असते याची जाणीव होते. विशाल भीषण रूप धारण केलेल्या निसर्गापुढे माणसू किती क्षुद्र व हतबल आहे याची जाणीव त्यांनी या लेखात करून दिली आहे. याच स्थळी स्वामी विवेकानंद मानवी चेतना राहिली होती याची आठवण झाल्यावर अल्मोरा हे गाव चेतनेचं दुसरं नाव आहे असे वाटू लागते.

याच लेखात लेखिकेने कौसानीचे सौंदर्यही चित्रित केले आहे. गांधीजीसारखा शांतीची उपासना करणारा माणूस आणि दुसरा पंत कवितेत प्रसाद शोधणारा माणूस या दोन्हीं थोर माणसांनी इथे मुक्काम केला होता. परंतु या दोघांच्या मनात जे हिमालयानं निर्माण केलं त्याची कौसानी साक्षी आहे. योग आणि भोगाचा मळा घालण्याची किमया या कौसानीच्या हृदयात आहे. असे लेखिकेचे मत लेखात व्यक्त झाले आहे.

**आग्र्याच्या किल्यातून–** हा लेख लेखिकेच्या यमुना नदी पाहण्याच्या इच्छेतून निर्माण झाला आहे. त्यांना यमुना नदी पाहण्याची इच्छा होती. ती पाहण्याकरिता गेल्यावर यमुनेचे कोरडे पात्र पाहून त्यांचे मन खिन्न होते. या नदीने भरपूर काही सोसले, कृष्णाचे बालपण पदरात घेतले, मोगल राज्यामध्ये मुगल साम्राज्याचे विलास, वैभव याबरोबर सत्तेचा माज असलेला आणि साम्राज्य विस्तारासाठी केलेले युद्धही पाहिले. इत्यादी प्राचीन संदर्भ त्यांच्या मनात जीवंत होतात. त्यामुळे हा आग्राचा किल्ला त्यांना यमुना नदीच्या मनाची दुखरी जागा वाटते. या आग्राच्या किल्यातील 'मीनाबाजार', त्या बाजारात स्त्रियांना फसवून लुटणारा अकबर याला प्रत्यक्ष यमुना नदी साक्षी आहे. त्यामुळे लेखिकेने या लेखात यमुनेला करुणेची नदी म्हणून संबोधले आहे.

## ६.२.६ व्यक्तिचित्रणपर लेख

लेखिकेने विविध क्षेत्रातील, वाचनात आलेली त्याचबरोबर वेगवेगळया ठिकाणी प्रवासात भेटलेल्या व्यक्तींची चित्रणे केली आहे. ज्या माणसांनी आपल्या मेहनतीच्या बळावर यशाचे शिकर गाठले, जी माणसे त्यांना श्रेष्ठ वाटली अशा आदरणीय माणसांवर लेखन झाले आहे.

### साहित्य क्षेत्रातील व्यक्तीचे चित्रण

**पुण्याचा पुराणपुरुष–** अखंड स्पंदन पावणारी वाङ्मयीन उर्जा असलेले द. वा. पोतदार यांचे वर्णन या लेखात केले आहे. पोतदार हे ललित साहित्यिक नसूनही, लोकमनाची घडण करण्याचे पोतदाराचे कार्य लेखिकेला चकित करणारे ठरले आहे. आणि त्यातून हे व्यक्तिचित्रण

निर्माण झाले. प्रांजळपणा, एकप्रकारचा उत्साह, अभ्यासाची तयारी, चिकाटी व बुद्धीची क्षमता असलेले पोतदारांचे व्यक्तिमत्त्व लेखिकेने लेखात चित्रित केले आहे.

मराठी वाङ्मय ज्या सामाजिक मनोभूमीत निर्माण होते त्या भूमीची निर्मिती क्षमता वाढवण्यासाठी पोतदार यांनी कसे कष्ट घेतले याविषयी लेखिका संपूर्ण लेखात विवेचन करताना दिसतात. भाषेच्या अस्मितेची जोपासना करण्याचा त्यांचा प्रयत्न, महाराष्ट्राला 'सकलविद्याकलासंपन्न' करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेचा त्यांचा आग्रह, ग्रंथालयाची गरज समजून त्यांच्या स्वरूपाचा केलेला विचार, सर्व प्रकारचे विचार समाजात पोहचवण्याकरिता प्रसारमाध्यमांना केलेलं सहाय्यं तसेच शासनानं स्वातंत्र्याला पोषक वातावरण निर्माण करावं याविषयी पोतदारांनी आग्रहपूर्वक मांडलेल्या विचारसरणीचा गौरव या लेखात झाला आहे.

**भेट—निसटलेल्या काळाशी—** या लेखाद्वारे लेखिका य. न. केळकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा अत्मीयतेने शोध घेताना दिसतात. यशवंत केळकरांचे कवी व्यक्तित्त्व घडवण्यामागे त्यांचे वडील तात्यासाहेब केळकरांचा मोठा वाटा असल्याचे त्या स्पष्ट करतात. त्यांच्या घरातील उत्तम ग्रंथसंग्रह, त्यांच्या घरात सतत ये जा करणारे विद्वान पाहुणे तसेच उत्तम व्याख्यान व ज्ञानाची उपजत लालसा यामुळे यशवंत आधी ग्रंथप्रेमी व नंतर ग्रंथकर्ते झाले. अशी त्यांची लेखक होण्यामागील प्रेरणेविषयी लेखन झाले आहे.

**पुस्तकांवर प्रेम—** गरीब परिस्थिती, परभरणीसारख्या आड गावात घरी व्यावहारिक उपासमार सोसत असतानाही मराठवाडयातील रघुनाथराव कुलकर्णी उर्फ बी. रघुनाथांचे पुस्तकांचे वेड येथे निदर्शनास आणून दिले आहे. खडतर आयुष्य जगत असताना अखेरपर्यंत वाचन आणि कविता यांची साथ न सोडणाऱ्या माणसाची पुस्तकांवरची ओढ स्पष्ट करण्यासाठी त्यांचे उद्गार लेखिकेने लेखात नमूद केले आहे. बी रघुनाथ म्हणतात, "आयुष्याच्या शेवटच्या जंक्शनवरून निघताना जीवनाच्या सूत्रधाराने थोडे जरी ओझे बरोबर नेण्याची परवानगी दिली, तर माझ्याजवळ सुंदर पुस्तकांचे, एक गाठोडे खात्रीने राहीलच राहील."(माणूस आणि माती, पृ. ३०) 'साहित्य माणसाला जगवते' या उद्गारांना आपल्या जगण्यातून सिद्ध करणारे बी. रघुनाथ लेखिकेने लेखातून उभे केले आहे.

**रूद्रास आव्हाहन–** कवी भा. रा. तांबे यांच्यापाशी असलेले शब्द सामर्थ्य आणि त्या शब्दांचे आणि संगीताचे मर्मज्ञ होते अशी त्यांची ओळख लेखातून करून दिली आहे. पुण्याला झालेल्या साहित्य संमेलनाच्या वेळी कविसंमेलनात सभागृहातील प्रेक्षकांना तांबे यांनी आपल्या गायनाने कसे थक्क केले याची आठवण लेखिकेने या लेखात सांगितली आहे.

## संगीत क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे

**पूर्वजांनी दिलेली दौलत–** या लेखात लेखिकेने अल्लदियाखाँ यांच्या गायनाविषयी सांगत असताना माणूस म्हणूनही ते किती थोर व श्रेष्ठ होते हे सांगितले आहे. ते प्रज्ञा व प्रतिभा असणारे गायक होते. त्यांच्या गायनाने श्रोत्यांच्या अंगावर रोमांच व डोळयात आनंदाचे अश्रु उभे राहत. एकदा अलवार संस्थानच्या महाराजांनी त्यांना एक गाव इनाम दिले होते. परंतु त्यांनी हा गाव इनाम म्हणून घेण्यास नकार दिला होता. त्यांचे म्हणणे होते की गायकाला गाव काय कामाचा? विद्येचा गौरव त्यांना महत्त्वाचा वाटत होता. धनधौलतीची हाव कधी त्यांनी धरली नाही. म्हणून आजपर्यंत आपल्या घराण्यामध्ये गाणे टिकून राहिले असे ते म्हणत होते. घराण्यातून मिळालेल्या गायीकीला त्यांने मान दिला. धनदौलतीची आस त्यांनी कधी बाळगली नाही. त्यांच्या या वृत्तीचे मोठेपणे लेखिकेने या लेखात विशद केले आहे.

## कला क्षेत्रातील व्यक्तिचित्रण

**सांस्कृतिक संचिताचा साक्षात्कार–** आपल्या चित्रकलेतून भारतीयांच्या सांस्कृतिक संचिताचा साक्षात्कार घडवणारा श्रेष्ठ चित्रकार रवि वर्मा या कलाकाराविषयी लेखिका या लेखात लिहितात. रंगाचे आणि रेषांचे सूक्ष्म ज्ञान आणि त्या ज्ञानाचा वापर करण्याचे कौशल्य त्यांच्यापाशी होते. त्याचबरोबर एकाग्रता, कष्ट आणि निष्ठा यांच्याजोडीने त्यांच्यापाशी प्रतिभाही होती. त्यामुळे आजही भारतीयांच्या मनात राहणारा आणि भारतीयांच्या अभिमान उंचावणारा मोठा चित्रकार अशी त्यांची आठवण ताजी टवटवीत आहे असे लेखिका लेखात सांगतात.

## संपादकाचे व्यक्तिचित्रण

**ध्येयनिष्ठ संपादक–** स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात राजकीय आणि सामाजिक जागृतीसाठी भाऊसाहेब सोमण यांनी वर्तमानपत्र सुरू केले. त्या वर्तमानपत्रात पुस्तक परिक्षणासाठी वेगळे सदर असे. त्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या चरित्राचे परीक्षण छापून आणले. परीक्षण करत्याचे नाव मात्र सदरात छापले जात नसून नुसते प्रेषित म्हणून तो लेख प्रसिद्ध होत असत. त्यामुळे सरकारला नाव शोधण्यास कठीण झाले. त्यावेळी सरकारने नाव मिळवण्यासाठी सोमणला अटक केली. परंतु सोमण हे इतके ध्येयनिष्ठ होते की त्यांनी सर्व स्वी त्या लेखाची जबाबदारी स्वतःवर घेऊन शेवटपर्यंत नाव सांगितले नाही. असे संपादक आज सापडणे लेखिकेला दुर्मिळ वाटते. त्यामुळे या भाऊसाहेब सोमणाचा गौरव लेखिकेने या प्रसंगाद्वारे केलेला दिसून येतो.

## समाज सुधारकांची चित्रणे

**कर्ता सुधारक–** कोकणातल्या मुरूडसारख्या गावात राहणारे रामभाऊ जोशी यांनी केलेल्या कार्याचा आढावा या लेखात घेतला आहे. वामनराव मोडकांच्या सहवासात राहिल्याने त्यांच्यात सुधारकी वृत्ती रूजली. त्यांनी विधवा विवाहाला नकार असतानाही आपल्या धाकट्या बहिणीचा १८९१ मध्ये पूर्नविवाह केला. त्यामुळे त्यांच्या घरच्याना आणि त्यांना भयंकर त्रास सोसावे लागले. त्यांवर बहिष्कार घातला जाईल हे माहिती असूनही त्यांनी बहिणीचे पूर्न विवाह करण्याचे धाडस पतकरले. त्यांच्या कार्याने अनेक विधवांना धैय आणि जगण्याचा नवा दिलासा मिळाला हे त्यांचे कार्य लेखिकेला श्रेष्ठ वाटले. त्यांनी केलेल्या धाडसाला लेखिकेने या लेखाद्वारे सलाम केलेला दिसून येतो.

**सृष्टीशी एकरूपता–** या लेखात लेखिकेने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची सहनशीलता, त्यांच्यापाशी असलेली सोशीकवृत्ती, त्यांचा शांत स्वभाव, जीवनाच्या खडतर वाटचालीत देखील न कोमेजणारी त्यांची रसिकता याचे दर्शन घडवले आहे. येरवडा कारागृहात कायदेभंगाच्या कारणाने कैद असताना स्वतःच्या कुटुंबाची आठवण त्यांनी त्यांच्या खोलीपुढच्या अंगणातील तीन झाडांना पत्नी, सुन आणि बहिण मानून दिवस घालवले होते.

निसर्गाच्या सहवासात त्यांनी घरचे सुख मानून तो काळ जगण्याचा प्रयत्न केला. असा सृष्टीशी साधलेला सहवास, तिच्याशी एकरूप झालेले शिंदे यांचे मन लेखिकेने निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखात त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श आपल्याला होत राहतो.

**वेगळा संस्थानिक –** या लेखात लेखिकेने इंचलकरंजीचे नारायणाराव गोविंदराव उर्फ बाबासाहेब घोरपडे यांच्या ठायी असलेली समाज कल्याणाच्या जाणिवेची ओळख करून दिली आहे. ते शिक्षणप्रेमी तसेच कलाप्रेमी होते. समाज कल्याणाचा विचार त्यांच्या ठायी भींतीवरील न्यायमूर्ती रानडेमुळे रूजला असे ते म्हणत असत. रानडे फोटोतून त्यांच्याकडे सतत पाहत आहे असे त्यांना वाटायचे. या त्यांच्या वृत्तीमुळे भारत इतिहास संशोधन मंडळ, वाईची प्राज्ञ पाठशाळा, वैदिक संशोधन मंडळ, अनाथ विद्यार्थी गृह, अनाथ बालिकाश्रम, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज अशा संस्था घोरपडे यांच्या मदतीने उभ्या राहू शकल्या असे लेखिकेला वाटते. अशी घोरपडेसारखी वृत्ती किंवा त्यांच्यासारखा विचार करण्याची वृत्ती आज सार्वजनिक जीवनात उभे असलेले महापुरुषांचे पुतळे भिंतीवर असलेली तसबिरी पाहत आहे असे लेखिका सांगतात. प्रत्येकाने घोरपडेंसारखा विचार करावा आणि समाजहित पहावे. मदतीचा हात पुढे करावा हेच या लेखाद्वारे लेखिकेला सांगायचं आहे.

**जगावेगळी माणुसकी–** या लेखात लेखिका सेनापती बापटांच्या माणुसकीविषयी भाष्य करतात. बाँब प्रकरणात बापटांचा हात असल्याने पोलिसांपासून बचाव करण्यासाठी ते भूमिगत झाले होते. त्यावेळी त्यांनी पुरुषोत्तम वैद्य या नावाने मॅट्रिकची परीक्षा पास करून धार शाळेत शिक्षकाची नोकरी मिळवून, देवळालीकर यांच्या तावडीतून तानीबाईच्या मुलीला सोडवून आणली. आपल्या जीवनाला धोका असतानाही अज्ञात वासात स्वतःचे प्राण वाचवण्याच्या धडपडीत माणुसकी जपणारा न्यायाच्या बाजूने उभा राहिलेले सेनापती बापट लेखिकेला उदार माणुसकीचे जिवंत प्रतीक वाटले.

**मुक्तीच्या वाटेवर–** या लेखात लेखिकेने बाराव्या शतकातील दक्षिण भारतात होऊन गेलेल्या अक्कमहादेवीचा संपूर्ण जीवनपट मांडला आहे. या अलौकिक महादेवीने शिवाला आपला पती मानला होता. जगाच्या दृष्टीनं जो तिचा पुरुष, तो तिच्या मानस पातळीवर केवळ आदिपुरुष

परमेश होता. आणि जगाच्या दृष्टीनं ज्याचं अस्तित्त्व भासमय, तो आदिपूरुष तिचा खरा पती ती मानत होती. ज्यावेळी तिला कौशिक राजाने आपली पत्नी करायचा प्रयत्न केला आणि तिला स्पर्श केला त्यावेळी ती पूर्णपणे निर्वस्त्र होऊन बाहेर पडली. हे सहसा कोणत्या साधारण स्त्रीला करता आलं नसतं. त्या काळात समाज या गोष्टीचा स्वीकार करणार नव्हता तरीदेखील या स्त्रीने त्या काळातील समाजानं लादलेली सर्व बंधनं झुगारली. स्त्री म्हणून तिला अडवणारी अशी सगळी बंधने त्या महादेवीने जाणली आणि तोडली. हे तिचे कर्तुत्त्व लेखिकेला भावते व ही महादेवी सत्त्वाच्या शोधात निघालेली एक प्रतिनिधीच वाटते. या लेखात त्यांनी अक्का महादेवीचा उपभोग्य अस्तित्त्वापासून ते सर्वसमर्थ चैतन्यापर्यंतचा प्रवास रेखाटला आहे.

## संत स्त्रियांची व्यक्तिचित्रणे

**कान्होपात्रा–** या लेखात लेखिकेने संत स्त्री कान्होपात्राची जीवनगाथा सांगितली आहे. कान्होपात्राचा जन्म मंगळवेढयाच्या शामा नावाची एका वेश्या गणिकेच्या पोटी झाला होता. एका वेश्याच्या पोटी जन्म घेऊनही त्यांनी भक्तीची वाट स्वीकारली. दगडाच्या देवाला जिवंत माणसाच्या स्वरूपात पाहिले. परंतु कान्होपात्राचे दुःख नष्ट करण्यास विठ्ठल असमर्थ ठरल्याची खंत लेखिकेने कान्होपात्राच्या अभंगाद्वारे व्यक्त केली आहे.

बिदरच्या बादशाहाच्या सैनिकांबरोबर न जाता विठ्ठलाच्या भक्तीत जीवनाचा शेवट करणे कान्होपात्राने पसंत केले. त्यांच्याविषयी लेखिका लिहितात, "ती आहे हरिण पाडसाच्या मुक्या हुंदक्यांसारख्या डोळयांच्या रूपानं, स्वतःच्या स्त्रीत्वाच्या दुःखाशी झुंजताना प्राण गमावणाऱ्या कोवळया जिद्दीच्या रूपानं" (भगव्या वाटा, पृ. १३२) स्वतःला न आवडणाऱ्या पुरुषाबरोबर जाण्याऐवजी त्यांनी देवालाच पुरुष मानले. अशा विलक्षण स्त्रीजीवनाचा शोध त्या या लेखात घेताना दिसतात.

**बहिणा–** या लेखात लेखिकेने बहिणाबाईचे जीवनचित्र रेखाटले आहे. बहिणा ही ब्राह्मण होती. रत्नाकर पाठक नावाच्या तीस वर्षाच्या बीजवराशी त्यांचे लग्न झाले. त्यानंतर आपल्या

आईवडिलांसोबत पतीसह ती कोल्हापूरात येते. येथे त्यांना गायवासरू दान मिळते. वासरावर त्यांचा प्रचंढ प्रेम होता.

तुकारामांना त्यांनी गरू केले. त्यांचा नवरा पुरुषी अहंकाराने पछाडला जातो आणि बहिणाला सोडण्याचा निर्धार करतो. अशावेळी प्रपंच करावा की परमार्थ या विचारातून त्यांनी पती सर्व स्व मानून त्याची सेवा निवडली. त्यानंतर पतीचे मतपरिवर्तन झाले व दोघेही देहू गावी राहायला आले. तिथे त्यांनी ब्राह्मणेत्तर गरू केल्याने समाजाकडून मानहानी सोसावी लागली. आणि त्यानंतर त्यांनी कवित्त्व करायला सुरुवात केली. अशा वैयत्तिक गोष्टींचा उलगडा येथे झाला आहे. त्याचबरोबर बहिणाबाईने अभंग, भारुडं, डकगाणी, झिम्मा, हमामा अशा प्रकारची रचना केली यांचीही माहिती मिळते.

## इतर माणसांची व्यक्तिचित्रणे

**एक विलक्षण आई—** एका सामान्य साध्या आईचा त्याग, न्यायनिष्ठेचे दर्शन घडवणारा हा लेख आहे. स्वातंत्र्य लढयात भाग घेतलेले भगत सिंह, सुखदेव, राजगुरू, जतींद्रनाथ यांना फाशीची शिक्षा फरमावली होती. त्यासाठी त्यांच्या अखेरच्या भेटीसाठी त्याचे नातेवाईकांनी लाहोरच्या तुरूंगात धाव घेतली. परंतु फक्त आई वडिलांनाच भेटण्याची परवांगी दिल्याने इतर नातेवाईक त्यांना भेटू शक्त नव्हते. हे राजगुरूंच्या आईला आवडले नाही. त्यांना न्याय मिळावा यासाठी राजगुरूंची आई राजगुरूंना भेटण्याचे टाळते. ही साधारण महिला परंतु तिच्या ठायी असलेले हे अलौकिक्त्व लेखिकेने दाखवून दिले आहे. या विलक्षण आईने पुत्राच्या मृत्यू प्रसंगीही राखलेल्या संयमाविषयी स्तुती लेखिकेने लेखात केली आहे.

**लाख मोलाचे देणे—** या लेखात पुण्यातील बाळूकाका कानिटकरांच्या समाज कार्याची दखल घेत असताना त्यांच्या मुलांची सहनशीलता व बुधवारपेठेत शरीरविक्री करणाऱ्या दुदैवी बायकांचेही मोठेपण व्यक्त केले आहे. बाळूकाका गांधीचे अनुयायी होते. ते सतत समाजसेवा करत होते. असे असताना त्यांना ‘कायदेभंगाच्या चळवळीत’ अटक झाल्याकारणाने त्यांच्या मुलांनी रस्त्यावर पुस्तके विकून वडिलांनी घेतलेले कर्ज फेडले. त्यावेळी या मुलांना लोकांकडून अपमान करून घ्यावा लागला. परंतु त्यांनी सर्व सहन करण्याची ताकद ठेवली. एक दिवस

पुस्तके विकण्याच्या नादात ते बुधवार पेटेत वैश्या वस्तीत गेले. तिथे या वैश्यांनीही त्यांची पुस्तके विकत न घेता त्यांना दिड रूपये दिले. ते दिड रूपये त्या मुलासाठी महत्त्वाचे, लाख मोलाचे होते. बाळूकाकांचे समाज कार्य, कर्ज फेडण्यासाठी मुलांने घेतलेले अफाट कष्ट व वैश्यांनी केलेली मदत लेखिकेला मोलाची वाटली. समाजातील अशा भल्या गोष्टींचे कौतुक लेखिकेला होते. त्यातूनच या माणसांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख या लेखातून होते आहे.

**धनकुंवरचे साहस–** या लेखात विधवेने केलेल्या साहसाविषयी लिहिले आहे. १८७१ च्या कालखंडात विधवांचे पुर्नविवाह करणे पाप मानले जात असताना धनकुंवर नावाच्या विधवा तरुणींनी सेठ माधवदास बरोबर विवाह केला. त्या दोघांना मरेपर्यंत लोकनिंदा सहन करावी लागली. तरीदेखील स्त्रियांना पूर्नविवाह करता यावा म्हणून या दोघांनी घेतलेल्या निर्णयाने पुढे स्त्रियांना मोकळीक मिळाली. त्यामुळे हा धनकुंवरने व माधवदासाने घेतलेला निर्णय लेखिकेला मोलाचा वाटला. त्यामुळे त्यांच्या साहसाची ओळख त्यांनी या लेखात करून दिली आहे.

## ६.४ अरुणा ढेरे यांच्या लेखनाचे वाङ्मयीन विशेष

### ६.४.१ अभिव्यक्तीचे स्वरूप

१९७५ नंतरच्या कालखंडात मराठी ललित साहित्यनिर्मिती करणाऱ्यांमध्ये अरुणा ढेरे यांचे ललित लेखन थोडया वेगळया वाटेने जाताना दिसते. एखादा विषय घेऊन त्यावर चिंतन करत असताना स्वतःचे अनुभव, विविध वाङ्मयीन संदर्भ, कथा दंतकथाचे उपयोजन करून विषयांत्तर करून स्वतःची मते, विचार व्यक्त करत लेखिकेने लेखाचा शेवट केला आहे. वेगवेगळया ग्रंथातील विविध संदर्भ घेऊन जुन्यातून नव्याची शोधप्रक्रिया त्यांच्या लेखनात दिसून येते. स्पष्टीकरणात्मक, विवेचनात्मकअशी त्यांच्या लेखांची मांडणी असलेली जाणवते. त्यांच्या लेखनाला आठवणी, अनुभवांची, स्मरणरंजनाची, संशोधनाची, नैतिक मूल्यांची, संदर्भ संपन्नतेची जोड मिळाली आहे.

लेखिकेचे अनुभवविश्व विस्तृत व सखोल आहे. गतकाळातील आठवणी अनुभव सांगण्यात त्या रमलेल्या दिसतात. हे लेखन स्वान्तःसुखाय आहे. त्यांच्या बालपणातील आठवणी, ज्या घरात त्या वाढल्या त्या घराच्या, तेथिल माणसांच्या आठवणी त्याचबरोबर त्यांच्या आवडीनिवडीविषयी लेखन झाले आहे. त्यांच्या अनुभव अभिव्यक्तीत प्रांजळपणा जाणवतो. त्यात जिव्हाळा, सरलता आहे. स्वतःचे जीवनाभुव मांडताना ते घटना, प्रसंग प्रत्यक्षात घडत असताना मनात ज्या भावना निर्माण झाल्या होत्या त्या भावनांचा उद्रेंक लेखात झालेला दिसतो. स्वतःच्या अनुभव, आठवणींकडे लेखिका तटस्थपणे, गंभीरपणे तर कधी भावगर्भतेने पाहताना दिसतात.

लेखिकेने त्यांच्या ललित लेखनातून स्वतःच्या आठवणी अनुभवांना स्थान देऊन स्वतःची लहानपणापासून कशी जडण घडन झाली याचा शोध घेतलेला दिसतो. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची नेमकी ओळख होते. त्यांची स्वभाववृत्ती, त्यांच्यापाशी असलेली रसिकता, भावना, संवेदना, सौंदर्यदृष्टी, जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू त्यांच्या आत्मपर लेखनातून निदर्शनास येतात.

लेखिकेने आपल्या ललित निबंध लेखनातून स्त्री जीवनाचा वेध घेतला आहे. विशेषतः ज्या ज्या ठिकाणी त्यांनी प्रवास केला तेथिल स्त्री जीवनाची व्यथा त्यांच्या लेखनात प्रकर्षाने व्यक्त झाली आहे. त्याचबरोबर रामायण, महाभारतातील तशाच ऐतिहासिक कथांमध्ये भेटलेल्या स्त्रियांवर लेखन करत असताना त्यांच्या वाटयाला येणाऱ्या दुःखाचा वेध त्यांनी चिंतनातून घेतलेला दिसतो. स्त्री दुःखाचा आवाका खूप मोठा असल्याचा अंदाज त्यांच्या साहित्यातून अनेक वेळा येत राहतो. खंबीर वृत्तीची स्त्री, कुटुंबाचा प्रेमाने सांभाळ करण्याचा तिचा स्वभावविशेष, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीच्या वाटयाला येणारे दुःख, समाजात तिला मिळणारी वागणूक, स्वतःचे पावित्र्य सिद्ध करण्यासाठी तिला सोसाव्या लागणाऱ्या यातना, एकंदरीत पुरुषाहुन वेगळे जीवनानुभव या सर्वांचा वेध घेत स्त्रीविषयीच्या त्यांच्या मनातील भावभावना, त्याविषयी चिंतन अनेक लेखात प्रकट झाले आहे. स्त्रीविषयक लेखन करताना लेखिका गंभीर तर काही वेळा संवेदनशील बनताना जाणवतात.

लेखिकेने भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रवास केला आहे. तिथे त्यांना भेटलेल्या स्त्रियांच्या माध्यमातून स्त्री जीवनाचा अनुभव त्यांनी निरीक्षणातून घेतला. कुठल्याही देशातील स्त्री असेना सर्व स्त्रीया त्यांना एकसारख्याच वाटल्या. लेखिका लिहितात, “वाटलं—किती सारख्या असतो आपण आणि तरी किती वेगळया! भाषेची, संस्कृतीची, प्रदेशाची, त्वचेची सालं सोलली तर आत तेच सनातन बाईपण. शिवाय तत्कालीन प्रश्नांचा संदर्भही आता सारखाच आहे. तपशिलातले फरक असतीलही, पण गाभ्याचं वास्तव तेच.” (वेगळी माती, वेगळा वास, पृ. १६४) म्हणजेचं वेगळा काळ, प्रांत किंवा वेगळा देश असा भेद असला तरी सर्व ठिकाणी बाईपणाचे सनातन दुःख एकच आहे. त्यांनी स्त्रीच्या वाटयाला येणाऱ्या व्यथा वेदनांचे चित्र प्रभावीपणे व्यक्त केले आहे. तसे पाहिले तर त्यांचे अधिकशे लेख स्त्री जीवनाशी संबंधीत असलेले दिसून येतात. स्त्रीकडे सहानभूतीने पाहून स्त्रीच्या जीवनाचा त्या गांर्भियाने विचार करताना दिसतात.

वेगवेगळया परिस्थितीच्या आवर्तात सापलेल्या स्त्रीच्या जीवनाचा आढावा लेखिकेने घेतला आहे. रामायण—महाभारतातील सीता, द्रौपदी, कुंती, गांधारी अशा समाजाने आदर्श मानलेल्या स्त्रियांनी यातना सहन केल्या होत्या. सीतेला आपले पावित्र्य सिद्ध करण्यासाठी अग्नी परीक्षा द्यावी लागली, द्रौपदीला पाचांची पत्नी व्हावी लागली, तिला भर सभेत विवस्त्र करण्याचा प्रयत्न केला गेला, गांधारीला दृष्टी असूनही आंधळेपण स्वीकारावे लागले. या सर्वा ंची उदाहरणे देऊन लेखिकेने भारतीय संस्कृती, पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात स्वतःची मते व विचार निर्भिडपणे मांडले आहे. स्त्री ही पापी, कलंकित अशी विधाने जी समाजाने करून ठेवली आहे. त्यांना स्पष्ट शब्दांत विरोध करणाऱ्या लेखिका आपल्याला त्यांच्या अनेक लेखातून दिसून येतात. लेखिका लिहितात, “प्रत्येक ठिकाणी कपट केले आहे ते पुरुषाने आणि अपराधी ठरली आहे ती स्त्री. कलंकित झाली आहे ती स्त्री. मग ती दैत्यपत्नी वृंदा असोत, देवपत्नी सीता असो की ऋषिपत्नी अहिल्या असो.” (नव्या जुन्याच्या काठावरती, पृ. १५६) अशा बेधडक शब्दांत पुरुषांच्या विरोधात लेखिका बोलताना दिसतात.

स्त्रियांच्या मनात आत्मसन्मान जागृत व्हावा, त्यांना स्त्री सामर्थ्याची जाणीव करून देण्यासाठी लेखिकेने लेखन केलेले दिसते. ज्या स्त्रियांचे वेधनामय जीवन त्यांनी चित्रित केले; त्या स्त्रियांचे सामर्थ्यही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे विशद केले आहे. लेखिका लिहितात,

“पुरुषसत्तेच्या अंकित व्हायला तयार नसणाऱ्या स्वतंत्र, स्वयंशासित आणि आत्मगौरवाने अखंड मंडित अशा स्त्रीत्वाचे रूप म्हणजे द्रौपदी. अशी स्त्री एकेकाळी जगाच्या पाठीवर होतीच. आजही आहे. पुरुष केवळ वंशसातत्य राखण्यासाठी निमित्तमात्र. संसार चालवणारी, मुलांना वाढवणारी, सगळी संकटे झेलणारी, खंबीरपणे घरादाराची मेढ बनून राहणारी स्त्री जन्म देणारी आणि वाढवणारी स्त्री. तिच्यात एक चिवटपणा असतो आणि न मालवणारी एक आत्मशक्तीही असते.” (नव्या जुन्याच्या काठावरती, पृ. १४८) अशा स्त्री सामर्थ्याबद्दल विश्वास लेखनात व्यक्त केला आहे. आपल्या लेखनातून त्यांनी समाजाला व स्त्रियांना विचार करण्यास प्रवृत्त केलेले दिसून येते.

अरुणा ढेरे या मौखिक व लिखित अशा दोन्ही प्रकारच्या साहित्याच्या गाढया अभ्यासकआहेत. त्यांची आई व आत्या यांच्याकडून त्यांना ज्या ओव्या, लोककथा, लोकगीते ऐकायला मिळाली त्यावर त्यांनी लेखन केलेले दिसून येते. त्याचबरोबर बालवयापासून त्यांना पुस्तकांचा सहवास लाभल्याने अनेक साहित्यकृती त्यांनी आवडीने वाचल्या. कदाचित त्यामुळेच त्यांना साहित्याची जाण आली. व त्यातूनच त्यांच्या प्रतिभासंपन्न, प्रज्ञावंत मनाने इतर साहित्यिकांच्या साहित्याची दखल आपल्या ललित निबंधाच्या माध्यमातून घेतलेली दिसते. मराठीच्या बरोबरीने संस्कृत, बंगाली, कानडी वगैरे भाषेची जाण त्यांना होती त्यामुळे या भाषांतील वाङ्मयाचे पडसाद त्यांच्या ललित लेखातून उमटले आहे. वेगवेगळया लेखकांनी लिहिलेल्या रामायण महाभारतातील कथांवर त्यांनी भाष्य केले आहे. निसर्गविषयक लेखन करत असतानाही स्पष्टीकरणासाठी अनेक कवींच्या कवितांचा आशय त्यांनी मांडला आहे. त्यांच्या लेखनात अनेक वाङ्मयीन संदर्भ आलेले दिसून येतात. दोन लेखकांच्या आशयाची तुलना करून त्यासंबंधी लेखात स्वतःची मते मांडली आहे. एखाद्या साहित्यकृतीवर किंवा साहित्यिकावर त्यांनी चिंतन केलेले दिसते. किंवा वाचनातून मिळालेली अनुभूती त्यांच्या लेखांचा विषय बनून त्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा रंगरस घेऊन त्यातून त्यांचा ललित निबंध तयार होत असतो. साहित्यिकाच्या सृजनशीलतेचा, सौंदर्यात्मक जाणिवेचा व निर्मिती प्रक्रियेचा शोध लेखिकेने घेतलेला दिसून येतो.

लेखिकेने कित्येक साहित्यकृतींवर लिहिले आहे. एखाद्या कवितेच्या रसग्रहणातून त्यांचा लेख आकाराला येत नसून त्या कवितेच्या ठिकाणी असलेल्या भावनात्मक अनुभूतीचा स्वतःच्या

मनाशी केलेला तो उलगडा असतो. साहित्यिकाचे व साहित्यकृतीचे श्रेष्ठत्त्व, वेगळेपण त्यांनी नेमक्या शब्दात उलगडून दाखवले आहे. त्यांच्या या साहित्यविषयक लेखनातून त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे, प्रतिभासंपन्नतेचे व त्यांच्या स्मरणशक्तीचे दर्शन घडते.

लेखिकेला बालवयातच निसर्ग सहवास लाभला. तसेच विविध ठिकाणी केलेल्या प्रवासा दरम्यान त्यांनी अनेक निसर्गरूपे पाहिली, अनुभवली. त्या निसर्गरूपांच्या सौंदर्याची मनभूलवणारी वर्णने त्यांच्या लेखात उतरली आहे.

निसर्ग सौंदर्याने लेखिकेचे मन वेधून घेतलेले दिसते. निसर्गातील प्रत्येक दृश्य त्या आत्मीयतेने अनुभवतात. निसर्ग सान्निध्यात त्यांना जो आनंद होतो. तो आनंद लेखात बोलका झाला आहे. फुलांनी भरलेली निरनिराळी झाडे, आभाळ व दिसणारे तारे, वळणा वळणाने जाणाऱ्या पाऊलवाटा, पक्ष्यांची साद, नदी, वनराई, वर्षाच्या प्रत्येक ऋतूचे सौंदर्य त्यांना मोहिनी घालताना दिसतात. त्यांना सांस्कृतिक पर्यावरणाची नेहमी सोबत लाभल्याने सृष्टीच्या चैतन्य रूपांचे सौंदर्य चित्रित करताना आदिम काळापासून माणसाचे सृष्टीशी असलेले नातेही समजून घेऊन लेखनात विशद केले आहे. सण उत्सवाचे महत्त्व विशद करत असताना त्यांनी निसर्ग व लोकसंस्कृती यांच्या अतूट नात्याचा वेध घेतला आहे. ग्राम संस्कृतीचे दर्शन घडवताना भारतीय संस्कृतीत परंपरेने चालत आलेल्या सणांचे व ऋतू यांचे नाते त्यांनी योग्य शब्दात लोक कथांच्या आधारे पटवून दिले आहे.

निसर्ग अनुभवत राहून ते लेखनात उतरणे यात लेखिका मनापासून रमताना दिसतात. निसर्गाच्या क्रीडा त्यांनी बारकाईने न्याहाळून समजून घेतल्या व लेखनात सूक्ष्मपणे संवेदनासह टिपल्या आहे. निसर्गसौंदर्य चित्रित करताना त्यांनी अनेक कवींच्या निसर्गसौंदर्य उलगडणाऱ्या कवितांच्या ओळी वापरल्या आहेत. वेगवेगळया कवींच्या दृष्टिकोणातून निसर्ग सौंदर्य जाणिवांतून त्यांचे लेख उलगडत जाताना दिसतात.

लेखिकेच्या निसर्गवर्णनपर लेखनाने काव्यात्मक पातळी गाठली आहे. त्यांच्यापाशी असलेल्या सौंदर्यदृष्टीने निसर्गातील सौंदर्याचा वेध अचूकपणे घेतला आहे. लेखिका लिहितात, "गावाबाहेरच्या मोठ्या माळावर, डोंगर खाद्यावर पावसानं गच्च पोसलेलं गवत या दिवसात सोनेरी तुऱ्यांनी डोलतं. पिवळी चिंटी फुलपाखरं थोडं ऊन माखलेल्या पंखांनी भिरभिरतात.

खेडयांकडे शेतात दूधदाण्यांनी कणसं दाटतात आणि उद्याच्या भरल्या दिवसांची वाट पहाणारे गरीब डोळे सोनेरी रेघांचं हे चिखलमातीतून वर आलेलं कवतिक अरूपानं जपतात. सगळा आश्विन महिना शेतातून उगवतो, उन्हावर तरंगतो आणि सोन्यानं हसत असतो." (रूपोत्सव, पृ. १४) अशी ऋतूची विलोभनीय रूपे आकर्षक शब्दात लेखनात मांडली आहे. वाचकांना आनंद देणारी, प्रत्यक्ष स्वतः वाचक निसर्गसौंदर्य अनुभवत आहोत असा साक्षात्कार घडविणारी निसर्गवर्णने लेखात उतरली आहे. काही लेखात अनुभवलेली निसर्गाची भीषण रूपेही लेखिकेने यथातथ्य वर्णिली आहेत.

लेखिका सृष्टीच्या सुख दुःखाच्या भावनाशी एकरूप होताना जाणवतात. सृष्टीची भावना, संवेदना अनुभतात व योग्य शब्दांत त्यांचे चित्रण करतात. शरद ऋतूत फुलणाऱ्या झाडाचे वर्णन करताना लेखिका लिहितात, "देवभाताची सोनेरी शेतं असोत, वाटाण्याचे तणावेदार वेली असोत, तांदूळ गहू–बाजरीचे तुषवंत तुरे असोत, मक्याची मणिमन्त कणसं असोत, मूग–मटकी चवळीची शिंबिमन्त झुडपं असोत किंवा मोठी देखणी फुलं असलेली अगस्त्यासारखी झाडं असोत, शरदाची ही पूर्ण सुखाची लिपी आहे. नदी–ओढयांना लागून नागदमनीची देखणी पांढरी फुलं जेव्हा कंदातून सासरून वाढलेल्या दांडयावर डोलत राहतात किंवा पोसलेल्या बागांमधून स्पायडर लिलीची सुंदर फुलं तरतरून वर येतात, तेव्हा जमिनीची पूर्ण तृप्ती किती परींनी तटतटली आहे अन् कशी फुलून येते आहे, हे जाणवून मन थोडं दुखतं सुध्दा." (रूपोत्सव, पृ. ८९, ९०) अशा प्रत्येक ऋतूतील बदल त्यांनी बारकाईने न्याहाळले व आकर्षक शब्दांतून रेखाटले आहेत.

लेखिकेच्या लेखनातील निसर्ग आविष्कार ठळक स्वरूपाचा आहे. निसर्गाशिवाय जीवन व्यर्थ आहे असा भाव त्यांच्या लेखनात शब्दबद्ध झालेला दिसतो. त्या आपल्या 'मनातलं घर' या लेखात त्या लिहितात, "तशी तर घराला झाडाचीही सोबत हवी घरानं झाडाला आपल्याजवळ ओढून घ्यावं आणि झाडांनाही घराच्या गळयात हात टाकून त्याला कौतुकानं वेढून घ्यावं. एखादी वेली, एखादी औषधी वनस्पती, एखादं फुलझाड आणि एखादं मोठं झाड ही मागणी काही फार नाही जिवाची. आपण माणूस आहेत हे झाडा–प्राण्यांच्या संगतीत जेवढं जास्त कळतं ना, तेवढं इतर कुठेही नाही." (अर्ध्यावाटेवर, पृ. ४६) निसर्गाशिवाय मानव जीवन निरस होईल असा भाव या लेखनातून व्यक्त झाला आहे. मानव निसर्गाला घातक ठरला;

याविषयी लेखिका लिहितात, "या निसर्गाच्या कुशीत सगळेच प्राणी 'जीवों जीवस्य जीवनम्' या न्यायाने माणसाबरोबरच जगत, वाढत आणि मरत होते. हया काळात मानव जातीचा आत्मविश्वास आजच्या इतका वाढलेला नव्हता अन् सृष्टीच्या खेळावर हुकमत गाजवायची तंत्रेही त्याला आजच्यासारखी अवगत नव्हती. म्हणून सृष्टीबद्दल भयही होते आणि आदी प्रेमही होते आणि अविश्वासही! निसर्ग त्याच्यासाठी सुंदर होता, असुंदरही! वृक्षवेली, पशुपक्षी सगळा निसर्ग हा एकाचवेळी माणसाचा शत्रू होता आणि मित्रही!" (अर्ध्या वाटेव, पृ. १५०) आजचे मनुष्य वागणे, आणि निसर्गसौंदर्य नाहीसे होणे लेखिकेला अस्वस्थ करते. आधुनिक युगात निसर्गापासून दूर गेलेला व घातक ठरलेल्या मानव प्रवृत्तीचे दर्शन त्यांना या प्रतिक्रियेतून दाखवून द्यायचे आहे.

थोडक्यात त्यांची निसर्गवर्णने, सौंदर्यवर्णने वाचक मनाला आनंद देणारी आहे. तथा त्यातून वाचक मनाला निसर्गाविषयी चिंतन करण्यास भाग पाडले आहे. त्यांनी आपल्या लेखनातून निसर्गवर्णने नेमक्या शब्दात इतकी हुबेहूब केली आहे की तो निसर्ग वाचकांच्या डोळयांसमोर प्रत्यक्ष उभा राहतो.

लेखिकने देशपरदेशात प्रवास केला आहे. त्या प्रवासातील आठवणी–अनुभव, स्थल प्रदेशवर्णने लेखात चित्रित झाली आहे. प्रवासवर्णनपर लेखनात त्यांनी स्वतःला आलेल्या कडू–गोड आठवणी व्यक्त केल्या आहेत. काही स्थळांविषयीची माहिती त्यांना वाचनात आलेल्या साहित्यातून मिळाली होती. प्रवासातील अनुभवांच्या व वाचनात आलेल्या साहित्याच्या माध्यमातून दक्षिण भारतातील मंदिराच्या निर्मितीविषयी, कथा, दंतकथा तसेच शिल्पसौंदर्य चित्रमय शैलीत उलगडले आहेत. लेखिकेने अधिकतर मंदिरांना भेटी दिल्या होत्या. तेथिल शिल्पांचे सौंदर्य त्यांनी मार्मिकपणे उलगडले आहे. शिल्पांचे सौंदर्य पाहिल्यावर मनात निर्माण झालेल्या भावनांना शब्दरूप देत असताना त्यांनी वेचकपणे शब्द निवडले आहे. मंदिरांचे वर्णने अगदी सूक्ष्मरित्या तपशीलाने लेखात उतरली आहे. 'कमलवल्ली लक्ष्मी' या लेखातील कुंभकोणाम हे मंदिर ज्या गावात आहे त्या गावाचे वर्णन, 'कामदृमाची डहाळी' या लेखातील गुहांचे वर्णन, बदामीच्या लेण्यांचे वर्णन आदी वर्णने विलोभनीय झाली आहेत. त्याचबरोबर प्रवासात भेटलेल्या माणसांचे स्वभावविशेष त्यांनी बारकाईने नोंदविले आहेत.

लेखिकेच्या प्रत्येक प्रवासवर्णनपर लेखात एक दोन पूराकथांचा समावेश झाला आहे. त्याचबरोबर मंदिराच्या परिसरात दिसणाऱ्या प्राचीन माणसांच्या संस्कृतीविषयी त्या तपशीलाने भाष्य करताना दिसतात. शिल्प कोरलेल्या कलावंतांचा गौरवही या लेखनात झालेला दिसून येतो. काही ठिकाणी उद्ध्वस्त प्रदेशांचे, मंदिरांचे रूप पाहून त्यांचे मन खिन्न होताना जाणवते.

त्यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनपर लेखनात त्यांची प्रवासाची आवड, सौंदर्यदृष्टी, संशोधन वृत्ती, त्यांच्यापाशी असलेलं सूक्ष्म निरीक्षण व त्यांच्या रसिक वृत्तीचे दर्शन घडते. त्यांची प्रवासवर्णने ऐतिहासिक, भौगोलिक व धार्मिक माहिती मिळवण्याच्या हेतुने महत्त्वाची ठरतात. त्याचबरोबर वाचकांना प्रत्यक्ष केलेल्या प्रवासाचा आनंद देण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात असलेले दिसून येते.

लेखिकेने त्यांना भेटलेल्या व वाचनात आलेल्या अनेक यशस्वी माणसांची व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. आपल्या प्रयत्नाच्या बळावर यशाचे उच्च शिखर गाठलेली माणसे त्यांच्या मनाला श्रेष्ठ वाटली त्यांचेचे गुणगान त्यांच्या लेखनातून झाले आहे. साहित्य क्षेत्रातील, संगीत क्षेत्रातील, समाजिक कार्यकर्ते, रामायण महाभारतातील, संत स्त्रीया अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे त्यांनी केली आहेत. तशीच त्यांची काही व्यक्तिचित्रणे विरांगिनीच्या जीवन संघर्षाचे चित्र रेखाटणारी आहे.

त्यांची अधिकशी व्यक्तिचित्रणे साहित्यातून समजून घेतलेल्या माणसांच्या जीवन जगण्याविषयी आहे. अशाप्रकारची चित्रणे करताना त्या माणसांच्या जीवनातील एखादा घटना प्रसंग घेऊन त्यांवर लेखन झालेले दिसून येते.

त्यांनी माणसांच्या अंतरंगाचा म्हणजेच स्वभावविशेष, कार्यकर्तृत्त्वासंबंधात तपशीलवार लेखन केले आहे. 'घरः शांताबाई शेळके यांचे', 'गृहस्थी कथाकार' यामध्ये पंडित महादेवशास्त्री जोशी, कथाकार र. धों. कर्वे अशासारख्या लेखात साहित्यक्षेत्रातील व्यक्तींच्या जीवनाविषयी व त्यांनी निर्मिलेल्या साहित्याविषयी लेखन झाले आहे. 'प्रिय पुलं', 'एक शिक्षक, एक माणूस' सारख्या व्यक्तिचित्रणात लेखिकेने त्या व्यक्तींच्या कार्यावर, माणूसपणावर व त्यांच्या विचारांवर भाष्य केले आहे.

माणसांवर व त्यांच्या ठायी असलेल्या माणूसपणावर लेखिकेने मनापासून प्रेम केले आहे. त्यामुळे ही व्यक्तिचित्रणे आत्मीयतेने लिहिलेली दिसून येतात. त्यांच्या माणूसपणाचा जिव्हाळयाने शोध घेतल्यामुळे या चित्रणांना संवेदनाची जोड मिळाली आहे. त्यांनी या माणसांच्या दोषांवर भाष्य केले नसून केवळ त्यांच्या गुणांवर अधिकभर देऊन व्यक्तिचित्रणे साकार केली आहेत. त्यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रणात माणसांविषयी केवळ माहिती लिहिली नसून त्या माणसांच्या माणूसपणावर भाष्य केल्याने ती चित्रणे वाचक मनाला बौद्धिक ज्ञान देणारी ठरली आहेत. त्यांच्या प्रगल्भ भाषेमुळे त्यांनी केलेली व्यक्तिचित्रणे सकस झाली आहेत. त्या माणसांना त्यांनी लेखनात इतक्या यथार्थपणे रेखाटली आहे की, त्या प्रत्येक माणसांना वाचक प्रत्यक्ष भेटलो असेच जणू वाटू लागते.

## ६.४.२ आत्माविष्कार

लेखिकेचे अनुभवाचे जग विस्तृत आहे. ते अनुभव त्यांनी अधिक उत्कटतेने, तिव्रतेने ललित लेखनात मांडले आहे. त्यांचे लेखन आत्मशोध घेणारे, अंतःस्थ प्रवृत्तीचा शोध घेणारे असून ते सकस झाले आहे. त्यातून त्यांचे सखोल व्यक्तिमत्त्व प्रकट होते. लेखिकेकडे संशोधन वृत्ती, बौद्धिकता, अभ्यासू दृष्टी आहे. याचा प्रत्यय त्यांच्या ललित निबंध लेखनातून वेळोवेळी येतो.

लेखिकेला प्रवासाची ओढ आहे. त्यांचा हा प्रवास दि्क आणि काल या दोन्ही अंगांनी झाला आहे. दक्षिणेच्या प्रवासातील निसर्ग, मंदिरे, शिल्प न्याहाळताना सतत त्यांची शोधक वृत्ती दिसून येते. बदामी लेण्यामधील प्रणयशिल्प पाहिल्यावर त्यांना  पु. शि. रेग्यांच्या, आरती प्रभूंच्या कवितेच्या ओळी आठवतात, या शिल्पातील पुरुषाचा रूबाब गंधर्वासारखा वाटतो व त्यातली स्त्री त्यांना जयदेवाने लिहिलेल्या गीत गोविंदातील राधेसारखी वाटते. अशा संदर्भा तून त्यांनी बदामीच्या लेण्यातील शिल्प सौंदर्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. येथे त्यांनी शिल्प कोरलेल्या कालावतांच्या मनाचा व त्या प्रदेशाच्या संस्कृतीचाही शोध घेतलेला दिसतो. अशा सारख्या अनेक लेखातून त्यांची संशोधक वृत्ती लक्षात येते.

लेखिकेने अफाट वाचन केलेले दिसून येते. याचा प्रत्यय त्यांच्या अनेक  लेखातून येतो. उदाहरणात, 'कविहृदयी महंत' या लेखात त्या समर्थांच्या कवितेचे सौंदर्य उलगडून

दाखवतात. तर 'भासाची वासवदत्ता' या लेखात भासाची 'उदयन वासवदत्त' ही कथा वाचून भासाचे बाटक कसे श्रेष्ठ आहे हे पटवून देतात. अशाप्रकारच्या त्यांच्या लेखांद्वारे त्यांची बुद्धिमत्ता आणि अभ्यासू वृत्तीचा पुरेपूर प्रत्यय येतो.

### ६.४.३ काव्यात्मकता

लेखिकेच्या ललित लेखनाने काव्यात्मकतेची पातळी गाठली आहे. त्यांच्या लेखनाची भाषा आकर्षक शब्दकळेने नटली आहे. त्यांना आलेली अनुभूती व्यक्त करत असताना त्यात लयबद्ध, आकर्षक शब्द, प्रतिमांचा वापर त्यांच्या लेखनाला काव्यात्मकता प्राप्त करून देते. हळबीड आणि बेलूरकडे जात असताना वाटेत दिसलेल्या हिरवळीचे वर्णन करताना लेखिका लिहितात, "हा हिरवा तरी केवढा हिरवा? कसा हिरवा? मनात मावू नये एवढा अनंत हिरवा. शब्दांत सांगता येऊ नये अस शतरूप हिरवा. लख्ख पोपटी पानांवर पहिल्या उन्हात चमकणारा, सूर्यफुलांच्या तकतकीत पाकळयांच्या खाली गवतावर हसणारा, जवाच्या निळया फुलांभोवती रेंगाळणारा, गर्द हिरव्या झाडीतल्या शांत जळावर थबकलेला, उंच वृक्षांच्या छत्रीतून पांढऱ्या ढगात घुसलेला हिरवाच हिरवा!" (लावण्ययात्रा, पृ. ४७) प्रत्येक वाक्यातील शेवटच्या शब्दातील यमक जुळणीमुळे वाक्याला एक लय प्राप्त झालेली दिसते. त्यांच्या या वर्णनाला एक नाद प्राप्त झालेला आहे. हिरव्या रंगाचे सौंदर्य त्यांनी विविध उदाहरणाच्या सहायाने अगदी आकर्षक शब्दांनी रेखाटले आहे. येथे त्यांच्या उत्कट भावनाशीलतेचे दर्शन घडत असतानाच त्यांच्या लेखनातील भाषिक सौंदर्य, नादमधुर शब्दकळा वाचक मनाला मोहून टाकते.

### ६.४.४ चित्रमयता

लेखिकेच्या ललित निबंध लेखनात चित्रमय शैलीचे दर्शन घडते. बारीक सारीक तपशीलासह एखाद्या दृश्याचे वर्णन त्यांनी हुबेहूब केलेले जाणवते. उदाहरणात– "कालिंजरसारख्या, उत्तरप्रदेशात बांद्याजवळच्या एखाद्या माथ्यावर उभं राहिलं की विंध्याचा हा सगळा अक्षय संचय आपल्यापुढे खुला होतो. चारशे मीटर्सपेक्षाही अधिक उंचीवर आपण वावरत असतो. भोवती उत्तर प्रदेशाच्या सखल हिरव्या भूमीवर पसरलेला ऐसपैस विंध्यच. तळात शेताचे

देखणे तुकडे. त्यांच्यामधून मुरडणारी सळसळीत डांबरी वाट. अधेमधे पाण्याचे निळे झळाळ आणि तुम्हाला आतबाहेर सुखावणारा गार, मोकळा वारा, या विशाल दुर्गप्रदेशात अगणित वनस्पती आहेत. नाना प्रकारच्या वनौषधी आहेत. मधानं भरलेली पोळीही असंख्य! पाखरं उडतात, नाना प्रकारचे शब्द करतात. त्यांचे रंग आणि आकार डोळयांना सुखवतात. फुलांच्या रानवट गंधानं परिसर भरलेला असतो." (वेगळी माती, वेगळा वास, पृ. ९३) भावपूर्ण निवेदन, सूक्ष्म तपशील, बोलके संवाद व परिणामकारक वातावरण निर्मिती यातून विंध्याचा परिसर चित्रमय स्वरूपात वाचकांसमोर उभा राहतो.

## ६.४.५ चिंतनशीलता

प्रस्तुत लेखिकेच्या लेखनात चिंतनशीलता हा विशेष दिसून येतो. त्यांचे चिंतन अभ्यासपूर्ण असून वाचकांना नवा विचार देण्याचे सामर्थ्य त्यामध्ये आहे. त्यामुळे त्यांचे विविध विषयांवरील चिंतन उच्च दर्जाचे ठरते आहे. उदाहरणात– शांताबाईंच्या 'तोच चंद्रमा नभात' या गाण्याचे वाचन केल्यावर ते गाणे ज्या श्लोकावरून शांताबाईंना सूचले त्या श्लोकाच्या मुख्य कवयित्रीविषयी, तिच्या काव्याविषयी चिंतन लेखिकेच्या 'तोच चंद्रमा नभात' या लेखात झाले आहे. लेखिका लिहितात, "इ.स. च्या नवव्या–दहाव्या शतकात होऊन केलेला गुर्जर प्रतिहार राजांच्या दरबारी कवी राजशेखर याने कवी बाण याच्या तोडीची प्रतिभावंत कवयित्री म्हणून शीलाभट्टारिकेचा उल्लेख केला आहे. बाणाच्या काव्यात शब्द आणि ध्वनी यांना जसे समान महत्त्व, तसेच या कवयित्रीच्या काव्यात आहेत. ती कोण असावी, याविषयी मात्र तर्कच करावा लागतो. ती भट्टारिका आहे, याचा अर्थ ती राणी असावी. तिचा राज भोजाशी संबंध असल्याने ती त्याचीच राणी असावी, असे वाटते." (कवितेच्या शोधात, पृ.१२४) शांताबाईंच्या गाण्याविषयी लिहित असताना शीला भट्टारिका व तिची काव्यनिर्मिती लेखिकेच्या चिंतनाचा विषय होताना दिसते.

## ६.४.६ घटनांचा संदर्भ

प्रस्तुत लेखिकेच्या ललित निबंध लेखनाला घटनांचा संदर्भ आहे. त्यांच्या जीवनातील अनुभवांचा, घडलेल्या घटनप्रसंगांचा, व्यक्तिंचा संदर्भ तसेच त्यांच्या लेखनात

रामायण—महाभारत अशा प्राचीन महाकाव्यांवर लेख प्रकटल्याने त्यांच्या आशयाला प्राचीन साहित्यातील घटनांचा संदर्भही लाभलेले दिसून येतात. हे संदर्भ वाचकांना जगण्यासाठी बळ देणारे आहेत. उदाहरणात, मायलेकीचे नाते उलगडून दाखवण्यासाठी लेखिकेने 'मायलेकी' या लेखात कवयित्री संजीवनी मराठे आणि त्यांची मूलगी यांच्या संवादाचा प्रसंग नमूद केला आहे. संजीवनी मराठे यांना भेटण्यासाठी लेखिका हॉस्पिटलमध्ये गेल्या होत्या. संजीवनी मराठे जीवनमरणाच्या सीमारेषेवर असताना त्यांची लेक अंजू कागदाची नळी आईच्या कानाशी धरून तिच्याशी बोलत होती. संजीवनी मराठेना बोलता येत नव्हतं पण त्यांचे डोळे बोलत होते. अशा विलक्षण अनुभवातून लेखिका मायलेकीच्या नात्याचे सूर उलगडतात. टया लिहितात, "मायलेकींचा तो संवाद विलक्षण होता. कित्ती वर्षे त्या दोघी एकमेखींशी भरभरून बोलत आल्या होत्या. इतके अर्थपूर्ण बोलणे मायलेकींमध्ये क्वचितच असते." (नव्या—जुन्याच्या काठावरती, पृ.५४)

## ६.४.७ व्यासंग

अरुणा ढेरे या प्रज्ञावंत संशोधक रा. चिं. ढेरे यांच्या कन्या असल्याकारणाने वाङ्मयीन वातावरणातून त्या घडल्या. त्यामुळे साहित्याशी त्यांचे जवळचे नाते जडले. त्या लेखक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे तयार झाले याचा विचार केला तर असे दिसून येते की लहानपणापासूनच वडिलांकडून त्यांना संस्कृती अभ्यासाचे संस्कार मिळाले. वाचन, लेखन, संशोधनाविषयी जिव्हाळा, गोडी निर्माण झाली. त्यांची आई व आत्या या दोघींचेही संस्कृती परंपरेशी दृढ नाते असल्याकारणाने संस्कृती आणि परंपरा याविषयी त्यांच्या मनात आपूलकी निर्माण झाली. त्याचबरोबर घरात अनेक चांगली पुस्तके असल्याने वाचनाची आवड त्यांना जडली. तसेच वडिलांचे अनेक जाणकार स्नेयांची संगत त्यांना लाभल्याने लहानपणापासूनच त्यांच्या सृजनशीलतेला चालना मिळाली. त्याचबरोबर अफाट परिश्रम, तटस्थपणे कोणत्याही गोष्टीला न्याहाळण्याची त्यांची दृष्टी, आणि वाङ्मयीन विचारांमुळे त्यांचे निर्मितीशील, अभ्यासू व्यक्तिमत्त्व घडले.

पीएच. डी. पर्यंतच्या त्यांच्या शिक्षणाने त्यांना मराठी साहित्याविषयी सखोल जाणीव करून दिली. त्यांना शिकत असताना तसेच प्रवास करत असताना अनेक साहित्यिकांची लाभलेली

साथसंगत, प्राचीन साहित्य तसेच आधुनिक साहित्याचे वाचन या सर्वांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध व दमदार बनले. बालवयात घरात आई आत्याकडून ऐकलेल्या ओव्या, लोकगीते त्यांना पाठ होती. त्याचबरोबर इंग्रजी वाङ्मयाचे वाचनही त्यांनी अफाट केलेले दिसते. त्यामुळे आशयानुसार प्रभावी संदर्भ त्या अनेक ठिकाणी वापरताना दिसतात. रामायण, महाभारत महाकाव्ये, कालिदास ते भवभूती, संस्कृत कवीपर्यंत ते संत पंडित कवींचे साहित्य त्यांनी वाचले होते. त्यामुळे त्यांच्या लेखामध्ये अशा संस्कृत कवितेतील संदर्भ अनेक ठिकाणी आलेले दिसतात. वाचन प्रेम आणि त्यातून मिळालेल्या शब्द भांडारातून अर्थछटा नेमकेपणाने पकडणे, योग्य शब्द वापरणे त्यांना जमले. वडिलांची संशोधन दृष्टी वारशाने त्यांना लाभल्याने रामायण महाभारतातील कथांचा अभ्यास करून लोकसंस्कृती, लोकमनाचा संबंध उलगडून दाखवता आला. प्रत्येक गोष्टींचा सखोल अभ्यास त्यांच्या लेखनातून वेळोवेळी दिसून येतो. विचार, योग्य अयोग्य, श्रद्धा अंधश्रद्धा, मानव जीवन, सणवार, निसर्ग, लोककथा अशा विषयांची त्यांना नेमकी जाण असल्याने त्यांच्या लेखनाला विशेष दर्जा प्राप्त झालेला आहे. एकंदरीत त्यांच्या लेखनात आलेले अनेक संदर्भ यातून त्यांचा अफाट व्यासंग दिसून येतो.

### ६.४.८ भाषाशैली

अरुणा ढेरे यांच्या ललित लेखनाची भाषा प्रगल्भ व लालित्यपूर्ण आहे. त्या सखोल विचार करणाऱ्या व अभ्यासू असल्यामुळे त्यांच्या लेखनाला संशोधनात्मक धार प्राप्त झालेली दिसून येते. वर्णन करताना त्यांची भाषा काव्यात्मकता गाठते. आकर्षक शब्दरचनेतून त्यांच्या भाषेला सौंदर्य प्राप्त झाल्याने ती भाषा वाचक मन वेधून घेणारी ठरली आहे. शब्दांच्या माध्यमातून अनुभवांना वाचकांच्या नजरेसमोर साकार करण्याची क्षमता त्यांच्या भाषेत आहे. ज्याप्रकारचे भाव त्यांना व्यक्त करायचे आहे त्याप्रमाणे ती भाषा मृदु, चिंतनशील व काही वेळा गंभीर रूप धारण करते. समाजातील विविध प्रश्नांवर भाष्य करताना त्यांची भाषा वास्तवदर्शी झालेली दिसते. त्यांची भाषा आजोस्वी व सुबोध असली तरी काही वेळा त्यात गूढतेचे दर्शन होते. त्यांनी त्यांच्या लेखनात श्रृतयोजनांचा यथोचित वापर केल्याने त्यांचे लेखन दर्जेदार झालेले दिसून येते.

## विचारगर्भित वाक्ये

लेखिकेच्या ललित लेखनात विचारगर्भित अर्थपूर्ण वाक्ये सापडतात. यातून त्यांची निरीक्षणशक्ती तसेच प्रतिभाशक्तीचे दर्शन घडते. केवळ एका वाक्यातून त्या खूप काही सांगून जाताना दिसतात. उदा–

'सुस्थिर आणि संपन्न माणसांसाठी देव एखाद्या श्रीमंत म्हाताऱ्यापेक्षा अधिक नसतो, पण आयुष्याशी ज्यांना सारखे अवघड आणि दुर्दैवी सौदे करावे लागतात, अशांना देवाची फार मोठी गरज असते.'

'वैयक्तिक पातळीवर प्रामाणिक आणि विश्वासाच्या आधारानं । उभं राहिलेलं प्रेम आपल्या समजूतीच्या बळानं स्वतःची प्रतिष्ठा राखू शकतं.'

'जगण्यातले शहाणपण, क्षमा आणि समजूत हा तर जवळजवळ सगळया अनुभवी बायकांनी आपल्या मुलांना दिलेला वारसा आहे.'

'परक्या प्रदेशात, जिथं शब्दांची भाषा निरूपयोगी असते, तिथे हे हसू केवढ मदतीला येतं'

## म्हणी

लेखिकेने लेखनात म्हणींचा वापर केला आहे. त्यांना जे सांगायचे आहे ते लांबलचक वाक्यांतून स्पष्ट न करता म्हणींचा वापर करून सहजपणाने व्यक्त करण्याचा प्रयास त्यांनी केला आहे. उदाहरणात–

'इकडे आड, तिकडे विहीर' अशा म्हणी त्यांच्या लेखनात आल्याने त्यांना जे सांगायचे आहे ते कमीत कमी शब्दात वाचकापर्यंत पोहचतात.

## कवितेच्या ओळी

'ते कित्ती लपविले तरिही मजला कळते

पाकळीत दडले तरिही गंधातुन गूज उमलते'

‘तशी पुन्हा जाऊ नको कातरवेळेची

तशी पुन्हा जाऊ नको हुरहुर श्वासाची’

अशा सारख्या अफाट काव्यपंक्तीने लेखिकेचे ललित लेखन भरले आहे. या कवितेच्या ओळींच्या वापरातून त्यांची काव्याची ओढ लक्षात येते. अनेक कवींच्या आशयघन कवितांचा वापर योग्य रीतीने व योग्य ठिकाणी केल्याने त्यांचे लेखन कसदार झाले आहे.

## श्लोक

लेखिकेने लेखनात श्लोकांचे उपयोजन केलेले दिसून येते. उदा–

‘अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्म

हिमालयो नाम नगाधिराजः।

पूर्वापरौ तोयनिधीव गाह्म

स्थितः पृथिव्या इव मनदण्डः॥’

‘मुकेमणाचें बोलणें । हें जयाचें, तोच जाणे।

स्वानुभवाचिये खुणे । स्वानुभवीच पाहिजे ॥” अशा सारख्या संस्कृत श्लोकांचा वापर लेखनात चपखलपणे केल्यामुळे त्यांच्या लेखनाला उच्च स्थर प्राप्त झालेला दिसतो.

## गीते

प्रस्तुत लेखिकेने आस्वादलेली गीते त्यांच्या लेखनात संदर्भासाठी वापरण्यात आली आहे. त्यांच्या ऋतूवरील लेखांमध्ये अधिकतः गीताच्या ओळी आल्याने त्या ऋतूचे विवेचन अधिक परिणामकारक झालेले दिसते. उदा–

‘दिवसामागुन दिवस चालले

ऋतूमागुता ऋतू

जिवलगा कधि रे येशिल तू?'

'कुणी नाही गं कुणी नाही आम्हाला पाहत बाई

शांति दाटली चहूकडे, या गं आता पुढे पुढे'

वरीलप्रमाणे अनेक गीतांची अभ्यासपूर्ण मांडणी लेखकेच्या लेखनात दिसते.

## इंग्रजी वाक्ये व शब्दांचा वापर

लेखिकेने देशपरदेशात प्रवास केला आहे. परदेशात प्रवास करताना तिथे आस्वादलेल्या निसर्गाचे वर्णन तसेच काही इंग्रजी कवींच्या कविताही त्यांनी संदर्भासाठी वापरलेल्या दिसतात.

'it's the young leaves season

I sometimes remember my country

Then a balloon hang in the air

High up in the sley...'

'I will bring you happy flowers from the mountains,

Bluebells, dark hazels &rustic baskets of kisses.

## संस्कृत शब्द व वाक्यांचे उपयोजन

लेखिकेचा जन्म ब्राम्हण घराण्यात झाल्यामुळे संस्कृत भाषेतील ग्रंथाशी त्यांचा संबंध आला. त्यांनी स्तोत्रे आरत्या भूपाळया श्लोक वेगवेगळे दासबोध, ज्ञानेश्वरीसारख्या संस्कृत ग्रंथाचे वाचन केले होते. त्याचबरोबर संस्कृत भाषेचा त्यांचा गाढा अभ्यास असल्याकारणाने त्यांच्या ललित लेखनात संस्कृत वाक्यांचा वापर झालेला दिसतो. उदाहरणात–

संस्कृती, ललाट, श्लोक, शिष्य अशा सारखे अनेक संस्कृत शब्द लेखनात विखुरले आहे.

'शुभं करोति कल्याणं, आरोग्यं, धनसंपदा।

शत्रुबुध्दि विनाशाय दीपज्योति नमोऽस्तुते ॥'

'सर्वार्तिभंजन, सदाशिव, दानवारे

पार्थप्रहार कलितोत्तम मूर्धभाग

यक्षेशसेवितपरा ब्जविभूतिदायिन्

श्री शैलवासचरणं शरणं तवास्मि ।'

अशी वाक्ये लेखनात जागो जागी सापडतात.

## वाक्प्रचार

लेखिकेच्या ललित निबंध लेखनात मराठी वाक्प्रचारांचे उपयोजन झाले आहे. वाक्प्रचारामुळे त्यांना जे काही सांगायचे आहे ते; आणि त्यांच्या भावना योग्य रितीने सहजपणे वाचकापर्यंत पोहचतात.

पारणं फिटणे, हरवून टाकणे, मन भरून येणे, एकजीव करणे, लीन होणे, रोमांचित होणे, थक्क होणे, जीव तोडून प्रयत्न करणे, हेवा वाटणे अशा सारखे अनेक वाक्प्रचार त्यांच्या लेखनाचे सामर्थ्य वाढवताना दिसतात.

## संवाद

लेखिकेने आपल्या ललित लेखनात संवादरूपी भाषा वापरली आहे. त्यामुळे आशय, घटना—प्रसंग संवादाच्या रूपाने योग्यरित्या वाचकापर्यंत पोहचतात.

'माणूस आणि माती' या संग्रहातील 'एक क्रांतिकारक कवी' या लेखात लेखिकेने क्रांतिवीर कवी रामप्रसाद 'बिस्मिल' व त्यांच्या आईच्या संवादातून त्यांच्या आईचे विचार, देशासाठी तिचा अभिमान तसाच बिस्मिलाचे आईवरचे प्रेम व देशाचा अभिमान पुढील संवादातून दाखवून दिला आहे.

पण आई म्हणाली "तुला राज हरिश्चंद्राच्या आणि ऋषी अधिचीच्या गोष्टी मी सांगितल्या आहेत, त्या आठव. पश्चातापाचे अश्रू तुझ्या डोळयांत दिसले, तर ते मला आवडणार नाहीत."

बिस्मिलने डोळे पुसले. तो म्हणाला, "हे अश्रू भीतीचे नाहीत. मृत्यूला मी घाबरत नाही. मी पाश्चातापही करीत नाही; पण आई, विस्तवाजवळ लोणी वितळत, तसं तुझ्याजवळ आल्यावर मी फक्त तुझा लहान मुलगा होतो. डोळयांत पाणी त्यामुळे येतं." तत्त्वावर ठाम राहून मुलाला कणखर बनवणाऱ्या आई व आईमुलाचे नाते उलगडण्यासाठी हे संवाद लेखिकेने नमूद केले आहे.

## प्रश्नार्थक शैली

लेखिका आपल्या लेखनात वाचकांपुढे काही वेळा प्रश्न उपस्थित करताना दिसतात. वाचक वर्गाला विचार करायला लावणारे त्यांचे लेखन आहे. उदाहरणात—माणूस म्हणून जसा रानडयाचा गोखल्यांवर आपण सामाजिक, राजकीय, इतिहास लिहितो. त्याचप्रकारे आपण बापटांवर का लिहित नाही. याविषयी लेखिका आपल्या 'धरणाच्या पाण्याखाली गेलेली गोष्ट' या लेखात प्रश्न करताना दिसतात. त्या लिहितात, "बापटांच्या मनातल्या या एकूणच साधेपणाचा, नितळपणाचा, ओलाव्याचा अनुभव आपण महाराष्ट्राचा नवा सामाजिक—राजकीय इतिहास लिहिताना फारसा लिहित नाही. किंबहुना बापटांवर आवर्जून लिहितही नाही. असे का होते? भारतीय राजकारणाच्या झळझळत्या बाजूला स्वातंत्र्यांनंतर बापट वावरत राहिले नाहीत म्हणून? पूर्व त्यागाचा हिशेब करणे आणि त्यांनी वलयांकित होणे टाळले म्हणून? सतत काम करणे, झोकून देऊन करणे आणि निःस्वार्थपणे, श्रेयाचा विचार न करता करणे, हे त्यांनी श्रेयस्कर मानले म्हणून? की बापटांचे कार्य इतके महत्त्वाचे नव्हतेच? नाहीच?" अशी प्रश्नार्थक शैली त्यांच्या लेखनात काही प्रमाणात दिसून येते.

## ६.५ अरुणा ढेरे यांच्या लेखनाचे वेगळेपण

प्रस्तुत लेखिकेचे ललित लेखन आत्माविष्कारी आहे. जीवनात त्यांनी जे जे अनुभवले त्याचे चित्रण लेखनात केले आहे. आठवणी अनुभव, सहवासात आलेला निसर्ग, माणसे, संस्कृती, वाचनात आणि ऐकीवात आलेले साहित्य या सर्वांतून त्यांचे ललित लेख निर्माण झाले आहे.

एक स्त्री लेखिका म्हणून त्यांच्या ललित लेखनात आलेले स्त्रीविषयक लेखन महत्त्वाचे व निराळे वाटते. अवघ्या स्त्रियांचे अनुभवविश्व त्यांनी वाचनात आलेल्या साहित्यातील स्त्रियांच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. 'भगव्या वाटा' हा संपूर्ण संग्रह संघर्ष करणाऱ्या स्त्रियांवर अवलंबून आहे. या लेखनात त्यांनी समाजाची, लोकपरंपरेची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी कशा पद्धतीची आहे याचे बारकावे अभ्यासपूर्वक अचूक शब्दात टिपतात.

लेखिकेला अनेक  भाषांचे ज्ञान होते. त्या भाषांतील विविध साहित्य त्यांनी वाचले होते. त्यातील जुन्या संदर्भातून नव्याचा शोध त्या घेताना दिसतात. अशा पद्धतीच्या त्यांच्या लेखन सामर्थ्या विषयी डॉ. स्वाती शिंदे, पवार लिहितात, "जुनेपणातले सारे चांगले सत्त्व बाजूला काढून त्याचे वेगळे जीवनतत्त्व बनवता येण्याची हातोटी अरुणा ढेरे यांच्या लेखनात आहे."[१]

अरुणा ढेरे आपल्या लेखनाविषयी मुलाखतीत सांगतात, "सगळेच जुनं काही टाकून देण्याजोगं नसतं आणि सगळं नवं हे उत्तम असतंच असं नाही. घातक, निरूपयोगी दोन्हीतही असतंच. जुन्यामधलं आजच्या जगण्याला जे उपयोगी आहे त्या गोष्टी उचलाव्यात व लोकांना दाखवून द्याव्यात."[२] लेखिका जुन्या गोष्टींना जास्त भाव देताना दिसतात. जुने साहित्य, जुने लेखक यांच्यावर आठवणींतून भाष्य करताना दिसतात. अशा वेळी त्यांच्या लेखनाने संशोधनाचे रूप घेतलेले दिसून येते. एक संशोधक व कवयित्री म्हणून त्या ललित लेखनात अधिकतेने दिसतात. त्या रामायण महाभारत, इतिहासाच्या गाढया अभ्यासक असल्याने त्यातील विविध संदर्भ त्यांच्या संपूर्ण लेखनात सातत्याने आलेले आहेत.

डॉ. वीणा देव लिहितात, "स्मरणरंजन हा ललितगद्याचा गाभा. उत्तम दर्जाच्या लेखनात केवळ आठवणींचे चर्वण नसते तर त्या लेखकाच्या संवेदनशील मनाचे प्रतिबिंब त्यात सहज उमटलेले असते."[३] आठवणीतील निसर्ग रेखाटताना लेखिकेच्या लेखनात त्यांच्या

संवेदनशील मनाचे दर्शन घडते. त्यांना निसर्गप्रिय होता. त्यामुळे निसर्गविषयक लेखनात त्यांच्या व निसर्गाच्या घटट् नात्याची तीव्रतेने जाणीव होते. निसर्गाविषयी लिहिताना त्यात मानव आणि निसर्ग यांचा आदिमकाळापासून असलेला संबंध शोधण्याचा प्रयास झाला आहे.

लेखिकेने देशात परदेशात प्रवास करून दिशा आणि काळ या दोन्ही अगांनी केलेल्या प्रवासाविषयी लिहिले आहे. या प्रवासात त्यांना भेटलेली माणसे, जाणून घेतलेली माणसांची संस्कृती, स्थळ प्रदेशाविषयी वर्णने लेखनात शब्दबद्ध झाली आहे. या प्रवासातील आठवणी, अनुभव रेखाटताना त्यांना प्रवास करतेवेळी आठवलेले साहित्यातील विविध संदर्भ लेखात जिवंत होऊन उतरतात. 'उद्ध्वस्त राजधानी' या लेखात फत्तेपूर सिक्री येथील बाबरानं बांधलेलं विजयाचे स्मारक पाहिल्यावर लेखिकेला तेथे घडलेला इतिहास आठवू लागतो. या राजधानीत अक्बराच्या जनानखान्यातील जोधाबाईचे आत्मनिवेदन तसेच चतूर बिरबलाचे बुद्धिवैभव इत्यादी घटना त्यांना आठवतात.

माणसाचा नितळ शोध घेणे हे लेखिकेच्या ललित लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. त्यांच्या अधिकशा लेखनातून त्यांनी वेगवेगळया काळातील, प्रांतातील, क्षेत्रातील भल्या माणसांच्या माणूसकीवर भाष्य केले आहे. माणसांची ओढ त्यांच्या मनामध्ये आहे. त्याच ओढीतून त्यांच्या लेखनात साहित्यातून भेटलेल्या पौराणिक, ऐतिहासिक त्याचबरोबर आधुनिक काळातील व्यक्तींचा शोध त्यांनी घेतला आहे.

मानव, घटना प्रसंग, लोकसंस्कृती, समाज मन यांचा खोलात जाऊन तपशीलाने शोध त्या घेताना दिसतात. या लेखनात त्यांनी माणसांच्या स्वभावाचा, वृत्ती–प्रवृत्तीचा सातत्याने शोध घेतला आहे. डॉ. आनंद यादव लिहितात, "ललित गद्य विकसनशील रहायचे असेल तर 'मी'चे व्यक्तिमत्त्व हे अनेकअंगांनी समाजजीवनाशी प्रत्यक्षाच्या पातळीवर भिडणे आवश्यकअसते. तरच ते सतत विकसनशील राहू शकेल आणि तरच त्याच्या व्यक्तिमत्त्वाला नवे नवे कंगोरे फुटत जातील व नव्या नव्या विषयवस्तूही त्याला प्राप्त होत जातील."[४] आनंद यादवांचे हे मत लेखिकेच्या साहित्यनिर्मितीला अनुसरून आहे. लेखिकेच्या लेखनात विषयाची विविधता आहे. अनेक विषयांवर त्यांनी लेखन केलेले दिसून येते. सामाजिक भान त्यांच्या लेखनात दिसते. समाजावर त्या आवर्जून लिहिताना दिसतात. त्यांच्या लेखनातून जीवनदर्शन घडते.

त्यांचे निबंध लेखन अभ्यासल्या नंतर तत्त्वचिंतक, व्यासंगी, विचारप्रवर्तक अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये दिसून येतात.

लेखिकेने आपल्या ललित लेखनातून जीवनाचा अर्थ शोधताना मिथकांचा वापर केला आहे. त्यांच्या मते वर्तमानकाळ भूतकाळाशी संबंधीत असतो. त्यामुळे वर्तमानकाळाचा अभ्यास करताना पुराण, इतिहास यांचे संदर्भ घेणे त्यांना महत्त्वाचे वाटतात. लेखिकेने आपल्या लेखनात सण, उत्सव, शिल्प, साहित्यकृती या सर्व मानवनिर्मित मिथकांशी कसे संबंधीत आहे हे दाखवले आहे. उदाहरणात 'मदनाचा महोत्सव', 'निर्माणशक्तीची पूजा' अशा सारख्या लेखांतून माणूस व निसर्ग यांच्या संबंधांच्या मिथककथांच्या मूळाशी असलेल्या जिव्हाळयाचा, समंजसपणाचा शोध त्या घेताना दिसतात. त्याचबरोबर येणाऱ्या ऋतूशी मानवी मन कसे जोडले गेले आहे यातील गूढ शोधण्याचा त्यांनी बऱ्याच ठिकाणी प्रयास केला आहे.

लेखिकेचे लेखन वाचकांशी संवाद साधणारे आहे. लोकसाहित्याचे तसेच लोकसंस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करणारे आहे. विपुल लेखन व विषय वैविध्य ही त्यांच्या ललित लेखनाची महत्त्वाची वैशिष्टये आहेत. त्यांच्या लेखनाचे स्वरूप प्रगल्भ व विकसनशील असलेले दिसून येते. त्यांचे लेखन चिंतनाच्या व संवेदनाच्या अंगाने झालेले दिसून येते.

लेखिकेच्या लेखनात अनुभवांची व विचारांची समृद्धी जाणवते. त्यांचे लेखन माहितीपर, बोधपर, नीतीपर असलेले दिसून येते. हे लेखन जीवननिष्ठेने, निर्भयतेने झाले आहे. काव्यात्मकता, संवेदनशीलता, भावनाशीलता, चिंतनशीलता, चित्रमयता, आकर्षक भाषा व निवेदनशैली, शब्दप्रभुत्व, त्यात आलेले विचार आणि संदर्भ समृद्धीमुळे त्यांच्या लेखनाला ललित लेखनप्रकाराची गुणवत्ता प्राप्त झाल्याने हे लेखन सकस झालेले दिसून येते. आपल्या प्रतिभाशक्तीच्या बळावर उत्कृष्ट दर्जाचे लेखन करून १९७५ नंतरच्या मराठी साहित्यात अरुणा ढेरे यांनी अनुकूल भर घालून स्वतःची विशेष व वेगळी ओळख निर्माण केलेली आहे.

## ६.६ निष्कर्ष:

१. आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गवर्णनपर लेख, प्रवासवर्णनपर लेख व व्यक्तिचित्रणपर लेख अशाप्रकारांना सामावून घेणारे लेखिकेचे ललित निबंध लेखन आहे.

२. लेखिकेचे अनुभवविश्व विस्तृत व सखोल आहे. विषयाची विविधता त्यांच्या लेखनात दिसून येते. स्मरणरंजन हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहे.

३. जुन्या संदर्भातून नवा अर्थ काढणे, प्रत्येक गोष्टीकडे संशोधकाच्या दृष्टीतून पाहणे हे लेखिकेच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

४. लेखिकेचे मन कलावंताचे, व्यासंगी, रसिक, प्रज्ञावंत, प्रतिभावंत, संशोधकाचे, सौंदयप्रेमी, जिज्ञासू आहे याची साक्ष देणारे त्यांचे ललित निबंध लेखन आहे.

५. लेखिकेने साहित्यात भेटलेल्या स्त्रियांच्या व्यथा वेदना, जीवनानुभव, संघर्षाचे विश्लेषण करून अखिल स्त्रीजीवनाचे दुःख वेदना, जीवनानुभांचे दर्शन घडवले आहे. हे लेखन स्त्री जीवनाबद्दल कळवळयाने झाले असून पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध लेखिकेने परखडपणे लिहिले आहे.

६. स्त्रीचे भावविश्व समजून घेणारी एक स्त्री लेखिका म्हणून लेखिका त्यांच्या ललित लेखनात नेहमीच जाणवत राहतात.

७. लेखिकेचे साहित्यविषयक लेखन वाचकांना अनेक साहित्यिकांविषयी, साहित्यकृतीविषयी माहिती पूरवीणारे झाले असून ते लेखन वाचकांच्या ज्ञानात भर घालणारे आहे. त्यांच्या साहित्यविषयक लेखनात साहित्यकृतींचा व साहित्यिकांचा तुलनात्मक अभ्यास झाला आहे. या लेखनात त्यांनी साहित्यकृतींच्या मूल्यमापनातून त्या त्या साहित्यकृतीचे वेगळेपण, नावीन्य व विशेष सांगितले आहे. त्यांच्या लेखनात आलेल्या अनेक वाङ्मयीन संदर्भातून त्यांच्या अफाट वाचनाची व व्यासंगाची कल्पना येते.

८. निसर्गवर्णनपर लेखनातून लेखिकेने निसर्गसौंदर्याचे चित्रण केले आहे. वेगवेगळया ऋतूंचे, सणवारांचे महत्त्व व वर्णन उदाहरणादाखल केले गेले आहे. या लेखनातून त्यांनी मानव व निसर्ग यांचा आदिम काळापासूनचा संबंध दर्शविला आहे.

९. लेखिकेने देशपरदेशात प्रवास केलेला दिसून येतो. त्यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनपर लेखनात विविध गावांची, प्रदेशांची, पाहण्यात आलेल्या मंदिरांची माहिती आली आहे. तेथिल कोरीव शिल्पांचे सौंदर्यवर्णने करून त्या शिल्पातून प्रतित होणाऱ्या अर्थाचाही उहापोह लेखनात झाला आहे. प्रवासात भेटलेल्या प्रदेशांची, माणसांच्या संस्कृतीविषयी लेखन झाले आहे. अधिकशा लेखात लेखिका उद्ध्वस्त झालेल्या स्थळांविषयी खंत व्यक्त करताना दिसतात. प्रवास करत असताना स्वतःला आलेले अनुभव, मनातील भावभावनाही त्यांच्या लेखनात शब्दबद्ध झालेल्या दिसून येतात.

१०. लेखिकेने आपल्या प्रत्येक व्यक्तिचित्रणात माणसाच्या माणूसपणाचा, चांगुलपणाचा व सामर्थ्याचा शोध घेतला आहे. या प्रकारच्या लेखनात रेखाटलेल्या माणसांचा स्वभावविशेष व कार्यकतृत्त्वाविषयी लेखन झाले असून ती व्यक्तिचित्रणे गुणगौरवपर झालेली दिसतात.

११. लेखिकेचे ललित निबंध लेखन लोकसंस्कृतीचे, लोकसाहित्याचे संरक्षण व संवर्धन करणारे आहे.

१२. काही प्रमाणात चिंतनशीलता लेखिकेच्या लेखनात जाणवत असून हे चिंतन वाचकमनाला विचार करायला प्रवृत्त करणारे आहे.

१३. आत्माविष्कार, काव्यात्मकता, चित्रमयता, काहीप्रमात चिंतनशीलता घटनांचा संदर्भ, व्यासंग व भाषाशैली असे वाङ्मयीन विशेष त्यांच्या ललित लेखनाला लाभले आहे.

१४. लेखिकेची ललित निबंध लेखनाची भाषा लालित्यपूर्ण व मनोवेधक झाली आहे. काहीवेळा त्यांनी साध्या आणि सरळ भाषेत वाचकांना समजेल व आवडेल अशा भाषेत लेखन केले आहे. त्यांची भाषा काव्यात्म, लय, नादयुक्त, संवेदनशील, संस्कृतप्रचूर व काही ठिकाणी गंभीर चिंतनशील बनताना दिसते. त्यांच्या अफाट वाचनामुळे त्यांच्यापाशी अपार शब्दभांडार आहे. त्यातून लेखनातील अनुभवांना अनुरूप असेच शब्द त्यांनी निवडलेले दिसतात. योग्य

शब्दांच्या माध्यमातून, परिणामकारक निवेदन, विश्लेषण करण्याची क्षमता त्यांच्या लेखणीत असल्याचे दिसून येते. त्यांच्या भाषेत नेमकेपणा, सहजता, जिव्हाळा, भावना, संवेदना प्रकर्षा ने जाणवतात. त्यामुळे त्यांचे ललित निबंध लेखन अभिजात वळणाचे झालेले दिसून येते.

१५. ललित निबंध लेखनाला आवश्यक असणारे सर्व गुण लेखिकेच्या लेखनाला लाभले असल्याने मराठी ललित लेखनाच्या प्रवाहात त्यांचे लेखन महत्त्वाचे ठरते.

## ६.७ संदर्भ सूचीः

१. शिंदे स्वाती, 'अरुणोदय', संस्कृती प्रकाशन, पुणे, प्र. आ., २०१९, पृ. १४१

२. तत्रैव, पृ. २१३

३. ढेरे अरुणा, 'शाश्वताची शिदोरी', "निवडक आणि प्रस्तावना–वीणा देव", अभिजात प्रकाशन, पुणे, द्वि. आ., २०१४, पृ. १०

४. यादव आनंद, 'ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रणः २०१६, पृ. ८४ ,८५

# प्रकरण सातवे

# समारोप

# प्रकरण सातवे

# समारोप

## ७.१ प्रस्तावना

“१९६० नंतरच्या स्त्री निबंधकारांच्या ललित निबंधांचा चिकित्सात्मक अभ्यास (शान्ता ज. शेळके, सुनीता देशपांडे, इंदिरा संत, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे)” या विषयाचा अभ्यास एकूण सहा प्रकरणांमध्ये मांडलेला आहे. या सहाही प्रकरणांतून केलेल्या अभ्यासाचा या सातव्या प्रकरणात सार रूपाने परामर्श घेऊन अभ्यासातून हाती आलेले निष्कर्ष येथे नोंदविले आहेत.

या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात निबंध लेखनाचे स्वरूप व वाटचालीचा अभ्यास केला आहे. प्रकरणाच्या सुरुवातीला ‘निबंध’ या संकल्पनेचा विचार करून वैचारिक व ललित निबंध लेखनाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यानंतर निबंधाच्या उपप्रकारांच्या स्वरूपाविषयी विवेचन केले आहे. त्यामध्ये आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गवर्णनपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख व चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख या ललित निबंध लेखनाच्या उपप्रकारांचा थोडक्यात विचार केला आहे. त्यानंतर निबंध लेखनाची वाटचाल स्पष्ट करून शेवटी निष्कर्ष मांडलेला आहे.

प्रकरण क्रमांक दोन, तीन, चार, पाच व सहामध्ये लेखिका शान्ता शेळके, सुनीता देशपांडे, इंदिरा संत, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे यांच्या निबंध लेखनाचा आशयाच्या व अभिव्यक्तिच्या दृष्टीने अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबरीने या पाचही लेखिकांच्या निबंध लेखनामागच्या प्रेरणा व भूमिकाही जाणून घेतल्या आहेत. त्यांच्या ललित निबंध लेखनाचे साधारणपणे आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गवर्णनपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख व चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख असे वर्गी करण केले आहे. त्या आधारे लेखिकांच्या निबंध लेखनातील आशयाचा सखोल अभ्यास केला आहे. त्यानंतर लेखिकांच्या निबंध लेखनाच्या प्रकटीकरणाचा विचार करत असताना अभिव्यक्तीचे स्वरूप, आत्माविष्कार, काव्यात्मकता, चित्रमयता, चिंतनशीलता, घटनांचा

संदभ, व्यासंग व भाषाशैली असे विभाजन करून या मुद्यांच्या आधारे वाङ्मयीन विशेषांचा शोध घेतला आहे. या पाचही लेखिकांचा व्यासंग अफाट आहे. त्यांची भाषाशैली तपासली तर त्यांच्या लेखनात विचारगर्भित वाक्ये, म्हणी, वाक्प्रचार, इतर कवींच्या कवितेतील ओळी, गीते, इंग्रजी—हिंदी शब्दांचे व वाक्यांचे उपयोजन, संवाद, प्रश्नार्थक शैली असे अनेक घटक आढळतात. यासर्वांचा विवेचनात्मकअभ्यास येथे केला आहे.

## ७.२ निवडक लेखिकांच्या लेखनाचा अढावा

'निबंध' म्हणजे एखाद्या विषयावर अनेक विचारांची केलेली गुंफण. एखाद्या विषयावर अनेक विचार एकत्रित आणून त्यांची नीट बांधणी करणे. विशिष्ट एखाद्या विषयावर निबंधकाराला जसे विचार सूचतात त्या विचारांची सुयोग्य अशी मांडणी तो आपल्या निबंधात करत असतो. निबंधकाराला निबंधविषय निवडायला स्वतंत्रता असते. आपल्याला हव्या त्या विषयाला तो प्राधान्य देऊ शकतो. निबंधातील विषय निवडायला जशी मर्यादा नसते; तशी निबंधातील विषयाच्या विवेचनालाही मर्यादा नसते. निबंधकाराला याबाबतीत कोणतेही बंधन नसते. हे वैचारिक व ललित निबंध या दोहोंच्या बाबतीत तितकेच सत्य आहे.

वैचारिक निबंधात विचाराला जास्त प्राधान्य असते. समाजाला तर्कशुद्ध विचार देणे आणि बोध करणे अशी त्याची भूमिका असते. या विचारांच्या मुळाशी चिंतन हा घटक तितकाच महत्त्वाचा ठरतो. एखाद्या विषयावरील विचार वैचारिक निबंध लेखनात मांडत असताना वापरणाऱ्या भाषेला विवेकनिष्ठ आणि सुस्पष्टता, सूत्रबद्धता या वैशिष्ट्यांची गरज आहे.

१८१८ या काळात मराठीत माहितीपर, वैचारिक स्वरूपाचे निबंध रचले गेले. बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, कृष्णशास्त्री चिपळूणकर या व अशा आधुनिक लेखन माध्यमाचे उपयोजन करण्याच्या विचारांनी भारलेल्या अगणित दिग्गज विचारवंतांनी नियतकालिकात तसेच स्वतंत्र पुस्तकात निबंध लिहिले. त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्वरूपाची जनजागृती घडवून आणण्यासाठी निबंध लेखन केले.

स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच स्वातंत्र्योत्तर काळातही वैचारिक निबंध लेखन होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील निबंधकारांच्या लेखनात आक्रमकता, आवेश, अन्यायाची चीड आणि

स्वातंत्र्याविषयी आस दिसून येते. तर स्वातंत्र्योत्तर काळातील वैचारिक निबंधातील आक्रमकतेबरोबर नवी समाज निर्मितीची इच्छा जाणवते. स्वातंत्र्यपूर्व काळातील वैचारिक निबंधावर समता, व्यक्तिस्वातंत्र्य अशा मूल्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. स्वातंत्र्यानंतर वैचारिक निबंध लेखनाच्या अंतरंगात तसेच बाह्यगांत बदल झालेला दिसतो. आजच्या वैचारिक निबंधातील विचार लेखकाच्या अनुभवविश्वातून साकार झालेले आहेत.

१८१८ ते १९२० हा निबंध लेखनाचा कालखंड आहे. त्यानंतर १९२० च्या आगे मागे लेखकांची नवी पिढी उदयाला आली. त्यांनी लिहिलेला आत्मपर निबंध आकाराने लहान आणि वाचनाच्या दृष्टीने आकर्षक व जुन्या काळातील निबंधापेक्षा अधिक रंजक आहेत. आत्मनिष्ठ अनुभव, अनुभवातील भाववृत्तीशी तन्मय होणारी भाषा, प्रमाणबद्ध मांडणी, प्रसन्न भाषाशैली, व्यक्तिमत्त्वाचे आवश्यक तेवढे दर्शन, मार्मिक विचार, विनोद दृष्टी अशा गुणांमुळे या काळात लिहिणाऱ्या फडके, खांडेकर व काणेकर यांचे लघुनिबंध सरस झालेले आहेत.

१९५० नंतर लघुनिबंध लेखन नामक या साहित्यप्रकाराची नव्याने मांडणी होत गेलेली दिसते. हा साहित्यप्रकार नव्या जाणिवांनी प्रेरित होऊन नव्या स्वरूपात साहित्यात आला. येथे आत्माविष्काराला महत्त्व आले. संवेदनशील लेखकांनी भावात्मकता, कल्पनाविष्कार आणि सामाजिक चैतन्याच्या बैठकीवर उजर्स्वल ललित निबंध लेखन केलेल दिसून येते. मानवी मनातील भावभावनांना या साहित्यप्रकाराने वाट करून दिली आहे. या लेखनात व्यक्तिमत्त्व आणि आशयविषय एकरूप झालेले असतात. लेखकाने स्वतःच्या जीवनात प्रत्यक्ष घडलेल्या घटना प्रसंगांचे, त्यांना भेटलेल्या माणसांचे संदर्भ घेऊन आपले विचार लालित्याच्या भाषेत, वाचकांना भावेल अशा पद्धतीने मांडले आहेत. लालित्य हा त्याचा गाभा आहे. ललित निबंध या प्रकारात केवळ लालित्यालाच महत्त्व नसून कल्पना, भावना आणि विचार यांनाही तितकेच महत्त्व असलेले दिसून येते. आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्ग वर्णनपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख व चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशाप्रकारांना सामावून घेणारा ललित निबंध हा साहित्यप्रकार आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात विपुल प्रमाणात ललित निबंध लिहिले गेले आहेत. प्रभाकर पाध्ये, रा. भि. जोशी, गंगाधर गाडगीळ, आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर, इरावती कर्वे, दुर्गा भागवत,

शान्ता शेळके, शिरीष पै, शरदिनी डहाणूकर, गिरिजा किर, इंदिरा संत, अरुणा ढेरे अशा लेखक लेखिकांनी समृद्ध असे ललित लेखन केलेले दिसून येते.

दुसऱ्या प्रकरणात लेखिका शान्ता शेळके यांच्या ललित निबंध लेखनाचा अभ्यास केला आहे. शान्ता शेळके यांनी आपल्या निबंधातून जीवनाचे चित्रण केले आहे. त्यांच्या आत्मपर लेखनात बालपण, तरुणपण ते नोकरीतून निवृत्त होईपर्यंतच्या आठवणी आल्या आहेत. हे लेखन स्मरणरंजनपर आहे. बालपणातील आठवणी सांगण्यात लेखिका रमताना दिसतात. ज्या गावात, माणसांच्या सहवासात त्या वाढल्या, त्या गावाशी, माणसांशी असलेले ऋणानुबंध त्यांच्या लेखनात व्यक्त झालेले दिसतात. आठवणी सांगत असताना त्यांचे विस्तृत चित्रण लेखनात झालेले दिसते. त्यांचे शिक्षण, त्यांच्या मनोविकासाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरलेल्या त्यांच्या शाळा—कॉलेजीस, शिक्षक—शिक्षिका, त्याचे विद्यार्थी मित्र—मैत्रिणी यांच्या सहवासातील आठवणी सांगून, स्वतःच्या जडणघडणीचा शोध त्यांनी घेतला आहे. स्वतःच्या लेखनाच्या गुण दोषांची नोंदही लेखिका घेते. त्यांच्या लेखनात त्यांच्या शेळक्यांच्या वाडयाविषयी, शिक्षिकेच्या नोकरीविषयी, सहसंपादकाच्या कामाविषयी, मुंबईच्या चाळीस वर्षा ंच्या प्रदीर्घ कालखंडातील जीवनाविषयी लेखन झाले आहेत.

त्यांच्या आत्मपर लेखनात आत्मीयता, स्नेहभाव, कृतज्ञतेची भावना व्यक्त होताना जाणवते. त्यांचे आत्मनिवेदनपर लेखन केवळ गोड आठवणीतूनच निर्माण झालेले दिसत आहे. केवळ गोड आठवणी लिहून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि साहित्यिक जीवनावर प्रकाश टाकण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

लेखिकेने काही मोजकेच स्त्रीविषयक लेख लिहिले आहेत. या लेखांची संख्या कमी असली तरी त्यांच्या आठवणी अनुभवांवर आधारित लेखांमधून त्यांनी स्त्रीच्या जीवनातील विविध समस्यांचा, दुःखाचा आढावा घेतला आहे. ज्या घरात त्या वाढल्या त्या कुटुंबातील स्त्रीजीवन, आजूबाजूला भेटलेल्या स्त्रियांच्या जीवनाविषयीचे अनुभव लेखनात चित्रित झालेले दिसून येतात. या लेखनात लेखिकेने स्त्रीजीवनातील विविध समस्यांचा शोध वेगवेगळया पातळीवरून घेतलेला दिसून येतो. लहान वयातील मुलीचे प्रश्न, कुरूप स्त्रीचे दुःख, अपंग, प्रौढ कुमारीकेचे दुःख, विधवा स्त्रीचे दुःख अशा विविध अवस्थेतील स्त्रीजीवनाचा वेध लेखिकेने

घेतला आहे. या लेखनात मांडलेले दुःख अखिल स्त्री जातीचे आहे. स्त्रियांच्या व्यथा वेदना जाणून घेताना स्त्रीची मानसिकता त्यांनी नेमकेपणाने हेरली आहे. त्यांचे स्त्रीचित्रण वास्तव स्वरूपाचे असून ते प्रभावी झाले आहे. स्त्रीजीवन दर्शवताना लेखिकेने स्त्रियांची संवेदनशीलता आणि भावनाशीलतेचे यथार्थ दर्शन घडविले आहे. त्यांचे स्त्रीविषयक लेखन आजच्या आधुनिक जगातील स्त्रीला स्वतःविषयी विचार करायला भाग पाडणारे आहे.

लेखिकेचा व्यासंग अफाट आहे. मराठी बरोबरीने इंग्रजीसारख्या इतर भाषेतील साहित्याचे वाचन करून त्या साहित्यावर व साहित्यिकांवर आधारित अनेक लेख लेखिकेने लिहिले आहेत. त्यांच्या अफाट वाचनामुळे त्यांना साहित्याविषयी नेमकी जाण होती. त्यामुळे त्यांच्या लेखनातून साहित्यविषयक सकस विवेचन झालेले दिसते. वाचलेल्या साहित्यकृतीचे विशेष, वेगळेपण, नावीन्य दाखवून देत असताना साहित्यकृतीचे मूल्यमापन करून त्या साहित्यकृतीचे गुणदोषही त्यांनी नेमकेपणाने टिपले आहेत. काही कलावंताच्या निर्मितीप्रक्रियेविषयी लिहिताना निर्मितीप्रक्रियेचे विविध पैलू त्या कलावंताच्या तसेच इतरांच्या दृष्टिकोणातून त्यांनी व्यक्त केले आहे. हे लेखन समीक्षात्मक पद्धतीचे झाले आहे. शिवाय एखादा वेगळा शब्द वाचनात आला की, त्याचा मागोवा घेत अर्थ लावणे यातून त्यांचे अनेक साहित्यविषयक लेख निर्माण झाले आहे. त्यांच्या लेखनात त्यांच्या स्वतःच्या वाङ्मय निर्मितीवरही विवेचन झालेले दिसते. वेगवेगळया कवितेच्या ओळी घेऊन त्यातील आस्वादक दृष्टया अर्थ स्पष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. हे लेखन प्रगल्भ भाषेत झाले असून या लेखनातून विविध शब्दांची, साहित्यकृतींची तशीच साहित्यिकांची ओळख होते.

प्रवासात उपभोगलेल्या प्रत्येक लहान मोठया क्षणांनी लेखिकेच्या लेखनात शब्दरूप घेतले आहे. प्रवासात पाहिलेली स्थळे अनुभवलेले क्षण, घडलेले प्रसंग त्यांच्या लेखनात तपशीलाने मनोवेधक शैलीत आविष्कृत झाले आहेत. या लेखनातून लेखिकेच्या रसिक, सौंदर्यवेधी, प्रवासाची आवड असलेल्या मनाची नेमकी ओळख होते.

लेखिकेचे व्यक्तिचित्रणाचे दोन स्वतंत्र संग्रह प्रकाशित झाले आहे. माणसांबद्दल त्यांना अपार कुतूहल होते. विविध क्षेत्रांतील अनेक दिग्गज व्यक्तींशी त्यांचा घट्ट ऋणानुबंध जुळला होता. त्यांच्या प्रत्ययकारी भाषेने त्या माणसांना जिवंतपणे चित्रित केले आहे. कौटुंबिक, प्रकाशकाची,

संगीत क्षेत्रातील व्यक्तींची, चित्रपट क्षेत्रातील व्यक्तींची, गुरुवर्यांची, साहित्य क्षेत्रातील व्यक्तींची अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींची चित्रणे लेखिकेने रेखाटली आहेत. लेखिकेला जीवनात ज्या ज्या माणसांचा दीर्घकाळ सहवास लाभला, ज्या माणसांनी त्यांच्याशी जिव्हाळयाची, आपुलकीची भावना ठेवली अशा माणसांच्या अंतर्बाह्याचा वेध त्यांनी घेतलेला दिसतो. विद्यार्थी दशेत किंवा नोकरी करत असताना ज्या व्यक्तींनी, त्यांच्या मनावर संस्कार केले, त्यांच्या जीवनाला दिशा दिली अशा माणसांविषयी लेखनात कृतज्ञतेचे भाव प्रकट झाले आहेत. त्यांना विशेष आवडणाऱ्या माणसांची सतत आठवण राहिल, त्यांच्यातला जिव्हाळयाचा धागा कायम राहील यासाठी त्यांनी व्यक्तिचित्रणे लिहिली आहे असाच भाव त्यांच्या या लेखनातून प्रतित होतो.

लेखिकेच्या अनेक लेखांनी चिंतनाची पातळी गाठलेली आहे. दैनंदिन जीवनातील एखादी गोष्ट, अनुभव, लहान मुल, साहित्यिक, नाते संबंध, मानवी स्वभाव किंवा मनात अचकित येऊन जाणारा विचार अशा अनेक विषयांसंबंधी त्यांच्या लेखनात विचारमंथन झाले आहे. त्यांनी मांडलेले विषय साधे वाटले तरी ते चिंतनगर्भ आहेत. लेखिकेचे हे लेखन वाचकांना अंतर्मुख करून विचार करायला लावणारे तसेच जीवनाविषयी मार्गदर्शन करणारे आहेत.

लेखिकेच्या ललित निबंध लेखनाचे स्वरूप वाचकांना सहज जाणवेल अशा पद्धतीचे आहे. अगदी साध्या व सोप्या भाषेत त्यांनी त्यांच्या लेखांचा आशय प्रतिपादन केलेला दिसून येतो. त्यांच्या ललित निबंध लेखनाची भाषा वाचकांना प्रसन्न करणारी आहे. वाचकाला गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य लेखिकेच्या भाषेत आहे असे म्हणता येते.

लेखिका सुनीता देशपांडे यांचे निबंध लेखन संख्येने कमी असले तरी त्यांच्या लेखनात अनुभव कथनाबरोबरीने संवेदना, भावना आणि विचार आल्याने या लेखनाला निराळे रूप लाभले आहे. त्यांचे निबंध लेखन आत्माविष्कारी आहे. बालपणातील मनात खोलवर रूतून बसलेल्या, मनाला सुखावणाऱ्या आठवणीं, बालपणात खेळलेले खेळ, त्यांच्या माहेरच्या गावाकडचे दिवस, शुटिंगच्या वेळच्या आठवणी, निसर्ग सहवासातल्या आठवणी, स्वातंत्र लढयात भाग घेतल्यावेळी आलेले विचित्र अनुभव, पु. ल. देशपांडेविषयी आठवणी, सहवासात आलेल्या माणसांविषयी आठवणी, अन्य भाषेतील भावलेल्या कलाकृती अशा विविध विषयांतून लेखिकेचे

निबंध लेखन साकार झाले आहेत. भूतकाळात घडून गेलेल्या बालपणातील व तारुण्यातील मनाच्या गाभाऱ्यात जपून ठेवलेल्या आठवणी लेखनात मांडून आपल्या भूतकाळात त्या पुन्हा एकदा डोकावून पाहतात. त्यांचे बरेचसे लेख पुलंच्या मृत्यूनंतर लिहिले असल्याने अधिकशा लेखांमधून पु. ल. देशपांडे यांच्याविषयी आठवणी आल्या आहेत. या घटनेनंतर लेखिकेला आलेलं एकटेपण, उदासीनता, चिंतनशीलता त्यांच्या बहुतेक लेखांमध्ये आढळते.

लेखिकेच्या लेखनात निसर्गप्रेम अधिकतेने जाणवते. त्यांच्या अनुभवातून साकार झालेल्या चराचर सृष्टीतल्या चैतन्याचा, त्यांच्या सुख दुःखात त्यांना साथ देणाऱ्या सर्वस्पर्शी निसर्ग सृष्टीतील, प्राणीसृष्टीतील अनुभव त्यांच्या लेखनातून व्यक्त होतात. या लेखनातील 'मी' हा निसर्गात रमणारा, निसर्गातील भाव समजून घेणारा आणि त्या निसर्गाबरोबर संवाद साधणारा आहे. निसर्गाला हानी पोहचवणाऱ्या माणसाच्या स्वभावातील कमकुवतपणा आणि त्या मनुष्य स्वभावाचा राग रोष त्यांच्या लेखांमध्ये व्यक्त झाला आहे. निसर्गाचे संरक्षण हे माणसाचे संरक्षण आहे. हे सत्य त्यांनी आपल्या लेखनात विविध उदाहरणातून पटवून दिले आहे. निसर्गाविषयी प्रत्येक माणसात कृतज्ञता असावी असे त्यांना मनापासून वाटत असते. त्यांचे निसर्गचित्रण वाचक मनावर प्रचंड परिणाम करणारे आहे.

लेखिकेच्या लेखनातील व्यक्तिचित्रणे स्वानुभवातून साकार झाली आहेत. त्यांच्या व्यक्तिचित्रांचे स्वरूप विविधांगी आहे. व्यक्तींची शरीरवर्णने, स्वभाववर्णने, व्यक्तींची घरे, त्यांचा कौटुंबिक तपशील, त्यांच्या वाटयाला आलेले अपयश, त्यांचे कार्यकर्तृत्त्व याचा जो ठसा त्यांच्या मनावर उमटला त्यातून त्यांची व्यक्तिचित्रणे निर्माण झाली आहेत. या माणसांच्या वियोगाने त्या अस्वस्थ होताना जाणवतात. त्यांच्या समवेत त्यांनी जगलेले क्षण आठवून त्यांच्या स्वभावाचा, त्यांच्या वागणूकीचा गुढार्थ शोधायचा प्रयत्न करतात.

लेखिकेच्या लेखनात त्यांचा जीवनाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निदर्शनास येतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विकारांचा स्पर्श झालेला जाणवत नाही. सतत सत्याचा आदर करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या लेखनातून प्रतित होते. माणसाच्या जीवनाला उपकारक असे सद्सद्विचार देण्याचे लेखिकेचे एक ध्येय त्यांच्या लेखनातून दिसून येते.

अतिशय गंभीरपणे अनुभवांच्या प्रामाणिकपणातून त्यांचे लेखन झाले आहे. त्यांचे काही लेख अंतरीच्या उमाळयाने उमलून आलेले आहे. त्यामुळे त्यांच्या मनातील कोवळीक वाचकांना स्पर्श करत राहते. संवेदना आणि भावना त्यांच्या लेखनात जागोजागी सापडतात. अनेक संदर्भानी समृद्ध झालेले त्यांचे लेखन; चिंतनशीलता आणि त्याबरोबरीने येणारे विचार याने एकरूप झालेले दिसून येते. त्यांच्या विचारांना भावनांची साथ आहे. कोणत्याही विषयावर लिहित असताना प्रश्न विचारून शंका उपस्थित करणे अशा पद्धतीचे त्यांचे लेखन आहे. चिंतनशीलता व वैचारिकता हे त्यांच्या लेखनाचे महत्त्वाचे विशेष असून त्यांच्या मोजक्याच शब्दकळेने वाचकांचे मन वेधून घेतलेले दिसून येते.

लेखिका इंदिरा संत यांचे 'मृद्गंध'आणि 'फुलवेल' हे केवळ दोन लेखसंग्रह प्रकाशित झाले असले तरी त्यामधील लेखांची संख्या अधिकआहे. त्यांचे लेखन स्वानुभवांशी निगडित आहे. त्यांच्या निबंध लेखनात त्यांचे बालपण ते नोकरीतून निवृत्तहोईपर्यंतच्या आठवणी आल्या आहेत. बालपणातील आठवणी, वैवाहिक जीवनातील अनुभव–आठवणी, नवऱ्याविषयी आठवणी, मुलांच्या आठवणी, नोकरीचे दिवस, निसर्ग सानिध्यातले अनुभव, त्यांना आवडलेली माणसे, वाचनात आलेले साहित्य, स्त्री म्हणून त्यांचा जीवनसंघर्ष अशातून त्यांचे ललित निबंध लेखन साकार झाले आहेत. जीवनातील सुख दुःखे, ताणतणाव, त्यांच्या मनातील भावभावना त्यांच्या लेखनात अनुभवांच्या अनुषंगाने व्यक्त झाल्या आहेत. त्यांनी उपभोगलेले बालपण, त्या बालपणातील तसेच सासरच्या सुखदुःख मिश्रित आठवणी लेखात तपशीलाने आविष्कृत झाल्या आहेत. त्यांच्या जीवनात त्यांना शतपावली, झोपाळा, झाडे, घराची खिडकी यांनी दुखःच्यावेळी साथ दिली होती. त्यामुळे यांवर लेखिकेने आत्मीयतेने स्वतंत्र लेख लिहिले आहेत.

लहानपणापासून नकळत मनात जपून ठेवलेल्या आठवणी व अनुभवांना लेखिकेने आपल्या ललित निबंध लेखनातून वाट करून दिली आहे. त्यांच्या लेखनात शब्दबद्ध झालेल्या सुखदुःख मिश्रित लहान–मोठया घटना–प्रसंगातून त्यांच्या आयुष्याविषयी माहिती मिळते. जीवनातील सुखकारक आठवणी सांगताना त्यांच्या प्रसन्न वृत्तीचे दर्शन घडते. अतिशय प्रांजळपणे त्यांच्या जीवनातील आठवणी अनुभव शब्दबद्ध झालेले दिसून येतात.

त्यांच्या आत्मपर लेखनात त्यांच्या जन्मभूमी व कर्मभूमीशी समरस झालेल्या संवेदनशील मनाचे दर्शन घडते. खेडयातील निसर्गसानिध्यात घेतलेले जीवनानुभव व कालांतराने वैवाहिक जीवनात आलेले अनुभव त्यांच्या व्यक्तिमत्त्वासह लेखात व्यक्त झाले आहेत. या आठवणी अनुभवांच्या अनुषंगाने लेखिकेच्या स्वभावाची, वृत्तीची, आवडीनिवडीची ओळख पटत जाते. माणसावर आणि निसर्गावर अतिव प्रेम करणारे हे व्यक्तिमत्त्व आहे. बालपणातील आठवणी लेखनात अतिशय सूक्ष्मरित्या माडंलेल्या असून अगदी सरळ साध्या व सोप्या भाषेत त्यांच्या आठवणी लेखात चित्रित झाल्या आहेत. काही लेखांना कथेचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. त्यांनी अधिकशा लेखनात त्यांच्या बालपणात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण कशी झाली याचा शोध घेतला आहे. जीवनाकडे आशावादी दृष्टिकोनातून पाहणारे हे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या आठवणी अनुभव रेखाटनातून त्यांच्या रसिक, चिंतनशील, संवेदनशील, भावनाशील अशा व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश पडतो.

लेखिकेने स्त्रीविषयक लेखनात स्वतःच्या अनुभवातून स्त्रियांचे वेगळे असे अनुभवविश्व आविष्कृत केले आहे. स्त्रीच्या भावभावना, स्त्रीच्या वैवाहिक जीवनातील प्रश्न, सासरी होणारी अवहेलना त्यामुळे सोसावे लागणारे दुःख वेदना याविषयी लेखन करताना त्या भावविवश होताना जाणवतात. स्वतःचे अनुभव रेखाटताना ते रेखाटन वरवर न करता त्या अनुभवांच्या अनुषंगाने अखिल जगातील स्त्रीच्या व्यथा वेदनांचे चित्रण त्यांनी परिणामकारकबनवले आहे. स्त्रीविषयक भाष्य करताना स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारावे अशी भूमिका आपल्या लेखातून लेखिकेने घेतलेली दिसते.

बालपणात वाचलेल्या साहित्यावर व साहित्यिकांवर लेखिकेने लिहिले आहे. त्यांना आवडलेल्या साहित्यकृतीचे रसग्रहण, त्यांना भावलेला अर्थ सांगत असताना त्या साहित्याचे आणि साहित्यिकांचे श्रेष्ठत्त्व त्यांनी नेमकेपणाने उलगडून दाखवले आहे. संस्कृत, मराठी, इंग्रजी या भाषांतील साहित्य वाचनाचे पडसाद त्यांच्या लेखातून उमटले आहेत. साहित्यातील चांगले–वाईट, वेगळेपण, नावीन्य, विशेष त्या नेमकेपणाने दाखवून देतात. अशाप्रकारच्या लेखनातून त्यांच्या अफाट व्यासंगाचे आणि तीव्र स्मरणशक्तीचे दर्शन घडते. या लेखांना स्पष्टीकरणात्मक तसेच दिर्घ स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

लेखिकेने कुटुंबातील, साहित्य क्षेत्रातील आणि संगीत क्षेत्रातील मोजक्याच व्यक्तींची चित्रणे आत्मीयतेने लिहिली आहेत. त्या व्यक्तींचा स्वभाव, त्यांच्या सवयी, त्यांचे आचार विचार, शरीरवर्णने, पोषाक, घरदार व त्यांच्या कार्याचा आढावा लेखिकेने आवर्जुन घेतलेला दिसून येतो. साहित्यिकांच्या किंवा गीतकारांच्या सहवासातील गोड आठवणी सांगत असताना त्यांनी चारही व्यक्तिचित्रणात त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वातील कंगोरे उलगडून दाखविले आहेत. लेखिका व त्या व्यक्तींचा अतूट स्नेहबंध, व्यक्तिबद्दल आदरभाव लेखात प्रकर्षाने व्यक्त झालेला दिसून येतो.

लेखिकेचे लेखन प्रत्येक गोष्टीचा सर्वांगीण विचार करत वाचकाला विश्वासात घेऊन विषयाच्या सर्व बाजू उलगडून दाखवणारे आहे. अनुभवांच्या अनुषंगाने त्यांच्या लेखनात चिंतनाला सुरुवात होते. त्यांच्या लेखनात अधिकतर मानव जीवनावर चिंतन झालेले दिसते. माणसांच्या स्वभावावर चिंतन करत असताना त्यांचे प्रगल्भ विचार प्रभाविरित्या लेखनात व्यक्त झाले आहे. लेखिकेने समाजातील विषमतेवर चिंतन करून आपल्या समंजस दृष्टीने पारखून घेतलेले विचार सह्रदयतेने, साधेपणाने आपल्या लेखनात व्यक्त केले आहे. कोणत्याही गोष्टीवर बारकाईने विचार करून लेखिका त्यावर दिशादर्शक विचार मांडताना दिसतात.

लेखिकेचे निबंध लेखन माहितीपर तसेच नीतीपर आहे. त्यांच्या ललित लेखनाची मांडणी स्पष्टीकरणात्मक, विवरणशील आहे. त्याचे ललित निबंध लेखन पूर्णता नव्या परंपरेशी नाते जोडणारे आहे. एखादा विषय घेऊन त्या अनुषंगाने अनेक संबंधीत अनुभव आठवणी सांगून त्यावर आपली मते, विचार प्रकट करणे अशा पद्धतीचे त्यांचे लेखन आहे. जीवनातील लहान मोठे अनुभव तपशीलाने सांगणे व लेख आकर्षक भाषेत लिहिणे ही त्यांच्या लेखनाची महत्त्वाची वैशिष्टये आहे. त्यांनी अल्प प्रमाणात ललित निबंध लेखन केले असले तरी त्यांच्या निबंध लेखनाने मराठी ललित निबंध लेखनात विशेष अशी भर घातलेली दिसून येते.

साठोत्तरी मराठी साहित्यविश्वात आपल्या ग्रामीण साहित्यनिर्मितीने महत्त्वाचे स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून लेखिका प्रतिमा इंगोले या सर्वश्रुत आहेत. त्यांनी ललित व वैचारिक अशा दोन्हीं प्रकारचे निबंध लेखन केले आहे. त्यांचे निबंध लेखन संख्येने कमी असले

तरी त्या लेखनाने मराठी ललित निबंध लेखनात तसेच मराठी ग्रामीण साहित्यात विशेष स्वरूपाची भर घातलेली दिसून येते. त्यांनी आपल्या ललित लेखनात बालपणातील अनुभव, आठवणींचे, ग्राम संस्कृतीचे, स्त्रीजीवनाचे, प्रवासातील अनुभवांचे कथन केले आहेत.

त्यांच्या आत्मपर लेखनात त्यांनी बालपणातील अनुभव, आठवणी मांडून त्या अनुभवांच्या माध्यमातून माणसांच्या मनाचा, ग्राम संस्कृतीचा वेध घेतलेला दिसतो. पूर्वी बालपणात अनुभवलेल्या संस्कृतीविषयी अनुभव मांडून आजच्या आधुनिक काळात बदललेल्या संस्कृतीवर त्या परखडपणे लिहिताना दिसतात. बालपणातील काळ आजच्या काळाहून चांगला होता हे सांगण्यासाठी त्यांनी स्वतःच्या बालपणातील अनेक घटना—प्रसंगाचे चर्वण करून स्वतःच्या लेखीच्या वागण्यातून आधुनिक काळातील जीवन दर्शविले आहे.

लेखिकेने जुन्या काळातील लोककथा, लोकगीते यांचा अभ्यास करून त्यांचे महत्त्व आपल्या ललित लेखनात विशद केले आहे. त्यांच्या बालपणातील जुना काळ व आजच्या यंत्रयुगीन आधुनिक काळाची तुलना त्यांनी लोकगीतांच्या आधारे केलेली दिसते. लोककथा, लोकगीतांमध्ये जो जिव्हाळा, जी प्रेमभावना दिसते ती आजच्या काळात हरवल्याची खंत लेखनात जागोजागी व्यक्त झाली आहे. त्यांच्या आत्मपर लेखनातून प्रवासाची ओढ, प्रेमळ, सोशिकवृत्ती, संवेदनशील, प्रामाणिक, कलाप्रेमी असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैंलू दिसून येतात. स्वतःला व्यक्त करण्यासाठी तसेच लोकसंस्कृतीचे जतन झाले पाहिजे या हेतुनेही त्यांचे लेखन झालेले दिसते.

लेखिका आपल्या ललित निबंध लेखनातून स्त्री जीवनाचा सर्वांगीण वेध घेताना दिसतात. आपल्या समाजात पुरुषसत्ताक पद्धतीमुळे स्त्री जीवनाची, स्त्री मनाची कशी कुचंबणा होते हे सांगत असताना स्त्रीचे पुरुषाहून निराळे अनुभव, तिचे बोलणे—वागणे, तिच्या भावभावना इत्यादींचे दर्शन लेखिकेने लोकगीतांच्या आधारे घडविले आहेत. ग्रामीण भागात वावरणाऱ्या स्त्रीला रेखाटताना स्त्रियांचा उदार स्वभाव, मनाची हळवी जागा, संवेदनशीलता, स्वतःचा विचार नकरता तिचा कुटुंबकल्याणाचा विचार, नवऱ्याचा मान राखणारे स्त्रीमन अशा स्त्रीस्वभाचा वेध घेणारे लेखिकेचे लेखन आहे. लेखिकेने आधुनिक स्त्री जीवनावरही भाष्य केले आहे. त्यांनी लोकगीतांच्या आधारे आपल्या लेखनात स्त्रीचे इतरांशी असलेल्या

नात्यातील बारकावे टिपले आहे. स्त्रीच्या संवेदनशील वृत्तीचे दर्शन त्यांच्या लेखात सातत्याने घडते.

लेखिकेच्या लेखनात स्त्रियांचा भाषिक वेगळेपणा जाणवतो. स्त्रीजीवनाचा विचार लेखिकेने साध्या व सरळ सामान्य माणसाला सहज समजेल अशा भाषेत केला आहे. लेखनात लोकगीतांचा वापर केल्याने लोकसाहित्याचे स्वरूप या लेखनाला प्राप्त झाले आहे. त्यांचे स्त्रीविषयक लेखन समाज मनाचे, लोकश्रध्दांचे, संस्कृतीचे, ग्राम जीवनाचे अचूक ज्ञान देणारे ठरते. या लेखनात वापरलेल्या स्त्रीसुलभ भाषेतील निवेदनामुळे त्यांच्या लेखनाच्या लालित्यात अधिक भर पडलेली दिसते.

लेखिकेने मौक्कि व लिखित साहित्यावर लेखन केले आहे. त्यातून त्यांच्या लोकसाहित्याच्या अफाट व्यासंगाचे दर्शन घडते. आपल्या भारतीय लोकसाहित्यात जी लोकगीते आहेत ती कशी निर्माण झाली याविषयी भाष्य करून त्या लोकगीतांमध्ये येणाऱ्या आशय विषयाचा विचार केलेला दिसतो. लोकगीतांमध्ये येणाऱ्या झाडांचे, स्त्रीजीवनाचे संदर्भ कशा प्रकारचे असतात हे त्यांनी उदाहरणादाखल समजून सांगितले आहेत. त्यांच्या लेखनात लोकसाहित्यातील लोकगीतांचे अनेक संदर्भ विखुरलेले आहेत. बोली भाषेत वापरल्या जाणाऱ्या म्हणींचा वापर साहित्यात का केला जातो यावर विचार मांडण्यासाठी या म्हणींवर लेखिकेने स्वतंत्र लेख लिहिले आहेत. म्हणींचे महत्त्व, त्या म्हणींतून प्रतित होणारा अर्थ, विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या म्हणी, या म्हणी कोणकोणत्या प्रकारच्या असतात याविषयी नेमकेपणाने सूसुत्रपध्दतीने लेखात उदाहरणादाखल निवेदन केले आहे.

लेखिकेने ज्या ज्या स्थळांना भेटी दिल्या त्या स्थळांच्या सांस्कृतिक इतिहासाचा नेमकेपणाने शोध घेऊन निवेदन केले आहे. लेखनात आलेल्या अधिकशा स्थळांना त्यांनी बालवयात भेटी दिल्या होत्या. त्या स्थळांना परत एकदा अनुभवताना तिथे जाणवणारा फरक लेखात सूक्ष्मतेने नोंदवत असताना त्या स्थळांचं हरवलेलं सौंदर्य पाहून लेखिका दुःखी होताना जाणवतात. एकंदरीत प्रवासातील अनुभवांची, स्थळांची वर्णने करत असताना माणसांच्या मनाचा, वृत्ती–प्रवृत्तीचा ठाव लेखिकेने घेतलेला आहे. पाहिलेल्या स्थळांची, परिसराची, प्रवासात घडलेल्या घटना–प्रसंगांची वर्णने लेखात चित्रमय शैलीत नेमक्या शब्दांतून उतरली आहेत.

लेखिकेची प्रवास करण्याची हौस, त्यांच्यापाशी असलेला सूक्ष्म निरीक्षण गुण, सौंदर्य दृष्टी, रसिकता, प्रवास करण्यासाठी लागणारी सहनशीलता या गोष्टींचे प्रकर्षाने दर्शन घडते.

लेखिकेने व्यक्तिचित्रणावर स्वतंत्र लेख लिहिले नाही. त्यांनी ज्या माणसांवर लिहिले ती माणसे त्यांना कधीतरी प्रवासात भेटलेली किंवा एकदा दोनदा इतर कुठेतरी भेटलेली माणसे आहेत. त्यामुळे त्या माणसांचा सर्वांगीण वेध लेखिकेला घेता आला नसावा असे म्हणावे लागते. त्यांनी माणसांच्या अंतरंगाचा अधिकतेने ठाव घेतला आहे. लेखात चित्रित झालेल्या व्यक्तींच्या जीवनाचा सर्वोपरिने वेध घेतला नसला तरी त्यांचा स्वभावविशेष, त्यांचे बोलणे, कार्यकर्तृत्त्व, व एका व्यक्तींच्या बाह्यांगाचाही वेध लेखिकेने घेतला आहे. व्यक्तींच्या मोठेपणाचा बारकाईने शोध घेताना त्यांचे मन त्या व्यक्तींमध्ये अडकलेले जाणवते.

'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता' आणि 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच!' हे दोन वैचारिक लेखसंग्रह त्यांनी लिहिले आहेत. या दोन्हीं वैचारिक लेखसंग्रहात स्त्रीजीवनासंबंधी लेखन झाले आहे. पुरुषी स्वभाव, स्त्री—पुरुष भेदभाव, हरवलेली माणूसकी, स्वार्थ, नीती मूल्यांची घसरण यावर प्रकाश टाकण्याची भूमिका लेखिकेने घेतलेली दिसते. पूर्वीची स्त्री आणि आजची आधुनिक स्त्री या दोन्ही काळातील स्त्रीच्या व्यथा सारख्याच आहे असे त्यांचे मत या लेखात व्यक्त झाले आहे.

भारतीय समाजजीवनाचे आकलन करून आपल्या वैचारिक लेखनाद्वारे लेखिकेने स्त्रीमुक्तिचा आवाज उचलून धरला आहे. त्यांच्या वैचारिक लेखनातून सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय येतो. लेखिकेने स्वतःची मते, विचार लेखनात स्पष्ट व निर्भिडपणे मांडून आजच्या समाजवास्तवाची परखड शब्दांत चिकित्सा केलेली दिसते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा प्रतिकार करणारे त्यांचे वैचारिक लेखन आहे. स्त्रीवादी चळवळीचा बाज या लेखनाला आला आहे. ज्या ज्या स्त्रीजीवनाच्या समस्या त्यांनी मांडल्या त्या समस्या सोडवण्याकरिता शिक्षण घेणे हाच उपाय त्या सूचवताना दिसतात. त्यांच्या वैचारिक लेखनाला वास्तवाचा आधार आहे. त्यामुळे हे लेखन वाचकाला अधिक अंतर्मुख करणारे झाले आहे.

लेखिकेच्या लेखनाची मांडणी विवरणशील, स्पष्टीकरणात्मक, विवेचनात्मक, माहितीपर बोधपूर्ण आहे. त्यांच्या लेखनात प्रांजळपणा जाणवत राहतो. त्यांनी मांडलेले अनुभव साधे

वाटले तरी वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करणारे असल्याने ते अनुभव निवेदन उच्च दर्जा चे वाटते.

सहाव्या प्रकरणात लेखिका अरुणा ढेरे यांच्या निबंध लेखनाचा अभ्यास केला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्य क्षेत्रातील प्रसिद्ध लेखिका अरुणा ढेरे यांची साहित्य क्षेत्रातील कामगिरी अतिशय मोलाची आहे. त्यांचे ललित निबंध लेखन उत्कृष्ट दर्जाचे झालेले दिसून येते.

आत्मपर निबंध लेखनातून लेखिकेच्या बालपणातील आठवणी, ज्या घरात त्या वाढल्या त्या घराविषयी आठवणी, त्यांच्या सहवासात आलेल्या माणसांच्या आठवणी त्याचबरोबर बालपणात त्यांनी अनुभवलेल्या निसर्गाच्या अनेकअंगी रूपांच्या आठवणी लेखात जागोजागी विखुरल्या आहेत. स्वतःच्या अनुभव आठवणीकडे लेखिका गंभीरपणे तर कधी भावगर्भतेने पाहताना दिसतात. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची नेमकी ओळख होते. त्यांची स्वभाववृत्ती, त्यांच्यापाशी असलेली रसिकता, भावना, संवेदना, सौंदर्यदृष्टी, जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू त्यांच्या लेखनातून निदर्शनास येतात.

त्यांनी आपल्या संपूर्ण लेखनात वेगवेगळया काळातील स्त्री जीवनाचा शोध घेतला आहे. स्त्री जीवनातील विविध प्रश्नांना त्यांच्या लेखनात महत्त्वाचे स्थान आहे. स्त्री दुःखाचा आवाका खूप मोठा असल्याचा अंदाज त्यांच्या साहित्यातून अनेक वेळा येत राहतो. स्त्रीविषयक लेखन करताना लेखिका गंभीर तर काही वेळा संवेदनशील बनताना जाणवतात. लेखिकेने भारतीय संस्कृती, पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात स्वतःची मते व विचार निर्भिडपणे मांडले आहे. त्यांनी पुरुषप्रधान समाजमनावर परखडपणे लिहिले असलेतरी स्त्रियांच्या मनात आत्मसन्मान जागृत व्हावा, एकंदरीत स्त्री सामर्थ्याची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी लेखन केलेले दिसते. आपल्या लेखनात लेखिकेने स्त्री सामर्थ्याबद्दल विश्वास व्यक्त केला आहे. त्यांचे लेखन समाजाला व स्त्रियांना विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहे.

लेखिका मौक्कि व लिखित अशा दोन्ही प्रकारच्या साहित्याच्या गाढया अभ्यासक आहेत. बालवयात वाचलेल्या अनेक साहित्यिकांच्या साहित्यकृती यांची दखल त्यांनी आपल्या निबंध लेखनाच्या माध्यमातून घेतलेली दिसते. साहित्यिकाचे व साहित्यकृतीचे श्रेष्ठत्त्व, वेगळेपण

त्यांनी नेमक्या शब्दात उलगडून दाखवले आहे. मराठीच्या बरोबरीने संस्कृत, बंगाली, कानडी इत्यादी भाषांची जाण त्यांना होती त्यामुळे या भाषांतील वाङ्मयाचे पडसाद त्यांच्या लेखनातून उमटले आहे. वेगवेगळया लेखकांनी लिहिलेल्या रामायण महाभारतातील कथांवर त्यांनी भाष्य केले आहे. त्याचबरोबर दोन लेखकांच्या एका विषयावरील साहित्यकृतीतील आशयाची तुलना करून त्यासंबंधी त्यांनी स्वतःची मते व्यक्त केली आहे.

विविध ठिकाणीच्या प्रवासाच्या दरम्यान पाहिलेल्या, अनुभवलेल्या अनेक निसर्गरूपांची मनभूलवणारी वर्णने त्यांच्या लेखात आली आहे. निसर्गातील प्रत्येक दृश्य त्या आत्मीयतेने अनुभवतात. फुलांनी भरलेली निरनिराळी झाडे, आभाळ, तरे, वळणा वळणाने जाणाऱ्या पाऊलवाटा, पक्ष्यांची साद, नदी, वनराई, वर्षाच्या प्रत्येक ऋतूचे सौंदर्य लेखिकेला मोहिनी घालतात. त्यांना सांस्कृतिक पर्यावरणाची नेहमी सोबत लाभल्याने सृष्टीच्या चैतन्यरूपांचे सौंदर्य चित्रित करताना त्यांनी आदिम काळापासून माणसाचे सृष्टीशी असलेले नाते समजून घेऊन लेखनात विशद केले आहे. ग्रामसंस्कृतीचे दर्शन घडवताना भारतीय संस्कृतीत परंपरेने चालत आलेल्या सणांचे व ऋतूंचे नाते योग्य शब्दांत लोककथांच्या आधारे पटवून दिले आहे. निसर्गाच्या क्रिडा त्यांनी बारकाईने न्याहाळून समजून घेतल्या व लेखनात सूक्ष्मपणे संवेदनासह टिपल्या. निसर्गसौंदर्य चित्रित करताना त्यांनी अनेक कवींच्या कवितेतील निसर्ग सौंदर्य उलगडणाऱ्या कवितांच्या ओळींचा वापर केला आहे.

ऋतूची विलोभनीय रूपे लेखिकेने आकर्षक शब्दांतून मांडली आहेत. काही लेखात त्यांनी अनुभवलेली निसर्गाची भीषण रूपेही यथातथ्य वर्णिली आहेत.

लेखिका सृष्टीच्या सुख दुःखाच्या भावनांशी एकरूप होताना जाणवतात. त्यांच्या लेखनातील निसर्ग आविष्कार ठळक स्वरूपाचा आहे. निसर्गाशिवाय जीवन व्यर्थ आहे असा भाव त्यांच्या लेखनात शब्दबद्ध झालेला दिसतो. आधुनिक युगात निसर्गापासून दूर गेलेला व घातक ठरलेल्या मानव प्रवृत्तीचे दर्शन लेखिकेला या प्रतिक्रियेतून दाखवून द्यायचे आहे. तथा त्यातून त्यांनी वाचक मनाला निसर्गाविषयी चिंतन करण्यास भाग पाडले आहे.

लेखिकेने प्रवासातील अनुभवांच्या व वाचनात आलेल्या साहित्याच्या माध्यमातून दक्षिण भारतातील मंदिराच्या निर्मितीविषयी, कथा, दंतकथा तसेच शिल्पसौंदर्य चित्रमय शैलीत व सूक्ष्मरित्या तपशीलाने उलगडले आहे. या लेखनात प्रवासात भेटलेल्या माणसांचे स्वभावविशेष त्यांनी बारकाईने नोंदवले आहेत. त्यांच्या प्रत्येक प्रवासवर्णनात एक दोन पूराण कथांचा समावेश झाला आहे. त्याचबरोबर मंदिराच्या परिसरात दिसणाऱ्या प्राचीन माणसांची संस्कृतीवर त्यांनी भाष्य केलेले दिसते. काही ठिकाणी उद्‌वस्थ प्रदेशाचे, मंदिरांचे रूप त्यांना उदास करताना जाणवतात. त्यांच्या काही प्रवासवर्णनात वाचकांना प्रत्यक्ष केलेल्या प्रवासाचा आनंद देण्याचे सामर्थ्य आहे.

प्रयत्नाच्या बळावर यशस्वी झालेली माणसे लेखिकेच्या मनाला श्रेष्ठ वाटली त्यांचे चित्रण लेखनात झाले आहे. त्यांनी माणसांच्या अंतरंगाचा म्हणजेच स्वभावविशेष, कार्य कर्तृत्त्वासंबंधात तपशीलवार लेखन केले आहे. साहित्यातून जाणून घेतलेल्या माणसांच्या जगण्याविषयी लिहित असताना त्यांनी माणसांच्या जीवनातील एखाद्या घटना प्रसंगाविषयी लेखन केलेले दिसते. त्यांनी काही संत स्त्रियांचीही व्यक्तिचित्रणे लिहिलेली आहे. तशीच त्यांची काही व्यक्तिचित्रे विरांगिनीच्या जीवनसंघर्षाचे चित्र रेखाटणारी आहे. द्रौपदी, कूंती, गांधारी, भीष्म, कर्ण, दुर्योधन त्याचबरोबर रामायणातील राम, सीता, तर पुराणातील उर्वशी अशा व्यक्तींच्या जीवनाचा शोध घेताना लेखिकेने त्यांसंबंधी स्वतःचे विचार, मते आवर्जून मांडली आहे.

स्पष्टीकरणात्मक, विवेचनात्मक अशी त्यांच्या लेखांची मांडणी असलेली जाणवते. त्यांच्या लेखनाला आठवणी अनुभवांची, विचारांची, संशोधनाची, नैतिक मूल्यांची, संदर्भ संपन्नतेची जोड मिळाली आहे.

लेखिकेच्या लेखनाचे स्वरूप प्रगल्भ व विकसनशील असलेले दिसून येते. अनेक भाषांतील विविध साहित्य वाचून त्यातील जुन्या संदर्भातून नव्याचा शोध त्या घेताना दिसतात. चिंतनाच्या व संवेदनाच्या अंगाने त्यांनी लेखन झालेले दिसते. त्यांच्या लेखनात अनुभवांची व विचारांची समृद्धी जाणवते. त्यांचे लेखन माहितीपर, बोधपर, नीतीपर असलेले दिसून येते. हे लेखन जीवननिष्ठेने, निर्भयतेने झाले आहे. काव्यात्मकता, संवेदनशीलता, भावनाशीलता,

चिंतनशीलता, चित्रमयता, सूक्ष्म निरीक्षण, आकर्षक भाषा व निवेदनशैली, शब्दप्रभुत्व, विचार आणि संदर्भसमृद्धी अशातून त्यांच्या लेखनाला ललित लेखनप्रकाराची गुणवत्ता प्राप्त झाल्याने हे लेखन सकस झालेले दिसून येते.

प्रस्तुत लेखिकांच्या निबंध लेखनाचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या लेखनात एकसुत्रीपणा तसाच फरक जाणवतो. या पाचही लेखिकांच्या लेखनातून जसे त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार होते तसाच त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोनही स्पष्ट होतो. या लेखिकांचा जीवनविषयक दृष्टिकोन सकारात्मक आहे. एक माणूस म्हणून त्यांच्या वाटयाला दुःख, निराशा, अपमान आल्या असल्या तरी या दुःखाने खचून न जाता त्यांनी स्वतःला सावरलेले दिसते. जीवनाकडे आशावादी दृष्टीने पाहायला लावणारे त्यांचे लेखन आहे. या लेखिका अंधश्रद्धाळू नाहीत. या विश्वाच्या निर्मीतीमागे असलेल्या अदृश्य शक्तीची त्यांना जाणीव आहे. अफाट व्यासंग आपल्या लेखनातून इतरांशी संवाद साधण्याची गरज, आपल्या लेखनातून वाचकांना नवी दृष्टी देणे तसेच वाचकांना विविध विषयांवर विचार करायला भाग पाडणे यामधेही त्यांच्यात एकसूत्रीपणा जाणवतो.

पाचही लेखिकांनी स्त्रीविषयक लेखन केले आहेत. त्यांच्या या लेखनात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव आहे. लेखिका सुनीता देशपांडे व इंदिरा संत या दोघांचे स्त्रीविषयक लेखन त्यांच्या स्वतःच्या अनुभवातून सिद्ध झाले आहे. तर शान्ता शेळके, प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे यांचे लेखन इतर स्त्रियांच्या अनुभवातून निर्माण झालेले आहे. प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे यांनी विविध कठोर अनुभव मांडून पुरुषप्रधान संस्कृतीवर परखडपणे, बेधडक शब्दांत लेखन केले आहे. त्यांच्या लेखनाला स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप लाभले आहे. याउलट शान्ता शेळके यांचे लेखन अतिशय शांत चित्तवृत्तीने झाले आहे. तर सुनीता देशपांडे व इंदिरा संत यांचे स्त्रीविषयक लेखन स्वतःशीच बोलल्याचे भाव निर्माण करणारे आहे.

या पाचही लेखिकांच्या लेखनात निसर्गप्रेम जाणवतो. निसर्गापासून माणूस दुरावत चालला आहे. हे पाचही लेखिकांनी विविध उदाहरणातून पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. लेखिका शांता शेळके, सुनीता देशपांडे आणि अरुणा ढेरे यांनी सृष्टीची कारुण्यपूर्णता आणि रौद्र रूप टिपले आहे. निसर्गाचे मानवीकरण या तिघींच्या लेखनात दिसून येते. इतर चार लेखिकांहून

अरुणा ढेरे यांनी खोलात जावून निसर्गावर लेखन केलेले दिसून येते. ढेरे निसर्गातील विविधतेकडे पाहताना निसर्ग आणि मानव यांना जीवाभावाच्या नात्याने पाहतात. त्यांचे असलेले जुने नाते उलगडतात. आपल्या लेखनात ऋतुंची मनमोहक वर्णने करत असताना निसर्गाचे व मानवाचे नाते माणसांच्या सण—उत्सवातून अखंडपणे वाहते आहे याचा शोध घेतला आहे.

प्रस्तुत लेखिकांच्या वाङ्मयीन विशेषांचा शोध घेतल्यानंतर इतर चार लेखिकेच्या लेखनाहून लेखिका सुनीता देशपांडे यांचे लेखन जास्तसे वैचारिकतेकडे झुकणारे आहे. त्यांच्या सर्व लेखांमध्ये विचार सातत्याने आढळतात.

## ७.३ निष्कर्ष

१. १८१८ पासून इंग्रजी निबंधांचे अनुकरण करून मराठी साहित्यात आलेल्या 'निबंध' या वाङ्मय प्रकाराची निर्मिती ज्ञानप्रसार करण्याच्या प्रयोजनातून झाली होती.

२. १८१८ ते १८५० या काळात मुख्यतः सामाजिक आणि धार्मिक विषयांवर निबंध लिहिलेले आढळून येतात.

३. १८५० ते १८७४ हा कालखंड वैचारिक साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा कालखंड होता. या काळातील निबंध लेखनाचे स्वरूप गंभीर विचारप्रधान होते.

४. १८८५ नंतर नियतकालिकांद्वारे बहुतांशी निबंध लेखन झाले असून या निबंध लेखनाने बरीच वैचारिक जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. या काळातील निबंध लेखनामागे समाजप्रबोधन, ज्ञानप्रसार, व्यवहारिक सदूपदेश अशी प्रयोजने दिसत होती.

५. १८७४ ते १९२० हा मराठी वाङ्मयाचा महत्त्वाचा कालखंड होता. या कालखंडात निबंध या वाङ्मय प्रकाराची स्पष्ट जाणीव लेखकांना झाली होती. या काळातील निबंधात मोठया प्रमाणात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक विषयांवर विचारमंथन झालेले दिसून येते.

६. १९२० ते १९५० हा लघुनिबंधाचा काळ होता. १९२० च्या आसपासच्या पिढीतील मराठी लेखकांनी आत्मपर, काहीसा रंजक स्वभावाचा लघुनिबंध स्वीकारला. सर्वसामान्य माणसांना रोजच्या जीवनातील जे घटना–प्रसंग महत्त्वाचे वाटत नाही अशा घटना–प्रसगांना त्यांनी आपल्या लेखांचे विषय बनविले आहे.

७. १९५० नंतर लघुनिबंध लेखनाने नवीन वळण घेतले. लघुनिबंधातील मित्राशी गप्पा मारण्याची भूमिका जाऊन 'मी' च्या आत्माविष्काराला महत्त्व आले. लेखकाच्या स्वतःच्या अनुभव–आठवणींना, भावनांना, कल्पनांना, चिंतनाला, विचारांना येथे प्राधान्य मिळाले व १९५० नंतर लघुनिबंधाला 'ललित निबंध' किंवा 'ललित गद्य' असा शब्द रूढ झाला.

८. १९५० नंतरच्या ललित निबंध लेखनात आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गचित्रणपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, चिंतनशील लेख अशा उपप्रकारांचा संकर झालेला दिसून येतो.

९. प्रत्यक्ष घटित अनुभवांचे विश्लेषण, अभिव्यक्तीतील सच्चेपणा, प्रांजळ निवेदन, आत्मनिष्ठा, एखाद विषयावर सखोल चिंतनाच्याबरोबरीने आलेले विचार, 'मी' चा आत्माविष्कार, सौंदर्यानुभव रेखाटन, निसर्ग प्रतिमांच्या साहाय्याने केलेले लेखन, काव्यात्मकता, खेळकर शैली, कल्पकता, विनोद ही वैशिष्टये १९५० नंतरच्या ललित निबंधाला मिळालेली देणगी आहे.

१०. १९५० नंतरच्या ललित निबंधाच्या माध्यमातून लेखकाचे बालपणातील जीवन, तेथिल निसर्गाशी, लोकसंस्कृतीशी समरस झालेले संवेदनशील मन आविष्कृत झाले आहे.

११. इ.स. १८१८ पासून निबंध लेखनाने सुरू झालेला प्रवास आज ललित लेखन या नावाने सुरू आहे. या लेखनाची कक्षा दिवसेंदिवस वाढत चाललेली जाणवते. 'निबंध', 'लघुनिबंध', 'ललित लेख', 'ललित निबंध' अशा विविध नावाने ओळखला जाणारा हा वाङ्मयप्रकार आपल्या आकारात आणि आशय विषयात बदल मान्य करून मराठी साहित्यात रूढ होऊन अनेक टप्पे ओलांडत आज यशस्वी झाला आहे.

१२. प्रस्तुत लेखिकांच्या ललित निबंध लेखनात आत्मपर लेख, स्त्रीविषयक लेख, साहित्यविषयक लेख, निसर्गचित्रणपर लेख, प्रवासवर्णनपर लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, चिंतनपर किंवा विचारप्रधान लेख अशा उपप्रकारांचा संकर दिसून येतो.

१३. प्रस्तुत लेखिकांचे अनुभवविश्व विविधांगी, व्यापक व सखोल आहे. वास्तव स्वरूपाचे अनुभव त्यांच्या लेखनात व्यक्त झाले आहे. बालपणात मनात खोलवर रूतून बसलेल्या आठवणी, दैनंदिन जीवनातील अनुभव–आठवणी, निसर्ग सहवासातील आठवणी, प्रवासातील अनुभव–आठवणी, व्यक्तींचा लाभलेला सहवास, भावलेल्या साहित्यकृती अशा अनेक विषयातून त्यांचे लेख साकार झाले आहेत. त्यांच्या निबंध लेखनात त्यांच्या जडण घडणीचा प्रत्यय येतो. गतकाळातील आठवणी सांगताना त्या भावविवश होताना जाणवतात. आपल्या जीवनातील विविधारंगी अनुभव सांगत असताना चिंतनाच्या पातळीवर जाऊन विचार व्यक्त करणे हे लेखिकांच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

१४. स्वानुभव कथन, आठवणींचे चर्वण, समाजजीवन दर्शन, व्यक्तिदर्शन व विचारमंथन असे अनेकविध आयाम त्यांच्या लेखनाला प्राप्त झालेले दिसतात.

१५. माणूसकी हे लेखिकांच्या लेखनाचे सुत्र आहे. मानवी वृत्तीचा, माणसाच्या मनाचा शोध घेणे हा लेखिकांच्या लेखांचा विषय बनला आहे. माणसांच्या अंतर्मनाचे सूक्ष्म निरीक्षण प्रत्येक लेखिका अचूकपणे करताना दिसतात.

१६. प्रस्तुत लेखिकांनी अखिल स्त्री जीवनाचे निराळे जीवनानुभव, स्त्रीजीवनाची व्यथा वेदना, दुःख स्वानुभवातून तसेच सहवासात आलेल्या इतर स्त्रियांच्या अनुभवांच्या माध्यमातून, पारंपरिक लोकगीतांच्या आधारे तसेच साहित्यात भेटलेल्या स्त्रियांच्या संघर्षाचे विश्लेषण करून मांडले आहे. हे लेखन स्त्री जीवनाबद्दल कळवळयाने झाले असून प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे या लेखिकांनी पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध परखडपणे लिहिले आहे. स्त्रीचे भावविश्व समजून घेणाऱ्या स्त्री लेखिका म्हणून पाचही लेखिका त्यांच्या ललित लेखनात सतत जाणवत राहतात.

१७. स्त्रियांना केलेला हितोपदेश प्रतिमा इंगोले यांच्या वैचारिक लेखनाचा महत्त्वाचा गाभा आहे. दारूचे व्यसन, हुंडाप्रथा स्त्रीच्या जीवनात दुःख आणणारी असून; आजच्या समाजात या गोष्टीने लोकमानसावर ताबा मिळविला आहे. त्यामुळे अत्यंत समंजसपणाने हे प्रश्न सोडवण्याची नितांत गरज लेखिकेच्या वैचारिक लेखनातून व्यक्त झाली आहे.

१८. लेखिका प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे यांनी केलेले निबंध लेखन समाज वास्तवाचे प्रतिरूप आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही आपल्या समाजात सुधारणा झाली नाही याचे निराशाजनक चित्र त्यांच्या लेखातून उमटलेले आहे. प्रत्येक जागी त्या पुरुषप्रधान संस्कृतीला विरोध करून स्त्री पुरुष समानतेची मागणी करतात. स्त्रीचे सामर्थ्य उलगडताना स्त्री–पुरूषाला समान हक्क मिळावा, तिला सन्मान दिला जावा यासाठी वाचकांना स्त्रीचे महत्त्व पटवून देतात. स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरूद्ध परखडपणे लिहिणे हा त्यांच्या लेखांचा विशेष आहे.

१९. प्रस्तुत लेखिकांचे साहित्यविषयक लेखन साहित्यप्रकारांविषयी, अनेक साहित्यिकांविषयी, साहित्यकृतीविषयी माहिती पूरवीणारे व वाचकांच्या ज्ञानात भर घालणारे आहे. संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांतील साहित्य वाचनाचे पडसाद त्यांच्या लेखानात उमटलेले आहेत. त्यांना आवडलेल्या साहित्यकृतीचे रसग्रहण करून त्यांना भावलेला अर्थ, त्या साहित्यकृतीचे वेगळेपण, नावीन्य, गूणदोष त्यांनी लेखनात सांगितलेले दिसतात. त्यांच्या लेखनात आलेल्या विविध वाङ्मयीन संदर्भातून त्यांच्या अफाट वाचनाची व त्यांच्या व्यासंगाची कल्पना येते.

२०. प्रस्तुत लेखिकांनी आपल्या निसर्गविषयक लेखनात केवळ निसर्ग सौंदर्य रेखाटले नसून मानव व मानवेतर सृष्टी यांचे आपआपले स्वतंत्र व्यवहार व मानव आणि निसर्ग यांचा एकमेकांशी असलेला संबंध दाखवला आहे. निसर्गसौंदर्य रेखाटत असताना निसर्गासाठी घातक ठरलेल्या विध्वंसक मानवी प्रवृत्तीचे चित्रण लेखनातून झालेले आहे. निसर्गविषयक लेखन करताना लेखिकांनी चिंतनाची पातळी गाठली आहे.

२१. लेखिका अरुणा ढेरे यांनी वेगवेगळया ऋतूचे सौंदर्य चित्रित केले आहे. त्याचबरोबर माणसांच्या सण उत्सवातून मानव व निसर्ग यांचा आदिम काळापासूनचा संबंध दर्शविला आहे.

२२. इंदिरा संत या सोडल्यातर इतर चार लेखिकांनी देशपरदेशात प्रवास केलेला असल्यामुळे प्रवासातील आठवणी, स्थळ प्रदेशांची वर्णने, तेथिल संस्कृती, निसर्ग, माणसे यांचे वर्णन प्रवासवर्णनपर लेखनात आले असले तरी लेखिका तिथे अधिकतेने जाणवत राहतात. त्यांचे अनुभव तिथे जास्त महत्त्वाचे वाटतात.

२३. लेखिका अरुणा ढेरे व प्रतिमा इंगोले यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनपर लेखनात विविध गावांची, प्रदेशांची, पाहण्यात आलेल्या मंदिरांची माहिती दिली आहे. तेथिल कोरीव शिल्पांचे सौंदर्यवर्णने करून त्या शिल्पातून प्रतित होणाऱ्या अर्थाचाही उहापोह लेखनात झाला आहे. प्रवासात भेटलेल्या प्रदेशांची, माणसांच्या संस्कृतीविषयी लेखन झाले आहे. अधिकशा लेखात लेखिका उद्ध्वस्त झालेल्या स्थळांविषयी खंत व्यक्त करतात. प्रवास करत असताना स्वतःला आलेले अनुभव, मनातील भावभावनांही लेखनात शब्दबद्ध झाल्या आहेत.

२४. प्रस्तुत लेखिकांनी विविध क्षेत्रातील व्यक्तींची व्यक्तिचित्रणे लिहिली आहेत. त्या व्यक्तींच्या अंतरंगाचे व बाह्यांगाचे दर्शन घडविताना त्या व्यक्तींचा स्वभावविशेष, विशिष्ट लकबी, शरीरवर्णने व कार्यकतृत्त्वावर अधिक भर देण्यात आला आहे. या माणसांविषयी आलेल्या लहान लहान अनुभवांना लेखिकांनी भावस्पर्शी रूप दिलेले जाणवते. त्यांच्या व्यक्तिचित्रणात व्यक्तींशी असलेले वैयक्तिक संबंध अधिक स्पष्ट झाले आहेत. लेखिकांनी प्रत्येक व्यक्तिचित्रणातून माणसाच्या माणूसपणाचा, चांगुलपणाचा व सामर्थ्याचा शोध घेतलेला दिसतो. या सर्वांतून त्या व्यक्तिरेखा वाचकांच्या नजरेसमोर चित्रमय स्वरूपात उभ्या राहण्यासाठी सबब ठरल्या आहेत. त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रणात गुणांचे अधिक विश्लेषण तर दोषांचे मूल्यमापन कमी प्रमाणात झालेले दिसते. त्याचबरोबर त्यांचे स्वतःचे व्यक्तिचित्रही नकळत उमटत गेले आहे.

२५. प्रस्तुत लेखिकांनी जीवनाबद्दल अतिशय उत्साहाने उत्कंठतेने लिहिलेले असून जीवनाकडे पाहण्याच्या आशावादी दृष्टिकोनामुळे वाचकांना नवी दृष्टी देण्यास त्यांचे निबंध लेखन समर्थ ठरले आहे.

२६. लेखिका सुनीता देशपांडे व इंदिरा संत यांच्या लेखनात त्यांच्या आयुष्यातील सुखदुःखाचे क्षण, आशा निराशा, जयपराजय अशा सगळया गोष्टींचा आलेख येतो. आंतरिक उर्मीतून हे

लेखन झालेले दिसून येते. लेखिकेने स्वतःला सुखी करण्यासाठी किंवा त्यांचे एकटेपण घालवण्याकरिता हे लेखन केले आहे किंवा असे वाटते की हे सगळे व्यक्त करण्याची त्याची मानसिक गरज होती.

२७. लेखिका प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे यांचे ललित लेखन लोकसाहित्याचे, लोकसंस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करणारे आहे. शिवाय इंगोले यांनी लोकसाहित्याचा काळ व आजचे यंत्रयुगातील जीवनामधली विसंगती दर्शविली आहे.

२८. प्रस्तुत लेखिकांच्या लेखनात घटना प्रसंगांची, विविध माणसांच्या स्वभावाची, निसर्ग सौंदर्याची सहृदय वर्णने उतरली आहेत.

२९. प्रस्तुत लेखिकांचे लेखन कोणत्याही गोष्टीतल्या वरवरच्या रूप गुणांपेक्षा त्या गोष्टीच्या गाभ्याला, मर्माला महत्त्व देणारे आहे.

३०. सूक्ष्म निरीक्षण, निर्भयता, अंतर्मुखता, विचार मग्नता, सौंदर्यवेदी वृत्ती, सौंदर्यप्रेमी, संवेदनशील, सहनशील, रसिक, विचारशील, तत्त्वजिज्ञासू, चिंतनात्मक वृत्ती, प्रज्ञावंत, प्रतिभावंत, अभ्यासू, जिज्ञासू, ज्ञानपिपासू वृत्ती, निसर्गप्रेमी, दयाळू, माणसांविषयी जिव्हाळा, संस्कृतीविषयी प्रेम, प्रामाणिकपणा, प्रवासाची हौस ही लेखिकांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये त्यांच्या ललित निबंधाद्वारे जाणवतात.

३१. सूक्ष्म कथन, तपशीलवार वर्णने, सहृदय वर्णने, पारदर्शकता, भावगर्भता, मनोवेधक निवदेनशैली त्याचबरोबर प्रत्येक गोष्ट अगदी समजून सांगणे ही प्रस्तुत लेखिकांच्या ललित निबंध लेखनाची महत्त्वाची वैशिष्टये आहेत.

३२. विषय प्राधान्यता, तत्त्वचिंतन, सडेतोडपणा, क्रांतिकारी विचार व ग्राम संस्कृतीविषयी लेखन करताना संवादरूपी वाक्यांमध्ये ग्रामीण बोलीचा वापर करणे ही प्रतिमा इंगोले यांच्या वैचारिक व ललित लेखनाला लाभलेली महत्त्वाची वैशिष्टये आहेत. तर जुन्या संदर्भातून नवा अर्थ काढणे, प्रत्येक गोष्टीकडे संशोधकाच्या दृष्टीतून पाहणे हे अरुणा ढेरे यांच्या लेखनाचा विशेष आहे.

३३. आत्माविष्कार, काव्यात्मकता, चित्रमयता, चिंतनशलता, घटनांचा संदर्भ, व्यासंग, भाषाशैली असे वाङ्मयीन विशेष त्यांच्या ललित निबंधाला लाभले आहेत.

३४. सुनीता देशपांडे सोडल्या तर इतर चारही लेखिकांची निबंध लेखनाची भाषा लालित्यपूर्ण असून वाचकमनाला प्रसन्न करणारी आहे. साधे साधे विचार प्रतिभाशक्तीच्या जोरावर आकर्ष क करण्याची किमया त्यांना सहज साधलेली आहे. त्यांची भाषा आशय विषयाला अनुसरून संवेदनशील तर काही वेळा चिंतनशील व गंभीर बनते. अनुभवातील तरल चित्र सहजपणे उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषाशैलीत आहे. त्यांची भाषा काव्यमय, लययुक्त, नादयुक्त असल्याचे दिसून येते. रंग, रूप, रस, नाद, स्पर्श अशी अनुभूती देणारी समृध्द भाषा लेखिकांच्या ललित लेखनाला कलात्मक व सौंदर्यानुभूती प्राप्त करून देते.

३५. लेखिका प्रतिमा इंगोले व अरुणा ढेरे यांची भाषा थेट प्रतिपक्षला भिडणारी झाली आहे.

३६. सहज साधी अनौपचारिक लेखनशैली, साध्या सरळ भाषेत आशय निवेदन, स्पष्टीकरणात्मक मांडणी, आकर्षक शिर्षके, मुद्देसूद मांडणी, श्रृतयोजने, नेमक्या शब्दात आपले विचार व्यक्त करण्याचे कौशल्य प्रस्तुत लेखिकांना सहज प्राप्त झाले आहे.

# परिशिष्ट

# परिशिष्ट

## निवडक लेखिकांचा जीवन परिचय व वाङ्मयीन कार्य

## अ. शान्ता शेळके यांचा थोडक्यात जीवन परिचय

शान्ता शेळके यांचा जन्म इंदापूर येथे १२ ऑक्टोबर १९२२ रोजी झाला. मंचर हे पुणे जिल्ह्यातील एक छोटेसे खेडे त्यांचे मूळ गाव. या गावात त्यांचा शेळक्यांचा वाडा होता. त्या वाडयात त्यांचे वडिलार्जित घर होते. त्यांचे आजोबा शाळामास्तर तर वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. नोकरीच्या निमित्ताने त्यांना नेहमी बाहेरगावी रहावे लागत असे. त्यामुळे कधी नोकरीतून सवड मिळाल्यावर हे कुटुंब शेळक्यांच्या वाडयात वास्तव्याला येत. त्यावेळी लेखिकाही आईवडिलांबरोबर वाडयात येई. त्यांचा जास्तसा मुक्काम बाहेर गावी होता. तरी काही दिवसांकरिता त्यांनी अनुभवलेला शेळक्यांच्या वाडयाचा भूगोल आणि तेथिल आठवणी त्या मनात साठवून ठेवतात.

त्यांच्या घराण्यात कोष्टीकाम पूर्वापार चालत आले असले तरी त्यांच्या वडिलांनी मात्र या कामात कधी लक्ष घातले नाही. स्वतः शिक्षक असल्याने त्यांना शिक्षणाची गरज वाटत होती. आपल्या मुलांना त्या व्यवसायात जाऊ न देता त्यांनी त्यांना शिक्षित केले. त्यामुळे तेव्हाही त्यांचे घर असे जरा शिकलेले असल्यामुळे कोष्टी जमातीत थोडेसे वेगळे उमटून दिसायचे.

बालवयापासून लेखिकेला वाचनाची, नवीन गोष्टी शिकण्याची आवड असलेली जाणवते. या सर्व आवडीचे मूळकारण म्हणजे त्यांच्या मातोश्री. त्यांच्या आईमुळे त्यांच्यात या आवडीनिवडी निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यांच्या आईचे मराठी चौथीपर्यंतचे शिक्षण झाले असले तरी वाचनाचे तिला अतोनात वेड होते. तिला एकटीला घरात कंठाळा येऊ नये म्हणून लेखिकेचे वडील तिच्यासाठी सतत पुस्तके मागवीत. भारत गौरव ग्रंथमाला, महाराष्ट्र कुटुंबमाला, हिंदी एजन्सी माला या मालांची पुस्तके त्यांच्या घरी होती. ही आईसाठी आणलेली पुस्तके आई च्याबरोबरीने लेखिकाही वाचित असे. त्यांच्या आईनेच त्यांना लिहायला वाचायला शिकवले. त्यांच्या आईमुळे त्यांचे लिहिणे वाचणे चालू राहिले आणि त्यांना वाचनाचा खूप नाद लागला.

त्यांच्या आवडीनिवडी जोपासायला त्यांच्या आईची साथ त्यांना लाभली. लहानपणी त्यांच्या सगळयात जवळची माणसे म्हणजे त्यांचे आईवडील. वडिलांचा सहवास मात्र त्यांना जास्त काळ लाभला नाही. वयाच्या ९व्या वर्षी १९६० साली त्यांचे वडील वारले. त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांची आई आणि त्यांची भावडे पुण्याला त्यांच्या काकाकडे रहायला आली.

**शिक्षण**

१९२० साली लेखिकेचे मराठी चौथीपर्यंतचे शिक्षण झाले होते. आणि इंग्रजी पहिलीत त्यांना प्रवेश घ्यायचा होता. पण त्या पुण्याला येईपर्यंत शाळांमध्ये प्रवेश बंद झाले होते. त्यांचे ते एक वर्ष फुकट जाऊ नये या कारणास्तव त्यांच्या काकांनी त्यांना ‘श्रीशिवाजी मराठा हायस्कूल’ या मुलांच्या शाळेत प्रवेश मिळवून दिला. दुसऱ्या वर्षी हुजुरपागेत प्रवेश मिळावा म्हणून खटपट केली. पण तिथे प्रवेश न मिळाल्याकारणाने त्यांनी इंग्रजी दुसरीच्या वर्षात ‘सेवासदन’मध्ये प्रवेश घेतला आणि शेवटी तिसऱ्या वर्षी त्यांनी हुजुरपागेत प्रवेश मिळविला. या शाळेत प्रवेश मिळावा असे त्यांचे स्वप्न होते ते पूर्ण झाले. इतक्या नामवंत शाळेत प्रवेश मिळाल्यामुळे त्यांची प्रतिष्ठा एकदम वाढल्यासारखे त्यांना वाटत होते. याचे कारण म्हणजे हुजुरपागेतली विद्यार्थिनी म्हटले की लोक त्या विद्यार्थ्याकडे आदराने बघत. या शाळेतील विद्यार्थी बोलायला हुशार, वेगवेगळया कलांमध्ये पारंगत आणि अभ्यासात हुशार असतात अशी लोकांची समज होती.

१९३८ साली लेखिका मैट्रिकपास झाल्या. या शाळेने त्यांना चांगले संस्कार दिले. याच शाळेत त्यांचे हस्ताक्षर सुधारले, पाठांतराची सवय लागली, संस्कृत, मराठी, इंग्रजी हे विषय त्यांच्या आवडीचे आहेत हे त्यांना याच शाळेने समजावून दिले. चित्र, साहित्य, संगीत वेगवेगळया कला याबद्दलची एक प्राथमिक का होईना समज शाळेने त्यांना दिली. बालवयात नुकत्येच निर्माण होऊ पाहणाऱ्या साहित्यप्रेमाला हुजुरपागेतील ज्ञानी शिक्षकांमुळे त्यांना चांगले मार्ग दर्शन मिळाले. तेथिल शैक्षणिक वातावरणामुळे त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाची घडण झाली. त्यांची भाषा सुधारून, भाषेविषयीचे प्रेम निर्माण झाले व साहित्य निर्मितीची पार्श्वभूमी याच शाळेत प्रथम तयार झाली. त्यामुळे त्यांच्या विकासाचे श्रेय हुजुरपागेला जाते.

१९३८ साली पुण्याच्या हुजुरपागेतून मॅट्रिक्ची परीक्षा उत्तीर्ण होऊन लेखिकेने परशुरामभाऊ कॉलेजात प्रवेश घेतला. परशुरामभाऊ कॉलेज ऐवजी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा असे स्वप्न उराशी बाळगून राहिलेल्या त्यांना शेवटी परशुरामभाऊ कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्याने त्यांचे मन खट्टू होते. पण नंतर याच कॉलेजने त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवले. केवळ शिक्षणाच्या दृष्टीनेच नव्हे, तर इतरही अनेक दृष्टींनी त्यांच्यावर बहुमोल संस्कार करणारे ठरले.

कॉलेजमधल्या मोकळया, सुसंस्कृत वातावरणात वावरत असताना मिळणाऱ्या शिक्षणातून लेखिकेच्या मनावर नवे संस्कार होत होते. भाषा आणि साहित्य याविषयी त्यांच्या मनात कुतूहल जागे होत होते. लहानपणापासून त्यांना वाचनाची आवड होती. परंतु त्यांना लिहावेसे कधी वाटले नव्हते. मात्र कॉलेजमध्ये आल्यावर लेखनाची उर्मी त्यांच्या ठिकाणी जागृत झाली. त्या लेखिका झाल्या; याचा संबंध त्या कॉलेजशी आहे. कारण थोडीशी साहित्यविषयक जाण होऊन आलेल्या कुणाही नवशिक्या होतकरू विद्यार्थ्याला हुरुप यावा, स्वतः काही वेडेवाकडे लिहून बघण्याची त्याला हौस वाटावी असेच या कॉलेजचे प्रोत्साहक वातावरण होते.

परशूरामभाऊ कॉलेजला स्वतःची अशी परंपरा होती. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचा कॉलेजशी प्रत्यक्ष संबंध नसला तरी विद्यार्थ्यांवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप आणि दबदबा होता. श्री. म. माटेसारखे विचारवंत, लेखक, वक्ता लेखिकेला प्राध्यापक म्हणून लाभले होते. त्याचबरोबर के. ना. वाटवे हे संस्कृत साहित्याचे रसज्ञ जाणकार लाभल्याने त्यांना वाचनाची गोडी लागली. या अवांतर वाचनामुळे त्यांच्याजवळ बरेच ज्ञान गोळा झाले आणि त्यातूनच केव्हातरी स्वतः काही लिहून बघावे अशी इच्छा त्यांच्या मनात जागी झाली आणि कॉलेजच्या नियतकालिकासाठी लेखिकेने एक लेख लिहिला. त्या लेखासाठी बापूसाहेब माटे यांच्याकडून त्यांना शाबासकी मिळाली. या शाबासकीने त्यांना लेखनासाठी प्रोत्साहन दिले होते. याचवेळी बी. ए. ला त्यांनी मराठी घ्यायचे हेही ठरवून टाकले. अभ्यास, साहित्य, कविता साऱ्यांचीच एक धुंदी त्यांच्या मनावर होती. बी. ए. झाल्याबरोबर त्यांनी इकडच्या तिकडच्या चार कथा गोळा करुन 'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा कथासंग्रह प्रकाशित केला. या संग्रहाला प्रा. माटयांनी प्रस्तावना दिली होती. प्रस्तावनेत त्यांनी लेखिकेचे कौतुक केले. पण नंतर प्रा. माटे यांनी परखडपणे त्यांना खडसावून आपली मते ऐकवली. लेखनाला जिवंतपणा येण्यासाठी पांढरपेशा साहित्याचे आणि साहित्यिकांचे निर्जीव, अनुभूतिशून्य अनुकरण

करण्यापेक्षा ज्या कोष्टी जातीत त्या जन्मल्या, ज्या परिसरात, माणसात त्या वाढल्या त्यांचे चित्रण लेखनात करण्याचा सल्ला प्रा. माटे यांनी त्यांना दिला.

१९४४ साली लेखिका एम. ए. झाल्या. कॉलेजच्या दिवसात त्यांना मिळालेल्या विचारवंत लेखकांची साथ आणि त्यांच्याकडून झालेले कौतुक त्यांना फलद्रुप ठरले. अभ्यासू सवयी तिथे लागल्या, नजर फाकली, जाणिवेच्या कक्षा रुंदावल्या. रसिकता डोळस झाली, धिटाई आली, आणि साहित्यक्षेत्रात आपण काही तरी करुन पहावे अशी इच्छा त्यांच्यात निर्माण झाली. जरी वृत्तपत्रीय लेखनातून त्यांच्या लेखनाला सुरुवात झाली असली तरी शाळा कॉलेजमध्ये त्यांच्या मनावर झालेल्या संस्कारातून ते लेखन निर्माण झाले आहे.

## नोकरी

चव्वेचाळीस साली एम. ए. पूर्ण झाल्यावर लेखिका अर्थाजनासाठी मुंबईला गेल्या. मुंबईला 'नवयुग' या वर्तमानपत्रासाठी आचार्य अत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सहसंपादक म्हणून काम केले. पुण्याला असताना कविता, कथा, एखादा ललित लेख इथपर्यंतच त्यांचे लेखन होत होते. तर 'नवयुग'मध्ये आल्यावर अत्रे यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी वृत्तपत्राच्या गरजेनुसार कित्तीतरी प्रकारचे लेखन केलेले जाणवते. अनुवाद करणे, पुस्तक परीक्षणे लिहिणे, वाङ्मयीन चर्चांचे किंवा परिसंवादांचे वृत्तात लेखन, थोर साहित्यिकांच्या किंवा कलावंताच्या मुलाखती लिहिणे असे लेखन लेखिकेकडून झालेले आहे.

'नवयुग' मध्ये झालेला त्यांचा दुसरा फायदा म्हणजे तिथे त्यांची भाषा खूप साधी, सोपी, सहज झाली. अवांतर वाचन यामुळे 'लेखन' या गोष्टीबद्दल त्यांच्यात प्रेम निर्माण झाले. या वरील गोष्टीमुळे वाचक आणि लेखक म्हणून त्यांची घडण होण्यामध्ये 'नवयुग' मधील काळाचा त्यांच्या जीवनात मोठा वाटा आहे. तरी पुढे तिथल्या वातावरणाचा एक विचित्र ताण त्यांच्या मनाला जाणवू लागला. ललित साहित्य, वाङ्मय क्षेत्रातल्या व्यक्ती, घटना यांची जरी 'नवयुग' मध्ये आवर्जून दखल घेतली जात असली तरी एकूण अधिकसा त्या पत्राचा भार राजकीय घडामोडींवर असायचा आणि ते स्वाभाविकही होते. पण लेखिकेला राजकारणात मुळीच रस नव्हता. त्यामुळे तिथे काम करणे त्यांना नकोसे वाटू लागले. आणि नवयुगमध्ये चार पाच वर्षे काम करत असताना एक दिवस त्यांनी राजनामा दिला.

‘नवयुग’सोडल्यानंतर त्यांची पाच सहा वर्षे बेकरीत गेली. सुरुवातीच्या काळात त्यांची भेदरलेली अवस्था जाऊन त्यांच्यामध्ये कणखरपणा आला. बेकारीत न परवडणाऱ्या खर्चा मुळे लेखिकेने अर्थाजनाचे मार्ग शोधले. या काळात त्यांनी अनेक कामे केली. रेडिओचे कार्य क्रम, कामगार कल्याण केंद्रात भाषणे देणे, प्रज्ञा आणि विशारद या वर्गामध्ये शिकवणे काही काळ ‘पिंगेज क्लास’ मध्ये शिकवले. या कामाच्या निमित्ताने त्यांना बक्षीस म्हणून रक्कम मिळे. याच काळात त्या वृत्तपत्रांतून स्फुटलेखन करु लागल्या. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रांतून ललित लेख, अनुवाद, मुलाखती, पुस्तक परीक्षणे असे विविध पद्धतीचे लेखन त्यांनी केले.

कविता लिहिणे हे लेखिकेचे नेहमीचे काम असे. त्याचबरोबर फक्त आर्थिक  गरज म्हणून त्यावेळी त्यांनी इंग्रजीवरुन रहस्य कथांची सात आठ पुस्तके अनुवादित केली होती. निव्वळ पैशांची गरज म्हणून त्यांनी मॅट्रिकचे गाइडही लिहिले होते. केवळ आर्थिक गरजेपोटी ही कामे त्यांनी केली असली तरी त्यांचा वाङ्मयीन घडणीवर, त्यांच्या अभिरुचीवर काही परिणाम होत होता, परंतु या साऱ्या व्यापाचा, करावी लागणाऱ्या धडपडीचा त्यांना कंटाळा येऊ लागला. मुख्यतः हेतुशुन्यतेच्या जाणिवेचे दुःख त्यांना सतावू लागले आणि त्याचवेळी हिस्लॉप कॉलेजमध्ये एका वर्षापुरती मराठीच्या प्राध्यापिकेची नोकरी त्यांनी पत्करली. त्यानंतर ‘सिध्दार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स’, त्यानंतर ‘रुइया कॉलेज’ आणि पुढे सेवानिवृत्त होईपर्यंत सतत वीस वर्षे परळचे ‘महर्षी दयानंद कॉलेज’ अशी मिळून एकंदर २६, २७ वर्षे मराठीची प्राध्यापिका म्हणून त्यांनी काम केले.

लेखिका सिध्दार्थ कॉलेजमध्ये शिकवत होत्या; त्यावेळी त्यांची सेन्सॉर बोर्डावर नेमणूक झाली. एकूण पधंरा वर्षे त्यांनी सेन्सॉर बोर्डावर काम केले. सेन्सॉर बोर्डावर काम करत असताना त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी चित्रपट पाहण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर सेन्सॉरच्या पॅनेलवर असणाऱ्या हिंदी, गुजराती, बंगाली, पंजाबी बोलणाऱ्या अनेक माणसांबरोबर केलेली चर्चा, हास्यविनोद, वैचारिक देवघेव त्यांना पुढे उपकारक  ठरली. प्राध्यापक, पत्रकार, चित्रकार, राजकारणी, समाजकारणी विविध क्षेत्रातले मान्यवर ललित लेखक अशा माणसांशी त्यांचा निकटचा सहवास घडला. त्यांच्या नजरेचे क्षितिज कितीतरी पटीने विस्तारले आणि ज्ञानात वेगळी भर पडली.

मुंबईत असताना लेखिकेच्या जीवनात महत्त्वाची घडलेली घटना म्हणजे गीतकार म्हणून त्यांची तिथे झालेली घडण. चित्रपट किंवा ध्वनिमुद्रिकासाठी कधी काळी गीते लिहू असे त्यांच्या स्वप्नातही आले नव्हते आणि त्या मुंबईला नसत्या तर अशी गीते लिहिण्याची संधीही त्यांना मिळाली नसती. मुंबईचा रहिवास हाच त्यांच्या गीत लेखनाला कारण झाला हे त्या स्वतःही मान्य करतात. त्यांनी दिनकर पाटील यांच्या 'राम राम पाव्हणं' या चित्रपटासाठी प्रथम गीतलेखन केले आणि सातत्याने पुढची ३०–४० वर्षे चित्रपटासाठी गीते लिहिली. मराठीतल्या जवळजवळ साऱ्या जुन्यानव्या संगीत दिग्दर्शकांबरोबर काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

सेवानिवृत्तीनंतर अवघ्या चाळीस वर्षानी लेखिका मुंबई सोडून पुण्याला आल्या. पण त्यानंतरही त्यांच्या लेखनात खंड पडला नाही. त्यांनी सातत्याने लेखन केले. आणि त्या लेखनासाठी त्यांना सन्मानही लाभले.

## शान्ता शेळके यांचे वाङ्मयीन कार्य

कवयित्री आणि गीतकार म्हणून मराठी साहित्यक्षेत्रात बहुप्रचलित असलेले महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे शान्ता शेळके. त्या कवयित्री किंवा गीतकार म्हणून बहुपरिचित असल्यातरी कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, ललित लेख, आत्मपर लेखन, अनुवाद लेखन, समीक्षात्मक लेखन असे विविध साहित्यप्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहे. बालकथा लिहिण्यात लेखिकेला विशेष रस होता.

### कविता लेखन

निसर्ग कविता, प्रेम कविता, भाव कविता अशा विविध कविता लेखनातून लेखिकेची काव्यसृष्टी बहरलेली आहे. बालपणापासूनच घरात जात्यावरील ओव्या आणि गाणी ऐकायला मिळाल्याकारणाने गाण्याची ताल, लयीची जाणीव त्यांना झाली होती. त्यांचे वाचन अफाट असल्याने अनेक कवींच्या कविता त्या वाचत असत. १९२३ साली सुरू झालेल्या रविकिरण मंडळातील लेखकांच्या कवितेने लेखिकेचे मन भारावून गेले होते.  रविकिरण मंडळातील लेखक माधव ज्युलियन यांच्या कविता वाचून त्यांच्या प्रेरणेतून त्यांची कविता आकार घेऊ

लागली होती. त्याचबरोबर निसर्गात रमणारे त्यांचे मन असल्याने निसर्गाची विविध दृश्ये त्यांच्या कवितेत उतरु लागली. त्यांनी अनेक कविता लिहिल्या. ते कवितासंग्रह आजही रसिक मनाला आनंद देणारे आहेत. त्यांचे कविता संग्रह म्हणजे 'अभंग शतपत्री (१९३२), वर्षा (१९४०), 'रुपसी' (१९५६), 'गोंदण' (१९७५), 'अनोळख' (१९८६), 'जन्मजान्हवी' (१९९०), 'तोच चद्रंमा' (१९९०), 'चित्रगीते' (१९९५), 'पूर्वसंध्या' (१९९६), 'इत्यर्थ' (१९९९), 'किनारे मनाचे' (१९९९), 'गणपतीची गाणी' (२०००). लोकप्रिय प्रतिभावंत कवयित्री म्हणून आजही त्या सर्वश्रृत आहे. त्यांच्या मादक अशा कवितांची धुंदी आजही रसिक मनावरुन यत्किंचितही ओसरली नाही.

### कथा लेखन

लेखिकेने लिहिलेल्या कथा आर्थिक गरजेपोटी, मागणीनुसार लिहिल्या असल्या तरी त्या निखळ कलात्मक प्रेरणेतून लिहिल्या गेल्याचे दिसून येते. त्यांची कविता साधी, सरळ काहीशी पारंपरिक वळणाची असलेली जाणवते. 'मुक्ता आणि इतर गोष्टी' (१९४४), 'पुतळा' (१९४७), 'नरराक्षस' (१९४८), 'गुलमोहर' (१९४९), 'चिखलद्याचा मांत्रिक' (१९५०), 'प्रेमिका' (१९५६), 'स्वप्नतरंग' (१९५९), 'कावेरी नि इतर कथा' (१९९२), 'एक गाणे चुलीचे' (१९९४), 'सतीचा वाडा' (१९९८), 'स्पर्श आणि स्पर्श' (२०००), 'वेडे वारे' (२०००) असे कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत.

## कादंबरी लेखन

कविता या वाङ्मयप्रकारांसारखे कादबंरी या वाङ्मयप्रकाराचे आकर्षण लेखिकेला होते. फडके, खांडेकर, माडखोलकर या तीन लेखकांच्या लेखनाच्या प्रभावातून लेखिकेने आपली पहिली 'स्वप्नतरंग' (१९४६) ही कादंबरी लिहिली. त्यानंतर 'निरुपमा', 'विझती ज्योत' (१९४६), 'भूवरील स्वर्ग' (१९४८), 'भीषण छाया' (१९४८), 'सुखाची सीमा' (१९५०), 'पुनजन्म' (१९५०) तसेच कोष्टी जीवनावर आधारित 'ओढ' (१९५०) ही कादंबरी लिहिली. 'माझा खेळ मांडू दे' (१९८१), 'मायेचा पाझर' (१९९९) इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. त्यांचे कादंबरी लेखन संख्यात्मक दृष्टीने जास्त असले तरी यशस्वी होण्यास असमर्थ ठरले आहे.

## ललित लेखन

शान्ता शेळके या गतकाळात रमणाऱ्या लेखिका आहे. याची झळ त्यांच्या ललित लेखनात दिसून येते. त्याचे ललित लेखन, आठवणी, अनुभवांतून निर्माण झाले आहे. 'शब्दांच्या दुनियेत' (१९५९) हा त्यांचा पहिला लेखसंग्रह. त्यानंतर 'आनंदाचे झाड' (१९८२), 'धुळपाटी' (१९८२), 'पावसाआधीचा पाऊस' (१९८५), 'एक्पानी' (१९८९), 'मदरंगी' (१९८९) 'वडीलधारी माणसे' (१९८९), 'संस्मरणे' (१९९०), 'जाणता अजाणता' (१९९५), 'इतस्ततः' (१९९८), 'ललित नभी मेघचार' (१९९८), 'रंगरेषा' (१९९९), 'मनातले घर' (२०००), 'आतला आनंद' (२०१०), 'नक्षत्रचित्रे' (२०१०) इत्यादी लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

आत्मचरित्र, व्यक्तिचित्रणे, असे लेखिकेचे विविध रूपातील हे निबंध लेखन यशस्वी ठरलेले दिसते आहे. त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन, माणसांविषयी कुतूहल, त्यांचे अफाट वाचन आणि त्यांच्याकडे असलेला बहुश्रुतपणा त्यांच्या लेखांद्वारे जाणवत आहे.

## गीत लेखन

लेखिकेने बहुतांश सर्व साहित्यप्रकार हाताळले असले तरी; एक कवयित्री किंवा गीतकार म्हणून त्यांची ओळख आजही जनमानसात प्रचाराता आहे. त्यांनी लिहिलेली गीते त्या काळीही गाजली आणि आजही ती लोकप्रिय आहेत. रेडिओ, चित्रपट, ध्वनिमुद्रिका यासाठी त्यांनी अनेक गीते रचली. सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर अशा नामंवत संगीत दिग्दर्शकांबरोबर गाणी लिहिण्याची संधी त्यांना लाभली. भक्तिगीते, कोळी गीते, निसर्ग गीते, अंगाई गीते, प्रेम गीते, लावण्या, भावगीते अशी कितीतरी त्यांची गीते आज प्रसिद्ध आहेत.

## बालसाहित्य

बालमनाला भावेल अशा विषयांना घेऊन लेखिकेने बालगीते लिहिली आहे. साधे, सरळ आणि सोप्या शब्दांची रचना करण्यास त्यांना सहज जमली. लहान मुलांना आवडणारी मांजरं, मोर, फुलपाखरू, चिमणी, बाहुली, पाऊस, आभाळ असे विषय घेऊन लेखिकेने गीते लिहिली. 'आरशातली आई' (१९४६), 'निळा दिवा' (१९४६), 'लिली' (१९४९), 'चिमणचारा'

(१९६०), ‘थुई थुई नाच मोरा’ (१९६१), कविता करणारा कावळा’ (१९८७), ‘झोपेचा गाव’ (१९९०), ‘चंद्रशेखर’ (१९९१), ‘वेडा खातो पेढा’ (१९९६), ‘वाऱ्याचारंग’ (१९९६), ‘चिमखुली’ (१९९६), ‘मांजराचा गाव’ (१९९९) इ. बालसाहित्य त्यांच्या नावावर आहेत.

## अनुवाद

कविता, कथा, लिहिणे याप्रमाणेच आवडलेल्या कलाकृतीचा अनुवाद करणे लेखिकेची आवडती निर्मिती होती. आपण अर्थाजनासाठी अनुवाद केला हे सांगण्यासही लेखिका धजत नाही. केवळ अर्थाजनाचे साधन म्हणून त्यांनी अनुवाद करण्याचा पर्याय निवडला असला तरी या अनुवादाने त्यांना निव्वळ, कलात्मक आनंद दिला. ‘मीनाक्षी’ (१९४८), ‘नागानंद’ (१९५५), ‘आंधळयाचे डोळे’ (१९५७) ‘चौघीजणी’ (१९६०) ‘गाठ पडली ठकाठक’ (१९६१), ‘गवती समुद्र’ (१९६२), ‘आंधळी’ (१९६३) ‘तालपुस्करा’ (१९६४), ‘औटी’ घटकेचा राज’ (१९६५), ‘लोकांचे राज’ (१९८९), ‘आसामी वृत्तपत्रांचा इतिहास’ (१९९६), ‘मेघदूत’ (१९९४), ‘पाण्यावरच्या पाकळया’ (१९९६), ‘निमित्ता निमित्ताने’ (१९९८), ‘अलैकिक’ (२०१०) ही लेखिकेची अनुवादित पुस्तके आहेत. इतर भाषातील साहित्य मराठीत आणून आपले मराठी साहित्य अधिक श्रीमंत आणि समृध्द करण्याचे एक सुंदर कार्य लेखिकेने केले आहे.

लेखिकेला नवनवीन गोष्टी शिकण्याची गोडी होती. लहानपणापासूनच वाचनाची ओढ असल्याने शाब्दिक ज्ञानाबरोबरच बौद्धिक ज्ञान त्यांच्या पदरात आले होते. त्यामुळे विविध प्रकाराचे लेखन करून मराठी साहित्य क्षेत्रात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

## पुरस्काराच्या मानकरी

शान्ता शेळके यांनी अफाट लेखन केले आणि त्या मौलिक लेखनासाठी त्या मानकरी ठरल्या आहे. १९९६ या वर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या आळंदी येथे झालेल्या संमेलनाचे अध्यक्षपद त्यांच्याकडे आले. तसेच चित्रपट गीत लेखनासाठी त्यांना ‘गदिमा पुरस्कार’ लाभला. मंगेश कुटुंबियातर्फे दिला जाणारा ‘वग्विलासिनी’ पुरस्कार’, पुणे विद्यापीठाचा ‘जीवनसाधना’ गौरव पुरस्कार, फ्राय फाऊण्डेशन पुरस्कार’ हे त्यांना लाभलेले काही महत्त्वाचे पुरस्कार आहेत.

लेखिका जीवनाच्या अखेरपर्यंत लिखाण करत राहिल्या आणि सुप्रसिद्ध लेखिका ठरल्या. अशा थोर लेखिका शान्ता शेळके या पुण्यात ६ जून २००२ साली मृत्यू पावल्या.

## आ. सुनीता देशपांडे यांचा थोडक्यात जीवनपरिचय

सुनीता देशपांडे या लग्नापूर्वी सुनीता ठाकूर तर लग्नानंतर सुनीता देशपांडे झाल्या. ३ जुलै १९२६ हा त्यांचा जन्मदिवस. लेखिकेचे वडील म्हणजे सदानंद महादेव ठाकूर उर्फ अप्पा हे रत्नागिरीचे नामवंत फौजदार व सरकारी वकील होते. सरलादेवी त्यांच्या मातोश्री. लग्नानंतर त्यांच्या मातोश्रीने काही काळ शिक्षिकेची नोकरी केली होती. त्यांना पाच भाऊ; शरदचंद्र, सत्यपाल, श्रध्दानंद, सर्वोत्त्म आणि सुभाषचंद्र व दोन बहिणी सत्यबाला आणि शालन. सत्यबाला ही लहानपणीच मृत्यू पावलेली. त्यामुळे सर्वाहून मोठी मुलगी हा मान लेखिकेकडे आला. आई वडिलांचा दिर्घकाळ सहवास त्यांना लाभला त्यामुळे पिढयान पिढया चालत आलेले संस्कार आणि मोठयाने बोलण्याची सवय, स्पष्टवक्तेपणा, प्रांजळपणा अशी काही स्वभाव वैशिष्टये त्यांच्या आईकडून त्यांना लाभली.

### बालपण

लेखिकेचा जन्म कोकणातील रत्नागिरीत एका नावलौकिक ठरलेल्या ठाकूर कुटुंबात झाला होता. ठाकूर हे त्या काळचे कोकणाचे मालक त्यामुळे आपल्या ठाकूर हया नावाचा त्यांना अभिमान वाटत होता.

त्यांचे बालपण ज्या रत्नागिरीमध्ये गेले ती रत्नागिरी एखाद्या घरंदाज बाईसारखीच रूढीप्रिय आणि कर्मठ होती. तिला भाषाविषयापेक्षा शीलाचे, गुणांपेक्षा विद्वत्तेचे वगैरे महत्त्व अधिक वाटत होते. सावकारांचे वास्तव्य त्याकाळी रत्नागिरीत होते; पण कवी नाटककार लेखक सावरकरांपेक्षा स्वातंत्र्यवीर आणि विचारवंत सावरकरांचा रत्नागिरीला अधिक अभिमान वाटे. अशा परंपरेच्या परिघात वावरणारी तत्कालीन रत्नागिरीत, सनातनी विचारांच्या पाशात गुंतलेल्या रत्नागिरीत चौथी ते मॅट्रिक होईपर्यंत खेळ, नाच गाणी अशा लहानपणी आवश्यक असणाऱ्या गोष्टींपासून लेखिका वंचित राहिल्या. रत्नागिरीतल्या चौथी ते मॅट्रिक या चार वर्षा

ंच्या शिक्षणात गॅदरिंग, नाच, गाणी वगैरे तर सोडाच, पण विद्यार्थीनी या नात्याने सर्वांसाठी असलेला खेळ किंवा पी. टी. हेही लेखिकेच्या वाटयाला आले नाही.

निसर्गाच्या सहवासात समुद्रकिनाऱ्यावर फिरायला जाणं, जंगलात भटकंतीला जाणं अशा गोष्टींमध्ये लेखिकेचे मन रमत होते. त्यांच्या घराच्या वरच्या मजल्यावरून समोर अथांग पसरलेला समुद्र दिसायचा. समुद्र किनाऱ्याच्या एका बाजूला काळी वाळू आणि दुसऱ्या बाजूच्या किनाऱ्यावरची वाळू पांढरी होती. काळया समुद्राच्या तोंडाशी भाटियाची खाडी होती. या खाडीतून चांदण्या रात्री खूप हिंडून येणे हा त्यांचा घराचा अगदी नेमच असे. दोन होडया एकमेकींला जोडून, त्यांत भरपूर खाणे पिणे घेऊन संध्याकाळी निघायचे आणि मध्यरात्रीनंतर, कधी कधी पहाटे परतायचे. तिथे गाणी म्हणणे, भेंडया लावणे, उन्हाळयाच्या सुट्टीत कोकणात फिरायला जाणे, धामापुरला राहणाऱ्या आजीला भेटायला गेल्यावर तेथिल तलावाच्या आणि टेकडीवरच्या भगवतीच्या देवळाच्या भेटीला जाणे अशाप्रकारे बालवयात त्यांना निसर्ग सानिध्यात राहण्याची संधी मिळाली होती.

जंगलात भटकंतीला जाणं हा त्यांचा लहानपणातील ठरलेला कार्यक्रम असे. त्यामुळे निसर्गा ची अमाप ओढ त्यांना जडली. झाड या गोष्टीची त्यांना खरीखुरी ओढ होती. त्यांच्या लहानपणी वर्षातून निदान एकतरी आनंदवनात फेरी होत असे. आणि प्रत्येक वेळी त्यांना काहीतरी नवे दाखवायची योजना त्यांच्या बाबांच्या मनात असे. त्या उत्साहातच 'आनंदवन' कुटुंबीयांकडून त्यांचे जोरदार स्वागत होत असे. अशा निसर्गाची सैर लेखिकेच्या वडिलांनी त्यांना लहानपणीच घडवली होती. त्यांना वाचनाची आवड होती. पण तेही दिवसभरात जेवढे होईल तेवढे. कारण रत्नागिरीत वीज आली नव्हती. घरात एकच पेट्रोमेक्सचा दिवा यामुळे त्याकाळात सलग वाचनही त्यांना करता आलं नाही. अशा वातावरणातही लेखिका वर्गात सर्व परि सर्व विद्यार्थ्याहून नेहमी वेगळया दिसत राहिल्या.

## शिक्षण

सुनीता देशपांडे या लहानपणापासूनच बुद्धिवान, बहुश्रुत, धेयवादी व जिद्दी होत्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण पहिली ते तिसरीपर्यंत मुंबईला राममोहन शाळेत झाले. त्यांचे नातेवाईक

मंजूअक्का देसाई यांच्या घरी राहून त्यांनी हे तीन वर्षांचे शिक्षण घेतले. त्यानंतर चौथी ते सातवी म्हणजे तेव्हाच्या मॅट्रिक परीक्षेपर्यंतचे शिक्षण त्यांनी रत्नागिरीच्या पटवर्धन हायस्कुलमध्ये पूर्ण केले. मुंबईमधल्या राममोहन शाळेतलं वातावरण सुधारणावादी पद्धतीचं होतं. तिथे वर्गात मुले आणि मुली साधारणतः संख्येने तेवढीच होती. त्याचबरोबर शिकवण्याकरिता शिक्षक तसेच शिक्षिकाही होत्या. गॅदरिंग, खेळ, नाच, गाणी, हस्तकला वगैरे सांस्कृतिक कार्यक्रमांना तिथे पूर्णपणे मोकळीक होती. त्यामुळे या शाळेत शिकत असताना लेखिकेचा सर्वांगीण विकास होत गेला.

१९४२ साली लेखिका मॅट्रिक परीक्षेत उतीर्ण झाल्या. ७० टक्यांच्या आसपास गुण त्यांनी मिळविले होते. १९४२ च्या सुमारास रत्नागिरीत महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे मुंबईच्या खालसा महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. पण ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी ‘चले जाव’ चळवळीत शिक्षणाला अर्धवट सोडून भाग घेतला. या चळवळीतल्या सहभागानं त्यांचं जग व्यापक झालं. त्यांना अनेक माणसांचा सहवास लाभला. प्रभाकर पाध्ये, राम जोशी अशा सारखी माणसं भेटली. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे सारखा मार्गदर्शक मिळाला. अशा माणसांच्या सहवासात लेखिकेच्या पूर्व ज्ञानाला अधिक पोषक भर मिळाली. मुख्य म्हणजे स्वतःमध्ये असलेल्या क्षमतांना तकाकी मिळाली. प्रसंगांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य, कमी खर्चात जगण्याचे ज्ञान, कष्ट करण्याची क्षमता, जोखमीची कामं करण्याची क्षमता त्यांच्यात आहे याची त्यांना ओळख पटली. या चळवळीने त्यांना जीवन जगण्याची दृष्टी दिली. पण पुढच्या शिक्षणाची संधी मात्र त्यांनी गमावली.

## नोकरी

जून १९४५ सात लेखिका दादरच्या ओरिएण्ट हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणू काम करत होत्या. त्यानंतर १९५४ ते १९५५ पर्यंत त्या मुंबईतील पार्ले टिळक विद्यालयात शिक्षिका म्हणून कार्य रत होत्या.

## अभिनयाची भूमिका

बालवयात लेखिकेच्या मनात चित्रपट सृष्टीचे कुतूहल होते. पुढे लेखिकेने सिनेमात आत्मीयतेनं अभिनयाचे काम केले होते. वंदेमातरम चित्रपट (१९४७), 'कृष्णाकाठी कुंडल' (१९५९), 'गडकरी दर्शन' (१९६०), 'बटाटयाची चाळ' (१९६१), 'वाऱ्यावरची वरात' (१९६२), 'राजेमास्तर' (१९६५) अशा चित्रपटांमध्ये त्यांनी अभिनयाची भूमिका केल्या होत्या.

## सुनीता देशपांडे यांचे वाङ्मयीन कार्य

सुनीता देशपांडे यांनी विपुल लेखन केले नसले तरी आपल्या अल्प गद्य लेखनाने वाचकांच्या मनात एक वेगळीच जागा निर्माण केली आहे. आत्मचरित्र, अनुवाद लेखन, ललित लेखन व पत्र लेखन असे साहित्यप्रकार त्यांनी हाताळलेले दिसतात. जीवनानुभव, त्यांनी उपभोगलेला निसर्ग, वाचनात आलेल्या साहित्यकृती, त्यांच्या संपर्कात आलेले व्यक्ती यासर्वांचा प्रभाव त्यांच्या गद्य लेखनावर पडलेला दिसून येतो.

## आत्मचरित्र

आहे मनोहर तरी... (१९९०) या आत्मचरित्रामध्ये लेखिकेचे जीवनानुभव आले असून त्यात त्यांचा आत्मशोध प्रकर्षाने जाणवत आहे. त्यांचं जगणं, त्या जगण्यामागचा उद्देश, जगत असताना हाती आलेले यश आणि अपयश याचा शोध येथे घेतला आहे.

## अनुवाद लेखन

समांतर जीवन (१९९२) हे लेखिकेचे अनुवादित पुस्तकआहे. या पुस्तकात फिलिस रोझ यांच्या 'पॅरलल लाईव्हज' या पुस्तकामध्ये इग्लंडच्या महाराणी व्हिक्टोरिया यांच्या काळच्या इग्लंडमध्ये समकालीन पाच थोर व्यक्तींच्या सहजीवनाचा विचार केलेला आहे. लग्नसंस्थेमुळे स्त्री पुरूष संबंधामध्ये निर्माण होणारे ताणतणाव, निर्माण होणारे प्रश्न अशा विषयांच्या दृष्टीने हे लेखन झाले आहे.

## ललित लेखन

'सोयरे सकळ' (१९९८), 'मण्यांची माळ' (२००२), 'मनातलं अवकाश' (२००६) हे लेखिकेचे ललित निबंध लेखनाचे संग्रह आहेत. त्यांच्या ललित लेखनात आठवणी अनुभवांवर, आप्तमित्रांबद्दल तसेच मानवेतर सृष्टीबद्दल लेख आले आहेत. लेखिकेच्या एकटेपणा, त्यांच्या मनाचा हळवेपणा व चिंतनशीलता लेखात जाणवत राहते. जीवन जगत असताना होणाऱ्या जाणिवा आविष्कृत होताना त्यांचे लेख भावना आणि विचार यांनी एकवटलेले आहे.

## पत्र लेखन संग्रह

'प्रिय जी. ए.' (२००३) हा जी. ए. कुलकर्णींना लिहिलेल्या पत्रांपैकी निवडक पत्रांतून तयार झालेला संग्रह आहे. त्या पत्रांद्वारे त्या दोहोंच्या संवादातून जीवनविषयक आणि साहित्यविषयक विचारांचे आदानप्रधान झालेले दिसते.

## पुरस्काराच्या मानकरी

'आहे मनोहर तरी...' या पुस्तकासाठी 'न. चि. केळकर पुरस्कार (१९९०),

'आहे मनोहर तरी...' या पुस्तकासाठी 'केशवराव कोठावळे' पुरस्कार (१९९१),

गदिमा प्रतिष्ठानचा 'गृहिणी सचिव सखी' पुरस्कार (१९९६) असे काही पुरस्कार लेखिकेला लाभले होते.

सुनीता देशपांडे यांचं ७ नोव्हेंबर २००९ साली पुण्यात निधन झालं. त्यांचे काही लेखन त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध केले आहे. आपल्या कार्याने आणि लेखनाने लोकांच्या मनात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केलेली जाणवते.

## इ. इंदिरा संत यांचा जीवन परिचय

इंदिरा नारायण संत यांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्हयातील इंडी या गावी ४ जानेवारी १९१४ रोजी झाला. लग्नापूर्वीच्या इंदिरा दिक्षित असलेल्या लेखिका

लहानपणापासून ‘अक्का’ या नावाने ओळखल्या जात होत्या. गोपाळराव दीक्षित व राधा दिक्षित यांच्या त्या कन्या.

लेखिकेचे वडील सरकार दरबारी मामलेदाराची नोकरी करत होते. ते तापट स्वभावाचे होते. त्यामुळे त्यांचे बालपण सुसंस्कृत व शिस्तबद्ध वातावरणात गेले. त्यांचे बालपण त्यांनी कोल्हापूर बेळगाव महामार्गावर असलेल्या ‘तवंदी’ या वडिलांच्या मूळ गावी घालवले. आई वडिलांच्या छायेत पितृसत्ताक  एकत्र कुटुंबात वाढणाऱ्या लेखिका वडिलांच्या अकाली निधनानंतर पितृ सुखाला मुकल्या. त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षी त्याचे वडील वारले. पुढे त्यांचा सांभाळ त्यांच्या काकांनी केला परंतु पूर्वीसारखे आनंदी जीवन त्यांना जगता आले नाही.

## शिक्षण

लेखिकेला लहानपणापासूनच वाचनाची ओढ होती. हावेरीला घरा शेजारी राहणाऱ्या मुलीकडून झाडाखाली बसून लेखिका लिहायला वाचायला शिकल्या. त्यांनी त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बेळगाव येथिल वनिता विद्यालयात पूर्ण केले. दहावीच्या परीक्षेत त्या पहिल्या श्रेणीत उत्तीण झाल्या. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी पुण्याच्या फर्ग्यु सन महाविद्यालयात व नंतर कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात प्रवेश घेतला. या महाविद्यालयात त्यांना ना. सी. फडके, माधवराव पटवर्धन सारखे नामवंत प्राध्यापक लाभले. या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाने त्यांच्या मनावर चांगले संस्कार केले. वेळोवेळी प्रोत्साहन दिले. त्यामुळे बालपणापासून त्यांच्यापाशी असलेल्या काव्यात्मक प्रतिभाशक्तीला नकळत चालना मिळाली. वर्गात भेंडया खेळणे, ओव्या गोळा करणे, गाणी ऐकण्याच्या वेडातून स्वतःची काव्यनिर्मिती करण्याची आवड निर्माण झाली. पाचवी सहावीत असताना त्यांनी अनेक इंग्रजी कवितांचे वाचन केले होते. इतक्या लहान वयात ‘अनाथ’ नावाची कविताही त्यांनी लिहिली होती.

महाविद्यालयाचे शिक्षण घेत असताना लेखिकेने पाश्चात्य सौंदर्यवादी कवी शेल, बायदन यांच्या कवितांचे वाचन केले तसेच आपले अनेक नामांकित कवींच्या कविताही भरभरून

वाचल्या. त्यांच्या सखोल वाचनाने त्यांच्या काव्य लेखनाला चेतना दिली. आणि महाविद्यालयीन शिक्षणाच्या वेळी त्यानी खऱ्या अर्थाने काव्य लेखनाला सुरुवात केली. त्यांच्या लेखनाला आशयाची सखोलता प्राप्त झाली. त्यांची पहिली कविता फर्ग्युसन महाविद्यालयातील मराठी मंडळाच्या 'जोत्सना' संकलनात प्रसिद्ध झाली. पुढे त्यांनी अनेक कविता लिहिल्या. लहानपणापासून परिचित असलेल्या ओव्यामधील साधी रचना आणि जीवनाविषयी असलेले अपार कुतूहल त्यांच्या कवितेत चित्रित होऊ लागले. पुढे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करत असताना त्यांची ओळख ना. मा. संत यांच्याशी झाली. पुढे या ओळखीचे प्रेमात रूपांतर होऊन घराचा विरोध स्वीकारून त्यांनी १९३५ साली पुण्यात ना. मा. संताशी विवाह केला. त्यानंतर त्यांनी बी. टी. डी. बी. एड. या पदव्या बेळगाव येथे नोकरी करत असताना प्राप्त केल्या.

## इंदिरा संत यांचे वाङ्मयीन कार्य

लेखिकेचे मराठी साहित्य क्षेत्रातील स्थान अतिशय मोलाचे आहे. प्रतिभावंत कवयित्री म्हणून जनमानसावर त्यांच्या काव्य लेखनाचा ठसा उमटलेला आहे. कविता लेखनापासून त्यांनी आपल्या वाङ्मयीन कार्याला सुरुवात केली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात उमटलेले दिसून येते. तेरा कविता संग्रह, तीन कथासंग्रह, दोन ललित लेख संग्रह व दोन संपादित पुस्तकेअशी एकूण एकोणीस पुस्तके त्यांच्या नावाने प्रसिद्ध आहेत.

### कविता लेखन

वाचनातून लेखिकेच्या काव्यलेखनाला सुरुवात झाली. स्त्रियांची गीते, ओव्या यांचे संकलन लेखिका करत होत्या. त्यामुळे या ओवी गीतांच्या आवडीतून त्या स्वतःच्या काव्यनिर्मितीकडे वळल्या. लहानपणापासून ऐकत आलेल्या ओवी रचनेला जाणून घेऊन त्यासारखीच साधी सरळ रचना त्यांच्या काव्य लेखनात उतरली. १९३१ पासून त्यांनी काव्य लेखनाला सुरुवात केली. त्यांचा आणि त्यांचे पती ना. मा. संत यांचा एकत्रित 'सहवास' हा पहिला काव्यसंग्रह १९४१ साली प्रकाशित झाला. त्यानंतर 'शेला' (१९५१) हा त्यांचा स्वतंत्र असा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. 'मेंदी' (१९५५), 'मृगजळ' (१९५७), 'रंगबावरी' (१९६४), 'बाहुल्या'

(१९७२), ‘गर्भरेशमी’ (१९८२), ‘चित्काळ’ (१९८९), ‘वंशकुसुम’ (१९९४), ‘निराकार’ (२०००) असे कविता संग्रह त्यांच्या नावावर आहेत.

‘शेला’, ‘मेंदी’, ‘मृगजळ’ या तिनही संग्रहात पतिनिधनानंतर त्यांना आलेले एकाकीपण वियोगाचे दुःख त्या व्यक्त करताना जाणवतात. त्यानंतर ‘रंगबावरी’ या संग्रहात थोडा बदल जाणवतो. या संग्रहात त्यांना आलेले अनेक अनुभव घटनांवर कविता आधारलेल्या आहेत. त्यांच्या ‘बाहुल्या’ या संग्रहातील कवितांमध्ये सभोवतालच्या वास्तवाचे चित्रण आले आहे. या त्यांच्या सर्व संग्रहांना लोकप्रियता लाभली आहे.

लेखिकेने मुलांकरिता कविता लिहिल्या आहेत. अंग पंगत, गवत फुला रे गवत फुला, मामाचा बंगला हे १९९५ साली जोत्स्ना प्रकाशनात, मुंबई यांच्यातून प्रकाशित केले गेले. मुलांसाठी कविता लेखन आहे याचे भान ठेवून त्यांनी साध्या सरळ भाषेत शब्दरचना केलेली दिसून येते.

## कथा लेखन

लेखिकेचे मोजकेच तीन कथासंग्रह प्रकाशित झाले असले तरी यातील कथा सारगर्भी असून वाङ्मयीन गुणांनी युक्त आहे. ‘श्यामली’, ‘कदली’, ‘चैतु’ हे त्यांचे प्रकाशित कथासंग्रह; जे मध्यमवर्गीय समाज जीवनाकडे झुकणारे आहे. मध्यमवर्गीय समाज जीवनाचे चित्रण या कथांमध्ये आलेले आहे.

## ललित लेखन

लेखिकेचे ‘मृद्गंध’ (१९८६) आणि ‘फुलवेल’ (१९९७) हे दोन लेखसंग्रह प्रकाशित झाले आहे. ‘मृद्गंध’ या लेख संग्रहात त्यांनी आपल्या अनुभव आठवणींना उजाळा दिला आहे. सभोवतालचे वातावरण, स्वतःला आलेले अनुभव, निसर्गाविषयी असणारा भावनिक ओलावा यावर आधारित लेखन झालेले आहे. तर ‘फुलवेल’ मधील काही लेखांमध्ये त्यांचे स्वतःचे अनुभव प्रकट झाले आहेत. तसेच स्वतःच्या कवितेची निर्मिती व इतर कवींच्या कवितेवर विचार करून स्वतःच्या मनातील भावभावनातून लेखांची घडण झाली आहे.

## संपादने

पूर्वीच्या स्त्रीया आपले दुःख, कष्ट कमी करण्यासाठी किंवा आपले दुःख दुसऱ्यापर्यंत पोहचावे या हेतुने काही प्रसंगी ओव्या गात असत. त्यांचे संकलन काही जणांनी करून ठेवले आहे. अशा पद्धतीचे संकलन 'मालनगाथा' (१९९६) रूपाने लेखिकेनेही केलेले जाणवते. एकूण नऊ प्रकरणांमध्ये त्यांचा 'मालनगाथा' हा संग्रह विभागला आहे. त्यांचा दुसरा संपादित संग्रह म्हणजे 'घुंगुरवाळा' १९९४ मध्ये प्रकाशित झाला. यात शिशुगीतांचे संकलन केलेले आहे.

## ई. प्रतिमा इंगोले यांचा जीवन परिचय

प्रतिमा इंगोले यांचा जन्म १० ऑक्टोबर १९५३ रोजी विदर्भातील अकोला जिल्यातील दानापूर या गावात झाला. आईवडिलांच्या त्या एकुलत्या एक कन्या. आशालता दादाराव कुकडे हे त्यांचे माहेरचे नाव. त्या दोन वर्षाच्या असतानाच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यांची पूर्ण जबाबदारी त्यांच्या आईने व आजोबांनी उचलली. त्यांचे आजोबा स्वातंत्र्य सैनिक होते. त्याचबरोबर ते एक उत्कृष्ट समाज कार्यकर्तेही होते. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अनेक प्रकारची कामे केली होती. दानापूर येथे मागासवर्गीय मुलांसाठी स्वखर्चाने वस्तीगृह चालवायचे काम त्याने केले. तसेच भारत–चीन युद्धात भारत देशासाठी त्यांनी सर्वस्व ओपले. मराठी भाषेवर त्यांचे अफाट प्रेम त्यामुळे वाचनाने भाषेवर प्रभुत्व मिळविणे त्यांना शक्य झाले. त्यांनी अनेक देशभक्तीपर कविता रचल्या पण काही कारणामुळे त्या प्रकाशित झाल्या नाही. अशा प्रतिभाशाली आजोबांचा वरदहस्त डोक्यावर असल्याने बालवयातच लेखिकेवर लेखनाचे संस्कार झाले. त्यात भाषा व व्याकरण हे आजोबांच्या शिकवणीचे महत्त्वाचे विषय असल्याने मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविणे त्यांना शक्य झाले.

शाळेत असताना मिळेल ते वाचून काढणे हा त्यांचा छंद होऊन बसल्याने शाळेतील आजोबांचे मानसपुत्र त्यांच्यासाठी मासिके घरी आणित असे. त्यांच्या आजोबांकडून ऐकलेले श्लोक, पंडित कविता, आर्या त्यांना अगदी मुखोद्‌गत होती. मुलांची मासिके, शालापत्रक, वऱ्हाड शालापत्रक व आनंद मासिक तसेच त्यांच्या आजोबांसाठी घरी येणारी पुस्तके त्या वाचत असतंच त्याचबरोबर खास त्यांच्यासाठी त्यांच्या आजोबांनी 'चांदोबा' मासिक लावले होते.

अशा वातावरणात त्यांना वाचनाचे वेड जडले. वाचनाचे वेड तर त्यांना होतेच त्याचबरोबर निसर्गही त्यांना तितकाच वेडावत होता. अशा आजोबा घरच्या प्रेमळ वातावरणाचे संस्कार त्यांच्यावर झाले आणि नकळत त्यांची साहित्यनिर्मितीची बीजे याच काळात रोवली गेली. शिक्षण सुरू असतानाच त्यांचा विवाह अँड. श्री. पंजाबराव इंगोले यांच्याशी झाला.

## शिक्षण

लेखिकेचे तिसरीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण झाल्यावर आठवीनंतर नववीपासून अकरावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी अकोला येथे पूर्ण केले. अपार आत्मविश्वास आणि हुशार असे त्यांचे शाळेपासूनचे व्यक्तित्त्व. याचे कारण म्हणजे त्यांचे आजोबा आणि शाळेतील शिक्षक. अकरावीला असताना त्या भूगोल विषयात प्रथम आल्या होत्या. मराठी भाषेत परिपक्व असलेल्या लेखिका मराठी विषयात Distinction मिळविण्यात यशस्वी ठरल्या. शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे बी. एला 'मराठी साहित्य' हा विषय घेऊन त्यांनी विशेष पदवी प्राप्त केली. एम. एचे शिक्षण पूर्ण करत असताना त्यांना दीड वर्षाची मुलगी होती. त्यांनी एम. ए. प्रथम वर्ष बहिःस्थ विभागातून पूर्ण केले. त्यानंतर द्वितीय वर्ष नागपूर विद्यापीठातून ठराविकपणे पूर्ण करून प्रथम श्रेणी प्राप्त केली. एम. ए. (मराठी) झाल्यानंतर सुमारे दहा वर्षे 'वऱ्हाडी लोकगीतांचा चिकित्सक अभ्यास' करून डॉ. मधुकर वाकोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती विद्यापीठामध्ये पीएच. डी पदवी मिळवली.

## नोकरी

एम. ए झाल्यानंतर दर्यापूर. जि. अमरावती येथिल जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयामध्ये लेखिकेने पाच वर्षे प्राध्यापिकेची नोकरी केली. तद्नंतर शैक्षिणिक क्षेत्रा अंतर्गत राजकारण्याच्या कारभारामुळे महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने त्यांना नाकारले. अशा प्रसंगी लेखिकेने स्वतःला लेखन क्षेत्रात झोकून दिले. ग्रामीण भागात जन्मलेल्या या लेखिकेने ग्रामीण जीवन जवळून पाहिले होते. त्यामुळे स्वतः अनुभव घेतलेल्या ग्रामीण जीवनाचे, ग्रामीण संस्कृतीचे प्रदिर्घ दर्शन त्यांच्या साहित्यातून होते.

साहित्य लेखनाबरोबर सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक कार्यातही लेखिकेचे महत्त्वाचे योगदान आहे. 'जिजामाता महिला मंडळ' दर्यापूर या महिला संघटनेच्या सचिव तसेच 'लोक साहित्य परिषद' आणि शैक्षणिकपरिषदांमध्ये त्यांचे मार्गदर्शन होते. त्याचबरोबर 'मुंबई दूरर्श नवरून कथा आणि कविता यांचे कार्यक्रम करणे, अनेक नाटकांमधून अगदी महाविद्यालयीन जीवनापासून सहभाग घेऊन स्वतः विविध भूमिका करणे अशा उदाहरणातून त्यांचे कार्य निदर्शनास येते.

## प्रतिमा इंगोले यांचे वाङ्मयीन कार्य

ग्रामीण भागात जन्मल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ग्रामीण जीवनात जडणघडण झाली. त्यामुळे त्यांचे लेखन ग्रामीण जीवनाशी निगडित असणे साहजिकच आहे. ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण स्त्रीजीवन रेखाटणे हाच त्यांच्या साहित्य लेखनाचा केंद्रबिंदू झाला आहे. ग्रामीण जीवनाशी संबंधीत असणारा निसर्ग त्यांच्या लेखनाचा अविभाज्य भाग झालेला दिसून येतो.

आठवीनंतर शाळेच्या वार्षिकसाठी लेखिकेने पहिला लेख लिहिल्याचे त्या 'आठवांचे गंध' या लेखात सांगतात. तसेच महाविद्यालयात शिकत असताना चिखलदऱ्यावर लिहिलेला लेख कालांतराने गहाळ झाल्याने प्रसिद्ध होऊ शकला नाही. त्यानंतर नागपूर 'तरुण भारत'ने 'बंडी उलार झाली' या नावाने ग्रामीण कथाविष्करणाचे सदर सुरू केले होते. त्यावेळी तरुण भारतमध्ये त्यांच्या कथांना प्रसिद्धी मिळाली आणि इथून पुढे त्यांच्या साहित्य लेखनाची खरी वाटचाल सुरू झाली. साहित्य संमेलनामध्ये त्यांनी आपल्या कथा, कविता सादर केल्या. त्यावेळी रसिकांकडून मिळालेला प्रतिसाद त्यांच्या साहित्य लेखनाला उत्तेजक ठरला. उपरान्त त्यांच्या हातून विपुल प्रमाणात लेखन घडले.

लेखिकेचे बालपण खेडयात गेले असल्याने त्या खेडयातील माणसांचे राहणीमान, त्यांचे विचार, तेथिल प्रथा–परंपरा, सण–उत्सव, व्यवसाय, ग्रामीण स्त्रीजीवन व पुरुषी वर्चस्व त्यांनी जवळून पाहिले होते. ते अनुभवलेले जीवन, घटना–प्रसंग त्यांच्या साहित्यात ठायीठायी विखुरलेले आहे.

शिक्त असताना लेखिका हाल अपेष्टेचे जीवन जगल्या. पण शिक्षणाचे ध्येय त्यांनी सोडले नाही. आजोबांचे संस्कार, रसिकांचे प्रेम, त्याबरोबरीने लेखनासाठी सर्व कर्तव्ये, जबाबदाऱ्या सांभाळून जागरणे सोसली. अफाट मेहनत, कष्ट घेतले. असे उपद्व्याप सोसूनही त्यांनी नेमाने लेखन केले. आज वऱ्हाडी बोली भाषेतील लेखिका म्हणून प्रतिमा इंगोले यांचा साहित्यक्षेत्रात नावलौकिक आहे.

**कथा लेखन**

'हजारी बेलपान', 'आकसिदीचे दान', 'सुगरनचा खोपा', 'जावयाचं पोर', 'लेकभुईची', 'हिरवे स्वप्न', 'अंधारपर्व', 'अमंगळ युग', 'बोलक्याचे बोंड', 'येळी माया', 'शेतकरी व्यथा', 'पजाया', 'उलटे झाले पाय' असे कथासंग्रह लेखिकेच्या नावावर आहेत.

**कादंबरी लेखन**

'बुढाई', 'पार्टटाईम', 'बोडखी', 'मोहरा', 'नक्षलग्रस्त', 'लळिताचे रंग', 'राशाटेक' अशा कादंबऱ्या लेखिकेने लिहिल्या आहेत.

**काव्य लेखन**

'भुलाई', 'उदयसोहळा', 'हंबर', 'गर्भालय', 'उदक्कार', 'शेतकऱ्याची नारी' हे लेखिकेचे प्रकाशित कविता संग्रह आहेत.

**ललित लेखन**

'बयनाचे बोल', 'झेंडवाईचे दिवे', 'उजाड अभयारण्य' असे तीन ललित निबंधांचे संग्रह लेखिकेने लिहिले आहेत.

**वैचारिक लेखन**

'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता', 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच!' हे खास स्त्रीजीवनावर लिहिलेले वैचारिक संग्रह लेखिकेने लिहिले आहे.

**माहितीपर लेखन**

‘वैदर्भीय’, ‘लोक संस्कृती आणि स्त्रीजीवन’, ‘पारंपरिक स्त्रीगाथा’ असे लेखिकेचे स्त्री संबंधीत माहितीपर लेखन आहेत.

**समीक्षात्मक लेखन**

‘आस्वाद गंध’ हे लेखिकेचे समीक्षात्मक लेखन आहे.

**बालसाहित्य**

‘वाघाचे घर’, ‘करारी आजी’, ‘अपंगाची करामत’, ‘आगळे जंगल’, ‘भंडाऱ्याचे गाव’, ‘लाजाळू’, ‘माध्यमा’, ‘सोन्याचं बाळ’, ‘बापू गुरूजी’, ‘स्वप्नातील राजा’, ‘सिपनेचे स्वप्न’, ‘सख्यांच्या गोष्टी’, ‘सावित्रीबाई फुले’, ‘उजळ आजोबा’, ‘जिजाऊ’, ‘दृष्ट’, ‘बोरंवालीबाई’, ‘मोठ्ठं व्हायचं कसं’ असे लहान मुलांसाठी लेखिकेने लेखन केलेले दिसून येते.

**संपादित**

‘ऋणामोचन’, ‘श्यामतुरा’, ‘श्यामगाणे’, ‘सोनपीस’, ‘श्यामवेल’, ‘वऱ्हाडी लोकगाथा’.

**प्रतिमा इंगोले यांना मिळालेले पुरस्कार**

१. यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार

२. कृष्णाबाई मोटे पुरस्कार

३. गिरिजा कीर पुरस्कार

४. आचार्य अत्रे पुरस्कार

५. ना. सी. फडके पुरस्कार

६. चि. वि. जोशी पुरस्कार

७. उत्कृष्ट स्त्रीजीवनपर पुरस्कार

८. ग्रंथोत्तेजक पुरस्कार

९. प्रबोधन पुरस्कार

१०. नागसेन पुरस्कार

११. सह्याद्री वाहिनीचा नवरत्न पुरस्कार

१२. जिजामाता पुरस्कार

१३. दत्ता डावजेकर स्मृती पुरस्कार

१४. स्वयंसिद्धा पुरस्कार

१५. संत गोरोबा सामाजिक पुरस्कार

१६. शकुंतला जोग पुरस्कार

१७. शब्दगंध पुरस्कार

१८. विश्वनाथ पार्वती पुरस्कार

१९. शशिकला आगाशे बालवाङ्मय पुरस्कार

२०. लोकमत दैनिकाचा पुरस्कार

२१. जनसंवाद पुरस्कार

२२. छत्रपती शिवाजी पुरस्कार

२३. सु. ल. गद्रे पुरस्कार

२४. राजरत्न पुरस्कार

२५. लोकमित्र सरदार पुरस्कार

२६. महाराष्ट्र सरकारचे बालसाहित्य पुरस्कार

२७. विदर्भ भूषण पुरस्कार

२८. मालती दांडेकर जीवनगौरव पुरस्कार

२९. रोहमारे पुरस्कार

३०. बहिणाबाई पुरस्कार

३१. ठाकूर देसाई पुरस्कार

३२. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे गोखले नी. स. पुरस्कार

३३. शिरोळे पुरस्कार

३४. स्वातंत्र्य सैनिक कडलग पुरस्कार

३५. पत्र पंडित पां. वा. गाडगीळ पुरस्कार

३६. डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार चंद्रपूर

३७. वैराग्य महामेरू वाङ्मयदीप पुरस्कार

३८. महाराष्ट्र सारस्वत पुरस्कार

३९. राजर्षी शाहू महाराज पुरस्कार

४०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

४१. वसंत वऱ्हाडपांडे बालसाहित्य पुरस्कार

४२. पदमश्री विखे पाटील पुरस्कार

**सन्मान**

१४ नोव्हेंबर २०१० रोजी सांगलीत झालेल्या ७व्या मराठा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद

२०१२ सालच्या डिसेंबरमध्ये पांढरकवडा येथे झालेल्या केशरस्त्री साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

२० ते २२ ऑक्टोबर २०१२ या काळात निप्पाणीला झालेल्या दुसऱ्या अखिल भारतीय लोकमंगल कृषी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

३० मे २०१८ रोजी झालेल्या ६व्या बोली साहित्य संमेलनाचे इचलकरंजी येथे अध्यक्षपद.

## उ. अरुणा ढेरे यांचा थोडक्यात जीवन परिचय

अरुणा ढेरे या सौ. इंदुबाला व रामचंद्र ढेरे यांच्या सुकन्या. त्यांचा जन्म पुणे येथे २ फेब्रुवारी १९५७ रोजी झाला. मिलिंद आणि वर्षा हे त्यांचे लहान भाऊबहिण. त्यांची आत्या प्रमिला ढेरे ही त्यांच्याबरोबर राहत होती. असे अवघ्या सहाजाणांचे ते मध्यमवर्गीय कुटुंब. लेखिकेला त्यांच्या आजी–आजोबांचा सहवास लाभला नसला तरी घराण्याचे पिढयान्पिढया चालत आलेले संस्कार त्यांना वडिल, आई आणि त्यांच्या आत्याकडून मिळाले. त्यांच्या घरातील सर्व मंडळी ज्ञानपिपासू होती. त्यांचे वडील डॉ.रामचंद्र चिंतामण ढेरे हे संशोधक होते. ही संशोधकाची दृष्टी लेखिकेलाही आहे. घरातील असे अभ्यासपूर्ण वातावरण लेखिकेच्या जडणघडणीला पोषक ठरले.

लेखिका चार वर्षांच्या असताना पानशेतच्या पुरामुळे त्यांच्या कुटुंबाने जुने घर बदलले व ते नव्या घरात आले. परंतु नव्या घरामध्येही पुराचे पाणी शिरले. पाण्यामुळे चिखलाने माखलेली जमीन, ओल्या झालेल्या भिंती यामुळे त्यांना भरपूर त्रास सोसावे लागले. अशा परिस्थितीतही त्यांचे कुटुंब नशीबाला दोष देणारे नव्हते. त्यांचे वडील रात्रदिवस लेखन करत होते. कुटुंब सावरण्यासाठी वडिलांबरोबरीने लेखिकेची आई व आत्या या दोघीही स्वतःच्या परिने हातभार लावत असे. बाहेर शाळा शिकवून आल्यावर रात्री जागून लोकांचे कपडे शिवणारी आत्या तर घर, घरातील मुलंबाळं, घरातील कामं करणारी लेखिकेची आई कुटुंब पालनासाठी मदत करत असत. नात्याची घट्ट वीण, नात्यातला विश्वास, मोकळेपणा लेखिकेला जाणवत राहिला. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न झाले. घराण्याचे संस्कार त्यांच्या मनावर कोरले गेले. त्यांच्या घरातील सुसंस्कृत वातावरणाने त्यांच्या मनाला सर्वार्थाने संपन्न केले आहे.

## शिक्षण

अरुणा ढेरे यांचे प्राथमिक  शिक्षण पुण्यामधल्या नूतन मराठी विद्यालयात पूर्ण झाले. त्यानंतरचे माध्यमिक शिक्षण त्यांनी हुजूरपागेत पूर्ण केले. या शाळेचे सांस्कृतिक, शिस्तीचे वातावरण लेखिकेच्या वाङ्मयीन अभिरूचीला उत्तेजक ठरले. या शाळेत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त त्यांना बरेच काही गवसले. शिक्षकांकडून योग्य मार्गदर्शन त्यांना मिळाले. या शाळेत प्रवेश मिळाल्यामुळे त्यांना संस्कारक्षम वयात योग्य ती वाङ्मयीन जाणीव झाली.

माध्यमिक शिक्षणपूर्ण झाल्यानंतर बी. ए. साठी लेखिकेने पुण्याच्या स. प. महाविद्यालयात प्रवेश मिळवून मराठी विषयातून १९७७ मध्ये बी. एचे शिक्षण पूर्ण केले. बी. एला त्या सर्वप्रथम आल्या व सुवर्णपदकासह त्यांनी अकरा पारितोषिके पटकावली. बी. ए. करत असताना टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून ‘भारतीय प्राच्यविद्या पदविका’ संबंधीचा अभ्यास करून यशवंतराव चव्हाण पारितोषिक मिळवले. पुढे १९७९ साली त्यांनी पुणे विद्यापीठातून एम. ए. केली. एम. ए. करत असताना लेखिकेने अफाट वाचन केले. तिथेही त्या सर्वप्रथम आल्या. त्यावेळी त्यांना एकूण तेरा पारितोषिके मिळाली. याच सुमारास लेखिकेने ‘माणूस’ साप्ताहिकात पुस्तकांविषयीचे लेखन करायला सुरुवात केली होती.

इ.स. १९८३ सालात 'स्वातंत्र्योत्तर मराठी कथा–कादंबऱ्यांचा अनुबंधात्मकअभ्यास' हा विषय घेऊन डॉ. भालचंद्र फडके यांच्या मार्गदर्शनाखाली लेखिकेने पीएच. डी. पदवी मिळवली.

## नोकरी

अरुणा ढेरे यांनी १९८३ ते १९८८ ही सहा वर्षे पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक माध्यम संशोधन केंद्रात अध्यापक–निर्माती म्हणून काम केले. तसेच १९८९ ते १९९१ या काळात त्यांनी 'राज्य शिक्षणशास्त्र संस्थेत साहित्य विभाग प्रमुख म्हणून काम पाहिले. त्याचबरोबर भारती विद्यापीठाच्या स्त्री सर्जनशक्ती विकास केंद्राच्या संचालिका म्हणून त्यांनी काम केले. तसेच 'पर्याय' या मासिकाच्या संपादिका म्हणूनही त्या कार्यरत होत्या.

## अरुणा ढेरे यांचे वाङ्मयीन कार्य

बालवयापासूनच लेखिकेच्या वाङ्मयीन व्यक्तित्त्वाची जडणघडण झालेली आहे. वाचनाची आवड, स्वतःचे विचार मांडण्याचा मोकळेपणा, संशोधनाची दृष्टी त्यांना त्यांच्या वडिलांकडून मिळाली. त्याचबरोबर घरातील इतर माणसांकडून त्यांना प्रोत्साहन मिळाले. लहानपणीच चांगली पुस्तके त्यांनी वाचली. त्यातूनच त्यांच्या वाचनात लवचिकपणा आला. वाचनामुळे त्यांच्याकडे शब्दभांडार तयार झाले. केवळ मराठी इंग्रजी नव्हे तर बंगाली, कानडी त्यांनी शिकून घेतली. याही भाषेतील साहित्य त्यांनी वाचलेले दिसते. वाचनामुळे जगाचे विविध पैलू त्यांनी समजून घेतले. लहानपणी ज्या गोष्टी त्या शिकल्या त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर दिसून येतो.

कविता, कथा, कादंबरी, ललित लेखन, बालवाङ्मय, समीक्षात्मक लेखन, सामाजिक इतिहासपर लेखन अशाप्रकारचे लेखन लेखिकेने केलेले दिसून येते.

### कविता लेखन

बालवयात वाचलेल्या कविता, घरात ऐकलेल्या आरत्या, श्लोक, स्तोत्रे, दारात येणाऱ्या वासूदेवाकडून ऐकलेली गाणी, बायकांकडून ऐकलेल्या ओव्या यातून लेखिकेला कविता लेखनाची आवड जडली. स्त्रियांच्या आयुष्यातील समस्या, निसर्गचित्रणे, जीवनविषयक

चिंतन, स्त्री—पुरुष नातेसंबंधाचे चित्रण असा विविधांगी आविष्कार त्यांच्या कवितेत झालेला दिसून येतो.

‘प्रारंभ’ (१९८७), ‘मंत्राक्षर’ (१९९०), ‘निरंजन’ (१९९४), ‘यक्षरात्र’ (१९९७), ‘जावे जन्माकडे’ (१९९८), ‘निळया पारदर्शक अंधारात’ (२००४) असे लेखिकेचे कविता संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. प्रगल्भ चिंतन, काव्यात्मकता, लयबद्धता तशीच संवेदनशीलतेतून त्यांची कविता प्रकट झालेली दिसते.

## कथा लेखन

लेखिकेने आपल्या कथांतून स्त्री जीवनाचा वेध घेतला आहे. त्यांच्या कथेतून स्त्रीशक्तिचा प्रत्यय येतो. ‘कृष्णकिनारा’ (१९९२), ‘अज्ञात झऱ्यावर रात्री’ (१९९५), ‘उंच वाढलेल्या गवताखाली’ (२०००), ‘मन केले ग्वाही’ (२००१), ‘पावसानंतरचं ऊन’ (२००६), ‘प्रतिष्ठेचा प्रश्न’ (२००६) अशा सारखे लेखिकेचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

## कादंबरी लेखन

लेखिकेने लघुकादंबरी लेखनही केले आहे. ‘मैत्रेयी’ (१९८७), ‘उर्वशी’ (१९८९) व ‘महाद्वार’ (१९९०) अशा त्यांच्या तीन लघुकादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

## ललित लेखन

‘लावण्ययात्रा’ (१९८५), ‘रूपोत्सव’ (१९८८), ‘मनातलं आभाळ’ (१९९४), ‘काळोख आणि पाणी’ (१९९१), ‘भगव्या वाटा’ (१९९४), ‘नव्या जुन्याच्या काठावरती’ (२००१), ‘अर्ध्या वाटेवर’ (२००२), ‘वेगळी माती, वेगळा वास’ (२००२), ‘माणूस आणि माती’ (२००४) अशा सारखे ललित निबंध लेखांचे संग्रह लेखिकेच्या नावावर आहेत. त्यांचे ललित निबंध लेखन सकस झालेले आहे.

**बाल वाङ्मय**

'सुंदर जग हे' (१९९७) हा बाल कवितासंग्रह, 'शील हे कवच जीवनाचे' (१९७५), 'क्षमा–शांतीच्या शीतल ज्योती' (१९७५), 'जीवन त्यांना कळले हो!' (१९७५) असे तीन बालकथा संग्रह लेखिकेने लिहिले असून डॉ. रामचंद्र ढेरे यांच्या संस्कारमालेतून प्रसिद्ध झाले आहेत. त्याचबरोबर लेखिकेने लहान मुलांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेत 'येशू ख्रिस्त', 'भगवान बुद्ध', ज्ञानेश्वर' (१९७७) यांची चरित्रे लिहिली आहेत.

**समीक्षात्मक लेखन**

इतर लेखनाबरोबर लेखिकेने समीक्षात्मक लेखनही केले आहे. 'काळोखाचे कवडसे' (१९८७) हे ढेरे यांचे समीक्षात्मक पुस्तक आहे.

**लोकसाहित्यविषयक लेखन**

'लोकसंस्कृतीची रंगरूपे' (१९९०), 'लोक आणि अभिजात' (१९९३), 'आठवणीतले आंगण' (१९९९) अशी लोकसाहित्यविषयक पुस्तके लेखिकेने लिहिली आहेत.

**समाज इतिहासपर लेखन**

'विस्मृतीचित्रे' (१९९८), 'प्रकाशाचे गाणे' (१९९९), 'डॉ. विश्राम रामजी घोले आणि त्यांचा परिवार' (२००२), 'विवेक आणि विद्रोह' (२००४), 'त्यांची झेप त्यांचे अवकाश' (२०११) हे लेखिकेचे सामाजिक इतिहासपर लेखन आहे.

**संपादने**

अरुणा ढेरे यांनी संपादनाचे कार्य केले आहे. एकूण १२ संपादने लेखिकेच्या नावावर आहे. 'विवेकानंदांची पत्रे' (१९८२), 'अक्षर–दिवाळी'चे चार खंड १९८१ ते १९८४ या काळात संपादित केले आहेत. तर १९८७ साली 'नागमंडल'मध्ये नऊ मराठीतल्या नागकथांचे संपादन केले आहे. १९९१ साली शान्ता शेळके यांच्या सहयोगाने 'मराठी प्रेम कविता' हे पुस्तक

संपादित केले आहे. त्याचबरोबर 'बहिणाई' हा कविता विशेषांक(१९९३) व 'बहिणाई' दिवाळी वार्षिक कथा विशेषांक (१९९४) असे दोन विशेषांक संपादित केले आहेत.

त्याचबरोबर रा. चिं. ढेरे यांच्या ७०व्या वाढदिवसाच्या निमित्ताने २०००साली त्यांच्या व्यक्ती व वाङ्मयावर आधारित 'लोक संस्कृतीचे प्रतिभा दर्शन' हा ग्रंथ संपादित केला आहे. त्याचप्रमाणे २०००, २००१ व २००३ या सालांमध्ये 'सेतुबंध' नावाने दिवाळी वार्षिकाचे संपादन केले आहे. 'उमदा लेखक आणि माणूस' हा ग्रंथ वि. श. वाळिंबे यांच्या व्यक्ती व वाङ्मयावर आधारित २००१ सालात संपादित केला आहे. त्यानंतर स्त्री साहित्याचा मागोवा, खंड १ व २ हे २००० मध्ये सहयोगाने संपादन केलेले खंड आहे. तसेच ना. घ. देशपांडे यांचा निवडक कवितांवर आधारित 'सुगंध उरले' व 'दुर्गा भागवत व्यक्तिविचार आणि कार्य' अशा दोन ग्रंथांचे संपादन २०११ मध्ये केले आहे.

## अरुणा ढेरे यांना लाभलेले पुरस्कार व पारितोषिके

### पुरस्कारः

१. मधुकरराव महाजन स्मृती पुरस्कार (२००२)

२. संजीवनी मराठे स्मृती पुरस्कार (२००३)

३. मालतीबाई बेडेकर स्मृती शिष्यवृत्ती (२००४)

४. अनंत लाभसेटवार पुरस्कार (२०१०)

५. गोमंत देवी पुरस्कार (२०१२)

६. साहित्यातील पुरस्कार (२०१६)

७. शिवाजी सावंत साहित्य पुरस्कार (२०१७)

८. ग्रंथ पुरस्कार (मसाप) (२०१७)

### पारितोषिकः

१. कवी यशवंत पारितोषिक (मसाप) (१९८७)

२. कवी केशवसुत पारितोषिक (म. शासन) (१९८७–८८)

३. ह. श्री. शेणोलीकर पारितोषिक (मसाप) (१९८७)

४. ल. म. प्रभुणे पारितोषिक (१९८८)

५. महाराष्ट्र शासन पारितोषिक (१९८८–८९)

६. बालकवी पारितोषिक (म. शासन) (१९९०–९१)

७. श्याम पानगंटी पारितोषिक (१९९०)

८. वा. म. जोशी पारितोषिक (मसाप) (१९९१)

९. आनंदीबाई शिर्के पारितोषिक (मसाप) (१९९१)

१०. कवी कुसुमाग्रज पारितोषिक (मसाप) (१९९४)

११. कवी ना. धों. महानोर पारितोषिक (१९९४)

१२. काकासाहेब गाडगीळ पारितोषिक (१९९५)

१३. यंदे पारितोषिक (सार्वजनिक वाचनालय, नाशिक) (१९९५)

१४. साहित्यसम्राट न. चिं. केळकर पारितोषिक (१९९८)

१५. महामहोपाध्याय द. वा. पोतदार पारितोषिक (मसाप) (१९९८)

१६. महाराष्ट्र शासन पारितोषिक (१९९३–९४)

१७. बालकुमार साहित्य संमेलन पारितोषिक (१९७८)

१८. 'बहिणाबाई' (१९९३), 'बहिणाबाई' (१९९४), 'सेतुबंध' (२०००), 'सेतुबंध' (२००१) दिवाळी अंकाच्या संपादनासाठी मिळालेली पारितोषिके

१९. इंदिरा संत पारितोषिक (१९९८)

२०. राष्ट्रीय पारितोषिक (१९९९)

२१. पुणे मराठी ग्रंथालय पारितोषिक (२००२)

२२. ना. ह. आपटे पारितोषिक (२००२)

२३. चैत्रबन पारितोषिक (२००१)

२४. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणसभा, पुणे पारितोषिक (२००२)

२५. आचार्य अत्रे पारितोषिक (२००२)

२६. आदिशक्ती पारितोषिक (अगरवाल ट्रस्ट, पुणे) (२०००)

# संदर्भ ग्रंथांची सूची

## संदर्भ ग्रंथ सूचीः

१. आळतेकर मनोहर, 'मराठी निबंध', सुविचार प्रकाशन, पुणे, प्र. आ., १९६३

२. कऱ्हाडे सदा, 'समाज आणि साहित्य', प्रकाश विश्वासराव लोक वाङ्.मय गृह मुंबई, दु. आ.

३. काणेकर अनंत, 'पांढरी शिडे, प्रस्तावना', प्र. आ., १९५७

४. कुलकर्णी व. दि., 'साहित्यविचार', 'प्रदक्षिणा खंड–१', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण १९९७

५. कुलकर्णी विष्णु नारायण, 'मराठी ललित साहित्यातील निसर्ग', मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, नोव्हेंबर १९७२

६. केरकर प्रतिमा, 'माणूस', (साप्ताहिक), २७ एप्रिल १९८५

७. खांडेकर भालचंद्र, 'खांडेकरांचा लघुनिबंध एक लेणे एक देणे', सुविद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ., मे २००६

८. गेडाम–कांबळे विजया, 'वैचारिक निबंधाची परिक्रमा', गोदा प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ.,२०११

९. गोडबोले मंगला, 'सुनीताबाई', राजहंस प्रकाशन पुणे, पाचवी आवृती, २०१९

१०. गोखले द. न. (संपा.), 'साहित्यविचार', व्हीनस प्रकाशन पुणे

११. गंभडी वि. श., 'साहित्याचे तत्त्वज्ञान', मेहता पाब्लिशिंग हाऊस, प्र. आ., मार्च १९९७

१२. जोग रा. श्री., 'अभिनव काव्यप्रकाश', व्हीनस प्रकाशन, पुणे, अकरावी आ. २००४

१३. ढेरे अरुणा, 'अर्ध्या वाटेवर', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, द्वि. आ., २०१९

१४. ढेरे अरुणा, 'शाश्वताची शिदोरी', "निवडक आणि प्रस्तावना–वीणा देव", अभिजात प्रकाशन, पुणे, द्वि. आ. २०१४

१५. तांबोळी लक्ष्मीकांत, 'ललित लेखनाची व्याप्ती', प्रतिष्ठान, (संपा) सुधीर रसाळ, रा. र. बोराडे व इतर, 'प्रतिष्ठान' ललित गद्य विशेषांक, वर्ष २६वे, अंक ५ वा, जून–जुलै १९७९

१६. तेंडुलकर रमेश, 'मृण्मयी', सुविचार प्रकाशन, पुणे, प्र आ., १९८५

१७. दाभाळे जे आर, हिरवे आर. एस., 'सामाजिक मानसशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ.

१८. धाक्रस पुरुषोत्तम, ‘निवडक शांता शेळके’, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, द्वी. आ., २००३

१९. नलगे चंद्रकुमार, ‘आगीनफुल’, संजय प्रकाशन, पुणे ४

२०. नेमाडे भालचंद्र, ‘सहित्याची भाषा’, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ.,१९९८

२१. पाटणकर रा. भा., ‘सौंदर्यमीमांसा’, मौज प्रकाशन, मुंबई, चवथी आ. २००६

२२. प्रभुदेसाई सुधाकर (संपा.), ‘English English, Marathi Navneet Advance Dictionary

२३. फडके ना. सी., ‘गुजगोष्टी प्रस्तावना’, ‘प्रस्तावना’ दि. इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणे, आ. ५ वी, १९५८

२४. फडके भालचंद्र, ‘मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन’, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, प्र. आ., १९८०

२५. फडके विजय नारायण (संक.), ‘समग्र ना. सी. फडके खंड १० भाषणे व लघुनिबंध’, ना. सी. फडके फाऊंदेशन, प्र. आ., ऑगस्ट २०१०

२६. भागवत दुर्गा, ‘रंगरूप’, ‘प्रस्तावना’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वि. आ., १९८९

२७. भावे ह. अ., ‘विस्तारित शब्दरत्नाकर’, वरदा प्रकाशक प्रा. लि., पुणे, २ रे पुनर्मुद्रण, जानेवारी २००४

२८. यादव आनंद, ‘ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण:, २०१६

२९. यादव आनंद, ‘समस्या’, मेहता पाब्लिशिंग हाऊस, पुणे.

३०. वडेर प्रल्हाद, ‘ना. सी. फडके एक चिकित्सक अब्यास’, राजहंस वितरण, प्र. आ., १९९०

३१. वाकोडे मधुकर, ‘लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे’, १९९४

३२. वाघ विठ्ठल (संपा.), ‘आमची बोली’, मुनघाटे प्रमोद, “पथनाटक आणि लोकनाटक”, शिवाजी प्रि. प्रेस, आकोला, १९८७

३३. शिंदे स्वाती, ‘अरुणोदय’, संस्कृती प्रकाशन, पुणे, प्र. आ., २०१९

३४. शेरे निळकंठ, ‘डॉ. भाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारिक वाङ्मय’, सुविद्या प्रकाशन, प्र. आ., २००५

३५. शेळके मोहन, 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, पारतंत्र्यकाल ते स्वतंत्रकाल (१८१८ ते १९५०)', अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड

३६. शेळके शांता, '१९६० ते ८५ मधील ललित गद्य', ललित मासिक, संपा. कोठावळे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट १९८८

३७. सहस्त्रबुद्धे पु. ग., 'स्वभाव लेखन', मॉडर्न बुक डेपो, पुणे १९३८

३८. सारडा शंकर, 'ग्रंथसंवत्सर', पुष्प प्रकाशन पुणे, प्र. आ., १९९३

३९. सावंत वसंत, 'प्रवासवर्णन आणि लघुनिबंध किंवा ललित निबंध, प्रवासवणनः एक वाङ्मयप्रकार', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७

४०. हातकणंगलेकर म. द. (संपा.), 'वाङ्मयीन शैली आणि तंत्रे', अभिनव प्रकाशन, कोल्हापूर प्र. आ., १९८१

## साधन ग्रंथ सूचीः

१. इंगोले प्रतिमा, 'उजाड अभयारण्य', सोनल प्रकाशन, अमरावती, प्र. आ. २००९

२. इंगोले प्रतिमा, 'झेंडवाईचे दिवे', देशमुख आणि कंपनी प्रा. लि., पुणे, प्र. आ. २००२

३. इंगोले प्रतिमा, 'बयनाचे बोल', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९८

४. इंगोले प्रतिमा, 'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता', सोनल प्रकाशन, अमरावती, प्र. आ. १९९८

५. इंगोले प्रतिमा, 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?', सोनल प्रकाशन, अमरावती, प्र. आ. २००९

६. ढेरे अरुणा, 'लावण्ययात्रा', सुरेश एजन्सी, पुणे, प्र. आ. १९८७

७. ढेरे अरुणा, 'रूपोत्सव', सुरेश एजन्सी, पुणे, दु. आ. १९८८

८. ढेरे अरुणा, 'काळोख आणि पाणी', सुरेश एजन्सी, पुणे, दु. आ., २००९

९. ढेरे अरुणा, 'भगव्या वाटा', सुरेश एजन्सी, पुणे, दु. आ. २०१९

१०. ढेरे अरुणा, 'मनातलं आभाळ', सुरेश एजन्सी, पुणे, प्र. आ. १९९४

११. ढेरे अरुणा, 'नव्या–जुन्याच्या काठावरती', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, दु. आ. २००९

१२. ढेरे अरुणा, 'अर्ध्या वाटोवर...', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, दु. आ. २०१९

१३. ढेरे अरुणा, ‘वेगळी माती, वेगळा वास’, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, तिसरी आ. २०१८
१४. ढेरे अरुणा, ‘माणूस आणि माती’, नावीन्य प्रकाशन, पुणे, दु. आ. २०१९
१५. देशपांडे सुनीता, ‘सोयरे सकळ’, मौज प्रकाशन, मुंबई, सहावी आ. २०१२
१६. देशपांडे सुनीता, ‘मण्यांची माळ’, मौज प्रकाशन, मुंबई, पाचवी आ. २०१०
१७. देशपांडे सुनीता, ‘मनातलं अवकाश’, मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आ. २०१२
१८. शेळके शान्ता, ‘आनंदाचे झाड’, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, १९८२
१९. शेळके शान्ता, ‘धूळपाटी’, सुरेश एजन्सी, पुणे, पाचवी आ., २०१५.
२०. शेळके शान्ता, ‘पावसाआधीचा पाऊस’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनमुद्रण २०११
२१. शेळके शान्ता, ‘एकपानी’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तिसरी आ., २००५
२२. शेळके शान्ता, ‘मदरंगी’, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, प्र. आ., १९८९
२३. शेळके शान्ता, ‘वडीलधारी माणसे’, सुरेश एजन्सी, पुणे, आठवी आ. २०१६
२४. शेळके शान्ता, ‘संस्मरणे’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण, २०११
२५. शेळके शान्ता, ‘जाणता अजाणता’, परचुरे प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९९५
२६. शेळके शान्ता, ‘इतस्ततः’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. १९९८
२७. शेळके शान्ता, ‘ललित नभी मेघ चार’, ज्ञानदा पब्लिकेशन्स प्रा. लि., प्र. आ., १९९८
२८. शेळके शान्ता, ‘रंगरेषा’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण, २०१४
२९. शेळके शान्ता, ‘सांगावेसे वाटले म्हणून’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण, २०१३
३०. शेळके शान्ता, ‘मनातले घर’, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २०००
३१. शेळके शान्ता, ‘आतला आनंद’, सुरेश एजन्सी, पुणे, तिसरी आ. २०१३
३२. शेळके शान्ता, ‘नक्षत्रचित्रे’, सुरेश एजन्सी, पुणे, तिसरी आ. २०१५
३३. संत इंदिरा, ‘मृद्गंध’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण २०१८
३४. संत इंदिरा, ‘फुलवेल’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९७